लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील आदिवासी विकास विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.२) यावरील

सत्तावन्नावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा/विधानपरिषद सभागृहास
दिनांक जून/जुलै, २०१९ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर
जून/जुलै, २०१९

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालामधील आदिवासी विकास विभागाशी संबंधित(परिच्छेद क्र. २.२) यावरील

सत्तावन्नावा अहवाल

लोकलेखा समिती
२०१७-२०१८

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

* (८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

** (१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(१०अ) ॲड. पराग अळवणी, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

*** (१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

**** (२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

***** (२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

****** (२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

******* (२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

निमंत्रित :

******** (२७) श्री. प्रसाद लाड, वि.प.स.

********* (२८) श्री. रामदास आंबटकर, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (का.),

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रवींद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* श्री. योगेश सागर, वि.स.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रीमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.

** श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १४ फेब्रुवारी, २०१९ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

*** श्री. सुरेश ऊर्फ बाळू धानोरकर, वि.स.स. यांनी दिनांक २२ मार्च, २०१९ रोजी आपल्या सदस्य पदाचा राजीनामा दिल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.

**** श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची पुन्हा दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

***** श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

****** श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे सदर जागा रिक्त झाली.

******* श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित समिती सदस्य म्हणून दिनांक ६ सप्टेंबर, २०१७ रोजी नामनियुक्ती केली होती. दिनांक २७ जुलै, २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांची निमंत्रित समिती सदस्यत्वाची नियुक्ती संपुष्टात आली होती. ते विधानपरिषद सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यामुळे मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची दिनांक ५ सप्टेंबर, २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून रिक्त जागेवर नामनियुक्ती केली.

******** श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक १ मार्च, २०१९ रोजी “ विशेष निमंत्रित ” समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

********* श्री. रामदास आंबटकर, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक २ मे, २०१९ रोजी “ विशेष निमंत्रित ” समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ च्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवाल यावर विचार करून लोकलेखा समितीचा सत्तावन्नावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक ६ व २० जून २०१८, २० ऑगस्ट, २०१८, १८ सप्टेंबर, २०१८ व ४ आणि १६ ऑक्टोबर, २०१८ रोजी प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधान भवन, मुंबई येथे घेण्यात आली.

महालेखाकार लेखापरीक्षा-दोन, महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट " अ " मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट " ब " मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक १८ जून, २०१९ रोजीच्या बैठकीत आदिवासी विकास विभागासंदर्भात तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन :
मुंबई/नागपूर,
दिनांक १८ जून, २०१९.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अनुक्रमांक (१)	विभाग व तपशील (२)	पृष्ठ क्रमांक (३)
	प्रस्तावना	(पाच)
(१)	**आदिवासी विकास विभाग** (परिच्छेद क्र. २.२)	१

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील

परिच्छेद क्र. २.२ " आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक योजना आणि इतर संबंधित कार्याची अंमलबजावणी "

१.१ भारताचे नियंत्रक व महालेखपरिक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या सामान्य व सामाजिक क्षेत्र अहवालात महालेखापालांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

परिच्छेद क्रमांक	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.२.१	दिर्घावधी परिप्रेक्ष्य योजनेचा अभाव . एखाद्या घटकाचे दिर्घावधी देय वेळेत साध्य करण्यासाठी नितीबध्द तंत्र नियोजन आवश्यक आहे. आदिवासी विकास विभागाने सर्व प्रकल्प अधिका-यांना त्यांच्या अधिकार क्षेत्रातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत (ITDP) पंचवार्षिक परिप्रेक्ष्य योजना तयार करण्याचे निर्देश दिले. (सप्टेंबर १९९३) तथापि, लेखा परिक्षेच्या असे निदर्शनास आले की, १९९२-९३ पासून २९ (निवडलेले आठ प्रकल्प अधिकारी अंतर्भुत) पैकी एकाही प्रकल्प अधिका-याने कोणतीही निर्घावधी परिप्रेक्ष्य योजना तयार केली नव्हती. प्रकल्प अधिका-यांनी स्थानिक मागण्या आणि निधी उपलब्धतेच्या आधारावर, कोणतेही भौतिक लक्ष निर्धारित न करता, फक्त वार्षिक योजना तयार केली. आणि ती मंजूरीकरीता जिल्हा नियोजन विकास समिती आणि अंतिमत; राज्य शासनाकडे सादर केली. मागील २२ वर्ष परिप्रेक्ष्य अहवाल संकलीत न करता राज्य शासन राज्यात आदिवासी उपयोजना राबवित आहे. परिप्रेक्ष्य योजना तयार न केल्याचे अनेक परिणाम झाले, जसे i) अंमलबजावणीच्या सर्व स्तरावर (TC, ATCs आणि POs) मोठया प्रमाणात अखर्चित शिल्लक, ii) नवीन शासकीय आश्रमशाळा आणि वसतीगृहांच्या बांधकामात लक्षणिय विलंब, iii) अनेक आश्रमशाळांमध्ये अनिवार्य शिक्षकांची रिक्त पदे, iv) आश्रमशाळांच्या व्यवस्थापनावर अवाढव्य खर्च करुन सुध्दा शासकीय आश्रमशाळांमध्ये प्रवेशाचा कल कमी होणे, v) धोरणातील विसंगतीमुळे आश्रमशाळांमध्ये आदिवासी मुलांसाठी गणवेशाचे प्रापण आणि वाटपात लक्षणिय विलंब झाला. vi) TC, ATCs आणि POs स्तरावर शिक्षण कक्ष स्थापन न केल्यामुळे योजनांचे समन्वय, संनियंत्रण आणि सर्वेक्षण निष्प्रभावी होते. vii) इ-गव्हर्नन्स ॲप्लीकेशन स्वॉफटवेअर, ज्याद्वारे राज्यशासनाला निधीचे अधिक चांगले व्यवस्थापन आणि निर्णय घेणे इत्यादि करीता मदत होणे अपेक्षीत होते, त्याचे कार्यान्वयन कमकुवत होते, आदिवासी विकास विभागाने दीर्घावधी परिप्रेक्ष्य योजना तयार करण्यात आली नसल्याची पुष्टी केली. (जानेवारी २०१६)	• केंद्र शासनाच्या सूचनानुसार राज्य स्तरावरुन पंचवार्षिक योजना निश्चित करण्यात येतात. राज्य व केंद्र शासनाच्या पंचवार्षिक योजनांमधील उद्दिष्टानुसार प्रत्येक वर्षी संबंधित क्षेत्रासाठी प्राथम्याने निधी उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही प्रकल्प स्तरावरुन करण्यात येते. राज्य स्तरावरुन सूचनानंनुसार संबंधित योजनांसाठी प्रत्येक वर्षी नियोजन आराखडे तयार करुन त्यास जिल्हा नियोजन समितीची मान्यता घेण्यात येते. • आदिवासी उपयोजनेंतर्गत असलेले विविध शैक्षणिक योजना आणि कार्याचा वित्तीय अंदाजपत्रके आणि मंजूर निधी त्या वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदीला अधीन राहुन खर्च केला जातो. • मागासवर्गीयांचे कल्याण (विशेषक्षेत्र) जिल्हास्तर व राज्यस्तर योजना मध्ये ज्या योजनासाठी दोनही स्त्रोतांमध्ये बाबनिहाय निधीची मागणी करतांना दोन्ही स्त्रोताद्वारे केलेली मागणीची पडताळणी करुन योग्य व आवश्यक तेवढी नियतव्ययाची मागणी करणेबाबत वेळोवेळी झालेल्या बैठकांमध्ये सुचना देण्यात आल्या आहेत. • जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना/घटक कार्यक्रम आराखडे तयार करताना नियतव्ययाच्या मागणीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सुचना दरवर्षी शासनस्तरावरुन माहे ऑक्टोबर महिन्यात परिपत्रकाद्वारे जिल्हा व विकास शिर्षनिहाय आर्थिक कमाल मर्यादा निश्चितकरण्यात येत आहे.

परिच्छेद क्रमांक	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.२.२	शासकीय आश्रमशाळांमध्ये दाखला घेणाऱ्यांच्या संख्येत घसरता कल. २०१०-१५ दरम्यान TDD यांनी आदिवासी विद्यार्थ्यांच्या सशक्तीकरणासाठी रु. ३४५१.१८ कोटी शासकीय आश्रमशाळेवर खर्च करण्यात आले. लेखापरिक्षेच्या निदर्शनास आले की, आश्रमशाळांच्या व्यवस्थापनेवर रु१७२९.५७ कोटी इतका खर्च करुन सुध्दा २.६९३ लक्ष मंजूर क्षमतेच्या विरुध्द आश्रम शाळांच्या प्रवेशामध्ये २०११ मधील २.०७ लक्ष वरून २०१४-१५ मध्ये १.९६ लक्ष इतका घसरता कल आढळला. यावरून असे निदर्शित होते की, आदिवासी लोकांनी त्यांच्या पाल्यांना शासकीय आश्रमशाळांमध्ये प्रवेश द्यावा यासाठी आकर्षित करण्याकरीता TDD वर्धनक्षम धोरण आखण्यात विफल ठरले. उपआयुक्त(शिक्षण) आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनी शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा घसरता प्रवेश कला याविषयीची पुढील कारणे दिली. (जुलै २०१५) १) TDD द्वारे पुरस्कृत शहरातील प्रख्यात इंग्रजी माध्यमांच्या शाळेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षित करणे आणि भारत सरकार पुरस्कृत एकलव्य रहिवाशी शाळा अंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना इतर शाळझंमध्ये प्रवेश घेण्याकरीता पर्यायी योजनांची सुरूवात २) वसाहती पासून एक किलोमिटरच्या आत जिल्हा परिषद शाळांची उपलब्धता आणि ३) घरगुती शेतीविषयक कामांकरीता विद्यार्थ्यांद्वारे त्यांच्या पालकांसोबत राहण्यास पसंती दर्शविणे. लेखापरिक्षणोत्तर बैठकिस सचिव TDD यांनी लेखापरिक्षा निरिक्षण अभिस्वीकृत केले (जानेवारी २०१६) आणि सांगितले की, शासकीय आश्रमशाळांमधील प्रवेशाच्या घसरत्या कलाचे विश्लेषण करण्यात येईल.	सन २०११-१२ ते सन २०१७-१८ आदिवासी विकासविभागाच्या अंतर्गत कार्यरत विविध शैक्षणिक संस्थामधील विद्यार्थी प्रवेश संख्या सन | नामांकीत शाळा | एकलव्य शाळा | शासकीय आश्रमशाळा | अनुदानित आश्रमशाळा | एकुण २०११-१२ | १,५०९ | १,२७७ | २,०७,००० | २,०५,३२२ | ४,१५,१०८ २०१२-१३ | १,७४० | १,४०१ | २,०४,१४७ | २,४४,५१० | ४,५१,७९८ २०१३-१४ | २,०४२ | १,९३४ | २,००,६४१ | २,४८,४०६ | ४,५३,९२४ २०१४-१५ | २,२५८ | १,९१३ | १,९६,३५७ | २,५३,५९१ | ४,५४,११९ २०१५-१६ | १५,३१० | २,१८९ | १,९१,८१८ | २,५६,०२६ | ४,६५,३४३ २०१६-१७ | १७,४२४ | २,५७६ | १,८७,३९२ | २,३१,१२३ | २,३१,१२३ २०१७-१८ | ८,९२९ | ३,२०६ | १,९१,७२९ | २,४९,०८९ | २,५२,९५३ **शासकीय आश्रमशांमधील विद्यार्थ्यांच्या संख्या कमी होण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.** • शिक्षण हक्क कायदा २००९नुसार प्रत्येक पालकाला व बालकाला त्याच्या इच्छेनुसार प्रवेश घेण्याचा अधिकार आहे. स्थनिक पातळीवर १ ते ३ कि.मी.च्या आत शाळा जिल्हा परिषदेच्या इ. १ली ते ५वी पर्यातच्या शाळा प्रत्येक गावात आहेत. शासकीय आश्रमशाळेप्रमाणे जिल्हा परिषद शाळेत मोफत गणवेश, पाठयपुस्तक, शिष्यवृत्ती या सुविधा मिळतात, त्यामुळे विद्यार्थ्यांचा स्थानिक शाळेत प्रवेश घेण्याचा कल आहे.त्यामुळे अनेक आश्रमशाळांमध्ये इ. १ली ते ५वी मध्ये विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात घटलेली आहे.. १० वी नंतर ।ा। नर्सिंग, विविध डिप्लोमा तसेच ११ वी १२वी साठी विद्यार्थ्यांचा तालूका व जिल्हा स्तरावर वसतिगृहात प्रवेशित होतात. एकलव्य निवासी शाळेतील विद्यार्थी हे बहुतांशी शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांमधून निवडले जातात. इंग्रजी शाळेमध्ये विद्यार्थ्यांना पाठविण्याचा पालकांचा कल वाढत आहे. वरील विविध कारणामुळे विभागाकडील शाळांमधील एकंदरीत विद्यार्थी संख्येत वाढ होत असली तरी शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी पटसंख्या कमी होत आहे.

परिच्छेद क्रमांक	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.२.३	**आश्रमशाळांच्या अभ्यासक्रमात अभ्यासबाहय विषयांचा अभाव.** आदिवासी विकास विभागाव्दारे प्रकाशित आश्रमशाळा संहिता २००६--०७ च्या नियम ३.१६ अनुसार, शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांनी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण (इयता १ ते ८) तसेच महाराष्ट्र मंडळ माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण (इयत्ता ४ थी ते १० वी करीता) यांचे व्दारे अभिस्वीकृत अभ्यासक्रम स्वीकारावयास पाहिजे. लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की, राज्य अभ्यासक्रमाचा भाग असलेले खेळ, चित्रकला आणि पेटिंग, नृत्य आणि गायन यासारखे अभ्यासक्रम विषय आश्रमशाळांच्या अभ्यासक्रमांत (शासकीय आणि अनुदानित) अंतर्भूत करण्यात आले नव्हते. हे विषय अंतर्भुत न केल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रतिभा, आवड आणि रुचियांच्या सर्वांगिण विकासामध्ये बाधा उत्पन्न होऊ शकते. आश्रमशाळा संहिता नियम ३.३(e) अनुसार अशा अभ्यासबाहय विषयांकरिता शिक्षकांची नियुक्ती शिक्षकांच्या मंजूर क्षमतेतून करता येते. तथापी, TDD व्दारे अशी कोणतीही नियुक्ती करण्यात आली नव्हती. सचिव TDD यांनी लेखापरीक्षा निरीक्षण मान्य केले आणि नमून केले की, आश्रमशाळा संहिता सुधारीत करण्यात येत आहे.	राज्यातील सर्व शासकीय व अनुदानीत आश्रमशाळांमध्ये इयत्ता १ ते ८ करीता महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थमार्फत तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम राबविला जातो. तसेच इ.९ वी आणि १० वी करीता महाराष्ट्र राज्य प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचे मार्फत तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम राबविला जातो. आश्रमशाळा संहितेमध्ये सुधारणा करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून त्यामध्ये राज्य अभ्यासक्रमाचा भाग असलेले खेळ, चित्रकला, पेटींग, नृत्य आणि गायन यासारखे विषयांचा समावेश करुन त्यासाठी आवश्यक शिक्षकवर्ग प्रस्तावति करण्यात येत आहेत. तात्पुरत्या स्वरुपात खेळासाठी क्रीडा प्रशिक्षक कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत दि. ६.३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये कळविण्यात आलेले आहे. पुढील शैक्षणिक वर्षात खेळासाठी प्रशिक्षक उपलब्ध करुन देण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच आश्रमशाळा संहितेस मंत्रीमंडळाची मान्यता घेऊन अन्य विषयासंदर्भात शिक्षक उपलब्ध करुन देण्यासाठी कार्यवाही करण्यात येणार आहे.

परि.क्र	परिच्छेद/मुद्दा	शासनाने केलेली कार्यवाही
२.२.२.४	**अनेक आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची रिक्त पदे.** निवडलेल्या ५२ पैकी २७ आश्रमशाळांद्वारे सादर केलेल्या माहितीवरुन असे निदर्शनात येते की, तक्ता२.२.१ मध्ये दर्शविल्या प्रमाणे, १५-२०१० दरम्यान अनेक आश्रमशाळांमध्ये बहुतांश अनिवार्य विषयांकरिता)हिंदी ,गणित, विज्ञान आणि समाज विज्ञान) शिक्षक उपलब्ध नव्हते.	

तत्क्ता २.२.१शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची वर्ष निहाय रिक्त पदे

वर्ष	इंग्रजी	मराठी	हिंदी	गणित	विज्ञान	समाज विज्ञान
२०१०-११	३	६	१४	१०	१८	१८
२०११-१२	३	७	१४	१२	१७	१७
२०१२-१३	२	६	१४	१०	१८	१९
१४-२०१३	३	७	१२	१२	१८	२०
१५-२०१४	३	८	१३	१३	१८	२१

स्त्रोत :आश्रमशाळांद्वारे सादर केलेली माहिती

वरील तक्तयावरुन असे निदिर्शनास येते की, मागील पाच वर्षा पासुन २७ पैकी कमीत कमी १२ आश्रमशाळांमध्ये २७ पैकी १० आश्रमशाळांमध्ये आणि २७ पैकी १७ आश्रमशाळांमध्ये अनुक्रमे हिंदी, गणित, आणि विज्ञान/समाज विज्ञान करिता शिक्षक उपलब्ध नाहीत. स्टॉपगॅप)Stopgap(व्यवस्थेनुसार इंग्रजी, मराठी आणि हिंदी विषय शिकविणारे शिक्षक

शासकीय आश्रमशाळा मंजुर भरलेली व रिक्त पदांचा तपशिल माहे ३१ मार्च २०१८ अखेर

अ. क्र.	पदनाम	अपर आयुक्त नाशिक			अपर आयुक्त ठाणे			अपर आयुक्त अमरावती			अपर आयुक्त नागपूर			एकूण		
		मंजुर	भरलेली	रिक्त	मंजुर	भरलेली	रिक्त	मंजुर	भरलेली	रिक्त	मंजुर	भरलेली	रिक्त	मंजुर	भरलेली	रिक्त
१	माध्य.मुख्या.	१७८	११६	६२	१०६	७६	३०	७३	६०	१३	८०	६०	२०	४३७	३१२	१२५
२	माध्य. शिक्षक	७१	४९१	२२१	४३६	३१६	१२०	३५५	२३६	११९	३१९	२५१	६८	१८२२	१२९६	५२८
३	क.म.शिक्षक	३३५	२१२	१२३	१८२	१२०	६२	१७२	१६०	१२	१८७	१४६	४१	८७९	६३८	२३८
४	प्राथ.मुख्या	६६	३	६३	२५	०	२५	२७	०	२७	१२	१	११	१३०	४	१२६
५	प्राथ. शिक्षक	१३३०	८२५	५०५	७८३	५३३	२५०	५९३	३७४	२१९	५९५	३२५	२७०	३३१	२०५१	१२४४
६	पद.प्राथ.शिक्षक	२२०	९७	१२३	१२६	७५	५१	९१	४८	४३	८१	६३	१८	५१८	२८३	२३५
७	क्रीडा शिक्षक	०	०	०	२	०	२	०	०	०	०	०	०	२	०	२
८	चित्र.शिक्षक	०	०	०	२	०	२	०	०	०	०	०	०	२	०	२
एकुण शिक्षक संवर्ग		२८४१	१७४४	१०९७	१६६२	११२२	५४०	१३११	८७८	४३३	१२७७	८४६	४३१	७०९१	५९०	२५०१

शिक्षकांच्या भरतीसाठी अपर आयुक्त हे नियुक्ती प्राधिकारी उपरोक्त रिक्त पदांपैकी विषय शिक्षकांची ७६६ पदे रिक्त आहेत. त्याचा पद निहाय तपशिल खालील प्रमाणे आहे.

अपर आयुक्त	पदनाम	रिक्त पदे	विषय निहाय रिक्त पदांचा तपशिल
नागपुर	माध्य.शिक्षक	६८	गणित १९, विज्ञान १९, इंग्रजी ९, मराठी १०, इतर ११
	कनिष्ठ महा. शिक्षक	४१	इति/राज्य-१, इंग्रजी ५, रसायन/भौतिक ७, मराठी ५, अर्थशास्त्र ३, गणित १३

गणित, विज्ञान आणि समाज विज्ञान सुध्दा शिकवित होते. ज्यामुळे त्यांच्यावर अधिक ओझे लादल्या गेले.

नाशिक	माध्य.शिक्षक	२२१	जनरल ९३, इंग्रजी ४४, गणित ४८, विज्ञान ३६
	कनिष्ठ महा. शिक्षक	१२३	भौतिक १५, इंग्रजी १५, मराठी ११, राज्य १०, इतिहास ४, भुगोल ४, अर्थशास्त्र १३, रसायन २७, गणित १३, जिवशास्त्र ११
ठाणे	माध्य.शिक्षक	१२०	गणित २५, विज्ञान १७, इंग्रजी २३, जनरल ५५
	कनिष्ठ महा. शिक्षक	६२	इतिहास ९, अर्थ ११,इंग्रजी १२, मराठी ९, भौतिक/गणित ८, रसायन ७, जिवशास्त्र ६
अमरावती	माध्य.शिक्षक	११९	गणित १३, इंग्रजी २७, विज्ञान ३३, जनरल ४६
	कनिष्ठ महा. शिक्षक	१२	रसायन ४, भौतिक ४ मराठी १, इतिहास १, राज्य १, इंग्रजी १
	एकुण	७६६	

अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक, अमरावती यांनी खालीलप्रमाणे विषय शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबात जाहिरात प्रसिध्द केलेली आहे. उमदवारांचे अर्ज प्राप्त झाले असून पुढील कार्यवाही सुरु आहे.

अ.क्र.	अपर आयुक्त	माध्यमिक शिक्षक		कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक				प्राथमिक शिक्षक
०१	नाशिक	गणित	१६	राज्यशास्त्र	५	भौतिक शास्त्र	८	१५५
		विज्ञान	१६	मराठी	६	रसायन शास्त्र	८	
		इंग्रजी	१४	अर्थशास्त्र	५	गणित	८	
		जनरल (मराठी/ हिंदी/इतिहास / भुगोल)	१६	इतिहास/भुगोल / इंग्रजी	१६	जीवशास्त्र	५	
		एकुण	६२	एकुण	६१			
०२	अमरावती	इंग्रजी	१५	रसायन	२			
		विज्ञान	२०	भौतिक	२			
		गणित	१०					
		एकुण	४५	एकुण	४			

		अपर आयुक्त, ठाणे :- शासकीय आश्रमशाळातील अनुसूचित क्षेत्रातील शिक्षक संवर्गातील प्राथमिक शिक्षक ११६, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक ०२, माध्यमिक शिक्षक ४३ अशी एकुण १६१ पदांसाठी जाहिरात प्रसिध्द केलेली होती. तथापि सदर भरती प्रक्रीयेस बिगर आदिवासी हक्क बचाव समिती शहापूर जि.ठाणे यांनी अनुसूचित क्षेत्र तील भरतीस मा.उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका क्र.८७८३/२०१४ दाखल केली असून मा.न्यायालयाचे आदेश दि.१५ मे २०१५ नुसार अनुसूचित क्षेत्रातील भरतीस अंतिम आदेश होई पर्यंत अंतरिम आदेशान्वये स्थगिती दिलेली आहे. अपर आयुक्त, नागपुर :-शासकीय आश्रमशाळेतील शिक्षक संवर्गातील अनुसूचित क्षेत्रातील ७, अनुसूचित क्षेत्रा बाहेरील ८ पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे. तथापि कागदपत्र तपासणी नंतर उमेदवारां कडुन प्राप्त झालेल्या पदव्युत्तर पदवी व बीएड च्या गुणपत्रिकेत गुणांऐवजी ग्रेडेशन असल्यामुळे त्या त्या विद्यापिठाकडुन ग्रेडेशनचे रुपांतर गुणांमध्ये करुन नियुक्ती आदेश निर्गमित करणे बाबत कळविले आहे. रिक्त पदां आभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणुन तासिका तत्वारील उमेदवारांकडुन शैक्षणिक कामकाज करुन घेण्यात येत आहे. सद्यस्थितीत १२९९ तासिका तत्वावरील कर्मचारी कार्यरत आहेत. त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे: प्रथमिक शिक्षक-६७६, पदविधर प्रथमिक शिक्षक-११६, माध्यमिक शिक्षक-३८४, कनिष्ठ महाविद्यालया शिक्षक-१२३

२.२.२.४ अनेक आश्रमशाळांची पदे रिक्त असल्याबाबत (५२ शासकीय आश्रमशाळांची पुरक माहिती)

अ.क्र.	प्रकल्प	शाळा	माध्य.मुख्या			क.महा.शिक्षक			प्राथ.मुख्याध्यापक			माध्यमिक शिक्षक			पद.प्राथ.शिक्षक			प्राथमिक शिक्षक		एकुण			
			मंजुर	भर	रिक्त	मंजुर	भर	रिक्त	मंजुर	भर	रिक्त	मंजुर	भर	रिक्त	मंजुर	भर	रिक्त	मंजुर	भर	रिक्त		भर	रिक्त
१	नाशिक	बोरीपाडा	१	०	१	८	७	१	०	०	०	४	४	०	१	१	०	६	६	०	२०	१८	२
२		धोंडबार	१	०	१	०	०	०	०	०	०	४	४	०	१	१	०	६	६	०	१२	११	१
३		नाळेगांव	१	१	०	४	२	२	०	०	०	४	४	०	१	१	०	६	६	०	१६	१४	२
४		शिरसगांव	१	१	०	०	०	०	०	०	०	४	४	०	१	१	०	६	४	२	१२	१०	२
५		देवगांव	१	१	०	७	३	४	०	०	०	४	४	०	१	१	०	६	५	१	१९	१४	५
६		तोरगण	१	१	०	०	०	०	०	०	०	४	४	०	१	१	०	६	६	०	१२	१२	०
७		देवसाने	१	१	०	०	०	०	०	०	०	४	३	१	१	१	०	६	६	०	१२	११	१
८		कोहर	१	१	०	७	७	०	०	०	०	४	२	२	१	०	१	६	४	२	१९	१४	५
९		आंबे	१	०	१	०	०	०	०	०	०	४	३	१	१	०	१	६	३	३	१२	६	६
१०		बोरवट	१	१	०	०	०	०	०	०	०	४	३	१	१	०	१	६	६	०	१२	१०	२
११	नंदुरबार	ढोंगसागळी	१	०	१	७	५	२	०	०	०	४	३	१	१	१	०	६	३	३	१९	१२	७
१२		बंधारे	१	०	१	०	०	०	०	०	०	४	४	०	१	१	०	६	२	४	१२	७	५
१३		नावली	१	०	१	०	०	०	०	०	०	४	२	२	१	०	१	६	१	५	१२	३	९
१४		भादवड	१	१	०	०	०	०	०	०	०	४	३	१	१	१	०	६	६	०	१२	११	१
१५		देवमोगरा आदर्श	१	१	०	०	०	०	०	०	०	९	३	६	०	०	०	०	०	०	१०	४	६
१६		कोठली	१	१	०	८	८	०	०	०	०	४	३	१	१	१	०	६	५	१	२०	१८	२
१७		खोकराळे	१	०	१	०	०	०	०	०	०	४	४	०	१	१	०	६	५	१	१२	१०	२
१८		गणोर	१	०	१	०	०	०	०	०	०	४	३	१	१	०	१	६	०	६	१२	३	२

१९		चास	१	१	०	०	०	०	०	०	०	४	३	१	१	१	०	६	१	५	१२	६	६
२०		नांदगांव	१	१	०	०	०	०	०	०	०	४	३	१	१	१	०	६	२	४	१२	७	५
२१		कुर्झे	१	०	१	०	०	०	०	०	०	४	४	०	१	१	०	६	२	४	१२	७	५
२२	जव्हार	ओझर	०	०	०	०	०	०	१	०	१	०	०	०	१	०	१	६	२	४	८	२	६
२३		धानवळ	०	०	०	०	०	०	१	०	१	०	०	०	१	१	०	६	४	२	८	५	३
२४		सुर्यमाळ	१	१	०	७	०	७	०	०	०	४	४	०	१	१	०	६	५	१	१९	११	८
२५		कारेगांव	१	१	०	४	४	०	०	०	०	४	४	०	१	१	०	६	३	३	१६	१३	३
२६		दाभेरी	१	०	१	४	४	०	०	०	०	४	०	४	१	०	१	६	१	५	१६	५	११
२७		बिलालपाडा	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	६	३	३	६	३	३
२८		ढेकाळे	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	१	१	०	६	५	१	७	६	१
२९		उपलाट	१	१	०	०	०	०	०	०	०	४	२	२	१	०	१	६	२	४	१२	५	७
३०	डहाणु	कांदरवाडी	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	०	६	३	३	६	३	३
३१		रणकोळ	१	१	०	०	०	०	०	०	०	४	४	०	१	१	०	६	३	३	१२	९	३
३२		वरवाडा	१	०	१	४	३	१	०	०	०	४	२	२	१	१	०	६	५	१	१६	११	५
३३		नाणिवली	१	१	०	०	०	०	०	०	०	४	२	२	१	०	१	६	४	२	१२	७	५
३४		सवणे	१	०	१	४	३	१	०	०	०	४	१	३	१	०	१	६	२	४	१६	६	१०
३५		राणीगांव	१	०	१	८	७	१	०	०	०	७	४	३	१	०	१	६	३	३	२३	१४	९
३६		आडनदी	०	०	०	०	०	०	१	०	१	०	०	०	१	१	०	६	३	३	८	४	४
३७	धारणी	रायपुर	१	१	०	०	०	०	०	०	०	७	२	५	५	१	०	६	२	४	१५	६	९
३८		टेंबुरसोंडा	१	१	०	८	८	०	०	०	०	६	५	१	१	१	०	६	६	०	२२	२१	१
३९		जरिदा	१	१	०	८	७	१	०	०	०	७	३	४	१	१	०	६	१	५	२३	१३	१०
४०	पांढरकवडा	रामपुर	१	१	०	०	०	०	०	०	०	४	४	०	४	०	४	६	२	४	१५	७	८

४१		जांब	१	१	०	७	७	०	०	०	०	४	४	०	१	१	०	६	४	२	१९	१७	२
४२		अंतरगांव	१	१	०	०	०	०	०	०	०	४	३	१	१	०	१	६	४	२	१२	८	४
४३		सोनुर्ली	१	१	०	०	०	०	०	०	०	४	३	१	१	१	०	६	४	२	१२	९	३
४४		नांझा	१	१	०	०	०	०	०	०	०	४	३	१	१	१	०	६	५	१	१२	१०	२
४५		रुढा	१	१	०	०	०	०	०	०	०	४	४	०	१	०	१	६	४	२	१२	९	३
४६	नागपुर	भोरगड	१	१	०	०	०	०	१	०	१	४	३	१	१	०	१	६	१	५	१३	५	८
४७		हिरापुर	१	०	१	०	०	०	०	०	०	४	३	१	१	१	०	६	६	०	१२	१०	२
४८		हरदोली	१	०	१	०	०	०	०	०	०	४	४	०	१	०	१	६	५	१	१२	९	३
४९		बेलदा	१	०	१	४	४	०	०	०	०	४	३	१	१	१	०	६	६	०	१६	१४	२
५०	चंद्रपुर	देवाडा	१	१	०	७	५	२	०	०	०	४	४	०	१	१	०	६	६	०	१९	१७	२
५१		जिवती	१	१	०	७	६	१	०	०	०	४	४	०	१	१	०	६	६	०	१९	१८	१
५२		मगी	१	०	१	०	०	०	०	०	०	४	२	२	१	०	१	६	०	६	१२	२	१०
एकुण			४६	२९	१७	११३	९०	२३	४	०	४	२००	१४७	५३	५२	३२	२०	३०६	१८९	११७	७२१	४८७	२३४

परिच्छेद क्रमांक	परिच्छेद/मुद्दा	शासनाने केलेली कार्यवाही
२.२.२.५	आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या संगणक प्रशिक्षण योजनेचे त्रुटीपूर्ण संकल्पन. TDD ने २०१०-११ या शिक्षण सत्राकरीता शासकीय आश्रमशाळेतील (इयत्ता v ते XII) आदिवासी विदयार्थ्यांसाठी संगणक प्रशिक्षण योजना मंजुर केली (जानेवारी २००९). योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रकल्प अधिका-यांनी (नोडल एजन्सी) रु.५० प्रति विदयार्थी प्रति माह (जर प्रशिक्षण विभागीय संगणकावर देण्यात येत असेल) आणि रु.६० प्रति विदयार्थी प्रति माह (जर प्रशिक्षण सेवा पुरवठादारांच्या संगणकावर देण्यात येत असेल) या दराने सेवा देणा-या खाजगी सेवा पुरवठादाराची निवड करुन, त्यांच्यासोबत कंत्राट करावयाचे होते. एका शिक्षणसत्राकरीता प्रशिक्षण कालावधी नऊ महिने होता. राज्य स्तरावर रु.२७.४१ कोटी संवितरण रकमेतुन २०१०-२०१५ दरम्यान रु.१५.८९ कोटी खर्च करण्यात आला. निवडक आठ प्रकल्प अधिकारी कार्यालयांमध्ये संवितरीत रु.११.७० कोटी रकमेच्या तुलनेत त्याच कालावधीत रु.६.९१ कोटी खर्च करण्यात आला. आदिवासी विदयार्थ्यांना देण्यात येणा-या संगणक प्रशिक्षण योजनेचे त्रुटीपुर्ण संकल्पन :- १. प्रशिक्षण कालावधीत संगणक वर्गाच्या तासांची संख्या, वर्गाचा कालावधी , प्रशिक्षण देण्यात येणा-या विदयार्थ्यांची संख्या, तसेच प्रशिक्षण कालावधी दर्शविणारी कोणतेही वेळापत्रक आखले नाही. रोख पुरवठादारांसोबत झालेल्या अटी व शर्तीनुसार मापदंड ठरविले प्रमाणे कार्यवाही का करण्यात आलेली नाही. २. पुरवठादारामार्फत १० संगणकांचा पुरवठा करण्यात आलेला नसतांना सुध्दा प्रकल्प अधिकारी मार्फत रु.६० प्रति विदयार्थी प्रतिमाहे अदायगी करण्यात आलेली आहे. ३. तीन प्रकल्प अधिकारी (डहाणु, चंद्रपुर, पांढरकवडा) एखादया महिन्याचे विदयार्थ्यांना देण्यात येणा-या प्रशिक्षण कालावधीच्या प्रत्यक्ष दिवसाच्य	• संगणक प्रशिक्षण कालावधीत दररोज घेण्यात येणाऱ्या संगणक वर्गाची / तासांची संख्या/वर्गाचा कालावधी आणि प्रशिक्षण देण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या तसेच प्रशिक्षण कालावधीत दर्शविणारे वेळापत्रक प्रशिक्षण देण्यात येणाऱ्या प्रत्येक आश्रमशाळेत दर्शनी भागात लावण्यात आलेले आहे. • सेवा पुरवठादारासोबत झालेल्या करारात आणि योजनेच्या मार्गदर्शक तत्वात शासन निर्णयानुसार नमूद करण्यात आलेले आहेत. • तसेच सदर संस्थेजवळ संगणक प्रशिक्षण देण्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. संस्थेच्या मालकीचे १० संगणक असणे आवश्यक आहे. इयत्ता ५ वी ते १२ वीच्या अभ्यासक्रमावर आधारीत संगणक प्रशिक्षण देण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. • सेवा पुरवठाधारकाने १० संगणक पुरविले होते. त्यांचे भाडेपोटी प्रती महा रुपये ६०/- देण्यात आले. शासन निर्णयानुसार योजनेच्या मार्गदर्शक तत्वाने तसेच करार अटीमध्ये विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचा किमान कालावधी नमूद केला आहे. • डहाणू प्रकल्पात सेवा पुरवठाधारकाचे कंत्राट करार वाढविण्यात अथवा नूतनीकरण करण्यात आले नाही. शासन निर्णयानुसार सन २०१४-२०१५ या शैक्षणिक वर्षात तीन वेळा ई-निविदा करण्यात आली होती. परंतु ई-निविदेला प्रतिसाद न मिळाल्यामुळे ई-निविदा रद्द करुन पुन्हा त्याच पुरवठाधारकांना कंत्राट देण्याचे पत्र अपर आयुक्त, ठाणे यांना देण्यात आले होते. त्यानुसार अपर आयुक्त, ठाणे यांचेकडून त्यास एक वर्षाची मंजूरी देण्यात आली होती. सन २०१०-१५ दरम्यान या योजनेचे स्वतंत्र मुल्यमापन केले होते. त्यात विद्यार्थ्यांच्या मुल्यमापनाचे मापदंड स्पष्टपणे नमूद केले आहेत. • अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना वरिष्ठ अधिकाऱ्यांशी बोलताना किंवा त्यांच्या प्रश्नाचे उत्तर देताना ते घाबरतात. त्यामुळे हार्डवेअर विषयी मुलभूत प्रश्न विचारले असता त्यांनी उत्तरे दिली नसती, परंतु आताच्या मुलांना संगणकाचे पूर्ण ज्ञान आहे. • डहाणू प्रकल्पात सन २०१४-१५ साठी एकुण ८२८९ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले असून त्यावर झालेला खर्च रुपये ४२,५३,१२०/-इतका झालेला आहे.

	संख्येची पडताळणी न करता त्या महिन्यात देण्यात येणा-या विदयार्थी संख्येस रु.६० ने गुणून पूरवठादारास रक्कम अदा केलेली आहे. ४. प्रशिक्षण संस्थेव्दारे देण्यात आलेल्या कार्य अहवालानुसार प्रकल्प् अधिकारी यांनी पुढील करार वाढविण्यात येऊन नूतनीकरण करण्यात आले. तथापी प्रकल्प अधिकारी यांनी २०१०-१५ दरम्यान स्वतंत्र मुल्यमापन केलेले नाही. प्रशिक्षणाची गुणवत्ता पडताळणी नाही. योजनेच्या मार्गदर्शक सुचनांमध्ये मुल्य् मापनाचे मापदंड स्पष्ट नमुद नसल्याने कराराचे वाढविणे वा संपुष्टात आणणे याकरीता अडचणी निर्माण झाल्या. ५. प्रकल्प अधिकारी डहाणु यांच्या कार्यशाळेतील १७ आश्रमशाळांमध्ये प्रशिक्षण संस्थेव्दारे देण्यात आलेल्या प्रशिक्षणाचे दस्ताऐवज (नस्ती) ठेवण्यात आले नाही. तसेच प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना संगणकाच्या मुलभुत हार्डवेअर बाबी ओळखता आलेल्या नाहीत. याबाबत काय आढावा घेण्यात आला. सचिव , आदिवासी विकास विभाग यांनी योजनेचा आढावा घेण्याबाबत मान्य केलेले होते , याबाबतचा अहवाल वा केलेली कार्यवाही ?	• पांढरकवडा प्रकल्पात सन २०१४-१५ साठी एकूण २६१२ विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतले व त्यावर झालेला खर्च रुपये ३,०६,१८०/- इतका झालेला आहे • चंद्रपूर प्रकल्प :- कार्यालयीन पत्र क्रमांक शिक्षण-२०१६/प्र.क्र.३(६)/२६९२ दिनांक ३१.०३.२०१६ अन्वये संगणक प्रशिक्षण नस्ती सन २००९ ते २०१३ या चार वर्षाचे एकुण देयक ६,३८,६९०/- रुपेय प्रशिक्षण योग्यरित्या व अटी शर्तीच्या अधिन राहून प्रशिक्षणाची रक्कम अदा करण्यात आलेली नाही.

परिच्छेद क्रमांक	परिच्छेद/मुद्दा	शासनाने केलेली कार्यवाही
२.२.२.६	**गणवेशाचे प्रापण आणि वाटप पध्दतीत विसंगती.** राज्यातील सर्व शासकीय आश्रमशाळांमधील आदिवासी विदयार्थ्यांना प्रत्येक शिक्षणसत्राच्या सुरुवातीलाच (प्रत्येक वर्षी १५ जुन) TDD द्वारे गणवेष पुरविण्यात यावयास पाहिजे. २०१०-१५ दरम्यान TDD द्वारे खरेदी आणि वितरण केलेल्या गणवेषाच्या दस्तावेजांच्या छाननीत खालीलप्रमाणे आढळले: २०१०-११, २०११-१२ आणि २०१४-१५ दरम्यान TDD ने आश्रमशाळांना प्रत्येक वर्षी जुन / जुलै महिन्यात कापड पुरविले होते. परंतू विदयार्थ्यांना तयार गणवेष पुरविण्यात आल्याच्या तारखा आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्याकडे उपलब्ध नाहीत. २०१२-१३ दरम्यान तीन महिन्याच्या विलंबाने आश्रमशाळांना तयार गणवेषाचा पुरवठा करण्यात आला. २०१३-१४ माहे ऑक्टोबर २०१३ ते मार्च २०१४ (तीन महिने ते १० महिन्याच्या विलंबाने) दरम्यान आश्रमशाळांना मुख्याध्यापकांना गणवेश भत्ते देण्यात आले. परंतू विदयार्थ्यांना गणवेष वाटप केल्याच्या तारखा आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्याकडे उपलब्ध नव्हत्या. २०१०-१५ दरम्यान, निवडलेल्या ५२ पैकी फक्त एका आश्रमशाळेत विदयार्थ्यांना वेळेत गणवेष पुरविण्यात आले (२०१०-११) तसेच, उर्वरीत चार वर्षात गणवेश वाटपाला नऊ महिन्यांपर्यतचा विलंब झाला. अशाप्रकारे गणवेष प्रापण आणि वाटपाच्या पध्दती मधील विसंगतीमुळे शासकीय आश्रमशाळांमधील विदयार्थ्यांना गणवेश उपलब्ध होण्यात विलंब झाला.	शासन निर्णयातील तरतूदीनुसार शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दरवर्षी गणवेशाचे दोन संच पुरविणेबाबत तरतूद आहे. • सन २०१०-११ या शैक्षणिक सत्रात शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना गणवेष कापड पुरवठा करणेसाठी संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग सह महासंघ मर्या. मुंबई यांना दि. ३०.०३.२०१० रोजी पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्यानुसार जुलै, २०१० अखेर प्रकल्प स्तरावर कापडाचा पुरवठा करुन शिलाई पुर्ण करुन ऑगस्ट, २०१० अखेर गणवेष संच पुरविले आहेत. • सन २०११-१२ या शैक्षणिक सत्रात शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना गणवेष कापड पुरवठा करणेसाठी संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग सह महासंघ मर्या. मुंबई यांना दि. ३०.०३.२०११ रोजी पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्यानुसार ऑगस्ट, २०११ अखेर प्रकल्प स्तरावर कापडाचा पुरवठा करुन शिलाई पुर्ण करुन सप्टेबर, २०११ अखेर गणवेष संच पुरविले आहेत. • सन २०१२-१३ या शैक्षणिक सत्रात शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना गणवेष पुरवठा करणेसाठी मे. श्री. जगदंबा महिला रेडीमेड ड्रेसेस विविध उत्पादन सहकारी औद्योगिक संस्था, मर्या., सोलापूर यांना रेडीमेड गणवेष पुरवठा करणेसाठी पुरवठा आदेश देण्यता आले होते. त्यानुसार ऑक्टोबर, २०१२ अखेर रेडीमेड ड्रेस वाटप करण्यात आले आहेत. • सन २०१३-१४ या शैक्षणिक सत्रात शासकीय आश्रमशाळेतील गणवेष ऐवजी थेट रक्कम त्यांचे बँक खात्यात जमा करणेसाठी शासन निर्णय दिनांक

		१२/०९/२०१३ नुसार तरतुद करण्यात आली होती. त्यानुसार विदयार्थ्यांचे बँक खात्यावर रक्कम जमा करण्यात आली. • सन २०१४-१५ या शैक्षणिक सत्रात गणवेश कापडाचे रंग व डिझाइन मध्ये बदल करण्यात आला आहे. त्यानुसार निश्चित केलेल्या कापडनिहाय मागणी विचारात घेऊन कापडासाठी दरकरारधारक व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांना दर करारातील मंजूर दराप्रमाणे पुरवठा आदेश निर्गमीत करण्यात आला. तथापि, मागणीनुसार कापड तयार करुन ते वाटप करण्यासाठी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांना काहीअंशी विलंब झालेला आहे. व त्यानुसार दंडनिय रक्कम वसुल करण्यात आलेली आहे. • सन २०१५-१६ या शैक्षणिक सत्रात शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना पुरवठा करावयाच्या गणवेश कापडाबाबत इ-निविदाद्वारे कार्यवाही करण्यात आली असून कापडाचे नमुने प्रयोगशाळेत तपासण्यासाठी पाठविण्यात आले असता एकही कापडाचा नमुना पात्र ठरला नाही. दुसरी व तीसरी फेर निविदा काढण्यात आल्यानंतर पात्र न्युनतम दरधारकास दिनांक ७.११.२०१५ रोजी पुरवठा आदेश निर्गमीत करण्यात आले. सन २०१५-१६ द्वितीय सत्र व सन २०१६-१७ प्रथम सत्रासाठी पुरवठा आदेश देण्यात आले. • सन २०१६-१७ मध्ये विद्यार्थ्यांना जुनच्या पहिल्या आठवडयामध्ये एक गणवेश संच पुरवठा करण्यात आला असुन सन २०१६-१७ द्वितीय सत्र व सन २०१७-१८ प्रथम सत्रासाठी दिनांक ५.१२.२०१६ रोजी पुरवठा आदेश देण्यात आला असुन विहित वेळेत पुरवठाही करण्यात आला आहे. • सन २०१७-१८ चे द्वितीय सत्रामध्ये प्रति विद्यार्थी रु.५००/- प्रमाणे विद्यार्थ्यांचे बँक-खात्यात रक्कम जमा करण्यात आली आहे.

वर्ष	वाटप दिनांक	विलंबाची कारणे
११-२०१०	जुलै २०१०	-
१२-२०११	ऑगष्ट २०११	-
१३-२०१२	ऑगष्ट २०१२	-
१४-२०१३	थेट रक्कम बॅकखात्यात जमा करण्यात आली	-
१५-२०१४	-	गणवेश कापडाचे रंग व डिझाइनमध्ये बदल करण्यात आला असल्याने काही अंशी विलंब झाला आहे.
१६-२०१५	डिसेंबर २०१५	तीन वेळेस फेर निविदा काढण्यात आल्या.
१७-२०१६	जुन २०१६	-
१८-२०१७	थेट रक्कम बॅकखात्यात जमा करण्यात आली	-

परिच्छेद क्रमांक	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.३.१	**शैक्षणिक योजनांतर्गत भरीव बदल.** जिल्ह्यातील आदिवासी लोकांच्या कल्याणाकरिता DPDC द्वारे मंजूर विविध योजन /कार्याच्या अंमलबजावणीकरिता TDD जिल्हाधिकाऱ्यामार्फत प्रकल्प अधिकाऱ्यांना निधीचे वाटप करतात. आदिवासींच्या फायदया करिता TDD राज्य शासनाच्या इतर समांतर विभागांना सूध्दा आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्या मार्फत विविध योजना/ उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी निधी वाटप करतात. २०१०-१५ दरम्यान आदिवासी उपयोजनेंतर्गत (TSP) TDD ला दिलेली एकुण तरतूद, शैक्षणिक योजनांकरिता वाटप केलेली तरतूद, झालेला खर्च आणि बचत खाली तक्ता २.२.२ मध्ये संक्षिप्तपणे दिले आहे.	शिक्षण विषयक योजनांवरील सन २०१०-११ ते २०१४-१५या वर्षामधील बचतीची कारणे सोबतच्या स्वतंत्र प्रपत्रात दिली आहेत. • जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम व राज्यस्तर योजनरसाठी नियतव्यची मागणी ही जिल्हयाचे पालकमंत्री /संबधीत जिल्हाधिकारी /प्रकल्प अधिकारी /संबधीत कार्यान्वय यंत्रणा यांच्या समंतीने शासनास सादर होतात.शासनस्तरावरुन मा.मंत्री आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली प्राप्त आराखडे राज्यरतरीत बैठकामध्ये चर्चा होऊन अंतिम: केले जातात. • सन २०१८-१९ चा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम अंतर्गत योजनांचा प्रारुप आराखडा सादर करतांना घ्यावयाचे दक्षता अंतर्गत नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या लेखा परिक्षण अहवालानुसार सन २०१७-१८ ची प्राप्त तरतुद सन २०१८-१९ साठी संभाव्य नियोजन करतांना आयुक्तालयांचे पत्र.क्र.नियो/१७/भानिवले/प्र.क्र./का५(१) दि.०१.०७.१७ अन्वये ४ हि अपर आयुक्त व सर्व प्रकल्प अधिकारी यांना अहवालातील सर्व बाबीची काळजी पुर्वक दक्षता घेऊन आराखडा तयार करुन खर्चाचे नियोजन व नियतव्याची मागणी करणे बाबत कळविण्यात आले आहे. • आदिवासी उपयोजनेअंतर्गत असलेले विविध शैक्षणिक योजना आणि कार्याचा वित्तीय अंदाजपत्रके आणि मंजुर निधी त्या वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदीला अधीन राहुन खर्च केला जातो. • मागासवर्गीयांचे कल्याण (विशेषक्षेत्र) जिल्हास्तर व राज्यस्तर योजना मध्ये ज्या योजना साठी दोन्ही स्त्रोतां मध्ये बाबनिहाय निधीची मागणी करतांना दोन्ही स्त्रेता व्दारे केलेली मागणीची पडताळनी करुन योग्य व आवश्यक तेवढी

वर्ष	TSP साठी TDD ला दिलेली अर्थसंकल्पीय तरतूद	शैक्षणिक योजनांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद	शैक्षणिक योजनांवर झालेला खर्च	शैक्षणिक योजनांतर्गत बचत
२०१०-११	१०७०.०१	४५५.२७	४१९.२०	३६.०७
२०११-१२	९५०.९५	६४८.०१	५२३.४०	१२४.६१
२०१२-१३	१३९१.५२	७६१.२०	६३२.०३	१२९.१७
२०१३-१४	१३०३.६८	१०२७.१८	९५१.४५	७५.७३
२०१४-१५	१४५०.४०	११७८.३०	९२५.१०	२५३.२०
एकुण	६१६६.५६	४०६९.९६	३४५१.१८	६१८.७८

स्त्रोत :TDD ने सादर केलेली माहिती

वरील तक्त्यावरुन असे दिसून येते की पाचही वर्षात बचत होती, ही बचत मुख्यत: विविध योजना, जसे St मुला-मुलींसाठी शासकीय

वसतिगृहे सुरू करणे आणि त्यांची देखभाल करणे, शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षकांना सेवेत प्रशिक्षण देणे , शासकीय आश्रमशाळा आणि वसतिगृहांचे बांधकाम आश्रमशाळांमध्ये मुलींच्या वसतिगृहांचे बांधकाम आणि सुवर्ण- महोत्सवी आदिवासी पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती योजना अशा विविध योजनांत झालेल्या बचतीमुळे होती.

निवडलेल्या आठ प्रकल्प अधिकारी कार्यालयांत २०१०-१५ दरम्यान अर्थसंकल्पीय तरतूद आणि शैक्षणिक योजनांवर झालेला खर्च खाली तक्ता २.२.३ मध्ये दर्शविला आहे.

तक्ता २.२.३ : निवडलेल्या आठ प्रकल्प अधिकारी कार्यालयातील अर्थसंकल्पीय तरतूद आणि खर्च (रु. कोटीत)

वर्ष	शैक्षणिक योजनांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद	शैक्षणिक योजनांवर झालेला खर्च	बचत
२०१०-११	२८७.८४	२६७.३०	२०.५४
२०११-१२	३६७.३०	३५५.०८	१२.२२
२०१२-१३	४५३.१७	३५८.६३	९४.५४
२०१३-१४	४७५.०९	४६२.८२	१२.२७
२०१४-१५	४६५.८१	३९०.७७	७५.०४
एकुण	२०४९.२१	१८३४.६	२१४.६[illegible]
स्रोत :TDD ने सादर केलेली माहिती			

या वरुन असे दिसून येते की निवडलेल्या आठ प्रकल्प अधिकारी कार्यालयांतही २०१०-१५ दरम्यान बचत झाली होती.

नियतव्ययाची मागणी करणे बाबत वेळोवेळी झालेल्या बैठकां मध्ये सुचना देण्यात आल्या आहेत.

- जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना/घटक कार्यक्रम आराखडे तयार करतांना नियतव्याच्या मागणीच्या अनुशंगाने मार्गदर्शक सुचना दरवर्षी शासनस्तरावरुन माहे ऑक्टबर महिन्यात परिपत्रकाव्दारे जिल्हा व विकासशिर्षनिहाय आर्थिक कमाल मर्याद निश्चीत करण्यात येत आहे.मा.लेखापरिक्षक निष्कर्ष मध्ये नमूद केलेल्या बाबीचे काही प्रमाणत प्रारुप आरखडे सादर करण्यात येत आहे.
- शैक्षणिक योजनांसाठी आवश्यक तेवढी तरतूद खर्च करण्यात येते. त्यानंतरची बचत अन्य योजनांसाठी पुर्नविनियोजनाने वळती करुन खर्च करण्यात आलेली आहे.

परिच्छेद क्र.	परिच्छेद.	केलेली कार्यवाही

२.२.३.२ रोकडवही आणि बँकेच्या रकमेत लक्षणीय फरक

निवडलेल्या आठ प्रकल्प अधिकारी, कार्यालयांतील मार्च २०१५ च्या रोकडवही आणि बँकेच्या विवरणपत्रांच्या पडताळणीत तक्ता २.२.४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे लक्षणीय फरक आढळला.

अ.क्र.	प्रकल्प कार्यालय	रोकड वही नुसार अखेरची शिल्लक	बँक विवरणपत्र नुसार अखेरची शिल्लक	रोकड वही शिल्लक आणि बँकेतील शिल्लक रक्कम यांचेतील फरक
१	डहाणू	८८.८२	१३२.८९	४४.०७
२	जव्हार	११.८७	१२२.४४	२.५४
३	नंदुरबार	२१.०२	३२.४४	११.४२
४	नाशिक	७६.०९	२२.८९	५३.२०
५	नागपुर	५२.३२	३३.६५	१८.६७
६	चंद्रपुर	३४.१५	१४.८३	१९.३२
७	धारणी	६५.६६	६६.६९	१.०३
८	पांढरकवडा	३४.५१	३४.३१	०.२०

अ.क्र.	प्रकल्प कार्यालय	रोकड वही नुसार अखेरची शिल्लक	बँक विवरणपत्रा नुसार अखेरची शिल्लक	रोकडवही शिल्लक आणि बँकेतील शिल्लक रक्कम यांच्यातील फरक
१	डहाणु	८८.८२	१३२.८९	४४.०७

प्रकल्प अधिकारी,डहाणु अंतर्गत् रोकड वही नुसार अखेरची शिल्लक ८८.८२ कोटी असुन बँक विवरणपत्रानुसार १३२.८९ कोटी शिल्लक असल्याने ४४.०७ कोटीची तफावत दिसुन येते. याबाबत प्रकल्प कार्यालय डहाणु यांनी पत्र क्र. शिक्षण २०१७-१८/प्र.क्र./का.२(१)३४४७ दि.१९/४/२०१८ अन्वये खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

सदरील ठक्करबाप्पा योजनेची ८० % रक्कम व शिष्यवृत्ती इतर योजनेची रक्कम अदा करणेसाठी माहे फेब्रुवारी २०१५ व मार्च २०१५ या महिन्यात धनादेश देण्यात आलेले होते. सदरील धनादेश मार्च २०१५ अखेरपर्यंत बँकेतुन पारित झालेले नसल्याने बँक विवरणपत्रात जादा रकमेचा फरक दिसुन येत आहे. परंतु सदरहु रकमेपैकी रु .४४०३६६९६६/- एवढया रकमेचे धनादेश मार्च २०१५ नंतर पारीत झालेले असून उर्वरित रक्कम रुपये ३४२०८२/- अद्याप पर्यंत वटलेल नाही.यास्त्व ४४.०७ कोटी या शिल्लक रकमेपैकी ४४.०४ कोटी रकमेचे धनादेश पारीत झालेले असल्याने कोणत्याही प्रकारची वित्तीय अनियमितता झालेली दिसनु येत नाही.

विशेषत: प्रकल्प अधिकारी, नाशिक, नागपुर, चंद्रपुर आणि पांढरकवडा (अ.क्र. ४,५,६ आणि ८) येथील स्थिती चिंताजनक आहे. कारण बँकेची अखेरची शिल्लक, रोकड वहीच्या अखेरच्या शिल्लक रकमेपेक्षा खूप कमी होती. (रु. ०.२० कोटी ते रु. ५३.२० कोटी) ज्यावरुन शासकीय पैशांची संभाव्य अफरातफर झाल्याचा संशय येतो. लेखापरिक्षेस पुढे असे आढळले की, ही परिस्थिती दीर्घावदीसाठी कायम होती. जेव्हा की प्रत्येक अतिरीक्त आदिवासी आयुक्त, कार्यालयात त्यांच्या अधिपत्याखाली एक मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी (CAFO) होते. आणि आदिवासी आयुक्त, स्तरावर एक उपायुक्त (वित्त) होते.

सचिव, TDD यांनी लेखापरिक्षा निरीक्षण मान्य केले आणि लेखापरीक्षणे निदर्शनास आणलेल्या चार प्रकल्प अधिकारी कार्यालयांतील लक्षणीय फरका विषयी चिंता व्यक्त केली. फरकांचा ताळमेळ बसविण्याबाबत कारवाई करण्यात येईल असे त्यांनी पुढे नमुद केले.

अ.क्र.	प्रकल्प कार्यालय	रोकड वही नुसार अखेरची शिल्लक	बँक विवरणपत्रा नुसार अखेरची शिल्लक	रोकडवही शिल्लक आणि बँकेतील शिल्लक रक्कम यांच्यातील फरक
१	जव्हार	११९.८७	१२२.४४	२.५७

महालेखाकार यांचे आक्षेपानुसार प्र अ जव्हार अंतर्गत् रोकड वही नुसार अखेरची शिल्लक ११९.८७ कोटी असुन बँक विवरणपत्रानुसार १२२.४४ कोटी शिल्लक तरोच फरक रु.२.५४ कोटी दर्शविण्यात आलेला आहे. तथापी प्रत्यक्षात परिगणना केली असता रोकडवही शिल्लक आणि बँकेतील शिल्लक रक्कम यामधील फरक रु .२.५७ कोटी असा आहे. याबाबत प्रकल्प कार्यालय जव्हार यांनी पत्र क्र. लेखा २०१८/प्र.क्र./का.५(५)/२७६७ दि.२०/४/२०१८ नुसार खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे. वनहक्क् समितीचे मानधन,कन्यादान योजना, दुधाळ जनावरांना चारापाणी, घरकुल योजना इ. योजनांतर्गत् धनादेश निर्गमित केलेले होते. परंतु दि.३१.३.२०१५ पर्यंत सदर धनादेश बँकेत वटविण्यासाठी सादर न झाल्याने बँक रोकड वहीतील शिल्लक बँकेतील विवरणपत्रानुसार अखेरच्या शिल्लक रकमेपेक्षा कमी दिसुन येते

अ.क्र.	कार्यालया चे नाव	रोकड वही नुसार अखेरची शिल्लक	बँक विवरणपत्र नुसार अखेरची शिल्लक	रोकडवही शिल्लक आणि बँकेतील शिल्लक रक्कम यांच्यातील फरक
३	नंदुरबार	२१.०२	३२.४४	११.४२

प्रकल्प अधिकारी नंदुरबार अंतर्गत् रोकड वही नुसार अखेरची शिल्लक २१.०२ कोटी असुन बँक
विवरणपत्रानुसार ३२.४४ कोटी शिल्लक असल्याने ११.४२ कोटीची तफावत दिसुन येते. याबाबत प्रकल्प अधिकारी नंदुरबार यांनी पत्र क्र. लेखा-२०१८/प्र.क्र./का.५(२)२०१८/३५१३ दिनांक २३/४/२०१८ अन्वये दि.३१.३.२०१५ रोजीची प्रत्यक्ष रोकडवहीची तपासणी केली असता रु.८७.४० कोटी आढळुन आली असे नमुद आहे. याबाबत खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

दिनांक ३१.३.२०१५ रोजीची रक्कम रु.५२.४८ लाख तफावत असल्याचे नमुद केले आहे. त्याअनुषंगाने संबंधितांना रोकडवही व बँक विवरणाचा ताळमेळ घेऊन तफावत दूर करणेबाबत कार्यवाही करण्याचे सुचित केलेले आहे.

अ.क्र.	प्रकल्प कार्यालय	रोकड वही नुसार अखेरची शिल्लक	बँक विवरणपत्रानुसार अखेरची शिल्लक
४	नाशिक	७६.०९	२२.८९

प्र अ नाशिक अंतर्गत् रोकड वही नुसार अखेरची शिल्लक ७६.०९ कोटी असुन बँक विवरणपत्रानुसार २२.८९ कोटी शिल्लक असल्याने ५३.२० कोटीची तफावत दिसुन येते. याबाबत प्रकल्प कार्यालय नाशिक यांनी पत्र क्र. लेखा २०१८/प्र.क्र./का.५(२)/२०१८/३५१३ दि.२३.४.२०१८ अन्वये खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

दि.३१ मार्च हा वर्षाअखेरचा महिना असल्याने ३१ मार्च रोजी पारीत झालेल्या देयकांचे धनादेश कोषागारातुन एप्रिल महिन्यामध्ये प्राप्त् होत असल्याकारणाने दि.३१.३.२०१५ अखेर कॅश बुकची शिल्लक जादा व बँक

पास बुक ची शिल्लक कमी दिसुन येते. दिनांक ३१.३.२०१५ अखेर कॅश बुक व बँक पास बुक मधील तफावत माहे एप्रिल २०१५ मध्ये दूर झालेली आहे. याबाबतचा ताळमेळ घेण्यात आलेला असुन त्यामध्ये कोणत्याही प्रकारची वित्तीय अनियमितता अथवा अफरातफर झालेली नसल्याचे सदर पत्रात नमुद केलेले आहे.

अ.क्र.	प्रकल्प कार्यालय	रोकड वही नुसार अखेरची शिल्लक	बँक विवरणपत्रानुसार अखेरची शिल्लक	रोकडवही शिल्लक आणि बँकेतील शिल्लक रक्कम यांच्यातील फरक
५	नागपूर	५२.३२	३३.६५	१८.६७

प्र अ नागपुर अंतर्गत् रोकड वही नुसार अखेरची शिल्लक ५२.३२ कोटी असुन बँक विवरणपत्रानुसार ३३.६५ कोटी शिल्लक असल्याने १८.६७ कोटीची तफावत दिसुन येते. याबाबत अपर आयुक्त कार्यालय नागपुर अपर आयुक्त आदिवासी विकास नागपुर यांचे पत्र क्र.लेखा २०१८/प्र.क्र./का.०५ अ/३२५७/१८ दिनांक १९/४/२०१८ अन्वये खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

दिनांक ३१.३.२०१५ रोजी प्रकल्प् कार्यालय नागपुर यांनी कोषागारामध्ये सादर केलेल्या देयकाची एकुण रक्कम रु.१८.६७ कोटी पारित होऊन NEFT ऐवजी कोषागाराने धनादेश दिल्याने सदर धनादेशाची नोंद रोकड वहीमध्ये दिनांक ३१.३.२०१५ रोजी घेण्यात आलेली आहे. परंतु सदरचे धनादेश माहे एप्रिल २०१५ मध्ये बँकेत जमा केल्याने तफावत दिसुन येते . सदर धनादेशाची रक्कम रु.१८.६७ कोटी रकमेच्या धनादेशांची यादी सोबत संलग्न् आहे. एप्रिल २०१५ मध्ये बँकेचे

खाती जमा झालेली आहे. सोबत खुलासा संलग्न आहे.एप्रिल २०१५ मध्ये बँकेचे खाती जमा झालेली आहे.

अ.क्र.	प्रकल्प कार्यालय	रोकड वही नुसार अखेरची शिल्लक	बँक विवरणपत्रा नुसार अखेरची शिल्लक	रोकडवही शिल्लक आणि बँकेतील शिल्लक रक्कम यांच्यातील फरक
६	चंद्रपुर	३४.१५	१४.८३	१९.३२

प्रकल्प अधिकारी चंद्रपुर अंतर्गत् रोकड वही नुसार अखेरची शिल्लक ३४.१५ कोटी असुन बँक विवरणपत्रानुसार १४.८३ कोटी शिल्लक असल्याने १९.३२ कोटीची तफावत दिसुन येते. याबाबत अपर आयुक्त् कार्यालय नागपुर यांनी पत्र क्र. लेखा २०१८/प्र.क्र./का.०५ अ /३२५७/१८ दिनांक १९/४/२०१८ अन्वये खालीलप्रमाणे खुलासा केलेला आहे.

कोषागारातुन ऑनलाईन देयके पारीत होणे बंद झाल्याने दिनांक ३१.३.२०१५ रोजी कोषागारातुन रु.१९.३२ कोटीचे धनादेश अदा करण्यात आले. त्यामुळे वेळीच दिनांक ३१.३.२०१५ रोजी बँक खाती जमा करता आले नाहीत. त्यामुळे बँक खात्यात रु.१९.३२ कोटी कमी आढळुन येतात. तसेच वित्तीय अनियमितता झाल्याचे दिसुन येत नाही. एकुण रुपये १९.३२ कोटी इतक्या रकमेचे १०३ धनादेशांची यादी सोबत खुलासा संलग्न आहे.

अ.क्र.	प्रकल्प कार्यालय	रोकड वही नुसार अखेरची शिल्लक	बँक विवरणपत्रानु सार अखेरची शिल्लक	रोकडवही शिल्लक आणि बँकेतील शिल्लक रक्कम यांच्यातील फरक
७	धारणी	६५.६६	६६.६९	१.०३

प्रकल्प कार्यालय धारणी अंतर्गत् रोखवहीतील शिल्लक रु .६५.६६ कोटी तर बँक विवरणपत्रानुसार शिल्लक रु.६६.६९ कोटी असल्याने

रु.१.०३ कोटीची तफावत दिसुन येते. प्रकल्प कार्यालयाने विविध योजनांच्या प्रती संस्थांना निर्गमित केलेल्या धनादेशाचे रोखीकरण न झाल्याने बँकेत जादा रक्कम शिल्लक असल्याचे अपर आयुक्त् अमरावती यांनी पत्र क्र. लेखा /प्र.क्र./का.३/२१००/२०१८ दि.१९/४/२०१८ अन्वये कळविले आहे.

अ.क्र.	प्रकल्प कार्यालय	रोकड वही नुसार अखेरची शिल्लक	बँक विवरणपत्रानुसार अखेरची शिल्लक	रोकडवही शिल्लक आणि बँकेतील शिल्लक रक्कम यांच्यातील फरक
८	पांढरकवडा	३४.५१	३४.३१	०.२०

प्रकल्प अधिकारी पांढरकवडा अंतर्गत रोकडवही नुसार अखेरची शिल्लक ३४.५१ असुन बँक विवरणानुसार रु.३४.३१ कोटी शिल्लक असल्याने ०.२० तफावत दिसुन येते याबाबत अपर आयुक्त अमरावती यांनी पत्र क्र. लेखा /प्र.क्र./का ३/२१००/२०१८ दि.१९/४/२०१८ अन्वये दिलेल्या खुलासा खालीलप्रमाणे आहे.

प्रकल्प कार्यालय, पांढरकवडा यांनी सन २००४ -२००५ ते २००९-२०१० या कालावधीत विविध योजनांची देयके कोषागारातुन आहरित केल्यानंतर संस्थांच्या नावाचे डि.डि. बँकेतुन वटविल्यामुळे तसेच कोषागारातुन प्राप्त् धनादेश बँकेत जमा न केल्याने सदर तफावत दिसुन येते. याबाबत शिल्लक रक्कम चलनाने शासन खाती जमा करणेबाबत तसेच कोषागारातुन प्राप्त झालेले धनादेश मुदतबाहय झाल्याने नवीन धनादेश मिळणेबाबत कार्यवाही करण्यात येत असल्याचे नमुद केलेले आहे.

	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.३.३.	**अखर्चित रक्कम :-** महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या तरतुदींनुसार शासकीय कोषागारातुन तात्काळ वितरणासाठी लागाणाऱ्या रक्कमेशिवाय अन्य कोणतीही रक्कम काढण्यात येऊ नये. चार प्रकल्प अधिकारी, एक अतिरिक्त आयुक्त आणि आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्या दस्ताऐवांच्या नमुना चाचणीत असे आढळून आले की, मार्च, २००८ ते डिसेंबर २०१४ दरम्यान शासकीय कोषागारातुन १४३ देयकांव्दारे काढलेलली रु. १२९.५९ कोटी रक्कम मार्च, २०१५ पर्यंत अखर्चित होती. रु. १२९.५९ कोटीपैकी रु. ३३.४६ कोटी रक्कम विविध शैक्षणिक योजना आणि कार्यासाठी होती. सर्व अखर्चति रक्कम प्रकल्प अधिकारी/ अतिरिक्त आदिवासी आदिवासी आयुक्त/ आदिवासी आयुक्त यांच्या बँक खात्यात ठेवण्यात आली होती. याविषयींचे तपशिल तक्ता २.२.५ मध्ये दर्शविली आहे	

कार्यालयाचे नाव	देयकांची संख्या	एकुण अखर्चित रक्कम	शैक्षणिक योजनांची अखर्चित रक्कम	देयके या अवधित सादर करण्यात आलीत
आदिवासी आयुक्त	०५	११.४६	११.४६	मार्च २०११ ते सप्टेंबर २०१३
अतिरिक्त आदिवासी आयुक्त, ठाणे	२५	३.८६	०.३४	मार्च २००८ ते मार्च २०१४
प्रकल्प अधिकारी जव्हार	३७	१२.७६	६.२४	फेब्रुवारी २००९ ते मार्च २०१४
प्रकल्प अधिकारी नंदुरबार	२७	४.५७	३.३६	मार्च २००८ ते मार्च, २०१४
प्रकल्प अधिकारी धारणी	१४	६५.६६	११.००	डिसेंबर २०११ ते मार्च २०१४

अ.क्र.	कार्यालयाचे नाव	देयकांची संख्या	एकुण अखर्चित रक्कम	शैक्षणिक योजनांची अखर्चित रक्कम	देयके या अवधीत सादर करण्यात आली आहेत.
१	आदिवासी आयुक्त, नाशिक	०५	११.४६	११.४६	मार्च २०११ ते सप्टेंबर २०१३

आयुक्तालय नाशिक यांच्या बँक खात्यात मार्च २०११ ते सप्टे.२०१३ या कालावधीत ५ देयकांची शिल्लक अखर्चित रक्कम ११ ,४६,४६,६००/- इतकी होती. सदर शिल्लक रक्कम खालील तपशीलातील देयकांचे प्रदान न झाल्याने दिसत आहे.

अ.क्र	देयक क्र, दिनांक	प्रदानाचा तपशील	प्रदान न केलेली रक्कम
१	५६, दि.३१.३.२०११	जैन एरिगेशन जळगाव	४१,२६,८९८/-
२	६०, दि.३१.३.२०११	पर्ल एंटरप्रायजेस , पुणे	१,५१,७०,६२३/-
३	३९४, दि.१७.१२.२०१२	बायोमेट्रीक ॲप्लीकेशन सिस्टम साठी वर्ग	९३,०५,५८२/-
४	११८-१२६, दि.१७.६.२०१३	एक्झीक्युटीव इंजीनिअर, सार्वबावि, शहादा व वाशिम	३,१०,४८,४९७/-
५	२६८-२७७, दि.१९.९.२०१३	एक्झीक्युटीव इंजीनिअर, शहादा	५,५०,००,०००/-
		एकुण	११,४६,४६,६००/-

प्रकल्प अधिकारी नाशिक	३५	३१.२८	१.०६	जुलै २००८ ते मार्च २०१३
एकुण	१४३	१२६.५९	३३.४६	

३. उपरोक्त अनु.१ ते ३ च्या बाबतीत महाराष्ट्र शासन आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्र. शाआशा२०१४/प्र.क्र.१५७/का.१३ दिनांक १६/४/२०१४ अन्वये बायोमॅट्रीक यंत्रणा बसविणे या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी एक सदस्यीय समितीचे गठण करण्यात आल्याने प्रदान थांबविण्यात आलेले आहे. चौकशीच्या अंतिम निर्णयानंतर सदर निर्णयांचा निपटारा करण्यात येईल.

४. अ) उपरोक्त् अनु.क्र.४ मधील अखर्चित रकमेच्या देयकाच्या बाबतीतील निधी एक वेळ केंद्रीय अर्थसहाय अंतर्गत प्राप्त् झालेला आहे. म.रा.नियोजन विभाग शा.नि.क्र.अवेस/२००६ /प्र.क्र.२८/का.१४/दि.१८/१/२००७ नुसार आयुक्त आदिवासी विकास विभाग यांचे अधिन ठेवण्यात आलेला होता. मात्र ज्या बाबींसाठी निधी प्राप्त झाला होता .त्या आश्रमशाळा बोराडी, अक्क्लकुआ, खापर, मोलगी येथे जागा प्राप्त झाली नाही. तसेच प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. त्याचप्रमाणे वाशिम वसतीगृहाची काम करुन शिल्क राहिलेली रक्कम आयुक्तालयास परत केलेली आहे. आयुक्तालयाचे पत्र क्र. एकेअ/प्र.क्र.८६/२००८ /भाग-२ /का.८.४ दिनांक २७/५/२०१४ अन्वये शासनास वर्ग करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक १२/१/२०१६ रोजी सदर निधी वर्ग करण्याबाबत पुन्श्च विनंती करण्यात आलेली आहे. शासनाची मान्यता प्राप्त् झाल्यावर सदर निधी वर्ग करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

ब) उपरोक्त अनु .५ मधील अखर्चित देयकाचा निधी एक वेळ केंद्रीय अर्थसहाय अंतर्गत शासन निर्णय शाआशा/२००८/ प्र.क्र.१६/का.१३/ दि.२.३.२००९ व शा.नि. क्र.केंद्रीय २००९/प्र.क्र. ३२/का.१७ दि२६.३.२०१० नुसार अनुक्रमे. १६० लाख व १००० लाख प्राप्त् झालेला होता. सदरचा निधी कार्यकारी अभियंता (अंमलबजावणी यंत्रणा) यांच्या कडे वर्ग करण्यात आलेला होता.

विषयांकित बाबींचे काम ५० लक्ष् किंमतीत नमुना नकाशा नुसार पुर्ण करणे शक्य् नसल्याने उपरोक्त रकमेपैकी ५५० लाख आयुक्तालयाकडे परत करण्यात आलेला आहे. सदर निधी अन्य् ठिकाणी वर्ग करण्याबाबत या कार्यालयाचे प्र.क्र.भासअनु २०१३/ प्र.क्र.२६/का.८.४/दि.१३.२.२०१६ अन्वये शासनास प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर सदर निधीचे विनियोजन करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

कार्यालयाचे नाव	देयकांची संख्या	एकुण अखर्चित रक्कम	शैक्षणिक योजनांची अखर्चित रक्कम
२.अतिरिक्त आदिवासी आयुक्त, ठाणे	२५	३.८६	०.३४

अपर आयुक्त आदिवासी विकास ठाणे, यांनी खालीलप्रमाणे खुलासा सादर केलेला आहे - लेखापरिक्षण अहवालातील नमुद २५ देयकांची अखर्चित् रक्कम रु.३,८६,०७,०८२/- इतकी असुन त्यामध्ये शैक्षणिक योजनांची अखर्चित रक्कम ३४ लाखचा समावेश आहे. सदर लेखा आक्षेपातील रक्कम रु.१५७००००/- आश्रमशाळा व विदयार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसासाठी वितरीत करण्यात आलेली आहे. वर्ग -३ च्या संवर्गातील परीक्षेसाठी उमेदवाराकडुन परीक्षा फीच्या स्वरुपात रु .२७०८३०/- चे एकुण ८१९ धनाकर्ष मुदतबाहय झाल्याने व धनाकर्ष नुतनीकरणासाठी विलंब आकार धनाकर्ष रकमेपेक्षा जास्त रक्कम लागणार असल्याने धनाकर्षाचे नुतनीकरण करण्यात आलेले नाही. तसेच रक्कम रु .३३८७८०१३/- हि चलनाने शासन खाती भरणा केलेली आहे. तसेच रक्कम रु.२८८८२३९/- हा केंद्राचा निधी असल्याने मार्गदर्शक तत्वे मंजूरीबाबतची कार्यवाही सुरु असल्याने शासन खाती भरणा करण्यात आलेला नाही.

कार्यालयाचे नाव	देयकांची संख्या	एकुण अखर्चित रक्कम	शैक्षणिक योजनांची अखर्चित रक्कम
३.प्रकल्प अधिकारी, जव्हार	३७	१२.७६	६.२४

दिनांक ३१.३.२०१५ रोजी विविध योजनांची अखर्चित रक्कम रु.१२.७६ कोटी इतकी होती. त्यापैकी रक्कम रुपये ११.५४ कोटी संवितरीत तसेच शासन खाती भरणा करण्यात आली असुन उर्वरित शिल्लक रुपये १.२२ कोटी योजनेतील लाभार्थ्यांना वर्ग करण्याबाबतची कार्यवाही चालु आहे. अन्यथा सदर रक्कम शासन खाती जमा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक ३१.३.२०१५ रोजी विविध शैक्षणिक योजनांची एकुण शिल्लक रुपये ६.२४ कोटी इतकी होती. सदर शिल्लक रकमेपैकी आज दिनांक ३१.३.२०१८ रोजी रुपये ३२.०७ लक्ष इतकी शिल्लक आहे. हि शिल्लक रक्कम भारत सरकार शिष्यवृत्ती व सुवर्ण जयंती शिष्यवृत्ती विदयार्थ्यांनी सादर केलेल्या अर्जामध्ये त्रुटी असल्याकारणाने व विदयार्थ्यांच्या बँक खाते क्रमांक चुकीचे असल्याने पुन्हा प्रकल्प कार्यालयाच्या खाती जमा झाल्याने रक्कम शिल्लक आहे. सदर रक्कम विदयार्थ्यांच्या नवीन खाते क्रमांक प्राप्त् करुन त्यांना अदा करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे अथवा सदर रक्कम चलनाने शासन खाती जमा करण्यात येईल.

कार्यालयाचे नाव	देयकांची संख्या	एकुण अखर्चित रक्कम	शैक्षणिक योजनांची अखर्चित रक्कम
४.प्रकल्प अधिकारी, नंदुरबार	२७	४.५७	३.३६

प्रकल्प अधिकारी नंदुरबार यांनी दिलेल्या खुलाश्यानुसार मार्च २००८ ते मार्च २०१४ अखेर एकुण अखर्चित रक्कम रुपये ४.५७ कोटी इतकी दर्शविण्यात आलेली आहे. त्यात शैक्षणिक योजनेची अखर्चित रक्कम रुपये ३.३६ कोटी इतकी दर्शविण्यात आलेली आहे.

कार्यालयाचे नाव	देयकांची संख्या	एकुण अखर्चित रक्कम	शैक्षणिक योजनांची अखर्चित रक्कम
५.प्रकल्प अधिकारी, धारणी	१४	६५.६६	११.००

अपर आयुक्त अमरावती यांनी दिलेल्या खुलाश्यानुसार प्रकल्प कार्यालय धारणी यांना प्राप्त् झालेली विशेष केंद्रीय सहाय योजना, भारतीय संविधान अनुच्छेद २७५ (१), कौशल्य विकास, न्युक्लिअस बजेट, शाळा बांधकाम, पारधी पॅकेज घरकुल योजना, कन्यादान योजना, ठक्करबाप्पा योजना इत्यादी योजनांसाठी प्राप्त झालेला निधी कोषागारातुन आहरीत केला जातो. परंतु योजना राबविण्याची प्रक्रिया कार्यवाहीत असल्याने सदर आहरीत झालेला निधी बँकेमध्ये जमा केलेला आहे. व योजना कार्यान्वित झाल्यानंतर निधी खर्च केलेला आहे. तसेच ज्या योजना कार्यान्वित झालेल्या नाहीत अशा योजनांचा अखर्चित निधी सन २०१५-१६ मध्ये रुपये १९.४० कोटी प्रकल्प कार्यालय धारणी यांनी चलनाव्दारे जमा केले असल्याचे नमुद केले आहे.

कार्यालयाचे नाव	देयकांची संख्या	एकुण अखर्चित रक्कम	शैक्षणिक योजनांची अखर्चित रक्कम
६.प्रकल्प अधिकारी, नाशिक	३५	३१.२८	१.०६

		प्रकल्प अधिकारी नाशिक यांनी दिलेल्या खुलाश्यानुसार पत्र क्र. लेखा-२०१८/प्र.क्र.का.५(२)/२०१८/३५१३ दिनांक २३.४.२०१८ अन्वये माहे मार्च २०१५ च्या अखर्चित निधी पैकी माहे फेब्रुवारी २०१८ अखेर पावेतो रुपये १९.३७ कोटी इतकी रक्कम खर्च करण्यात आली असुन उर्वरित शिल्लक रक्कम रुपये ११.९१ कोटी निधी प्रामुख्याने केंद्रीय योजनांचा असल्याने योजनांना मंजूरी प्राप्त झाल्यानंतर खर्च करण्यात येत आहे. तसेच इतर राज्य स्तरीय शिल्लक निधीचा आढावा घेऊन शासन खाती भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.४.१	**विदयार्थ्यांना अन्नधान्याचा कमी पुरवठा:** TDD ने शासकीय आश्रमशाळांतील प्रत्येक विदयार्थ्यांसाठी प्रतिदिन ४००ग्राम गहु किंवा ज्वारी किंवा बाजरी आणि १०० ग्राम तांदुळ हे माप नियत केले आहे) ऑगस्ट१९९९) म्हणजेच ,प्रत्येक विदयार्थ्याला प्रति दिन ५०० ग्राम अन्नधान्य पुरवावयाचे होते .आदिवासी आयुक्त ,नाशिक यांच्या दस्तावेजांच्या पडताडणीत असे आढळले की ,५२९ शासकीय आश्रमशाळांध्ये निवास करणा-या१ ,९६, ३५७विदयार्थ्यांसाठी २०१४- १५मध्ये ५०० ग्राम प्रति विदयार्थी या मापाऐवजी फक्त२६२ . ५६ग्राम अन्नधान्य प्रति दिन) सरासरी (प्रति विदयार्थी पुरविण्यात आले होते .यामुळे प्रति विदयार्थी प्रति दिन२३७ . ४४ग्राम अन्नधान्य कमी पुरविण्यात आले होते .निवडलेल्या ५२ शासकीय आश्रमशाळांध्ये याच कालावधीत २०, ०१३विदयार्थ्यांना२५१ . ७८ग्राम अन्नधान्य कमी पुरविण्यात आले होते. सचिव, TDD यांनी या बाबीचे विश्लेषण करुन सुधारात्मक कारवाई करावयाचे मान्य केले त्यांनी पुढे नमुद केले की आवश्यकता असल्यास प्रति विदयार्थी पुरवावयाच्या अन्नधान्याच्या मापाबाबत आढावा घेण्यात येईल.	शासन निर्णय दिनांक २५/२/२०१४ अन्वये शासकीय आश्रमशाळा व वसतीगृहांना आवश्यक अन्नधान्य, कडधान्य व इतर किराणा माल पुरवठयाकरीता आदिवासी विकास महामंडळ, मर्या नाशिक यांचे स्तरावरुन ई निविदा प्रक्रीया खरेदी करण्याची तरतूद आहे. त्यानुसार सन २०१४-१५ या वर्षाकरीता प्रकल्प अधिकारी यांचेकडून या कार्यालयाकडे अन्नधान्य, कडधान्य व इतर किराणा मालाची निव्वळ मागणी (मागील शिल्लक वजा जाता) नोंदविण्यात आली होती. सदर मागणीनुसार गहू ९३०६० क्विंटल व तांदूळ १०३६१६ क्विंटल अशी एकूण १९६६७६ इतकी मागणी होती. शासन निर्णय दिनांक २५/२/२०१४ मधील तरतूदीनुसार सदर मागणी आदिवासी विकास महामंडळ, मर्या नाशिक यांचेकडे नोंदविण्यात आली होती. त्यानुसार आदिवासी विकास महामंडळ, मर्या नाशिक यांचे स्तरावरुन ई निविदा प्रक्रीया सुरु करण्यात आली. तथापि सदर निविदा प्रक्रीयेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र. ५१४० व ५१९७ दाखल झालेली होती. सदर याचिकाच्या सूनावणीअंती सदर निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत आवश्यक अन्नधान्य, कडधान्य व इतर किराणा मालाची खरेदी ही महाराष्ट्र स्टेट को.ऑ. कंन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई यांचेकडून मागील मंजूर दराने करणेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई निर्देश दिलेले होते. त्यानुसार महाराष्ट्र स्टेट को.ऑ. कंन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई यांचेकडून वेळोवेळी गहू ४१८७७ क्विंटल व व्यंकटेश्वरा महिला स्वखरेदी केलेली आहे. व्यंकटेश्वरा महिला औद्योगिक उत्पादन सह. संस्था मर्या. उदगिर यांचेकडून वेळोवेळी गहू ३२५७१ क्विंटल असा एकूण ७४४४८ क्विंटल गहू खरेदी केलेले आहे.

		वरीलप्रमाणे या कार्यालयाच्या स्तरावरुन खरेदी करण्यात आलेल्या गहू व तांदूळाची मागणी वजावट करुन आदिवासी विकास महामंडळ, मर्या नाशिक यांनी पुरवठा केलेला आहे. तसेच आदिवासी विकास महामंडळ, मर्या नाशिक यांचे स्तरावरुन ई निविदा प्रक्रीयेची कार्यवाही सुरु होती. तथापि सदर निविदा प्रक्रीयेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र. ५१४० व ५१९७ दाखल झालेली असल्याने पुरवठयास विलंब होण्याची शक्यता लक्षात घेवून तसेच शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची अन्नधान्याअभावी जेवणाची गैरसोय होवू नये म्हणून शासकीय आश्रमशाळा स्तरावर तातडीची बाब म्हणून काही प्रमाणांत स्थानिक स्तरावर खरेदी करण्यात आलेली होती. त्यामुळे आदिवासी विकास महामंडळ, मर्या नाशिक यांचे कडून माल स्विकारतांना शासकीय आश्रमशाळास्तरावरुन खरेदी करण्यात आलेला माल वजावट करुन स्विकारण्यात आलेला आहे. त्यामुळे मागणी व पुरवठा यामध्ये तफावत दिसून येत आहे. वरीलप्रमाणे या कार्यालयाच्या स्तरावरुन गव्हाची ७४४४८ क्विंटल खरेदी करण्यात आलेली असून आदिवासी विकास महामंडळाने ३३१९ क्विंटल गहू पूरवठा केलेला आहे. अशाप्रकारे गव्हाची एकूण प्राप्त मागणी ९३०६० पैकी एकूण ७७७६७ क्विंटल गव्हाचा पुरवठा झालेला आहे. तसेच तांदूळाची प्रत्यक्षांत मागणी १०३६१६ क्विंटल मागणी होती आदिवासी विकास महामंडळाने ७६९०१ पुरवठा केलेला आहे. शासकीय आश्रमशाळेवरुन विद्यार्थ्यांच्या परिमाणानुसार आवश्यक एकूण मागणी व त्यामधून मागील शिल्लक वजावट करुन मागणी नोंदवित असतात. त्यामुळे एकूण परिमाणानुसार येणारी मागणी व प्रत्यक्षात नोंदविलेली मागणी यामध्ये तफावत दिसून येत आहे.

	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.४.२	**तांदुळ खरेदीवर जादा खर्च:** केंद्र शासनाने संपुर्ण देशात कच्च्या धानातुन किमान ६७ टक्के उत्पादन आणि ग्राहकोपयोगी तांदळाचे मापदंड निश्चित केले आहे. २०१४-१५ दरम्यान आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखालील खरेदी समीतीने ५२९ शासकीय आश्रमशाळांना आदिवासी विकास महामंडळाकडुन (TDC) रुपये २७.४५ कोटी किंमतीवर अ आणि ब प्रतिचा ७६,९०१.४० क्विंटल तांदुळ खालील प्रमाणे खरेदी केला. जुन २०१४ ते ऑक्टोबर २०१४ दरम्यान पुरवठा केलेले ३६,४०३.१९ क्विंटल रुपये ३,४५० प्रति क्विंटल या दराने आणि नोव्हेंबर २०१४ ते एप्रिल २०१५ दरम्यान पुरवठा केलेले ४०,४९८.२१ क्विंटल रुपये ३,६७६ प्रति क्विंटल या दराने. परंतू प्रति क्विंटल तांदळाची किंमत निर्धारीत करण्यासाठी TDC ने उत्पादन माप ६७ टक्क्याऐवजी ५७ टक्के घेतले, त्यामुळे ७६,९०१.४० क्विंटल तांदुळ खरेदीसाठी रुपये ३.६५ कोटी जादा खर्च झाला. लेखापरीक्षेस पुढे असेही निदर्शनास आले की TDC ने प्रति क्विंटल तांदळाची किंमत निर्धारीत करतांना १४ टक्के प्रति वर्ष व्याज घटकही विचारात घेतले, जे TDC ला अग्रीम प्रदान करण्याची व्यवस्था असती तर टाळता आले असते. अशी व्यवस्था करता येऊ शकली असती कारण २०१०-११ पासुन २०१४-१५ पर्यंत दर वर्षी TDD निधीमील बचत होत होती. तांदळाच्या विक्री किमतीत व्याज घटक अंतर्भुत केल्यामुळे २०१४-१५ मध्ये ७६,९०१.४० क्विंटल तांदुळ खरेदी साठी TDD ने TDC ला रुपये ७९.४४ लक्ष जादा प्रदान केले. रुपये ७९.४४ लक्ष या व्याजाच्या रकमेने शासकीय आश्रमशाळांमधील विदयार्थ्यांसाठी २३०० क्विंटल अतिरीक्त तांदुळ घेता येऊ शकले असते. सचिव, TDD ने लेखापरिक्षा निरीक्षण मान्य केले आणि यापुढे भविष्यात उत्पादन मापदंडाचे पालन करण्यात येईल आणि खरेदीची पध्दती सुलभ करण्यात येईल अशी हमी दिली.	आदिवासी विकास महामंडळामार्फत पुरवठा करण्यात येणा-या तांदुळाची किंमत निश्चित करतांना सदर तांदळासाठी एकाधिकार योजनेअंतर्गत खरेदी केलेल्या धान्याची किंमत भरडाईसाठी येणारा खर्च भरडाई दरम्यान प्राप्त होणा-या उपपदार्थांची किंमत तसेच एकाधिकार योजनेसाठी राज्य सहकारी बँकेमार्फत लावण्यात आलेल्या व्याजाचा विचार करण्यात येतो. खरेदी समितीने तांदुळाचे नमुने निश्चित केल्यानुसार (५७% उता-याचे नमुने) तांदळाचा पुरवठा करण्यात आलेला आहे. ६७% उतारा व ५७% उतारा असणा-या तांदळातील उपपदार्थ (जसे कणी व पॉलीश कोंडा) यांचीही वेगवेगळी टक्केवारी असते. ५७% दराची किंमत निश्चित करतांना त्याप्रमाणात निर्माण होणा-या उपपदार्थाची किंमत वजा करुन किंमत निश्चित केली जाते. त्यामुळे तांदुळ खरेदीसाठी जास्त खर्च केला अशी परिस्थिती नाही. तसेच एकाधिकार खरेदी योजना या शासनाच्या आदिवासी शेतक-याच्या योजनेमार्फत असलेली ही खरेदी शासन उपक्रमामार्फत पुरवठा असल्याने महामंडळाने निश्चित केलेल्या दराने किंमत अदा केली आहे. याबाबत महामंडळाने दिनांक १४/०१/२०१६ रोजी अहवाल सादर केला आहे. सद्यस्थितीत शासन निर्णय आदिवासी विकास विभाग दिनांक १५/०६/२०१७ मधील तरतुदीनुसार आदिवासी विकास महामंडळ यांनी देखील ई-निविदा प्रक्रियेत भाग घेणे आवश्यक आहे, अशी तरतुद करण्यात आली आहे.

	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.४.३	**अ) आश्रमशाळा आणि वसतीगृहांच्या अन्नधान्य खर्चाच्या किमतीत भरीव वाढ:** अतिरीक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांच्या अधिकार क्षेत्रातील ८९ शासकीय आश्रमशाळा आणि १०४ शासकीय वसतीगृहे येतात. अतिरिक्त आदिवासी आयुक्त , अमरावती यांचे दस्ताऐवजाच्या पडताळणीत असे आढळून आले की २०१२-१५ दरम्यान ८९ शासकीय आश्रमशाळेतील प्रवेश संख्येत घसरता कल होता. (उणे १६ टक्के ते उणे सात टक्के) तरी अन्नावरील खर्च (आहार खर्च या उपशिर्षाखाली वर्गीकृत केलेले) २०१२-१३ मध्ये ७६ टक्के तर, २०१४-१५ मध्ये दरामध्ये ८१ टक्क्यांनी मोठया प्रमाणात वाढला. २०१३-१४ मधील उतार वगळता तसेच १०४ शासकीय वसतीगृहांमध्ये प्रवेश संख्येत जरी २०१२-१५ दरम्यान वाढता कल (नऊ ते ५३ टक्के) तरी अन्नावरील खर्च २०१२-१३ मधील ४६ टक्क्यावरुन २०१४-१५ मध्ये १७२ टक्क्यांवर अयोग्य प्रमाणात वाढला. याबाबतचे तपशील तक्ता २.२.६ मध्ये मांडले आहे. तक्ता २.२.६ प्रवेश घेण्या-यांच्या संख्येच्या तुलनेत वर्ष-निहाय आहार खर्च <table><tr><td>तपशिल</td><td>१२-२०११ (आधार वर्ष)</td><td>-२०१२ १३</td><td>-२०१३ १४</td><td>१५-२०१४</td></tr><tr><td>शासकीय आश्रमशाळांमध्ये प्रवेश घेणा-या विदयार्थ्यांची संख्या</td><td>३२००९.००</td><td>२९७९२ (%७-)</td><td>२८५२५ (-११%)</td><td>२६६९६ (-१%)</td></tr><tr><td>शासकीय आश्रमशाळांतील आहार च(रु. लक्ष मध्ये)</td><td>४८२.२९</td><td>८४७.७९ (%७६)</td><td>६०३.३१ (२५%)</td><td>८७१.३९ (८१%)</td></tr></table>	आश्रमशाळा. १. शासन निर्णय आदिवासी विकास विभाग दिनांक १९ जुलै २०११ नुसार मा. उच्च न्यायालय यांनी जनहीत याचीकेच्या अनुषंगाने दिलेल्या निर्देशानुसार आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना दुध, अंडी केळी इ. बाबी पुरविणेबाबतचे निर्देश देण्यात आले. या बाबी शासकिय विद्यार्थ्यांच्या आहारात नव्याने समाविष्ठ झाल्याने सन २०१२-१३ च्या आहार खर्चात वाढ झालेली आहे. २. वरील शासन निर्णयानुषंगे सन २०११-१२ मध्ये शासकिय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अंडी व केळी पुरविणेबाबत दिनांक २९/१२/२०११ ला पुरवठा आदेश देण्यात आले. त्यामुळे सन २०११-१२ मध्ये माहे जानेवारी २०१२ ते एप्रील २०१२ या कालावधीत या बाबींचा आहारात पुरवठा झाला. तथापी सन २०१२-१३ मध्ये संपुर्ण शैक्षणिक सत्रात या बाबींचा पुरवठा झाल्याने आहारावरील खर्चात सन २०११-१२ चे तुलनेत सन २०१३-१३ मध्ये वाढ झाली. ३. सन २०१३-१४ मध्ये आहारामध्ये दोन वेळ जेवण व्यतिरीक्त अंडी, केळी या बरोबरच सफरचंद, डाळींब, चिक्कु मोसंबी इ. फळांचा सुध्दा समावेश केलेला असल्याने सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये आहारावरील खर्चात वाढ झालेली आहे. ४. सन २०११-१२ ते २०१४-१५ या कालावधीतील अन्नधान्य, कडधान्य, अंडी केळी इ. बाबींचे दर खालील प्रमाणे निश्चित होते :- <table><tr><td>अ.क्र.</td><td>वस्तूचे नांव</td><td colspan="3">दर रुपये (प्रति क्विंटल/प्रति नग) २५५५.००</td></tr><tr><td></td><td></td><td>२०११-१२</td><td>२०१२-१३</td><td>२०१३-१४</td></tr><tr><td>१.</td><td>गहु</td><td>१७५०.००</td><td>१८००.००</td><td>२२७१.००</td></tr><tr><td>२</td><td>तांदूळ</td><td>२१००.००</td><td>२०००.००</td><td>२५५५.००</td></tr><tr><td>३</td><td>तूरदाळ</td><td>६०००.००</td><td>५९००.००</td><td>६९००.००</td></tr></table>

शासकीय वसतीगृहांमध्ये प्रवश घेणा-या विदयार्थ्यांची संख्या	८१९८.००	८९६८ (९%)	११९१० (२०%)	१२५६१ (५३%)
शासकीय वसतीगृहांतील आहार खर्च (रु. लक्ष मध्ये)	५८४.२८	८५५.७२ (४६%)	१०८३.०८ (८५%)	१५३८.८० (१७२%)

स्रोत: अतिरिक्त आदिवासी आयुक्त५, अमरावती यांच्या दस्तावेजातुन संकलित केलेली माहिती कंसामधील अंक आधार वर्ष २०११-१२ च्या संदर्भात होणा-या टक्केवारी मधील वाढ अथवा घट दर्शविते.

४	मुंगदाळ पॉलीश	६४००.००	६७००.००	८८२५.००
५	चनादाळ	५०००.००	६१००.००	४३९०.००
६	उडीददाळ	५७००.००	५१००.००	६६५०.००
७	मुग अख्खा	५६००.००	५८००.००	८८५०.००
८	चना अख्खा	४२००.००	४८००.००	३८५०.००
९	चवळी	४६००.००	४५००.००	५५२०.००
१०	मटकी	३७५०.००	५१००.००	६८००.००
११	पिवळा वाटाणा	३२००.००	३२००.००	३५५०.००
१२	शेंगदाणे	७३००.००	८२००.००	८५५०.००
१३	पोहे	३०००.००	२५००.००	३३००.००
१४	साखर	३२५०.००	३३००.००	३२५०.००
१५	मिठ	१२.००	१४.००	१३.५१
१६	सनल्फावर तेल १५ किलो डबा	१२००.००	१२८०.००	१४६१.००
१७	वनस्पती तुप १५ किलो डबा	१०२०.००	१०००.००	१४५०.००
१८	मिरची पावडर प्रती किलो	१८०.००	१४०.००	१८५.००
१९	गरम मसाला प्रती किलो	१८०.००	१४०.००	१८५.००
२०	मोहरी	४०.००	६०.००	७०.००
२१	हळद प्रती किलो	२००.००	१४०.००	१८५.००
२२	जिरे	१८०.००	१५०.००	१७५.००

दर निश्चित आयुक्तालय नाशिक

- वरीप्रमाणे सन २०११-१२-१३-१४ मध्ये अन्नधान्य, कडधान्य किमतीत वाढ झाल्याने आहार खर्चात वाढ झाली आहे.

अंडी, केळी व फळांचे पुरवठा दर :-

अक्र	वस्तुचे नांव	दर रूपये (प्रति क्विटल/ प्रतिनग)				शेरा
		२०११-१२	२०१२-१३	२०१३-१४	२०१४-१५	
१.	अंडी प्रती शेकडा	३३०.००	३३०.००	३५५.००	४००.००	
२.	केळी प्रती डझन	२४.००	२४.००	२४.००	३०.००	
३.	सफरचंद प्रती किलो	--	--	१४५.००	१५०.००	
४.	डाळींब प्रती किलो	--	--	१००.००	--	
५.	चिक्कु प्रती किलो	--	--	४०.००	--	
६.	मोसंबी प्रती किलो	--	--	७०.००	६०.००	

- सन २०११-१२ मध्ये अंडी व केळी पुरवठा माहे जानेवारी २०१२ ते एप्रील २०१२-१३ मध्ये झालेला असल्याने आणि सन २०१२-१३ मध्ये संपुर्ण शैक्षणिक सत्रात झाल्याने सन २०११-१२ चे तुलनेत सन २०१२-१३ मध्ये आहार खर्चात वाढ झाली.
- सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये अंडी व केळी बरोबरच फळांचा सुध्दा आहारात समावेश झाल्याने सन २०१३-१४ व २०१४-१५ मध्ये आहार खर्चात वाढ झाली.
- सन २०१२-१३ व २०१३-१४ मध्ये अन्नधान्य, कडधान्य किमतीमध्ये वाढ झाल्याने एकूण आहार खर्चात वाढ झाली.

	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.४.३	**आश्रमशाळा आणि वसतिगृहांच्या अन्न-धान्य खर्चाच्या किमतीत भरीव वाढ** [वसतीगृहे] अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांच्या अधिकार क्षेत्रात ८९ शासकीय आश्रमशाळा आणि १०४ शासकीय वसतीगृहे येतात. अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांच्या दस्तऐवजाच्या पडताळणीत असे आढळून आले की सन २०१२-१५ दरम्यान ८९ शासकीय आश्रमशाळांमध्ये प्रवेश संख्येत घसरता कल होता. (उणे १६ टक्के ते उणे ७ टक्के) तरी अन्नावरील खर्च (आहार खर्च या उपशिर्षाखाली वर्गीकृत केलेले) २०१२-१३ मध्ये ७६ टक्के तर २०१४-१५ मध्ये ८० टक्कयांनी मोठया प्रमाणात वाढला, २०१३-१४ मधील उतार वगळता, तसेच १०४ शासकीय वसतीगृहांमध्ये प्रवेश संख्येत जरी २०१२-१३ दरम्यान वाटता कल (नऊ ते ५३ टक्के) होता तरी अन्नावरील खर्च २०१२-१३ मधील ४६ टक्यावरुन २०१४-१५ मध्ये १७२ टक्यांवर अयोग्य प्रमाणात वाढला. याबाबतचे तपशिल तक्ता २.२.६ मध्ये मांडले आहे. अपर आयुक्त, अमरावती यांनी उत्तर सादर केले नाही. परंतू सचिव, आदिवासी विकास यांनी हे प्रकरण तपासण्यात येईल असे नमूद केले.	**शासकीय वसतीगृह (अमरावती विभाग)** अमरावती प्रादेशिक विभागात आदिवासी मुला- मुलींचे एकूण १०४ शासकीय वसतीगृहे सन २०१४-१५ वर्षाअखेर कार्यान्वीत आहेत. विभागांतर्गत कार्यान्वीत शासकीय वसतीगृहात मंजूर प्रवेशार्थी क्षमते अधिन प्रवेश देण्याची कार्यवाही करण्यात येते. सन २०११-१२ ते २०१४-१५ या कालावधीत अमरावती प्रादेशिक विभागातील शासकीय वसतीगृहात वर्षनिहाय प्रवेशार्थी संख्या व भोजन पुरवठयावर झालेल्या खर्चासबंधी विवरण खालीलप्रमाणे

अ. क्र.	कालावधी /वर्ष	मुला/ मुलींचे कार्यान्वीत वसतीगृहे संख्या	मंजूर प्रवेशार्थी क्षमता	प्रवेशित विद्यार्थी संख्या	दैनंदिन आहार /भोजन या बाबीवर झालेला वार्षिक खर्च (लाखात)
१.	२०११-१२	१०२	१२,८४०	८१९८	५८४.२८
२.	२०१२-१३	१०२	१२,८४०	८९६८ (वाढ ९%	८५५.७२ (वाढ ४६%
३.	२०१३-१४	१०४	१३,२६५	९९१० (वाढ २० %	१०८३.०८ (वाढ ८५%
४.	२०१४-१५	१०४	१३,२६५	१२५६१ (वाढ ५३ %	१५८८.८० (वाढ १७२%

सन २०१४-१५ या वर्षात वरीलप्रमाणे वसतीगृहातील प्रवेशित विद्यार्थी संख्या ही सन २०१२-१३ या वर्षातील प्रवेशित संख्येच्या तुलनेत ९ टक्यावरुन ५३ टक्के इतकी वाढीव झाली आहे. तसेच अन्नधान्य किराणा मालाचे वाढते बाजारभाव व वाढती प्रवेशार्थी संख्या विचारात घेता सन २०१२-१३ या वर्षातील भोजन खर्चाचे तुलनेत सन २०१४-१५ या वर्षात १७२ टक्के इतकी वाढ झाली आहे

परिच्छेद क्र.	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.४.४.	**एकाच क्षेत्रातील शासकीय वसतीगृहासाठी वेगवेगळया दराने कॅटरींग सेवा कंत्राट बहाल करणे.** आदिवासी विकास विभागाद्वारे आदिवासी मुला- मुलींच्या शासकीय वसतीगृहांना तयार जेवण पुरविण्यात येते. यासाठी प्रकल्प अधिका-यांना खाजगी सेवा पुरवठादारासोबत कॅटरींग सेवा कंत्राट करण्याचे प्राधिकार आहेत. सन २०१४-१५ दरम्यान प्रकल्प अधिकारी चंद्रपूर यांनी रु.३.७९ कोटी किंमतीवर १८ कॅटरींग कंत्राट सेवा पुरवठादारांना दिले. (जुलै २०१४) प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांच्या निविदा दस्तावेजाच्या पडताळणीत असे आढळले की, २०१४-१५ दरम्यान बहाल केलेल्या १८ पैकी १६ कंत्राटात कॅटरींगच्या दरात मोठया प्रमाणात तफावत (रु.२९९ ते १४९९ प्रती विद्यार्थी दरमहा) होती. जेव्हा की, ही वसतीगृहे एकाच क्षेत्रात स्थीत होती आणि सेवा पुरवठादारांनी एका ठरावीक आहारासाठीच (उपहार, मध्यान्ह भोजन आणि रात्रीचे जेवण) हे दर कळविले होते. याविषयीचे विवरण तक्ता २.२.७ मध्ये दर्शविले आहे. **अ. क्र. | वसतीगृहाचे ठिकाण | प्रवेशार्थी संख्या | प्रती विद्यार्थी मासिक दर रुपये | या ठिकाणचे मुलींचे व.गृह व (प्रवेश क्षमता) | प्रती विद्यार्थीनी मासिक दर रुपये | मुला - मुलींचे प्राप्त दरातील तफावत रुपये** **१. | मुलींचे चंद्रपूर क्र.२ | १२५ | १८९५ | मुलींचे चंद्रपूर क्र. १ (प्रवेशार्थी १००) | १६८६ | २९९** **२. | मुलांचे चंद्रपूर क्र. १ | १०० | २७७७ | | १६८६ | १०९१** **३. | मुलांचे चंद्रपूर क्र. २ | १६५ | २६६६ | | १६८६ | ९८०**	• सन २०१४-१५ या वर्षात प्रकल्प अधिकारी चंद्रपूर यांचे स्तरावर मुलांचे व मुलींचे शासकीय वसतीगृहांस दैनंदिन नास्ता, भोजन पुरवठा करणेसाठी प्रकल्पस्तरावर स्वतंत्रपणे ऑनलाईन निविदा मागविण्यात आल्या आहेत. • प्रकल्प स्तरावर मुलांचे शासकीय वसतीगृहास न्युनतम प्राप्त दर निविदा -धारक यांचे समवेत दि.३ जुलै २०१४ रोजी प्रथम दरवाटाघाटीसाठी बोलविले असता सबंधीत न्युनतम निविदाधारक यांनी निविदेत ारलेले दर हे स्थानिक बाजारभाव प्रमाणे असल्यामुळे व शासनाचे आहार मेनुप्रमाणे मुलांना भोजन आहार पुरवठा करणेसाठी दरवाटाघाटी करण्यास सबंधीत न्युतनम निविदाधारक यांनी सहमती दिली नसल्याचे प्र. अ. चंद्रपूर यांनी कळविले आहे. त्यानुसार प्र. अ. चंद्रपूर यांनी दिनांक २१.८.२०१४ रोजी अपर आयुक्त नागपूर यांचेकडे भोजनठेका दर मंजूर होणेसाठी प्रस्ताव सादर करण्यात येऊन प्रकल्प स्तरावर निवड केलेल्या निविदा धारक यांना मुला- मुलींचे वसतीगृहास भोजन पुरवठयासाठी आदेशित केले आहे. • मुलांच्या वसतिगृहामध्ये अनधिकृतपणे राहण्याचे प्रमाण अधिक असते, तसेच मुलांचा आहार हा मुलींपेक्षा जास्त असल्याने एकाच शहरात मुला/ मुलींचे वसतीगृहातील भोजनठेका मासिक दरात तफावत न राहण्याचे दृष्टीने शासनाकडून पत्र क्र. वगृह.२०१६/ प्र.क्र.६१/का.१२, दिनांक ३.३. २०१६ अन्वये क्षेत्रिय कार्यालयांना निर्देश देण्यात आले आहे.

४.	मुलांचे चंद्रपूर क्र.३	५०	२७७७		१६८६	१०९१
५.	मुलांचे राजूरा क्र.१	१००	२७५५	मुलींचे राजूरा क्र.१ (प्रवेश क्षमता ७५)	१४८१	१२७४
६.	मुलांचे राजूरा क्र.२	१००	२९८०		१४८१	१४९९
७.	मुलांचे गडचांदूर	७५	२७९५	मुलींचे गडचांदूर (६०)	१९५७	८३८
८.	मुलांचे गोंडपिंपरी	७५	२४४४	मुलींचे गोंडपिंपरी (६५)	१८९९	५४५
९.	मुलांचे व.गृह, मुल	७५	२४९९	मुलींचे व.गृह, मुल (६०)	१५१६	९८३
१०.	मुलांचे सिंदेवाही	७५	२३१६	मुलींचे सिंदेवाही (६०)	१६९९	६१७

याशिवाय, वरील अनु.क्रमांक ४ वर दर्शविलेल्या कंत्राटा व्यतिरिक्त उर्वरीत कंत्राटे, ज्यात विद्यार्थ्यांची संख्या जास्त किंवा तेवढीच होती, ती रकाना ७ मध्ये दर्शविण्यात आलेल्या दरापेक्षा खुप जास्त दराने (रकाना ४ पहा) देण्यात आली. यावरुन असे निदर्शनास होते की, प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांनी कॅटरिंग सेवेची निविदा अंतिम करतांना मितव्ययितेचे मापदंड अवलंबिले नाही.

सचिव, TDD यांनी या प्रकरणाची तपासणी करण्यात येईल आणि तपशिलवार उत्तर पाठविण्यात येईल, असे नमूद केले.

- इ-निविदा प्रक्रियेद्वारे स्पर्धात्मक स्वरुपात ऑनलाईन दर प्राप्त होत असल्याने एकाच शहरातील मुला-मुलींचे वसतीगृहातील भोजन पुरवठा न्युनतम प्राप्त दरात काहीअंशी प्रमाणात तफावती /वाढीव दर असल्यास त्यानुषंगाने प्रकल्प व अपर आयुक्त स्तरावर सबंधीत न्युनतम निविदाधारक अथवा इतर पात्र निविदाधारक यांचे समवेत वेळोवेळी दरवाटाघाटी करण्याची कार्यवाही केली जाते. परंतू अपेक्षीत प्रतिसाद मिळत नाही.

मुद्दा क्र.	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.४.५	शासकीय वसतीगृह बांधण्यातील विलंब • मार्च २०१५ पर्यंत आदिवासी मुला-मुलींसाठी असणाऱ्या राज्यातील ४९१ पैकी १३४ शासकीय वसतीगृहे शासकीय इमारतीमधुन चालविण्यात येत होते. तर उर्वरीत ३५७ (७३%) वसतीगृहे रुपये २.४० कोटी अश्या भक्कम मासिक भाड्यावर किरायाच्या इमारतीमध्ये चालविण्यात येत होती. • लेखापरिक्षेस असे आढळले की, ३५७ पैकी २२९ वसतीगृहांसाठी जमीन संपादीत करण्यात आली होती. तर १२८ वसतीगृहासाठी भुसंपादन अद्याप करण्यात आलेले नव्हते. • लेखापरिक्षेस असे ही निदर्शनास आले की, २०१०-१५ दरम्यान आदिवासी विकास विभागाने कोणतेही भौतिक लक्ष न ठरविता वसतीगृहांच्या बांधकामासाठी रुपये ४६१.८२ कोटी निधी वितरीत केला. आणि अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर (बीडीएस) रुपये ३५५.९० कोटीची तरतुद केली त्यापैकी प्रकल्प अधिकाऱ्यांद्वारे फक्त रुपये २३०.४५ कोटी (६५%) उपयोगात आणण्यात आले.	अ)आज अखेर राज्यात ४९१ शासकीय वसतीगृह कार्यान्वित आहेत • यापैकी ३६४ वसतीगृहास जमीन प्राप्त आहे. उर्वरीत १२७ वसतीगृहासाठी प्रकल्प कार्यालयाच्या स्तरावर जमीन प्राप्ती प्रक्रीया सुरु आहे. • १६६ वसतीगृह मालकीच्या इमारतीत सुरु आहेत. • उर्वरीत ३२५ वसतीगृहे भाड्याच्या इमारतीत सुरु आहेत. या इमारतींच्या भाड्यापोटी रुपये ३०.१२ कोटी वार्षिक खर्च येत आहे. सर्व वसतीगृहांना शासनाच्या मालकीच्या इमारतीत आणणेकरिता व कार्यवाही सुरु आहे. • सन २०१७-१८ या वर्षात एकुण ७१ वसतीगृहांची कामे अर्थसंकल्पीत करण्यात आली होती. त्याची सद्यस्थिती खालीलप्रमाणे • हस्तांतरीत कामे ०७ • पुर्ण कामे १३ • प्रगतीतील कामे ५१ • एकुण ७१ • मार्च २०१५ अखेरच्या मालकीच्या इमारती १३४वसतीगृह कार्यरत होते. तद्नंतर माहे फेब्रुवारी २०१८ अखेर हस्तांतरीत ३२ इमारती व वरील तयार १३ इमारती असे एकुण १७९ वसतीगृहे असून २०१८ पासून मालकीच्या इमारतीत सुरु होईल.

		• या व्यतीरीक्त ५१ कामे प्रगतीत आहेत. ही कामे पुर्ण होताच २३० वसतीगृह मालकीच्या इमारतीत येतील. • जमीन प्राप्त ३६४ वसतीगृहांपैकी २३० वसतीगृह वजा जाता १३४ वसतीगृहांना मालकीच्या इमारतीची आवश्यकता आहे. • त्यासाठी बांधकाम कक्षास अंदाजपत्रके तयार करण्याबाबत वेळोवेळी निर्देश देण्यात आलेले आहेत. त्यानुसार त्यांचेकडुन अंदाजपत्रके तयार होत आहेत. • सद्यस्थितीत ५४ वसतीगृहांची अंदाजपत्रके प्रशासकीय मान्यतेसाठी सादर/प्राप्त आहेत. उर्वरीत ८० वसतीगृहांची अंदाजपत्रके मोहिम तत्वावर तयार करण्यात येतील. • जमीन अप्राप्त १२७ वसतीगृहांकरीता प्रकल्प कार्यालयाच्या स्तरावरुन जमीन प्राप्तीसाठी कार्यवाही सुरु आहे. आयुक्तालयाच्या स्तरावरुन संबधीत जिल्हाधिकारी यांस जमीन उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. • प्रति वर्षी इमारत बांधकामासाठी अर्थसंकल्पात नियतव्यय निश्चित करतांना चालु बांधकामे व प्रशासकीय मान्यता प्राप्त नविन कामे यांचा एकत्रित विचार करुन कामांची संख्या निश्चित केली जाते व वर्षभरात कामनिहाय अपेक्षित खर्च विचारात घेतला जातो. सदर प्रस्तावीत नियतव्यय अंदाजीत असतो. • सन २०१० ते २०१५ या कालावधीत शासकीय वसतीगृह इमारत बांधकामाकरीता अर्थसंकल्पीत, वितरीत व प्रत्यक्षात खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

रुपये लाखात

अ.क्र.	वर्ष	अर्थसंकल्पीत तरतुद	वितरीत तरतूद	प्रत्यक्ष
१	२०१०-११	४५.९४	४५.९४	
२	२०११-१२	९०९.३७	९०९.३७	
३	२०१२-१३	१७६८.६६	१७६८.६६	
४	२०१३-१४	२९९२.००	२९९२.००	
५	२०१४-१५	२९४४.८३	२९४४.८३	
एकूण राज्यस्तर		८६६०.८००	८६६०.८००	
६	२०१५-१६	२१३०.८१	२१३०.८१	
७	२०१६-१७	७१००.००	७१००.००	
८	२०१७-१८	१४०००.००	३०१४.५३	
९	२०१८-१९	१२५००.००		

भाडेतत्वावर ३२५ वसतिगृह कार्यरत आहेत.

	एकुण वसतीगृहे	शासकीय इमारतीत	भाडेतत्वावर	वार्षिक भाडे
मार्च २०१५	४९१	१३४	३५७	२.४० कोटी
मार्च २०१८	४९१	१६६	३२५	३०.१२ कोटी

वसतिगृह बांधकामाचा गोषवारा खालील प्रमाणे आहे

जमीन प्राप्त- ३६४

जमीन अप्राप्त- १२७

अंदाजपत्रकस्तर- ७३

बांधकाम सुरु- ७१

शासनास सादर- ५४

	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.४.६	शासकीय आश्रमशाळा बांधण्यातील विलंब आदिवासी विकास विभागाने मे २००५ ते जुलै २०११ दरम्यान ३४ शासकीय आश्रमशाळा इमारती बांधकामासाठी रुपये १६७.९८ कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान केली. सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे (PWD) आश्रमशाळा इमारतींचे बांधकाम डिपॉझीट वर्क करावयाचे होते. लेखापरिक्षा पडताळणीत खालील प्रमाणे आढळले. • आदिवासी विकास विभागाने PWD कडे निधी जमा केला. परंतु बांधकाम पुर्ण करण्यासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित केली नव्हती. अनेक प्रकरणात PWD ने प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर २-३ वर्षानंतर कार्यादेश जारी केले. • मार्च २०१५ पर्यंत ३४ पैकी फक्त २ आश्रमशाळा बांधण्यात येऊ शकल्या, तथापी या आश्रमशाळा PWD ने मार्च २०१५ पर्यंत आदिवासी विकास विभागाच्या सुपुर्द केल्या नाही. • उर्वरीत ३२ आश्रमशाळांपैकी २३ आश्रमशाळांचे काम मार्च २०१५ पर्यंत चालु होते. मार्च २०१५ पर्यंत ९ आश्रमशाळांची कामे, प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतरही (एक आश्रमशाळा) आणि जुन २०१० ते ऑक्टो २०१५ दरम्यान प्रशासकीय मान्यता संपल्यानंतरही (आठ आश्रमशाळा) सुरु झाली नव्हती.	• शासकीय आश्रमशाळा इमारत बांधकामा करिता सार्वजनिक बांधकाम विभागास ठेवअंशदान अंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. सदर निधीतुन ३४ शासकीय आश्रमशाळा इमारती बांधकामा करिता झालेला खर्चाचा तपशिल तथा सद्यस्थिती सोबत सादर करण्यात येत आहे. • अपर आयुक्त, ठाणे यांचे कार्यक्षेत्रातील डहाणु प्रकल्पातील १६ शासकीय आश्रमशाळा व जव्हार प्रकल्पातील १८ शासकीय आश्रमशाळा अशा एकुण ३४ शासकीय आश्रमशाळा इमारत बांधकामाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे. (रुपये लाखात)

अ. क्र.	प्रकल्प	आश्रमशाळा	प्र.मा. किंमत	शेरा
१	डहाणु	सवणे	४६८.००	दि.२६.८.१६ रोजी शालेय इमारत ताब्यात
२		अस्वली	५२३.००	शाळा इमारत काम पुर्ण् व विद्युतफिटींग चालु
३		उधवा	२३५.००	दि.८.६.१७ रोजी शालेय इमारत ताब्यात
४		वरवाडा	३३४.००	दि.८.६.१७ रोजी शालेय इमारत ताब्यात
५		नंडोरे	१८६.००	दि.८.१०.१७ रोजी शालेय इमारत ताब्यात
६		मेंढवण (खुटल)	१८६.००	काम पुर्ण झाले असुन हस्तांतरण कार्यवाही सुरु
७		रणकोळ	३९३.००	वसतीगृह इमारत विद्युत फिटींगचे कामे सुरु शालेय इमारत विटकाम सुरु
८		धामणगांव	४६७.००	शाळा इमारत काम पुर्ण् व विद्युतफिटींग चालु
९		गिरगांव	४३५.००	शालेय इमारत अंतर्गत कामे सुरु
१०		झाई	४५६.००	शालेय इमारत अंतर्गत कामे सुरु
११		उपलाट	८२८.२५	शालेय इमारत अंतर्गत कामे सुरु

- प्रशासकीय मान्यता संपल्यामुळे सुरु होऊ शकली नाही अशा आठ आश्रमशाळा कामांपैकी चार आश्रमशाळांसाठी PWD कडे जमा केलेले रुपये १०.४१ कोटी अडकुन राहीले.

सचिव, TDD यांनी PWD ला जमा केलेला निधी परत करण्याबाबत अथवा दुसऱ्या आश्रमशाळा कामांसाठी वापरण्याबाबत सुचना देण्यात येतील. असे नमुद केले.

३४ आश्रमशाळापैंकी ८ आश्रमशाळांची बांधकामे पूर्ण होऊन वापरात आहेत. ४ आश्रमशाळांची हस्तांतरीत कर्यावाही सुरू आहे. १३ आश्रमशाळांची बांधकामे सुरू आहेत. ९ आश्रमशाळांची काम सुरू झालेली नाहीत.

१२		वरखंडा	१७३.०१	सन २००५ मध्ये प्र.मा.प्राप्त काम सुरु नाही.
१३		आंबेसरी	४६२.५८	सदर शाळेचा निधी जागेअभावी चळणी शाळेला वर्ग केला. चळणी आश्रमशाळेत शालेय इमारत व मुलींचे वसतीगृहाचे काम सुरु आहे.
१४		सायवण	४६४.४४	प्रस्तावित कामास मंजुरी अप्राप्त
१५		ढेळाळे	१८०.६७	जागे अभावी इमारत बांधकाम नाही
१६		टाकवाळ	१७०.६९	जागे अभावी इमारत बांधकाम नाही
एकुण डहाणु			१२७८.३८	
१७	जव्हार	हिरवे	६८४.५६	शालेय इमारत व मुलींचे वसतीगृह बांधकाम पुर्ण
१८		गोंदे	७६६.७९	शालेय इमारत, मुलां-मुलींचे वसतीगृह पुर्ण व वापरात
१९		साखरे	४५५.६३	शालेय इमारत व मुलांच वसतीगृह पुर्ण व वापरात
२०		देहरे	५९३.४२	शालेय इमारत, मुलां-मुलींचे वसतीगृह पुर्ण व हस्तांतरण प्रगतीत
२१		विनवळ	४५७.४५	शालेय इमारत, मुलींचे वसतीगृह रंगकाम प्रगतीत
२२		दाभेरी	६४३.२८	शालेय इमारत, मुलां-मुलींचे वसतीगृह पुर्ण व हस्तांतरण प्रगतीत
२३		कावळे	५७२.६३	शालेय इमारत, मुलींचे वसतीगृह पुर्ण हस्तांतरण प्रगतीत व मुलांचे वसतीगृह विटकाम प्रगतीत
२४		कुर्झे	६०५.०८	शालेय इमारत व मुलींचे वसतीगृह बांधकाम पुर्ण
२५		सुर्यमाळ	६१४.४५	शालेय इमारत व मुलींचे वसतीगृह काम सुरु व मुलांचे वसतीगृह काम सुरु नाही.
२६		गुहीर	४०६.५९	शालेय इमारत विटकाम पुर्ण व मुलींचे वसतीगृह तिसऱ्या स्लॅबचे काम प्रगतीत
२७		गारगांव	५३७.१३	शालेय इमारत व मुलांचे वसतीगृह काम सुरु
२८		पुळसुंडे	६४९.८९	शालेय इमारत प्लास्टर काम अपुर्ण व मुलांचे वसतीगृह विद्युत फिटींग काम अपुर्ण

		२९		पाली	५३६.८६	शालेय इमारत व मुलींचे वसतीगृह इमारत बांधकाम पुर्ण व विद्युत फिटींग व किरकोळ कामे बाकी.
		३०		कळंबे	६४६.८४	प्रशासकीय मान्यतेला ५ वर्षाचा कालावधी उलटुन गेल्याने प्र.मा.रद्द करण्यात आली आहे. नविन अंदाजपत्रक शासनास सादर केले आहे. सद्यस्थितीत शाळा भाड्याच्या इमारतीत कार्यरत आहे.
		३१		आमगांव	६३२.०३	प्रशासकीय मान्यतेला ५ वर्षाचा कालावधी उलटुन गेल्याने प्र.मा.रद्द करण्यात आली आहे. नविन अंदाजपत्रक शासनास सादर केले आहे. सद्यस्थितीत शाळा भाड्याच्या इमारतीत कार्यरत आहे.
		३२		ऐंना	६४७.१६	प्रशासकीय मान्यतेला ५ वर्षाचा कालावधी उलटुन गेल्याने प्र.मा.रद्द करण्यात आली आहे. सद्यस्थितीत शाआशा सारखे शाळेच्या जुन्या शेड मध्ये भरत आहे. तसेच नविन अंदाजपत्रक तयार करण्यात आली आहे.

३३		ओझर	६६३.३६	प्रशासकीय मान्यतेला ५ वर्षाचा कालावधी उलटुन गेल्याने प्र.मा.रद्द करण्यात आली आहे. २७५(१) मधुन सदर बांधकामाकरिता रुपये ३.६२ लक्ष निधी मिळाला आहे. शालेय इमारतीचे अंदाजपत्रक अ.अ.सा.बां. (आदिवासी) मंडळ, नाशिक यांना सादर केला आहे. सद्यस्थितीत भाड्याच्या इमारीत कार्यरत आहे.
३४		मुरबाड	६१४.१८	प्रशासकीय मान्यतेला ५ वर्षाचा कालावधी उलटुन गेल्याने प्र.मा.रद्द करण्यात आली आहे. सद्यस्थितीत सुर्या कॉलनी मध्ये भरत आहे
एकुण जव्हार			१०७२७.३३	
एकुणांत			१२००५.७१	

- शिल्लक निधी परत करणे अथवा इतर शासकीय आश्रमशाळांच्या कामांवर वळती करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

राज्यात ५५२ शासकीय आश्रमशाळा मंजूर असून सद्यसिथीत ५०२ शासकीय आश्रमशाळा कार्यरत आहेत. शासकीय आश्रमशाळा व शासकीय वसतीगृहांची बांधकामे व देखभाल दुरुस्तीची उक्त गतीने पुर्ण होत नव्हती. त्यामुळे विद्यार्थ्यांना सुविधाअभावी जुन्या किंवा भाडयाच्या इमारतीत राहावे लागत असे. बांधकाम पुर्ण झालेल्या इमारती किरकोळ कामाअभावी किंवा विद्युतीकरणाअभावी हस्तांतरीत होत नव्हत्या त्यामुळे बांधकाम खर्चात वाढ होवून अरिक्त खर्चाचा भार शासनास सोसावा लागत असे. सार्वनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत असलेल्या बांधकामाबाबत सनियंत्राण ठेवण्याकरिता आदिवासी विभागाकडे स्वतंत्र

यंत्राणा नव्हती या बाबींचा विचार करुन आदिवासी विकास विभागाने शासन निर्णय दिनांक १४ जुलै २०१६ नुसार शासकीय आश्रमशाळा /वसतिगृह यांची बांधकाम व देखभाल दुरुस्तीसाठी स्वतंत्र बांधकाम व्यवस्थापन कक्ष स्थापन केला आहे.

सदर सर्व आश्रमशाळांना विभागाच्या मालकीच्या इमारती बांधण्याकरिता गत तीन वर्षात जमीन संपादन इमारत बांधकाम याबाबत मोहिम तत्वावर कार्यवाही झालेली आहे.

गत तीन वर्षात शालेय इमारत ७३, आश्रमशाळा मुलांचे वतिगृह २५, मुलींचे वसतिगृह ४० अशा १३८ इमारती ताब्यात घेतल्या आहेत.

आश्रमशाळांच्या बांधकामाची सद्य:स्थिती खालील प्रमाणे आहे.

अ.क्र	टप्पा १	टप्पा २	
	२७४	१०८	

२ जानेवारी २००७ च्या शासन निर्णया नुसार नवीन टाईपप्लॅन प्रमाणे पुर्ण व चालू कामे खालीलप्रमाणे

अ. क्र.	बाब	पुर्ण	सन १७-१८ मधील कामे	एकू
	संकुल	४२	३३	७५
१	शालेय इमारत	११४	६२	१७
२	मुलींचे वसतिगृह	७६	३२	१०
३	मुलांचे वसतिगृह	४३	४१	८४
४	बहुउद्देशीय हॉल	८१	०	८१

भाडयाच्या इमारतीत कार्यरत असलेल्या १०१ आश्रमशाळापैकी ३० शाळांची अंदाजपत्राके तयार असून प्रशासकी मान्यता देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. १५ आश्रमशाळांची बांधकामे सुरु आहेत.

	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.४.७	**आश्रमशाळा इमारतींच्या बांधकामावर करण्यात आलेला विवेकहिन खर्च** मारेगांव ता.शिंदेवाही शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता १ ते ७ वी मध्ये दाखला घेण्याऱ्या विद्यार्थ्यांची कमी संख्या विचारात घेऊन प्रकल्प अधिकारी, चंद्रपुर यांनी मारेगांव येथील सर्व ६९ विद्यार्थ्यांना पिंपरी दिक्षीत ता.मुल येथील शासकीय आश्रमशाळेत भरती करुन या दोन्ही आश्रमशाळा विलीनी करणाचा प्रस्ताव (जुलै २०१२) मांडला. जुलै २०१४ मध्ये TDD ने हा विलीनीकरण प्रस्ताव मान्य केला. आणि मारेगांव आश्रमशाळा बंद करण्यात आली. परंतु लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की, ६९ विद्यार्थ्यापैकी कोणत्याही पिंपरी दिक्षीत आश्रमशाळेत प्रवेश घेतला नाही. कारण या दोन आश्रमशाळांमध्ये (मारेगांव आणि पिंपरीदिक्षीत) ४० कि.मी.अंतर होते. विद्यार्थ्यांनी पिंपरी दिक्षीत आश्रमशाळे ऐवजी जवळ पासच्या जि.प.शाळेतआणि मारेगांव जवळील इतर अनुदानित आश्रमशाळेत प्रवेश घेतला. अशा प्रकारे शाळेच्या विलिनीकरणाचा मुळे उद्देशच विफल ठरला. दरम्यानच्या काळात प्रकलप अधिकारी, चंद्रपुर यांनी मारेगांव वस्तीत नविन आश्रमशाळा बांधण्याचा दुसरा प्रस्ताव मांडला (सप्टेंबर २०१२) आणि TDD ने डिसेंबर २०१२ मध्ये या प्रस्तावास मान्यता देऊन यासाठी रुपये २.८६ कोटी मंजुर केले. फेब्रुवारी २०१४ मध्ये हे काम बहाल करण्यात आले आणि डिसे २०१५ पर्यंत यावर रुपये १.९७ कोटी खर्च करण्यात आला. सुरुवातीला प्रवेश घेणाऱ्यांची कमी संख्या लक्षात घेऊन आश्रमशाळा बंद करणे आणि नंतर त्याच वस्तीत नवीन आश्रमशाळा इमारत बांधण्याचा निर्णय घेणे तक्रसंगत नाही. आणि यामुळे रुपये १.९७ कोटी विवेकहिन खर्च झाला. सचिव, TDD यांनी बांधकाम सुरु असलेल्या इमारतीचा वापर होण्यासाठी आवश्यक कारवाई करण्यात येईल असे नमुद केले.	शासन निर्णय आदिवासी विकास, मंत्रालय, मुंबई क्र.शाआशा-२०१३/प्र.क्र.३१४/का-१३,दिनांक ५.८.२०१६ अन्वये शासकीय आश्रमशाळा, पिंपरीदिक्षित ता.मुल जि.चंद्रपुर व शासकीय आश्रमशाळा उमरीपोतदार ता.पोंभुर्णी जि.चंद्रपुर येथील अपुरी विद्यार्थी संख्या व सोयी सुविधांची कमतरता असल्यामुळे मारेगांव, ता.शिंदेवाही जि.चंद्रपुर येथे नविन इमारीतचे बांधकाम सर्व सोयी सुविधांसह पुर्ण झालेले असल्यामुळे इयत्ता १ ते १० वी चे वर्ग सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. शैक्षणिक सत्र २०१७४-१८ या वर्षापासुन मारेगांव येथे इयत्ता १ ली ते १० वी पर्यंतचे वर्ग सुरु करण्यात आलेले असुन सदर शाळेत शैक्षणिक सत्र २०१७-१८ या वर्षात खालीलप्रमाणे इयत्ता निहाय विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. इयत्ता | मुले | मुली | एकुण एकुण | ८५ | ५६ | १४१

	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.४.८	आश्रमशाळांमध्ये मुलभूत सुखसोयींची अपर्याप्तता अ) २००६-०७ च्या आश्रमशाळा संहितेत आश्रमशाळांमध्ये मूलभूत सुविधा, जसे वर्ग कक्ष वाचनालय, प्रयोगशाळा, भोजन कक्ष, भांडार कक्ष, स्वयंपाक घर, पिण्याच्या पाण्याची सोय, प्रसाधनगृह, स्नान घर, खेळण्याचे मैदान, फिरत्या वैद्यकीय कक्षची तरतूद इत्यादि सोयी पुरविण्याचे विहित केले आहे.	मुलभुत सुखसोयी - राज्यात एकुण ५५२ शासकीय आश्रमशाळा मंजुर असुन ५०२ आश्रमशाळांचा अपर आयुक्त निहाय सोयी-सुविधांचा गोषवारा खालीलप्रमाणे

अपर आयुक्त	आश्रम शाळां संख्या	शाळा इमारत संख्या		स्नानगृहे		शौचालये		पाण्याची व्यवस्था		वाचनालय	क्रिडांगणे	प्रयोग शाळा
		शास.	भाड्याने	मुले	मुली	मुले	मुली	कायम	तात्पुरती			
नाशिक	२१५	१६६	४९	१३१२	१४७४	१५९७	१६७८	११६	९९	८३	१३०	८४
ठाणे	१२८	९७	३१	६४६	८१३	८८५	८४८	१०८	२०	१८	८७	१२
अमरावती	८१	६८	१३	६५७	५९८	७३७	५४५	६३	१८	९	७०	३१
नागपूर	७८	७६	२	६५९	८७२	७६४	७५२	७२	०६	४४	६४	६०
	५०२	४०७	९५	३२७४	३७५७	३९८३	३८२३	३५९	१४३	१५४	३५१	१८७

आश्रमशाळानिहाय मुलभूत सोयीसुविधांची माहिती यासोबत जोडून देण्यात येत आहे.

सद्यस्थितीत या विभागाच्या अंतर्गत स्वतंत्र बांधकाम कक्ष तयार करण्यात आला असुन २ जानेवारी २००७ च्या शासन निर्णयान्वये नविन टाईप प्लॅन प्रमाणे बांधकाम करण्यात येईल. आणि ज्या आश्रमशाळांवर सुखसोयींचा अपर्याप्तता आहे. अशा शासकीय आश्रमशाळांना सुख-सोयी पुरविण्यात येतील.

	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.४.८	ब) फिरत्या वैद्यकीय पथकाद्वारे आश्रमशाळांना आवश्यकते एवढया भेटी दिल्या नव्हत्या. आश्रमशाळा सहितेच्या नियम ३.२९ अ नुसार वैद्यकीय पथकाने प्रत्येक आश्रमशाळेत विद्यार्थ्याच्या वैद्यकीय तपासणी साठी दर महिन्यात कमीत कमी एकदा भेट द्यावयास हवी. म्हणजेच प्रत्येक आश्रमशाळेत ५ वर्षाच्या कालावधीत (२०१० ते २०१५) वेळा भेट द्यावयास पाहिजे होती. या तरतूदी विरुध्द फिरत्या वैद्यकीय पथकाद्वारे आश्रमशाळांना देण्यात आलेल्या भेटीत तक्ता २.२.८ मध्ये दर्शविल्या प्रमाणे मोठया प्रमाणात तूट होती. तक्ता २.२.८ फिरत्या वैद्यकीय पथकाद्वारे देण्यात येणाऱ्या भेटीमधील तूट. <table><tr><th>फिरत्या वैद्यकीय पथकांद्वारे देण्यात आलेल्या भेटींची संख्या</th><th>भेट देण्यात आलेल्या आश्रमशाळांची संख्या</th></tr><tr><td>१-१० भेटी</td><td>२४</td></tr><tr><td>११-२० भेटी</td><td>१७</td></tr><tr><td>२१-३० भेटी</td><td>५</td></tr><tr><td>३१-४० भेटी</td><td>१</td></tr><tr><td>४१-५० भेटी</td><td>३</td></tr><tr><td>५० पेक्षा जास्त भेटी</td><td>१</td></tr><tr><td colspan="2">स्त्रोत : आश्रमशाळांमधून संकलित केलेली माहिती.</td></tr></table>	आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना तपासणी करता फिरते वैद्यकीय पथक स्थापन करण्यात आले आहे .मात्र या पथकाकडे दौरे करण्याकरीता वाहन नाही .पथकातील पदे भरलेली नाहीत .व हे पथक उप जिल्हा रुग्णालयांना जोडण्यात आलेले आहेत .त्वरीत वैद्यकीय अधिका-यांची पर्यायी व्यवस्था पथकाकरीता करण्यात आली आहे .अशा परिस्थतीत सुध्दा वाहनाची व आरोग्य कर्मचारी यांची पर्यायी व्यवस्था करुन शाळांना भेटी देण्यात येत आहेत. पथकांमध्ये पुरेरे अधिकारी व कर्मचारी नसल्याने स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्र ,ग्रामीण रुग्णालय ,उप जिल्हा रुग्णालय याठिकाणी शाळेतील विदयार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येते . तसेच तेथील डॉक्टर ,नर्स हे शाळेस भेट देऊन विदयार्थ्यांची तपासणी करतात .विदयार्थी आजारी पडल्यास शालेय प्रशासनामार्फत तात्काळ रुग्णालयात नेऊन उपचार करण्यात येतात . याशिवाय एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण व शहापुर या प्रकल्पात उर्वी अशोक पिरामल फाऊंडेशन मुंबई या एन.जी.ओ .शी वैद्यकीय तपासणी व उपचाराबाबत शासन स्तरावर करार करण्यात आला असुन त्यांचे मार्फत दोन्हीही प्रकल्पात सुसज्ज अशा प्रत्येकी तीन मोबाईल व्हॅन कार्यरत असुन त्यात डॉक्टर ,नर्स ,कम्पांउडर इत्यादी परीपुर्ण स्टाप औषधांसह उपलब्ध आहे .त्याचे मार्फत या प्रकल्पांतील प्रत्येक शाळेला आठवडयातुन किमान एक भेट दिली जाते .व विदयार्थ्यांची आरोग्य तपासणी करुन औषधोपचार केला जातो .तसेच आवश्यकता वाटल्यास पुढील उपचाराकरीता ग्रामीण रुग्णालय उपजिल्हा रुग्णालय व जिल्हा रुग्णालयात पाठविले जाते . प्रकल्प कार्यालय धारणी अंतर्गत शासकीय आश्रमशाळा चिरोडी ता .चांदुर रेल्वे जि .अमरावती येथे कार्यरत असुन सदर शाळा ओटीएसपी क्षेत्रामध्ये आहे .या शाळेकरीता आरबिएसके मार्फत मागील ५वर्षात ७भेटी देण्यात आल्या आहेत .शैक्षणिक वर्ष सन२०१७ - १८पासुन दर तीमाहीत एक भेट देण्यात आली आहे .तसेच ANM व MPW मार्फत ९वेळा भेटी देण्यात आल्या आहेत . शासकीय आश्रमशाळा टेंब्रुसोंडा ता .चिखलदरा ही शाळा कन्या शाळा असुन सदर शाळा टिएसपी क्षेत्रामध्ये असल्याने या प्रकल्पातील धारणी ता .चिखली तालुक्यातील शाळांची तपासणी करणेकरीता फिरते वैद्यकीय भरारी पथक कार्यान्वीत आहे .सदर भरारी पथकामार्फत दरमहा विदयार्थ्यांची तपासणी करण्यात येते.

		• प्रत्येक शाळेमध्ये ANM च्या सेवा प्राथमिक आरोग्य केंदाने उपलब्ध करुन दिल्या आहेत. शहापूर व पेन प्रकल्पात ३५ शाळांमध्ये उर्वी परिमल फाऊंडेशनच्या सहाय्याने फिरत्या मोबाईल पथकाद्वारे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची प्रत्येक आठवडयातून एकदा तपासणी करण्यात येत आहे.

	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.४.८	क) आश्रमशाळांमध्ये प्रसाधनगृहे आणि स्नानघरांची संख्या अपर्याप्त असणे. निवडलेल्या ५२ आश्रमशाळांची मंजूर संख्या २७,४७० विद्यार्थ्यांची होती. या आश्रमशाळांमध्ये ७९६ प्रसाधनगृहि ७०४ स्नान घरे होती, म्हणजेच सरासरी ३५ विद्यार्थ्यासाठी एक प्रसाधनगृ हि ३९ विद्यार्थ्यासाठी एक स्नानघर उपलब्ध होते. दोन आश्रमशाळांमध्ये (धानवळ आणि ओझर) प्रसाधनगृ हि स्नानघर नव्हते आणि एका आश्रमशाळेत (बोरीपाडा) प्रसाधनगृह नव्हते. परिणामी या आश्रमशाळातील विद्यार्थी मुलांना प्रसाधनासाठी उघडयावर जाण्या शिवाय दुसरा मार्ग नव्हता आणि विद्यार्थी मुली गावातील महिलांसाठी असलेल्या सामाईक प्रसाधन गृहांचा वापर करीत होत्या. इतर सुविधांची अनुपलब्धता ५२ आश्रमशाळांमध्ये आढळलेल्या इतर अपर्याप्ता खालीलप्रमाणे होत्या • १५ आश्रमशाळांमध्ये खेळण्यासाठी मैदान नव्हते • १३ आश्रमशाळांमध्ये कर्मचाऱ्यांसाठी निवासी क्वार्टर्स नव्हते • २७ आश्रमशाळांमध्ये विज्ञान प्रयोगशाळा नव्हत्या • १९ आश्रमशाळांमध्ये भोजन कक्ष नव्हते • २६ आश्रमशाळांमध्ये संगणक कक्ष नव्हते • ३० आश्रमशाळांमध्ये वाचनालय कक्ष नव्हते .	लेखा परिक्षणाच्या दरम्यान नाशिक, नंदुरबार, जव्हार, डहाणु, धारणी, पांढरकवडा, नागपुर व चंद्रपुर असे एकुण ८ प्रकल्पांमधील ५२ शासकीय आश्रमशाळांची तपासणी झाली आहे. लेखा परिक्षण समयी उपलब्ध असलेल्या प्रसाधनगृह व स्नानगृह यांची सद्यस्थिती खालील प्रमाणे आहे.

अ. क्र.	तपशिल	लेखापरिक्षण दिनांकास उपलब्ध	सद्यस्थितीत उपलब्ध	कमी/ जादा	सदयस्थिती विदयार्थी सराररी प्रमाण	
					लेखापरिक्षण दिनांकास	विदयमान स्थिती
१	५२ शासकीय आश्रमशाळा प्रसाधनगृह	७२६	९६९	(+) १७३	३५ विदयार्थ्या मागे ०१ प्रसाधनगृह	२८ विदयार्थ्या मागे ०१ प्रसाधनगृह
२	५२ शासकीय आश्रमशाळा स्नानगृह	७०४	८४२	(+) १३८	३९ विदयार्थ्या मागे ०१ स्नानगृह	३३ विदयार्थ्या मागे ०१ स्नानगृह

अ.क्र.	शा.आ.शा नांव	लेखापरिक्षण दिनांकास उपलब्ध		सद्यस्थितीत उपलब्ध		कमी/ जादा		शेरा
		स्नान गृह	प्रसाधन गृह	स्नानगृह	प्रसाधन गृह	स्नानगृह	प्रसाधन गृह	
१	धानवळ	०	०	२०	२०	(+)२०	(+) २०	गोंदे येथे स्थलांतर
२	ओझर	०	०	०	१५	०	(+) १५	
३	बोरीपाडा	०	०	१८	२१	(+) १८	(+) २१	

८ प्रकल्पातील ५२ शासकीय आश्रमशाळांच्या मुलभुत सुखसोयीचा सद्यस्थितीचा तपशिल सोबत संलग्न केलेला आहे.

आदिवासी वि ५२ आश्रमशाळांची सद्यस्थिती दर्शविणारे विवरण पत्र (सोयी सुविधा)

अ.क्र	अपर आयुक्त	प्रकल्प	आश्रम शाळेचे नाव	तालुका	आश्रमशाळा इमारत		विद्यार्थी स्नानगृह संख्या	विद्यार्थीनी स्नानगृह संख्या	विद्यार्थी शौचालय संख्या	विद्यार्थीनी शौचालय संख्या	किडणाण		निवासस्थान		दवाखाना शाळा		भोजन कक्ष		संगणक कक्ष		ग्रंथालय	
					शासकीय /शेडस	भाडयाचे					आहे	नाही	वर्ग-३	वर्ग-४	आहे	नाही	आहे	नाही	आहे	नाही	आहे	नाही
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८	१९	२०	२१	२२	२३
१	नाशिक	नाशिक	बारीपाडा	त्र्यंबकेश्वर	शासकीय		५	५		५	आहे		१६	५		नाही	आहे		आहे			नाही
२			धोडबार	सिन्नर	शासकीय		२	४	१६	४	आहे		७	७	आहे		आहे		आहे			नाही
३			नाळेगाव	दिंडोरी	शासकीय		३		८	६	आहे		१२	१६	आहे		आहे		आहे		आहे	
४			शिरसगाव	त्र्यंबकेश्वर	शासकीय		१८	५	१८	५	आहे		१६	१२		नाही	आहे		आहे			नाही
५			देवगाव	त्र्यंबकेश्वर	शासकीय			१०		२०		नाही	१०	०		नाही	आहे		आहे			नाही
६			तोरंगण	त्र्यंबकेश्वर	शासकीय					८	आहे		०	१२		नाही	आहे		आहे			नाही
७			देवसाने	दिंडोरी	शासकीय		१६	८	१८	९	आहे		७	९		नाही	आहे		आहे			नाही
८			कोहोर	पेठ	शासकीय		४	४	४	४	आहे		७	४		नाही	आहे		आहे			नाही
९			आंबे	पेठ	शासकीय		१८	१५	५	५	आहे		०	०		नाही	आहे		आहे			नाही
१०			बोरवड	पेठ	शासकीय							नाही	८	८		नाही	आहे		आहे			नाही
एकुण				१०	१०	०	६६	५१	६९	६६	८	२	८३	७३	२	८	१०	०	१०	०	१	९
११		नंदुरबार	ढोंगसागाळी	नवापुर	शासकीय		१०	३०	८	२३	आहे		७	३	आहे		आहे		आहे		आहे	
१२			बंधारे	नवापुर	शासकीय		८	१३	१०	१६	आहे		३	५		नाही		नाही	आहे			नाही
१३			नाव्ली	नवापुर	शासकीय		१८	७	१८	३	आहे		७	६		नाही	आहे		आहे		आहे	
१४			भादवड	नवापुर	शासकीय		१८	४	१८	६	आहे		७	६	आहे		आहे		आहे		आहे	
१५			देवमोगरा	नवापुर	शासकीय		११	१२	१४	१३	आहे		७	७	आहे			नाही	आहे		आहे	
१६			कोठली (कन्या)	नंदुरबार	शासकीय		०	२९	०	२३	आहे		७	३	आहे		आहे		आहे		आहे	
१७			खोकराळे	नंदुरबार	शासकीय		९	१५	९	१५	आहे		७	३		नाही	आहे		आहे			नाही
१८			गणोर	शहादा	शासकीय		१०	४	९	९	आहे		७	९		नाही	आहे		आहे			नाही
एकुण				८	८	०	८४	११४	८६	१०८	८	०	५२	४२	४	४	६	२	८	०	५	३
१९	पालघर	जव्हार	चास	मोखाडा	शासकीय		५	५	१५	१२	आहे		०	०		नाही		नाही	आहे			नाही
२०			गारगाव	विक्रमगड	शासकीय		१६	४	१६	१९	आहे		३	१		नाही	आहे		आहे			नाही
२१			कुझे	विक्रमगड	शासकीय		४	१०	१०	१३	आहे		१	०		नाही	आहे		आहे		आहे	
२२			ओझर	जव्हार		भाडयाची	०	०	५	१०		नाही	०	०		नाही	आहे			नाही		नाही
२३			धानवळ	मोखाडा		भाडयाची	०	०	०	०		नाही	०	०		नाही		नाही		नाही		नाही
२४			सुर्यमाळ	मोखाडा	शासकीय		१०	१०	१०	१०	आहे		०	०		नाही		नाही	आहे			नाही
२५			कारेगाव	मोखाडा	शासकीय		०	१०	०	१०	आहे		५	७		नाही	आहे		आहे			नाही
२६			दाभरी	जव्हार	शासकीय		८	८	१०	६	आहे		३	३		नाही	आहे		आहे			नाही
एकुण				८	६	२	४३	४७	७४	८०	६	२	१२	११	०	८	५	३	६	४	२	७

अ.क्र	अपर आयुक्त	प्रकल्प	आश्रम शाळेचे नांव	तालुका	आश्रमशाळा इमारत		विद्यार्थी स्नानगृह संख्या	विद्यार्थीनी स्नानगृह संख्या	विद्यार्थी शौचालय संख्या	विद्यार्थीनी शौचालय संख्या	क्रिडांगण		निवासस्थान		पाणी शाळा		भोजन कक्ष		संगणक कक्ष		ग्रंथालय	
					शासकीय इंडस	भाडयाची					आहे	नाही	वर्ग-३	वर्ग-४	आहे	नाही	आहे	नाही	आहे	नाही	आहे	नाही
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७	१८	१९	२०	२१	२२	२३
२७		डहाणू	बिलाल पाडा	वसई		भाडयरची	१	१	१	१		नाही	०	०		नाही		नाही	आहे			नाही
२८			ढकाळे	पालघर	शासकीय		५	५	५	५	आहे		०	०		नाही		नाही	आहे			नाही
२९			उपलाट	तलासरी	शासकीय		२	५	८	५	आहे		२	५		नाही		नाही	आहे			आहे
३०			कांदरवाडी	डहाणू		भाडयाची	५	५	५	५		नाही	०	०		नाही		नाही	आहे			नाही
३१			रणकोळ	डहाणू	शासकीय		८	८	१०	८	आहे		०	०		नाही	आहे		आहे		आहे	
३२			वरवाडा	तलासरी	शासकीय		०	२३	०	२७	आहे		६	३		नाही		नाही	आहे			आहे
३३			नानिवली	पालघर	शासकीय		३	५	४	५	आहे		२	०		नाही	आहे		आहे			नाही
३४			सवणे	तलासरी	शासकीय		१७	०	१८	०	आहे		६	५	आहे		आहे		आहे		आहे	आहे
एकुण				८	६	२	४१	५२	५१	५६	६	२	१६	१३	१	७	३	५	८	०	२	७
३५	अमरावती	धारणी	राणीगाव	धारणी	शासकीय		२०	५	१९	५	आहे		२	३		नाही		नाही		नाही		नाही
३६			आडनदी	चिखलदरा		भाडयाची	२	२	२	२		नाही	१	०		नाही		नाही		नाही		नाही
३७			रायपूर	चिखलदरा	शासकीय		१०	२	१०	६	आहे		०	०		नाही		नाही		नाही		नाही
३८			टेंबुसाडा	चिखलदरा	शासकीय		०	३४	०	३४	आहे		८	४	आहे			नाही	आहे			नाही
३९			चिरोडी	चांदुर रे	शासकीय		१४	६	२०	५	आहे		१३	३		नाही	आहे		आहे			नाही
एकुण				५	४	१	४६	४९	५१	५२	४	१	२३	१०	१	४	१	४	२	३	०	५
४०		पांढरकवडा	रामपूर	घाटंजी	शासकीय		०	१०	५	५	आहे		२	१		नाही		नाही		नाही		
४१			जाब	घाटंजी	शासकिय		१८	६	१८	१०	आहे	नाही	१४	७	आहे			नाही		नाही	आहे	
४२			अतरगाव	कळंब	शासकिय		६	६	६	६	आहे		४	३		नाही		नाही		नाही		नाही
४३			सोनुर्ली	कळापुर	शासकिय		८	८	४	१०	आहे		०	३	आहे		आहे		आहे			नाही
४४			नांझ	कळंब	शासकिय		०	१०	२	१०		नाही	०	०	आहे			नाही	आहे			नाही
४५			रुढा	कळंब	शासकिय							नाही				नाही		नाही		नाही		नाही
एकुण				६	६	०	३२	४०	३५	४१	३	३	२०	१४	३	३	१	५	२	४	१	४
४६	नागपूर	नागपूर	भोरगड	काटोल	शासकीय		१५	६	१२	१२	आहे		१२	०	आहे			नाही		नाही	आहे	
४७			हिरापूर	देवळी	शासकीय		१६	५	१६	५	आहे		८	३	आहे		आहे		आहे			नाही
४८			हरदोली	काटोल	शासकीय		०	९	०	१३	आहे		१२	९	आहे		आहे		आहे		आहे	
एकुण				३	३	०	३२	६०	४७	६६	३	०	५२	२६	३	०	२	१	२	१	२	१
४९		चंद्रपुर	बोडी	चंद्रपूर	शासकिय		२	१७	२	२२	आहे		१३	३	आहे		आहे		आहे		आहे	
५०			देवाडा	राजुरा	शासकिय		१८	१०	१८	१०	आहे		८	६	आहे		आहे		आहे		आहे	
५१			जिवती	जिवती	शासकिय		९	९	९	९	आहे		१२	३	आहे			नाही		नाही	आहे	
५२			मंगी	राजुरा	शासकिय		१०	१०	१०	१०	आहे		५	४	आहे			नाही		नाही	आहे	
एकुण				४	४	०	३९	४६	३९	५१	४	०	३८	२६	४	०	२	२	२	२	४	०
एकुणात				५२	४७	५	३८३	४५९	४४९	५२०	४२	१०	२९६	२०५	१८	३४	३०	२२	४०	१२	१६	३६

	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.४.८	**ड) इतर सुविधांची अनुपलब्धता** **जनरेटर संचाबाबत:-** एप्रिल २०११ ते डिसेंबर २०१३ दरम्यान लोड-शेडिंगच्या समस्येचे निवारण करण्यासाठी आश्रमशाळांना पुरविलेल्या २६ डिझेल जनरेटर संचापैकी सात संच जुलै २०१५ पर्यत स्थापित करण्यात आले नव्हते. उर्वरीत १९ संचाचा उपयोग करण्यात येत नव्हता, कारण डिझेल खरेदी करण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतुद करण्यात आली नव्हती, या २६ जनरेटर ची एकूण किंमत रुपये ०.८९ कोटी होती.	अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांचे कार्यक्षेत्रात खालीलप्रमाणे तपशिलात नमुद केल्यानुसार जनरेटर बसविण्यात आले आहेत. त्याबाबतचा सविस्तर तपशिल सादर.

अ.क्र.	प्रकल्पाचे नांव	खरेदी करण्यात आलेल्या जनरेटर संचाची संख्या	प्रकल्प निहाय पुरवठा करण्यात आलेल्या जनरेटर संचाची संख्या		मे.जी.एस. एन्टरप्रायजेस यांना अदा केलेली रक्कम रुपयात	अदा न केलेली रक्कम	शेरा
			कार्यान्वीत	अकार्यान्वीत			
१	पांढरकवडा	२०	००	२०	००	६५६६१२०/-	सदर रक्कम प्रकल्प अधिकारी ,पांढरकवडा यांचे स्तरावर आहंरीत करण्यात आलेली असुन रक्कम अदा करणे बाकी आहे.
२	अकोला	१३	००	१३	००	४२६८६०८/-	सदर रक्कम प्रकल्प अधिकारी ,अकोला यांचे स्तरावर आहंरीत करण्यात आलेली असुन रक्कम अदा करणे बाकी आहे.
३	धारणी	१७	१७	००	५५८१२०२/-	००	सदर रक्कम प्रकल्प अधिकारी,धारणी यांचे स्तरावर आहंरीत करुन अदा करण्यात आली आहे .
एकूण		५०	१७	३३	५५८१२०२/-	१०८३४७२८/-	

	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
२.२.४.८	इ)निष्काम सौर पाणी तापके (Solar water heaters) आदिवासी आयुक्तांनी आश्रमशाळा आणि वसतीगृहांसाठी रुपये २८.६४ कोटी किमतीचे १,७८९ सौर पाणी तापके खरेदी केले (२०११-१३) ज्यापैकी १७४६ सौर पाणी तापके ४२५ आश्रमशाळा आणि ७९ वसतीगृहांना देण्यात आले होते. चार अतिरिक्त आदिवासी आयुक्तांच्या (अमरावती, नागपुर, नाशिक आणि ठाणे) दस्तावेजांच्या पडताडणीत असे आढळले की, १७४६ पैकी १३३१ पाणी तापके (७६ टक्के) सौर पॅनल्स, पाईप लाईन्सच्या खराबीमुळे आणि पाण्याच्या कमतरतेमुळे व छोटया दुरुस्तीसाठी आश्रमशाळा आणि वसतीगृहांध्मये निष्काम पडले होते. ती निष्कामी होण्याची बाब अतिरिक्त आदिवासी आयुक्तांनी सप्टेंबर २०१३ मध्ये पुरवठाधारकांकडे उठविली, परंतु पुरवठादारांनी यावर प्रतिक्रिया दिली नाही. जेव्हा की संचमाडणी करण्याच्या तारखेपासुन पाच वर्षापर्यंत या उपकरणांची मोफत देखभाल करण्यासाठी पुरवठादार जबाबदार होते. यामुळे न केवळ १३३१ पाणी-तापकांच्या खरेदीवर करण्यात आलेला रुपये २१.४३ कोटी खर्च निष्फळ ठरला तर गरम पाण्याच्या सोयीपासुन विशेषत: हिवाळयात विदयार्थी वंचित राहीले. निवडलेल्या ५२ पैकी ५० आश्रमशाळांना सौर पाणी तापके दिले होते. ज्यापैकी फक्त १४ चालु होते. सचिव, TDD यांनी नमुद केले की या विषयावर आधीपासुनच चौकशी करण्यात येत आहे. आणि चौकशीच्या अहवाल प्राप्त झाल्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.	• आदिवासी विकास विभागातील शासकीय आश्रमशाळा / शासकीय वसतीगृह यातील विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी गरम पाण्याचा पुरवठा व्हावा म्हणून सोलर वॉटर हिटर पुरवठा करण्या बाबतची शिफारस शासन निर्णय आदिवासी विकास विभाग दिनांक ५ मे २००१ मधील खरेदी समिती क्रमांक २ यांनी दिनांक २२ मार्च २०११ रोजी केलेली होती. • त्यानुसार १६७ शासकीय आश्रमशाळांना प्रति शाळा ४ संच या प्रमाणे ६६७ संच व ३३ शासकीय वसतिगृहांना प्रत्येकी १ संच या प्रमाणे १००० लिटर क्षमतेचे सोलर वॉटर हिटर पुरवठयासाठी महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण यांचेकडील दर कराराच्या अधिन राहुन मे. जैन इरिगेशन सिस्टम लि. जळगांव यांच्या नावे आयुक्तालयाच्या स्तरावरुन ३१ मार्च २०११ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले होते. • तसेच त्यानुसार २५८ शासकीय आश्रमशाळांना प्रति शाळा ४ संच या प्रमाणे १०३२ संच व ७९ शासकीय वसतिगृहांना प्रत्येकी १ संच या प्रमाणे १००० लिटर क्षमतेचे सोलर वॉटर हिटर पुरवठयासाठी महाराष्ट्र उर्जा विकास अभिकरण यांचेकडील दर कराराच्या अधिन राहुन मे पर्ल एंटरप्रायजेस, पुणे यांच्या नावे आयुक्तालयाच्या स्तरावरुन ९ सप्टेंबर २०११ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले होते. • मे जैन इरिगेशन सिस्टम जळगांव यांनी ६१४ संच शासकीय आश्रमशाळांना व ८६ वसतिगृहांना सोलर वॉटर हिटर संचाचा पुरवठा करुन शासकीय आश्रमशाळा व शासकीय वसतिगृह मिळुन एकूण ६४९ संच कार्यान्वित करुन दिले व ५१ संच कार्यान्वित केले नाहीत. • पर्ल एंटरप्रायेजेस, पुणे यांली ९६० संच शासकीय आश्रमशाळा व ५४ संच शासकीय वसतिगृहांना सोलर वॉटर हिटर संचाचा पुरवठा करुन शासकीय

		आश्रमशाळा व शासकीय वसतिगृह मिळुन एकुण ७१३ संच कार्यान्वीत करुन दिले व ३०१ संच कार्यान्वित केले नाहीत. • त्याचप्रमाणे अकार्यान्वित असलेले सोलर वॉटर हिटर कार्यान्वित करुन देणाबाबत मे जैन इरिगेशन सिस्टम लि. जळगांव यांना आयुक्तालय स्तरावरुन दिनांक २३/०७/२०१२, १०/०७/२०१३ व दिनांक १२/०२/२०१४ नुसार कडक स्वरुपाच्या नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. सदर नोटीस ची वेळीच दखल न घेतल्याने, दुरुस्ती व देखभालीची कार्यवाही न केल्याने तसेच पुरवठा आदेश व करारनाम्यातील अटींचा भंग केल्याने मे. जैन इरिगेशन सिस्टम लि. जळागांव यांचे नाव काळया यादीत टाकुन त्यांच्यावर कार्यवाही करणेबाबत आयुक्तालयाचे दिनांक १२/०२/२०१४ च्या कारणे दाखवा नाटीसा नुसार व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट उर्जा अभिकरण पुणे यांना कळविण्यात आलेले आहे. • तसेच मे पर्ल एंटरप्रायजेस पुणे यांना अशाच प्रकरणी आयुक्तालयाच्या स्तरावरुन आयुक्तालयाचे पत्र दिनांक २१/१२/२०१५, कारणे दाखवा नोटीस दिनांक ०६/०६/२०१३, २२/०६/२०१३, दिनांक ०१/०८/२०१३ नुसार कडक स्वरुपाच्या नोटीसा बजावण्यात आलेल्या आहेत. सदर नोटीस ची वेळीच दखल न घेतल्याने, दुरुस्ती व देखभालीची कार्यवाही न केल्याने तसेच पुरवठा आदेश व करारनाम्यातील अटींचा भंग केल्याने मे. पर्ल एंटरप्रायेजेस, पुणे याचे नाव काळया यादीत टाकुन त्यांच्यावर कार्यवाही करणेबाबत आयुक्तालयाचे दिनांक १२/०२/२०१४ च्या कारणे दाखवा नोटीसा नुसार व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र, उर्जा अभिकरण पुणे यांना कळविण्यात आलेले आहे. • या प्रकरणी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र उर्जा अभिकरण पुणे यांनी त्यांचे पत्र दिनांक १९ मे २०१४ नुसार उक्त पुरवठादारांचा संदर्भात कारवाई करणे संदर्भात आयुक्तालयास असे कळविले आहे की, या प्रकरणी शासनाने समिती गठीत केलेली असल्याने समितीची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर

निष्कर्षानुसार त्यांकेडुन कारवाईची बाब विचारात घेतली जाईल असे नमुद आहे.

- याप्रकरणी प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने शासन निर्णय आदिवासी विकास विभाग, क्रमांक शाआशा-२०१४/प्र.क्र.१५७/का-१३ दिनांक १६/०४/२०१४ नुसार सोलर वॉटर हिटर पुरवठयाप्रकरणी शासनाने उच्च स्तरीय चौकशीसाठी सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडील विभागीय चौकशी अधिकारी यांची १ सदस्यीय चौकशी समिती गठीत केली होती. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाला असून त्यामधील शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

अ.क्र.	पुरवठा झालेले सोलर	कार्यान्वीत सोलर	अकार्यान्वीत सोलर
१	१७१४	४२०	१२९४

अ.क्र.	परिच्छेद क्रमांक	परिच्छेद / मुद्दा	अनुपालन / अभिप्राय
	२.२.४.८	**निष्क्रीय बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली.** ई) आदिवासी आयुक्त, नाशिक यांनी एसब्रेन सिस्टम्स ॲन्ड सॉफटवेअर प्रायेव्हेट लि., पुणे (एजेन्सी) यांना ३,१७७ बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली (BAS) सब्सक्राईबरस् आयडेन्टीटी मॉडयुल (SIM) आणि BAS चे मंत्रालयातील केंद्रीय सर्वर समवेत कॉन्फीगरेशन, एकुण रु. ९.३८ कोटी किंमतीला पुरवठा आदेश दिला (ऑगस्ट,२०११) BAS ची स्थापना TDD च्या सर्व क्षेत्रीय कार्यालयात, शासकिय आणि अनुदानित आश्रमशाळा व वसतिगृहांमध्ये करावयाची होती. जेणे करुन TDD कार्यालयात वक्तशीरपणाची खातरजमा करण्यासाठी आणि आश्रम शाळा व वसतिगृहांना विद्यार्थ्यांच्या वास्तविक संख्येनुसार अनुदान देण्यासाठी उपयोग होईल. पुरवठा आदेशाच्या अटीं व शर्तीनुसार BAS ची मांडणी झाल्यावर आणि SIM मध्ये डेटा (TDD कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अंगठा ठसे) अपलोड झाल्यानंतर एजेन्सीला ९० टक्के अदा करावयाचे होते. आणि उर्वरित १० टक्के BAS चे केंद्रीय सर्वर सोबत समाधानकारक कॉन्फीगरेशन झाल्यावर आणि ते १० दिवस कोणतीही बाधा न येता सुरु राहिल्यावर अदा करावयाचे होते. ही प्रणाली एजेन्सी व्दारे तीन वर्ष राबवयाची होती.	१) अनुसूचित जमातीत शिक्षणाचा प्रचार व्हावा, शिक्षण घेवुन आदिवासी समाजाला मुख्य प्रवाहात येता यावे म्हणुन आश्रम शाळा आदिवासी व दुर्गम भागात सुरु करण्यात आल्या आहेत. आदिवासी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने त्यांना शिक्षण मिळावे यासाठी निवासी शाळा सुरु करण्यात आल्या आहेत. २) प्रभावी व लोकाभिमुख प्रशासन व्यवस्थेसाठी प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित राहाण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्रमांक मातंसं- २००९/९२४/३९, दिनांक ७ जुलै, २००९ अन्वये बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली बसविण्यात बाबत निर्देश दिलेले आहेत. ३) महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई यांचे दिनांक ३०.१०.२०१० च्या दरकरारा नुसार आदिवासी विकास विभागाच्या नियंत्रणाखालील क्षेत्रिय कार्यालये, शासकिय व अनुदानित आश्रमशाळा, शासकिय वसतिगृहांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली (Biometric Attendance System) लागु करणेसाठी आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक शाआशा-२०११/प्र.क्र.२७/का.१३, दिनांक १६ जुलै, २०११ अन्वये ३१७७ जी.पी.आर.एस./ एस.एम.एस. आधारित बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली (GPRS SMS based Biometric Attendance System) मे. ऐसब्रेन सिस्टीम ॲण्ड सॉफटवेअर प्रा. लि. सदाशिव पेठ पुणे यांचे कडुन आस्थापित करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. ४) शासन निर्णय नुसार आयुक्तालयाचे आदेश क्र.रवका/बायो/ जंस-१२१०/प्र.क्र.१९१/ का.२(४), दिनांक २० ऑगस्ट, २०११ अन्वये मे. ऐसब्रेन सिस्टीम

लेखापरीक्षेस असे निदर्शनास आले की, एजन्सीने जुलै २०११ ते जुलै २०१३ दरम्यान ३,१७७ BAS चा पुरवठा केला व संच मांडणी केली. त्यापैकी फक्त १,३५७ चालू होते आणि उर्वरित १,८२० SIM ची वॅलिडीटी संपल्यामुळे आणि बेकाम यंत्रामुळे निष्क्रिय होते. याशिवाय, जेथे BAS चालु स्थितीत होते तेथेही एजन्सीद्वारे ते केंद्रीय सर्वर सोबत कॉन्फीगर करण्यात येऊ शकले नव्हते आणि म्हणूणच नियतकालीक अहवाल निर्मित करता येऊ शकले नाही व शिखर स्तरावर यांचे संनियंत्रण करता येऊ शकले नाही या अपर्याप्तता असल्यावरही आदिवासी आयुक्त नाशिक यांनी पुरवठा आदेशांच्या अटी व शर्ती विरुध्द जाऊन मार्च २०१५ पर्यंत एजन्सीस रुपये ८.३८ कोटींची (जवळजवळ ९० टक्के) अदायगी केली. जानेवारी २०१६ पर्यंत BAS क्रियाशिल वापरात आले नव्हते आणि यामुळे रुपये ८.३८ कोटींचा खर्च निष्फळ ठरला.

सचिव TDD यांनी नमुद केले की, या विषयावर आधीपासूनच चोकशी करण्यात येत आहे. आणि चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

अॅण्ड सॉफटवेअर प्रा. लि. सदाशिव पेठ, पुणे यांना खालील प्रमाणे पुरवठा आदेश देण्यात आले आहे.

५) मे. अेसब्रेन सिस्टीम अँड सॉफटवेअर, प्रा. लि., पुणे यांनी खालील क्षेत्रिय कार्यालय, शासकिय आश्रम शाळा / अनुदानित आश्रम शाळा व शासकिय वसतिगृहांनामॅट्रीक मशिनचा पुरवठा केलेला आहे.

अ.क्र	तपशिल	एकुण कार्यालय	पुरवठा केलेले कार्यालय	एकुण बायोमॅट्रीक मशिन पुरवठा केलेले मशिन
१.	क्षेत्रिय कार्यालय	०२९	०२९	००२९
२.	शासकिय आश्रम शाळा	५५२	५३४	१२९२
३.	अनु. आश्रम शाळा	५५६	५३६	१४५६
४.	शासकिय वसतिगृह	४७५	३५३	०४००
एकुण:-	१६१२	१४५२	३१७७	एकुण:-

६) अपर आयुक्त कार्यक्षेत्रातील सर्व प्रकल्प अधिकारी व त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकिय / अुदानित आश्रम शाळाव शासकिय वसतिगृहातील मुख्याध्यापक/व्यवस्थापक/केंद्रप्रमुख/ गृहपाल यांची कार्यशाळा माहे. एप्रिल व मे २०१३ मध्ये कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत. सदर कार्यशाळेस मे.

			अेसब्रेन सिस्टीम अँड सॉफटवेअर, प्रा. लि., पुणे यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित असलेल्या सर्व प्रकल्प अधिकारी व त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकिय / अुदानित आश्रम शाळा व शासकिय वसतिगृहातील मुख्याध्यापक/व्यवस्थापक/ केंद्रप्रमुख/ गृहपाल यांना बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणाली बाबत मार्गदर्शन केले आहे. तसेच आवश्यक ती माहिती संबंधित पुरवठा धारकास उपलब्ध करुन देणे बाबत सर्व शासकिय / अनुदानित आश्रम शाळा व शासकिय वसतिगृहातील मुख्याध्यापक/ व्यवस्थापक / केंद्रप्रमुख/गृहपाल यांना कळविले आहे. ७) बायोमॅट्रीकच्या सिम कार्डची मुदत १ वर्षाची असल्याने मुदत संपल्यानंतर सर्व प्रकल्प अधिकारी व त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकिय / अुदानित आश्रम शाळा व शासकिय वसतिगृहातील मुख्याध्यापक/ व्यवस्थापक/ केंद्रप्रमुख/ गृहपाल यांना त्यांच्या स्तरावर संबंधित पुरवठा धारकाडुन र.रु. ४२१/- प्रमाणे ज्या कंपनीच्या सिम कार्डची रेंज असेल ते सिम कार्ड खरेदी करणे बाबत कळविण्यात आले आहे. तसेच बायोमॅट्रीक मशिन ना दुरुस्त झाल्यास अथवा तांत्रिक अडचणी आल्यास संबंधित पुरवठा धारक याचेशी संपर्क साधुन योग्य ती कार्यवाही करणे बाबत कळविण्यात आले आहे. ८) बॅटरी / चार्जर / ॲन्टेना खराब, विद्युत पुरवठा अभावी, मदर बोर्ड खराब, डिसप्ले खराब, सिम कार्ड, मशिन लॉक, शॉट सर्किट, नैसर्गिक आपत्ती, तांत्रिक बिघाड, शाळा बंद, मशिन तोडफोड/ देखभाल अभावी इ. सर्वसाधारण कारणांमुळे बायोमॅट्रीक मशिन अकार्यान्वित आहेत. सदर मशिन कार्यान्वित करणे बाबत संबंधित पुरवठाधारक मे. अेसब्रेन सिस्टीम अँड सफटवेअर, प्रा. लि., पुणे यांना आयुक्तालय, अपर आयुक्त, आदिवासी विकास व प्रकल्प अधिकारी कार्यालयांकडुन कळविण्यात आले आहे. ९) बायोमॅट्रीक मशिन्सच्या पुरवठयापोटी एकुण देयक रक्कम रुपये ९,३३,७८,५००/- पैकी वेळोवेळी त्यांना रक्कम रुपये ८,३८,८५०८९/- अदा करण्यात आलेली असुन उर्वरित रक्कम रुपये ९४,९३,४११/- शिल्लक आहे.

			१०) बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणाली संयंत्राच्या वापराबाबत चौकशी करण्यासाठी आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय दिनांक १६.०४.२०१४ अन्वये मा. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला असून चौकशी अहवालाच्या शिफारशीनुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

अ.क्र	प. क्रमांक	परिच्छेद/मुद्ये	केलेली कार्यवाही
	२.२.५	**आदिवासी विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक आणि शिष्यवृत्ती योजना :-** आदिवासी विद्यार्थ्यांकरिता TDD दोन शैक्षणिक योजना, " शहारातील प्रख्यात इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये ST विद्यार्थ्यांना शिक्षण देणे " आणि "सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व - माध्यमिक शिष्यवृत्ती " राबवित आहे. दोनही योजनांमध्ये शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांव्यतिरिक्त दुसऱ्या शाळांमध्ये शिकत असणारे आदिवासी विद्यार्थी येतात व आदिवासी उपयोजनेंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या अनुदानातून भरीव निधी पुरविण्यात येतो. या योजनांची अंमलबजावणी पुढे चर्चिल्याप्रमाणे होत आहे. **"शहरातील प्रख्यात इंग्रजी पामाध्यमाच्या शाळांमध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची " योजना :-** हया योजनेत विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेशी परिचित करुन देऊन त्यांची इंग्रजी भाषा सुधारावी या उद्देशाने ऑगस्ट२००९ पासून TDD द्वारे राबविण्यात येत आहे, जेणेकरुन विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेतांना मतद होईल. या योजनेंतर्गत प्रति ST विद्यार्थ्यांसाठी प्रति वर्षा रु. ५०,०००/- आणि रु. ७०,०००/- रक्कम प्रख्यात इंग्रजी शाळांत (बहुतांश खाजगी बोर्डिंग शाळा) अनुक्रमे इयत्ता पहिली ते दहावी आणि अकरावी ते बारावी मध्ये प्रवेश घेण्यासाठी TDD देते २०१०-१५	• या योजनेसाठी २२२५-सी ९९९ असा स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात आला आहे. • या लेखाशिर्षावर प्राप्त तरतुद केवळ नामांकित शाळेतील प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी रु.५०,०००/-रु.६०,०००/- व रु.७०,०००/- याप्रमाणे प्रति विद्यार्थी शुल्क या बाबीवर खर्च करण्यात आला आहे. • आदिवासी विकास विभागाकडून या शाळांना अनुदान देण्यात येत नसून नामांकित शाळेच्या नियमानुसार विद्यार्थ्यासाठी शालेय गणवेश, वहया, पुस्तके, बुटमोजे, रेनकोट, अंडर गारमेंटस, भोजन, निवास खर्च, टयुशन फी, प्रवेश फी, सुरक्षा अनामत, शिक्षण शुल्क इत्यादीसाठी शुल्क देण्यात येते. • अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांचे स्तरावरुन नामांकित शाळांच्या प्राचार्य/ मुख्याध्यापक यांच्या संयुक्तिकरित्या बैठकीमध्ये आदिवासी विकास विभागाचा निधी व खर्चासाठी स्वतंत्र लेखे ठेवणेबाबत सुचना देण्यात आलेल्या आहेत.

१		दरम्यान १०,१०३ विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर रु. १२६.२९ कोटी खर्च करण्यात आला. निवडलेल्या आठ प्रकल्प अधिकाऱ्यांच्या अधिकार क्षेत्रातील १६ प्रख्यात इंग्रजी शाळांमधील दस्तावेजांच्या पडताळणीत लेखापरीक्षेस योजनेच्या अंमलबजावणीत खालील प्रमाणे अपर्याप्तता आढळली. योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये लाभार्थी शाळांना या योजनेसाठी वेगळे लेखे ठेवण्याबाबत सूचना दिलेल्या नाहीत. यामुळे खाजगी शाळांना TDD व्दारे देण्यात आलेला निधी, शाळांव्दारे ठराविक उद्येशासाठीच वापरण्यात आला ,याबाबत लेखापरिक्षणाचे वेळी खात्री करणे कठीण झाले. सचिव TDD यांनी नमूद केले की, शाळांना यासाठी वेगळे लेखे ठेवण्याच्या सूचना देण्यात येईल	
२		योजनेच्या मार्गदर्शक तत्वाविरुध्द १६ पैकी दोन शाळांनी इयत्ता पहिली आणि दुसरीच्या आदिवासी विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र वर्ग तयार केले. सचिव TDD यांनी याबाबत शाळांना आवश्यक सूचना देण्यात येतील असे नमूद केले.	सदर नामांकित शाळांची निवड करतांना संस्था/ शाळेमार्फत आदिवासी विद्यार्थ्यासाठी वेगळी तुकडी/ वर्ग सुरु करणे, तसेच त्यांच्या सुरु असलेल्या नियमित तुकडी/ वर्गामध्येच आदिवासी व बिगर आदिवासी विद्यार्थ्यांना एकत्रित शिक्षण देणे अभिप्रेत आहे. त्यानुसार कार्यारंभ आदेशात तसे निर्देश देण्यात आलेले आहे. तसेच अपर आयुक्त, नागपूर यांचे स्तरावरुन नामांकित शाळांना स्वतंत्र वर्ग न भरवून बिगर आदिवासी विद्यार्थ्यासमवेत शिक्षण देण्याबाबत दिनांक २६.५.२०१६ चे परिपत्रकाव्दारे सुचना देण्यात आलेल्या आहेत.या संदर्भात सर्व शाळांसाठी प्रकल्प अधिकारी यांचे स्तरावरुन पालक अधिकारी नेमलेले असल्याने त्यांचेव्दारा तपासणी करण्यात येत असते.
३		२०१३-१५ दरम्यान इयत्ता पहिली, दुसरी आणि बारावी मध्ये शिकणा-या ३२७ आदिवासी विद्यार्थ्यासाठी चार शाळांनी त्याच अवधीत त्याच इयत्तांमध्ये शिकणा-या नियमित विद्यार्थ्यांनी अदा केलेल्या फीच्या तुलनेत	सदर शाळांतील प्रवेशित विद्यार्थ्यांना अनुज्ञेय शुल्कच अदा होईल, शुल्क अतिप्रदान होऊ नये याकरिता नामांकित शाळा आज्ञावलीमध्ये शाळा पडताळणी, मुलभुत सुविधा इ. विषयी निकष ठरवून देण्यात आले आहेत. तसेच प्रत्यक्ष तपासणी अहवालानुसार आढळुन आलेली वस्तुस्थिती इ.बाबी अंतर्भुत करुन अनुज्ञेय शुल्कापैकी अदा करावयाचे शुल्क निर्धारण तथा

		रु.१६.४५ लक्ष प्रवेश शिकवणी फी TDD कडून जादा आकारली. सचिव TDD यांनी नमूद केले की ही परिस्थिती भविष्यात टाळण्यात येईल आणि याबाबत संनियत्रण पध्दत बळकट करण्यात येईल.	निश्चितीची व्यवस्था आज्ञावलीमध्ये ठेवण्यात आली आहे. प्रकल्प अधिकारी, नागपूर यांचे अधिनस्त असलेल्या नामांकित शाळांना नियमित विद्यार्थ्यांना अदा केलेल्या फी बाबत TDD कडून जादा रक्कम आकारणी केली नसल्याचे अपर आयुक्त, नागपूर यांनी कळविले आहे. सन २०१६-१७ या वर्षापासून नामांकित शाळांना शुल्क वितरण करण्याकरिता ऑनलाइन प्रणाली विकसित करण्यात आलेली असून ऑनलाइन प्रणालीच्या वापरामुळे शुल्क वितरणामध्ये स्पष्टता आली आहे. अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी यांचे स्तरावरुन विद्यार्थ्यांची पडताळणी करण्यात येवूनच नामांकित शाळांना ऑनलाइन शुल्क अदा करण्यात येत आहे.
४		योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनुसार या योजनेचा लाभ घेऊन खाजगी शाळांमध्ये प्रवेश घेण्यास पात्र ठरण्यासाठी पालकांचे जाती आणि उत्पन्न प्रमाणपत्रे संबंधित प्रकल्प अधिका-यास सादर करावयास पाहिजे.२०१०-१५ दरम्यान १६ खाजगी शाळांमध्ये इयत्ता पहिली मध्ये प्रवेश घेण्यासाठी केलेल्या ८९२ अर्जाच्या नमूना चाचणीत असे आढळले की, संबंधित प्रकल्प अधिका-यांनी आठ शाळांमध्ये ६३ अर्ज जाती प्रमाणपत्राशिवाय आणि ५४ अर्ज उत्पन्न प्रमाणपत्राशिवाय स्वीकृत केले. सचिव TDD यांनी नमूद केले की जाती आणि उत्पन्नाच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी सुधारात्मक कारवाई करण्यात येईल.	योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार या योजनेचा लाभ घेऊन प्रवेश घेण्यास पात्र ठरण्यासाठी प्रवेश अर्जासोबत पालकाचे जात प्रमाणपत्र, उत्पन्नाचे प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक आहे. नामांकित शाळा प्रवेश अर्ज सादरीकरणाकरिता व संनियत्रणाकरिता नामांकित शाळा आज्ञावली विकसित करण्यात आली आहे. त्यामध्ये वरील आवश्यक कागदपत्रे असल्याशिवाय प्रवेश अर्ज स्विकृत न करण्याची बाब अंतर्भुत करण्यात आली आहे. त्यामुळे विना आवश्यक कागदपत्र अर्ज स्विकृत होत नाही. अपर आयुक्त यांचे स्तरावरुन प्रकल्प अधिकारी यांना शासन निर्णय दिनांक २८.८.२००९ अन्वये नामांकित शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याचे जातीचे दाखल व पालकाचे उत्पन्न या बाबीची व्यक्तीश: तपासणी करणे व काटेकोरपणे पालन करणेबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच पालकाच्या उत्पन्नाची मर्यादा जास्त असतांना विद्यार्थी प्रवेश दिल्याची बाब निदर्शनास आल्यास प्रकल्प अधिकारी यांना व्यक्तीश: जबाबदार धरुन सदर विद्यार्थ्याच्या शिक्षणावर झालेल्या खर्चाची रक्कम प्रकल्प अधिकारी यांचेकडून वसूल करण्यात येईल असे अपर आयुक्त, नागपूर यांनी दिनांक २६.५.२०१६ व अपर आयुक्त, अमरावती यांनी दिनांक २१.९.२०१६ चे परिपत्रकान्वये सुचना दिलेल्या आहेत.

२.२.५

सुवर्ण महोत्सवी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती साठी योजना:-

TDD ने मे २०१० मध्ये ही योजना सूरू केली ज्या अंतर्गत गुणवत्तापूर्ण आदिवासी विद्यार्थ्यांना तीन हप्त्यांत रू १००० प्रति वर्ष (इयत्ता ते Iv) रु१५०० प्रति वर्ष (इयत्त v ते VII) आणि रू २०००रू प्रति वर्ष (इयत्त viiते x) शिष्यवृत्ती प्रदान करावयाची होती २०१०-१५ दरम्यान TTD ने ६१.८१ लक्ष आदिवासी विद्यार्थ्यांना रू७८६.२० कोटी शिष्यवृत्ती प्रदान केली. आदिवासी आयुक्त नाशिक आणि निवडलेल्या आठ प्रकल्प अधिकाऱ्यांच्या अधिकार क्षेत्रातील चाचणी तपासणी केलेल्या १६ शाळांच्या (जिल्हा परिषद शाळा महानगर पालिका/ नगरपरिषद शाळा आणि खाजगी शाळा) दस्तावेजांच्या पडताळणीत खालील प्रमाणे आढळले

आदिवासी विभागांतर्गत शासकीय व अनुदानित आश्रमशाळां व्यतिरिक्त इतर खाजगी/ जिल्हा परिषद/ नगरपालिका/ महानगरपालिका शाळांमध्ये इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या आदिवासी विद्यार्थ्याना सुवर्ण महोत्सवी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती:-

आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्याकरीता शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, वसतीगृहे, सैनिकी शाळा, इंग्रजी माध्यमशाळा, मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी परीक्षा फी, वैद्यकीय अभियांत्रिकीय व्यावसायीक अभ्यासक्रमासाठी शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती, इत्यादि योजना राबविण्यात येत आहेत. परंतू राज्यात अनुसूचित जमातीच्या इयत्ता १ ली ते १० वी या वर्गात आश्रमशाळा व्यतिरिक्त शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याकरीता प्रोत्साहनात्मक योजना कार्यान्वीत नसल्यामुळे इयत्ता १ ली ते १० वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्याना शैक्षणिक खर्च भागविणेसाठी केरळ व राजस्थान राज्याच्या धर्तीवर सुवर्ण महोत्सवी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजना आदिवासी विकास विभागाकडून शासन निर्णय क्र.आविशी-२००९/प्र.क्र.२०/का.१२, दिनांक ३१ मे,२०१० व शुध्दीपत्रक २६ ऑगष्ट, २०१० अन्वये लागू केली आहे.

- २०१०-११ आणि २०१२-१३ मध्ये प्रकल्प अधिकारी स्तरावर मागणी करते वेळी आणि आदिवासी आयुक्त स्तरावर अनुदान देते वेळी इयत्ता पचवी ते सातवीच्या ६.१९ लक्ष विद्यार्थ्यांना (राज्याची स्थिती) शिष्यवृत्ती रक्कमेचे रू०.६१ कोटी जादा प्रदान झाले.सचिव TDD यानी नमुद केले की २०१५-१६ पासुन जादा प्रदान रोखण्यासाठी ऑनलाईन प्रणाली व्दारे अदायगी करण्यात येईल.
- दोन प्रकल्प अधिकाऱ्यांकडे (जव्हार आणि नंदुरबार) मार्च २०१५ ला त्यांच्या रोख शिल्लक रक्कमेत २०१०-ते १४

नंदूरबार :- **प्रकल्प अधिकारी**

सन २०१० ते २०१७-१८ कालावधीची शिष्यवृत्ती वितरित केल्याचे विवरणपत्र

वर्ष	मंजुर तरतूद	खर्च रक्कम	लाभार्थी संख्या	शेरा
२०११-१२	१४३१.००	१४३१.००	१०७५१८	
२०१२-१३	१६००.००	१६००.००	७११८८	
२०१३-१४	१४१८.००	१४१८.००	१०५२२	

कालावधीची वितरित न केलेली शिष्यवृत्ती रु ११.०८ लक्ष रक्कम शिल्लक राहिली २०११-१५ कालावधीची विद्यार्थी रु १.९७ लक्ष शिष्यवृत्ती रक्कम तीन शाळांमध्ये अवितरित राहिली.अशाप्रकारे विद्यार्थी रु १३.०५ लक्ष रक्कमेच्या शिष्यवृत्ती पासुन वंचित राहिले.

- योजनेच्या मार्गदर्शक तत्वांनंसार शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र ठरण्यासाठी पालकांची जाति आणि उत्पन्न प्रमाणपत्रे ज्यावरुन विद्यार्थ्यांच्या जातिची आणि त्यांच्या पालकांच्या उत्पन्नाची पडताळणी होउ शकेल संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांना सादर करावयाची होती लेखापरीक्षने २०१०-१५ च्या कालावधीच्या १७४६ अर्जांची पडताळणी केली त्यात असे आढळले की १५८८ अर्जामध्ये (९१ टक्के) जाति प्रमाणपत्रे नव्हती आणि १४६३ अर्जामध्ये जाती प्रमाणपत्रे नव्हती आणि १४६३ अर्जामध्ये (८४ टक्के) उत्पन्न प्रमाणपत्रे नव्हती सचिव टिडीडी यांनी नमुद केले की जाती आणि उत्पन्न प्रमाणपत्रावी पडताळणी करण्यासाठी सुधारात्मक कार्यवाही करण्यात येईल.

			८	
२०१४-१५	१४०५.००	१४०५.००	१३०७७६	
२०१५-१६	१३५४.०७	१३५४.०७	४५६९२	सन २०१५-१६ पासून योजना जिल्हा जिल्हापरिषदेकडे हस्तांतरीत करुन त्यांना BEAMS प्रणालीवर निधी उपलब्ध करुन दिलेला आहे.
२०१६-१७	९५०.००	९५०.०७	३१३४९	
२०१७-१८	१००.००	१००.००	--	

सन २०१०-ते २०१४ या कालावधीत वितरीत न झालेल्या शिष्यवृत्तीच्या रकमा खालीलप्रमाणे आहेत.

Bill no	मंजूर रक्कम	शिल्लक रक्कम
४१४/०२.११.२०१३	८३४०२००	२३५००
५५५/१६.११.२०१४	९४७४६२९	९६५००
६७४/२७.०३.२०१४	१०१८५९००	५८५०००
६७२/२८.०३.२०१८	१४३१०००	१४३१०००
एकूण	२९४३१७२९	२१३६०००

सदर देयकात नमुद असलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकांनी मुख्याध्यापकांचे खाते क्रमांक या कार्यालयास सादर केलेले नसल्याने सदर रक्कम वितरीत करता आली नाही. सदर रक्कम २०१३-१४ व २०१४-१५ या वर्षातील असल्याने व मुख्याध्यापकाकडून खाते क्रमांक प्राप्त न झाल्याने सदर ची रक्कम चलनाने शासनास जमा करण्यात आली आहे

तसेच सन २०१४-१५ मधील ८० शाळेचे रु ६२७४७०० शाळेचे व विद्यार्थ्यांचे बँक खाते क्रमांक नसल्यामुळे प्रंलबी आहेत. विद्यार्थ्यांचे खाते क्रमांक मुख्याध्यापकाकडून प्राप्त न झाल्यास सरची रक्कम चलनाने शासनास जमा करणेची कार्यवाही करणेत येईल.

प्रकल्प अधिकारी नाशिक :-

सन २०१० ते २०१७-१८ कालावधीची शिष्यवृत्ती वितरीत केल्याचे विवरणपत्र

वर्ष	मंजूर तरतूद	खर्च रक्कम	लाभार्थी संख्या	शेरा
२०११-१२	१३७३.००	१३७३.००	८५०००	सन २
२०१२-१३	१८२३.४९	१८२३.४९	१२००८९	
२०१३-१४	२३१६.६६	२२०१.८३	१७७९७०	
२०१४-१५	१९२९.६४	१९२९.६४	१८०८७२	
२०१५-१६	२४९२.३८	२४९२.३८	१८००००	
२०१६-१७	१६९४	१६९४	१५००००	
२०१७-१८	१६९३.५	१६९३.५		

प्रकल्प कार्यालय नाशिक कार्यक्षेत्रातील जिल्हा परिषद शाळा ज्योती माध्यमिक विद्यालय पिंपळगांव बहुला या शाळेस वाटप केलेली व अतिरीक्त रक्कम चलनाने खालील प्रमाणे भरली आहे

वर्ष	वितरीत शिष्यवृत्ती	वाटप शिष्यवृत्ती	चलनाने भरलेली शिष्यवृत्ती
२०११-१२	१५६९००	१२९७००	२७२००
२०१२-१३	१४६४००	१२२६५०	२३७५०
२०१३-१४	१८७५००	१७०५०	१७४५०
एकुण			६८४००

जादा रक्कम चलनाने भरण्यात आली आहे.

प्रकल्प अधिकारी जव्हार :-

Sr. No.	Name of Scheme	Year	TSP- २२२५-D ०३७			
			Budegt Allotment	On BDS Available	Actual released	Expenditure
२	Goldan jublee tribal pre matric scheme	२०१०-११	११९३.००	८९३.००	८९३.००	८५६.००
		२०११-१२	८६१.००	८४८.००	८४८.००	८४८.००
		२०१२-१३	१०००.००	९२०.००	९२०.००	९१२.००
		२०१३-१४	१०००.००	१०००.००	१०००.००	९४७.००
		२०१४-१५	१७००.००	१३४८.००	१३४८.००	८८३.००
		Total	५७५४.००	५००९.००	५००९.००	४४४६.००

सन २०१०-१५ या कालावधीत जव्हार प्रकल्प कार्यालयाकडून काढण्यात आलेल्या रकमा जिल्हा परिषद शाळेच्या मुख्याध्यापकाच्या खाती वर्ग करण्यात आलेल्या आहेत तसेच मुख्याध्यापकाकडून रक्कम विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आली आहे तसेच सन २०१४ या कालावधीत उशिरा प्राप्त झालेले प्रस्ताव तसेच विद्यार्थ्यांचे बँक खाते काढण्यासाठी लागलेला विलंब या करीता रक्कम अदा करण्यास उशिर झाला परंतु सद्यस्थितीत सर्व विद्यार्थ्यांना रकमेचे वाटप करण्यात आलेले आहे असे प्रकल्प कार्यालय जव्हार यांचेस्तरावरुन कळविण्यात आले आहे.

प्रस्तुत योजनेवर सन २०१०-११ पासुन झालेला खर्च व लाभार्थी संख्या खालीलप्रमाणे

अ. क्र.	कालावधी	इयत्ता १ ते ४ पर्यंत	इयत्ता ५ ते ७ पर्यंत	इयत्ता ८ ते १० पर्यंत	एकूण	एकूण खर्च (रु.लाखात)
१.	२०१०-११	५,५६,२८८	२,६७,३५३	१,५१,६४३	९,७५,२८४	१२३१०.६८
२.	२०११-१२	६,७४,६४१	३,५०,६३०	२,१०,९५२	१२,३६,२२२	१४७१५.९१
३.	२०१२-१३	६,१५,९५२	३,५९,५२१	२,२६,५५८	१२,०२,०३१	१५२७२.२६
४.	२०१३-१४	७,०३,७०४	४,५९,६०४	२,४६,२२७	१४,०९,५३५	१८४००.३६
५.	२०१४-१५	६,७९,७९९	४,३८,२९१	२,७३,४०१	१३,९१,४९१	१७९१३.५६

सुवर्ण महोत्सवी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती योजनेकरीता सन २०१५-१६ या वर्षापासुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्याकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडे निधी प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडून निधी वर्ग केला आहे. सदर निधीतून विद्यार्थ्यांच्या याद्या गट शिक्षण अधिकारी यांचे मार्फत प्राप्त याद्या प्रकल्प अधिकारी एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प यांचेकडून तपासुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे वर्ग केल्या आहेत. त्यानुसार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला आहे.

सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षात हि योजना शासन निर्णय शिष्यवृ-२०१७/प्र.क्र.१३७/का.१२ दिनांक १७.०४.२०१८ अन्वये जिल्हा परिषद स्तरावर वर्ग करण्यात आली आहे.

२.२.६ सनियंत्रण व मुल्यांकन :-

२.२.६.१

शिक्षक कक्षामधील प्रमुख पदे न भरणे

प्रकल्प अधिकाऱ्यांच्या शासकीय आश्रमशाळा आणि वसतिगृहांवर सनियंत्रण ठेवण्याचे ओझे कमी करण्यासाठी TDD ने आदिवासी आयुक्त, अतिरिक्त आदिवासी आयुक्त आणि प्रकल्प अधिकारी स्तरावर शिक्षण कक्ष गठन करण्याचे ठरविले) जानेवारी (२०१४ या शिक्षण कक्षासाठी ८४९पदे भरण्याचा निर्णय TDD ने घेतला. या शिक्षण कक्षांना आश्रमशाळा आणि वसतिगृहाच्या संपूर्ण कार्याचे समन्वय , सनियंत्रण आणि पर्यवेक्षण करावयाचे होते .या कार्यात विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षणाचा दर्जा ,बांधकाम कार्ये , अन्नधान्य वितरण इ .समाविष्ठ होते.

दस्तऐवजांच्या पडताळणीत असे आढळले की, आयुक्त स्तरावर भरावयाच्या असलेल्या २१ पदांपैकी फक्त १० पदे भरण्यात आली होती . ज्यापैकी सात पदे (७०%) लिपीक टंकलेखकाची होती. अतिरिक्त आयुक्त स्तरावर भरावयाच्या असलेल्या ७६ पदांपैकी फक्त ५७ पदे भरण्यात आली होती .त्यापैकी १५ पदे(%८८) लिपीक

आश्रमशाळा आणि वसतिगृहांच्या प्रभावी सनियंत्रणासाठी शिक्षण कक्षाची मंजूर पदे

अ.क्र.	पदनाम	आयुक्तालय	अपर आयुक्त	प्रकल्प कार्यालय	एकुण
०१	सह आयुक्त)शिक्षण(	०१	००	००	०१
०२	सहाय्यक आयुक्त	०१	०४	००	०५
०३	सहाय्यक प्रकल्प अधिकारी)शिक्षण(	०३	१२	८७	१०२
०४	कार्यालय अधिक्षक)शिक्षण(	०१	००	००	०१
०५	वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी	०३	०८	००	११
०६	वरिष्ठ आदिवासी विकास निरिक्षक	००	०४	३२	३६
०७	कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी)का(	००	००	८७	८७
०८	कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी) नि(	००	००	१११	१११
०९	लिपीक टंकलेखक	०९	३६	३४८	३९३
१०	शिपाई	०३	१२	८७	१०२
	एकुण	२१	७६	७५२	८४९

दिनांक ३१.३.२०१८अखेर खालील प्रमाणे शिक्षण कक्षातील मंजुर ,भरलेली व रिक्त पदांचा तपशिल

अ. क्र	पदनाम	आयुक्तालय			अ.आयुक्त			प्रकल्प अधिकारी			एकूण		
		मं	भ	रि	मं.	भ	रि	मं.	भ.	रि	मंजुर	भरलेली	रिक्त
०१	सह आयुक्त (शिक्षण)	१	१	०	०	०	०	०	०	०	१	१	०
०२	सहा.आयुक्त	१	१	०	४	२	२	०	०	०	५	३	२
	एकुण गट अ	२	२	०	४	२	२	०	०	०	६	४	२

टंकलेखकाची होती. २९ प्रकल्प अधिकारी कार्यालयात भरावयाची असलेल्या ७५२पदांची स्थिती आदिवासी आयुक्त ,नाशिक यांनी आणि जुलै २०१५ मध्ये सचिव ,TDD यांनी मागविली होती, परंतु त्यांच्याकडुन उत्तर प्राप्त झाले नव्हते .तथापि निवडलेल्या आठ प्रकल्प अधिकारी कार्यालयात भरावयाच्या असलेल्या १६८पदांपैकी फक्त ५२ पदे भरण्यात आली होती ज्यापैकी २८ पदे ५४) %) लिपीक टंकलेखकाची होती. येथे प्रकर्षाने असे दिसुन येते की , सनियंत्रणाशी थेट संबधीत नसलेली पदे मोठया संख्ये भरण्यात आली असली तरीही प्रमुख पदे रिक्त राहिली .अशा प्रकारे आश्रमशाळांचे आणि वसतिगृहांचे प्रभावी समन्वयन ,सनियंत्रण आणि पर्यवेक्षण क गठीत करण्यात आलेल्या क्षिक्षण कक्षांचा मुळ उददेशच विफल ठरता.

सचिव TDD यांनी वस्तुस्थिती मान्य केली आणि ही बाब शिक्षण विभागा सोबत घेतली असल्याचे नमुद केले.

०३	सहा.प्र. अधि. (शिक्षण)	३	२	१	१२	९	३	८७	३५	५२	१०२	४६	५६
	एकुण गट ब	३	२	१	१२	९	३	८७	३५	५२	१०२	४६	५६
०४	का.अ. (शि)	१	१	०	०	०	०	०	०	०	१	१	०
०५	व.शि.वि.अ.	३	०	०	८	३	५	०	०	०	११	३	८
०६	व.आ.वि.निरि	०	०	०	४	३	१	३२	१४	१८	३६	१७	१९
०७	क.शि.वि. (का)	०	०	०	०	०	०	८७	४०	४७	८७	४०	४७
०८	क.शि.वि. (नि)	०	०	०	०	०	०	१११	४२	६९	१११	४२	६९
०९	लिपीक टंक.	०९	६	३	३६	३०	६	३४८	२४२	१०६	३९३	२५१	१४२
१०	शिपाई	३	०	३	१२	०	१२	८७	०	८७	१०२	०	१०२
एकुण गट क		१६	७	६	६०	३६	२४	६६५	३३८	३२७	७४१	३५४	३८७
एकुण		२१	११	७	७६	४६	३०	७५२	३७३	३७९	८४९	४०४	४४५

वित्त विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१५/प्र.क्र ४१/अर्थ-१/दिनांक २ जुन २०१५ मधील ३ (क) नुसार शिक्षक संवर्गातील रिक्त पदांच्या ७५ % पद भरती करण्याचे निर्देश होते. तर शिक्षक संवर्गा व्यतिरिक्त रिक्त पदांच्या ५० % अथवा एकुण संवर्गाच्या ४ % या पैकी जे कमी असेल इतकीचे पदे भरण्यास मुभा देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरची पदे रिक्त आहेत.

तसेच अनुज्ञेय मर्यादित रिक्त पदे भरणेची कार्यवाही संबधीत अपर आयुक्त आदिवासी विकास यांचे स्तरावर सुरु आहे.

शिक्षण कक्षातील गट अ व ब ची पदे भरण्याची प्रक्रया करण्यात येत आहे. या पदाचे सेवा भरती नियम कार्यवाहीत आहेत. तो पर्यंत माध्यमिक शिक्षका मधुन सेवा जेष्ठतेने बदलीने प्रतिनियुक्तीने सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) ही पदे भरली आहेत. सन २०१८-१९ मध्ये २४ जेष्ठ माध्यमिक शिक्षकांची बदलीने प्रतिनियुक्तीने पदस्थापना करण्यात येत आहे.

सहायक आयुक्त (शिक्षण) उर्वरित २ पदे भरण्यासाठी विनंती शिक्षण विभागास करण्यात आलेली आहे.

परिच्छेद क्रमांक	परिच्छेद /मुद्दा	अनुपालन / अभिप्राय
२.२.६.२	**इ- गव्हर्नन्स ॲप्लीकेशन सॉप्टवेअरचे कमकुवत कार्यान्वयन.** ---------- TDD मास्टेक लिमीटेड, मुंबई ला रु.४.९६ कोटी एकूण किंमतीवर इ-गव्हर्नन्स ॲप्लीकेशन सॉप्टवेअर, जे २०१२-१३ पासून लागू करावयाचे होते. विकसित करावयाच्या कार्यादेश जारी केला (नोव्हेंबर २०११) या ॲप्लीकेशन सॉप्टवेअरच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना विविध सेवा त्या शासकीय कार्यालयांना प्रत्यक्ष भेट न देता ऑनलाईन देणे, आणि शासनाची कार्यपध्दती आणखी जास्त प्रभावी, कार्यक्षम आणि पारदर्शक करणे अपेक्षित होते. या ॲप्लीकेशन सॉप्टवेअर मध्ये तीन मॉडयुल्स आहेत. i) योजना संनियंत्रण प्रणाली - जी योजना निधीचे नियोजन आणि संनियंत्रण करण्यास मदत करते आणि MIS अहवाल पुरविते. ii) आश्रमशाळा आणि वसतीगृह व्यवस्थापन प्रणाली - शासकीय आश्रमशाळा आणि वसतीगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करणे सुकर करते, आणि iii) शिष्यवृत्तीचे प्रदान करण्यासाठी प्रणाली - शिष्यवृत्तीचे ऑनलाईन प्रोसेसिंग आणि नियंत्रण करते.	• राज्यातील अनुसूचित जमातीसाठी आदिवासी विकास विभागाद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याचे दृष्टीने १) योजना संनियंत्रण, आश्रमशाळा व वसतीगृह व्यवस्थापन ३) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व शिक्षण फी परीक्षा फी प्रदाने याकरीता इ-गव्हर्नन्स अंतर्गत संगणकीकरण करण्यासाठी मास्टेक प्रा.लि. मुंबई यांची सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक २७ जुलै २००९ चे शासन परिपत्रकान्वये नेमणूक करण्यात आली आहे. • वरील तीन मॉडयुल्स तयार करण्यासाठी एकूण संभाव्य खर्च रु.४,९६,२२,०००/- (सेवाकर वगळुन) इतका शासनास आयुक्तालयाकडून दिनांक ९ मे,२०११ चे पत्रान्वये प्रस्ताव सादर केला असता सदरहू प्रस्तावास शासनाकडून दिनांक ४ ऑक्टोंबर, २०११ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. • शासन मान्यतेनुसार मास्टेक प्रा.लि. मुंबई यांना आयुक्तालयाकडून दि. ४ नोव्हेंबर २०११ अन्वये विहित अटी व शर्तीनुसार कार्यारंभ आदेश देण्यात आले. • वरील प्रमाणे १ ते ३ मॉडयुल्सचे स्वॉप्टवेअर तयार करण्याचे कामाचे प्रगतीनुसार आयुक्तालयाकडून खालील प्रमाणे टप्या-टप्याने रक्कमा (एकूण देयकावरील सेवाकरसह) अदायगी करण्यात आली आहे.

५२ शासकीय आश्रमशाळा आणि निवडलेल्या ८ प्रकल्प अधिका-यांच्या कार्यालयातील सॉप्टवेअरच्या नमुना तपासणीत खालीलप्रमाणे आढळले.

- मास्टेक ने विकसीत केलेले पहिले दोन मॉडयुल्स (योजना संनियंत्रण प्रणाली आणि आश्रमशाळा व वसतीगृह व्यवस्थापन प्रणाली क्रियाशिल नव्हते. (जानेवारी २०१६) कारण अपु-या सोयी (विशेषत: इंटरनेट सुविधा) आणि अप्रशिक्षीत कर्मचा-यांमुळे आश्रमशाळा आणि वसतीगृहांमध्ये डेटा एंट्री करण्यात येऊ शकत नव्हती. परिणामत: योजना निधीचे नियोजन आणि संनियंत्रण तसेच वसतीगृहांमध्ये ऑनलाईन प्रवेश प्रणाली सुरुच होऊ शकली नाही.
- तिस-या मॉडयुल (शिष्यवृत्ती प्रदानासाठी प्रणाली) मध्ये फक्त मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती शी सबंधीत माहिती ऑनलाईन अद्यावत करण्यात आली होती, आणि सुवर्ण महोत्सवी आदिवासी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती यासह इतर शिष्यवृत्ती योजनांची माहिती अद्यावत करण्यात आली नव्हती. (डिसेंबर २०१५)

इ-गव्हर्नन्स प्रकल्प आधीच जवळपास तीन वर्षांनी प्रलंबीत झाला आहे. जानेवारी २०१६ पर्यंत मास्टेक लि. मुंबईला रु.४.७१ कोटी प्रदान केले होते.

सचिव, TDD यांनी दस्तावेजांच्या पडताळणीनंतर तपशिलवार उत्तर पाठविले जाईल असे नमूद केले.

अ. क्र.	कार्यालयीन आदेश क्रमांक व दिनांक	e-scholarship scheme	Scheme Monitoring System	School & Hostel Management	go-live amount	Gross Total Rs.
1.	क्र.भासशि-2011/ प्र.क्र.18/क.6(3) दिनांक 31.3.2012	5103802	0	7729824	0	12833626
2.	क्र.भासशि-2011/ प्र.क्र.18/क.6(3) दिनांक 20.11.2012	6498902	14427923	5905642	649890	27482357
3.	क्र.भासशि-2011/ प्र.क्र.18/क.6(3) दिनांक 17.7.2013	0	4122264	3937094	649890	8709248
	एकूण	11602704	18550187	17572560	1299780	49025231

- वरीलप्रमाणे एकूण रु . ४,९०,२५,२३१/- इतकी रक्कम मास्टेक कंपनीस अदायगी करण्यात आली आहे.
- लेखपरिक्षण दरम्यान इ-विकास आज्ञावली विकसन कामकाज सुरू होते. प्रथम टप्प्यत शिष्यवृत्ती व शासकीय वस्तीगृह प्रवेश कार्यान्वीत करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार सदर मॉड्युल्स चालू करण्यात आले. उर्वरित मॅडयुल योजना व इतर टेस्टीग कामकाज सुरक्षा ऑडीट इत्यादी कामकाज कार्यवाहीत होते. सद्य:स्थितीत इ-विकासने शिष्यवृत्ती व वस्तीगृह प्रवेश प्रणाली तथा मॅडयुल कार्यान्वीत आहेत.

१.२.६.३	परिच्छेद/मुद्दा	केलेली कार्यवाही
	आदिवासी उपयोजनेअंतर्गत झालेल्या कार्याचे मुल्यांकन - मानवी विकास निर्देशांकात स्थायी सुधारणा करुन आदिवासी क्षेत्र आणि इतर क्षेत्रे यांच्यातील अंतर भरुन आदिवासींचा सामाजिक - आर्थिक दर्जा सुधारणे, हे आदिवासी उपयोजनेचे उद्दीष्ट आहे. परंतू आदिवासी योजनेअंतर्गत घेण्यात आलेल्या कामांचे नियतकालीक प्रभाव निर्धारण अथवा मुल्यांकन TDD द्वारे करण्यात आले नाही. परिणामी, आदिवासी लोकांच्या उन्नतीसाठी घेण्यात आलेल्या विविध कामांचे अथवा योजनांचे उद्दीष्ट साध्य झाले अथवा नाही याची खातरजमा करणे कठीण होते. सचिव, TDD यांनी नमूद केले की, टाटा कन्सलटंन्सी सर्व्हीसेस द्वारे मुल्यांकन अभ्यास करण्यात आला आणि त्याचा अहवाल डिसेंबर २०१५ मध्ये शासनास सादर केला आहे.	• आदिवासी उपयोजनाअंतर्गत झालेल्या कार्याचे मुल्यांकन संदर्भात टाटा कन्सलटन्सी सर्व्हीसेसद्वारे मुल्यांकन अभ्यास अहवाल प्राप्त करुन त्यावर झालेल्या कार्यवाही संदर्भात स्वतंत्ररित्या अहवाल सादर करण्यात येत आहे. • आदिवासी विभागामार्फत राज्यात आदिवासी कल्याणाच्या विविध योजना राबविल्या जातात. सदरच्या योजना इतर विभागामार्फत देखील राबविल्या जातात. या योजना राबवितांना सदर योजनांची सांख्यीकी माहिती व संगणीकृत विश्लेषण करणे गरजेचे आहे. • यासाठी आदिवासी विकास विभागाकडे कोणतीही तांत्रिक प्रणाली वा मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने डेटा ॲनालिटीक्स आणि प्रकल्प व्यवस्थापन केंद्र (Data Analytics & Project Management Center for TSP Planning) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अंतर्गत संनियंत्रण व मुल्यमापन कक्ष मुंबई येथे स्थापन करण्यात आला आहे. • या केंद्राला संलग्न तरंग हे केंद्र आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.केंद्रिय-२०१७/प्र.क्र.८६/का.१९ दिनांक २५.१.२०१८ अन्वये पुणे विद्यापीठात कार्यान्वीत करण्यात येत आहे. • या केंद्राच्या माध्यमातून आदिवासी उपयोजनेअंतर्गत आदिवासी विकास विभाग व अन्य विभागाकडून प्रतिवर्षी राबविण्यात आलेल्या योजनांचा आदिवासी बांधवांना कितपत लाभ झाला, त्यावर किती लाभार्थ्यासाठी किती खर्च झाला याविषयी सहजगत्या माहिती मिळणे सुलभ होईल.

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचा ३१ मार्च २०१५ रोजी संपलेल्या वर्षाचा अहवाल

सामान्य आणि सामाजिक क्षेत्र

समितीने केलेल्या शिफारशींवरील कार्यवाही

परिच्छेद क्रमांक	शिफारस क्र.	समितीने केलेली शिफारस	करण्यात आलेली कार्यवाही
२.२.२.	१	आदिवासी विकास विभागाने आदिवासी विदयार्थ्यांच्या सशक्तीकरणासाठी त्यांच्या समस्या आणि गरजांचे उददेश पुर्ण निर्धारण करुन आणि उपलब्ध साधने विचारात घेऊन एखादी योग्य संस्थात्मक पध्दती विकसित करावयास पाहिजे. १. नियोजनाचे तंत्र. २. अंमलबजावणी. ३. सनियंत्रण प्रक्रिया आणि आदिवासी विदयार्थ्यांकरीता असलेल्या विविध योजना व उपक्रमांचा परिणाम याकरिता ठोस कार्यसूची आखावयास पाहिजे.	**आदिवासी विकास विभागाने आदिवासी विद्यार्थ्यांच्या समस्या व गरजा विचारात घेऊन त्यांचे सशक्तीकरणासाठी विविध उपाययोजना केलेल्या आहेत. सदर उपाययोजना खालीलप्रमाणे:-** १. शालेय शिक्षण क्रिडा विभागामार्फत शासन निर्णय दिनांक २२/०६/२०१५ अन्वये राज्यात सुरु असलेल्या प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रम राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये राबविला जात आहे. २. आर. टी. ई. कायदा २००९ नुसार ६ ते १४ वयोगटातील प्रत्येक आदिवासी विद्यार्थ्यास शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. ३. राज्यातील इंग्रजी माध्यमाच्या नांमाकीत शाळांमध्ये इ. १ ली पासुन आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत आहे. आतापर्यंत सुमारे ५२,००० विद्यार्थ्यांनी नामांकित शाळांमध्ये प्रवेश देण्यात आलेला आहे. ४. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे इंग्रजी भाषा संभाषण कौशल्य विकसित करण्यासाठी कराडी-पथ हा उपक्रम राबविण्यात येत आहेत. ५. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे विज्ञान विषय अध्ययन वृध्दीसाठी एकलव्य संस्थेच्या मदतीने उपक्रम राबविण्यात येत आहे. ६. शालेय शिक्षण विभागामार्फत वेळोवेळी पुनर्रचित करण्यात आलेला अभ्यासक्रम व मुल्यमापन पध्दतीचा अवलंब शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमधुन करण्यात येतो. ७. आश्रमशाळेतील किशोरवयीन विद्यार्थ्यांसाठी जीवन कौशल्य शिक्षण देण्यात येत असून हा विषय नियमितपणे शिकविण्यात येणार आहे. ८. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या स्वतंत्र क्रीडा स्पर्धाव्दारे राज्यस्तरापर्यंतच्या खेळाडुंना सहभागी होण्याची संधी मिळणे. ९. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या अध्ययन स्तराची निश्चिती करुन उपचारात्मक अध्यापानाचे आयोजन करण्यात येत आहे. १०. आदिवासी विकास विभागांतर्गत कार्यरत प्राथमिक / माध्यमिक शिक्षकांना मिपा औरंगाबाद या संस्थेमार्फत गणित संबोध कार्यशाळा, भाषा विषय विकास कौशल्य- मराठी भाषा विषय विकसन कौशल्य-इंग्रजी, तंत्रस्नेही शिक्षक कार्यशाळा इ. चे प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. ११. पर्यवेक्षकीय यंत्रणेतील मुख्याध्यापक, केंद्र प्रमुख आणि सहाय्यक प्रकल्प अधिकारी शिक्षण यांना प्रशिक्षणाचे व्यवस्थापन आणि शाळा सिधी या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

परिच्छेद क्रमांक	शिफारस क्र.	समितीने केलेली शिफारस	करण्यात आलेली कार्यवाही
२.२.२.	२	१. आदिवासी उपयोजनेंतर्गत असलेल्या विविध शैक्षणि योजना आणि कार्याची वित्तीय अंदाजपत्रके काळजीपूर्वक तयार करावयास पाहिजे जेणे करुन बचत कमी होईल. २. शासकीय पैशांची अफरातफर होण्याची संभावना टाळण्यासाठी रोकड वही आणि बँकेची शिल्लक यातील फरकाचा ताळमेळ ठेवावयास पाहिज, आणि ३. सर्व अखर्चित शिल्लक रक्कम अविलंब शासन खाती जमा करावयास पाहिज	१. सन २०१८-१९ या वर्षाचे मागासवर्गीय कल्याण (राज्यस्तर) योजनांचा नियतव्य मागणी आराखडा हा शासन निर्णयाच्या नुसार परिगणित करुन व आठ माही अंदाज व सुधारित अंदाज लक्षांत घेऊन करण्यांत आली आहे. व त्यावाबत दक्षता हया पुढे हि घेण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. • जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम व राज्यस्तर योजनसाठी नियतव्यची मागणी ही जिल्हयाचे पालकमंत्री /संबधीत जिल्हा अधिकारी/प्रकल्प अधिकारी /संबधीत कार्यान्वय यंत्रणा यांच्या समंतीने शासनास सादर होतात.शासनस्तरावरुन मा.मंत्री आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली प्राप्त आराखडे राज्यस्तरीत बैठकामध्ये चर्चा होऊन अंतिम: केले जातात. सदर बाब ही शासन स्तरावरिल निगडीत आहे. • सन २०१८-१९ चा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम अंतर्गत योजनांचा प्रारुप आराखडा सादर करतांना घयावची दक्षता अंतर्गत नियंत्रक व महालेखा परिक्षक यांच्या लेखा परिक्षण अहवालानुसार सन २०१७-१८ ची प्राप्त तरतुद सन २०१८-१९ साठी सभाव्य नियोजन करतांना आयुक्तालयांचे पत्र.क्र.नियो/१७/भानिवले/प्र.क्र./का५(१) दि.०१.०७.२०१७ अन्वये ४ हि अपर आयुक्त सर्व प्रकल्प अधिकारी यांना अहवालातील सर्व बाबीची काळजी पुर्वक दक्षता घेऊन आराखडा तयार करुन खर्चाचे नियोजन व नियतव्याची मागणी करणे बाबत कळविण्यात आले आहे. तसेच सन २०१८-१९ ची वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम राज्यस्तर/केंद्रपुरस्कृत/विशेष केंद्रिय अर्थसहाय्य तसार करणे बाबत आयुक्तालयाचे पत्र.क्र.नियो१७/मा.क.रास्त/प्र.क्र./का५(१) दिनांक ०७.१२.२०१७ अन्वेय सुचित करण्यांत आले आहे. • आदिवासी उपयोजनेअंतर्गत असलेले विविध शैक्षणिक योजना आणि कार्याचा वित्तीय अंदाजपत्रके आणि मंजुर निधी त्या वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदीला अधीन राहुन खर्च केला जातो. मागासवर्गीयांचे कल्याण (विशेषक्षेत्र) जिल्हास्तर व राज्यस्तर योजना मध्ये ज्या योजना साठी दोन्ही स्त्रोता मध्ये बाबनिहाय निधीची मागणी करतांना दोन्ही स्त्रोता व्दारे केलेली मागणीची पडताळनी करुन योग्य व आवश्यक तेवढी नियव्याची मागणी करणे बाबत वेळोवेळी झालेल्या बैठकांना मध्ये सुचना देण्यात आल्या आहेत. आदिवासी उपयोजनेअंतर्गत असलेले विविध शैक्षणिक योजना आणि कार्याची वित्तीय अंदाजपत्रके आणि मंजुर निधी त्या त्या वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदीला अधीन राहुन संपुर्ण खर्च केला जातो. २. रोख वहीतील शिल्लक व बँक पासबुक मधील शिल्लक यामधील ताळमेळ घेणेबाबत प्रकल्प कार्यालयांना वेळोवेळी

			सूचित करण्यात आलेले आहे. प्रकल्प कार्यालय डहाणु, जव्हार, नाशिक, नागपुर, चंदपुर पांढरकवडा या कार्यालयाने वरावरील रोकडवही शिल्लक व बँक विवरणपत्रानुसार तफावती बाबत ताळमेळ घेण्यात आला असल्याने प्रकल्प कार्यालयांनी कळविलेले आहे. प्रकल्प कार्यालय, नाशिक, नागपुर, चंदपुर व पांढरकवडा यांनी मार्च अखेर कोषागारात सादर केलेल्या देयकांचे धनादेश प्रत्यक्षात कोषागाराकडुन मार्च अखेर किंवा तदनंतर पारित होऊन धनादेश प्राप्त होतात. परंतु त्याची नोंद ३१.मार्च २०१५ रोजी घेणे क्रमप्राप्त असल्याने तशी नोंद रोखवहीमध्ये घेण्यात येते व सादर धनादशे प्रत्यक्षात बँकेमध्ये एप्रिल २०१५ किंवा तदनंतर पारित (cleared) होतात त्यामुळे रोखवहीतील शिल्लक हि बँकेतील शिल्लकी पेक्षा जास्त् दिसुन येते.. प्रकल्प अधिकारी नंदुरबार व धारणी या कार्यालयाकडील रोकडवहीमधील शिल्लक व बँक विवरणापत्रानुसार ताळमेळ घेण्याबाबत तसेच शासकीय रकमेचे नियमांप्रमाणे संवितरण करण्याबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी वरील अनुपालन स्विकृत करण्यात यावे, हि विनंती. ३. विभागांतर्गत् येणारे सर्व अपर आयुक्त, व प्रकल्प अधिकारी यांच्या खात्यात असणा-या अखर्चित रकमेबाबतचा तपशील या कार्यालयाचे पत्र क्रमांक लेखा /प्र.क्र./का.४(१)/६४७ / दिनांक २५/१/२०१८ व पत्र क्र. लेखा / प्र.क्र. / का.४(१)/२०६०/दिनांक ८/३/२०१८ अन्वये मागविण्यात आलेला आहे. तपशील प्राप्त झाल्यावर त्याची एकत्रित माहिती शासनास तात्काळ सादर करण्यात येईल.

परिच्छेद क्रमांक	शिफारस क्रमांक	समितीने केलेली शिफारस	करण्यात आलेली कार्यवाही
२.२.४	३	१) आदिवासी विदयार्थ्यांना दयावयाच्या असलेल्या अन्न धान्याच्या विहित मापदंडाचे काटेकोरपणे पालन होत असल्याची खात्री करावी. २) दरांमधील तफावतीत दुर करण्यासाठी सर्व कॅटरिंग सेवा कंत्राटांचा आढावा घ्यावा. ३) विदयार्थ्यांच्या प्रवेश संख्येत घसरता कल आणि या तुलनेत अतिरिक्त आदिवासी आयुक्त अमरावती यांच्या अधिकार क्षेत्रातील आश्रमशाळांमध्ये अन्न खर्चामधील वाढ यांच्या कारणांची तपासणी करावी.	१) आदिवासी विदयार्थ्यांना दयावयाच्या जेवण व अप्लोपहाराचा मेनू शासनाने निश्चित करुन दिलेला आहे. सदर मेनूनुसार विद्यार्थ्यांना अल्पोपहार व जेवण देण्यात येत असल्याची खात्री चव नोंदवहीद्वारे तसेच भेटीच्या वेळी करण्यात येते. विद्यार्थ्यांना गरजेनुसार व वयानुसार अल्पोपहार व जेवण देण्यात येत असल्याने अन्नधान्याच्या प्रत्येक घटकाचे मापदंड निश्चित करणे उचित ठरणार नाही. २) आदिवासी विकास विभाग शासन पत्र दिनांक २२.१.२०१४ नुसार शासकीय वसतीगृहातील विदयार्थ्यांना दैनंदिन नाश्ता, भोजन पुरवठा करण्यासाठी प्रकल्प स्तरावर ऑनलाईन निविदा मागविण्यात येते. ई-निविदा व्दारे स्पर्धात्मक स्वरुपात ऑनलाईन दर प्राप्त होत असल्याने एकाच शहरातील मुलामुलींच्या वसतीगृहातील भोजन पुरवठा न्युनतम प्राप्त दरात काही अंशी तफावती/वाढीव दर दिसुन येतो. परंतु सदर तफावतीची कारणे वेगवेगळी आहेत कारण विद्यार्थ्यांच्या वसतीगृहामध्ये अनधिकृतपणे राहण्याचे प्रमाण अधिक असते. तसेच मुलींच्या आहारापेक्षा मुलांचा आहार जास्त असतो. शासन पत्र दिनांक ३.३.२०१६ नुसार मुला-मुलींचे वसतीगृहातील भोजन ठेका दरात तफावत न राहण्याच्या दृष्टीने क्षेत्रीय कार्यालयांना निर्देश देण्यात आलेले आहेत. तथापी ई-निविदा व्दारे प्राप्त न्युनतम दरामध्ये जास्त तफावती असल्यास निविदा धारक यांच्या समवेत वेळोवेळी दर वाटाघाटी करण्याची कार्यवाही करण्यात येते. परंतु प्रत्येक वेळी प्रतिसाद मिळेलच असे होत नाही. ३) शासकीय आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना भोजनासाठी पुरविण्यात येणारे अन्न धान्य व इतर किराणा माल या बाबींसाठी शासन निर्णय दिनांक १०.३.२०१६ मधील तरतुदीनुसार शाळा स्तरावर प्रतीमहिना आवश्यक तेवढेच अन्न धान्य पुरवठा करण्याचे निर्देश आहेत. त्यानुसार मुख्याध्यापक स्तरावरुन प्रत्यक्ष लागणारी मागणी संकलीत करुन अपर आयुक्त स्तरावरुन पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे ज्यादाचा माल पडुन राहणे तसेच शासनाचा निधी अधिकतम लागणे व अन्य अनुषंगिक बाबींवर नियंत्रण ठेवण्यात आले आहे. तसेच पुरवठा झालेल्या मालाची देयके वेळीच अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. जेणेकरुन खर्चामध्ये सातत्य राहील.

परिच्छेद क्रमांक	शिफारस क्रमांक	समितीने केलेली शिफारस	करण्यात आलेली कार्यवाही
२.२.४	४	आदिवासी विकास विभागाने भाडे देण्याचे दायित्व कमी करण्यासाठी शासकीय वसतीगृहांच्या बांधकामांची गती वाढवली पाहिजे. तसेच उर्वरित आश्रमशाळांचे बांधकाम/जे प्रशासकीय मान्यता संपुष्टात आल्यामुळे अथवा इतर काही कारणांमुळे अडले आहे/ त्यांचे देखील बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाशी समन्वय साधुन आणि स्पष्ट भौतिक लक्ष्य व कालमर्यादा ठरवुन हाती घ्यावयास पाहिजे.	आदिवासी विकास अंतर्गत एकुण ४९५ वसतीगृह मंजुर असुन त्यापैकी ४९१ वसतीगृह चालु आहेत. १६६ वसतीगृह शासकीय इमारतीत सुरु आहेत. उर्वरित ३२५ वसतीगृह भाडयाच्या इमारतीत सुरु आहेत. शासकीय वसतीगृहाच्या बांधकामाची गती वाढविण्याकरीता आदिवासी विभागांतर्गत स्वतंत्र बांधकाम कक्ष शासन निर्णय दिनांक ४/७/२०१६ नुसार निर्माण करण्यात आलेला आहे. सदर बांधकाम कक्षामार्फत कालबध्द पध्दतीने अंदाजपत्रके तयार करण्यात घेऊन शासकीय वसतीगृह इमारत बांधकामाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच सदर बांधकामासाठी आवश्यक निधीची तरतूदही करण्यात आलेली आहे. याबाबत वारंवार आढावा घेऊन भाड्याच्या इमारतीमधील वसतीगृह शासनाच्या स्वत:च्या इमारतीमध्ये आणण्यासाठी कारवाई करण्यात येत आहे.

परिच्छेद क्रमांक	शिफारस क्रमांक	समितीने केलेली शिफारस	करण्यात आलेली कार्यवाही
२.२.४	५	विदयार्थ्यांच्या हालअपेष्टा होणे टाळण्यासाठी आदिवासी विकास विभागाने आश्रमशाळांमध्ये मुलभूत आणि आवश्यक सुखसोयी असण्याबाबतची खातरजमा करावयास पाहिजे. याखेरीज सौर पाणी तापके, जनरेटर्स आणि बायोमेट्रीक हजेरी प्रणालीच्या खरेदीवर मोठी रक्कम गुंतली असल्यामुळे ती उपकरणे जास्त काळ निष्क्रीय राहणार नाहीत याबाबत खातरजमा करावयास पाहिजे.	१) आदिवासी विकास विभाग अंतर्गत आश्रमशाळेतील विदयार्थ्यांना मुलभूत आणि आवश्यक सुखसोयी उपलब्ध करुन देण्यासाठी किरकोळ दुरुस्तीचे अधिकार शाळा व्यवस्थापन समितीस देण्यात आले असून त्यांना प्रतिवर्षी रु. ५ लक्ष निधी देण्यात येत आहे. २) सन २०१७ च्या उन्हाळी सुट्टीमध्ये शाळास्तरावर आश्रमशाळांची विशेष दुरुस्ती मोहीम राबवून सुमारे १२.५० कोटी रकमेची दुरुस्तीची कामे शाळास्तरावरील विविध समित्यांद्वारे करण्यात आलेली आहे. ३) सन २०१८ च्या उन्हाळी सुट्टीमध्येही आश्रमशाळांची अत्यावश्यक दुरुस्ती व रंगरंगोटीची कामे करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. ४) शासकीय आश्रमशाळा, वसतीगृहांमधील विदयार्थ्यांना अंघोळीसाठी गरम पाण्याचा पूरवठा व्हावा यासाठी सोलर वॉटर हिटर पूरवठा मे.जैन एरिगेशन सिस्टीम जळगाव तसेच पर्ल एंटरप्रायझेस पुणे यांचेमार्फत एकुण १७१४ संच पुरविण्यात आले असुन १२९४ संच अकार्यान्वीत आहेत. सोलर वॉटर हिटर जनरेटर, बायोमेट्रिक हजेरी यंत्रणा दुरुस्तीचे अधिकार स्थानिक स्तरावर घेण्यात आले आहेत. ५) सोलर वॉटर हिटर व बायोमेट्रिक हजेरी यंत्रणा यांच्या अनुषंगाने स्वतंत्र एक सदस्यीय चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालातील शिफारशीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. ६) चौकशी समितीनेही सदर यंत्रणा दुरुस्त करण्याची शिफारस केली असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

परिच्छेद क्रमांक	शिफारस क्रमांक	समितीने केलेली शिफारस	करण्यात आलेली कार्यवाही
२.२.५	६	आदिवासी विदयार्थ्यांच्या शैक्षणिक आणि शिष्यवृत्ती योजनेसाटी ठोस निधी राज्याव्दारे पुरविण्यात येत असल्यामुळे आदिवासी विकास विभागाने, हितसंबंधितांनी योजनेच्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे आणि कमकुवत दुरदृष्टी तंत्रामुळे निधी निष्काम होत नसल्याची खात्री करावयास पाहिजे.	आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या विदयार्थ्यांचे शैक्षणिक उन्नतीसाठी शासकीय अनुदानीत व अनुदानीत आश्रमशाळा व वसतीगृह, सैनिक शाळा, इंग्रजी शाळा , सुवर्ण महोत्स्वी पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती ,भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, शैक्षणिक शुल्क प्रतिपुर्ती, इ. योजनेच्या शासनाने विहित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार राबविण्यात येतात. सदर योजनांतर्गत विद्यार्थ्यांना/संस्थांना देय निधी वितरणासाठी ऑनलाईन संगणक प्रणालीचा वापर करण्यात येत असून काही योजनांसाठी संगणक प्रणाली विकसित करण्याची कार्यवाही सुरु आहे. आश्रमशाळेतील व वसतीगृहातील विद्यार्थ्यांना वैयक्तिक वापराच्या वस्तूंसाठी थेट निधी देण्यात येत आहे.तसेच विद्यार्थ्यांच्या मुलभूत सुविधांबरोबर शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठीही प्रयत्न करण्यात येत आहे. सदर योजनेचा निधी पुर्णत: खर्च करण्याबाबत वेळोवेळी आयुक्त, अपर आयुक्त, प्रकल्प अधिकारी व संबंधित क्षेत्रिय यंत्रणांना वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत.

परिच्छेद क्रमांक	शिफारस क्रमांक	समितीने केलेली शिफारस	करण्यात आलेली कार्यवाही
२.२.६	७	१) आश्रमशाळा आणि वसतीगृहांच्या प्रभावी सनियंत्रणासाठी शिक्षण कक्षाची प्रमुख पदे प्राथमिकता देऊन भरण्यात यावी. २) ई-गर्व्हनन्स प्रकल्पात भरीव रक्कम आणि वेळ गुंतलेला असल्यामुळे त्यातील सर्व अडचणी सोडवुन त्याला क्रियान्वीत करण्यासाठी भरघोस प्रयत्न करावयास पाहिजे.	१) शिक्षण कक्षातील काही पदे तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात आलेली आहेत. तसेच शिक्षण विभागाकडून प्रतिनियुक्तीने भरावयाच्या ५ पदांपैकी ३ पदे भरण्यात आलेली आहेत. उर्वरित पदांच्या सेवा प्रवेश नियम अंतिम करुन ती भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. २) मास्टेक कंपनीमार्फत ई-विकास प्रणालीसाठी तांत्रिक पाठबळ २०१६-१७ मध्ये काढून घेण्यात आले त्यामुळे आश्रमशाळा व्यवस्थापन मॉडयुल्स पुर्णपणे क्रियाशील होऊ शकले नाही. तसेच आयसीआयसीआय बँकेमार्फत डीबीटी करण्यासाठी विनाशुल्क प्रणाली तयार करुन घेण्यात आली आहे. सदर प्रणालीमध्ये आश्रमशाळा पातळीवर असलेल्या अडचणी विचारात घेता आश्रमशाळामार्फत संकलित माहिती Excel Sheet मध्ये घेऊन ती माहिती प्रकल्प कार्यालयाकडून प्रणालीवर अद्यावत करण्यात येते व प्रकल्पामार्फत अद्यावत झालेली माहितीची पडताळणी करुन विद्यार्थ्यांना डीबीटीचा लाभ हस्तांतरीत करण्यात येतो. सन २०१५-१६ मध्ये सुवर्ण महोत्सवी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज इ विकास प्रणाली मार्फत घेण्यात आले होते परंतू ब्लॉक व शाळेमार्फत योग्य तो प्रतिसाद न मिळाल्यामुळे सदरचे अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडे सादर करण्यात आले. वसतीगृह व्यवस्थापन संदर्भात महाऑनलाइन मार्फत २०१६-१७ मध्ये ऑनलाइन प्रणाली तयार करुन घेण्यात आली आहे. सदर प्रणालीमार्फत २०१७-१८ या वर्षात वसतीगृहासाठी सर्व अर्ज ऑनलाइन घेण्यात आले व प्रणालीमार्फत मेरीट लिस्ट (पात्रता यादी) प्रकल्प स्तरावर जनरेट करुन विद्यार्थ्यांना मेरीटनुसार प्रवेश देण्यात आला आहे. तसेच सदर प्रणालीव्दारे पंडीत दिनदयाळ उपाध्याय योजनेचा लाभ देखील विद्यार्थ्यांना देण्यात येत आहे.

परिच्छेद क्र.	निष्कर्ष	करण्यात आलेली कार्यवाही
२.२.७	संपादणूक लेखापरीक्षेत असे आढळले की आदिवासी विकास विभागाने आदिवासी विद्यार्थ्यांना संशक्त करण्यासाठी कोणतेही दीर्घावधी परिप्रेक्ष्य नियोजन केले नाही. प्रकल्प अधिकाऱ्यांनी कोणत्याही भौतिक लक्ष्याविनानिधीच्या उपलब्धतेनुसार फक्त वार्षिक योजना तयार केल्या २०१०-१५ दरम्यान विभागाने रु.१.७३० कोटी खर्च करुनही शासकीय आश्रमशाळांमधील दाखल्यांच्या संख्येत घटता कल आहे. अनेक आश्रमशाळांमध्ये हिंदी, गणित, विज्ञान आणि समाज विज्ञान यासारख्या अनिवार्य विषयांसाठी शिक्षक नाहीत. आश्रमशाळांच्या अभ्यासक्रमात खेळ, चित्रकला, नृत्यकला आणि संगीत यासारखे अभ्यासक्रमाव्यतिरिक्त विषय समाविष्ट नाहित ज्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या रुची, गोडी आणि गुणवत्तेच्या सर्वांगिण विकास होत नाही. अंमलबजावणीच्या तीन निरनिराळया स्तरांवर विभागाजवळ रु.१२९.५९ कोटी अखर्चित आहे. ज्यापैकी आदिवासी रु.३३.४६ कोटी जे विविध शैक्षणिक योजना आणि कार्यासाठी होते ते मार्च२०१५ पर्यंत अखर्चित राहिले विभागाने विहित केलेल्या मापानुसार आदिवासी विद्यार्थ्यांना अन्न-धान्य पुरविण्यात येत नव्हते. खाजगी सेवा पुरवठाधारकांना शासकीय वसतिगृहांना खाण्यायोग्य तयार जेवण पुरविण्यासाठी दिलेले कॅटरिंग सेवा कंत्राट विषमतोल होते नविन शासकीय आश्रमशाळा आणि वसतिगृहे बांधण्यात विलंब झाला होता. आश्रमशाळांमध्ये पुरविण्यात आलेल्या मूलभूत सुखसोयी समाधानकारक नव्हत्या सौर पाणी तपाके आणि बायोमॅट्रिक हजेरी प्रणालीच्या खरेदीवर रु.२९.८१ कोटी रक्कम खर्च करुनही ते चालू करण्यात येवू शकले नव्हते इतर शाळांमध्ये शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी असलेल्या विभागाद्वारे पुरस्कृत शैक्षणिक आणि शिष्यवृत्ती योजनांतर्गत कमकुवत कार्यतंत्रामुळे विद्यार्थ्यांच्या पात्रतेची पडताळणी न करता अदायगी करण्यात आली व यामुळे शाळांना जादा प्रदान झाले आणि शिष्यवृत्तीही अवितरीत राहिल्या शिक्षण कक्षातील प्रमुख पदे भरण्यात आली नव्हते रु४.७१ कोटी खर्च केल्यावरही आणि जवळपास तीन वर्षाचा कालावधी लोटल्यानंतरही विभागाचाई-गव्हर्नन्स प्रकल्प कार्यान्वित होवू शकला नाही. ही बाब ऑक्टोबर २०१५ मध्ये शासनास कळविण्यात आली जानेवारी २०१६ पर्यंत त्यांचे उत्तर प्रतीक्षीत होते.	यासंदर्भातील सर्व खुलासा संबंधित परिच्छेद व शिफारशीमध्ये सविस्तरपणे केलेला आहे.

शैक्षणिक योजना खर्च व बचत

वर्ष	TSP साठी TDD ला दिलेली तरतूद	शैक्षणिक योजनांसाठी अथसंकल्पिय तरतूद	शैक्षणिक योजनांवर झालेला खर्च	शैक्षणिक योजनांतर्गत बचत	अखर्चित रक्कची टक्केवारी	अखर्चित रकमेची कारणे
२०१०-११	१०७०.०१	४५५.२७	४१९.२	३६.०७	७.९२	(१) सन २०१०-११ मध्ये वित्त विभागाने योजनाखर्चावर केलेल्या १० % कपातीमुळे तेवढ्याच वित्तीय मर्यादेत निधीवितरण करण्यात आलेले असुन उर्वरीत रक्कम बचत दिसून येते. (२) तसेच शिक्षण विषयक योजनांमध्ये प्रामुख्याने शिष्यवृत्ती ही बाब विद्यार्थांच्या दृष्टीने महत्वाची व संवेदनशिल बाब असल्याने कोणताही विद्यार्थी लाभापासून वंचित राहू नये म्हणून शिष्यवृत्ती करीता पुरेशा प्रमाणात तरतूद अथसंकल्पित करण्यात येते. तथापि, संबंधित शैक्षणिक वर्षात जिल्हा परीषद/ शैक्षणिक संथामार्फत प्राप्त होणा-या पात्र लाभार्थांनाच शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. (३) शैक्षणिक योजनांतर्गत आश्रमशाळा / वसतीगृह इमारत बांधकामाकरीता राज्य व जिल्हा अशा दोन्ही स्तरावरून तरतूद करण्यात येत होती व बांधकाम विषयक अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभाग या यंत्रणेमार्फत कर्ण्यात येत होती. तथापि, संबंधित यंत्रणेमार्फत पुरेसे प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे बचत झालेले आहे.
२०११-१२	९५०.९५	६४८.०१	५२३.४	१२४.६१	१९.२३	(१) सन २०११-१२ मध्ये वित्त विभागाने योजनाखर्चावर केलेल्या १५ % कपातीमुळे तेवढ्याच वित्तीय मर्यादेत निधीवितरण करण्यात आलेले असुन उर्वरीत रक्कम बचत दिसून येते. (२) तसेच शिक्षण विषयक योजनांमध्ये प्रामुख्याने शिष्यवृत्ती ही बाब विद्यार्थांच्या दृष्टीने महत्वाची व संवेदनशिल बाब असल्याने कोणताही विद्यार्थी लाभापासून वंचित राहू नये म्हणून शिष्यवृत्ती करीता पुरेशा प्रमाणात तरतूद अथसंकल्पित करण्यात येते. तथापि, संबंधित शैक्षणिक वर्षात जिल्हा परीषद/ शैक्षणिक संथामार्फत प्राप्त होणा-या पात्र लाभार्थांनाच शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. (३) शैक्षणिक योजनांतर्गत आश्रमशाळा / वसतीगृह इमारत बांधकामाकरीता राज्य व जिल्हा अशा दोन्ही स्तरावरून तरतूद करण्यात येत होती व बांधकाम विषयक अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभाग या यंत्रणेमार्फत कर्ण्यात येत होती. तथापि, संबंधित यंत्रणेमार्फत पुरेसे प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे बचत झालेले आहे.
२०१२-१३	१३९१.५२	७६१.२	६३२.०३	१२९.१७	१६.९७	१) सन २०१२-१३ मध्ये वित्त विभागाने योजनाखर्चावर केलेल्या २० % कपातीमुळे तेवढ्याच वित्तीय मर्यादेत निधीवितरण करण्यात आलेले असुन उर्वरीत रक्कम बचत दिसून येते. (२) तसेच शिक्षण विषयक योजनांमध्ये प्रामुख्याने शिष्यवृत्ती ही बाब विद्यार्थांच्या दृष्टीने महत्वाची व संवेदनशिल बाब असल्याने कोणताही विद्यार्थी लाभापासून वंचित राहू नये म्हणून शिष्यवृत्ती करीता पुरेशा प्रमाणात तरतूद अथसंकल्पित करण्यात येते. तथापि, संबंधित शैक्षणिक वर्षात जिल्हा परीषद/ शैक्षणिक संथामार्फत प्राप्त होणा-या पात्र लाभार्थांनाच शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

						(३) शैक्षणिक योजनांतर्गत आश्रमशाळा / वसतीगृह इमारत बांधकामाकरीता राज्य व जिल्हा अशा दोन्ही स्तरावरून तरतूद करण्यात येत होती व बांधकाम विषयक अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभाग या यंत्रणेमार्फत कर्ण्यात येत होती. तथापि, संबंधित यंत्रणेमार्फत पुरेसे प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे बचत झालेले आहे.
२०१३-१४	१३०३.६८	१०२७.१८	९५१.४५	७५.७३	७.३७	१) सन २०१३-१४ मध्ये वित्त विभागाने योजनाखर्चावर केलेल्या २० % कपातीमुळे तेवढ्याच वित्तीय मर्यादेत निधीवितरण करण्यात आलेले असुन उर्वरीत रक्कम बचत दिसून येते. (२) तसेच शिक्षण विषयक योजनांमध्ये प्रामुख्याने शिष्यवृत्ती ही बाब विद्यार्थांच्या दृष्टीने महत्वाची व संवेदनशिल बाब असल्याने कोणताही विद्यार्थी लाभापासून वंचित राहू नये म्हणून शिष्यवृत्ती करीता पुरेशा प्रमाणात तरतूद अथसंकल्पित करण्यात येते. तथापि, संबंधित शैक्षणिक वर्षात जिल्हा परीषद/ शैक्षणिक संथामार्फत प्राप्त होणा-या पात्र लाभार्थांनाच शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते. (३) शैक्षणिक योजनांतर्गत आश्रमशाळा / वसतीगृह इमारत बांधकामाकरीता राज्य व जिल्हा अशा दोन्ही स्तरावरून तरतूद करण्यात येत होती व बांधकाम विषयक अंमलबजावणी सार्वजनिक बांधकाम विभाग या यंत्रणेमार्फत कर्ण्यात येत होती. तथापि, संबंधित यंत्रणेमार्फत पुरेसे प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे बचत झालेले आहे.या यंत्रणेमार्फत कर्ण्यात येत होती. तथापि, संबंधित यंत्रणेमार्फत पुरेसे प्रस्ताव प्राप्त न झाल्यामुळे बचत झालेले आहे.
२०१४-१५	१४५०.४	११७८.३	९२५.१	२५३.२	२१.४९	१) सन २०१४-१५ मध्ये वित्त विभागाने योजनाखर्चावर केलेल्या २५ % कपातीमुळे तेवढ्याच वित्तीय मर्यादेत निधीवितरण करण्यात आलेले असुन उर्वरीत रक्कम बचत दिसून येते. (२) तसेच शिक्षण विषयक योजनांमध्ये प्रामुख्याने शिष्यवृत्ती ही बाब विद्यार्थांच्या दृष्टीने महत्वाची व संवेदनशिल बाब असल्याने कोणताही विद्यार्थी लाभापासून वंचित राहू नये म्हणून शिष्यवृत्ती करीता पुरेशा प्रमाणात तरतूद अथसंकल्पित करण्यात येते. तथापि, संबंधित शैक्षणिक वर्षात जिल्हा परीषद/ शैक्षणिक संथामार्फत प्राप्त होणा-या पात्र लाभार्थांनाच शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

साक्ष :

२.१ परिच्छेद क्र.२.२—आदिवासी उपाययोजनेतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक योजना अणि इतर संबंधित कार्याची अंमलबजावणी.

परिच्छेद क्रमांक—२.२.२.१ दिर्घावधी परिप्रेक्ष्य योजनेचा अभाव

या परिच्छेदाच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे? अशी विचारणा समितीने केली असता, पूर्वी नियोजन आयोगाच्या पद्धतीप्रमाणे केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या स्तरावर पंचवार्षिक योजना राबविण्यात येत होती. १२ व्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी २०१२ ते २०१७ पर्यंत होता. या कालावधीनंतर निती आयोगाची पुनर्रचना झाल्यामुळे पंचवार्षिक योजनेच्या पद्धतीचा अवलंब करण्यात आला नाही. तथापि विभागाच्या स्तरावर २०३० डॉक्युमेंट तयार करून त्याचे वित्त आणि नियोजन मंत्री यांचेसमोर सादरीकरण केले होते. प्रत्येक विभागाने फक्त पाच वर्षाचा आराखडा न करता एकूण २०३० पर्यंतचा रोडमॅप तयार करावा असे शासनाचे एक पत्र आले होते. त्याप्रमाणे विभागाने आपल्या स्तरावर तसा प्लान तयार करून त्याचे सादरीकरण केले होते, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Has it been sanctioned ? विभागाने ते सादर केव्हा केले ? अशी विचारणा समितीने केली असता, नियोजन विभागाकडून पुढे काही औपचारिक मंजुरी किंवा कार्यवाही करण्यात आलेली नाही. सादरीकरण झाल्यावर सहा महिने झाले. Sir, I will give you the exact date. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नियोजन आयोगाचे रुपांतर नीती आयोगामध्ये झाल्यानंतर लॉग टर्ममध्ये काय काय करावे हे अपेक्षित होते. विभागाने सहा महिन्यापूर्वी नियोजन विभागाचे लॉंग टर्म म्हणजे २०३० पर्यंतचे धोरण शासनाला सादर केले. आदिवासी विकास विभागाने शासनाकडे धोरण सादर करताना कोणत्या तज्ज्ञाची मदत घेतली होती की केवळ सचिव दर्जाचे, उप सचिव दर्जाचे किंवा प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालयातील आदिवासी विकास विभागाचे काम पाहणारे अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन प्लान तयार केला होता काय, विभागाचा बेस काय होता ? २०३० पर्यंतचा आराखडा तयार करण्यासाठी तज्ज्ञांचे पॅनेल करून त्यांना मानधन देऊन त्यांचा सल्ला घेतला होता काय ? त्यांची अधिकृत नियुक्ती केली होती काय? अशी विचारणा समितीने केली असता, टीस, आयआयटी, बाबासाहेब आंबेडकर टेक्निकल युनिव्हर्सिटी, पुणे विद्यापीठ डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, शिक्षण विभाग अशा बऱ्याच जणांशी एमओयु केला. We have not prepared this plan by outsourcing it to any outside Agency. वैचारिक स्तरावर विचारमंथन करून केलेले आहे. आदिवासी उप योजनेची सध्याची ॲलोकेशन आणि कार्यपद्धतीबाबत विभागाचा फोकस असावयास पाहिजे. लॉंग टर्ममध्ये काय डायरेक्शन असायला पाहिजे तर आदिवासी समाजाचे सक्षमीकरण, त्यांचा कौशल्य विकास, हेल्थ, एज्युकेशन या मूलभूत सुविधा आहेत. त्यामध्ये शासनाकडून काही मदत लागली असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आदिवासी समाजाचा विकास करण्याच्या बाबतीत विभाग सर्वच गोष्टींमध्ये मागे आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे असले तरी सन २०३० मध्ये ज्या उपायोजना द्यावयाच्या होत्या त्याचे निकष, त्याचा हेतू, त्याचे उद्दिष्ट या सर्व गोष्टी विभागाच ठरविणार काय ? This is very unfortunate. राज्य शासन ही एक प्रयोगशाळा आहे. It is an experiment laboratory. आज ज्याच्याजवळ सत्ता आहे तो अधिकाराचा उपयोग करून त्याला जे चांगले वाटते ते करतो. कोणी वाईट काम करीत नाही, परंतु त्याला जे वाटते त्याप्रमाणे अंमलबजावणी करतो. शासन जेव्हा लॉंगटर्म धोरण स्वीकारते तेव्हा एस्पर्टीजची मदत घेतली पाहिजे, पण त्यामध्ये शासन फेल्युअर आहे. विभाग विद्यार्थ्यांना वर्षभरात साधा शाळेचा गणवेश आणि दफ्तर देऊ शकत नाही. विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या आहाराबाबत सर्व वर्तमानपत्रात बातम्या आणि प्रत्येक अधिवेशनात मुद्दा उपस्थित होत असतो. त्या अनुषंगाने काय धोरण आखावे लागणार आहे याचा विचार करावा लागणार आहे. त्याशिवाय विद्यार्थी, स्तनदा मातांना थेट लाभ कसा देता येईल, आदिवासींसाठी रोजगार निर्मिती कशी करता येईल या सर्व गोष्टींचा विचार करण्याची आवश्यकता होती, पण असे काही झाले नाही. विभागाने शासनाला ज्या दीर्घकालीन उपाययोजना सुचविलेल्या आहेत त्याची कॉपी समितीला द्यावी कारण फक्त रकाने भरून द्यायचा म्हणून माहिती दिली असेल. ती माहिती मागवून घ्यावी. विभागाचे कोणत्या प्रकारचे इनपुटस घेतले ? अशी विचारणा समितीने केली असता, समितीने संधी दिल्यास समितीसमोर सादरीकरण करणे शक्य आहे. विभाग मूलभूत सुविधा देत नाही. विभागामध्ये काय रिफॉर्म्स केलेले आहेत असे विषय येथे उपस्थित होत आहेत. याबाबत सादरीकरण पाहिल्यास त्याबाबत समितीला कल्पना येईल. विभागाने मागील एक वर्षात खालच्या स्तरावरील आदिवासी आश्रमशाळांमध्ये सोयी-सुविधांसाठी कायापालट अभियान घेतले. स्कूल मॅनेजमेंटला रिसोर्सेस दिले. The inputs are from the consultations which we regularly had with the UNICEF, UNDT and with the field officers. We are having a lot of brain-storming sessions. I would request you to have a look at the vision plan. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

This Audit Para is not on the Vision Plan. महालेखाकारांनी आक्षेप काढला आहे की प्रत्येक प्रकल्प अधिकाऱ्यांनी पंचवार्षिक योजना तयार करावयास पाहिजे होते, पण तसे झालेले नाही असा आक्षेप आहे असे मत समितीने व्यक्त केले.

We are trying to bring to the notice of the department that the Project Officers have to prepare a five year Plan असे मत महालेखापालांनी व्यक्त केले.

समिती पुढील बैठकीत सादरीकरण पाहिल. विभाग जे प्रॉस्पेक्टीव्ह करीत आहे त्याबद्दल काही वाद नाही. प्रत्येक प्रकल्प अधिकाऱ्यांनी त्याच्या प्रकल्पाची पंचवार्षिक योजना तयार करून ती सादर केली पाहिजे, पण असे करण्यामध्ये ते अयशस्वी ठरले त्याबाबत समितीने विभागाचे मत विचारले असता, पाच वर्षाचे नियोजन करण्यासाठी नियोजन विभाग नोडल एजन्सी होती. तसेच राज्यस्तरावर नियोजन आयोगाचे सादरीकरण होत होते. ॲक्शन प्लान, ॲन्युअल ॲक्शन प्लान आणि लॉंग टर्म-पाच वर्षे असे त्याचे टप्पे आहेत. आता ही प्रॅक्टीस बंद झालेली आहे. प्रत्येक राज्याने पाच वर्षाचे नियोजन न करता २०३० पर्यंतचे नियोजन करावे अशी नीती आयोगाची सूचना होती असे विभागीय सचिवांनी अवगत केले. नीती आयोगाच्या स्थापनेनंतर सन २०१४-२०१५ नंतर जूनी पद्धत बंद झाली. आता सन २०१४-२०१५ चे ऑडीट करण्यात येत आहे. सन २०१४-२०१५ पर्यंत प्लान विभागाने तयार करावयाचे होते ते प्लान तयार केले नाहीत हा आक्षेप आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, राज्यात टीएसपीखालील प्लानिंग युनिट प्रकल्प अधिकारी स्तरावर आहे. जिल्हा नियोजनचे दोन भाग झाले. ट्रायबल सबप्लानसाठी डी.पी.सी.ची मान्यता घेण्यात येते. त्यामध्ये सर्व विभागांच्या ॲन्युअल प्लानचा समावेश असतो. त्याशिवाय राज्य सरकारची योजना आहे. डीएसपीच्या ९.३५ टक्के ॲलोकेशन ऑफ द स्टेट बजेट असते. त्यामध्ये दोन भाग आहेत, आता त्याचे तीन भाग झालेले आहेत. We transfer 5% funds to the villages directly. त्यामध्ये राज्य सरकारची योजना असते, राज्य सरकारचे बजेट असते तसेच डीपीसी लेव्हलवरील योजना असतात.आदिवासी विकास विभागाचा ॲन्युअल ॲक्शन प्लान आहे. नियोजनाची प्रकिया दरवर्षी करण्यात येते असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सन १९९२-१९९३ पासून एकाही प्रकल्प अधिकाऱ्याने दीर्घावधी योजना तयार केली नव्हती. प्रकल्प अधिकाऱ्यांनी स्थानिक मागण्या आणि निधी उपलब्धतेचा आधारावर कोणतेही भौतिक लक्ष्य निर्धारित न करता फक्त वार्षिक योजना तयार केली असा महालेखाकारांचा आक्षेप आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, In our State we are following the system of resource allocation on annual basis. There is no such thing in any district of any department ये पांच साल का ॲलोकेशन बना के फ्रिज कर दिया असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आदिवासी विकास विभागाकडून सर्व प्रकल्प अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिकार क्षेत्रातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत पंचवार्षिक परिप्रेक्ष्य योजना तयार करण्याचे सप्टेंबर, १९९३ मध्ये निर्देश देण्यात आले. परंतु एकाही प्रकल्प अधिकाऱ्याने कोणतीही दीर्घावधी परिप्रेक्ष्य योजना तयार केली नाही. सप्टेंबर, १९९३ च्या आदेशाचे पालन झाले नाही हा महालेखापालांचा आक्षेप आहे. विभाग २०३० व्हीजन डॉक्युमेंट तयार करीत आहे ही चांगली गोष्ट आहे. सप्टेंबर, १९९३ च्या आदेशानुसार सन २०१५ पर्यंत तोच नियम होता. विभागाने दीर्घावधी परिप्रेक्ष्य योजना तयार केली पाहिजे होती. पण तसे झालेले नाही असे समितीने निदर्शनास आणले.

A.G. We have pointed out the implications of non-implementation. There were huge unspent balances. There were vacancies of teachers in Ashram Schools, E-governance Application Software was not implemented. We have pointed out few examples of implications in the functioning of the department which arose due to absence of long term planning. असे मत महालेखापालांनी व्यक्त केले असता, When we come on the point of vacancies, we will discuss the points one by one. At present, I can only say what we have done and what we are trying to do असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

एक वर्ष किंवा पाच वर्षाचे नियोजन कशाच्या आधारावर करता ? विभाग लोकंख्येच्या आधारावर नियोजन करतो. याबाबत औरंगाबाद जिल्ह्याचे उदाहरण देताना सन २०११ च्या जनगणनेनुसार औरंगाबाद जिल्ह्यास जो निधी मिळावयास पाहिजे तो मिळत नाही. सरपंच पद, जिल्हा परिषद सदस्य पद, पंचायत समिती सदस्य पद मिळते पण निधी मिळत नाही. विभागाने जो प्लान बनविला त्यामध्ये हा मुद्दा घेतला काय ? विभाग लोकसंख्येप्रमाणे निधीचे वाटप का करीत नाही ? सिल्लोड मतदारसंघामध्ये लोकसंख्येप्रमाणे १७ सरपंच आहेत. पण निधी मिळत नाही. आपण प्लान करीत नसल्यामुळे निधी मिळत नाही. त्यामुळे आदिवासी बांधव वंचित राहतात असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली. १९८१ च्या जनगणनेनुसार राज्यात टीएसपीचे मॅपिंग झाले होते. तेव्हापासून ते कंटीन्यु आहे. या विषयासंदर्भात माननीय मुख्यमंत्री आणि मुख्य सचिवांशी चर्चा झाली आहे. सन २०११ च्या जनगणनेनुसार रिमॅपिंग करावे लागेल. आम्ही आयटीआयमार्फत सर्व मॅप्स तयार केलेले आहेत. ते मॅप्स केंद्र सरकारच्या प्लानिंग आणि स्टॅटीस्टीक्स विभागाला पाठवावे लागतात. ती प्रोसिजर विभाग करणार आहे. मागील २० वर्षात डेमोग्राफीक बदल झालेले आहेत. काही भागात आदिवासींची संख्या जास्त आहे. काही ठिकाणी हे बदल झालेले आहेत. This will be a

big decision to re-map the tribal areas. ज्याला शेडयुल्ड एरिया म्हणतात आणि टीएसपी. त्याचे बरेच इम्पलीकेशन्स आहेत. मागे देखील हा विषय समितीसमोर मांडला होता. लेटेस्ट सेन्ससवर रिमॅपिंग झाले पाहिजे असे विभागाचेही प्रयत्न आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

केंद्र आणि राज्य सरकार लोकसंख्येच्या प्रमाणात निधी देते. परंतु काही स्पेसिफीक एरियाला तो निधी मिळतो. अन्य भागाला तो मिळत नाही. सचिवांनी सांगितले की, १९८१ च्या जनगणनेनुसार वाटप करण्यात येते, ते चुकीचे आहे. अदिवासी लोकांना न्याय मिळाला पाहिजे. त्यांना फक्त रिझर्व्हेशनचा फायदा मिळतो. परंतु त्यांना निधी मिळत नाही. मग त्यांच्या नावाने निधी कशाला घेण्यात येते? केंद्र सरकार आणि राज्य सरकार वाढीव लोकसंख्येच्या प्रमाणात विभागाला निधी देते. परंतु निधीचे वाटप करण्याची पद्धत चुकीची आहे. विभागाने २०३०-व्हीजन डॉक्युमेंटस दिलेले आहेत त्यामध्ये हा मुद्दा आहे काय ? जेव्हा जनगणना होते त्यामध्ये लोक एस.टी.आहेत म्हणून सांगतात आणि तेथील लोकसंख्येनुसार रिझर्व्हेशनही बदलते. पण प्रत्यक्षात त्यांच्याकडे एस.टी.चे प्रमाणपत्र नसते त्यांना एस.टी. ग्राह्य धरावे की नाही हा एक मुद्दा आहे.आदिवासी वस्तीच्या घनतेच्या आधारावर केंद्र सरकार निधी देते. सचिवांनी सांगितल्याप्रमाणे सन १९८१, १९९१, २००१, २०११ या वर्षात जनगणना झाली. सालाबाद प्रमाणे निधी येतो. तो ठरलेल्या पॉकेटसमध्ये जातो आणि तो सर्वांच्या वतीने घेतला जातो. असे मत समितीने व्यक्त केले असता, Sir, even if we do the re-mapping, sorry to say that औरंगाबादला जास्त फायदा होणार नाही. कारण इतर जिल्ह्यांच्या तुलनेत औरंगाबाद जिल्ह्यात आदिवासींची संख्या कमी आहे.

समितीची सदस्यांची जी तक्रार आहे त्यानुसार नवीन लोकसंख्येप्रमाणे स्पेसिफीकली औरंगाबाद जिल्ह्याची लोकसंख्येची टक्केवारी किती आहे, विभागाचे निधीची टक्केवारी किती आहे, याची माहिती पुढील साक्षीच्या वेळी सादर करावी असे समितीने सूचित केले.

शहरी भागातील महानगरपालिका क्षेत्रामध्ये एस.टी.चे रिझर्व्हेशन असते. कारण तेथे तेवढी लोकसंख्या असते. परंतु त्या भागातही निधी मिळत नाही असे मत समितीने व्यक्त केले.

विभागाने रिमॅपिंगचा प्रस्ताव शासनाला सादर केलेला आहे त्याची एक प्रत समितीला सादर करावी. या प्रकरणी कोणता उपाय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ५० टक्क्यांपेक्षा अधिक लोकसंख्या असेल तर टीएसपी, १०००० पेक्षा जास्त लोकसंख्या असेल तर माडा व ५००० पेक्षा जास्त लोकसंख्या असेल तर मिनी माडा यासाठी जर रिमॅपिंग करावयाचे असेल, कॉर्पोरेशन भागातील एसटी कॅन्डीडेन्टच्या कॉन्स्टीट्यूएन्सीला वगळण्याची बाब धोरणात्मक आहे. उक्त प्रकरणी चर्चा करून कोणते धोरण स्वीकारावयाचे हा वेगळा विषय आहे. केंद्र शासनाच्या टीएसपीच्या गाईड लाईनमध्ये अशा प्रकारचे प्रयोजन नाही. लोकसंख्येनुसार त्यास अपडेट करता येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

व्हिजन डॉक्युमेंटच्या वेळी या मुद्यावर चर्चा केली पाहिजे असे समितीने सूचित केले असता, सचिव महोदया यांनी सांगितले की, रिमॅपिंग करण्यात येईल. व्हिजन डॉक्युमेंटमध्ये उक्त बाब समाविष्ट करण्यात आली आहे काय ? रिमॅपिंग करावे, अशी समितीची शिफारस आहे. रिमॅपिंग केंद्र शासनस्तरावरून नोटीफिकेशन काढून करण्यात येते. राज्यात रिमॅपिंग ओव्हर ड्यू आहे, असे विभागाचे मत आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाकडून राज्याचा आराखडा तयार करण्यात येतो. जिल्हा नियोजन समिती ७३ व्या घटना दुरूस्ती अन्वये अस्तित्त्वात आली आहे. प्रकल्प अधिकारी यांनी जिल्हानिहाय पंचवार्षिक विकास आराखडे सन १९९२-९३ पासून तयार केले नाहीत, असा महालेखाकारांचा लेखा आक्षेप आहे. विभागाच्या सचिवांनी सांगितले की, ते डीपीडीसीचे जिल्हा नियोजनाचा व राज्याच्या वार्षिक आराखडे तयार करतो. जिल्हा वार्षिक आराखड्याच्या माध्यमातून जिल्ह्यासाठी नियतव्यय ठरवून देण्यात येतो. राज्यातील आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून राज्याचा विकास आराखडा तयार करण्यात येतो व तो डीपीडीसीमध्ये मंजुरीसाठी ठेवण्यात येतो. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

७३ व्या घटना दुरूस्तीच्या अन्वये निवडणुका होऊन अस्तित्त्वात आलेल्या डीपीडीसीला कोणता अधिकार आहे ? रस्ता लेखाशिर्षाखाली १० टक्क्यांपेक्षा अधिक खर्च करू नये, ही बाब ठरविणारे राज्याचे अधिकारी कोण ? याबाबत विभागाच्या सचिव काही माहिती देणार आहेत काय? समजा मेळघाट भागामध्ये रस्ता लेखाशिर्षाखाली १२ ते १५ टक्क्यांपर्यंत नियतव्ययाच्या अधिन राहून निधी खर्च करावयाचा असेल तर त्यास मर्यादा का घालण्यात येते ? विकास आराखडा केवळ डीपीडीसीच्या मंजुरीसाठी पाठविण्यात येतो. विभागाने दिलेला प्लॅन डीपीडीसीने मान्य का करावा? याबाबतचा प्रस्ताव सादर केला होता. जिल्ह्याचा नियतव्यय जिल्ह्याच्या कोणत्या लेखाशिर्षाखाली कशा प्रकारे वाटप करावयाचा, हा डीपीडीसीचा अधिकार असून त्यासंदर्भात घटनात्मक तरतूद करण्यात आली आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी निवडणुका घेतात. शासनाने जिल्ह्यासाठी १०० कोटी रुपये निधी वितरित करण्याचा निर्णय घेतला तर उक्त निधीचे नियोजन लेखाशिर्षनिहाय किती टक्केवारीनुसार करावे, याबाबतचे अधिकार डीपीडीसीला देण्यात यावेत, कारण डीपीडीसीची निवडणूक घटनात्मक आहे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाकडून प्रत्येक कामासाठी निधीची टक्केवारी निश्चित करून मर्यादा आणण्यात येतात. सदरहू प्रकरणी विभागाच्या सचिवांनी स्पष्टीकरण द्यावे असे समितीने सूचित केले असता, सदरहू प्रकरणी तक्रार होती. आदिवासी विकास विभागाच्या सन १९९१ मधील शासन निर्णयानुसार उपलब्ध निधीची लेखाशिर्षनिहाय टक्केवारी निश्चित करून देण्यात आली आहे. त्यामुळे जिल्हास्तरावरील डीपीओ लेखाशिर्षाखालील निश्चित टक्केवारी पेक्षा अधिक प्रमाणात निधी देऊ देत नाहीत. या आर्थिक वर्षापासून नियोजन विभागाचे ज्याप्रमाणे कोअर व नॉन कोअर सेक्टरसाठी सर्वसाधारण नियोजन करण्यात येते त्याप्रमाणे केले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कायदा मोठा की शासनाचे सर्क्युलर मोठे ? असा समितीने जो मुद्दा मांडला आहे त्यासंदर्भातील निर्णय विभागाने विड्रॉ केला असून डीपीडीसीला सर्व अधिकार देण्यात आले आहेत. उक्त विषयासंदर्भातील सर्क्युलर समितीच्या सर्व सन्माननीय सदस्यांना विभागाने वाटप करावे. सदरहू अधिकार डीपीडीसीला नव्हे तर पालक मंत्री महोदयांना दिले आहेत. पालक मंत्री डीपीडीसीचे अध्यक्ष असतात व डीपीडीसी मेजॉरिटीनुसार चालत असते. डीपीडीसीतील मेजॉरिटीचा विश्वास पालक मंत्री यांचेवर असेल तर ते निर्णय थोपवतात. तो स्थानिक विषय आहे. राज्य समिती लेखाशिर्ष निहाय खर्चाची टक्केवारी ठरवून देते, त्यासंबंधीचे अधिकार डीपीडीसीला नाहीत, ही बाब योग्य नाही असे मत समितीने व्यक्त केले. विभागाच्या सचिवांनी शासन निर्णयाची प्रत समितीला सादर करावी.

परिच्छेद क्रमांक २.२.२—शासकीय आश्रमशाळांमध्ये दाखला घेणाऱ्यांच्या संख्येत घसरता कल

राज्यातील आश्रमशाळांच्या व्यवस्थापनासाठी १७२९.५७ कोटी रुपये खर्च करून सुद्धा २.६९३ लाख मंजुरी क्षमतेच्या विरुद्ध आश्रमशाळांच्या प्रवेशामध्ये घसरला कल आढळला आहे. सदरहू प्रकरणी प्रशासन कमी पडत आहे काय, विद्यार्थी संख्या घटण्याचे कारण काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विद्यार्थ्यांची संख्या परिणामकारक घटलेली नाही. आश्रमशाळेतील विद्यार्थी संख्या सन २०११-१२ मध्ये ४ लाख ५२ हजार होती. From 2011 to 2017-18 there is an increase of 52,000 and not a decline असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

समितीचा आक्षेप आहे की, शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची संख्या घटत असून अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थी संख्येमध्ये वाढ होत आहे. शासकीय आश्रमशाळा अकार्यक्षम का होत आहेत ? शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी संख्या सन २०११-१२ मध्ये २ लाख ७ हजार होती ती सन २०१७-१८ मध्ये १ लाख ९१ हजारांवर आली आहे व खाजगी अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थी संख्या २.५ लाख होती ती वाढ होऊन २.४९ लाख पर्यंत पोहोचली आहे. नामांकीत शाळेमध्ये सन २०११-१२ मध्ये १५०९ विद्यार्थी संख्या होती त्यामध्ये वाढ होऊन ती ८,९२९ पर्यंत पोहोचली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, मागील काही वर्षात अनुदानित शाळेचा दर्जा सुधारला आहे व शासकीय आश्रमशाळांचा दर्जा खालावला आहे, असे नाही. यासाठी विद्यार्थी संख्येचा विभागनिहाय तपशील पहावा लागेल तसेच त्यांच्या शैक्षणिक निकालांची तुलना करून पहावी लागेल. विभागाकडील तपशील समितीला नंतर सादर करण्यात येईल. सर्वसाधारणपणे पाहिले तर ग्रामीण भागामध्ये नवीन इंग्रजी माध्यमाची खाजगी शाळा सुरू झाल्या आहेत. हा ट्रेंड खूप राईजिंग आहे. लहान शहरांतील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची संख्या नवीन इंग्रजी माध्यमाच्या खाजगी शाळा सुरू झाल्यामुळे थोड्या प्रमाणात कमी झाली आहे. या व्यतिरिक्त एक कारण आणखी आहे. मागील २ वर्षांच्या काळात कन्सॉलिडेशन ऑफ आश्रमशाळा घेतलेला आहे. ज्या शाळेची पट संख्या कमी होती व तेथे ६० ते ८० विद्यार्थी होते अशा आश्रमशाळेतील मुलांचे जवळपासच्या आश्रमशाळेत समायोजन करून त्यांना एका ठिकाणी चांगली सुविधा देऊन कन्सॉलिडेशन फेज केले आहे. याशिवाय काही शाळांमध्ये १ ली ते ४ थी वर्गामध्ये शिकणारी खूप लहान मुले होती. त्या मुलांना पालकांसोबत राहता आले पाहिजे. आदिवासी क्षेत्रातही जिल्हा परिषदेच्या दर १ कि.मी. परिसरामध्ये शाळा असून तेथे सर्व शिक्षा अभियान राबविण्यात येत आहे असे विभागीय सचिवांनी अशी विचारणा केली असता, All this is applicable to Grant Ashramshala also. It is applicable to both but department not taking consolidation and closing down Grant Schools. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शासकीय आश्रमशाळांचा दर्जा खालावत असल्याचे दिसून येत आहे. उक्त प्रकरणी प्रशासन कोठे तरी कमी पडत आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, आदिवासी विकास विभागाच्या १४ एकलव्य शाळा सुरू केल्या आहेत. सीबीएसई बोर्डाच्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांचे कॉम्प्लेक्स पूर्ण झाल्यानंतर त्यांना तळोद्याच्या मेरीट धर्तीवर आणण्यात येईल. विभागाने नामांकीत शाळा सुरू केल्या आहेत. आदिवासी मुलांसाठी चांगल्या खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांना स्पॉन्सर करण्यात येत आहे व शासकीय आश्रमशाळांना कन्सॉलिडेट करण्यात येत आहे. ज्या ठिकाणी गरज आहे तेथील शाळा ठेवून त्यांना चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्याचा एकंदरीत परिणाम and there is a trend and craze for private English Medium schools हे पण खरे आहे. समितीला संपूर्ण चित्र पाहिले पाहिजे. ज्या ठिकाणी विद्यार्थी संख्या कमी झाली आहे तो शहरीकरण झालेला भाग आहे. जवाहर, डहाणू, धारणी येथील शासकीय आश्रमशाळांमधील पट संख्या वाढलेली आहे. Therefore, you have to look at micro data to analyse असे विभागीय सचिवांनी विदित केले.

लेखा परीक्षकांनी शासकीय आश्रमशाळांमध्ये दाखला घेणाऱ्यांच्या संख्येत घसरता कल, हा लेखा आक्षेप काढला आहे. त्यामुळे समिती केवळ शासकीय आश्रमशाळेच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करीत आहे. शासकीय आश्रमशाळांतील विद्यार्थी संख्या दिवसें दिवस घटत चाललेली आहे, ही वस्तूस्थिती विभागास नाकारता येणार नाही. यासंदर्भात स्पष्टीकरण देण्यास समितीने सूचित केले असता, After listening to our observations, the Accountant General has not offered any comments. They have accepted our observations असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखाकार कार्यालयाने लेखापरीच्छेदावरील स्पष्टीकरण मान्य केले याचा अर्थ लोकलेखा समितीने ते मान्य केले असे नाही. The Accountant General is silent on this issue. However, we are not silent असे मत समितीने व्यक्त केले.

महालेखाकारांच्या आदिवासी विकास विभागाने जे उत्तर दिले आहे तेच आम्ही अहवालातील मुद्यासमोर छापले आहे and we have left it to the Committee to discuss असे महालेखाकारांनी नमूद केले.

लेखा परीच्छेदासंदर्भातील स्पष्टीकरण महालेखाकार यांनी मान्य असल्याचे सांगितले म्हणून ते समितीला मान्य करावे लागत असते तर समितीला काही अर्थच राहिला नसता. ज्या प्राप्त परिस्थितीमध्ये आदिवासी विभागातील लोकांचा जो कल आहे त्यासंदर्भात तो स्वतः काही करू शकत नसल्याने शासनाने अनुकूल धोरण अवलंबिले पाहिजे. शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थी संख्येत घट होऊन खाजगी शाळांची संख्या वाढत असेल तर उक्त घट होण्यामागे शासकीय आश्रमशाळांची अडचण काय आहे ? आश्रमशाळेवरील निधी तेवढाच खर्च करण्यात येत आहे. विद्यार्थी संख्या कमी झाली त्या प्रमाणात पैसे खर्च होतील.महानगरपालिकेच्या शाळेत पालक आपल्या पाल्याचा प्रवेश न घेता खाजगी शाळेत प्रवेश घेतात. हा ट्रेंड सर्वत्र आहे. मेळघाट येथे सर्व अनुदानित आदिवासी शाळा आहेत. शासकीय आश्रमशाळांचे इन्फ्रास्ट्रक्चर चांगले आहे, तेथे देण्यात येणाऱ्या सुविधा चांगल्या आहेत. शासकीय आश्रमशाळांसाठी इमारत आहे, तेथे बाथरुम आहेत, सर्व सुविधा आहेत त्या सुविधा खाजगी आश्रमशाळांमध्ये नाहीत. तरी देखील विद्यार्थी संख्येमध्ये घट का होत आहे? अशी विचारणा समितीने केली असता, शासकीय व अनुदानित आश्रमशाळांच्या संदर्भात तुलनात्मक स्टडी थर्ड पार्टी मार्फत करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. शासकीय आश्रमशाळांची संख्या कमी झाली आहे काय ? अशी समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमत दर्शविली व शासकीय आश्रमशाळांची संख्या ५५२ होती ती ५०२ इतकी झाली आहे असे सांगितले.

उक्त बाब विभागाने समितीला आतापर्यंत का सांगितली नाही ? अनुदानित आश्रमशाळांची संख्या देखील तपासली पाहिजे. सदरहू परिच्छेद प्रकरणी केलेली चर्चा पर्याप्त आहे. समितीच्या सन्माननीय सदस्यांची अपेक्षा आहे की, ट्रेंड बदली करण्यासाठी एक जिल्हा, तहसील किंवा आदिवासी विभाग रोल मॉडेलच्या माध्यमातून उपाययोजना करून, पीपीपी तत्त्वावर किंवा ना-नफा ना-तोटा कार्य करणाऱ्या एनजीओ संस्था यांच्यामाध्यमातून प्रायोगिक तत्त्वावर एक प्रकल्प सुरू केला पाहिजे. केवळ लेखा परीक्षणाच्या मुद्यावर चर्चा करून चालणार नाही. उक्त प्रकरणी समितीने शिफारस करण्याचे समितीने सूचित केले.

उक्त प्रकरणी शिक्षणा शिवाय इतर उपक्रम आश्रमशाळेमध्ये चालविण्यात येत नाहीत. काही उपक्रम सुरू करण्यासाठी एनजीओंना आश्रमशाळेशी जोडण्यात यावे. अशा प्रकारची उपाययोजना केली तर शासकीय आश्रमशाळेची पट संख्या अपोआप वाढेल. त्यासाठी एनजीओच्या माध्यमातून काही तरी उपाययोजना केली पाहिजे. शासकीय आश्रमशाळेतील पट संख्या वाढविण्याकरिता एखादा तालुका रोल मॉडेल करून तेथे अभ्यासबाह्य नवीन उपक्रम सुरू करण्याचे प्रयत्न केले पाहिजे. यासंदर्भात समितीने शासनास शिफारस करावी असे समितीने सूचित केले.

लेखा परिच्छेद २.२.२.३—शासकीय आश्रमशाळांच्या अभ्यासक्रमामध्ये अभ्यासबाह्य विषयांचा अभाव—

सन्माननीय सदस्यांनी उपस्थित केलेल्या विषयाशी संबंधित लेखा परिच्छेद २.२.२.३ आहे. शासकीय आश्रमशाळांच्या अभ्यासक्रमामध्ये अभ्यासबाह्य कला, नृत्य, गायन इत्यादी विषयांचा अभाव दिसून आला, असा लेखा परीक्षकांची आक्षेप असे समितीने निदर्शनास आणले असता, नवीन आश्रमशाळा कोड मॅन्युअल तयार करण्यात आले आहे. अभ्यासबाह्य क्रीडा व इतर उपक्रमांसाठी त्यामध्ये विशेष कौशल्य प्राप्त केलेले किंवा स्थानिक स्तरावरील कौशल्य प्राप्त व्यक्तिना कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती देऊन शाळेच्या तासिकेमध्ये त्या उपक्रमाचा अंतर्भाव करून प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या दृष्टकोनातून क्रीडा संदर्भात एक शासन निर्णय निर्गमीत केला आहे. प्रकल्प अधिकारी यांनी त्यांचे स्तरावरून युनिव्हर्सल, नॅशनल, स्टेट स्तरावरील खेळाडू, एक्स आर्मी उपलब्ध असतील तर त्यांना आश्रमशाळेत प्रशिक्षण देण्यासाठी ठेवले आहे. त्याशिवाय सामंजस्य करार करण्यात आला आहे. क्रिकेट अकॅडेमी, नागपूर व इतर स्पोर्ट फेडरेशन सोबत in the coming years we are going to take talent hunt search. विशेष कल असलेल्या मुलांना ४ अकॅडेमीच्या माध्यमातून प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

ज्या मुलांना विशेष कल आहे त्यांना ४ विभागामध्ये ठराविक अकॅडमीमध्ये प्रशिक्षण देण्यात येणार आहे. On the same basis of sport teacher, we are asking our POs to appoint people for music and arts. कारण विभागाला वित्त विभागाकडून काही रेग्युलर टीचर यासाठी सॅक्शन होत नाहीत कारण विभागीय स्तरावर असे नियोजन करण्यात येते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एफ.डी.कडून शिक्षकांची मान्यता मिळत नाही म्हणजे शिक्षकांची भरती करण्यासाठी एफ.डी. मान्यता देत नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, असा काही मुद्दा नाही. पण रिक्रुटमेंटवर सामान्य वेळोवेळी करटेलमेंट असते आणि ते सर्व विभागाला लागू असते असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

राज्य शासनाने एकूण ९.३ टक्के एवढा खर्च केला पाहिजे असे राज्यघटनेनुसार बंधन आहे. मग एफ.डी. करटेलमेंट करून जो पैसा उरवते तो कुठे खर्च केला जातो. हे घटनात्मक तरतुदीला आव्हान आहे. ज्याअर्थी आदिवासी विभागाला ९.३ टक्के पैसे खर्च करण्यासाठी जर वित्त विभाग मनाई करीत असेल तर हे घटनेचे बंधन नाही. ९.३ टक्के खर्च करावा, अशी घटनात्मक तरतूद आहे. तो सेक्शनवाईज कशावर करायचा आहे. हा ट्रायबलचा अधिकार आहे. पदनिर्मिती हा वेगळा प्रश्न आहे. There is plan and non-plan budget. Can they put salary under Plan budget ? आदिवासी विकास विभागाचा ९.३ टक्के खर्च झाला पाहिजे या दृष्टीने विभाग जर काही पदे आवश्यक असतील तर मागणी करू शकतो तुम्ही जेव्हा परमनंट केले की तेव्हा तो काम करणे सोडतो. त्यामुळे कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर चांगले आहे. कर्मचाऱ्याला असे मत समितीने व्यक्त केले.

परिच्छेद क्र. २.२.२.३ आश्रमशाळेच्या अभ्यासक्रमात अभ्यासबाह्य विषयांचा अभाव यासंदर्भात समितीने ट्रायबलचे सेप्रेट आयटीआय आहेत काय? अशी विचारणा समितीने केला असता, Our Department does not run ITIs. We give money to Technical Education Department to run ITIs in tribal areas. We are a funding agency. पण आदिवासी विकास विभागामार्फत आयटीआय चालवता येत नाहीत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

'अभ्यासबाह्य विषयांचा अभाव' म्हणजे जसे आता अमरावती जिल्ह्यात कॉटन हब होत आहे. मग आदिवासींचे मुल कॉटन हबमध्ये नोकरीला लागली पाहिजे. यासाठी विभागाने कौशल्य विभागाचे काही कार्यक्रम आदिवासी विभागामार्फत करण्यात येत आहेत की नाही. संगीत, नृत्य, चित्रकला यासाठी विभाग खर्च करेल आणि उद्योगपतींना ज्या कौशल्याची मुले आवश्यक आहेत ती मिळाली पाहिजे यासाठी विभाग काही आदिवासी आश्रमशाळांमध्ये असे काही कोर्सेस निर्माण करण्यासाठी काही फंडींग करणार आहात काय? राज्याच्या काही भागात विशेषणा अमरावती भागात मोठ्या प्रमाणात एक कॉटन इंडस्ट्री विकसित होत आहे. आयटीआयला निधी देतो त्याचप्रमाणे त्यांना काही कोर्सेस करण्यासाठी सूचवू शकतो काय ? अशी विचारणा समितीने केली असता, स्पेसिफिक कोर्सेसमध्ये बदलाची समितीची सूचना आली तर विभाग तसे करेल. पण कौशल्यवर्धनसाठी विभागाने दोन व्हर्टिकल ठेवलेले आहेत म्हणजे दोन पद्धतीने विभागाचे नियोजन सुरू आहे. एक म्हणजे डिपार्टमेंट ऑफ स्किल डेव्हलपमेंट आहे. टेक्निकल किंवा व्हेकेशनल कोर्सेस जे रन केले जातात त्यांना विभाग फंडींग करतो आणि त्यांना विभागाचा आग्रह आहे की, त्यांनी ट्रायबल युवकांसाठी कोर्सेस डिझाईन करावेत विशेष प्रकल्प विभागाला द्या मग तो मंजूर करण्यात येईल असे आम्ही डिपार्टमेंट ऑफ स्किल डेव्हलपमेंटला वारंवार सांगितलेले आहे. त्याशिवाय ट्रायबल रिसर्च ॲन्ड ट्रेनिंग इन्स्टिटयुट, पुणे ही संस्था आतापर्यंत कौशल्य विकास बघत नव्हती. पण यावर्षी त्यांना पण सूचना दिलेली आहे की, कौशल्य विकासचा काही निधी आणि आदिवासी कौशल्य विकासासाठी विशेष प्रकल्प सुरू करण्यात येत आहे. मॅग्नेटीक महाराष्ट्रमध्ये जे दोन ते तीन उद्योग महत्त्वाचे होते आणि जिथे ट्रायबल युथ एम्प्लाय होऊ शकतात त्यांच्याशी एमओयु करून पुण्याच्या एमआयडीसी एरियामध्ये मागील दोन ते तीन महिन्यात चांगले प्लेसमेंट करण्यात आले आहेत. We are encouraging bamboo based enterprises, value addition of minor forest produce. हम बांबू बोर्ड को पैसा दे रहे है, वन विभाग के साथ काम कर रहे है, हमारी एक टीम है, बैंगलोर की एक संस्था है, उनके साथ हर एरिया में विजिट के लिए गए है. कृषि उत्पादन पर हम किसी तरह से वॅल्यू एडीशन कर सकते है, उधर के एरिया की लाईडलीह्युड किस तरह से बढा सकते है यह सब हम देख रहे है. आमचे बरेच प्रयत्न सुरू आहेत. आपल्याकडून काही विशेष प्रकल्प किंवा सूचना आल्या तर आम्ही त्यासाठी कन्सीडर करू शकतो. आश्रम शाळांमध्ये व्यावसायिक शिक्षण किंवा कौशल्य विकास आपण स्थापन केलेले नाही. कारण त्याचे पॅरलल डुप्लीकेशन होणार आणि ते दुसरा विभाग करते अशी विभागीय सचिवांनी दिली.

परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की, सन २००६-०७ च्या नियमानुसार शाळाबाह्य जे उपक्रम करायला पाहिजे होते ते केले नाहीत. तर ते कधीपासून केलेले आहे, याची माहिती द्यावी. शांतीलाल संघवी फाउंडेशन ही एक शासनाला मदत करणारी संस्था आहे. ८ ते ९ वर्षापूर्वी मी याचे इनिशियट घेतले होते. आता त्यांनी अंबरनाथ येथे ४० हजार स्क्वेअर फुटचे ट्रेनिंग सेंटर सुरू केले आहे. हे सेंटर केवळ आश्रम शाळांच्या शिक्षकांना प्रशिक्षण करण्यासाठी सुरू केलेले आहे. गणित, विज्ञान आणि इंग्रजी अशा तीन विषयांमध्ये तिथे शिक्षकांना प्रशिक्षित करून ते शिकवतात. सीएसआरचा पैसा मोठ्या प्रमाणावर आश्रम शाळांच्या अशा प्रवृत्तींवर शासन खर्च करू शकते. त्यासाठी विभागाचे काही विशेष प्रयत्न

केले आहेत काय? किंवा असे काही करण्याची इच्छा असेल तर समिती त्या संदर्भात विभागास मदत करेल. सीएसआरच्या माध्यमातून केवळ प्रशिक्षण नाही तर अभ्यासक्रमामध्ये अभ्यासबाह्य विषयांचा अभ्यास इनकार्पोरेट करायचा असेल तर अशा कंपन्या विभागाला मदत करतील असे समितीने सूचित केले.

परिच्छेद क्रमांक २.२.२.४—अनेक आश्रमशाळांमध्ये रिक्त पदे—

आदिवासी विकास विभागांतर्गत असलेल्या आश्रमशाळांमधील असलेली अनेक पदे बऱ्याच वर्षापासून रिक्त आहेत, यावर काय उपाययोजना केलेली आहे? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडे जी माहिती आहे, त्यानुसार ५४७९ अशी मंजूर पदे होती. ७०९१ याच्यापैकी आता समायोजन केल्यानंतर आणि जी काही मागील भरती झाली आपले ५४७९ पदे भरलेली आहेत. म्हणजे विभागाच्या रिक्त पदानुसार आपली जी पदे भरलेली आहेत, ती ७५ टक्के आहेत.आता विभागाची केवळ २५ टक्केच पदे रिक्त आहेत, ही देखील पदे रिक्त आहेत, ती शैक्षणिक मुलांचे नुकसान होऊ नये म्हणून जेवढे काही शिक्षकांची रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. एकतर ७५ टक्के ही पदे भरलेली आहेत. जी पदे रिक्त आहेत, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शो कॉज बेसिसवर शिक्षक नेमण्यात येतात. शाळेत कुठलाच भाग शिक्षकांच्या अभावी रिक्त राहतो, अशी वस्तूस्थिती नाही. अमरावती अतिरिक्त आदिवासी आयुक्तालयांतर्गत जवळपास विभागाचे पेसा क्षेत्रातील ४९ पदांची निवड प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यांची नियुक्ती १५ दिवसांमध्ये होईल. जी ४७ पदे पदोन्नतीसाठी रिक्त होती, त्यांचीही विभागीय पदोन्नती समितीची बैठक झालेली आहे. एक महिन्याच्या आत त्यांचे नियुक्ती आदेशही होतील. केवळ ठाणे येथे पेसा क्षेत्राकरिता हायकोर्टची स्थगिती आहे. नॉन पेसाकरिता आमची जाहिरात आचार संहितेनंतर निघणार आहे. नागपूरमध्ये एक विषय असा उपस्थित झाला होता की, काही कॅण्डिडेट्स आहेत, त्यांना ग्रेडेशन आहे. नागपूर विद्यापीठाला आम्ही ग्रेडेशनचे इक्विव्हॅलंट गुण किती आहेत, कारण मेरिटकरिता टक्केवारी बघावी लागते. त्याकरिता एटीसी सातत्याने पाठपुरावा करते. ती ग्रेडेशनची स्पष्टता आली की, ते पद भरता येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ठाण्याची जी माहिती दिली. त्याबाबतचे प्रकरण कोर्टात गेले होते, असे समितीने निदर्शनास आणले असता, राज्यपाल महोदयांनी एक आदेश काढला होता की, स्थानिक आदिवासी क्षेत्र, अनुसूचित जमाती क्षेत्र टीएसपीचे त्याच्यामध्ये काही भाग आहेत, तेथे ग्राऊंड लेव्हलचे फंक्शनरीज आहेत. त्यांना स्थानिकच नागरिकांची नोकरीत नियुक्ती करावीअशी सूचना जाहीर केली होती. त्यामध्ये जे आदिवासी नाहीत त्यांची संघटना आहे. त्यांनी हायकोर्टमध्ये जनहित याचिका दाखल केली होती. कोर्टाचा निकाल होईपर्यंत पदभरती करू नये अशी याबाबत स्थगिती आली होती. स्थगिती उठविण्याकरिता २३ जुलै ही तारीख मिळालेली आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कोर्टाने बंदी केलेली आहे परंतु ती पद भरती करावी. हे कोर्टाच्या निदर्शनास आणले पाहिजे. दोन दोन वर्षे जर शिक्षकांची भरती झाली नाही तर विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ शकते यासंदर्भात समायोजनाने शिक्षक भरले,असे समितीने निदर्शनास आणले असता, याकरिता कोर्टाने आता २३ जुलै ही पुढची तारीख दिलेली आहे. तेथे जी रिक्त जागा आहे, ती विभागाने क्लॉक अवर बेसिसवर शिक्षक भरले आहेत. लो एनरोलमेंटमुळे काही वर्ग बंद केलेले आहेत. जेथे पहिली ते चौथी अशी लहान मुले असतात. तेथे शिक्षक हजर झालेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखापाल यांच्या आक्षेपामध्ये सांगितले गेलेले आहे की, विज्ञान आणि गणित विषयाचे शिक्षक उपलब्ध नाहीत आणि इतर विषयाचे शिक्षक हे विषय शिकवितात. या शिक्षकांची जास्त कमतरता आहे, असे मत समितीने व्यक्त करता, २७ पैकी १२ आश्रम शाळांमध्ये, २७ पैकी १० आश्रमशाळांमध्ये इंग्रजी, मराठी व हिंदी शिकविणारे शिक्षक गणित विज्ञान आणि समाजविज्ञान हे विषय शिकवित होते, असे विभागीय प्रतिनिधीने सांगितले.

उत्तरातील कारवाईमध्ये प्रत्येक एटीसीनिहाय विषयवार शिक्षकांची संख्या दिलेली आहे.विज्ञानआणि गणिताचे शिक्षक भरतीबाबत प्रयत्न करण्यात येतात, जाहिराती काढण्यात येतात त्यावेळी ते कमी संख्येत मिळतात परंतु विभाग शिक्षकांची संख्या कमी असली तरी इतर विषयांच्या शिक्षकांना शिकवायला लावत नाही. क्लॉक-आर्स बेसिसपर टीचर्स लगाते है, वह सब्जेक्ट स्पेशालिस्टही लगाते है, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

अगर ऐसा है, तो महालेखापाल महोदयने ऑब्जेक्शन क्यों निकाला! त्यांचे म्हणणे असे आहे की, सायन्स आणि गणित शिकविणारे शिक्षक ते विषय शिकवित नाहीत. इतर विषयांचे शिक्षक गणित आणि विज्ञान शिकवितात. निकालाची टक्केवारी शाळांमध्ये किती आहे ? गणित आणि विज्ञानाचे हे विशिष्ट आक्षेप आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, विज्ञानाचे शिक्षक म्हटले की, प्रत्येक वेळी जाहिराती आणि इंटरव्ह्यू होतात, ज्यावेळी विषयाप्रमाणेच भरती केली जाते. विषयाप्रमाणे आवश्यकतेप्रमाणे जाहिराती काढण्यात येतात. एका विषयाच्या ऐवजी दुसऱ्या विषयाच्या शिक्षकांनातो विषय शिकविण्यास सांगू शकत नाहीत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शाळांमध्ये गणित आणि विज्ञानाकरिता शिक्षक नाहीत. समिती सदस्य सामाजिक क्षेत्रात काम करतात. २५० मुले आल्यानंतर २८ शिक्षकच मिळाल्यानतर याकरिता विभागाकडे काय उपाय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, अशी परिस्थिती शासकीय शाळांमध्ये नाही. शालेय शिक्षण विभागाचे पवित्र नावाचे पोर्टल आहे, त्याचा वापर करून तेथे जास्त जाहिराती देऊन याकरिता विभाग प्रयत्न करतो. इंग्रजी माध्यमाचे शिक्षक उपलब्ध होत नाहीत.पण तो विषय या परिच्छेदात नाही. एकलव्य शासकीय सीबीएसई स्कूलबाबतचा हा विषय आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने दिलेल्या तक्त्यावरून असे निदर्शनास येते की, मागील पाच वर्षापासून २७ पैकी १२ आश्रमशाळांमध्ये व २७ पैकी १० आश्रमशाळांमध्ये २७ पैकी १७ आश्रमशाळांमध्ये हिंदी,गणित,विज्ञान व सामाजिक विज्ञानाकरिता शिक्षक उपलब्ध नाहीत. हिंदी विषय शिकविणारे शिक्षक इंग्रजी, गणित, विज्ञान शिकवितात. मागील पाच-दहा वर्षांपासून गणित व विज्ञान विषयाचे शिक्षकच नाहीत. याचा अभ्यास केलेला आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, त्या २७ शाळांची माहिती आता उपलब्ध नाही. राज्य, प्रादेशिकची माहिती आहे.यानंतर याबाबतची माहिती समितीपुढे सादर करण्यात येईल. विशिष्ट शाळेचे नाव दिलेले आहे, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जो मुद्दा महालेखापाल यांनी उपस्थित केलेला आहे, त्यात ज्या आश्रमशाळांना त्यांनी भेटी दिलेल्या आहेत, त्यात त्यांनी सांगितले की, या विषयासाठी पाच-दहा वर्षांपासून शिक्षक नाहीत. हिंदी व मराठी शिकविणारे शिक्षक गणित व विज्ञान शिकवितात. हे खरे आहे का, असल्यास या शाळांबाबतचीहीअडचण दूर झालेली आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, हे जे शिक्षक आहेत, ते प्रकल्पस्तरावर भरले जात नसून एटीसी स्तरावर भरले जातात, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

हा समितीचा विषय नाही. शासन म्हणून विभागाने उत्तर द्यायला पाहिजे. महालेखापाल यांनी हा आक्षेप नमूद केलेला आहे, याची माहिती विभागाने तयार करून आणणे अपेक्षित होते, असे समितीने मत व्यक्त केले असता, विभाग एकंदरीत समितीला माहिती देत होता. विशिष्ट विभागाकडे माहिती नाही. एकंदरीत शाळांमध्ये केवळ सध्या केवळ २५ टक्के रिक्त जागा आहेत. ती माहिती केडरवाईज सांगणे शक्य आहे, रिक्त जागांची कारणेही सांगणे शक्य आहे, असे विभागीय सचिवांची अवगत केले.

विभागाकडे किती शिक्षकांची पदे रिक्त आहेत, याची माहिती विषयनिहाय दिलेली नाही. राज्याच्या या २७ आश्रमशाळांमध्ये गणित व विज्ञान शिकविणारे शिक्षक दहा वर्षे नसतील तर त्यांची स्थिती काय असेल, याचा विचारच केलेला बरा. ज्यावेळी महालेखापाल आक्षेप काढतात, त्यावेळी जो परिच्छेद असतो, त्याला ततोतंत उत्तर आले तर प्रश्न निर्माण होत नाहीत. विभागाने आजची परिस्थिती सांगितली, ती मान्य आहे. महालेखापाल यांनी आक्षेप काढलेले आहेत, ते शाळांच्या, जिल्ह्यांच्या नावासह, शिक्षक कोणत्या विषयाला किती वर्षापासून कोणत्या शाळेवर नाहीत. इतकी सविस्तर माहिती त्यांनी दिलेली आहे. त्याकरिता विभागाकडे काही उत्तर वा माहिती आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडे त्या २७ शाळांची माहिती नाही. उत्तरामध्ये विषयनिहाय किती रिक्त जागा कोणत्या एटीसीकडे आहेत, ती माहिती दिलेली आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

समितीला आता परिच्छेदवरील चर्चा संपवायची आहे. या शाळांमध्येही पदे रिक्त आहेत, अशा प्रकारचा परिच्छेद आहे. या आक्षेपाचे निराकरण झाले असेल तर विषय संपवून टाकता येईल. आज तरी या शाळांचा अडचणीवर मार्ग निघाला आहे का? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडून विषय घड्याळी तालिका तत्त्वावर (Clock hour busts) शिक्षकांची नेमणूक करण्यात येते. सगळया ठिकाणी त्यांची नेमणूक केलेली आहे. भरतीची परिस्थती सांगितलेली आहे. अमरावती एटीसी येथील भरती पूर्ण झालेली आहे. ठाणे येथे हायकोर्टची स्थगिती आहे. नागपूरमध्ये अर्धी भरती झालेली आहे. शिल्लक राहिलेली भरती विद्यापीठाने मान्यता दिल्यावर ती पूर्ण करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मराठी हिंदी शिकविणारे शिक्षक गणित व विज्ञान शिकवित आहेत. स्टॉपगॅपमधील भरतीमध्ये गणित व विज्ञान शिकविणारे टिचर्स भरले पाहिजेत, असे समितीने सूचित केले असता, शाळानिहाय, विषयनिहाय सविस्तर माहिती संकलित करून समितीसमोर सादर केली जाईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

स्टॉप गॅप अंतर्गत शिक्षकांची भरती करीत असताना ज्या विषयांच्या शिक्षकांची कमतरता आहे, त्याच विषयांची शिक्षक भरती करण्यात यावी. अशा सूचना विभागाकडून विभागीय स्तरावर देण्यात यावी. विभागाच्या सोयीच्या शिक्षकांची सेवा सुरू ठेवली जाते. ज्या विषयाच्या शिक्षकांची गरज आहे, ती पुरविली जात नाही, असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

विभागाने चंद्रपूर येथे विशेष शौर्य योजना राबविली होती. त्या अंतर्गत पाच विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळालेली आहेत.याबाबत समितीने विभागाचे अभिनंदन केले व या रिक्त जागांमुळे निकालाच्या टक्केवारीवर काय परिणाम झालेला आहे? अशी विचारणा केली तसेच अहवालामध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्यामुळे निकालाच्या टक्केवारीवर जर परिणाम झाला तर याचा उल्लेख करता येईल. याची सविस्तर माहिती समितीला

सादर केली तर बरे होईल, असे समितीने सूचित केले असता, याचे को-रिलेशन बसते का, याची माहिती तपासून सांगण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक २.२.२.५—आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या संगणक प्रशिक्षण योजनेचे त्रुटीपूर्ण संकल्पन—

पुरवठादारासोबत झालेल्या अटी व शर्तीनुसार मापदंडाप्रमाणे कारवाई झालेली नाही, असे महालेखापाल यांचे आक्षेप आहेत. संगणकांचा पुरवठा झाल्याशिवाय प्रती विद्यार्थी साठ रुपये याप्रमाणे अदायगी देखील करण्यात आलेली आहे, या बाबी समितीने निदर्शनास आणल्या असता, प्रकल्प कार्यालय, डहाणू येथून विद्यार्थ्यांच्या उपस्थिती पटाप्रमाणे पैसे देण्यात आलेले आहेत, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पहिला मुद्दा असा होता की, संगणकाचा पुरवठा झाल्याशिवाय ६० रुपये प्रती विद्यार्थी याप्रमाणे अदायगी करण्यात आली.प्रशिक्षक कालावधीत संगणक वर्गांच्या तासांची संख्या, प्रशिक्षण देण्यात येणा-या विद्यार्थ्यांची संख्या, प्रशिक्षणाचा कालावधी याचे कोणतेही वेळापत्रक आखले नव्हते. याचे काही नियोजन केलेले नव्हते. महालेखापाल यांचे आक्षेप आहेत की, असे कोणतेही वेळापत्रक बनविलेले नव्हते, असे मत समितीने व्यक्त केले असता, यह जो डहाणूका विषय है, इसमे यह लिखा हुआ है की, एक हप्ते में पाचवी-दहावी केलिए प्रती आठवडा १२ तास वेळापत्रक होता. त्याचप्रमाणे प्रशिक्षण दिले होते. विद्यार्थींची संख्या उपस्थितीप्रमाणे अदायगी देण्यात आली. सन २०१०-११-२०१४-२०१५ पर्यंत ३०६६६ वेळापत्रकानुसार दुपारी ३ ते ५ मध्ये त्यांचे प्रशिक्षण वर्ग घेण्यात आलेले आहेत. ज्या अटी व शर्ती होत्या त्याच्यामध्ये शासननिर्णयाप्रमाणे दहा संगणकांचा पुरवठा केला होता. त्याचे प्रदान त्याचप्रमाणे करण्यात आलेले आहे. चंद्रपूरमध्ये या संदर्भात अडचण निर्माण झाली होती, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विद्यार्थ्यांची जेवढी संख्या वर्गात पटावर आहे, १०० विद्यार्थी असतील तर १००×६० करून पैसे देण्यात आलेले आहेत. उपस्थितीनुसार पैसे देण्यात आलेले नाहीत, असे महालेखापाल यांचे आक्षेप आहेत. शंभर टक्के विद्यार्थी प्रत्येक वेळी उपस्थित होते का ? अशी विचारणा समितीने केली असता, पाच वर्षांचा जो आराखडा दिलेला आहे, त्याप्रमाणे लक्षांकप्रमाणे ट्रेनिंग दिले गेलेले होते, सन २०१०-२०११ मध्ये ८००० लक्षांकाप्रमाणे ६०७७ विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण होते. ९०२० चा लक्षांक २०१२ मध्ये होता. सन २०१२-२०१३ मध्ये ७३७२ चा लक्षांक पूर्ण झाला होता. सन २०१३-२०१४ मध्ये ६५२० विद्यार्थ्यांचा लक्षांक पूर्ण झाला होता, असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

त्या शाळांमध्ये जितके विद्यार्थी होते, त्या विद्यार्थी गुणिले याप्रमाणे प्रदान केले. विद्यार्थी आणि हजेरी पटानुसार पेमेंट करण्यात आलेले नाही. असे महालेखापाल यांचे स्पष्ट आक्षेप आहे. यावर सविस्तर उत्तर द्यावे. याप्रमाणे वस्तूस्थिती मांडण्यात यावी. यामध्ये वेळापत्रक दाखविलेले नाही, त्याच्यापुरते उत्तर द्यावे, असे समितीने सूचित केले असात, एक क्लासको हप्ते में दो घंटे के लिए दोपहर में ३ ते ५ चे वेळापत्रक हे योजनेच्या डिझाईन्सबाबत त्यांनी काही निरीक्षणे दिलेली आहेत. विभागाचे जे डहाणूचे प्रकल्प कार्यालय आहे, त्यामध्ये टाईम टेबल होते, त्याप्रमाणे त्यांनी प्रदान केलेले आहे. प्रशिक्षण दिलेल्या वर्गापुरते हे प्रदान मर्यादित आहे. " Attendance as per training given for computers and not for the whole class " असे त्यांचे अहवालावरून दिसत आहे Rs. ६० / student, trainer has given his computer and Rs. ५०/child if the computer is of the school. हा तेव्हाचा शासन निर्णय होता, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महालेखापाल यांनी यावर स्पष्टीकरण द्यावे असे समितीने सूचित केले. दहा संगणक पुरवठादाराने दिलेले नव्हते. महालेखापाल यांचे याच्या पलीकडे आक्षेप आहे की, संगणक पुरवठा न करताना साठ रुपये प्रती विद्यार्थी याप्रमाणे प्रदान काढलेले आहे. त्याच्यानंतर जर शाळेमध्ये एका कॉलेजची क्षमता ५००० विद्यार्थ्यांची असेल तर गुणिले साठ रुपये याप्रमाणे प्रदान केले. यामध्ये उपस्थिती विचारात घेतली गेली नाही. याचे कारण काय आहे. विद्यार्थीही नव्हते, तेवढे प्रशिक्षण दिले गेलेले नाही. संगणक न देताही प्रशिक्षणाबाबत लाभार्थी कंपनीला पैसे दिले का, संगणक किती तारखेला आले, याचा काही रेकॉर्ड आहे का? समितीसमोर साक्षीला येताना विभागीय प्रतिनिधींना तयारी करून यायला पाहिजे. समितीचा वेळ वाया घालवित आहात, असे मत समितीने व्यक्त केले असता, थोडा वेळ दिला तर याबाबतची माहिती देण्यात येईल, असे विभागीय प्रतिनिधीनी सांगितले.

महालेखापाल यांचे चार मुद्दे आहेत. विभागीय प्रतिनिधी या मुद्द्यांवरील उत्तराची तयारी करून आले तर वेळ वाया जाणार नाही. विभागाचा व समितीचा यामध्ये वेळ जात आहे. महालेखापाल यांचा आक्षेप स्पष्ट आहे. संगणकाचा पुरवठा होण्याअगोदर विभागाने साठ रुपयांचे प्रदान केले, असे महालेखापाल यांचे स्पष्ट आक्षेप आहेत. संगणकांचा पुरवठा किती तारखांना झाला होता, साठ रुपयांचे प्रदान किती तारखांपासून सुरू झाले होते ? अशी विचारणा समितीने केली तसेच महालेखापाल यांच्या आक्षेपानंतर विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्यात आलेले आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, प्रकल्प अधिकारी डहाणूच्या अहवालानुसार सदर संस्थांनी म्हणजे एमटी एडयूकेअर, मुलुंड, शांतीलाल सांघवी फाऊंडेशन ही संस्था मुंबईची आहे. नियमानुसार संस्थेने दहा संगणक इयत्ता पाचवी बारावी विद्यार्थ्यांना अभ्यास क्रमावर आधारित प्रशिक्षण दिले होते. त्यानुसार संस्थेकडून २६ प्राथमिक आदिवासी आश्रम शाळांमध्ये प्रशिक्षण देण्यात आले होते, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

संगणक विहित वेळेत पुरविण्यात ६० रुपये प्रती विद्यार्थी याप्रमाणे संगणक पुरवठादाराला त्या प्रकल्प अधिकारी यांनी संगणक घेण्यास मान्यता दिली होती त्यानुसार ६० रुपयेप्रमाणे पैसे द्यायचे होते, अन्यथा त्याला ५० रुपये प्रती विद्यार्थी याप्रमाणे पैसे द्यायचे होते. विभागाने पुरवठादाराला ६० रुपये प्रती विद्यार्थी याप्रमाणे पैसे दिलेले आहेत. ज्या दिवशी ६० रुपयाप्रमाणे प्रदान काढलेले होते, त्या दिवसापर्यंत त्यांच्याकडे संगणक आलेले नव्हते. महालेखापाल यांचे दुसरे आक्षेप आहे की, किती विद्यार्थ्यांना प्रशिक्षित करून प्रमाणपत्र दिले, किती विद्यार्थ्यांचे प्रदान काढलेले आहे ? विभाग यावर ढोबळ उत्तर देत आहे. महालेखापाल यांचे आक्षेप योग्य आहे. त्याचे उत्तरही योग्य प्रकारे देण्यात यावे, असे समितीने सूचित केले असता, प्राथमिक आश्रमशाळांमध्ये इयत्ता पाचवी-सातवी या इयत्तांमध्ये विद्यार्थी संख्या कमी असल्यामुळे त्या शाळांवर सदर संस्थेने प्राथमिक, माध्यमिक शाळा प्रती शाळा दहा संगणक याप्रमाणे पुरवठा केला होता. असा प्रकल्प अधिकारी, डहाणू यांचा अहवाल आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आदिवासी विभागाच्या अधिकाऱ्यांनी हा रिपोर्ट दिलेला आहे. महालेखापाल यांनी विशिष्ट तारीख काढलेली आहे. त्यानुसार २.२.१८ रोजी विभागाकडे संगणक उपलब्ध नव्हते. २.२.१८ पूर्वी विभागाचे प्रदान काढलेले आहे.असे निश्चित आक्षेप आहेत. संगणक आले नव्हते तर देयक कसे मंजूर केले? पीडी म्हणतात की, विभागाकडे संगणक उपलब्ध झाले नव्हते. या संदर्भात आदिवासी विभागाचे पत्र आहे. असे मत समितीने व्यक्त केले असता, यांची नोंद घेण्यात आहे. विभागाकडील परिच्छेदामध्ये या संदर्भातील निश्चित तारीख नाही. विभागाकडे असलेल्या अहवालामध्ये संस्थांनी पुरवठा केलेला आहे. पाच वर्षांमध्ये किती विद्यार्थ्यांनी प्रशिक्षण घेतलेले आहे, त्यांना प्रदान केले का, याबाबत अभिलेखे आहेत. विभागाकडे जे आक्षेप आलेले आहेत, त्याप्रमाणे मुद्देनिहाय उत्तर तयार केलेले आहे, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

संगणकाचा पुरवठा, कोणत्या तारखेला प्रदान केले, हे महालेखापाल यांनी नमूद करण्याची गरज नाही. ही विभागाचे अंतर्गत बाब आहे. या बाबतच्या सर्व गोष्टी निदर्शनास आल्या पाहिजेत. विभागाच्या कनिष्ठ अधिका-यांची ही जबाबदारी आहे.समितीकडे साक्षीसाठी येत असताना महालेखापाल यांनी विभागाला सविस्तर माहिती देणे, हे अपेक्षित नसते. महालेखापाल यांचे आक्षेप खोडण्याकरिता उत्तराची तयारी करणे विभागाकडून अपेक्षित आहे, असे समितीने निदर्शनास आणले असता, I am very sorry to say, but I would like to clarify the observations of Accountant General on this para received by as is. At that time, we have accepted the flaws in this scheme and reviewd it. त्या अनुषंगाने हे निरीक्षण असे होते की, विभागाने त्याचा पुनर्विचार करावा. ही योजना बंद केलेली आहे. विभाग प्रस्तावित करीत आहे की, आता विभागाच्या स्तरावरच संगणक लॅब तयार करण्यात येत आहे. विभागाने सेंट्रल असिस्टन्स मार्फत प्रत्येक शाळेकरिता निधीची मागणी केलेली आहे. कंत्राटी तत्त्वावर शिक्षकांची नियुक्ती करून ते काय करणार आहेत? It is only what department can do. The Accountant General observations on this para towards department is that, the department should review the flaws of the past scheme and should consider change in the programme, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यामध्ये २.२.५ हा महालेखापाल यांचा पूर्ण परिच्छेद पाहिला तर महालेखापाल यांनी एकंदर पाच आक्षेप काढलेले आहेत, असे दिसून येते. या पाच आक्षेपांचा खुलासा विभागाकडून अपेक्षित आहे, महालेखापाल यांचे आक्षेप हे अंतिम आक्षेप आहेत. ज्यावेळी हा आक्षेप महालेखाकार काढतात, त्यावेळी नोट चुकीची दुरूस्ती प्रस्ताव किंवा सविस्तर खुलासा विभागाकडून मागविला जातो, हा खुलासा समाधानकारक आलेतरच तो परिच्छेद वगळण्यात येतो. अन्यथा तो अंतिम होतो. आक्षेपांपूर्वी महालेखापाल यांनी सविस्तर खुलासा मागितला होता, त्याचे उत्तर विभागाकडून आलेले नाही म्हणून हे आक्षेप अंतिम झाले. त्याचा पत्रव्यवहार विभागाकडे उपलब्ध असणार. ही सविस्तर माहिती विभागाकडे उपलब्ध नाही, असे जे समितीसमोर जे चित्र निर्माण होत आहे, ते थोडेसे विभागाने तपासून घ्यावे, असे समितीने सूचित केले.

विभागाची बाजू अशी आहे की, मुद्दा क्रमांक ०२ पुरवठादारामार्फत दहा संगणकांचा पुरवठा करण्यात आलेला नसतानाही साठ रुपये अदायगी करण्यात आली. सेवा-पुरवठाधारकाने दहा संगणक पुरविले नव्हते. महालेखापाल यांचा मुद्दा हा दोन विशिष्ट संस्थांबाबत आहेत. दोन विशिष्ट संस्थांचा उल्लेख नसल्यामुळे सर्वसाधारण उत्तर देता येईल की, महालेखापाल यांनी जे पत्र दाखविलेले आहे की, त्यावर त्यांनी सात दिवसांमध्ये खुलासा द्यावा, असे मत वित्त सचिवांनी मांडले.

ज्यावेळी महालेखापाल तपशीलवार मुद्दे काढतात. ज्यावेळी एखादा आक्षेप नोंदवितात, त्याचे निरीक्षण त्यांच्याकडे सविस्तर उपलब्ध असतात. यासंदर्भात तारीखनिहाय तपासून समितीला माहिती कळविण्यात यावी. त्या तारखेला संगणकांचा पुरवठा झाला होता का ? त्या दोन विशिष्ट संस्थांबाबत त्या मुदतीत उत्तर द्यावे. यामध्ये असा मुद्दा होता की, मुलांना प्रशिक्षण दिले असे सांगण्यात आलेले आहे. तेथे वस्तूस्थिती अशी होती की, तेथे विद्यार्थ्यांना स्क्रीन, कीबोर्ड, मॉनिटर, सीपीयू कशाला म्हणतात हे देखील त्यांना माहिती नव्हते मग त्यांना कोणते प्रशिक्षण दिले गेले होते ? हे उत्तर डहाणूच्या सतरा आश्रमशाळांमधील प्रशिक्षणबाबतची माहिती आहे. प्रशिक्षणाच्या तेथे नस्तीही नव्हत्या. त्यानंतर प्रशिक्षणाचा आढावा घेण्यात आला नव्हता की, विद्यार्थ्यांना संगणकाचे ज्ञान मिळालेले आहे की नाही. केवळ नावाकरिता हे प्रशिक्षण झालेले आहे. हे

डहाणूबाबतचे आक्षेप आहेत. आदिवासी विकास विभागीय सचिवांनी या योजनेचा आढावा घेण्याबाबत मान्य केले होते, असे समितीने निदर्शनास आणले असता, ही योजना आता बंद करण्यात आलेली आहे. सन २०१०-२०११ मध्ये ट्रेनिंगचा स्तर वाईट असेल हे जरी मान्य केले तरी तत्कालिन विद्यार्थ्यांना कोणतेही उत्तर देता आले नाही. प्रशिक्षणाला त्यावेळी दर्जा नव्हता. हे जे डिझाईन आहे, त्यामध्ये लहान मुलांना केवळ दोन तासांचा क्लास असेल तरीही त्यांची तोंडओळख झाली का याबाबत शंकाच आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समाजकल्याण, आदिवासी कल्याण हे जे काही विभाग शासन चालविते, ते त्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा विकास करण्याकरिता चालविते. यासंदर्भात विभागाच्या नस्तीमध्ये कागद पत्रे सापडतील की, एखादी कंपनी प्रस्ताव देते, त्या प्रस्तावावरच ती फाईल तयार होते. यापूर्वी असे झालेले आहे.

प्रशिक्षण नऊ महिन्याचे होते, त्यांना नऊ महिन्यांचे पैसे दिले गेलेले आहेत का ? नऊ महिन्यांचे प्रशिक्षण न देता पैसे मात्र पूर्ण नऊ महिन्यांचे घेतले गेलेले आहेत, अशी बाब झालेली आहे काय अशी विचारणा समितीने केली असता, सध्या असे होत नाही. या बाबत सविस्तर तपासणी करून माहिती समितीला कळविण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सामाजिक न्याय विभागासंदर्भात यापूर्वी हा विषय चर्चेला आला होता, त्याबाबत तक्रार, एफआयआर दाखल झालेल्या आहेत. ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, एफआयआर डहाणूबाबत आहे का ? आदिवासी विकास विभागाकडे जी अनियमितता आढळली ती चंद्रपूरच्या योजनेमध्ये आढळून आली होती. त्याचे आम्ही ६,३८,६९० रुपये राखून ठेवलेली आहे. त्यांना ती रक्कम अदा केलेली नाही. त्यानंतर त्या संदर्भात पी ओ स्तरावर समिती गठित केलेली आहे. त्यामध्ये ज्यांनी अटी पूर्ण केलेल्या नाहीत, त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात येणार आहे. तो कोणत्याही स्तरावरील मुख्याध्यापक असला तरी, त्याचे प्रदान जरी हेडमास्तर करीत असतील समितीकरिता त्या परिच्छेदाबाबत माहिती सादर करणे आवश्यक आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक २.२.२.६—गणवेशाचे प्रापण आणि वाटप पद्धतीतील विसंगती—

या परिच्छेदामध्ये एजी यांचे ऑब्जेक्शन अतिशय स्पेसिफिक आहे. सन २०१०-२०१५ दरम्यान निवडलेल्या ५२ पैकी केवळ एका आश्रमशाळेच्या विद्यार्थ्यांना वेळेवर गणवेष पुरविण्यात आले. ही अत्यंत गंभीर बाब आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, मागील वर्षी विद्यार्थ्यांना गणवेष लवकर मिळाला होता. आता शासनाने वैयक्तिक लाभाच्या योजनांचे प्रदान डीबीटी द्वारा करण्याचा निर्णय घेतलेला आहे.त्यामुळे आता गणवेष पोहोचण्याचा प्रश्नच राहिलेला नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

केवळ ५२ पैकी एका शाळेला वेळेवर गणवेष देण्यात आले. इतर शाळांना गणवेष देण्याकरिता एक ते दहा महिन्यांचा विलंब झाला, असे आक्षेप महालेखापाल यांचे आहे, याकरिता कोण जबाबदार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१०-२०११ महाराष्ट्र राज्य हातमाग महासंघ यांच्याकडे त्याबाबतचा पुरवठा आदेश देण्यात आला होता. मार्चमध्ये पुरवठा आदेश देण्यात आला होता, त्यावेळी निविदा पद्धत नव्हती. जुलैमध्ये कापड पुरवठा केला, त्यावेळी जी कामकाजाची पद्धत होती. त्यानुसार कपडा हातमाग महासंघ यांच्याकडून घेतला जात होते. प्रकल्प अधिकारीस्तरावर या गणवेषांचे शिवणकाम करण्यात येत होते.तीन महिने हातमाग महामंडळाने लावलेले आहेत, त्यामुळे तो उशिर झालेला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जर एका वर्षी हातमाग महामंडळ तीन महिने कापड सप्लाय करीत नाही. एका वर्षी ही चूक होऊ शकते. वेळेवर गणवेष पोहोचणे आवश्यक आहे, हा विभागाचा हेतू असणे आवश्यक आहे. गणवेश पुरवठा करण्याचा कालावधी संपल्यानंतर सहा महिन्यानंतर जर गणवेश मिळत असतील तर शासनाच्या पैशांचा अपव्यय होत आहे, असे म्हणता येईल. कोणकोणत्या वर्षी कोणकोणत्या महिन्यात गणवेष मिळाला हेही मी या यादीवरून समजणे शक्य आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, सन २०१२-२०१३ मध्ये ऑक्टोबरमध्ये विद्यार्थ्यांना गणवेष मिळाले. याचे कारण पॉलिसी रेडीमेड ड्रेस देण्यास सुरुवात झालेली आहे. जगदंब महिला रेडीमेड ड्रेसेस सहकारी संस्था यांच्याकडे पुरवठा आदेश दिले होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

माहे जून मध्ये शाळा सुरू झाल्यानंतर ५ महिने विलंबाने म्हणजेच माहे ऑक्टोबरमध्ये गणवेष पुरवठा करण्यात आला. विभागाने धोरण बदलताना शैक्षणिक वर्षाची सुरुवात लक्षात घेऊन त्यापूर्वी धोरणामध्ये बदल करणे आवश्यक होते. नवीन धोरण तयार करण्यात येत नसल्याने विद्यार्थ्यांना एक वर्षाचे पैसे व ६ महिन्यांनी गणवेश पुरवठा करणे योग्य नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय सचिवांनी यास सहमती दर्शविली व ऊर्जा विभागाचे आदेश आहेत की, पब्लिक सेक्टरसाठी हातमाग मंडळाकडून वस्तू घेण्यात याव्यात. त्यानंतर पुढील वर्षामध्ये डीबीटी धोरण अवलंबिण्यात आले. त्यापुढील सन २०१४-१५ मध्ये गणवेषाच्या डिझाईन बदलण्यात आले. सन २०१५-१६ मध्ये विलंब झाला कारण क्लॉथ लॅब टेस्टिंगसाठी तीन वेळा निविदा काढण्यात आली व तीनही वेळा क्वालिटी ऑफ क्लॉथ लॅबमध्ये फेल झाली. प्रत्येक वर्षामधील वेगवेगळी कारणे आहेत. आता विभागाकडून डीबीटी धोरणाचा अवलंब करण्यात येत आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

महाराष्ट्र यंत्रमागचे सॅम्पल लॅब टेस्टमध्ये फेल झाले होते का ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१५-१६ मध्ये तीन वेळा निविदा काढण्यात आली होती त्यावेळी सॅम्पल फेल झाले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सन २०१० ते सन २०१५ मधील बाबी संदर्भात विचारणा करण्यात आली आहे. रेडिमेड गणवेष खरेदी करण्याचा निर्णय शासनाने किती तारखेला घेतला ? अशी समितीने विचारणा केली असता, विभागाकडून सन २०१२-१३ मध्ये जगदंबा महिला रेडिमेड ड्रेसेस यांना कार्यारंभ आदेश दिनांक २१ मे रोजी देण्यात आला होता व त्यांनी माहे ऑक्टोबरमध्ये गणवेश पुरवठा केला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

दिनांक २१ मे रोजी कोणत्या अटीवर आदेश देण्यात आला होता, कोणत्या महिन्यामध्ये पुरवठा केला पाहिजे होता, त्याच्या अटी व शर्ती कोणत्या होत्या, किती दिवसामध्ये पुरवठा करावयाचा होता ? दिनांक २१ मे रोजी आदेश दिल्यानंतर ६ महिन्यांनी पुरवठा करण्यास सांगण्यात येणार नाही. विभागाने अशा पद्धतीचा आदेश दिला असेल तर हि बाब योग्य नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, सदरहू आदेश पाहून समितीस माहिती करण्यात येईल. परंतु साधारणतः ९० दिवसांमध्ये पुरवठा करण्यात आलेला नसल्याने, पुरवठादारावर कारवाई करण्यात आली का, त्यांना दंड आकारण्यात आला का, त्याची वसुली करण्यात आली का, त्यांना काळ्या यादीमध्ये समाविष्ट केले का ? अशी विचारणा समितीने केली असता, शाळा सुरू झाल्यानंतर गणवेष पुरवठा करण्यासाठी पुरवठादाराला आदेश दिल्यानंतर तो तीन महिन्यांनी पुरवठा करेल. माहे मे मध्ये दिलेल्या पुरवठा आदेशामध्ये ९० दिवसांचा कालावधी कसा असेल ? समितीला उक्त प्रकरणी विभागाने घेतलेला निर्णय तो निर्णय कधी घेतला, कार्यारंभ आदेश, त्यामधील अटी व शर्ती तसेच कराराची प्रत सादर करण्यात यावी. पुरवठादाराने वेळेवर गणवेष पुरवठा केला नाही. उक्त पुरवठादाराने देयक देण्यापूर्वी जे अधिकारी कार्यरत होते त्यांनी त्यासंदर्भात काही टिपणी लिहिली आहे का अथवा त्यास क्लीन चीट देऊन देयक अदा करण्यात आले का ? असेल तर पुरवठादाराने विलंबाने पुरवठा केल्याबद्दल त्याच्यावर कारवाई करण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर होती ती त्यांनी केली नसेल तर त्यांच्या विरुद्ध विभाग कोणती कारवाई करणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, समितीने निदेशानुसार माहिती सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हा विषय सभागृहामध्ये मांडला होता. विभागाचे सचिव व त्यांचे सहकारी अधिकारी साक्षीसाठी समितीसमोर येतात त्यावेळी त्यांनी सर्व माहितीसह व अभ्यास करून उपस्थित राहणे आवश्यक आहे. महालेखाकार कार्यालयाचे परिच्छेद विभागाला प्राप्त झालेले असतात. त्या अनुषंगाने समिती प्रश्नावली तयार करते. लेखापरिच्छेदाच्या व्यतिरिक्त प्रश्न विचारण्याचे काहीच कारण नाही. या समितीमधील सन्माननीय सदस्यांनी या समितीमध्ये खूप वर्षे काम केले आहे. आजच्या साक्षी दरम्यान अधिकाऱ्यांनी विसंगत उत्तरे दिली आहेत. अधिकारी परस्परांना प्रश्नांची माहिती विचारतात अनेकवेळा समितीला नंतर माहिती सादर करण्यात येईल, असे सांगतात. समितीला साक्षीसाठी उपस्थित अधिकाऱ्यांकडून अशा पद्धतीची अजिबात अपेक्षा नाही. समितीचे सन्माननीय सदस्य लेखापिच्छेदाच्या मर्यादेबाहेर कधीच प्रश्न विचारत नाहीत व त्याची आम्हाला आवश्यकताही नाही. लेखापरिच्छेदाच्या मर्यादेमधील प्रश्नांची योग्य उत्तरे समितीला मिळत नसतील तर उक्त बाब उचित नाही. समाज कल्याण विभाग व आदिवासी विकास विभाग या एका नाण्याच्या दोन बाजू आहेत. पुरवठादाराने आश्रमशाळांना गणवेश पुरवठा कधी केला? त्याचे व्हाऊचर व दिनांक व विद्यार्थ्यांना गणवेश वाटप किती तारखेला करण्यात आले? उक्त माहिती समितीला उपलब्ध करून द्यावी असे समितीने सूचित केले.

लेखापरिच्छेद क्रमांक २.२.३.१—शैक्षणिक योजनांतर्गत भरीव बचत—

सदरहू परिच्छेदातंर्गत महालेखापालांनी आक्षेपित केलेल्या बचतीची कारणे काय आहेत ? अशी समितीने विचारणा केली असता, शैक्षणिक बाबींवरील बचतीचा विषय आहे. शैक्षणिक बाबींवर सन २०१०-२०११ मध्ये ८१.८ टक्के, सन २०११-१२ मध्ये ८९ टक्के, सन २०१२-१३ मध्ये ८८ टक्के, सन २०१३-१४ मध्ये ९४.७ टक्के, सन २०१५-१६ मध्ये ९७.२ टक्के, सन २०१६-१७ मध्ये ९५ टक्के व सन २०१७-१८ मध्ये ८८ टक्के अशी एकूण खर्चाची टक्केवारी आहे. उक्त वर्षांमध्ये वित्त विभागाने विभागाच्या निधीमध्ये सन २०१०-११ मध्ये १० टक्के, सन २०११-१२ मध्ये १५ टक्के, सन २०१२-१३ मध्ये २० टक्के, सन २०१३-१४ मध्ये २० टक्के व सन २०१४-१५ मध्ये २५ टक्के आर्थिक कपात केली होती. विभागाने बचत कोठे होते याचे ॲनॅलिसीस केले आहे अथवा नंतर अप्रोप्रिएशन अधिक करावे लागते. याचे कारण राज्य जिल्हा नियोजन समिती या दोन्ही लेखाशिर्षाखाली योजनांसाठी दुबार तरतुदी करण्यात येतात. अगोदर राज्य शासनाच्या योजनेखाली खर्च करण्यात येतो. त्यानंतर जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून खर्च करण्यात येतो. उक्त योजनेतून वसतिगृह व आश्रमशाळांसाठी तरतूद करण्यात येते. आता दोन्ही योजना स्टेट लेखाशिर्षाखाली घेण्यात येत आहे कारण दुबार तरतूद करण्यात येते. त्यामुळे शेवटच्या वेळीचे पुनर्विनियोजन व अखर्चित मुद्दे राहणार नाहीत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

अनुसूचित जाती व जमातीच्या योजनेसाठी विभागांना दिलेल्या निधीतून वित्त विभागाला कपात करता येते का ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

याबाबत वित्त विभागाकडून सर्व विभागांच्या निधीतून सरसकट कपात करण्यात येते असे वित्त विभागाच्या सचिवांनी सांगितले.

अनुसूचित जाती व जमातीच्या योजनेसाठी विभागांना दिलेल्या निधीतून वित्त विभागाला कपात करता येते का ? समितीच्या माहितीनुसार अनुसूचित जाती व जमातीच्या योजनेसाठी विभागांना दिलेल्या निधीतून वित्त विभागाला कपात करता येत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाच्या एकूण निधीतून सरसकट कपात करण्यात येते. परंतु त्यांचा शेअर कायम ठेवण्यात येतो. सदरहू विभागांचा शेअर एकूण लोकसंख्येच्या प्रमाणात असतो व निधी कमी उपलब्ध झाला तर करण्यात येणारी कपात सर्व विभागांना लागू होते. अर्थसंकल्पीय तरतुदीला ३० टक्के कपात लावण्यात आली तर ? उर्वरित ७० टक्के निधी सर्व विभागांना विभागून वाटप करण्यात येतो. असे वित्त सचिवांनी अवगत केले.

लोकसंख्येनुसार शेअर कायम राहतो. विभागाचा निधी कपात करण्यात येत असेल तर बचतीचा विषय का येतो ? यासंदर्भात वित्त विभागाने काही तरी निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. एका बाजूला निधी कपात करण्यात येतो व दुसऱ्या बाजूला लेखापरिक्षणामध्ये बचतीचा मुद्दा येतो. कपात करण्यात आल्यामुळे बचत दिसून येत आहे, असे विभागाच्या सचिवांचे मत आहे. हि बाब समितीने निदर्शनास आणली असता, पुनर्विनियोजन आहे. पण प्रती वर्षी करण्यात आलेल्या कपातीची व करण्यात आलेल्या खर्चाची माहिती विभागाने दिली आहे. this cut is done by the Finance Department? असे विभागीय सचिवांनी सांगितले.

कपात केली म्हणून आहे की पुनर्विनियोजन केले ? अशी विचारणा समितीने केली असता, लेखापरिक्षक लेखापरिच्छेद काढतात त्यावेळी कपात विचारात घेत नाहीत. परंतु प्रत्येक आर्थिक वर्षामध्ये कपात करण्यात येते. This has been trend for last few years. The A.G. Office or Finance Department should consider this issue असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

कपात करण्यात येत असेल तर तो निधी बचत म्हणून का दर्शविण्यात येते ? कपातीमुळे विनाकारण विभागावर आक्षेप येतो. याप्रकरणी वित्त विभागाकडून सुधारणा करण्यात यावी. १०० रुपयांऐवजी ९० रुपये तरतूद केली असेल तर तेवढीच तरतूद दाखविली तर बचतीचा प्रश्न निकाली निघेल असे मत समितीने व्यक्त केले असता, हा मुद्दा दरवर्षीचा आहे असे वित्त सचिवांनी सांगितले.

बचत दिसून येत असल्याने अधिकाऱ्यांची त्याची विनाकारण उत्तरे द्यावी लागतात असे मत समितीने व्यक्त केले असता, कपातीचा विषय काही वेळा एकसमान राहात नाही. काही आर्थिक वर्षात एका वर्षात कपात लागते त्यानंतर ३ महिने राहतात त्यामुळे टक्केवारी बदलते, काही वेळा तो रिस्टोअर होतो. There is no uniform policy of Finance Department असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्या प्रमाणात तरतूद उपलब्ध करून दिली त्या प्रमाणात खर्च झाला की नाही, हे पाहण्याचे काम महालेखाकार कार्यालयाचे आहे. निधी कपात हा विभागाचा अंतर्गत भाग आहे. जेवढी तरतूद दर्शविण्यात आली त्यामधील उर्वरित अखर्चित रक्कम बचतच दाखविण्यात येते. वित्त विभागाच्या कपातीमुळे विभागाला निधी न मिळाल्याने तो खर्च होऊ शकत नाही. अशा स्थितीत शासनाने स्टॅन्ड बाय आदेश निर्गमित केली पाहिजे. ज्या लेखाशिर्षा खालील निधीला कपात लावण्यात आली आहे ती रक्कम बचत म्हणून न घेता अंतर्गत समायोजित करावी. जेणे करून महालेखाकार कार्यालयाने आक्षेप काढून नये. समितीने सदरहू शिफारस वेळोवेळी केली आहे. कारण त्यामुळे विभागाचा व समितीचा नाहक वेळ जातो. विभागाला निधी प्राप्तच झालेला नसताना त्यास बचत म्हणता येणार नाही. महालेखाकार कार्यालयाचे मत बरोबर आहे. कारण जेवढी तरतूद केली ती खर्च करणे अपेक्षित आहे व ती खर्च करण्यात आली नाही तर बचत दर्शविण्यात येते. विभाग व महालेखाकार कार्यालय यांच्यामध्ये उक्त प्रकरणी समन्वय असणे आवश्यक आहे. सदरहू निधी प्राप्त झालेला नाही, हे विभागांनी महालेखाकार कार्यालयाच्या निदर्शनास आणून दिले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

समितीने पुन्हा दिनांक २० ऑगस्ट २०१८ रोजी आदिवासी विभागाचे प्रधान सचिव व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. आदिवासी समाजाच्या विकासासाठी विभागामार्फत ज्या सुधारणा किंवा योजना राबविल्या जात आहेत त्याबाबत सविस्तर माहिती देण्याच्या सूचना साक्षीच्या वेळी समितीने मागील बैठकीमध्ये केल्या होत्या. विभागासाठीची अर्थसंकल्पीय तरतूद, सध्या सुरू असलेल्या योजना, महालेखापालांनी काढलेल्या परिच्छेदांबाबतचे स्पष्टीकरण व इतर बाबींचे सविस्तर विश्लेषण आम्ही एका सादरीकरणाद्वारे समितीसमोर करण्यात येणार आहे त्यासाठी आम्हाला परवानगी द्यावी. असे विभागीय सचिवांनी विनंती केली व समितीच्या मान्यतेनंतर सादरीकरणाला सुरुवात केली.

समितीच्या सादरीकरणाला सुरुवात केली व सादरीकरणातून मिळतील अशी आशा व्यक्त करून सुरुवात करते. Empowering Tribal Communities हे आदिवासी विकास विभागाचे व्हिजन आहे. तसेच सस्टेनेबल डेव्हलपमेंट मॉडेल राबवणे जे आदिवासी समाजाकडून त्यांच्या साठीचा सन्माननीय दृष्टिकोन शिकून घेऊन आणि ह्युमॅनिटी ॲप्रोच ठेऊन त्यांची सभ्यता व संस्कृती जपणारे असले पाहिजे. हे महाराष्ट्राचे डेमॉग्रॅफिक डिस्ट्रीब्यूशन आहे. Maharashtra is the second largest tribal populated state in the country. There is 9.3% of the Scheduled Tribes population in the State. लाल रंगामध्ये दाखविलेले प्रदेश हे २० टक्क्यांपेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेले प्रदेश आहेत. निकषानुसार मानव विकास निर्देशांकाबाबत माहिती देताना शिक्षण, आरोग्य व आर्थिक प्राप्त अशा तीन

निकषांनुसार मानव विकास निर्देशांक काढतात.त्यापैकी एक असलेल्या शिक्षणाविषयी विभागाने विश्लेषण केले आहे.या क्षेत्रावर आदिवासी विकास विभागाचा खूप मोठा भर आहे.याबाबतची आकडेवारी पाहिली तर, Department can see that it is comparable. ST, Maharashtra and all India are comparable as far as elementary education is concerned. The average of all over Maharashtra is १०५.३४ and that of ST is १०४. सेकण्डरी लेव्हलवर जाताना ही टक्केवारी ७२ वर येते जी महाराष्ट्र राज्याची ७८ टक्के एवढी आहे. १० वी नंतरच्या ड्रॉपकडे पाहिले तर लक्षात येईल की त्याचे प्रमाण जवळजवळ अर्धे आहे. It becomes very alarming at college level. महाराष्ट्रातील युवा महाविद्यालयीन शिक्षणाकडे वळले पाहिजेत. They are only 11% of the eligible young students. Department calculate GER on 18 to 24 age group going to college. महाराष्ट्र का आवरेज भी अच्छा नहीं है. उसमें भी एसटी का ऑलमोस्ट आधा ही है. So this is the area on which department should focus. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Does it mean that department is better than the national index? अशी विचारना समितीने केली असता, Maharashtra is better in GER at the national level. अब शायद कुछ राज्य आगे हो गए होंगे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

Higher education, Senior secondary, Secondary and Elementary. What about elementary ? What about the health ? अशी विचारणा समितीने केली असता, एलिमेंटरीमध्ये विभाग समान पातळीवर आहे परंतु त्यामध्ये ८ वी इयत्तेपर्यंतचाच समावेश होतो. त्या इयत्तेपर्यंतची मुले नापास होत नाहीत तसेच त्यांचा सर्व शिक्षा अभियानांतर्गत देखील समावेश असतो. १० वी, ११ वी व १२ वी दरम्यान होणाऱ्या ड्रॉप आउटवर खरा फोकस असला पाहिजे. १२ वी नंतरदेखील मुले उच्च शिक्षणाकडे किंवा व्यावसायिक शिक्षणाकडे गेली पाहिजेत. I think this should be the focus of the Government. मानव विकास निर्देशांकामध्ये विचारात घेण्यात येणाऱ्या बाबींपैकी दुसऱ्या दोन बाबी म्हणजे आरोग्य आणि आर्थिक प्राप्ती या आहेत. याबाबत विभागाकडे कोणताही डिसॲग्रीगेटेड डेटा उपलब्ध नाही.आदिवासी विकास विभागाचा प्रयत्न आहे की, एस.सी.सी.सी. सेन्ससच्या आधारे अनुसूचित जमातींचे हाऊसहोल्डचे आर्थिक विश्लेषण करण्यात येणार आहे. महिला व बाल कल्याण विभागाच्या सचिवांकडे देखील आरोग्य सुविधाबाबत बऱ्याच वेळा याबाबतचा विषय मांडला आहे. त्यांच्याकडे अंगणवाडीमध्ये जाणाऱ्या कुपोषित मुलांचे रजिस्टर्स असतात. परंतु मोर्टेलिटी रेटबाबत राज्य पातळीवर तयार होणाऱ्या अहवालामध्ये अनुसूचित जमातीचे वेगळे वर्गीकरण केलेले नसते असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

अर्थसंकल्पाच्या सुमारे ७ ते १० टक्के रक्कम विभागाकडून या वर्गासाठी खर्च करण्यात येते. ज्या जिल्ह्यांमध्ये २० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या आहे त्या जिल्ह्यांमधील आरोग्य व पर कॅपिटा इन्कमचा डेटा मिळविण्यासाठी विभागाने कार्यपद्धती तयार करणे गरजेचे आहे. ती बाब तातडीने करणे गरजेचे आहे. ज्या ठिकाणी सुमारे २ ते ३ टक्के लोकसंख्या आहे तेथे समजणे शक्य आहे.परंतु जर एकूण लोकसंख्येच्या २० टक्के लोकसंख्या एखाद्या प्रवर्गाची असेल व ती विखुरलेली देखील नसेल अशा ठिकाणी डेटा संकलित केला पाहिजे. This is very important point. For making any scheme and plan this data is very important असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाकडे राज्यामध्ये कन्व्हीन्सींग डेटा आणि डिसेग्रीगेटेड डेटा जे आपल्या कडे येतो तो आतापर्यंत तरी मानव विकास निर्देशांक किंवा इतर तत्सम जे अहवाल येतात त्यामध्ये डेसिग्रेशन केलेले नसते. At the most the Report stops at the district level असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जर असे असेल तर टोटल आऊटले आणि एक्सपेंडिचर यांचा काही अर्थच राहत नाही. पाच वर्षे अगोदर किती पर कॅपिटा इन्कम होते, त्यामध्ये किती वाढ किंवा कमी झाली आहे, विभाग किती पैसे खर्च करीत होता, यामुळे आरोग्य व पर कॅपिटा इन्कममध्ये सुधारणा झालेली नसेल तर आऊटले आणि एक्सपेंडिचर यांना काहीही अर्थ नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबत समिती शिफारस करू शकते की, अनुसूचित जमातींच्या विकासासाठी जे विविध कार्यक्रम आहेत त्यांचा डेटा डिसॲग्रीगेट करून उपलब्ध झाला पाहिजे असे विभागीय सचिवांनी सूचित केले.

याबाबत समितीला विभागाकडून देखील अपेक्षा आहेत. ज्याप्रमाणे प्रत्येक जिल्ह्याचे पर कॅपिटा इन्कम काढण्यात येते त्याप्रमाणेच आदिवासी वर्गाचे देखील दरवर्षी पर कॅपिटा इनकम वाढले आहे का हे पाहणे गरजेचे आहे.जेणेकरून त्याप्रमाणे योजना राबविणे शक्य होईल असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबत संबंधितांशी सन २०१७-१८ पासून प्लॅन्ड व नॉन प्लॅन्डचे वर्गीकरण झाले आहे. आता विभागाकडून स्कीम एक्सपेंडिचर व ॲडमिनिस्ट्रेटिव्ह एक्सपेंडिचर असे त्याचे वर्गीकरण करण्यात येते असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

What is the position of Plan and Non-Plan till 2016-17 ? सादरीकरणामध्ये बारच्या स्वरूपात दाखविण्यात आले आहे. निळ्या रंगातील बार हा अर्थसंकल्पित तरतूद दर्शवितो, रिलिज झालेला निधी लाल रंगाचा बार दर्शवितो व खर्च झालेला निधी हिरव्या रंगाच्या बारने

दर्शविण्यात आलेला आहे. सन २०१५-१६ मध्ये प्रोग्रेसिव्ह एक्सपेंडिचर ८८ टक्के होता. त्यानंतर तो २०१६-१७ मध्ये ९४ टक्के, २०१७-१८ मध्ये ९६.२ टक्के पर्यंत पोहचला आहे.प्रोगेसिव्ह एक्सपेंडीचर कमी होण्याची सरासरी ५ टक्के आहे की १० टक्के ? अशी विचारणा समितीने केली असता, ॲब्सुल्यूट फिगर पाहता विभागाचा आऊटले वाढलेला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले. आऊटले वाढला आहे, परंतु रिलिज होण्याच्या टक्केवारीबाबत समितीने विचारणा केल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, टक्केवारी कमी आहे. मागील वर्षी वित्त विभागाने एस.टी.पी. आणि टी.एस.पी. कट रिस्टोअर केला होता. Therefore, you can see it is only Rs. 300 crores. मुलांची स्कॉलरशिप किंवा तत्सम गोष्टींना कट लावण्यात आला नव्हता. सिव्हिल वर्क किंवा इतर कामांना कट लावण्यात आला होता. सन २०१८-१९ चे वाटप दाखविण्यात आलेले आहे. This is a consolidated picture of State Sector plus DPC. रुरल डेव्हलपमेंट, शबरी हाऊसिंगसाठी यामध्ये सुमारे १७० कोटी रुपये खर्च होतात. स्टेट लाईव्हलीहूड साठी ८० टक्के, ठक्कर बाप्पा योजना व रोड सेक्टरसाठी सुमारे ८०० कोटी रुपये जातात असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ठक्कर बाप्पा योजनेसाठी १७८ कोटी रुपये व रस्त्यांसाठी ३०० कोटी रुपये आहेत. परंतु यामध्ये संपूर्ण ८०० कोटी रुपयांचे वर्गीकरण दिलेले नाही. विभागाने ६ हजार ७३० कोटी रुपयांपैकी ६ हजार ५०० कोटी रुपये खर्च केले आहेत.यामध्ये विभागाच्या आस्थापना खर्चाचादेखील समावेश आहे का ? या ६ हजार कोटी रुपयांमध्ये डी.पी.सी. चा किती फंड आहे व इस्टेट फंड किती आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबतदेखील पुढे माहिती देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ठक्कर बाप्पा योजना व रस्त्यांसाठी दाखविण्यात आलेल्या ३०० कोटी रुपयांबाबत अशी अडचण आहे की, आदिवासी विकास विभागाचा जिल्हा नियोजन समितीकडे आराखडा तयार करून जिल्हा नियमन समितीकडे मंजुरीसाठी पाठविला जातो. त्यामध्ये १० टक्क्यांची अट टाकण्यात आलेली आहे. सर्वसाधारण प्लॅनमध्ये जसे ६७ टक्के व ३३ टक्के तयार करतात त्याप्रमाणे रस्त्यांसाठी १० टक्के खर्च करण्याची अट कशाच्या आधारे टाकण्यात आलेली आहे ? ही अट का वगळत नाहीत, याबाबत कायदेशीर काय तरतूद आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत लोकप्रतिनिधीची सूचना होती व त्या अनुषंगाने विभागाने मागील वर्षी जिल्हाधिकारी यांना सूचना दिलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

आता १० टक्क्यांची अट ठेवलेली नसून कोअर व नॉन कोअर अशी विभागणी केलेली आहे. त्यापैकी नॉन कोअरमध्ये जे करायचे असेल ते करणे शक्य आहे त्यासाठी टक्केवारीची अट ठेवण्यात आलेली नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व सदर अट काढण्यात आलेली आहे. याबाबतचा शासन निर्णय समितीला सादर करण्यात येईल. १९९० साली जूने पत्र होते त्यामुळे आदिवासी विकास विभागासाठी पर्सेन्टेज ॲलोकेशन केले होते, डीपीसी में प्लानिंग करते समय इतना प्रतिशत रोड पर, इतना प्रतिशत पानीपुरवठा पर, इतना प्रतिशत हेल्थ पर कम्पलसरी करेंगे. परंतु काही ठिकाणी लोकप्रतिनिधींची विनंती होती, की अजूनही दुर्गम भागात रस्ते करण्यासाठी त्यांना ते अडचणीचे वाटते. So, we have removed that condition. Now, the procedure is simple as the general plan. It cannot be shifted from Core to Non-core but *vice versa* is allowed असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

जिल्हानियोजन समितीने मान्य केलेल्या आराखड्याबाबत माहिती देताना तो आराखडा आता आदिवासी विकास विभागांकडे येत नाही.आराखडा मंजूर करण्याचे अधिकारी मागील वर्षापासून जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत. तसेच रिॲप्रोप्रिएशन देखील जिल्हाधिकाऱ्यांकडे होते. This is the major reform we have taken. डीपीसी लेव्हलवरील कोणतीच फाईल मंत्रालयात मंजुरीसाठी येत नाही. ठक्कर बाप्पा योजनेसंदर्भात एटीसी कडे विलंब होत होता. त्यामुळे एटीसी यांच्याकडील अधिकार काढून जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार देण्यात आलेले आहेत. हे दोन महत्त्वाचे निर्णय विभागाने घेतलेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ठक्कर बाप्पा ही कोअर स्किम आहे. ट्रायबलच्या टीएसपीच्या एरियाला वेगळा निधी दिला जातो आणि ओटीएसपीला वेगळा निधी दिला जातो. ठक्कर बाप्पा ही योजना संपूर्ण राज्यासाठी आहे. या योजनेला कोअर, नॉन कोअर असायला नको. ती योजना कोअरमध्येच येते. ट्रायबल एरियामध्ये ठक्कर बाप्पा योजनेचा लाभ द्यायचा आहे. परंतु विभाग ओटीएसपीच्या एरियाला टीएसपीचे पैसे देत नाहीत. या योजनेचा मूळ हेतूच हा आहे की, जेथे माडा नाही, मिनी माडा नाही, टीएसपी नाही त्या लोकांना पैसे देण्याच्या दृष्टीने ही योजना २००७-२००८ मध्ये वारंवार पाठपुरावा करून आणली होती. विभागाचे अधिकारी म्हणतात की, ओटीएसपीला कोअरमधून पैसे देता येत नाहीत. तसेच ओटीएसपीचे काम नॉन कोअरचे काम आहे, असे त्यांचे मत आहे.ठक्कर बाप्पा योजनेला ट्रायबल सब प्लॅनमधून पैसे दिले पाहिजे. या योजनेला कोअर व नॉन कोअर असे बिरूद लावण्याची आवश्यकता नाही. ठक्कर बाप्पा योजनेचा लाभ द्यायचा असेल तर ५० टक्के लोकसंख्या असणे आवश्यक आहे व एवढी लोकसंख्या असलेल्या गावाला किंवा वाडीला ठक्कर बाप्पा योजनेचे फायदे मिळू शकतात. विभागाचे अधिकारी टीएसपी, ओटीएसपीमध्ये नॉन कोअर, कोअर मध्ये पैसे ट्रान्सफर करीत नाहीत. एखाद्या भागामध्ये पैसे असताना कोअरचे पैसे नॉन कोअरमध्ये देता येत नाही, असे अधिकारी सांगतात. याचे कारण असे की, त्यांचे असे मत असते की, ठक्कर बाप्पा ही योजना ओटीएसपीची आहे. ठक्कर बाप्पा योजनेचा निकष केवळ एवढाच आहे की,

त्या गावातील किंवा वाडीतील किंवा एरियातील आदिवासींची लोकसंख्या ५० टक्के असली पाहिजे. त्यामुळे कोअर व नॉन कोअरची अडचण उभी करू नये. विभागीय प्रतिनिधींनी माहिती दिली की, कोअरचा निधी वेगळा आणि नॉन कोअरचा निधी वेगळा आहे. परंतु ठक्कर बाप्पा योजनेला कोअर मध्ये घेणार की, ओटीएसपीला नॉन कोअर मध्ये घेणार की, टीएसपीला कोअर मध्ये घेणार? असे करणे योग्य नाही. ठक्कर बाप्पा योजना ही कोअर योजना आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, It is a core scheme and it is applicable for areas having over 50% of tribal population. The money is disbursed as per those norms असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ओटीएसपी एरियामध्ये ठक्कर बाप्पा योजना घ्यायची असेल तर कोअरचे पैसे देता येत नाहीत. त्यामुळे नॉन ट्रायबल एरियामध्ये म्हणजेच ज्या ठिकाणी १० ते २० आदिवासी वस्त्या आहेत, त्यांना पैसे मिळत नाहीत. गोंदिया मतदार संघात दर वर्षी ५, ६ लाख रूपयांच्या वर निधी मिळत नाही. ठक्कर बाप्पा योजनेकरिता कोअर, नॉन कोअरची बाब पुढे करून अडचणी निर्माण करू नये. ट्रायबल सब प्लॅनचे पैसे ठक्कर बाप्पा योजनेकरिता प्रत्येक ठिकाणी मिळाले पाहिजे असे समितीने सूचित केले असता, या मुद्यामध्ये ज्याचे समितीला ॲनालिसीस दिले त्याच्यामध्ये विभागाकडे डिस्ट्रिब्युशन असे असते. मागील वेळेस देखील ६,७८४ कोटी रूपयांचा आऊटले होता. I am speaking about 2017-18. If you see the outlay of this year, it is Rs. 10,000 crore. It is national because the 'Shetkari Sanman Karja Mafi' is Rs. 2,000 crore, which is shown against this. Apart from this, the shadow provision for central scheme is shown as Rs. 2,000 crores. त्यामुळे ॲक्च्युअल आऊटले जवळजवळ फ्रीज आहे. मागील वर्षाचा व या वर्षीचा तेवढाच आहे.त्यामुळे आऊट ले मध्ये कोणतीही वाढ नाही अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

राज्याच्या एकूण आऊटले मध्ये तुम्हाला ९ टक्के मिळाले पाहिजे. आदिवासी भागाला त्यांच्या हिस्याची ९ टक्याची रक्कम मिळाली किंवा कसे हे आपण समजून घेतले पाहिजे. आपल्याला त्याचे पेपर्स दाखविण्यात येतील. एकूण बजेटमधील ९ टक्के रक्कम आदिवासी विभागासाठी ईयर-मार्क केली नाही किंवा त्यांच्यासाठी तेवढा आऊटले ठेवला नाही आणि एससीसाठी ठेवला नाही तर केंद्र शासनाचा निती आयोग महाराष्ट्र राज्याच्या असो की, इतर राज्याच्या अर्थसंकल्पाला मान्यता देत नाही असे समितीने सूचित केले असता, Here we are having internal discussion regarding the State. I am trying to show that it comes to 9.35%. But in real terms, आता प्लॅन आणि नॉन प्लॅन मर्ज केल्यामुळे आदिवासी विकास विभागामध्ये विशेषतः दीड हजार कोटी रूपये मुलतः प्रशासकीय खर्च आहे. It is for salaries and office. त्यामुळे विकास निधीच्या पटीत मार्जीन खरोखर कमी आहे. Department had raised this issue with the finance department अशी विभागीय सचिवांनी अवगत केले.

ईस्टम्ब्लीशमेंट कॉस्ट यामध्ये अनकॉर्पोरेट असेल तर तो निधी ट्रायबलसाठी खर्च केला जातो, असे कसे म्हणता येईल ? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत उदाहरण देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, जिल्हा परिषदेच्या शाळा पालघरमध्ये भरत असेल किंवा आदिवासी भागामध्ये भरत असेल तर तेथील कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च हा विभागाच्या प्रशासकीय खर्चामध्ये समाविष्ट केला जातो.परंतु आदिवासी विकास विभागाबाबत हा प्रशासकीय खर्च योजनेवरील खर्च म्हणून दाखविला जातो. Furthermore, there is lack of uniformity in same type of expenditure, being labelled under different category. This is just for analysis, this is not for record असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीचा मुद्दा केवळ हा आहे की, आदिवासी विकास विभागाला प्लॅनकरिताचा निधी वितरित होत असतो. त्यापैकी प्लॅन एक्स्पेंडीचरचा ९ टक्के निधी विभागाला मिळाला पाहिजे. नॉन प्लॅनचा विषय येत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, वह निधीप्लॅन का नहीं है, वह एक ही है. प्लेट में वही खाना मिल रहा है, आप उसे कैसे भी खा सकते है असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पहले खाना अलग अलग मिलता था, प्लॅन और नॉन प्लॅन था, अब पूरी खिचरी बना दी गई है. परंतु अल्टीमेटली there is true part of the total working, one is the administrative expenses and second is the scheme expenditure. उसके हिसाब से आज कि तारीख में प्लॅन एक्सपेंडीचर में स्कीम एक्सपेंडीचर कितना प्रतिशत है? ठक्कर बाप्पा योजना के बारे में कार्पोरेशन और नगर परिषद एरिया के किसी वार्ड में आदिवासियों की जनसंख्या यदि ५० प्रतिशत से अधिक है तो क्या ये ही बात अर्बन एरिया के लिए भी लागू है ? अशी विचारणा समितीने केली असता, समितीला तेच समजावण्यात येत आहे. Department sure that it is not for urban areas. याचे कारण असे की, ग्रामपंचायतमध्ये पॉप्युलेशनचे युनीट आहे. You can give us a submission, department will consider it in the review असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

The money is earmarked for the advisasis. Whether they live in the rural area or urban area should not matter. In principle, why don't department agree on this अशी विचारणा समितीने केली असता, department is not against it. But department have to do an analysis because the present scheme is not meant for urban areas. ठक्कर बाप्पा योजना ग्रामीण इन्फ्रास्ट्रक्चरला सुदृढ करण्यासाठी आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ठक्कर बाप्पाला गावाची काही अट नाही. एक वॉर्ड आदिवासी होऊ शकत असेल तर त्याकरिता ३०० लोकसंख्या असली पाहिजे. तसेच वॉर्डमधील लोकसंख्या ५० टक्के असेल तर it should also be eligible. भौतिक इन्फ्रास्ट्रक्चर सोडून परिवारीक आदिवासी जेथे रहात असेल तर ते आदिवासी सर्व योजनांसाठी पात्र आहेत. त्यासंदर्भात विभागाने गांभीर्याने विचार केला पाहिजे असे समितीने सूचित केले असता, विभागाचे असे मत आहे की, त्यासंदर्भात ग्रामीण भागावर देखील प्रेशर आहे. If the outlay is increased to cover urban areas, then it can be considered. Urban Development Department is supposed to take care of the basic infrastructure needs of urban areas असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभाग कहना ऐसा है कि हमें ग्रामीण के लिए ही पैसा कम पड़ रहा है. उसमें बहुत प्रेशर है. लेकिन समितीकडे कहना यह है कि वह स्कीम लेनी चाहिए असे मत समितीने व्यक्त केले असता, Department is against it. But the implementing department would be UDD. Department will only be funding them असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

इस बारे में एक सुधारणा है. जो कार्पोरेशन है. नगरपंचायत जो अभी पूरे महाराष्ट्र में ली थी, वह पूरा एरिया ले लिया गया था. कम से कम नगरपंचायत को इन्कार्पोरेट करना चाहिए, क्योंकि कल तक वह ग्रामपंचायत थी. अब वह एकदम नगरपंचायत होने के कारण उनको ज्यादा फंड भी नहीं मिलता है इसलिए उसको ठक्कर बाप्पा योजना में इन्कार्पोरेट करना चाहिए असे समितीने सूचित केले असता, मुलतः असे आहे की, विभागाकडे जवळपास १,४१७ कोटी रूपये आहेत. त्यामुळे डेव्हलपमेंट फंड ॲक्च्युअली कमी होत आहे. बरीचशी अशी मागणी आहे की, याला विधीग्राह्य करायचे. स्टॅच्युटरी गॅरंटी असायला पाहिजे. The Hon. Governor has also been saying this. तसेच समितीने वारंवार प्रश्न विचारला की, काही ठिकाणी ओटीएसपी आहे. मागील साक्षीमध्ये माहिती दिली होती की, जूनी जनगणना आकडयावर मॅपींग अजूनही चालू आहे. हे अद्ययावत डेमोग्रॅफीक डेटावर रिमॅपिंग करणे आवश्यक आहे. तसेच जात पडताळणी समितीवरील प्रशासकीय खर्च, गव्हर्नमेंट स्कुल्स, एडेड स्कुल्स व वसतिगृहांमध्ये वॉर्डनचे वेतन, फिल्ड ऑफीसर हे सर्व टीडीसी आहे. जसे की, तहसीलदार, एसडीओ, प्रांत कार्यालय हे कोणीही स्किममध्ये टाकणार नाही. परंतु विभागाचे फिल्ड ऑफीसेस सर्व स्कीमच्या खर्चामध्ये समाविष्ट केले जातात. Therefore, it is seen that our department is having big budget but actually the development funds are less असे विभागीय सचिवांनी अवगत केले असे समितीने निदर्शनास आणले असता, रेकॉर्डवर एकूण ॲलॉकेशनच्या २२-२३ टक्के आहेत. We have been highlighting this anamoly. याचे कारण असे की, इतर विभागाच्या फिल्ड ऑफिसेसला ॲडमिनिस्ट्रेटिव्ह एक्सपेंडीचर मध्ये असतात, ते कमीटेड असतात, त्याला कोणी हात लावत नाही. इतर ॲडीशनल आऊट ले येतो, तो डेव्हलपमेंट स्कीमसाठी करता येतो. हे विश्लेषण मी बारकाईने एफडीसाठी तयार केले होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने दिलेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात नमूद केलेले १,४१७.६९ कोटी रूपये आस्थापना खर्चाच्या व्यतिरिक्त खर्च झालेले आहेत. यामध्ये जात पडताळणी समिती, शासकीय आश्रम शाळा, ॲडेड आश्रम स्कुल, शासकीय वसतिगृह, कमिशनर ऑफीस एडेड स्कुल ऑफ एज्युकेशन डिपार्टमेंट, मिलेटरी स्कुल ऑफ एज्युकेशन, ट्रायबल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन आणि लाईंग डिपार्टमेंट ऑफ ऑफीस एक्स्पेन्सेस ॲण्ड डीपीसी हे विभाग दिलेले आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, त्यामध्ये असे दाखविलेले आहे की, ज्या ठिकाणी सिंगल स्टार केलेला आहे. विभागाचे ५५४ कोटी रूपये आहेत, तसेच ५६१ कोटी आणि १३१ कोटी रूपये अंडर गव्हर्नमेंट आश्रम स्कुल, एडेड स्कुल आणि गव्हर्नमेंट हॉस्टेल. In Zilla Parishad schools, it is shown under committed expenditure. यहाँ पर ये स्कीम में काऊंट हो रहा है. स्कीम में यदि वेतन काऊंट होगा तो ॲक्च्युली स्कीम के लिए तो खर्चा हुआ होगा, बच्चों को स्कॉलरशीप दी, आहार भत्ता या कुछ और दिया असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

गव्हर्नमेंट आश्रम स्कुलकरिता ५५४ कोटी रूपये दाखविण्यात आलेले आहेत. त्यामध्ये तेथील मुलांवर होणारा सर्व खर्च समाविष्ट असेल. ही रक्कम केवळ वेतनावर खर्च होणारी नाही. जर योजनेमधून वेगळे करायचे असेल तर वेतनाची रक्कम सेपरेट करावी अशी सूचना वित्त विभागाच्या सचिवांनी केली.

Department can give that bifurcation. इसको बायफरकेट करके बताईए कि only regarding salaries. It should not be included in the scheme. अभी विभागीय सचिव कहा कि इसमें आहार भत्ता नहीं है. इसमें बाकी के खर्चे नहीं है, केवल टिचर्स का वेतन है. ये केवल पेड अलाऊंसेस है. इसमें बाकी के भी खर्चे है निदर्शनास आणले की, इसमें दोनों है. मैंने ये नहीं कहा. इसमें मेजर खर्चा वेतन का है. असे समितीने निदर्शनास आणले असता, Department shall will do that exercise. ठाणे येथे मुख्य कार्यकारी अधिकारी असताना ॲनालिसिस केला होता. त्यावेळी जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांचे वेतन व प्रशासकीय खर्च ७० टक्के झाला. The remaining 30% was spent on schemes असे विभागीय सचिवांनी सांगितले.

राज्यभरात अशीच परिस्थिती आहे. ६०, ६२, ६३ टक्के प्रशासकीय खर्च होतो. १,४१७ कोटी रूपयांमधून प्रशासकीय खर्च किती आहे आणि कमीटेड एक्स्पेंडीचर किती आहे ? या ठिकाणी वसतिगृह आणि शाळा यांचा खर्च एकत्रित आहे व इतर ठिकाणची सर्व रक्कम वेतनावरील आहे, असे समितीला वाटते. वेतनावरील खर्च आणि इतर खर्च वेगळा केला तर १,२५० कोटी रूपयांची रक्कम अर्धी राहील. त्यामुळे या सर्व रकमांची विगतवारी करण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, समितीच्या सूचनेप्रमाणे सदरहू रक्कमेची विगतवारी करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

यानंतर विभागाकडून सादरीकरण करण्यात आले. सादरीकरणाच्या वेळी माहिती देताना विभागाचा फोकस विविध मुद्यांवर आहे. त्यामध्ये एन्शुअरिंग क्वालिटी अँड ॲफोर्डेबल एज्युकेशन आहे. इम्प्रुव्हड हेल्थ अँड न्युट्रिशिअन ऑफ ट्रायबल्स थ्रू स्पेशल प्रोजेक्टस अँड रिगरस मॉनिटरिंग आहे. पेसा क्षेत्रातील आणि आदिवासी क्षेत्रातील एम्पॉवरिंग ग्रामपंचायत व ग्रामसभा आहे. त्यामध्ये विभागाचा प्रमुख फोकस हा एफ.आर.ए. फॉरेस्ट राईट ॲक्ट इम्प्लीमेंटेशन अँड पेसा कायदा त्या शिवाय इन्फ्रास्ट्रक्चर फॅसिलिटिज आणि त्याच्या इन्स्टिट्युटनल स्ट्रेंथनिंगवर आहे. आदिवासी विकास विभागाच्या अजून दोन शाखा आहेत. TDC अँण्ड TRTI - ट्रायबल रिसर्च ट्रेनी इन्स्टिट्यूट इन पुणे या दोन संस्था आहेत. TRTI करीत असलेल्या कामाबाबत प्रिझर्व्हेशन ऑफ ट्रायबल कल्चर अँड हेरिटेज काम आहे, विभागाचे जेवढी काही संशोधने होतात त्यामध्ये आदिवासी संस्कृतीमध्ये त्याची कला भाषा यांचे भाषांतर करतात.रिसर्च ॲकेडॅमिक टाईप ऑफ वर्क ते करतात. त्यांचे म्युझियम्स आहेत. ज्या ८ एस.टी. व्हॅलिडिटी कमिट्या आहेत, जी सर्व ऑनलाईन सिस्टिम कार्यरत झालेली आहे. ती TRTI च्या अंतर्गत आहे. त्याशिवाय आता आदिवासी विकास विभाग वन हक्क कायद्याखाली करण्यात येणाऱ्या वन हक्क अभियानास त्यामध्ये, Department has trying to finish all the pending FRA claims. In that TRTI has become the nodal agency. सादरीकरणादरम्यान सचिवांनी सांगितले की, शिक्षणाबाबतची एज्युकेशनबाबतची माहिती ही या स्लाईडमध्ये देण्यात आलेली आहे. शासनाच्या ५०२ शाळा आहेत. विविध व्हर्टिकल्समध्ये शासन अनुदानित आश्रमशाळा, एकलव्य शाळा, नामांकित हॉस्टेल व स्वयम असे मिळून आदिवासी विकास विभागाचे जवळपास ५.६ लाख मुलांच्या शाळेपासून महाविद्यालयापर्यंतच्या शिक्षणामध्ये योगदान राहते. A total of 5.60 lakh approximately tribal students depend on the governments scheme. विद्यार्थ्यांची संख्या खाली नमूद केलेली आहे. आश्रमशाळांमध्ये जवळपास २ लक्ष विद्यार्थी आहेत. अनुदानित आश्रमशाळांमध्ये अडीच लक्ष विद्यार्थी आहेत, एकलव्यमध्ये ३ हजार विद्यार्थी आहेत. नामांकित शाळांमध्ये ५४ हजार विद्यार्थी आहेत. हॉस्टेलमध्ये कॉलेजगोईंग जवळपास ५५ हजार विद्यार्थी आहेत आणि स्वयंमखाली एनरोल्ड ५ हजार विद्यार्थी आहेत. स्वयंमबाबत माहिती देताना स्वयम ही विभागाने पूरक कामे हॉस्टेलला सप्लीमेंट करायला म्हणजे जर मुलांना शासकीय वसतिगृहामध्ये प्रवेश मिळत नसेल तर विभाग त्यांचे जेवण अँड निवास अलाऊन्सेस फिक्स केलेले आहेत. शहरासाठी मुलांचे कॉलेजमध्ये ऑनलाईन प्रवेश झाले की, त्यांना डि.बी.टी. ट्रान्सफर केले जातात असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

हॉस्टेलच्या मुलांना विभागाने मोजणीस घेतले but they are not taking education under the scheme of your department? They are only residing in department's hostel असे समितीने निदर्शनास आणले असता, नामांकित पर्यंत शाळा आहेत आणि हॉस्टेल व स्वयंम कॉलेज आहे. department funding their stay असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

Are they taking education in other institutions? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व they are taking education in other institutions. But they are registered with tribal development department and reside in the hostels run by the Tribal development department. आणि त्यांचा जो काही रहाणी मानाचा खर्च आहे, त्यांचा आहारभत्ता, त्यांचे निवासावरील खर्च आहेत, त्यांची पाठ्यपुस्तके, स्टेशनरी, स्कॉलरशिप हे सर्व विभाग देतो, both under State Govt.and Govt. of India असे विभागीय सचिवांनी सांगितले.

डि.बी.टी. मध्ये काय काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, डि.बी.टी.मध्ये विभागाचे मोठी सुधारणा केलेला आहे. नेहमी टुथपेस्ट, गणवेश, मुलांना दिल्या जाणाऱ्या वस्तूंचा दर्जा निकृष्ट असल्याबाबतचा विषय समितीच्या साक्षीमध्ये वारंवार असायचा. Department has100% switched over to DBT. त्यामुळे मुलांना खूप चॉईस मिळालेला आहे. गुणवत्तापूर्ण पुरवठा आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभाग जी डि.बी.टी. देतो त्याची काय किंमत पकडण्यात येते पूर्वी विभाग १ रुपयाचा माल ३ रुपयांमध्ये विकत घेत होता. आता विभाग मुलांना ३ रुपये देत आहे की, १ रुपया देत आहे? तुम्ही मुलांना १ रुपया देणार तर व्यापाऱ्यांना ३ रुपये देणार असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागकी तरफसे मैंने मुंबई की कुलाबा मार्केट में और दूसरे जो स्टोअर्स है वहां पर सरप्राईज टीम भेजकर पेन, पेन्सिल, रबर, शॉपनर इन सब की रिटेल प्राईस ली है. नोटबूक कितने पन्ने की है इसकी जानकारी ली. मुंबई की दुकानों से इन चीजों के रेट लिए है, ताकि कल कोई ऐसा न कहे कि विभागाने इसमें कुछ कट किया है. इसके बाद विभागाने ये लमसम बनाया. ६ से ८ कक्षा के बच्चे, ८ से १० के बच्चे, ११ से १२ वी के

बच्चे है. अब विभाग उनको लमसम मनि ट्रान्सफर करता है. विभागाकडे कहीं से भी शिकायत नहीं आयी है. प्राईस कम है. इसके अलावा के क्लॉथ और एक नाईट ड्रेस और बरायी है. इसमें ये देखा कि विभागाने जो पैसे ट्रान्सफर किए है, बच्चों ने उससे भी ज्यादा आईटम्स लाए है. पैसे का मामला नहीं है. दूसरी बात यह है कि विभागाने इसका दिल्ली स्कूल से थर्ड पार्टी रिगरस इव्हॅल्यूएशन करवाया. मुंबई विद्यापिठाच्या इकोनॉमिक्स डिपार्टमेंटने १२ हजार सॅम्पल्सचा ६ महिने स्वतंत्रपणे सर्व्हे केला. The department have the DBT evaluation Report. पिछले साल विभागाने रोल आऊट किया और विंटर में विभागाने इसका थर्ड पार्टी रिवॅलसी व्हॅल्यूएशन किया अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

What is the summary of the Report? अशी विचारणा समितीने केली असता, the summary of the Report is "exceptional success". त्यांनी असेही म्हटले आहे की, त्यांनी अनुषंगिक केले म्हणजे फक्त डि.बी.टी. नाही तर, पालकांचे मेळावे, मुलांना समजावून सांगणे की, हे या कामासाठी आहे. त्यांनी चांगल्या गुणवत्तेच्या वस्तू घ्याव्यात. याचा परिणाम झालेला आहे. Department had not just given them money and the list of items without creating awareness. विभागाने त्यांना शाळेमध्ये हे शिकविले होते की, विभाग हे पैसे त्यांच्या पालकांच्या खात्यामध्ये देण्यात येत आहेत. तर it is for these items, and departmental representative asked the class teacher to check the items after the students came to school. विभागाने यामध्ये दुसरे असे संशोधन केले होते की, शासनाच्या डि.बी.टी.मध्ये विभागाने आधी खरेदी करावे लागते and then you reimburse by producing the bills. आता आदिवासी आश्रमशाळेमध्ये असे केले असते तर it would have been total failure. Therefore, department took this special permission. आदिवासी विकास विभागाकडून शाळेतील मुलांना उन्हाळ्याच्या सुट्टीवर जाताना ५० टक्के ॲडव्हान्स दिला होता. त्यांनी त्या वस्तू घेतल्यानंतर नो बिलिंग जस्ट चेकिंग कि बच्चों ने अपनी टेक्स्टबूक लाए है क्या? Thereafter, department released the second installment to them असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आश्रमशाळेतील किंवा आदिवासी विकास विभागाच्या शाळेतील १०-१५ टक्के मुलांना डायरेक्ट बेनेफिट ट्रान्सफर होतो त्यातून वस्तू घेत नसतील. परंतु, विभागाच्या याचा परिणाम पुढे या योजनेवर होऊ देऊ नये. १०-१५ टक्के पालक हे त्यांच्या पाल्यांना नवीन वस्तू आणून देणार नाहीत. मागच्या वर्षीच्या जुन्या वस्तूच वापरायला सांगतील. परंतु, याचा परिणाम या योजनेवर होऊ देऊ नये याबाबत काळजी घ्यावी. दुसरे म्हणजे डि.बी.टी. हे फक्त १ लाख ४७ हजार एवढ्याच विद्यार्थ्यांना दिले आहे. आपल्या राज्याचा विचार करता ही संख्या फार काही मोठी संख्या नाही. याद्वारे ६२ कोटी रुपये ट्रान्सफरर केले आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता, तो खर्च फक्त १७ वैयक्तिक वस्तूसाठी आहे. ती वेगळी स्लाईड आहे. आता विभागाने जास्त पैसे खर्च केलेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने ६२ कोटी रुपये असतील तर सरकारने लक्ष घालण्याची गरजच नाही. विभागाने हे सी.एस.आर. ला ओपन केले तर लगेच कंपन्या येतील.विद्यार्थ्यांच्या उपस्थिती वाढीबाबत प्रयत्न करावेत असे समितीने सूचित केले असता, च्ण्त्व्ह त्व्ह दृदथ्ऱ ढदृद्ध १७ द्रड्ढद्धह्मदृदड्ढ त्व्ह्ड्ढ्ध्र्ह्म, इसके अलावा विभाग की जो शिकायत आती थी वह टूथपेस्ट, तेल,ल मंजन, साबून, चप्पल की आती थी.रेनकोट पुरवठा आता वैयक्तिक सामानामध्ये घेतला आहे. स्वेटरही यामध्ये घेतला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाने उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये एक कायापालट अभियान हाती घेतले होते. कारण खिडकी नाही, दरवाजे नाहीत, रंगरंगोटी नाही अशा मायनर रिपेअरकरिता स्कूल मॅनेजमेंट कमिटीला ५ लक्ष रुपयांपर्यंतचे अधिकार दिलेले आहेत याकरिता फंडिंग विभागाकडूनच होते. Department have decentralized it. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

हे सर्व बेनेफिट्स फक्त तुमच्या शासकीय आश्रमशाळेलाच आहेत की, इतर खाजगी शाळांनाही आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, It is only for Govt. schools असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अनुदानित शाळेला बाकीची ग्रँट दिली जाते असे मत समितीने व्यक्त केले असता, विभाग त्यांना भाडे देतो, त्याशिवाय त्यांचे वेतन देतो. इतर मुलांना परिरक्षण अनुदान असते. Department had not started DBT to granted schools. Department give it to the institutions. इससे तहलका मच जाएगा असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जो सरकारी आश्रम स्कूल है वह निजी आश्रम स्कूलों से कई गुना हर चीज में सही में अच्छी है. This is our success story. ये ही बात हम निजी स्कूलों को लागू क्यों नहीं कर सकते? अशी विचारणा समितीने केली असता, Committee's suggestion is good but the management of those institutes is private असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Whatever it may be, but ultimately the beneficiaries are adivasi students. असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व याबाबत समितीची ठोस सूचना काय आहे अशी विचारणा केली.

विभागाकडून जे डि.बी.टी. शासकीय आश्रमशाळांमध्ये देण्यात येते ते खाजगी आश्रमशाळांना ट्रान्सफर करावे असे समितीने सूचित केले असता, त्यांचे परिरक्षण अनुदान सध्या कमी आहे. विभाग त्याची प्रतिपूर्ती ते शाळेला रिएम्बर्स करतो असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ते पूर्णपणे वगळण्यात यावे त्यांना ते मिळत नाही. खाजगी विभागाकडून परिरक्षण अनुदान देण्यात येणाऱ्या आश्रमशाळांना ते दोन वेळेच्या जेवणाशिवाय बाकीचे काही पुरवित नाहीत. डि.बी.टी. चा पर्याय खूप चांगला आहे. It should also be applicable to private ashram schools. शाळांच्या अनुदानातून कमी करण्यात यावे असे समितीने सूचित केले असता, There will be big financial liability असे विभागीय सचिवांनी अवगत केले. But ultimately it would be for the benefit of tribal students.

समितीने सूचित केले समितीच्या शिफारसीमध्ये मांडण्यात येईल असे ही समितीची शिफारस असल्याने विभागाने याचा विचार करावा. विभाग एवढे चांगले काम करीत आहात तर पूर्ण काम करण्यात यावे असे मत वित्त विभागाच्या सचिवांनी व्यक्त केले.

At present some students are getting the benefits and some students remain deprived. This is not good for the society असे मत समितीने व्यक्त केले. यानंतर पुन्हा सादरीकरण सुरू झाले. सादरीकरणाच्या वेळी माहिती देताना त्यांना जुन्या शाळांच्या इमारती दर्शविलेल्या आहेत. त्यांना फक्त रंग लावलेला नसून रिपेअरसुद्धा केले आहे. मागच्या वर्षी विभागाच्या ५० आश्रमशाळांचे आय.एस.ओ. सर्टिफिकेशनही झाले आहे. नामांकितमध्ये हा विभागाचा प्लॅन आहे. विभागाने आता स्टेट सिलेक्शन केलेले आहे. रजिस्ट्रेशनपासून ते फंड ट्रान्सफरपर्यंतची पूर्ण सिस्टिम ऑनलाईन आहे. त्याशिवाय विभागाच्या एकलव्य शाळांमध्येही आता मोठ्या प्रमाणात सुधारणा करण्यात येत आहेत. नामांकितमध्ये पूर्ण विद्यार्थी आहेत नामांकितमध्ये आता सॅच्युरेशन झालेले आहे. नामांकितमध्ये आता विभागाला सबस्टँडर्ड स्कूल्स घ्यायचे नाहीत. इंग्रजी माध्यमांच्या प्रायव्हेट स्कूलसाठी खूप मागणी आहे. विभागाचे असे नियोजन आहे की, शासनाने हे केले की, शासनाची आश्रमशाळा विभागाला इंग्रजी माध्यमामध्ये टप्प्या-टप्प्याने रुपांतरीत केली पाहिजे. केंद्र शासनाने मंजूर केलेले एकलव्य स्कूल १४ राज्यांमध्ये आहेत. त्यांची क्षमता वाढवून मंजूर राज्यामध्ये शासनाद्वारे इंग्रजी माध्यमाचे दर्जेदार शिक्षण दिले पाहिजे. आता हे नामांकित व्यवसायासारखे झाले आहे. जिन स्कूलों को हम इन्सपेक्शन करके बंद करते है, वे स्कूल वाले कोर्ट में जाते है या पॅरंट्स को लेकर एटीसी ऑफिस पर मोर्चा निकालते है, क्योंकि उनका पूरा बिजनेस है. या वर्षापासून तेथे एक नॉर्म केला आहे की, कुठल्याही परिस्थितीत विभागाचे स्पॉन्सर्ड कँडिडेट should be less than ५०% in that school. That school should attract market demand, ते विभागाचे नाही तर ते अनुदानित सारखे होणार की, १००% sponsored by the department मग एवढे पैसे खर्च करण्याचा काय उपयोग आहे ? त्यावर सुद्धा सध्या खूप असंतोष आहे. कारण मागे असे निदर्शनास आहे की, विभागाचे ८०० विद्यार्थी आणि १०० त्यांचे स्वतःचे. या पद्धतीने आपल्याला नामांकित सांगता येत नाही. त्यामुळे we have reversed that process. We have created matrix online, पहले स्कूल सेल्फ रिपोर्टींग करता है, उसकी फोटो अपलोड होती है फिर हमारे प्रोजेक्ट ऑफिसर और एटीसी फिजिकल इन्सपेक्शन करते है. उसके बाद विभागकी कमिटी बैठकर उसकी छाननी करके उनको सीट्स अलॉट करती है अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

वह ठीक है. Is department's total focus to modernize Ashram Schools to English schools? अशी विचारणा समितीने केली असता मराठी माध्यमाचा जास्त इशु झाला नाही तर आयडली पालकांना मार्केटमध्ये इंग्रजी माध्यमाचे शिक्षण पाहिजे आहे. त्यामुळे त्यांची नामांकितची एवढी डिमांड आहे. त्यामुळे विभागाला जवळपास २५ टक्के तरी हळूहळू Govt. Residential schools should be converted into English medium schools, त्याला सेमी इंग्रजी माध्यम म्हणतात. त्यामध्ये विज्ञान व गणित इंग्रजीमध्ये असते असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाकडे मोठ्या प्रमाणात रिक्त पदे असल्याने जास्त अडचण होईल. विभागाकडे २५ टक्के रिक्त पदे आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, त्यासाठी कर्मचारी मिळतील. आता विभागाला त्याच्या कर्मचाऱ्यांना लोकांना प्रशिक्षित करावेच लागेल. एक कन्सोलिडेशनही पाहिजे. जास्त दुर्गम भागातील शाळांतील मुलांना जेथे पायाभूत सुविधा चांगल्या आहेत तेथे क्षमता चांगली वाढवून आणली पाहिजे. कारण दुर्गम भागामध्ये आपल्याला शिक्षक मिळत नाहीत. इंग्रजी माध्यमाचे तर अजिबात मिळणार नाहीत. येथे तेच एक अधिन राहील. Therefore, consolidation of schools is also important असे विभागीय सचिवांनी सांगितले.

While selecting the up-gradation of Ashram Schools, department should also think about the availability of required teachers, otherwise your intention will not be fulfilled असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शवली. परंतु, सध्या कॅडर रिक्रुटमेंट असते तिची ज्युरिसडिक्शन ए.टी.सी. आहे. ती सेवाप्रवेश नियमामध्ये बदल करून डिस्ट्रिक्ट करावी लागेल.

समितीचा मुद्दा असा आहे की, विभागाची जी आश्रमशाळा तालुकास्तरावर असेल तेथे विभागाने हे सर्व करावे. विभाग रिमोट प्लेसमध्ये जाणार. चांगल्या ठिकाणी कंसोलिडेटींग केले तरच शिक्षक येतील नाहीत येणार नाहीत. कारण गडचिरोली सारख्या ठिकाणी कोणताही अधिकारी सहजासहजी जात नाही. हीच परिस्थिती जर जवळपास केली तर ते विभागाला वेळेवर उपलब्ध होतात. त्या दृष्टीने विचार करावा कारण तालुका स्तरावर शिक्षकांचे सुद्धा कुटुंब असते. त्यांच्या मुलांना देखील शिक्षण घेण्यासाठी तिथे चांगल्या प्रकारच्या सुविधा असतात. या दृष्टीने चांगले अपग्रेडेशन करायचे असेल तर रिमोट प्लेसच्या ऐवजी तालुकास्तरावर हे सर्व करावे, अशी सूचना समितीने केली असता,

चांगल्या ठिकाणीच कंसोलिडेटींग करणार आहे. विभाग शिक्षकांना पैसे देतो. मुंबई, नवी मुंबई या ठिकाणी दहा महिन्यांसाठी ६०,००० रुपये, सी-ग्रेड महानगरपालिका एरियासाठी ५१,००० रुपये आणि बाकीच्या जिल्ह्याच्या मुख्य ठिकाणी ४३,००० रूपये ज्या मुलांना शासकीय वसतिगृह मिळत नाही त्यांना देतो. आश्रम शाळा कोड डिव्हिजन पण विभागाने केलेले आहे. त्यासाठी मान्यता घ्यायची आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यामधील काय बदलाची माहिती देताना त्यामध्ये अकाऊंटेबिलीटी, ग्रिव्हन्स रिड्रेसल, नवीन कायदे, ॲक्सो आणि आरटीईचे जे नॉर्म्स आलेले आहेत त्यांना सर्व अलाइनमेंट केलेले आहे. नेहमीचे जे आरोग्य, बालमृत्यू, आश्रम शाळांतील संदिग्ध मृत्यु याबाबतचे जे मुद्दे होते त्याबद्दल आपण एक सेसींटीव्ह प्रोटोकॉल घातलेला आहे. देशात लाईफ स्कील एज्युकेशन एकमात्र एवढया मोठ्या स्केलवर केलेले आहे. त्यामध्ये ॲडॉलसन्स इश्यू, रिप्रोडेक्टीव हेल्थ सेल्फ केअर, हेल्थ न्युट्रीशन हायजीन याबाबत महिला व बालविकास विभाग आणि सार्वजनिक आरोग्य विभाग व युनिसेफ सोबत मॉडयुल करून मागील एक वर्षामध्ये इयत्ता ६ वीच्या वरचे जे विद्यार्थी आहेत त्यांच्याशी संवाद साधण्यात येत आहे. २५०० मास्टर ट्रेनर्स, शालेय स्तरावर अधिक्षक, अधिक्षिका आणि ६ मोस्ट सिनियर मेल ॲन्ड फिमेल टिचर या मोडयुल्समध्ये विभागाने ट्रेन्ड केलेले आहेत. It is for health and nutrition. यामध्ये त्यांच्याकडे काही डिसीस किंवा काही विषय होते ते लपवून ठेवत होते. ते आता समोर आलेले आहेत आणि पॉझिटीव्ह व कॉन्फिडेन्शियल मुलांचा यावर चांगला परिणाम झालेला आहे. ही सर्व शिक्षकांची ट्रेनिंग आहे. त्यांना पीएचसीमध्ये बाकीची माहिती देण्यात आलेली आहे. विभागाकडे विज्ञान क्षेत्राचे शिक्षण कमी आहे म्हणून एकलव्य फाऊंडेशन ३० वर्षांपासून या क्षेत्रात काम करीत आहे. त्यामध्ये वैज्ञानिक आहेत तर त्यांच्यासोबत एमओयू करून ४०० आश्रमशाळांमध्ये सायन्स टिचींग ॲन्ड लर्निंगचे पूर्ण टिचरचे ट्रेनिंग, हॅन्डसॉन ट्रेनिंग किट हे सर्व सायन्स युथ क्लब आश्रम शाळामध्ये करण्यात येत आहे. ती प्रॅक्टीकल सायन्सची कन्सेप्ट आहे. त्यांच्या सिलॅबसमध्ये ज्या काही एक्सपिरिमेंट दिलेल्या असतात त्यांच्या हॅन्डसॉन किट आणि त्याला वापरणे हे सर्व त्यामध्ये आहे. त्याशिवाय इंग्रजी बोलणे यासाठी चेन्नईची एक संस्था आहे. 'Karadi Path' म्हणून त्यांची मुलांसाठी गोष्टीची पुस्तके येतात. त्यांच्याशी एमओयू करून विभागाने जव्हार, डहाणू, पालघर आणि नंदूरबारमध्ये पायलट केले होते. आता विभागाकडून या वर्षामध्ये तो स्केलअप १० POs मध्ये करण्यात येत आहे. त्याचे पण चांगले परिणाम आहेत. त्यांचा इंग्रजी शिकविण्याचा हा परिणाम आहे. आता विभागाचा विचार आहे की, या वर्षामध्ये एज्युकेशन रिसोर्स सेल विथ एक्सपर्ट प्रत्येक एटीसी आणि पीओकडे एक उत्कृष्ट हेड मास्टर, अधिक्षक आणि त्या भागामध्ये जे चांगले शिक्षक आहेत त्याचे रिसोर्स सेंटर करायचे. मिशन शौर्यची समितीला माहिती आहे. यासाठी विभागाने मुले पाठवली होती. यामध्ये ५ मुले यशस्वी झाली. माननीय राष्ट्रपती, माननीय पंतप्रधान, माननीय राज्यपाल या सर्वांनी त्यांचे कौतुकही केले आहे. या मुलांची आता परत दुसऱ्या भागाची तयारी होत आहे. ते सध्या रॉक क्लायबिंगसाठी गेलेले आहेत. तेव्हा आपण पायलेट केले होते की, या वर्षामध्ये प्रत्येक विभागाचे ५० खेळाडू मुले आहेत त्यांनी राज्य क्रीडा स्पर्धेमध्ये उत्कृष्ट काम केले आहेत त्यातून विभाग त्यांचे निवड करीत आहोत. आरोग्यविषयक बाबींमध्ये इतर सेंट्रलाईज किचनबद्दल समितीला माहिती आहे. टाटा ट्रस्टसोबत हे केलेले आहे.यामध्ये एस्कॉनकडून त्यांचे डिझाईन आणि टेक्निकल सपोर्ट घेतलेला आहे. विभागाची स्वतःची सेंट्रल किचन कांबळगाव व मुंढेगाव येथे दोन आहेत. आता या वर्षामध्ये अजून ५ किचन करण्यात येणार आहेत ती गडचिरोली, मेळघाट असतील पूणे शहरात एक करण्यात येणार आहे कारण मेस डिबीटी गेल्यामुळे खूप आंदोलने सुरू आहेत. अजून दोन ठिकाणी यासाठी निश्चित करायचे आहेत. त्याचा सर्व्हेक्षण सुरू आहे. Department provide breakfast, lunch, evening snack and dinner. प्रेझेंटेशनमध्ये फोटो में एक जगह पर किचन दिख रही है. स्टीम कुकींग, वेजीटेबल कटींग, फ्रुड टेस्टींग ये सब एक जगह पर होता है. डेढ़ घंटे से ज्यादा समय तक ये फुड रहना नहीं चाहिए. ये कंटेनर है जिसमें फुड स्कूल में जाता है Food sampling of every meal is done and tested. Recording is done. There is a project monitoring unit. प्रायोगिक तत्त्वावर विभाग उर्वी पिरामल फाऊंडेशनसोबत रायगड, रत्नागिरी अशा काही ठिकाणी मोबाईल व्हॅन्सचा चांगला परिणाम झाला अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

राज्यामध्ये किती मोबाईल युनिट आहेत ? what about earlier 150 units? अशी विचारणा समितीने केली असता, आरोग्य विभागाला आदिवासी विकास विभाग आरएसडीकेसाठी १५० व्हॅनसाठी निधी उपलब्ध करीत होता. पण विभागाला पाहिजे तशी सेवा दिली जात नाही. कधी त्यांचा स्टाफ नसतो तर कधी त्यांचा इतर इश्यु असतात. त्यामुळे या वर्षापासून ७ ऑक्टोबरला विभाग व्हॅन्स लॉंच करणार आणि दुर्गम

भागामध्ये जेवढे सोलार प्रकल्प आहेत त्यामध्ये बीव्हीजीसोबत विभागाचा करारनामा झालेला आहे. बीव्हीजीला विभाग ॲडीशनल कंपोनंट, मुलांचे इलेक्ट्रॉनिक हेल्थ कार्ड सांगून आश्रम शाळेवर आम्ही ते मुक्कामी करणार आणि एक एक ambulance will be covering 8 to 11 schools. So there will be a dedicated parallel health serviceu for ashram shala from this year. This ambulance will be having a Doctor, a Nurse and a Psychologist. यदि कोई इमर्जेंसी आ गई तो वे रिमोट ट्राईबल एरिया से अन्य लोगों को भी अपनी सेवा देंगे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आज की तारीख में भी बीव्हीजोकी मोबाईल यूनिट चालू है असे समितीने निदर्शनास आणले असता, वह नव संजीवनी क्षेत्र में चालू होती है. It is a substitute to Sub-centre. It is not dedicated to our Ashram School असे विभागीय सचिवांनी सांगितले.

They are dedicated to entire tribal area. देवरी, सालेपट्टा या ठिकाणी प्रत्येक तालुक्याला एक-एक मोबाईल युनिट त्यांनी दिलेली आहे. However, for that funding was done by Tribal Development Department? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

Now, department creating arrangements for Ashram Schools only. विभागाने पहले गृह विभाग की स्टडी की. कि, उनके ॲम्बूलेंस और भरारी पथक ने किस एरिया में सेवा दी उसके बाद में विभागने खुदकी क्लस्टर मॅपिंग की है. उनके साथ यह अंडरस्टॅण्डींग रहेगी कि उन्हीं का कंट्रोल रुम रहेगा ताकि विलेजेस ओव्हर लॅप न हो. या ठिकाणी विभागाचा फोकस यासाठी आहे की, तो दुर्गम भाग आहे, तिथे हेल्थ सेंटर पण जवळ नाही, पीएचसी लांब आहे, ट्रान्सपोर्ट फॅसिलीटी तेवढी नाही. वेळेअभावी किंवा ट्रान्सपोर्ट अभावी we have a regular health system for our children. डॉ. साळुंखे समितीचा अहवाल आणि बाकीच्या पेपरमधील काही बातम्या हे नेहमी आरोग्याच्या विषयावर असतात त्यामुळे Department are trying to create this. Amrut Aahar Yojana is another programme for which department giving funds to WCD. हे एकमेव आहे की, ज्या गरोदर महिला आहेत त्यांना यामध्ये गरम जेवण देण्यात येते. This scheme is already in Women and Child Care Department. This Tribal Development Department scheme. This is not women and child care department's scheme यामध्ये ते पॉकेट देतात. त्यांचा टीएचआर (Take Home Ration) आहे. या ठिकाणी गावात अंगणवाडीमध्ये मील समिती आहे. बायकांना तिथे बोलावून घेतले जाते. गरोदर मातांना आणि कुपोषित मुले यांनाच जेवण देण्याचे काम या योजनेखाली होत असते त्यांना लसीकरण आणि टीएचआर पॉकेट आणि मुलांना खिचडी देण्यात येत होती. यामध्ये त्यांची आयसीडीएसची पोषण आहारची जी सप्लीमेंट आहे त्याव्यतिरिक्त लहान मुलांना चार वेळा अंडी व केळी आणि गरोदर मातांना जेवण, शिजवलेले गरम अन्न (Hot cooked meal) देण्यात येत आहे. This is prepared locally in the village. This is prepared only for tribal mothers. बीव्हीजीचे यापूर्वीच सांगितले आहे. त्याशिवाय department trying to create Health Insurance Scheme for Tribal children. Livelihood साठी विभाग राज्यामध्ये जवळपास मोठ्या प्रमाणात वन हक्क कायद्यामध्ये हक्क दिलेले आहेत. १ लाख २८ हजार आदिवासी कुटुबांना ६.७५ गावांमध्ये वैयक्तिक पट्टे दिलेले आहेत. बरेचसे बाबू सेंटर, इनकम जनरेशनची योजना, एसआरएलएम सोबत विभाग नियोजन करीत आहे. या वर्षामध्ये विभागाने बरेच नॉलेज पार्टनरशिप विविध युनिव्हर्सिटीज सोबत केलेली आहे. या वर्षामध्ये विभाग एक हेल्थ कमांड सिस्टिम आणि इलेक्ट्रॉनिक डेटा सिस्टिम करणार आहे. तेलंगणा राज्याची एक एक्सपिरिमेंट पाहिली होती, त्याद्वारे ती विभागाकडून ते करण्यात येत आहे. बीव्हीजीसोबत Life Support Ambulance with AYUSH Doctor for 24*7 services हे डिप्लॉय करण्यात येत आहे. मिशन शौर्य बद्दल समितीला माहिती आहे. त्याशिवाय फारमर्स प्रोड्युसर कंपनी, ट्रायबल फारमर्स असा मोठा स्केल करण्यासाठी ३० हजार शेतकऱ्यांसाठी विभागाचा प्रकल्प आहे. यामध्ये जे सर्व आदिवासी भाग आहेत त्यामध्ये त्या टीमने २ महिने अभ्यास केलेला आहे की, कोणत्या ठिकाणी काय वाव आहे काय म्हणजे व्हॅल्यू ॲडिशन फॉर ॲग्रीकल्चर आणि काही वन उत्पादन असेल. मग त्यावर लघु उद्योगाचे नियोजन करायचे आहेत. जे एक्झीसटींग इन्फ्रास्ट्रक्चर आहे त्याला विकसित करून त्याची मार्केटींग आणि ब्रँडींगसाठी बाहेरच्या एजन्सीकडून मदत घेण्यात येणार आहे. अशाप्रकारे त्यांच्या फिल्ड व्हिजीट झालेल्या आहेत त्यांना तो आराखडा सादर करायचा आहे. बरेचसे इनोव्हेटीव्ह प्रोजेक्ट आपण सेंट्रल असिस्टंट खाली घेत आहोत. अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

परिच्छेद क्र. २.२.२.५ बद्दल माहिती देताना त्याबद्दल आपल्याला काय बोलायचे आहे.विभागीय सचिवांनी सांगितले की, यामध्ये समितीने विचारले होते की, विभागाचे ताराचे असे निरिक्षण होते की, विभागाने काही बेंचमार्क ठेवले नाही, त्याला टाईमटेबल करून दिला नाही, त्याचे मुल्यांकन कसे होणार आहे आणि त्यामुळे विभागाचे काही पेमेंट ॲक्सेस झालेला काय ? असे ते निरिक्षण होते आणि याबद्दल विभागाचा पुढचा

काय प्लॅन आहे ? यामध्ये विभागाने समितीला उत्तर दिले होते ते प्लॅन बद्दल दिले नव्हते. त्यावर विभागाने चर्चा करून असे ठरले की, विभाग आता ते संगणक वर्ग करणार आहे त्यामध्ये स्वतःच्या कंप्युटर लॅब विभागाकडून लावण्यात येणार आहेत. सीबीएससीचा कंप्युटरचा जो अभ्यासक्रम आहे त्याचेच मराठीकरण करून विभाग शिक्षकांना कंत्राटी तत्त्वावर घेणार आहे. कारण कंप्युटर प्रशिक्षणासाठी विभागाकडे टिचर कंत्राटी तत्त्वावर आता जसे क्रीडा शिक्षक नियुक्त केले तसेच कंत्राटी पद्धतीने विभागाकडे शिक्षणांची मंजूर पदे नाहीत. कंप्युटर शिक्षक नियुक्त करण्यात येणार आहेत. ज्या ग्रँटेड शाळा आहेत त्यांना विभाग कंप्युटर शिक्षण सुरू करायला देणार नियुक्त करण्यात येणार आहेत. असे याबद्दलचे नियोजन आहे. समिती का एक मुद्दा था कि बच्चों को १०० प्रतिशत पेमेंट अटेंडन्स पर दिया गया था. इसके बारे में एटीसी समिती का विस्तार से बताएंगे. इन्होंने वापस जाकर वह रेकॉर्ड देखे थे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने मल्टीप्लाय बाय ६० करके सब पेमेंट कर दिया है. वहां पर जितने एनरोल है, उतनो को पेमेंट दी हि बाब समितीने निदर्शनास आणली असता, दिनांक ६ जुलै, २०१८ रोजी कॅफो एटीसी, प्रकल्प अधिकारी डहाणू आणि सहायक लेखा अधिकारी एटीसी ठाणे व सहायक प्रकल्प अधिकारी, प्रकल्प कार्यालय, डहाणू अंतर्गत नवीन समिती स्थापन केली होती. त्यांनी पॅरल स्कूलची तपासणी करून सर्व दौरे केले आणि त्यांनी अहवाल पण सादर केलेला आहे. त्या अनुषंगाने हा तीन वर्षांचा कार्यक्रम होता. त्यानुसार तीन वर्षाचे कॉन्ट्रॅक्ट केले होते त्या तीन वर्षांमध्ये त्यांना १० कंप्युटरच्या अनुषंगाने प्रदान करावयाचे होते. पहिल्या वर्षाचे ६ सेक्शन होते तर मुख्याध्यापकांनी ४ उपलब्ध केले आहेत. आता त्यांनी पूर्ण १० कंप्युटर उपलब्ध केले आहेत अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

प्रत्येक शाळेला १० कंप्युटर उपलब्ध करून द्यायचे, अशी विभागाची अट होती. पण ते १० कंप्युटर त्यांनी पुरविलेच नाही, असे महालेखाकारांचे निरिक्षण आहे. किती लोकांनी प्रशिक्षण घेतले ते न बघता जेवढया मुलांनी नाव नोंदणी आदिवासी विकास विभागाच्या शाळेमध्ये आहे. Department made entire payment by multiplying it by 60, is the main discussion in the said para असे समितीने निदर्शनास आणले असता, त्यामध्ये किती तफावत आहे म्हणजे जास्त किंवा कमी कंप्युटर पुरवले असतील तर ते अहवालामध्ये आहे. सन २०१०-११ मध्ये ७१ हजार ५७१ रुपयांचे कंप्युटर प्रदान आणि सन २०११-१२ मध्ये २५ हजार ९७१ पेक्षा जास्त रुपयांचे कंप्युटर दिलेले होते. सन २०१२-१३ मध्ये कमी प्रदान केलेले आहे ते म्हणजे २२ हजार ६८२ रुपये सन २०१३-१४ मध्ये ७९ हजार ४४७ रुपये कमी प्रदान केलेले आहेत. सन २०१४-१५ मध्ये ५२ हजार ११९ रुपये कमी प्रदान केले होते. त्यांना जास्त कंप्युटर प्रदान केले गेले आहेत असे समजू शकत नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सर्व लेखे तपशीलवार तपासलेले आहेत आणि वर्षनिहाय ते कमी किंवा जास्त दिलेले आहे. ९ महिन्यांचे पैसे दिलेले आहेत. तर पूर्ण ९ महिने ते प्रशिक्षण दिले होते काय?अशी विचारणा समितीने केली असता, त्या अहवालाच्या प्रती समितीला दिल्या. त्यांचा कॉन्ट्रॅक्ट असा होता की, जे ५ वी ते १०वी ची मुले होती त्यांना १२ Hrs/week होते आणि १० ते १२ च्या मुलांना १६ Hrs/week होते. त्यांना कमीत कमी आकडयामध्ये प्रति शाळा१० पर्यंत १२ तास आणि १२ वी पर्यंत १६ तास असे प्रशिक्षण देण्याची गरज होती. त्यांनी तासाप्रमाणे प्रशिक्षण दिलेले आहेत. जर ८ किंवा ९ महिन्यांचे बघितले तरी त्यांनी तास पूर्ण केलेले आहेत. त्यांनी तासाप्रमाणे दिलेले आहे. आठ ते नऊ महिन्यांचे तास पूर्ण करण्यात आलेले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

याचा अर्थ नऊ महिन्यांमध्ये जेवढे तास देणे आवश्यक होते तेवढे तास त्यांनी सहा महिन्यांमध्ये दिलेले आहेत परंतु एवढे चांगले प्रशिक्षण देऊनही विद्यार्थ्यांना संगणकाचा कि-बोर्ड वापरता येत नाही. ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, मुख्याध्यापकांनी त्या सर्व मुलांची परीक्षा घेतलेली होती. त्यामध्ये ते सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत, अशा प्रकारचा अहवाल मुख्याध्यापकांनी दिलेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

दहा संगणकांच्या ऐवजी सहा संगणक दिलेले आहेत. उर्वरित चार संगणक मुख्याध्यापकांनी आणलेले आहेत. ते चार संगणक मुख्याध्यापकांनी कोठून आणले आहेत? दहा संगणक द्यावयास पाहिजे होते. परंतु त्याऐवजी सहाच संगणक देण्यात आलेले आहेत. याचा अर्थ यामध्ये निश्चितपणे फेरफार करण्यात आलेला आहे असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, सन २००९-१० मध्ये सहा संगणक दिलेले आहेत आणि मुख्याध्यापकांनी चार संगणक त्या वर्षी आणले आहेत. परंतु पुढील वर्षी चार संगणक देण्यात आलेले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

चार संगणक मुख्याध्यापक कशा प्रकारे देऊ शकतात ? ते त्यांचे काम नाही. त्यांनी ते कोठून आणले होते ? संगणक पुरविण्यासाठी तीन वर्षांचा करार करण्यात आलेला होता. कंपनीने/कंत्राटदाराने दहाऐवजी सहा संगणक दिले. ज्या व्यक्तीला याबाबतचे कंत्राट दिले होते त्या व्यक्तीने दहा संगणक पुरवावयाचे होते. परंतु त्या कंपनीने किंवा कंत्राटदाराने दहा ऐवजी सहा संगणक पुरविलेले आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, परंतु यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याला शिक्षणापासून वंचित राहवे लागले नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

मुख्याध्यापकांनी उर्वरित चार संगणक कोठून आणले ? त्या शाळेमध्ये चार संगणक होते का ? अशी विचारणा समितीने केली असता, ते चार संगणक शाळेमध्येच होते. याबाबतच्या अहवालामध्ये तसे नमूद करण्यात आलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जर प्रशिक्षण देण्यासाठी त्या ठिकाणी संगणक उपलब्ध असतील तर नवीन संगणक घेण्याचे प्रयोजन काय होते ? ज्या ठिकाणी किंवा शाळांमध्ये संगणक आहेत त्या ठिकाणी भाड्याने किंवा नवीन संगणक घेण्याची आवश्यकता नव्हती असे मत समितीने व्यक्त केले. असता, यदि ४ और ६ कंप्युटर लगाए तो कुल १० कंप्यूटर हो गए। यदि ६ कंप्युटर लगाए है तो ६ का ही पेमेंट करना चाहिए। १० कंप्यूटर का पेमेंट दिया है। कह रहे है कि अगले साल उसने ज्यादा कंप्युटर लगा दिए थे। असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अगले साल तो दस ही कंप्युटर लगाए होगे ना ? अशी विचारणा समितीने केली असता, ये तीन साल का काम है असे विभागीय सचिवांनी सांगीतले असता.

एक साल में उसने ४ कंप्युटर नहीं दिये, केवल ६ ही कंप्युटर दिये। अगले साल उसने पूरे दस कंप्युटर लाये। असे समितीने निदर्शनास आणले असता, The school had provision of 4 computers plus 6 computers. So, the payment has been done as per the number of teaching hours, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागने उसको दस कंप्युटर के पैसे दिए। चार कंप्युटर के पैसे स्कूल को दिए या फिर पहले साल में उसने क्या किया ? पहले साल में उसने ६ कंप्युटर दिए और ४ कंप्युटर का पेमेंट आपने उसको ज्यादा का दिया. जो कि स्कूल ने प्रोवाईड किया था। स्कूल ने जो चार कंप्युटर प्रोवाईड किये थे। उसका पैसा किसको गया ? अशी विचारणा समितीने केली असता, कम्युलेटीव बाद में हुआ है सर। मैंने शुरु में ही बताया है। ये पहले तीन साल और बाद में दो साल एक्सटेन हुआ है। असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२० हजार रुपये, २५ हजार रुपये, ४० हजार रुपये कम किये है। विभागने टोटल पेमेंट का कितना प्रतिशत कम किया है ? विभाग का जो फिगर आ रहा है। वह २-३ प्रतिशत से ज्यादा नहीं है। असे विभागीय सचिवांनी सांगितले.

In fact, it is less than that. असे विभागीय सचिवांनी सांगितले. It means there was 100% attendance. Committee's objection is regarding training given to the total enrolled students under the scheme. विभागीय प्रतिनिधीनी बताया कि पूरा पैसा नहीं दिया, कुछ कम करके दिया है। कम किया तो कितना कम किया ? एक प्रतिशत कम किया। अशी विचारणा समितीने केली ;

आपका कहना था कि आपने उसको तीन साल कम पैसा दिया। क्या इस बारे में कम ज्यादा करने का कोई सिस्टम था, या ऐसा ही ॲडव्हॉक बेसिस पर चल रहा था ? अशी विचारणा वित्त सचिवांनी केली असता, शुरूवात में उसको दो साल ज्यादा पैसा गया था और बाकी के तीन साल उसको कम पैसा गया है।

It was based on the attendance of students. इसको दस के प्रमाण से निकालेंगे तो दस के प्रमाण से पहले ज्यादा पैसा जा रहा था, और दस के प्रमाण में बाद में ऑन दी बेसिस ऑफ स्टूडंट अटेंडन्स, उसको कम पैसा गया है। बाद में ये चेकींग लेखा अधिकारी, प्रकल्प अधिकारी तथा प्रकल्प कार्यालय, डहाणू, सहाय्यक लेखा अधिकारी, सहाय्यक आदिवासी आयुक्त, ठाणे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी यांनी तपासणी केली होती असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

या सर्वांनी केव्हा तपासणी केली होती ? सन २०१०-११ चे सदरहू प्रकरण आहे. या प्रकरणाला आता सात ते आठ वर्षे होत आहे. असे असताना जर विभागाकडून आता तपासणी होणार असेल तर त्यामुळे सत्य परिस्थिती कळून येणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता, केवळ १३ शाळांचीच तपासणी करण्यात येणार आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ज्यावेळी महालेखापालांनी हे सर्व आक्षेप नोंदविले ते त्यावेळच्या मुलांची उपस्थिती पाहून आणि इतर सर्व बाबी पाहून नोंदविलेले आहे. The Secretary, Tribal Development Department accepted the objection raised by the A.G. It is noted here that the Secretary, TDD accepted the observations of audit and agreed to review the scheme. असे मत समितीने व्यक्त केले असता, Tribal Development Department has stopped that scheme.

This audit para is regarding irregularities committed during that period. This was accepted by the department. What action are you going to take against them? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाला जर तीन ते चार महिन्यांचा कालावधी मिळाला तर वसुलीची कार्यवाही करता येईल असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

विभागाच्या सचिवांनी या विषयाबाबत स्पष्टपणे आश्वासन दिले पाहिजे असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली व आश्वस्त केले.

या प्रकरणामधील रेकॉर्ड विभागाला प्राप्त झाला नाही तर काय कार्यवाही करण्यात येणार ? अशी विचारणा समितीने केली असता, एका महिन्याच्या कालावधीमध्ये तेरा शाळांच्या रेकॉर्डची पाहणी केलेली आहे. अजून तीन ते चार महिन्यांचा कालावधी मिळाला तर सर्व शाळांच्या रेकॉर्डची पाहणी करणे शक्य होईल असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

ज्या तेरा शाळांची तपासणी विभागाने केली आहे त्यांचे रेकॉर्ड महालेखापालांकडे आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, Department will submit the reports of 13 schools. Committee can have a look at it. If there are any queries, Committee call the team which inspected it. If there is a case of recovery, will do it. अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

Recovery of pecuniary loss is not a punishment. यदि सरकार को किसी चीज में मॉनिटरी लॉस होता है, यदि आप उसको रिकवर कर ले तो वह पनिशमेंट नहीं है. यह एक स्टेप आगे है असे महालेखाकारांनी सूचित केले असता, Administrative action is only on the Headmaster, staff or the supplier असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आता पुरवठादाराला वाचविण्याचे प्रयत्न होत आहेत. त्यावेळच्या मुलांचे शिक्षणाचे झालेले नुकसान आता पुन्हा भरून येणार नाही. आज विभागाचे अधिकारी सांगत आहेत की, मुलांना संगणकाचे प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. परंतु प्रशिक्षण घेऊनही त्यांना जर कि-बोर्ड ओळखता येत नसेल प्रशिक्षणाचा दर्जा काय असेल, याची माहिती येऊ शकते असे मत समितीने व्यक्त केले असता, परिच्छेदाच्या अनुषंगाने विभागाने कशा प्रकारे कार्यवाही करावी, याबाबत समितीने मार्गदर्शन करावे. विभागाने जी काही तपासणी केली आहे ती समितीला सादर करण्यात येईल. Whatever records of those schools are available with the A.G., यामध्ये काही तफावत असेल तर समितीने तशा प्रकारे सांगावे किंवा आता या परिच्छेदाबाबत समितीने विभागाला मार्गदर्शन केले तर त्याप्रमाणे विभागाला कार्यवाही करता येईल, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लोकलेखा समितीचा हा अहवाल मार्च, २०१६ मध्ये सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला आहे. आता या परिच्छेदावर अडीच वर्षानंतर चर्चा करण्यात येत आहे. हे सर्व आक्षेप विभागाने स्वीकारलेले आहेत. परंतु आता ज्यावेळी साक्ष घेण्यात येत आहे त्यावेळी विभागाने सर्व कार्यवाही करून समितीच्या साक्षीपुढे उपस्थित राहिले पाहिजे. अशा प्रकारची समितीची अपेक्षा असते. अशाच प्रकारचे प्रश्न सामाजिक न्याय विभागाच्या साक्षीवेळी उपस्थित झाले होते. त्यावेळी एक उप समिती नियुक्त केली होती. त्या उप समितीने या सर्व बाबी तपासल्या होत्या.समितीला अशी अपेक्षा असते की, the lapses which have been accepted by the department, त्यावर ॲक्शन घेऊनच या समितीसमोर आले पाहिजे. या सर्व परिच्छेदांवर विभागाने कार्यवाही करावयास पाहिजे होती. आता जर विभागाने रेकॉर्डची पाहणी करावयाचे ठरविले तर आता काहीही रेकॉर्ड त्या ठिकाणी मिळणार नाही. महालेखापाल केवळ एक टक्के पॅरा पाहत असते. असे असताना विभागाने सांगितले आहे की, पैसे कपात करण्यात आलेले आहेत. ते देखील एक टक्क्यांपेक्षा कमी करण्यात आलेले आहेत. याचा अर्थ ९९.९९ टक्के विद्यार्थ्यांची उपस्थिती होती. दहा संगणक द्यावयास हवे होते. परंतु त्यापैकी केवळ सहा संगणक देण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. परंतु संगणक देण्यात आलेले नाहीत. हे सर्व विभागाचे लॅप्सेस आहेत.

कोणत्या संस्थेद्वारे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे ? शांतीलाल फाऊंडेशन ही संस्था होती. करारामध्ये जे काही नमूद होते त्याप्रमाणे संगणक पुरवावयास पाहिजे होते. नऊ महिन्यांचे प्रशिक्षण होते. ते विहित वेळेत पूर्ण करण्यात आलेले नाही. प्रशिक्षणाचे तास पूर्ण केलेले नाहीत. त्याचप्रमाणे अनेक त्रुटी या परिच्छेदामध्ये आहेत. त्यामुळे याबाबतचा संपूर्ण अहवाल एक महिन्याच्या आत महालेखापालांना सादर करण्यात यावा. अहवाल पाठविल्यानंतर एक महिन्याच्या कालावधीमध्ये पुन्हा विभागाची साक्ष घेण्यात येईल. एक महिन्यामध्ये विभागाने महालेखापालांसोबत व्हेटींग करून घ्यावी. त्यामध्ये जर महालेखापालांचे समाधान झाले तर साक्ष घेण्याची आवश्यकता राहणार नाही आणि त्यांचे जर समाधान झाले नाही तर त्यावर योग्य कारवाई करण्यात येईल. सामाजिक न्याय विभागामध्येही अशाच प्रकारचे एक प्रकरण समोर आले होते. त्या प्रकरणामधील कंत्राटदारावर गुन्हे नोंदविण्यात आले होते. अगोदर विभागाचा अहवाल समितीला प्राप्त झाला पाहिजे. त्यानंतर मग पुढील कारवाई करता येईल असे मत समितीने व्यक्त केले.

परिच्छेद क्र. २.२.२.६ यामध्ये टक्केवारीप्रमाणे रिव्हाईस मॅपींग करण्याबाबत सांगितले होते. त्या प्रस्तावाची एक प्रत समितीला सादर करण्याबाबत समितीने दिनांक ०६ जून, २०१८ रोजी सांगितले होते असे समितीने निदर्शनास आणले असता, रिमॅपिंग बाबतची कार्यवाही करून समितीला सादर करण्यात येईल. हम प्रस्ताव तैयार कर रहे है. शासन को प्रस्ताव दिया ऐसी बात नहीं है. विभागने उनको बताया था कि ये राजनीतिक, संवेदनशील विषय है. उनको ऑफ दी रेकॉर्ड बताया था. इस पर पहले चर्चा होगी और बाद में प्रस्ताव सादर होगा. विभागने अपनी ओर से तैयारी कर ली है, ऐसा बताया था. इससे अनुसूचित जनजाति मतदार क्षेत्र पर परिणाम होगा असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

लेटेस्ट सेन्ससवर रिमॅपिंग झाले पाहिजे, असेही सांगण्यात आलेले होते. ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शवून आता विभागाने जिल्हाधिकाऱ्यांकडून सेन्ससचे मॅप तयार केलेले आहे असे सांगितले.

विद्यार्थ्यांच्या ९० दिवसांच्या गणवेशाबाबत माहिती देण्यात यावी. यासाठी किती कालावधीची मर्यादा देण्यात आलेली होती ? पुरवठादाराने आश्रमशाळांना कधी गणवेश पुरवठा केला, त्यांचे व्हॉऊचर, विद्यार्थ्यांना किती तारखेस गणवेश वाटप करण्यात आले, त्याची माहिती समितीला अवगत करावी. दिनांक २० जून २०१८ रोजी याबाबतची साक्ष घेण्यात आली होती. त्यावेळी याबाबत विभागाला निदेश देण्यात आलेले होते. त्यामुळे याबाबतची माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, यासाठी तीन महिन्यांची कालमर्यादा होती.

आपण परिच्छेद क्र.२.२.३.१ वर चर्चा केलेली आहे. आपल्याला आता परिच्छेद क्र.२.२.३.२ पासून पुढील परिच्छेदांवर चर्चा करावयाची आहे. अजून सादरीकरण शिल्लक आहे काय ? आपण काही परिच्छेदांच्या संदर्भात ॲडिशनल रिप्लाय संदर्भात कागदपत्रे दिलेली आहेत. ज्यावेळी ते परिच्छेद चर्चेला येतील त्या त्यावेळी आपण त्यावर चर्चा करू आणि आपण जो ॲडिशनल रिप्लाय दिलेला आहे तो गृहीत धरू. मघाशी परिच्छेदावर चर्चा सुरू केल्यामुळे हा मुद्दा उपस्थित केला. सादरीकरण करावयाचे असेल तर ते पूर्ण करून घ्यावे. जेणेकरून सादरीकरणाचा विषय अपूर्ण राहणार नाही. असे मत समितीने व्यक्त केले असता,

सादरीकरण अजून बाकी आहे. परंतु, परिच्छेद चर्चेला घ्यावयाचे का सादरीकरण बघावयाचे हे समितीने ठरवावे. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने व्हिजन डॉक्युमेंट तयार केलेले आहे. समितीने ते बघून घ्यावे, अशी विनंती विभागीय सचिवांनी केली असता, सादरीकरण पूर्ण करून घेऊ. जेणेकरून सादरीकरणाचा विषय संपेल. आपण व्हिजन डॉक्युमेंटच्या आधारावरच साक्ष घ्यावी. आपण १५ मिनिटात प्रेजेंटेशन पूर्ण करावे. असे समितीने सूचित केले.

विभागाच्या सादरीकरणादरम्यान माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, विभागाने व्हिजन अँड ॲक्शन प्लॅन तयार केलेला आहे. The Department has Vision for Education. सादरीकरणातील व्हिजन एज्युकेशन प्लॅनमध्ये माईलस्टोन दिलेले आहेत. उसमें विद्यार्थी का पूरा का पूरा, १०० प्रतिशत आधार, रजिस्ट्रेशन और सिडींग. All scholarships, all transfers that happen to students can be verified. Conversion of Ashram Schools to English medium in a phased manner. 100% filling of posts. सध्या आश्रमशाळांमध्ये व्होकेशनल ट्रेनिंग एज्युकेशन नाही. परदेशातील अभ्यासक्रमाप्रमाणे इयत्ता ८ वी नंतर मुलांचे कॅलिबर बघून तेथे व्होकेशनल ट्रेनिंग असले पाहिजे. 100% ISO certification of Ashram schools. राज्याचा जो जीईआर आहे गर्व्हमेंट रेश्यो २०३० पर्यंत करणे हे खूप मोठे चॅलेंज आहे. It should be taken to 100%. किमान ५० टक्के विद्यार्थी कॉजेल पर्यंत गेले पाहिजेत. अशी सादरीकरणात माईलस्टोनचे पाट्र्स दिसत आहेत. विभागाकडे अडचण अशी आहे की, आता आमच्याकडे केवळ आट्र्स आणि सायन्स सुरू आहे. कॉमर्स सुद्धा स्ट्रीम नाही. सीबीएसईमध्ये इयत्ता १० वी व १२ वी मध्ये किती तरी सब्जेक्ट इन्ट्रोड्युस आहेत. कॉमर्स सुद्धा सुरू झाले पाहिजे. At least Commerce should be introduced in Government Ashram Schools because it has lot of carrer opportunities. दूसरी बात यह है कि जो सीनियर सेकेण्डरी है, त्याचे विभाग धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी कॅबिनेट नोट तयार करीत आहे की, ज्या ठिकाणी १० वी आहे तेथे आपोआप ११ वी व १२ वी म्हणजे अतिरिक्त वर्ग व तुकड्यांसाठी मंत्रिमंडळाकडे जावे लागते ते आदिवासी भागासाठी ३-४ वर्षापासून Government has not sanctioned anything for Aided Ashram Schools. आठवी कक्षा के बाद बच्चों का ड्रॉपआऊट बहुत है. Four-fold increase in tribal students beneficiary of post-matriculation scholarship scheme. कम से कम ये चार गुना बऱना चाहिए. सब बच्चे हायर एज्युकेशन में जा रहे है. Career Counselling and Scholarship Cell at Cluster level.Department going to start at pilot level three career counselling and scholarship cells. Today, there is no such thing in Government Ashram Schools. सर्व शासकीय आश्रमशाळांमध्ये शिक्षण आर्ट, कॉमर्स व सायन्स अशा तिन्ही स्ट्रिमचे इन्ट्रोडक्शन असावयास पाहिजे हे विभागाचे सर्व बेंचमार्क आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मध्यंतरी केजी टू पीजी ही संकल्पना तयार करण्यात आली होती. त्या संदर्भात प्रगती झालेली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ती संकल्पना काय होती याबाबत माहिती नाही. परंतु, ओरीसामध्ये KIITS आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

श्री. बबनराव पाचपुते आदिवासी विकास मंत्री असताना ठाणे, पालघर, गडचिरोली सारख्या आदिवासी भागात केजी टू पीजी अशा दोन शाळा असावयास पाहिजेत अशी संकल्पना मांडण्यात आली होती. विशेष म्हणजे आदिवासी भागात एकाच कॅम्पसमध्ये केजी टू पीजी अशा दोन शाळा झाल्या तर सर्व होईल अशी संकल्पना पूर्वी होती. ते रेकॉर्डवर सुद्धा आहे. That has been observed from Odisha. याबाबत माहिती आहे काय ? विभागाने व्हिजन डॉक्युमेंटमध्ये याचा समावेश केला पाहिजे, असे समितीने सूचित केले असता, व्हिजन डॉक्युमेंटमध्ये त्याचा समावेश करण्यात येईल. विभाग या संदर्भात खूप गंभीर आहे. On this, department require support of the Finance Department and the Chief Ministerus Office. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Department need Central Assistance also असे मत समितीने व्यक्त केले असता, यह कलींग इन्स्टीट्युट और टेक्नॉलॉजी के आधार पर है. तेथे २५ हजार आदिवासी विद्यार्थी एकाच कॅम्पसमध्ये आहेत. तेथे विद्यार्थी इयत्ता पहिलीमध्ये ॲडमिशन घेतात आणि पोस्ट ग्रुज्युएशन करून बाहेर पडतात. तो इंटरनॅशनली रेकग्नाईज कॅम्पस आहे. इतर देशातील माननीय पंतप्रधान, राष्ट्रपती तेथे भेट देतात. त्यांना मोठ्या प्रमाणावर बाहेरुन डोनेशन देखील मिळते. त्यांचा स्टेट ऑफ दी आर्टस असा कॅम्पस आहे.

संस्थापकांचे नाव आठवत नाही. आता ते संसदेचे सदस्य आहेत. त्यांच्या बरोबर चर्चा झाली होती. त्यांचे असे म्हणणे होते की, याबाबत मुख्यमंत्री महोदयांकडे विचारणा करावी. आंध्र प्रदेश सरकारने त्यांच्या बरोबर करारनामा केलेला आहे. त्यांच्या बरोबर प्राथमिक चर्चा केली होती की, they are willing to help us set up and help us manage similar institute only if State Government is willing to give land. त्यांनी ते कशा पद्धतीने स्थापन केले याबाबत ते संपूर्ण टेक्निकल सपोर्ट, मॅनेजमेंट सपोर्ट देतील. हे महाराष्ट्र राज्यात झाले तर अतिशय चांगले होईल.ल कारण ते अतिशय सुंदर आहे आणि it will have a remarkable impact. कारण, आता ५०० शाळांमध्ये १ लाख ८० हजार आणि विभागाचे संपूर्ण रिसोर्सेस थिंनली डिस्ट्रीप्रयुट होते. त्यातून जे कॉंक्रीट आऊटपूट मिळावयास पाहिजे ते सुद्धा दिसत नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मुलाने त्या कॉलेजमध्ये प्रवेश घेतल्यानंतर तो पोस्ट ग्रुज्युएट होऊनच बाहेर येईल. त्यामुळे त्या मुलाला करीअरची सुद्धा काळजी करावी लागणार नाही. ओरीसामध्ये अशा प्रकारचे चांगले कॅम्पस आहेत. त्यावेळी महाराष्ट्र राज्यात तशी संकल्पना मांडण्यात आली होती. All these things are on paper असे मत समितीने व्यक्त केले.

Department can move the proposal. विभागाची अशी धारणा होती की, विद्यार्थ्यांना इयत्ता ११ वी १२ वी पर्यंत शिक्षण द्यावयाचे आणि त्यानंतर ते पोस्ट ग्रॅज्युऐशनसाठी इतर कॉलेजेसमध्ये मर्ज होतील. जेणेकरून त्यांना समान दर्जाचे शिक्षण मिळेल आणि ते स्पर्धेसाठी तयार होतील. परंतु, विभागाला सेपरेट करावयाचे असेल तर या संदर्भात धोरणात्मक निर्णय घ्यावा लागेल. विभाग स्तरावर याचा अभ्यास करावा असे मत वित्त विभागाच्या सचिवांनी व्यक्त केले असता, It is not excluding. It is consolidating education facilities such as hostel accommodation, sports activities, etc are provided at campus in one place. It is worth visiting. It is very remarkable. Odisha Government also runs other Ashram Schools. It is not that they have closed down. This campus is an unique experiment. व्हिजन डॉक्युमेंटमध्ये त्याचा समावेश करण्यात येईल.विभागाला त्यासाठी पदांची आवश्यकता आहे. विभागाला कॉमर्ससाठी पद निर्मिती करावी लागेल. त्याप्रमाणे इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलप करावे लागेल. हॉस्टेल, क्लास रुम्स, लायब्ररी, लॅब्स तयार कराव्या लागतील. तसेच, इंग्रजी माध्यमासाठी प्रशिक्षित स्ट्राफची नियुक्ती करावी लागेल. Consolidation of Ashram Schools into Ashram Shala Complexes with higher capacity. कारण, आता विभागाचे रिसोर्सेस संधान खूप विखुरलेले आहे. महाराष्ट्र राज्यातील लोकांची अशी मानसिकता आहे की, विद्यार्थ्यांना तालुक्यातून जिल्ह्याच्या ठिकाणी पाठवावयाचे असेल तर पालक खूप नाराज होतात आणि लोक सुद्धा त्यांना सपोर्ट करतात. इंफ्रास्ट्रक्चर चांगले असेल आणि त्यासाठी थोडा प्रवास करावा लागला तरी त्यासाठी ते तयार असले पाहिजेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विद्यार्थी तसे करण्यास तयार होत नाहीत. या संदर्भात पुढे एक परिच्छेद आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील एका शाळेत विद्यार्थी संख्या कमी असल्यामुळे त्यांना दुसऱ्या शाळेत शिफ्ट करावयाचे होते. परंतु, मुले तेथे गेले नाहीत, असे त्या परिच्छेदात नमूद केले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, यासाठीच लोकांची मानसिकता तयार करणे हा देखील एक भाग आहे. विभागाने इयत्ता १० वी व १२ वीकरिता विद्यार्थ्यांना एकत्र आणावे असे सांगितले आहे. परंतु, त्यांची मानसिकता अशी आहे की, विभागाने बोर्डासाठी एक्स्ट्रा टिचर्स नियुक्त करून प्रश्नपत्रिका, एक्स्ट्रा क्लासेस घ्यावेत. तेथे नेहमी विभागाची टीम पाठवावी. परंतु, विभागाने यावर्षी प्रत्येक प्रकल्प अधिकाऱ्यांच्या कार्यक्षेत्रात त्यांना इयत्ता १० वी व १२ वी मधील मुलांना एकत्र आणण्यास सांगितले आहे. त्यासाठी सोई सुविधांनी युक्त असे मोठे कॉम्प्लेक्स तयार केले पाहिजेत. Create posts for sports/ fine arts. Create Eklavya as flagship schools. विभागाने इतकी वर्षे चुकीची पद्धत केली होती की, विभागाच्या सीबीएसई इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये केंद्र शासनाकडून ४५ हजार रुपये मिळतात. विभाग त्या शिक्षकाला त्यापेक्षा जास्त पगार देत नसतो. म्हणजे सीबीएसई फ्लॅगशीप प्रोग्रामच्या शाळांमधील शिक्षकांची कंडिशन शासकीय आश्रमशाळा व जिल्हा परिषदेच्या शाळांपेक्षा वाईट होती. त्यामुळे विभागाने पॉलिसी डिसीजन घेतला की, त्यांना किमान राज्य सरकारचे जे शिक्षक आहेत त्यांचा दर्जा किंवा एक स्टेप वर दिली पाहिजे. केंद्र शासनाचे नवोदय विद्यालय आहे. त्यांना तो दर्जा देऊन चांगले इंग्रजी येणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती केली पाहिजे. म्हणजे सिक्युरिटी ऑफ टन्युअर. आपल्याला व्होकेशनल ट्रेनिंगसाठी इंडस्ट्री बरोबर टायअप करावे लागेल. १००% flexibility of recruitment. आदिवासी भागात हे खूप गरजेचे आहे. विभागाला हेल्थ अँड न्युट्रेशनसाठी alternate healthcare system for Ashram Schools - dedicated ambulances, digital database and e-Health cards of all tribal students by २०१९, addiction free ashram schools. ज्यावेळी विभागाचे नागपूर विभागात प्राथमिक स्क्रिनिंग केले त्यावेळी २२५ मुलांना ओरल कँसर असल्याचे आढळून आले. इयत्ता ५ वी, ६ वी मधील विद्यार्थी सुद्धा तंबाखूचे सेवन करतात. विभागाकडून त्यांना ॲडिक्शन फ्री करण्यासाठी नागपूर मेडिकल कॉलेज बरोबर डेंटल स्क्रिनिंग करण्यात येत आहे. Availability of safe drinking water in all Ashram Schools. आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना शुद्ध पिण्याचे पाणी मिळाले पाहिजे. १००% Health Insurance Coverage for Ashram School Students. आश्रमशाळेतील विद्यार्थी व त्यांच्या कुटुंबासाठी विशेष विमा योजना सुरू करण्याचा विभागाचा विचार आहे. Full implementation of WASH initiatives. विद्यार्थ्यांनीच त्यांचा गावात कल्चर वॉटर सॅनिटेशन हायजिनची व्यवस्था आणावयाची आहे. Full and nutritious meals to all Ashram School students by scaling the centralized kitchen model by २०२६. विभाग अब्दुल कलाम अमृत आहार योजना स्केलअप करीत आहे. Quality benchmarking of services, हेल्थ नेटवर्क इनिशीएटिव्ह आहे. राज्यात त्यांच्या काही संस्था आहेत. ग्रामपंचायत स्तरावर आरोग्य समिती आहे, पोषण आहार पुरविणारी यंत्रणा यांच्या अकाऊंटिबिलिटीने विभाग मॉनिटरिंग मॅकॅनिझम करीत आहे. वर्तमानपत्रात कुपोषणाच्या बातम्या येतात. सरकारने कुपोषण निर्मूलनासाठी बक्षिस जाहीर करावे, सुपोषित गावांचे कॅम्पेन आयोजित करावेत. So that this can become one of the attribute. जैसे कि " स्वच्छ भारत " अभियान है. सुपोषित गांव, सुपोषित पंचायत ऐसी कॉम्पीटीशन लगाएंगे तो कुछ हो सकता है. Intensive focus on immunization and १००० day care. कारण, कुपाषित मुलांचे एका वर्षाच्या आत मृत्यू होण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यामुळे यावर थोडा लक्ष केंद्रीत करावयाचे आहे. Scale up centralized kitchen with clear management plan. Suggest pilots to run PHC and sub-centres to be managed by NGOs/ professional agencies on PPP model. आता हे थोडे विसंगत होऊ शकते. परंतु, याचा प्रायोगिक तत्त्वावर विचार करण्यास हरकत नाही. कारण, अनेक राज्यांमध्ये याचे चांगले परिणाम मिळालेले आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

How NGO can manage it ? अशी विचारणा समितीने केली असता, ते एनजीओ नसतात. ते हेल्थ डोमेन सेक्टरमध्ये काम करणाऱ्या कंपनी किंवा फाऊंडेशन असतात. ज्या प्रमाणे पीपीपीमध्ये रिएंबर्समेंट असते की, त्यांनी एवढे डायग्नोस्टिक्स किंवा ओपीडी केले तर कमीत कमी ते शाश्वतीने हेल्थ वर्क्स होतात. ते डॉक्टर्स नियुक्त करतात, त्यांचे पेमेंट देतात. The Government can fix reimbursement cost for patient and procedure असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महाराष्ट्र राज्यात असे कोठेही नाही. Sir, the Health Department has to take it up. ती कॉन्सेप्ट आहे. विभाग केवळ नवीन गोष्टी सुचवू शकतो. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने हे पीपीपी मॉडेल महाबळेश्वर ग्रामीण रुग्णालय आणि तळदेव प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्यासाठी बे-लेअर हॉस्पिटल, पाचगणी यांनी प्रस्ताव दिलेला आहे. त्यावर काम सुरू आहे.एखादा नवीन पायलट प्रोजेक्ट राबविला तरच हे होऊ शकते असे समितीने सूचित केले असता, इंफ्रास्ट्रक्चर संदर्भात " In partnership with line Department ". परंतु, प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रत्येक वर्षाची गोष्ट आहे, ४-५ कोर्स, इंफ्रास्ट्रक्चरची बाब आहे, १००% electrification of all households, १००% road connectivity, Housing for all, uninterrupted digital and mobile connectivityu in TSP areas and full penetration of financial services through banks or banking correspondents. योजना राबविताना उक्त सहा बाबींवर अधिक लक्ष केंद्रीत केले तर जास्तीत जास्त प्रमाणात विकास होईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

बहुतेक ठिकाणी ९५ टक्के कामे झालेली आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, हॅम्लेट लेव्हलपर्यंत हे काम झालेले आहे.

बहुतेक पाणी पुरवठ्याच्या योजना बहुतेक झालेल्या आहेत. असे विभागीय सचिवांनी सांगितले.

पाणीपुरवठा योजना झाल्या असल्या तरी त्यातील अनेक योजना बंद स्थितीत आहेत. त्या योजना सुरू झाल्यानंतर बंद पडलेल्या आहेत. ही बाब समितीने निदर्शनास असणली असता महाराष्ट्रात या योजना मोठ्या प्रमाणात बंद पडलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

नागपूरच्या अधिवेशनात मुख्यमंत्र्यांनी जुन्या आणि नव्या योजना सौर ऊर्जेवर सुरू करण्याच्या अनुषंगाने धोरण आखण्याबाबत सांगितले होते. जर पाणीपुरवठा योजना नादुरुस्त असेल तर ती बंद राहणार. परंतु सौर ऊर्जेवर या योजना सुरू केल्या तर त्या बंद पडण्याचा प्रश्न निर्माण होणार नाही. जर या अनुषंगाने उपाययोजना केल्या तर या योजनांवर केलेली कोट्यवधी रुपयांची गुंतवणूक वापरात येईल, अन्यथा ती वापराविना पडून राहील. डिजीटल व्हीलेज करण्याच्या बाबतीत केलेल्या घोषणेचे पुढे काय झाले ? सद्यःस्थितीत डीजीटल मोबाईल कनेक्टीव्हीटीची खूप अडचण येते. स्वस्त धान्य दुकानात सुद्धा कनेक्टीव्हीटीची अडचण आहे.याबाबीकडे समितीने लक्ष वेधले असता, ई-रिपोर्टींग, फायनान्शीयल सर्व्हीसेस, पेटीएम या बाबतीत अडचण नाही. जे विशेष मागास जिल्हे आहेत त्या ठिकाणी जास्त अडचण आहे. त्यामुळे या विषयाशी संबंधित जे लाईन विभाग आहे त्यांचा तीन ते पाच वर्षांचा कृतिआराखडा तयार करून खाजगी करणामध्ये रिसोर्सेस त्याच ठिकाणी केले पाहिजे. ही बाब त्या विभागावर अवलंबून आहे. लाइव्हलीहूड बद्दल शासनाचे जे कौशल्यविकास विभाग बाकी आहेत त्यांच्या नियमित योजनाशिवाय मायनर फॉरेस्ट प्रोडयूस, इको-टुरिझम फॉरेस्ट्री, ॲग्रीकल्चर आणि ॲनिमल हजबन्ड्री यावर व्हल्यू ॲडीशन करून, व्हल्यू चेंज करून आदिवासी भागात उत्पन्नाचा स्त्रोतनिर्माण करता येईल. त्यासाठी आम्ही काही प्रयत्न करीत आहोत, including bamboo based, value additions for agriculture produce, असा विभागाचा प्रयत्न सध्या सुरू आहे. Better price realization, MFP based livelihood by value addition, creation of farmer producer organization and federations, fisheries, dairy etc. For sports and other activities, at least in every region, we would like to have one state of art sports academy for tribal students. Preparing and identifying after doing a talent hunt, to prepare them for national and international level. To see that the tribal representation in sports is increased at national/international level. As regards T.D.C., we would like it to become from dysfunctional company to profit making company, if Government allows us. Department would like to have online procurement and payment mechanism. अभी जो भी कोऑपरेटीव सोसायटीज डिफंक्ट है या जो भी एजेन्सीज, एचएसजी, ग्रास रुट लेवल पर जो फेडरेशन, प्रामयरी कोऑपरेटीव सोसायटीज बनी, त्यांचा समावेश करून त्यांचा प्रोक्युअरमेंटमध्ये आणि व्हल्यू ॲडीशनमध्ये कसा समावेश करता येईल याबाबत विभागाकडून प्रयत्न करण्यात येतील.

ज्या खाजगी संस्था व फेडरेशन आहेत त्यात मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार असल्याचे अन्न व नागरी पुरवठा विभागाच्या साक्षीच्या वेळी निदर्शनास आले होते. ते आदिवासी विकास महामंडळाचे एजंट असतात.त्यांच्या गैरव्यवहारामुळे शासनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते.त्यांच्यावर वचक किंवा अकाऊंटीबिलिटी कुठेच दिसून येत नाही. उदाहरणार्थ धान खरेदी केले तरी ३० टक्के तुटवडा आहे. या बाबतचे पैसे घेतले. तुम्ही अे.पी.एन.डी.एस. करून घेतले आणि सोसायटीने ते आदिवासी विकास विभागाकडून घेतले. परंतु याला कोणी वालीच नाही. The Tribal Development Corporation should run totally on commercial basis. It should be profit making company. कारण याबाबत खूप ठिकाणी मत्तेदारी आहे. हीबाब समितीने निदर्शनास आणली असता, The legal structure of the Corporation has to be changed. Today, it is not registered as a Company. मॅनेजमेंट और अकाऊंटीबिलिटी तो तभी आएगी जब उसका लीगल... अभी जो एग्जीस्टिंग सेटअप है उसको खत्म करके उसको नये सिरे से करेंगे तभी ये होगा असे विभागीय सचिवांनी सांगितले.

असे असेल तर ते महामंडळ बरखास्त करावे. बरखास्त करा दीजिए, विभाग कंपनी बनाने के लिए तैयार है. विभाग जब ओपिनियन है कि इस तरह करना चाहिए तो फिर विभागाने सरकार को प्रपोज करना चाहिए असे समितीने सूचित केले.

आदिवासी विकास महामंडळाचा एक उद्देश वेल्फेअर ॲक्टीव्हीटी सुद्धा आहे. जर या महामंडळाचे पूर्ण रुपांतर कंपनीमध्ये केले तर त्याकडे रेटस किंवा नफा या हिशेबाने बघितले जाईल. नफा कमविणे हा आदिवासी विकास महामंडळाचा मुख्य उद्देश नाही. पण अकाऊंटीबिलिटी आहे असे मत वित्त विभागाच्या सचिवांनी व्यक्त केले.

विभागाचे सचिव नमूद करीत आहेत की, या बाबतीत अकाऊंटीबिलीटी घेता येत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, कंपनी ॲक्टमध्ये नवीन चॅप्टर आहे. त्या नुसार नॉन प्रॉफीट कंपनीची सुद्धा नोंदणी करता येते, with the same rules of accountability like a regular Company असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

What is department's intention to make it a Company rather than a Corporation? अशी विचारणा समितीने केली असता, Department don't have any intention. It is just having an intellectual discussion असे विभागीय सचिवांनी सांगितले.

समितीचा मुद्दा मर्यादित आहे की, every default should be accountable and the responsibility should be fixed असे मत समितीने व्यक्त केले त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

आदिवासी विकास महामंडळ कमर्शियल ऑर्गनायझेशन म्हणून विकसित करू शकत नाही किंवा कंपनी ॲक्टखाली नोंदणी करू शकत नाही. परंतु महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ ही सुद्धा राज्य सरकारची कंपनी आहे. शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे मिळाले पाहिजे हा बियाणे महामंडळ स्थापन करण्यामागील सरकारचा उद्देश होता. दर्जेदार बियाणे मिळण्यासाठी त्याचे जे उत्पादक आहेत ते शेतकरीच आहेत. शेतकरी जेव्हा दर्जेदार बियाणे उत्पादित करतात तेव्हा त्याच शेतकऱ्यांच्या कृषी मालाला हमी भावापेक्षा कमी भाव मिळतो. या विषयाच्या बाबतीत नुकताच सभागृहामध्ये संघर्ष झाला होता. बियाणे महामंडळ ही प्रॉफीट मेकींग ऑर्गनायझेशन असली तरी त्यांना बियाणे उत्पादकांना हमी भावाने भाव देणे परवडत नाही. बाजारात तुरीचा हमी भाव ५४०० रुपये होता. परंतु तूर बियाणे उत्पादकांना ४९०० रुपये भाव देण्यात आला. आदिवासी विकास महामंडळामध्ये बियाणे महामंडळाच्या धर्तीवर काय तरतूद आहे ?आदिवासी विकास महामंडळामध्ये जी अनियमितता आहे, there should be accountability, which is not there at present ही बाब समितीने निदर्शनास आणली.

This presentation is not for record. Apart from the audit paras, we are discussing about the future plans of the department असे विभागीय सचिवांनी सांगितले.

It is not part of the recommendations. यामध्ये कुठे अडचण आहे ? कंपनी प्रॉफीटेबल असावी, त्याची अकाऊंटीबिलीटी असावी आणि त्यांना सोशल वर्क करता यावे. यात काय अडचण आहे ? तसेच जेवढा जास्त नफा होईल तेवढी जास्त सोशल ॲक्टीव्हीटी करता येईल. शेवटी त्या प्रॉफीटचे वाटप सोसायटीच्या सभासदांनाच होणार आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाचा दुसरा कार्यक्रम टीआरटीआय आहे. हा कार्यक्रम १९६२ पासून सुरू आहे. या अंतर्गत संशोधन अभ्यासक्रम राबविले जातात. तसेच त्या अंतर्गत अनुसूचित जमाती पडताळणी समिती कार्य करीत आहे.या बाबतीत विभागाचे रोडमॅप आहेत. या बैठकीसाठी टीआरटीआय चे आयुक्त उपस्थित आहेत. ते या बाबत सांगतील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

टीआरटीआय हे १९६२ पासून कार्यरत आहे. राज्यात आठही ठिकाणी जात पडताळणी समिती या टीआरटीआयच्या अखत्यारीत आहेत. टीआरटीआयचे काम प्रशिक्षण व संशोधन करण्याचे असले तरी, मधल्या कालखंडात संशोधनामध्ये खंड पडला होता. आता ते काम सुरू केले आहे. टि आर टी आय माध्यमातून राज्य पातळीवर वर्षातून चार वेळा आदिवासी कला महोत्सव होत होते. परंतु आता प्रत्येक प्रकल्प अधिकारी पातळीवर आदिवासी कला महोत्सव आयोजित करण्यात येतो. जेणेकरून जास्त लोकांना सहभागी होण्याची संधी मिळेल. कल्चर कॉन्झर्व्हेशनमधील मुख्य मुद्दा हा सर्व आदिवासी लोकसंख्येला अपॉर्च्युनीटी ऑफ डेव्हलपमेंट ॲव्हलेबल करायची आहे. यामध्ये मेन स्पिरींगची चर्चा करण्यात येते. पण हे करीत असताना कल्चरचे सुद्धा संवर्धन करावयाचे आहे. हा थोडासा डेलिकेट आणि व्यवस्थितपणे बघण्याचा विषय आहे. याबाबत संशोधन करून त्या दृष्टीने काम करण्यात येत आहे. काही म्युझियम्स विभागाने प्लान केलेले आहेत. उदाहरणार्थ ट्रायबल फ्रीडम फायटरचे म्युझियम गडचिरोली येथे उभे करण्यात येत आहे. गोंडवाना येथे म्युझियम उभे करण्यात येत आहे. पुणे येथे टीआरटीआय या संस्थेच्या परिसरात आदिवासींचे राज्यस्तरीय म्युझियम आहे. त्याचे व्हर्च्युअल तयार केले आहे. त्याचे किऑस प्लान महाराष्ट्रभर ठेवणार आहोत. जेणेकरून त्या ठिकाणी उभे राहून म्युझियमची व्हर्च्युअल टुर करता येईल. या संदर्भातील सॉफ्टवेअर सुद्धा तयार झाले आहे. हे काम या वर्षअखेर होऊ शकेल. ॲकेडेमिकमध्ये पुणे विद्यापीठाने संशोधन संस्था म्हणून मान्यता दिलेली आहे. परंतु टीआरटीआयकडे पीएचडी आणि एमफीलचे कोर्सेस सुरू केलेले नाहीत. त्यासाठी एक लाँग टर्म प्लान करण्याचा विचार आहे. तो म्हणजे ट्रायबल अँथ्रोपॉलॉजी हे स्पेसलायजेशन होऊ शकते. त्यासाठी टीआरटीआय हे चांगले सीट होईल. जात पडताळणी समितीचा अभ्यास याच ब्रांचखाली होत असतो. त्यामुळे त्याचे डॉक्युमेंटेशन करून मगच ती ॲकेडेमिक स्टेप घेता येईल. ऑडीओ व्हीज्युअल हे टीआरटीआयचे स्वप्न आहे. तसेच टीआरटीआयला पब्लीकेशन हाऊस सुद्धा उभे करावयाचे आहे. त्या पब्लीकेशनमध्ये आदिवासी बद्दलचे साहित्य प्रकाशित होईल आणि आदिवासींनी लिहिलेले साहित्य सुद्धा प्रकाशित होईल, असे एक आहे. तसेच दुसरी बाब कल्चलर फेडरेशन ऑफ ग्रामसभा आहे. आज आदिवासी खेड्यापाड्यातील कलावंत किंवा त्यांचे जे संस्कृती आहे तेथपर्यंत पोहचण्यासाठी कोणतेही फॉर्मल स्ट्रक्चर नाही. त्यामुळे पुढील पाच-सहा वर्षात पेसा ग्रामसभांचे फेडरेशन असावे किंवा एमएपी बद्दलचे फेडरेशन असावे अशी चर्चा सुरू आहे. त्याच धर्तीवर सांस्कृतिक फेडरेशन करता येईल का, या कन्सेप्टवर आम्ही सध्या काम करीत आहोत.

त्याच बरोबरच वेगवेगळ्या प्रकारचे ट्रायबल आर्ट उदाहरणार्थ दंडार नृत्य हे कला महोत्सवात दाखविले जात नाही. त्यासाठी पाच-सहा वर्षे प्रयत्न करून ते सर्व एस्टॅब्लिश करावे लागेल. या बाबतचा रोडमॅप टीआरटीआयकडून तयार करण्यात येत आहे. आदिवासी कला आणि वस्तूंचे काही पेटंटस् आणि कॉपी राईटस् या अनुषंगाने काम करीत आहोत.पुढील १० वर्षात ५ हजार पेटंटस् आणि कॉपी राईटस् निवडायचे ठरविलेले आहे. त्या दृष्टीने टीआरटीआयचे काम सुरू आहे.

दुसरा महत्त्वाचा विषय हा जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्राचा आहे. टीआरटीआयचा संगणकीकरणासंदर्भातील अर्धा प्रयोग यशस्वी झालेला आहे. जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे कामकाज संगणकीकरणाच्या माध्यमातून ऑनलाईनद्वारे करण्यात येत आहे. अर्जदाराला त्याच्या प्रकरणाची स्थिती ऑनलाईन समजू शकते. परंतु जोपर्यंत हे एसडीओ कार्यालयाला जोडत नाही तोपर्यंत कार्यवाही होणार नाही. जात प्रमाणपत्र इश्यू झाल्यानंतर एसडीओनी ते पडताळणीसाठी रेफर केले आणि समितीने त्याचे पडताळणी करून त्याच्याकडे तयार करून ठेवले तर जेव्हा उमेदवाराकडून मागणी येईल तेव्हा ते देता येईल, या बाबतीत आम्ही कार्यवाही करण्यात येत आहे. एसडीओ यांनी जात प्रमाणपत्र इश्यू केल्यानंतर ते प्रकरण जात पडताळणी समितीकडे ऑनलाईन रेफर करावयाचे आहे. सहा विभागीय ठिकाणी आणि गडचिरोली व नंदुरबार अशा एकूण ८ ठिकाणी समित्या आहेत. टीआरटीआय इंटीग्रेटेड सॉफ्टवेअर करीत आहे. प्रत्येक समितीचे कार्यक्षेत्र ठरलेले आहे. अशा पद्धतीचे स्ट्रक्चर आम्ही उभे करण्यात येत आहे. तसेच डेटा टीआरटीआयकडून ॲनॅलिसीस सेंटर हा संशोधनाचाच भाग समजण्यात येतो असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

जात प्रमाणपत्राची पडताळणी करून घेण्यात खूप त्रास होतो. या संदर्भात राज्य सरकारने रक्ताच्या नात्यातील व्यक्तीच्या जातीच्या प्रमाणपत्राची पडताळणी झाली असल्यास, अन्य व्यक्तीला जात वैधता प्रमाणपत्र देण्यात यावे असा निर्णय केला होता. परंतु अनुसचित जमातीच्या लोकांना या धर्तीवर सहा महिने, वर्ष-वर्षभर जात वैधता प्रमाणपत्र मिळत नाही. या संदर्भातील शासन निर्णय झाला आहे की नाही, असल्यास, त्या शासन निर्णयाची अंमलबजावणी का होत नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, जात वैधता प्रमाणपत्रासंदर्भातील कायदा २००२ मधील असून तो अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीतील सर्व जातींना लागू आहे. आदिवासी समाजासाठी जात प्रमाणपत्राची नियमावली २००३ मध्ये अंतिम झाली आणि त्याच वेळी अनुसूचित जातीसाठीसुद्धा अंतिम झाली. २०१२ मध्ये अनुसूचित जातीच्या संदर्भात रिव्हीजन झाले. त्यानुसार अनुसूचित जाती प्रवर्गासाठी रक्त गट नात्यासंदर्भातील निर्णय घेण्यात आला. मात्र आदिवासी समाजासाठीची नियमावली अजून अंतिम झालेली नाही. या प्रकरणी मंत्री गटाची स्थापना झाली असून, त्यामध्ये जो काही निर्णय होईल त्यानुसार नियमावली तयार करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

हा निर्णय जाहीर करून दोन-अडीच वर्ष झालेली आहेत. आदिवासी समाजाच्या लोकांना याबाबत खूप त्रास होत आहे. ही बाब विचारात घ्यावयास पाहिजे. याबाबत सरकारला या बाबतीत निर्देश दिले पाहिजेत. तसेच, राज्य सरकारने दरवर्षी आदिवासी समाजाच्या २५ हजार विद्यार्थ्यांना नामांकित शाळेमध्ये विनामूल्य शिक्षण देण्याचा निर्णय घेतला होता. पण एक वर्षानंतर देखील हा निर्णय अंमलात आणला जात नाही. या संदर्भातील सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, नामांकित शाळांमध्ये आदिवासी समाजाच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची योजना सुरू आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

परंतु, अनेक शाळा या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास तयार नाहीत. त्या त्या भागातील नामांकित शाळांची यादी संबंधित प्रकल्प अधिकारी सादर करतात. त्या शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावाच लागतो. आरटीईनुसार जे प्रवेश देण्यात येतात तो भाग वेगळा आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, नामांकित शाळा योजनेमध्ये कोणतीही इच्छुक शाळा सहभागी होण्यासाठी नोंदणी करू शकते. सध्या आदिवासी विभागात १९० नोंदणीकृत शाळा आहेत. त्यांच्या पॅरामीटर्समध्ये क्वॉलिटी, इन्फ्रास्ट्रक्चर, स्टाफ आणि रिसोर्स ठेवलेले आहेत. या शाळांमध्ये ५४ हजार विद्यार्थी आहेत. या संदर्भातील यादी सादर केली. विभागाची अडचण अशी आहे की, ग्रामीण भागात आता या स्टॅण्डर्डची इंग्रजी माध्यमाची शाळा उपलब्ध नाही. आता नामांकित शाळांमध्ये ज्या शाळा येत आहेत त्या थोड्याशा सब स्टॅण्डर्ड आहेत. त्या शाळा केवळ नाव बदलून इंग्रजी माध्यमांच्या शाळा असल्याचे सांगत आहेत. त्यांच्या शिक्षकांना योग्यप्रकारे इंग्रजी येत नाही किंवा त्यांच्याकडे व्यवस्थित इन्फ्रास्ट्रक्चर नाही. त्यामुळे विभागाचा विचार आहे की, शासनाच्या आदिवासी शाळांचे कन्व्हर्जन्स या शाळांमध्ये करावयास पाहिजे. त्या ठिकाणी प्रशिक्षित शिक्षक घ्यावयास पाहिजे. एवढे सांगून विभागीय सचिवांनी सादरीकरण संपविले.

समितीने दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी पुन्हा आदिवासी विकास विभागाचे सचिव व विभागीय प्रतिनिधींनीची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी २.२.३.१ या परिच्छेदावर मागील बैठकीत झालेल्या चर्चेत समितीने असे सांगितले होते की, संगणकाच्या विषयासंबंधी महालेखापाल यांच्याकडून

तपासणी करून घ्यावी. सदर परिच्छेदात अनेक त्रुटी आहेत. त्यामुळे याबाबतचा संपूर्ण अहवाल महालेखाकार यांच्याकडे सादर करावा. त्यानंतर एक महिन्याच्या कालावधीत पुन्हा विभागाची साक्ष घेतली जाईल. सदर प्रकरणी महालेखापाल यांचे समाधान झाल्यास हा विषय संपू शकतो. अन्यथा समितीला यासंबंधी साक्ष घ्यावी लागेल. संगणकाच्या विषयासंबंधी महालेखापाल यांच्याकडून व्हेटींग करून घेतले आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, यासंबंधी चौकशी सुरू आहे. एक महिन्याच्या कालावधीत सदर चौकशी पूर्ण होईल. ते अतिशय जूने रेकॉर्ड आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर प्रकरणी एक महिना होऊन गेला आहे. तरी देखील जूने रेकॉर्ड असल्यामुळे आणखी एक महिन्याच्या कालावधीत सदर चौकशी पूर्ण करावी. समितीला यासंबंधी सदनात अहवाल सादर करावयाचा आहे असे समितीने सूचित केले असता विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

समितीने आश्रमशाळासंबंधी अशी विचारणा केली होती की, पुरवठादाराने आश्रमशाळांना गणवेषांचा पुरवठा कधी केला होता ? विद्यार्थ्यांना कोणत्या तारखेला गणवेषाचे वाटप करण्यात आले ? याबाबत समितीने २० जून, २०१८ रोजी सदर माहिती विभागाकडे मागितली होती असे समितीने निदर्शनास आणले असता, शाळानिहाय माहिती तयार केलेली आहे असे विभागीय सचिवांनी सदर माहिती समितीकडे सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. (माहिती अप्राप्त)

परिच्छेद क्रमांक २.२.३.२ — रोकडवही आणि बँकेच्या रकमेत लक्षणीय फरक —

रोकडवही आणि बँक विवरणानुसार अखेरच्या शिल्लक रकमेमध्ये मोठा फरक आहे. या संदर्भात एकच तारखेला रकमेचा फरक असल्यामुळे तारीख नमूद केली असती तर संभ्रम निर्माण झाला नसता. सदर माहिती ३१ मार्च, २०१५ रोजीची आहे का ? तसेच रकमेमध्ये एवढा मोठा फरक का येत आहे ? लेखी स्पष्टीकरण वाचले असता असे लक्षात येते की, एखाद्याने धनादेश दिल्यानंतर विभागाच्या खात्यात तो भरला गेला. परंतु तो धनादेश वटला नाही म्हणून तिकडे जास्त रकमेची शिल्लक दिसत आहे. त्यानंतर एप्रिलच्या पहिल्या आठवडयात ते धनादेश वटले आहेत. नंदूरबारसंबंधी विभागाने कशा प्रकारचा खुलासा केला आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी मोठी तफावत येत होती. त्यात ९ पीओ यांचा समावेश होता. त्यापैकी ५ पीओंची तफावत रक्कम निरंक झाली आहे. तसेच मार्च, २०१८ पर्यंत रिकन्सीलिएशन करण्यात आले आहे. आता डहाणू येथे १२ लाख ५० हजार रुपयांची तफावत आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

लेखी स्पष्टीकरणातील पृष्ठ क्रमांक २० वर असे नमूद केले आहे विभागाने सादर केलेल्या माहिती तर बॅ प्रकल्प अधिकारी नंदूरबार अंतर्गत रोकड वहीनुसार अखेरची शिल्लक २१.०२ कोटी असून विवरणपत्रानुसार ३२.४४ कोटी रुपये शिल्लक असल्याने ११.४१२ कोटी रुपयांची तफावत दिसून येते. तसेच प्रकल्प अधिकारी, नंदुरबार यांच्या दिनांक २३ एप्रिल २०१८ रोजीच्या पत्रान्वये दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी प्रत्यक्ष रोकडवहीची तपासणी केली असता रु.८७.४० कोटी रुपयांची तफावत आढळून आली आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, त्यावेळी १ कोटी ८ लाख २६ हजार रुपयांची तफावत होती. त्यानंतर एक टीम पाठविली होती. त्यांनी तपासणी केली असता ९७ लक्ष रुपये तफावत राहिली. तसेच मा. मुख्यमंत्र्यांचा एक कार्यक्रम असल्यामुळे एका निधीतून दुसऱ्या निधीत रक्कम वर्ग करून त्या कार्यक्रमासाठी वापरण्यात आली होती. त्याची मंजुरी मिळण्यासाठी आयुक्त कार्यालयाकडे पाठविलेले आहे. विभागाने त्यांना अशी सूचना केली आहे की, त्यांनी २६ लाख रुपयांकरिता रितसर मंजुरी दिल्यास तर ती रक्कम रिकुप करता येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

मा. मुख्यमंत्र्यांचा महोदयांच्या कार्यक्रमासाठी वेगळा निधी दिला जातो की, तो खर्च आदिवासी विकासाकरिता असलेल्या निधीतून खर्च केला जातो ? अशी विचारणा समितीने केली असता, मोठे कार्यक्रम असल्यास त्यांची वेळ घेऊन कार्यक्रम घेतले जातात असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मा. मुख्यमंत्र्यांच्या कार्यक्रमाकरिता चेक दिल्याचा उल्लेख केला आहे. मुख्यमंत्री महोदयांच्या कार्यक्रमासाठी आदिवासी विकासाकरिता असलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीमधून खर्च केला जातो का ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांनी सदर खर्च न्युक्लिअस बजेटमधून केला होता. पेसाबद्दल मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. लहान स्वरुपाच्या शासकीय कार्यक्रमासाठी कार्यालयात खर्चामधून खर्च केला जातो. कार्यक्रमासाठी स्टेटमधून वेगळी तरतूद केली जाते व त्याकरिता आयुक्तालयाला परवानगी दिली जाते. सदर कार्यक्रमाकरिता तेव्हा त्यांनी स्थानिक पातळीवर व्यवस्था केली असेल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्याकरिता विभाग स्वतंत्र निधी मागू शकतो. आदिवासी विकासाकरिता अर्थसंकल्पात नियोजित निधीकरिता तरतूद केली जाते. तो खर्च मोठ्या कार्यक्रमांसाठी ५० लाख रुपयांपेक्षा जास्त होत असतो. त्याकरिता आदिवासी विकासाकरिता अर्थसंकल्पात राखीव असलेल्या निधीतून केला जातो का ? अशी विचारणा समितीने केली असता अशा राखीव निधीतून खर्च केला जात नाही. त्याकरिता लेखाशीर्षाखाली स्वतंत्र तरतूद केलेली असते. तसेच त्यातून अशा कार्यक्रमासाठी खर्च झाल्यानंतर आयुक्त कार्यालयाकडे तो निधी आल्यानंतर तो रिकुप होतो व त्याचा हिशेब लागतो असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने समितीला दिलेली माहिती संयुक्तिक वाटत नाही. याबाबत सविस्तर माहिती घ्यावी. मोठे कार्यक्रम असल्यास प्लॅनमधील रक्कम त्याकरिता खर्च करण्याची गरज नाही. कार्यक्रम करण्यासाठी काही अडचण नाही. विभागाने अशा कार्यक्रमांकरिता वेगळा निधी मागितला पाहिजे असे समितीने सूचित केले असता, दिनांक ९ ऑगस्ट रोजी आदिवासी जागतिक दिवस असतो. निर्धारित कार्यक्रम असल्याशिवाय निधी घेत नाही. तेव्हा हा कार्यक्रम ठरला असेल विभागाकडून त्यांना ते रिकुप करून देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सदर रकमेत मोठा फरक दिसून येत आहे. तसेच दिनांक ३१ मार्च रोजी चेक काढले जातात. ऑक्टोबर ते डिसेंबर महिन्यात काम पूर्ण झाले तरी त्या कामांचे पेमेंट करण्यासाठी ३१ मार्च रोजी चेक का काढले जातात ? त्यामुळे विभाग वर्षभर काम करीत नाही अशी प्रतिमा तयार होत असते. काम पूर्ण झाल्यानंतर त्याचे पेमेंट करण्यासाठी मंजुरी देऊन कार्यवाही करणे अत्यावश्यक आहे. याबाबत असे परिपत्रक काढावे की, वर्कऑर्डर झाल्यानंतर काम पूर्ण झाल्यानंतर बिल सादर केले असल्यास त्याबाबत तपासणी करून त्यांना १५ दिवसांमध्ये पेमेंट करणे अत्यावश्यक आहे. प्रॅक्टीकली अडचण अशी आहे की, विभागाला शेवटच्या महिन्यात अनुदान रिलिज होत असते. त्यामुळे सदर बिले शेवटच्या महिन्यात अदा केली जातात. तसेच उपलब्ध असलेला निधी अगोदर देण्याची भूमिका विभागाने ठेवली पाहिजे. परंतु वित्त विभागाकडून निधी रिलिज केला जात नाही. दर महिन्याला बीडीएस सिस्टीमनुसार पेमेंट अदा झाले पाहिजे. परंतु विभागाने जुन्या सिस्टीमबाबत माहिती दिली आहे. तसेच पैसे रिकुप करण्यासाठी विभागाकडून बीडीएस सिस्टीमचा वापर केला जात नसल्यास तसेच झालेला खर्च त्यात समाविष्ट करीत नसल्यास ती विभागाची चूक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, यासंबंधी फिल्ड ऑफिसरकडून फिडबॅक दिला जातो. तसेच वर्किंग प्रोग्रेसमध्ये कोणाचेही देयक प्रलंबित ठेवायचे नाही. तसेच विभागाचे क्लाईंट नामांकीत शाळा, अनुदानित आश्रमशाळा असून तेथे बहुतांश ठिकाणी इन्स्टॉलमेंट सिस्टीम ऑनलाईन आहे. तसेच पोर्टलवर अनेक योजना दिसू शकतात. ऑन गोईंग बेसेसवर विभागाकडे उपलब्ध असलेल्या निधीचा वेळोवेळी आढावा घेऊन तो क्लिअर करण्यात येतात. तसेच यासंबंधी समितीने केलेल्या सूचनेनुसार याबाबत पुन्हा सूचित केले जाईल की, ज्यांची कामे पूर्ण झाली आहेत, निधी उपलब्ध असल्यास त्यांचे पेमेंट करण्यात यावे असे विभागीय सचिवांनी अवगत केले. दुसरा मुद्दा असा आहे की, निधी उपलब्ध असताना मार्च अखेर किंवा एप्रिल महिन्यात पेमेंट का केले जाते ? अशी विचारणा समितीने केली असता, साधारणतः अशी प्रॅक्टीस आहे की, त्यात २० ते ३० टक्के कट लागत असतो. विभागाला विशेष बाब म्हणून निधी रिस्टोअर करायचा असल्यास तो निर्णय शेवटच्या आठवडयात होतो. विभागाकडे अचानकपणे कॅश फ्लो मंजुरीकरिता येतात त्यासंबंधी ३१ मार्च रोजी अखेर कार्यवाही करायची असते. त्यानंतर प्रत्यक्षात बँकेमध्ये एप्रिल महिन्याच्या एक-दोन आठवड्यात इन-कॅश होतात. त्यामुळे ती रक्कम पासबुकमध्ये रिफ्लेक्ट होत नाही. तसेच बँकेकडून परस्पर कमिशन चार्जेस आकारणी केली जाते. त्यामुळे पासबुक व रोकडवहीमध्ये तफावत दिसून येत असल्याची कारणे फिल्ड ऑफिसरने सांगितलेली आहेत. आता मार्च, २०१८ पर्यंत आमचे बँकेचे रिकन्सीलिएशन झालेले आहे. तसेच ६ पीओंच्या संदर्भात असलेली तफावत रक्कम निरंक झाली आहे. नंदुरबार येथे १ कोटी रुपयांच्या जवळपास तफावत आली आहे. यासंबंधी नाशिक येथून कॅफोची टीम पाठवून त्यासंबंधी त्यांनी तपशील घेतलेला आहे. We will follow it up and we will take it up in the other 3 POs असे विभागीय सचिवांनी सांगितले.

नाशिक येथील एटीसी कार्यालयात जवळपास ५३ कोटी रुपयांची तफावत दिसून आली आहे. नाशिकला आऊटले कसा होता, त्यांचे वार्षिक बजेट किती रुपयांचे होते ? नाशिक किंवा चंद्रपूर असो, आपली शिल्लक जास्त व बँकेतील बॅलन्स कमी दिसत आहे. विभागाने यासंबंधी समितीला कारणे सांगितलेली आहेत. तसेच बँकेत रक्कम जमा नसताना विभागाकडे चलन आल्यानंतर रक्कम जमा करून टाकतात. त्यामुळे समितीने ५३ कोटी रुपयांच्या तफावतीसंबंधी प्रश्न विचारलेला आहे असे समितीने स्पष्ट केले असता, दिनांक ३१ मार्च, २०१५ रोजी कॅशबुक आणि बँक बॅलन्स यात ५३.२० कोटी रुपयांचा फरक येत होता असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभाग समितीला वेगळी माहिती देत आहे. त्या आर्थिक वर्षात बजेटरी तरतूद किती होती व त्यापैकी किती निधी खर्च करायचा होता. त्या वर्षी ५३ कोटी रुपयांची तफावत दिसून येत आहे असे समितीने व्यक्त केले असता, नाशिक प्रकल्पासंबंधी माझ्याकडे त्या वर्षाची आकडेवारी नाही. नाशिक प्रकल्पाचे मोठे बजेट असते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीला यावर्षीची आकडेवारी द्यावी. त्यावरून याबाबतची माहिती समजण्यास मदत होईल. तसेच तफावत का निर्माण झाली याची समितीला कारणे देण्याबाबत समितीने सूचित केले.

विभाग बिले खर्ची टाकत असल्यास कॅशबुकमध्ये तेवढी रक्कम कमी दिसली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाकडे तफावतीसंबंधी आकडेवारी उपलब्ध आहे. वर्षाच्या शेवटी पुरेसा निधी येत असतो. तसेच त्यावेळी प्रलंबित असलेली बिले खर्ची टाकली जातात. ३१ मार्च रोजी ट्रेझरीमध्ये बिले पाठविल्यानंतर व ती त्यांच्याकडून मंजूर झाल्यानंतर २ ते ५ एप्रिल पर्यंत येत असतात. परंतु त्यावर ३१ मार्च तारीख असते. त्यामुळे कॅशबुकला रक्कम जास्त दिसत असते. तसेच ती रक्कम बँकेतून खर्ची पडत असताना १५ ते २० एप्रिल तारीख येते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. विभागाकडे त्यावर्षी ५३ कोटी रुपयांची तफावत होती. त्यावेळी एकूण बजेटरी तरतूद किती होती ? अशी विचारणा समितीने केली असता, साधारणतः साडेतीनशे ते पावणेचारशे कोटी रुपयांचे बजेट असते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

नागपूर व चंद्रूपरमध्ये कॅशबुकमध्ये जास्त रक्कम दाखविण्यात आली आहे. याउलट बँकेतील रक्कम कमी आहे. याचे कारण बँकेने ट्रेझरीची बिले क्रेडिट केलेली नाहीत. साडेतीनशे कोटी रुपयांच्या बजेटरी प्रोव्हीजनपैकी ५३ कोटी रुपयांची तफावत आली आहे. अशाप्रकारे ३० टक्के रक्कम मार्च महिन्याकरिता ठेवली जाते असे मत समितीने व्यक्त केले असता, It is more than 350 crores. For Nashik it would go around ४२५ crores असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

Out of that, department are keeping ५० crores for march. मार्च महीने के अंत में बहुत गड़बड़ियां होती है ये बात सभी को मालूम है. सारे लोग अपने बिल पास करने के लिए प्रयास करते है. बिल कैसे पास होते है ये बात सभी को मालूम है. सारी चीजों को रेग्युलराईज करना चाहिए. जिस महीने का बिल है वह बिल उसी महीने में पूरा करना चाहिए. इसको आखरी तक रखने की क्या जरुरत है ? शासनाकडे उपलब्ध होणारा निधी, त्यातून ज्यांचे पेमेंट ड्यू होते त्यांना बँकेतून पेमेंट करावे. तसेच विभागाचे पैसे बँकेत भरत असताना शासन त्यावरील व्याज भरेल. त्यामुळे विभाग प्रदान करीत असताना ६ महिने विलंबाने करून लोकांना त्रास देऊ नये. तसेच मार्च महिन्याखेर होणाऱ्या प्रदानामध्ये नेहमी अडचणी येत असतात असा समितीचा दावा आहे. त्यामुळे यासंबंधी असलेल्या सिस्टिममध्ये सुधारणा करणे अत्यावश्यक आहे. एकही अधिकारी आज येथे येऊन सांगू शकत नाही. किती बिले कशा पद्धतीने मंजूर होतात हे सर्वांना माहीत आहे. सिस्टिममध्ये काही सुधारणा केली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, आता विभाग RTGS कम्पलसरी करणार आहोत. चेक काढून ठेवायचा नाही अशा सूचना देणार आहोत. काही पी.ओं.नी ते स्वतः सुरू केले आहे. इतरांना याबाबत सूचना देण्यात येत आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

परिच्छेद क्रमांक २.२.३.३—अखर्चित रक्कम—

या परिच्छेदामध्ये अखर्चित रक्कमेच्या संदर्भातील मुद्दा आहे. सन २०११ ते सन २०१५ अशी ५ वर्षांची रक्कम तुम्ही त्या त्या पी.ओ.ला देऊन ठेवता. ते खर्च करीत नाहीत. Therefore, it remain idle, unspent. असे कसे चालणार ? काम सुरू होत नसेल तर त्या त्या वर्षात ते पैसे परत आले पाहिजेत. याला कुठे तरी जबाबदारी असलीच पाहिजे. तुम्ही ज्या कामासाठी खर्च प्रस्तावित केला, त्या कामाला मान्यता नसेल तर पैसे कशासाठी दिले, जागा नाही तर पैसे का दिले ? पैसे खर्च होत नसतील तर ते पुढच्या वर्षी मार्च महिन्यामध्ये परत केले पाहिजेत. याकरिता जबाबदार असणाऱ्या लोकांवर काय कारवाई केली ? If the money is kept idle for 4/5 years without proper reasoning, then who is responsible? एका बाजूला राज्य सरकार बँक व इतर संस्थांना व्याज देते तर, दुसऱ्या बाजूला विभाग रक्कम खर्च न करता तशीच ठेवता, ती परत विभागाच्या फंडामध्ये जमा होत नाही हे योग्य नाही. याकरिता कोण जबाबदार आहे किंवा ती सिस्टिमच तशी होती काय ? तेव्हाची अखर्चित रक्कम ही १२९ कोटी इतकी होती. आता ती ३३ कोटी इतकी आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

सिस्टिम आताही सुधारलेली नाही. आताही ३३ कोटी रुपये अखर्चित आहेतच. विभागाने सांगितले की, आम्ही यामध्ये सुधारणा केली परंतु ती सुधारणा दिसत नाही. विभागाने दिलेल्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, देयक क्रमांक ५६, दि. ३१ मार्च, २०११ जैन इरिगेशन, जळगाव यांना प्रदान केलेली रक्कम रु. ४१,२६,८९८/- इतकी आहे. देयक क्रमांक ६०, दि. ३१.३.२०११ पर्ल एंटरप्रायजेस, पुणे यांना दिलेली रक्कम रु. १,५१,७०,६२३/- इतकी आहे. ही सन २०१४ ची चौकशी आहे. ती आता पर्यंत सुरू आहे. ती सन २०११ ची आहे. सन २०१४ मध्ये चौकशी बसविली आहे आणि देयक सन २०११ मधले आहे. सन २०११ ते सन २०१४ पेमेंट का नाही केले ? पेमेंट केले नाही तरी कमीत कमी ते जमा तरी केले पाहिजे. पेमेंट न करण्याचे कारण काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, अखर्चित रक्कमेबाबत माहिती देताना आदिवासी कमिशनरेटकडे ११ कोटी ४६ लक्ष आहेत. त्यामध्ये सोलार, जैन इरिगेशन, पॉल एन्टरप्रायजेस व बायोमेट्रिक असे मिळून २.८६ कोटी रुपये अखर्चित होते. अखर्चित म्हणजे १० टक्के. चौकशी सुरू झाली त्यांनी त्या प्रोजेक्टचे व्यवस्थित कमिशनिंग केले नाही. त्यासाठी ते रोखून ठेवण्यात आले होते धारणी येथील बाब गंभीर आहे. धारणी येथे ४६ कोटी २६ लक्ष आहेत. त्यामध्ये विविध योजना आहेत. स्पेशली केंद्र शासनाची विभागाकडे ग्रँट इन एड येते. त्यामध्ये विभागाचे एड डेफिशिअन्सी पाहिली सन २००१ पासून १५ वर्षांच्या अखर्चित रकमांचा ताळमेळाचे काम केलेले असून वित्त विभागाकडे ते मान्यतेसाठी दिलेले आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

मागच्या वर्षी आदिवासी विकास विभागाने मार्चमध्ये बरेच अखर्चित पैसे परत केले आहेत असे वित्त सचिवांनी सांगितले.

येथे वित्त विभागाचे अधिकारी उपस्थित आहेत असे नमूद करून एक नवीन सिस्टिम डेव्हलप होऊ शकत नाही का? जे पैसे विभागाला वर्ग करतात ते ट्रेझरीमध्येच असू द्या. पैसे ट्रान्सफर वगैरे करण्याची गरज नाही, विभागाला पैसे देण्याची काय गरज आहे ? शासन आता १०० टक्के पेमेंट कॅशने करीत नाही असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, आर.डी.डी.ने ती पद्धती प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली असून ती चांगली सुरू आहे. ती रिप्लीकेट करण्याचे प्रयत्न होत आहेत असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, विभागाने निधी मागायचा नाही. मान्यता दिल्यानंतर

बिल येईल तेव्हा ते पैसे विभागाला डायरेक्ट ट्रेझरीकडून मिळतील. तोपर्यंत पैसे तेथे जाणार नाहीत. पैसे हेडक्वॉर्टरला असतील. महाराष्ट्र राज्यामध्ये फक्त आर.डी.डी.ने असे केले आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, यामध्ये असे आहे की, बिल मंजूर करायचे. महसूल विभागाने ICICI बरोबर करार केला आहे. ICICI ला ते टोटल डिमांड प्लेस करतात. तेवढेच पैसे ट्रेझरीतून निघतात. एका दिवसात ते पेमेंट होते. तरतूद वितरित केल्यानंतर त्यांच्या सोईने ते रक्कम वापरतात ते बंद केले आहे असे वित्त विभागाच्या सचिवांनी सांगितले.

१२९ कोटींची रक्कम पडून राहिली, त्याचे व्याज जमा करायचे, ते ट्रेझरीमध्ये जमा करायचे. व्याज नाही करंट अकाऊंटमध्येच असेल. महालेखापाल कार्यालयाने यावर अभ्यास केला पाहिजे. यांनी व्याजाचे नुकसान केले आहे. एक तर योजनेचे पैसे लोकांना मिळाले नाहीत. शिवाय व्याजाचे नुकसानही झाले. याबाबत लोकलेखा समितीने विधानसभेला अशी शिफारस पाठविली पाहिजे की, १०० टक्के पेमेंट ट्रेझरी करेल. विभागाचे सर्व पैसे ट्रेझरीमध्ये राहणार. तुम्ही बिल क्लिअर झाल्यानंतर कोषागाराला कळवावे. त्यानंतर २४ किंवा ४८ तासांत किंवा ३ किंवा ८ दिवसांत कोषागार प्रदान करेल. कोणी कोणाला पैसे वर्ग करणे हे आता बंद करावे. ग्रामविकास विभागाने सुरू केलेली सिस्टिम आदिवासी विभागानेही अंगिकारली पाहिजे. प्रशासकीय मान्यता दिल्यावर पैसे मार्क करावेत. डायरेक्ट ट्रेझरीमधून पेमेंट होईल. आता या १२९ कोटीचे काय होणार? १२९ कोटी रुपये असो की, सध्याचे ३३ कोटी रुपये असो, the money should not be kept idle. त्याचे व्याज वगैरे काही नाही. विभाग येथे व्याज भरणार. बँकेमध्ये पैसे असणार. लोकांना योजनांचा लाभ होणार नाही. बँकेत पैसे असणार त्याचा लाभ सरकारला होणार नाही. कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात यावी. आर.डी.डी. पॅटर्न वापरला पाहिजे. त्याकरिता एफ.डी. नाही म्हणणार नाही. एफ.डी. तयार होईल असे मत समितीने व्यक्त केले.

ते सुरू करून ४ महिनेच झाले आहेत. ते सक्सेसफुल झाले असल्यामुळे त्याची अंमलबजावणी करणे शक्य आहे असे वित्त सचिवांनी सांगितले. ते यशस्वी होईल का याबाबत वित्त विभागाला शंका का येते, ही पद्धती सर्व विभागामध्ये लागू करावी असे समितीने सूचित केले असता, आदिवासी विकास विभागाचे अखर्चित पैसे काढणे व ते परत करणे हे तसे किचकट असते. परंतु, मोठ्या प्रमाणात अखर्चित निधी परत केला आहे. हे विभागीय सचिवांचे क्रेडिट आहे असे वित्त सचिवांनी सांगितले.

मार्चचे प्रेशर कमी केले की खूपशा गोष्टी कमी होतात असे समितीने सूचित केले असता, विभाग ते स्ट्रीमलाईन करेल. केंद्र शासनाचा जो निधी मोठ्या प्रमाणात अखर्चित राहिला होता त्यामध्ये विभागाने असे पाहिले की, तो निधी वितरित व्हायचा. परंतु, मंत्रालय स्तरावर प्रत्येक योजनेचे मार्गदर्शक तत्त्व निर्गमित करायचे ही स्पष्टता नव्हती. त्यामुळे पी.ओ. ए.टी.सी. ४-५ वर्षे वाट पाहत होते. विभागाने डिसेंबर, २०१७ मध्ये १५ वर्षांचा ताळमेळाचे काम केले. विभागाने पी.ओ. स्तरावरील प्रशासकीय अधिकार पी.ओ. ना दिलेले आहेत. विकेंद्रीकरण केले आहे. त्यांच्या प्रकल्प भागामध्ये जे काम घ्यायचे आहे, त्याची प्रशासकीय मान्यता ते देऊ शकतात. तसेच ठक्कर बाप्पा योजनेचे पैसे हे शासनातर्फे मार्च अखेरीस मोठ्या प्रमाणात वितरित व्हायचे. त्यामध्येही प्रशासकीय मान्यतेचे दोन स्तर होते. आधी पी.ओ. प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव ए.टी.सी. ला पाठवावयाचे व ए.टी.सी. कडून ते कलेक्टरकडे जात होते. त्यामध्येही विलंब व्हायचा. तो स्तरही काढलेला आहे. आता ठक्कर बाप्पा योजनेबाबत ज्याप्रमाणे DPC च्या इतर योजनांच्या प्रशासकीय मान्यतेचे अधिकार कलेक्टरना आहेत व टी.एस. कलेक्टरकडे सादर करतील. So, this has got streamlined. घरकुलच्या अखर्चित निधीबाबत विभागाने स्टेट हाऊसिंगचा हिशोब काढला. स्टेट हाऊसिंग युनीट ग्रामविकास विभागाच्या नियंत्रणाखाली केलेले आहे. शबरी घरकुल योजनाही त्यातूनच राबविण्यात येते. Department had transferred that unspent amount to State Housing unit. या आर्थिक वर्षामध्ये ते करता आले नाही कारण ६०:४० रेशिओ स्टेट सेक्टर व DPC चा ठेवायचा असतो. परंतु, आता बरीच लोकसंख्या OTSP मध्ये आदिवासी गेलेले आहेत. काही योजना या DPC मध्येही असतात व स्टेट सेक्टरमध्येही असतात. त्याचे नियोजन व तरतूद करताना थोडेसे अनियोजन व्हायचे. त्यामुळे DPC काही जिल्ह्यांमध्ये कमी तर काही जिल्ह्यांमध्ये जास्त मिळायचे. Department has centralising that and putting important schemes in state sector, so that according to the demand department can redistribute it. These are the changes depatment has making. तरीही मागची अखर्चित रक्कम ज्या ज्या कामांसाठी मंजूर होती त्याबाबत विभाग ठेकेदारांचा दंड सोडून बाकीची रक्कम काढण्यात येत आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आता शबरी घरकुल योजनेबाबत सांगितले. तसाच सर्वात महत्त्वाचा कौशल्य विकास आहे. आज जेव्हा कौशल्य विकासची योजना जाहीर होते त्यावेळेस एन.जी.ओ. बाहेर निघतात. त्यांच्याकडे पायाभूत सुविधा वगैरे काही नसते. ते त्या दिवशी त्या गोष्टीची नोंदणी करतात. पायाभूत सुविधा नसताना पैसे घेतात व संपवून टाकतात. त्याऐवजी कौशल विकास विभागामध्ये जे लोक नोंदणीकृत आहेत, ज्यांच्याकडे पायाभूत सुविधा तयार आहे, त्यांना जर विभागाने मान्यता दिली तर हे ऐन वेळेस येणारे लोक संपून जातील. कारण त्यांच्याकडे पायाभूत सुविधा नसतात.

त्यांच्याकडे बायोमेट्रिकचे स्कील नसते. ते नोंदणी करतात, त्या लोकांना सांगतात सही करा व निघून जा आणि पैसे उकळतात. त्यांच्या ऐवजी कौशल विकासच्या अंडर रजिस्टर्ड एन.जी.आ. किंवा संस्था असतील त्यांना हे काम दिले तर चांगले होऊ शकेल. अमरावती येथे विभागाच्या अशा योजना तयार होतात, अशा संस्था रजिस्टर होतात त्यातून काहीच साध्य होत नाही असे समितीने निदर्शनास आणले असता, जे नियमित कौशल्य विकास व्होकेशनल ट्रेनिंगचे कोर्सेस आहेत त्याबाबत विभागाने सर्व पी.ओं.ना लेखी सूचना दिलेल्या आहेत. त्यांनी रिट्रिट करून काही जिल्हा कौशल्य विकास अधिकारी व कलेक्टरच्या अधिपत्याखालील समितीमध्ये ठराविक विभागातील रजिस्टर संस्थांकडूनच हे काम करून घ्यायचे आहे. पुढच्या वेळेस तसे निश्चित होईल त्या शिवाय विभाग काही विशेष कौशल्य ट्रेनिंग घेतो. आदिवासी भागांसाठी काही विशेष योजना आहेत. त्यासाठी काही नामवंत संस्था एम्पॅनल करण्यात येतात. त्यासाठी विभागाने Titi खाली कौशल्य विकासाच्या काही योजना तयार केलेल्या आहेत. एम्पॅनलमेंटमार्फतच छाननीनंतर तर विभाग असे विशेष प्रकल्प घेतो की, नेहमीच्या कौशल्य विकास विभागाकडे उपलब्ध नाहीत. In this manner department has trying to do the work now असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

परिच्छेद क्रमांक २.२.४—शैक्षणिक योजना आणि इतर संबंधित कार्याची अंमलबजावणी—

परिच्छेद क्रमांक २.२.४.१—विद्यार्थ्यांना अन्नधान्याचा कमी पुरवठा—

या परिच्छेदामध्ये असे म्हटले आहे की ओपनींग स्टॉक घेतला नाही त्यामुळे कमी सप्लाय दिसतो. यामध्ये जे निकष आहेत त्याप्रमाणे वाटप झालेले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ते निकषाप्रमाणेच झालेले होते. त्याची ई-निविदा प्रक्रिया आदिवासी विकास महामंडळामार्फत झाली होती. त्यामध्ये उच्च न्यायालयात याचिका दाखल झाली होती. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कन्झ्युमर फेडरेशन हे जे मागील वर्षाचे पुरवठादार होते त्यांच्याकडे ते जुन्या रेटवर देण्यात आले होते. स्थगिती उठल्यानंतर उर्वरित मागणी निविदाधारकांकडून करण्यात आली होती. शाळेमध्ये निकषाप्रमाणे पुरवठा झाला. मात्र नंतरच्या पुरवठदारांकडून जेवढी गरज होती तेवढीच खरेदी करण्यात आली. विभागीय सचिवांनी सांगितले.

परिच्छेद क्रमांक २.२.४.२—तांदुळ खरेदीवर जादा खर्च—

तांदूळ खरेदीवर जादा खर्च याबाबतचा हा परिच्छेद आहे. ही खरेदी TDC कडून केली, याची माहिती आदिवासी विकास महामंडळाकडे एम.डी. देतील. पी.डी.एस.मध्ये मिलिंग करताना ६७ टक्क्यांच्या उताऱ्याचा निकष लावण्यात येतो. आश्रमशाळांसाठी तुटलेला तांदुळ नसावा याबाबत ५७ टक्क्यांचा उताऱ्यांचा निकष आहे. त्यामुळे ही तफावत दिसत आहे. एकाधिकार योजनेमध्ये आदिवासी विकास महामंडळ कर्ज घेऊन त्यांची प्रणाली करीत होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एकाधिकार योजना स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेकडून कर्ज घेऊन राबविण्यात येते. समितीच्या माहिती प्रमाणे एकाधिकार योजना ही सन २०१२-२०१३ पर्यंत होती. त्यानंतर ही योजना अस्तित्त्वात नाही असे मत समितीने व्यक्त केले असता, एकाधिकार योजनेतील तालुके कमी झाले. मात्र कमी तालुक्यांसाठी ती योजना अजूनही अस्तित्त्वात आहे. त्यावेळेस ६८ वगैरे तालुके होते ते आता कमी झाले आहेत. २९ तालुक्यांमध्ये ती योजना अस्तित्त्वात आहे, त्यांची यादी देण्यात येईल असे आदिवासी विकास महामंडळाच्या संचालकांनी सांगितले.

मिनिमम सपोर्ट प्राईज प्रमाणे किती तालुक्यांमध्ये खरेदी करण्यात येते. ती सर्वसाधारण शेतकऱ्यांसाठी आहे. ही फक्त आदिवासी भागासाठीच आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, मिनिमम सपोर्ट प्राईज प्रमाणे सर्वत्रच खरेदी करण्यात येते. केंद्र शासनाची हमी भाव योजना आहे. हमी भाव योजना सर्वसाधारण शेतकरी व आदिवासी या दोन्हींसाठी आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

हमी भाव योजना ज्या मार्केट कमिटी मधून मागणी येते तेथे सुरू करण्यात येते. एकाधिकार खरेदी योजना ट्रायबल्ससाठी होती. ही योजना आदिवासींसाठी नाही काय ? कारण आदिवासींचे सर्वात जास्त शोषण होत आहे अशी विचारणा समितीने केली असता, विभाग मिनिमम सपोर्ट प्राईसपेक्षा १ रुपये जादा दर जिल्हाधिकाऱ्यांकडून ठरवून घेण्यात येतो. याबाबत अधिक माहिती देताना केंद्र सरकारचा पूर्ण देशामध्ये जो हमी भाव दर आहे त्यापेक्षा १ रुपया जादा द्यायचे धोरण विभागाकडून राज्य सरकारच्या एकाधिकार खरेदी योजनेमध्ये राबविण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

०१ रुपया म्हणजे काय ? यामध्ये एक रुपयाचे काय महत्त्व आहे अशी विचारणा समितीने केली असता, हमीभाव दरापेक्षा एक रुपयाने जादा दर ठरविण्यात येतो, केंद्र शासनाचा पूर्ण देशामध्ये जो हमी भाव दर आहे, त्याच्यापेक्षा एक रुपया जास्त दर राज्य शासनाच्या एकाधिकार योजनेमध्ये देण्याचे निश्चित करण्यात आले आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१५००-१६०० रुपये जर दर असेल तर त्यावर केवळ १ रुपयाने जास्त दर घेण्यात काय अर्थ आहे ? असे मत समितीने व्यक्त केले.

परिच्छेद क्रमांक २.२.४.३—आश्रमशाळा आणि वसतिगृहांच्या अन्नधान्य खर्चाच्या किंमतीत भरीव वाढ—

सन २०११-२०१२, २०१२-२०१३ मध्ये जेवणावर जो खर्च झाला, अन्नधान्यावर जो खर्च झाला, त्याच्यामध्ये भरीव वाढ झाली. त्या वर्षामध्ये पीआयएल दाखल झाली होती. त्या आहारामध्ये अंडा, केळी आणि इतर फळांचा समावेश करण्यात आला होता, त्याच्यामध्येच वाढ दिसून येते. जे वसतिगृहामध्ये आहे, त्याच्यामध्ये सन २०१२-२०१३ मध्ये ९ टक्के, २०१३-२०१४ मध्ये २० टक्के, २०१४-२०१५ मध्ये ५३ टक्के अशी विद्यार्थी संख्येत वाढ झाली होती आणि त्यांच्यामुळे हॉस्टेल्समध्येही त्या वर्षापासून अंडी, केळी, दुध फळांचा समावेश आहारामध्ये केला होता. त्याच्यामुळे ही वाढ झाली आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

महालेखापाल आक्षेप सन २०१२-१५ या वर्षामध्ये आश्रमशाळांच्या प्रवेशामध्ये घसरता कल होता, याची काय कारणे आहेत ? विद्यार्थ्यांची संख्या सन २०१२ मध्ये २९७९२ होती, २०१३ मध्ये २८५२५ इतकी संख्या होती. २०१४-२०१५ मध्ये २६६९६ इतकी विद्यार्थी संख्या होती असे महालेखापालांचे आक्षेप असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता, यासंदर्भात शाळांमध्ये एकूणच घट झालेली आहे, याची विगतवारी उपलब्ध करावी लागेल. हा केवळ ५२ शाळांचा आकडा आहे. राज्यात एकूण अनेक आश्रमशाळा आहेत. Whether there was declining trend in those years, It has have to verify. The A.G. Para was regarding the sudden increase in expenditure असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Committee agree with department but what is the basic reason for decrease in the number of students? अशी विचारणा समितीने केली असता, याची सविस्तर माहिती आता नाही. काही शाळा टीएसपी क्षेत्रात आहेत, काही ओटीएसपी क्षेत्रात आहेत. मागील वर्षीपर्यंत ट्रेण्ड पाहिला तो असा होता की, रिमोट एरियातील शाळांमध्ये मार्जिनल इन्क्रीज आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

महालेखापाल यांनी नमूद केले आहे की, सन २०१२-२०१५ पर्यंत आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये घट झाली होती. ग्रामीण भागात, आदिवासी कुपोषित मुले आहेत, आदिवासी विकास विभागाच्या आश्रमशाळांमध्ये विद्यार्थी संख्या कमी होत आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, शेड्यूल्ड एरियामध्ये मार्जिनल इन्क्रीज आहे. ओटीएसपी क्षेत्रात अमरावती जवळील शाळांमध्ये मार्जिनली ड्रॅस्टीक डिक्रीज आहे. विद्यार्थ्यांच्या पालकांचा कल इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेण्याकडे जास्त असल्यामुळे प्राईव्हेट कॉन्व्हेंटची संख्या वाढत चालली आहे. शेड्यूल्ड एरियामध्ये या सोयी नसल्यामुळे तेथे आश्रमशाळांमध्ये प्रवेश वाढला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शहराच्या लगतच्या भागामध्ये आदिवासी लोक कॉन्व्हेंटमध्ये जाणे पसंत करीत असतील तर शहरालगतच्या शाळा सेमी इंग्रजी करण्याचा विचार करणार का, अन्यथा शाळा बंद होतील. यामध्ये विभागाची काय भुमिका आहे ? आदिवासी मुले दुसऱ्या मुलांसोबत शिकली तर त्यांची चांगली प्रगती होईल. कोअर एरियातील कॉलेजेस आणि शाळा सेमी इंग्रजी केल्या पाहिजेत, आदिवासी विभाग त्यांना शैक्षणिक सुविधा देत नाही. त्यांची प्रगती होणे आवश्यक आहे. आदिवासी मुलांचे प्रवेश जनरल शाळांमध्ये होणे आवश्यक आहे. बाकी समाजतील लोकांसोबत त्यांचे इंटरॲक्शन होते असे जर असेल, आदिवासी विद्यार्थी कमी होत असतील तर इतर कॉन्व्हेंटमध्ये त्यांना ॲडमिशन देऊन त्यांची फी भरण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, हे जे विश्लेषण आहे, तो केवळ ५२ शाळांबाबतचे लेखापरीक्षण आहे. ५२ शाळांची विशिष्ट त्या वर्षांमध्ये किती मुले कमी झाली, जास्त झाली ती आकडेवारी उपलब्ध नाही. परंतु संपूर्ण राज्याची त्या वर्षांची जी आकडेवारी आहे, ती सांगणे शक्य आहे. २०१०-२०१५ या काळात एकूण नामांकित एकलव्य शासकीय अनुदानित, या चारही कॅटेगरीजच्या शाळांची मिळून घोषित मागणी नाही. यामध्ये सर्व स्टेबल होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एकलव्य आणि नामांकित योजना जोडल्या म्हणून ते स्टेबल आहे. ते वगळता क्लेम डेक्लाईन होते. पुस्तकामध्ये जे महालेखापाल यांचा आक्षेप आहे, तो चुकीचा आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, राज्यातील शाळांना शहरांच्या जवळ ज्या शाळा आहेत, त्यांना तो महालेखापालांचा आक्षेप नाही, परंतु तरीही मी उत्तर देते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

अतिरिक्त आदिवासी आयुक्त यांच्या अधिकारक्षेत्रातील ८९ शासकीय आश्रमशाळा, १०४ शासकीय वसतिगृह येतात. यांच्या दस्ताऐवजाच्या पडताळणीत असे आढळून आले की, सन २०१२-२०१५ दरम्यान ८९ शासकीय आश्रमशाळांच्या प्रवेश संख्येत घसरता कल होता. याची आकडेवारी दिलेली आहे. समिती परिच्छेदाच्या बाहेर विचारत नाही. जे यातील स्पेसिफिक आहे, ते समितीने विचारले असे समितीने निदर्शनास आणले असता, हे शासनाच्या विचाराधीन आहे की, जे ग्रामीण भागात किंवा शहराजवळ आश्रमशाळा इंग्रजी माध्यमातून करण्याचा शासनाचा मानस आहे का हे समितीने विचारले होते. त्याबाबत विभागाकडे नामांकित योजनेकरिता इतकी आंदोलन आणि मोर्चे होतात. शासनाने २०१० मध्ये नामांकित शाळांची योजना आणली. प्राईव्हेट इंग्रजी माध्यम शाळांमध्ये आदिवासी मुलांना आदिवासी विकास विभाग प्रत्योजित करतो. त्याच्यावर आता सॅच्युरेशन लिमिट आलेली आहे. ग्रामीण भागामध्ये पायाभूत सुविधांची सोय नाही. पालकांची इंग्रजी माध्यमाची मागणी आहे. विभागाने असा निर्णय घेतला की, शासकीय आश्रमशाळा ज्या चांगल्या पायाभूत सोयींनी युक्त आहेत, बराच मोठा प्रयत्न करून आदिवासी विकास विभागाच्या

शासकीय आश्रमशाळा आयएसओ सर्टिफाईड आहेत, त्यांना टार्गेट करून पाईपलाईनमध्ये आहे, सुचीत आहे, अशा १०० शाळांना इंग्रजी माध्यम, सेमी इंग्रजी माध्यमांमध्ये रुपांतरीत करण्याचा मानस शासनाचा आहे, त्यासाठी प्रयत्न केला जाईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आश्रमशाळा-वसतिगृहामध्ये संख्या कमी होत आहे, खर्च वाढत आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, अंडी, दुध, केळी हा मेन्यूमध्ये बदल झालेला आहे. याकरिता खर्चात वाढ झाली आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यामुळे ८० टक्के खर्चात वाढ होते का ? अशी विचारणा समितीने केली असता, काही आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना कमी ट्रेंड आहे. हॉस्टेल्समध्ये या मेन्युमध्ये बदल झाल्यानंतर विद्यार्थी संख्या वाढलेली आहे. यामुळे वाढीव खर्च दिसून येतो. आश्रमशाळांमध्ये प्रामुख्याने जे मेन्यू आहे, त्यामध्ये बदल झालेला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

समितीला ही माहिती मिळेल का ? फळे म्हणजे सफरचंद वगैरे कोणत्या भावाने विकत घेतलेली आहेत का ? याबाबत विवरण दिलेले आहे. विवरण पत्रामध्ये सफरचंदाचा भाव १४५ रुपये प्रती किलो असा दाखविण्यात आलेला आहे. सन २०१८ मध्ये देखील हा भाव नाही. सामान्य माणूस वेळी सफरचंद विकत घेतो, त्यावेळी ८० रुपये प्रती किलो असा असतो. हे काश्मीरी सफरचंद असतात. इम्पोर्टेड अमेरिकन सफरचंद्र १५० रुपये प्रति किलो विकत घेऊन आदिवासी मुलांना खायला देण्यात येतात का ? या फळांकरिता वार्षिक टेंडरींग केले असेल तरीही हा भाव जास्त आहे. निविदा प्रक्रिया निश्चित करताना वास्तववादी दृष्टीकोन ठेवला पाहिजे. चंद्रपूरमध्ये बारा प्रकारचे भाव आले तर सर्वांना ऑर्डर दिली का ? जो ऑर्डर देणारा माणूस आहे, तो बाजारभावाची खात्री केल्याशिवाय सही करतो का ? अंदाजित किंमत किंवा बाजार भावाप्रमाणे भावही पाहिले पाहिजे. त्याप्रमाणे जास्तीची आणि कमीत कमी किंमतही (प्राईसही) पाहिली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, आता तर फळे वाटप बंद केलेले आहे. कारण ही फळे सडलेली असतात व तत्सम तक्रारी येत होत्या. फळांविषयी अनेक तक्रारी आल्या होत्या. मुलांना दूध दररोज दिले गेले पाहिजे. दुधाकरिता फळे पर्याय होतो. परंतु फळांपेक्षाही दूध मुलांना देणे आवश्यक आहे. दूध सक्तीचे केलेले आहे. अंडी आणि केळीही सक्तीची केलेली आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

परिच्छेदामध्ये विद्यार्थी संख्येतच वाढ आहे. प्रवेशित विद्यार्थ्यांमध्ये वाढ झालेली आहे. सन २०११-२०१२,२०१२-२०१३ मध्ये ९ टक्के वाढ आहे. २०१३-२०१४ मध्ये २० टक्के वाढ आहे. २०१४-२०१५ मध्ये ५३ टक्के वाढ आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली. परंतु खर्चात १७२ टक्के वाढ झाली. प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या सन २०१२-१३ मध्ये ८९६८ इतकी आहे. २०१३-२०१४ मध्ये ही संख्या ९,९१० इतकी आहे. ती २० टक्के वाढ होत नाही. २० टक्के खर्च वाढण्यासाठी १८०० विद्यार्थी वाढावे लागतात. ८१०० ची बेसलाईन यामध्ये पकडलेली आहे. समितीचे मत एवढेच आहे की, खर्च इन्फ्लेशन रेटनुसार वाढला पाहिजे. प्रतीवर्षीच्या महागाईतील वाढीप्रमाणे खर्चात वाढ झाली तर ठीक आहे. असे जर असते तर या चर्चेची गरजच नसती असे मत समितीने व्यक्त केले असता, विद्यार्थी संख्येमध्ये वाढ आहे, त्याच्या व्यतिरिक्त ११.११.११ रोजी तेथे एक शासन निर्णय निघाला होता, त्यामध्ये ज्याप्रमाणे पूर्वी वसतिगृहातील मुलांना दोन वेळचे जेवण, एक वेळचा नाश्ता होता. जेवणामध्ये परंतु काही पदार्थ कमी होते. ११.११ च्या शासन निर्णयामध्ये त्यांनी भरपूर ॲडिशन केले. फळे, अंडी, केळी, दोन भाज्या, दही हे सगळे आले. त्यामुळे भोजन ठेक्याचे जर १६००-१८०० पर्यंत येत होते, ते एकदम २८००-२९०० पर्यंत वाढले. त्यामुळे मग त्या वर्षीपासून खर्चात ती वाढ आहे. ११.११.११ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी २०१२ पासून सुरू झाली. यामुळे भोजन ठेक्याचे दर वाढले असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

२०१३-२०१५ मध्ये २७ टक्के विद्यार्थी वाढलेले आहेत. याची काय कारणे आहेत? एवढे विद्यार्थी बाहेरून स्थलांतरीत झालेले आहेत का? एका वर्षात २७ टक्के विद्यार्थी संख्येत कशी काय वाढ झाली ? २७ टक्के संख्या एका वर्षात वाढणे म्हणजे एकदम क्वालिटी अपग्रेड झाली असेल म्हणून लोकांना वाटल असेल का ? अशी विचारणा समितीने केली असता, विद्यार्थींची संख्या कशी वाढली हे आता सांगता येणार नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ही शाळा नाही. जिल्हा व तालुक्यांमधील शासकीय आश्रमशाळा असून ते कॉलेजमधील विद्यार्थ्यांसाठी आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सदर परिच्छेदामध्ये हॉस्टेल यांच्यासमवेत आश्रमशाळा सुद्धा आहेत. हा परिच्छेद आश्रमशाळा व वसतिगृहासंबंधी आहे. त्यामुळे ही बाब विभागाने उत्तरामध्ये दुरुस्त करावी. विद्यार्थी संख्या एवढी कशी वाढली अशी विचारणा समितीने केली असता, अमरावती विभागात सन २०११-२०१२ मध्ये ६६१५ विद्यार्थी, २०१२-२०१३ मध्ये ७९८३ विद्यार्थी होते अशाप्रकारे त्यात २१ टक्के वाढ झाली आहे. त्यानंतर विद्यार्थी संख्या ११ हजारपर्यंत वाढली ती ६३ टक्के वाढ आहे. याचा अर्थ तालुका व जिल्हास्तरावर शिक्षण घेणाऱ्या मुलांची संख्या दरवर्षी वाढत आहे. मागील वर्षी विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे हॉस्टेलच्या क्षमतेशिवाय स्वयंम योजना सुरू करून स्टेट लेव्हलला २० हजारपर्यंतची क्षमता वाढवावी लागली. अशाप्रकारे वसतिगृहामध्ये शिक्षण घेण्याकरिता विद्यार्थ्यांकडून मोठी मागणी होत आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

परिच्छेद क्रमांक २.२.४.४—एकाच क्षेत्रातील शासकीय वसतिगृहांसाठी वेगवेगळ्या दराने कॅटरींग सेवा कंत्राट बहाल करणे—

हा परिच्छेद अतिशय गंभीर आहे. नंदुरबार येथे क्रमांक-२ वसतिगृहाकरिता १८९५ रुपये मासिक दर, क्रमांक-१ करिता २७७७ रुपये आणि मुलांचे क्रमांक-२ करिता २६६६ रुपये इतर मासिक दर आहे. मुलांचे गोंडपिंपरी येथील मासिक दर २४४४ रुपये, मुल येथील मुलांच्या वसतिगृहाकरिता २४९९ रुपये, सिंदेवाही येथे २३१६ रुपये मासिक दर आहेत. अशाप्रकारे प्रत्येक ठिकाणी असलेल्या वसतिगृहाच्या मासिक दरामध्ये ३०० ते ४०० रुपयांचा फरक दिसून येत आहे. याकरिता चंद्रपूर पीओ यांनी मान्यता दिली असावी. परंतु ही बाब त्यांनी तपासलेली आहे असे वाटत नाही. एका बाजूला २३०० ते २४०० रुपयांचे मासिक दर येत असताना दुसऱ्या बाजूला २९९९ ते ३००० रुपयांपर्यंत मासिक दर करण्यात आलेले आहेत. तसेच १० वसतिगृहांकरिता निविदा काढल्यानंतर त्यात ज्यांनी निविदा भरली त्यांना ई-टेंडरच्या नावाखाली मान्यता द्यावयाची अशी विभागाची पद्धत आहे का? ही बाब योग्य वाटत नाही. तसेच २३०० ते २४०० रुपयांच्या मासिक दराऐवजी त्यांनी ३ हजार रुपयांपर्यंत वसतिगृहांचे मासिक दर केलेले आहेत. यासंबंधी विभागाला त्यांना रिकॉल करता येत नाही का? याबाबत संबंधितांवर कारवाई व्हावयास नको का ? अशी विचारणा समितीने केली असता, समितीला जो फरक दिसून येत आहे त्यात वस्तूस्थिती अशी आहे की, मुलींच्या वसतिगृहाकरिता ठेक्याचे कमी दर आहेत. तसेच मुलांच्या वसतिगृहासाठी जास्त दर आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समिती विभागाच्या मताशी सहमत नाही. मुलांचे गोंडपिंपरी येथील मासिक दर २४४४ रुपये, मुल येथील मुलांच्या वसतिगृहाकरिता २४९९ रुपये, सिंदेवाही येथे २३१६ रुपये मासिक दर असून ही सर्व वसतिगृहे मुलांची आहेत. समिती २३०० ते ३००० रुपयांच्या रेजंसंबंधी चर्चा करीत आहे विभागीय प्रतिनिधी समितीला ज्या पद्धतीने माहिती देत आहोत ती विचारपूर्वक द्यावी. नंतर आपण समितीला दिलेली माहिती चुकीची आढळून आल्यास त्यासंबंधी आपल्या नावावर त्याची नोंद घेतली जाईल. ही बाब स्वीकारून त्याबाबत आतापर्यंत कारवाई करावयास पाहिजे होती असे समितीने सूचित केली असता, There is a problem at the local level. This was an online tendering system. तेव्हा असलेली पद्धत व सध्या विभागाने स्वीकारलेली पद्धत यामध्ये असलेली तफावत याबाबत माहिती देण्यात येत आहे. तसेच या संदर्भात केलेल्या तपासणीमध्ये ज्या चुका आढळून येतात त्या योग्य पद्धतीने ॲड्रेस केल्या पाहिजेत. तसेच यासंबंधी कोणी जाणीवपूर्वक काम केले असल्यास त्याच्यावर जबाबदारी निश्चित केली पाहिजे. त्यावेळी हॉस्टेलनिहाय ऑनलाईन पद्धतीने दर मागविण्यात आले होते. त्यांनी टेंडरिंग सिस्टीम केली होती. तसेच त्यात आलेल्या कमी दरांच्या निविदाधारकांना वाटाघाटी करण्यासाठी बोलाविण्यात आले होते. वाटाघाटीमध्ये जे लोक तयार झाले नाहीत त्यांच्या दराकरिता त्यांनी एटीसीकडून मान्यता घेतली असे त्यांचे म्हणणे आहे. त्यांचे अनऑफिशिएली असे म्हणणे आहे की, मुलांच्या हॉस्टेलमध्ये रेजंची मोठी तफावत आहे. जिल्हा मुख्यालयातील काही ठराविक शहरांमध्ये मुलांच्या हॉस्टेलमध्ये अनधिकृत मुलांची संख्या, डीबीटीलेसमध्ये जे आंदोलन होते ते सुद्धा एक कारण आहे. त्यात मुलींच्या हॉस्टेलमध्ये अधिकृत संख्येइतक्याच मुली तेथे राहत असतात. त्यामुळे मुलींच्या वसतिगृहाचे मासिक दर ८०० ते ९०० रुपये कमी असून दुसऱ्या बाजूला मुलांच्या वसतिगृहाचे दर जास्त आहेत. या संदर्भात मुलांच्या हॉस्टेलमध्ये मुलांची संख्या अनधिकृत संख्या राहत असल्यामुळे त्यांनी शहरातील वसतिगृहे असली तरी मुलांच्या वसतिगृहाकरिता ठेकेदारांकडून निविदेत जास्त दर येत होते असे म्हणणे आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

गोंडपिंपरी, मुल तसेच सिंदेवाही येथील मुलांच्या वसतिगृहाचे मासिक दर कमी आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता समिती दो हॉस्टेल की तुलना कर रही है. जिले के ८-१० हॉस्टेल की तुलना कीजिए असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यासंबंधी हेतुपुरस्सर किंवा नियमाने कार्यवाही केली असल्याबाबत सांगण्यात येत आहे. यासंबंधी सदसदविवेकबुध्दीने निर्णय घेतला पाहिजे. समितीने याबाबत सुरुवातीलाच सांगितले की, समिती १८०० चे दर मान्य करीत नाहीत. परंतु २४०० ते ३००० च्या मध्ये जे दर आलेले आहेत त्यासंबंधी वाटाघाटी करण्यात आल्यासंबंधी लेखी स्पष्टीकरणामध्ये कोठेही नमूद केलेले नाही. तसेच वाटाघाटी केल्याबाबत यापूर्वी कधीही मान्य केलेले नाही. यासंबंधी अशी पद्धत असल्याबाबत विभागीय सचिवांनी समितीला सांगितले. विभागाला एका ठिकाणी २४०० रुपयांचा दर मिळत असेल व सर्व वसतिगृहांकरिता एकाच वेळी टेंडर काढले असल्यास व त्याबाबत एकाच व्यक्तीला निर्णय घ्यावयाचा असल्यामुळे विभागाचे ठराविक दर निश्चित करून दिला पाहिजे. तसेच अनधिकृत मुलांना जेवण द्यावे लागणार असे गृहित धरून विभाग जास्त मासिक दर देणार असल्यास ही बाब योग्य नाही. अशाप्रकारे अनधिकृत मुलांना कशासाठी जेवण द्यावयाचे. त्याकरिता त्यांच्याकडून पैसे घेतले पाहिजेत. त्यामुळे विभागीय सचिवांनी समितीला दिलेली माहिती संयुक्तिक वाटत नाही. विभागाने यापूर्वी चांगली कामगिरी केली आहे. परंतु यासंबंधी कशाप्रकारे कार्यवाही केली आहे याबाबत समितीला माहिती द्यावी. सदर प्रकरणी पूर्वीच्या लोकांना संरक्षण देऊ नये. त्यांच्याकडून चूक झाली असल्यास तसे समितीला सांगावे. टेंडरिंग सिस्टीममध्ये एकाच व्यक्तीकडून निर्णय घेऊन एकाच वेळी सर्व टेंडर प्रक्रिया केली जात आहे. परंतु त्यात एका ठिकाणी वसतिगृहाचे मासिक दर २४०० रुपये व दुसऱ्या ठिकाणी असलेल्या वसतिगृहाचे मासिक दर ३००० रुपये इतके आहेत. यासंबंधी निविदेत ज्यांचे दर कमी आलेले आहेत त्यांना विभाग डोळे झाकून मान्यता देणार आहोत का ? अशी विचारणा समितीने केली असता, आता समितीने अशा सूचना दिलेल्या आहेत की, एका जिल्ह्यात जेव्हा अशाप्रकारे निविदा काढल्या जातात तेव्हा त्यामधील दरांमध्ये सारखेपणा असला पाहिजे. तसेच

जेथे दर कमी येतील तेच गृहित धरावेत. त्याशिवाय एटीसीस्तरावर अन्नधान्य तसेच किराणा याकरिता टेंडर काढले जातात त्यातील वस्तूंकरिता सर्वात कमी रकमेची निविदा आलेली आहे त्या निविदाधारकाला बोलवून पीओस्तरावर नव्हेतर रिजनमध्ये त्यांना पुरवठा आदेश दिले जातात. याकरिता दोन मोठे रिफर्मस केलेले आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सदर प्रकरणी यापूर्वी ज्यांनी कार्यवाही केली आहे त्यांना दंडीत करावे असे समितीने सूचित केले. मुले आणि मुलींच्या वसतिगृहाचे मासिक दरात वाढ केल्यास काही हरकत नाही. परंतु त्यात एकसारखेपणा असला पाहिजे.या संदर्भात ज्यांनी कार्यवाही केली त्यांच्यावर कोणती कारवाई करणार आहात ? अशी विचारणा समितीने केली असता, सदर दरामध्ये मोठा फरक दिसून येत आहे. तसेच सदर प्रकरणी ई-टेंडरिंग करून सर्व प्रोसिजर पूर्ण झाली असली तरी याव्यतिरिक्त काही मुद्दे आहेत का, त्याची तपासणी करणे गरजेचे आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर प्रकरणी प्रथमदर्शनी चूक झाली असल्याचे समितीला दिसून आले आहे. त्यामुळे सदर प्रकरणी चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी व त्याबाबतचा अहवाल समितीकडे सादर करावा. एका जिल्ह्यात विविध ठिकाणी वेगळे दर आकारणी करण्यात आली आहे. तसे घडायला नको होते. तेव्हा पीओ म्हणून कोण कार्यरत होते ? त्या काळात एटीसी पदावर कोण कार्यरत होते ? अशी विचारणा समितीने केली असता, तेव्हा पीओ पदावर श्री. वानखेडे कार्यरत होते. सन २०१५ ते २०१८ पर्यंत डॉ. माधवी खोडे ह्या कार्यरत होत्या. त्यापूर्वी डॉ. पल्लवी दराडे सदर पदावर कार्यरत होत्या असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

सदर गोष्टीला एटीसी यांनी मान्यता दिली असल्यामुळे त्यांनी ही बाब तपासून त्यात दुरूस्ती करणे अत्यावश्यक होते. त्यामुळे सदर प्रकरणी चौकशी केल्यानंतर सर्व फॅक्टस समोर येऊ शकतील.सदर प्रकरणी पुढील बैठकीपूर्वी चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करावी. आपल्या विभागाची पुढील बैठक एक महिन्यामध्ये घेतली जाईल असे समितीने सूचित केले असता, सदर प्रकरणी चौकशी केली जाईल असे विभागीय सचिवांनी आश्वस्त केले.

परिच्छेद क्रमांक २.२.४.५—शासकीय वसतिगृह बांधण्यातील विलंब—

सदर परिच्छेदासंबंधी २०१८ पर्यंत १७९ वसतिगृहासंबंधी कार्यवाही केली जाईल असे सांगितले होते असे समितीने निदर्शनास आणले असता, विभाग १९० पर्यंत पोहोचला आहे. तेव्हा ३५७ इमारती भाडे तत्त्वावर होत्या. सध्या ३०१ इमारती भाडे तत्त्वावर आहेत. तसेच १३४ इमारती शासकीय मालकीच्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यावर्षी ९ इमारतींना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. ७ इमारतींचे अंदाजपत्रक तयार आहे. ७६ इमारतींचे बांधकाम यावर्षी सुरू करण्यात येत आहे. याकरिता १२५ कोटी रुपयांची तरतूद केली आहे.५८ इमारतींना मान्यता दिली असून त्यांचे बांधकाम सुरू आहे. असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

३०१ इमारतीसंबंधीची सद्यःस्थिती काय आहे? प्रगतीपथावर किती कामे आहेत? ३०१ कामांपैकी किती इमारतींना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे व त्यापैकी किती कामे सुरू आहेत व किती इमारतींकरिता जागा उपलब्ध झालेली नाही ? ५८ इमारतींचे बांधकाम कधी सुरू झाले व त्याकरिता कधी कार्यादेश देण्यात आला? ती कामे कधीपर्यंत पूर्ण करायची होती व त्यांची सद्यःस्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, आदिवासी विकास विभागाने बांधकाम विभागाकरिता स्वतंत्र कक्ष निर्माण केला आहे. त्याचे इनचार्ज मुख्य अभियंता कार्यरत आहेत. ते समितीला यासंबंधी सविस्तर माहिती देऊ शकतील. याकरिता सार्वजनिक बांधकाम विभागाकडून काही इंजिनियर्स डेप्युटेशनवर घेतलेले आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले. वसतिगृहाच्या बांधकामाबाबत माहिती देताना सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात ५८ कामांचा समावेश होता. सदर कामे प्रगतीपथावर आहेत. तसेच ५८ कामांना वेगवेगळ्या तारखांना वर्कऑर्डर दिलेल्या आहेत. त्याबाबतची यादी समितीकडे सादर करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. समिती कोणत्या वर्षात किती कामे सुरू झाली याबाबत समितीला वर्षनिहाय माहिती द्यावी. वर्क ऑर्डर कधी दिली, किती दिवसांत काम पूर्ण करण्याची मुदत होती, त्या मुदतीत ते काम पूर्ण होणार आहे काय व ती वसतिगृह कधी सुरू करणार ही सर्व माहिती द्यावी. कामाची प्रगती किती आहे, काम किती दिवसात पूर्ण होणार, ते कधी सुरू केले याबाबतची वर्षनिहाय माहिती द्यावी असे समितीने सूचित केले असता, जो नियोजन आराखडा केला होता त्या अनुषंगाने २२ कामे मे, २०१८ अखेर पूर्ण केली होती. जून अखेर १३ पूर्ण केली होती. सप्टेंबर अखेर ३ पूर्ण करण्यात येणार आहेत व डिसेंबर, २०१८ अखेर ३ पूर्ण करण्यात येणार आहेत. मार्च, २०१९ अखेर ७ कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. सध्या सुरू नसलेली ९ कामे आहेत. पुढच्या वर्षी सन २०१९ मध्ये ४८ कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. सुरू असलेल्या सर्व कामांबाबत विभागाने नियोजन आराखडा तयार केलेला आहे त्याप्रमाणे विभाग कारवाई करीत आहे. या कामांना निधीची अडचण अजिबात नाही असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

तरतूद किती आहे व विभाग खर्च किती करत आहे. कॉंट्रॅक्टरचे काम निधी नाही म्हणून प्रलंबित राहिले पाहिजे. मात्र विभागाकडे अशी परिस्थिती आहे की, निधी आहे व काम होत नाही. ही परिस्थिती विभागाच्या आराखड्यावरून निदर्शनास येते. “Inefficiency of tribal

development department " हा शब्द योग्य ठरेल. निधी उपलब्ध असताना त्याचे रिझल्ट देऊ शकत नाही. विभाग याकरिताच आता पी.डब्ल्यू.डी. सेपरेट केले आहे.ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे प्रगतीपथावर होती. ती आता आदिवासी विकास विभागाकडे पूर्ण हस्तांतरित झालेली आहेत या कामाकरिता विभागाकडे जे.ई. पासून ई.ई. पर्यंत सर्व स्टाफ विभागाकडे आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाकडे २ अधीक्षक अभियंता आहेत. ४ कार्यकारी अभियंता आहेत. १६ उप अभियंता आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

५८ कामे प्रगतीपथावर आहेत. बाकीच्या कामांबाबत अजून किती कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे? निधीपेक्षा जास्त पुढे काम विभागाने केले पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने आता तसे नियोजन केलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. मात्र तसे होत नाही. ५८ कामे प्रगतीपथावर आहेत. अजून कामांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे का ? कारण विभागाकडे ३०१ कामांची पेन्डसी आहे ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, आता १४६ ठिकाणच्या शासकीय जागा उपलब्ध झालेल्या आहेत. ५८ कामांव्यतिरिक्त १४६ ठिकाणच्या जागा आता हस्तांतरित झालेल्या आहेत. त्यापैकी ७० कामांना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. ४१ कामांची अंदाजपत्रके प्रगतीत आहेत, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जे.ई. किती आहेत ? विभागाकडून जवळपास ६८ जे.ई. आहेत. डेप्युटी इंजिनिअर १६ आहेत. त्यापैकी एक जव्हारला आहेत. अशा प्रकारे प्रत्येक प्रकल्पाच्या अनुषंगाने आहेत. समितीला या कामासाठी नियुक्त केलेल्या इंजिनिअर्सची आम्हाला यादी द्यावी. आतापर्यंत विभागाच्या साईट्स रिमोटमध्ये असताना मॉनिटर होत नव्हत्या. विभागाचे अधिकारी जिल्ह्यातच राहत असतील तर ते पुन्हा मॉनिटर होणार नाही. ते त्यांच्या हेडक्वार्टरला राहतात काय ते पहावे लागेल. त्यांचे हेडक्वार्टर कुठे आहे याची यादी द्यावी असे समितीने सूचित केले असता, त्याची यादी देण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ए.सीं.चे हेडक्वार्टर कुठे आहे, ई.ई. कुठे आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, १ ए.सी. नाशिकला तर १ ए.सी. नागपूरला आहेत. १ ई.ई. ठाणे, १ धुळे, १ चंद्रपूर व १ अमरावतीला आहेत. अमरावतीच्या ई.ईं.चे नाव श्री. पवार आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

५८ कामे प्रगतीपथावर आहेत. १४६ कामांसाठी जागा उपलब्ध आहे. त्यापैकी ७० कामांना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. या ७० कामासाठी अर्थसंल्पीय तरतूद केली आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यांना प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे व ती कामेही तुम्हाला सुरू करावयाची आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

परिच्छेद क्रमांक २.२.४.६—शासकीय आश्रमशाळा बांधण्यातील विलंब—

शासकीय आश्रमशाळा बांधण्यातील विलंबाबाबतचा हा परिच्छेद होता. ३४ शाळांचे लेखा परीक्षण होते. त्यापैकी सन २०१७-२०१८ पर्यंत पूर्ण झालेल्या शाळांची संख्या १६ इतकी आहे. १० बाबत अजून जमीन उपलब्ध नाही अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

३४ शाळांबाबत माहिती देण्यात येत आहे काय? महालेखापालांनी असे नमूद आहे की, ८ शाळा पूर्ण झाल्या. ४ शाळा ट्रान्सफर व्हायच्या आहेत. ३४ शाळांची माहिती देण्यात येत आहे त्यापैकी एकूण ९ आश्रमशाळांचे काम सुरू झाले नाही असे नमूद केले होते असे समितीने निदर्शनास आणले असता, आता सन २०१७-२०१८ पर्यंत १६ शाळा पूर्ण झाल्या आहेत. २०१५-२०१६ मध्ये जमीन उपलब्ध नसलेल्या १० शाळा होत्या. आता त्यातील फक्त ४ राहिलेल्या आहेत. ६ करिता जमीन मिळालेली आहे. सन २०१५-२०१६ मध्ये ८ कामे प्रगतीपथावर आहेत. त्यातील गारगाव व गिरगाव ही दोन कामे सन २०१७-२०१८ पर्यंत पूर्ण झालेली आहेत. रणकोळ, विनवळ, गुहीर, सूर्यमाळ, पळसुंडे व कावळे ही ६ कामे अंडर प्रोग्रेस आहेत. फक्त ४ शाळांकरिता आपल्याला अजून जागा मिळालेली नाही. बाकीच्या शाळा पूर्ण होतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

एकूण १८ शाळा पूर्ण झाल्या आहेत तर ६ कामे प्रगतीपथावर आहेत आणि ४ ठिकाणी विभागाला जागा मिळालेली नाही. यांची टोटल २८ होते उर्वरित ६ शाळांबाबत माहिती देण्यास समितीने सूचित केले असता, एकूण ३४ शाळांपैकी १८ शाळा पूर्ण झालेल्या आहेत. सन २०१५-२०१६ मध्ये १० शाळांकरिता जागा उपलब्ध नव्हती. त्यापैकी ६ शाळांकरिता आता जागा उपलब्ध आहे. ४ शाळांकरिता अजून जागा उपलब्ध नाही. ६ शाळांच्या जागा या वरखंडा, आंबेसरी, सायवण, आमगाव, कळंबे व ओझर या ठिकाणी आहेत. तेथे काम सुरू झाले नाही. त्याचे अंदाजपत्रक तयार केले आहे. ते काम अजून सुरू व्हायचे आहे. या ६ जागासन २०१७-२०१८ मध्ये उपलब्ध झाल्या असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जागा उपलब्ध झाल्या, निधी उपलब्ध आहे मग निविदा निघाल्या काय व काम सुरू झाले काय ? सन २०१७-२०१८ मध्ये जागा मिळाली तर आतापर्यंत काम सुरू का झाले नाही? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१० मध्ये १० कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली होती. नंतर जागा शोधण्याची प्रक्रिया झाली. त्यानंतर ६ शाळांकरिता जागा मिळालेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाला जागा कधी मिळाली, त्याच्या निविदा झाल्या काय, झाल्या असल्यास त्या कधी झाल्या आणि नाही झाल्या तर का झाल्या नाहीत जागा मिळाल्यानंतर पुढची कारवाई का केली नाही ते सांगावे. कारण प्रशासकीय मान्यता जूनी झाली तर पुन्हा प्रशासकीय मान्यता घ्यावी लागते

असे समितीने निदर्शनास आणले असता, मॅक्झीमम सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी वेळ गेलेला आहे. कारण जागा मिळण्यामध्ये ४ ते ५ वर्षे गेलेली आहेत. सुधारित प्रशासकीय मान्यता मिळण्यामध्ये खूप वेळ लागला असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

कॉस्ट वाढली म्हणून Is it necessary to get Revised Administrative Approval (सुप्रमा) after 5 years अशी विचारणा समितीने केली असता, ५ वर्षानंतर किंमत वाढल्यामुळे सुधारित प्रशासकीय मान्यता घ्यावी लागते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्यास किती वेळ लागतो. विभागाने सुधारित प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ती जागा आता मिळाली आहे. ज्यांची जागा नव्हती त्यांचे आता प्रपोजल नाही. ज्यांच्याकरिता जागा मिळालेली आहे, त्याकरिता सुधारित प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे जागा मिळाल्याची तारीख समितीला कळविण्यात येईल परंतु निविदा काढण्यात आल्या नाहीत तसेच काम सुरू झालेले नाही असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

सन २०१७-२०१८ मध्ये जागा मिळाली. निधी उपलब्ध असतानाही सन २०१८-२०१९ मध्ये निविदा निघत नाही, काम सुरू होत नाही ? प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर विषय संपलेला आहे. विभागाने लगेच टेंडर काढले पाहिजे होते. पैसे आहेत, प्रशासकीय मान्यता आहे सर्व काही आहे, मग अडचण काय आहे? पैसे व जागा उपलब्ध असताना व प्रशासकीय मान्यता मिळालेली असताना काम लगेच सुरू करणे अभिप्रेत आहे. विभागाने ते लवकरात लवकर सुरू करावे असे समितीने सूचित केले असता विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली.

परिच्छेद क्रमांक २.२.४.७—आश्रमशाळा इमारतींच्या बांधकामांवर करण्यात आलेला विवेकहीन खर्च—

या परिच्छेदाबाबत हा तर खूपच गंभीर विषय आहे. चंद्रपूरमध्ये जास्त आहे. पी.ओ. चंद्रपूर यांनी याबाबतची माहिती द्यावी असे समितीने सूचित केले असता, मारेगाव शाळा सन २०१२ मध्ये बंद करण्याचा प्रस्ताव होता. कारण तेथे विद्यार्थी संख्या कमी होती असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विद्यार्थ्यांची संख्या त्यावेळेस किती कमी होती ज्यामुळे विभागाने ती शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला ? एका बाजूला शाळा बंद करण्याची कारण मीमांसा देत असताना दुसऱ्या बाजूला सन २०१६-२०१७ मध्ये शाळा सुरू करण्याचे समर्थन करण्यात येत आहे. हा विरोधाभास आहे. याबाबत माहिती देण्यास समितीने सूचित केले असता, याबाबत निश्चित संख्या कळविण्यात येईल. यामध्ये असे झाले होते की, शाळा बंद करण्याचा प्रस्ताव पाठविण्यात आला. शासनाकडून मान्यता यायची होती. त्यामुळे सन २०१४ पर्यंत शाळा सुरू राहिली असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

शाळा बंद करण्याचा आदेश मिळाला, विलिनीकरणाचा प्रस्ताव मंजूर झाला, त्यानंतरही शाळा का बंद केली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, त्यामध्ये २ वर्षे गेली. त्यामुळे ती सुरू राहिली. मधल्या काळात असे झाले की, त्याच्या जवळच्या उमरी पोतदार व पिंपरी दिक्षीत या गावांमध्ये देखील २ शाळा होत्या. त्या शाळा शेडमध्ये चालत होत्या. तेथेही सोईसुविधांची कमतरता होती म्हणून आंदोलन होत होते. मारेगाव येथे शासकीय जमीन उपलब्ध होती. त्यामुळे तेथे बांधकाम करण्यात आले. पिंपरी दिक्षीत व उमरी पोतदार या २ शाळांमध्ये व्यवस्थित सोईसुविधा नव्हत्या. या दोन्ही शाळांचे विलिनीकरण नवीन बांधकाम केलेल्या शाळेच्या ठिकाणी केलेले आहे. कारण तेथेही सोईसुविधांची कमतरता होती. त्यामुळे आता या दोन्ही शाळा व मारेगावची शाळा परत सुरू केली असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मारेगावची शाळा बंद झाली नाही असे समितीने निदर्शनास आणले असता ती सन २०१४ मध्ये बंद झाली तिचे बांधकाम सन २०१२ मध्ये सुरू झाले होते. त्यावेळेस बांधकामाचा प्रस्ताव वगैरे आला होता असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सन २०१४ मध्ये शाळा बंद करण्यात आली व सन २०१२ मध्ये शाळा बांधकामाचा प्रस्ताव सुरू होता असे सांगण्यात आले मग जर प्रस्ताव सुरू होता तर सन २०१४ मध्ये शाळा बंद करण्याचा निर्णय का घेतला ? हे तर तुघलकी काम दिसत आहे. विभाग एका बाजूला शाळा बंद करण्याचा निर्णय घेता. शाळा बंद केल्यावर तेथील एकही विद्यार्थी दुसऱ्या शाळेत गेला नाही. सन २०१२ मध्ये शाळा सुरू असताना शाळा बंद करण्याचा निर्णय चुकीचा आहे. विभागाने बांधकाम सुरू केले व या दोन्ही शाळांचे विलिनीकरण जर विभाग मारेगावच्या शाळेमध्ये करणार होता तर येथील मुलांना सोडायचे कारणच काय ? हा तुघलकी निर्णय कोणी घेतला, त्यावेळेच्या ए.टी.सी. वर कारवाई झाली पाहिजे. Whoever it may be, the Chair should be charged. विभाग या निर्णयाशी सहमत आहे काय ? चूक झाली असेल तर मान्य करण्यास काय हरकत आहे त्यांना डिफेंड करण्याचे कारण काय ? विभागाने घेतलेला निर्णय चुकीचा असला तरी तो डिफेंडच केला पाहिजे अशी भावना अधिकाऱ्यांमध्ये का आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये डिफेंड करणार नाही. मी याची तयारी करत असतानाची प्रोसेस पाहिली आहे. हा प्रश्न बरोबर आहे की, सन २०१२ मध्ये पी.ओं.कडून, ए.टी.सी.कडून शासनापर्यंत एका वेळेला दोन प्रस्ताव समांतर चालले. एक प्रस्ताव शाळा बंद करण्याचा चालला व दुसरीकडे एक प्रस्ताव त्या ठिकाणी नवीन बांधकाम करण्याचा चालला, ही वस्तूस्थिती आहे व ती नाकारत नाही. हे बरोबर आहे हे वस्तूस्थिती कबूल आहे. हे दोन्ही प्रस्ताव एकाच वेळेस ज्या एकाच अधिकाऱ्याने चालवले ती चूक आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

बांधकाम सुरू केल्यानंतर शाळा बंद का केली ? दोन प्रस्ताव गेले व दोन्ही मंजूर झाले. परंतु, त्यापैकी एकच इम्प्लीमेंट केला पाहिजे होता ना ? दोन्ही प्रस्ताव ए.टी.सी. समोर असतील. एक मुंबईला व एक नागपूरला असे तर नव्हते. ए.टी.सीं.ना हे माहीत होते की, बांधकामाचा एक प्रस्ताव सुरू आहे. नंतर विभागाने घेतलेला निर्णय चुकीचा निघाला ती ४० मुले तेथे गेलीच नाहीत. याचा अर्थ हे कोणाला तरी लाभ देण्यासाठी केले काय ? ती खाजगी शाळा होती काय ? अशी विचारणा समितीने केली असता, जूनी शाळा शासकीय होती व ही शाळा देखील शासकीय आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्या खाजगी आश्रमशाळा होत्या का ? अनुदानित आश्रमशाळा हा पॅटर्न आहे.जिल्हापरिषद, मारेगाव येथे इतर अनुदानित आश्रमशाळा आहेत. ते ज्या दुस-या खाजगी शाळांना मदत व्हावी म्हणून ही आश्रमशाळा बंद करण्याचा निर्णय घेतला का ? अशी विचारणा समितीने केली असता, जी शाळा बंद करायची होती, पण जेथे बांधकाम केले होते. तेथे दोन अजून गैरसोयीची शाळांच्या बिल्डींग होती, त्यांचे तीन शाळांचे एका नवीन बिल्डींगमध्ये विलिनीकरून करून आता तेथे जवळपास २६५ मुले शिक्षण घेत आहेत. तीन शासकीय आश्रमशाळांमध्ये मिळून २६५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

समिती याबाबत सहमत आहे, समितीला याची कल्पना आहे. विभागाने मारेगावची शाळा बंद करण्याचा निर्णय का घेतला ? संख्या कमी आहे म्हणून ! मारेगावी संख्या कमी केला तर दुस-या गावाला त्याला विलिनीकरणाचा प्रस्ताव २०१२ मध्ये केला. ती शाळा २०१४ पर्यंत चालू होती. त्यानंतर विभागाने २०१२ मध्ये एक प्रस्ताव आणखी पाठविला. दोन शाळा आणखी मारेगावची शाळा याचे विलिनीकरणाचा प्रस्ताव पाठविला होता. मारेगावलाच नवीन शाळा बांधण्याचे काम सुरू केले. परंतु तो विलिनीकरणाचा सन २०१२ चा निर्णय सन २०१४ पर्यंत अंमलात आणला नाही. तोपर्यंत या शाळेचे बांधकाम सुरूही झाले. त्यानंतर ती शाळा २०१४ मध्ये बंद करण्याचे कारण काय ? २०१४ मध्ये त्या शाळेबाबत केलेल्या निर्णयाचा पुर्नविचार न करता ती बंद केली. नंतर तिकडची मुले त्या गावाला गेलेली नाही. येथे शाळेचे बांधकाम पूर्ण झाल्यावर सर्व मुलांना जमा करून एकत्रित संख्या दाखविण्यात येत आहे. सन २०१२ मध्ये जो निर्णय केला, त्याबाबत सांगण्यात येते की, दोन्ही प्रस्ताव एकाच वेळी पाठविले. त्यापैकी दोन्ही प्रस्ताव मंजूर झाले. परंतु मंजूर करणाऱ्यानेही विचार केला पाहिजे की, एका बाजूला बांधकाम मंजूर करण्यात येते, दुसऱ्या बाजूला शाळा बंद करण्यात येते. तिसऱ्या बाजूला बांधकाम सुरू झाले तरीही शाळा दोन वर्षानंतर बंद करायचा निर्णय घेतलेला आहे. शाळा बंद केली. बांधकाम सुरू झाले. मुलांची संख्या दाखविण्यात येते. ही पूर्ण कहाणी समितीच्या लक्षात आहे. ही केस आणि ही कृती समर्थनीय नाही. यामुळे याबाबतची जबाबदारी निश्चित केली पाहिजे. तीन शाळांची एकूण विद्यार्थी संख्या किती होती ? आता ती विद्यार्थी संख्या किती आहे ? हे सर्व निर्णय होत असतात. सन २०१४ मध्ये मारेगावची शाळा बंद करण्याचे काही कारण नाही. ६९ मुले जिल्हापरिषद आणि इतर अनुदानित आश्रमशाळेत गेली म्हणजे त्या शासकीय आश्रमशाळा नव्हत्या का ? त्या आश्रमशाळा अनुदानित होत्या परंतु शासकीय आश्रमशाळा नव्हत्या. त्या शाळांना फायदा देण्यासाठी ही आश्रमशाळा बंद केली का ? अशी समितीची धारणा झालेली आहे. विभागाने काहीही केले तरीही कोणीही विचारणारा नाही. यातून जो अर्थ अभिप्रेत आहे, तो समजणे आवश्यक आहे. हि अरेरावी आहे. कोणाची हिम्मत आहे विचारायची ? ६९ मुले एका दिवसात रस्त्यावर आणताना काहीच कसे वाटले नाही ? या मुलांना खाजगी शाळांमध्ये जाण्यास सांगितले. हे योग्य नाही. असे अधिकाऱ्यांनी निर्णय घेतले, त्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित झाली पाहिजे, त्यांना योग्य ती शिक्षा झाली पाहिजे. शिक्षा म्हणजे ताकीद दिली वगैरे असे नाही. अन्यथा त्यांच्यावर काय कारवाई करायची, याची शिफारस समितीला करावी लागेल असे मत समितीने व्यक्त केली असता याबाबत चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यात येईल. याचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर केला जाईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदर निर्णय कोणत्या स्तरावर झाला, याची माहिती अहवालामध्ये स्पष्ट करण्यात यावी. पीओने शिफारस केल्यानंतर त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने हे पाहणे आवश्यक आहे. हा प्रश्न विधानसभेतही लावण्यात येईल. बांधकाम सुरू असताना हे बंद करण्यात येते, म्हणजे यामध्ये कोणाचा तरी वेस्टेड इंटरेस्ट असल्याशिवाय चित्र तयार होत नाही.सन २००६ च्या आश्रमशाळा संहितेत आश्रमशाळांमध्ये मुलभूत सुविधांची तरतूद पुरविण्याचे विहित केले आहे. त्या अनुषंगाने ५०२ आश्रमशाळांच्या ज्या शासकीय इमारती असलेल्या किंवा भाड्याच्या इमारती आहेत, त्यामध्ये कमी झाल्या असतील. यामध्ये स्नानगृह शौचालय, पाण्याची व्यवस्था, वाचनालय, क्रीडांगण, प्रयोगशाळा याप्रमाणे जे ठरलेले निकष आहेत, त्याप्रमाणे त्याची उपलब्धता किती पर्सेंटेजमध्ये आहे, कुठे तूट आहे, याबाबतची थोडक्यात माहिती देण्यास समितीने सूचित केले असता, ५२ आश्रमशाळांबाबत जे लेखापरीक्षण झालेले आहे, त्यामध्ये निकष २० विद्यार्थ्यांमागे एक स्नानगृह, प्रसाधनगृह असणे आवश्यक आहे. या आश्रमशाळांमध्ये सद्य:स्थितीचा जो विभागाने आढावा घेतला, त्यामध्ये सतरा विद्यार्थ्यांमागे एक प्रसाधनगृह २० विद्यार्थ्यांमागे एक स्नानगृह असे उपलब्ध आहे. राज्यात एकूण ५०२ आश्रमशाळा आहेत, त्याच्यामध्ये प्रमाण जरा वेगळे आहे. २५ विद्यार्थ्यांमागे एक शौचालय, २७ विद्यार्थ्यांमागे एक स्नानगृह उपलब्ध आहे. या सगळ्या शौचालय आणि स्नानगृहांच्या दुरूस्तीसाठी आणि उन्हाळयामध्ये विशेष मोहीम राबविल्यामुळे हा परफॉर्मेन्स होऊ शकला, अजूनही काम बाकी आहे, परंतु ते चालू आहे. याच्या संदर्भात जो कायापालट अभियान राबविले त्याच्या अन्वये याच्यामध्ये बरीचशी सुधारणा होऊ शकते असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

त्यामध्ये एक पाण्याच्या व्यवस्थेबाबत तात्पुरती पाणी व्यवस्था असे नमूद केलेले आहे. शाळा जरी परमनंट असेल तर पाण्याची व्यवस्था तात्पुरती योग्य नाही. पाणी ही मुलभूत व्यवस्था आहे. १४३ ठिकाणी तात्पुरती पाण्याची व्यवस्था आहे. तात्पुरतीपैकी भाड्याने ९५ आहे, बाकी तर शासनाचेचे आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, मुलभूत सोयी सुविधांमध्ये या मुद्दयांचा समावेश केलेला आहे.जेथे तात्पुरती व्यवस्था आहे, तेथे कायमस्वरुपी व्यवस्थेचे नियोजन केलेले आहे. तात्पुरती व कायमस्वरुपी व्यवस्था यातील फरक सांगताना कित्येक ठिकाणी ग्रामपंचायतीच्या पाणीपुरवठा योजनेतून ग्रामपंचायतीशी टाय-अप करून पाण्याची व्यवस्था केलेली आहे. पाण्याचा स्त्रोत यातून उन्हाळयातही पाणी पुरेल, एवढा ज्या ठिकाणी सोर्स आहे, त्याला कायम स्वरुपी म्हणता येईल. कायमस्वरुपी मध्येही दोन्ही पद्धतीच्या आहेत. जेथे ग्रामपंचायतीशी टाय-अप आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

काही ग्रामपंचायतीमध्येही पाणी नाही. तेथेही तात्पुरती पाण्याची व्यवस्था आहे. पाण्याची व्यवस्था असलीच पाहिजे, त्याला तात्पुरते स्वरुप ठेऊ नये असे समितीने सूचित केले असता, त्याप्रमाणेच आता नियोजन करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एखाद्या वेळी छप्पर नसले तरी चालेल परंतु पाण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे.तात्पुरत्या व्यवस्थेचा विषय संपवून अशी समितीची शिफारस आणि अपेक्षा आहे.२५ मुलांमागे स्नानगृह आणि २७ मुलांमागे एक स्वच्छता गृह असे होईल तर ते कसे शक्य आहे. सकाळी विद्यार्थी एक तास आधी उठूनही त्याचा नंबर येणार नाही. यामुळे मुलांची व मुलींचीही फार कुचंबणा होते.यामुळे काही मुले दोन-दोन दिवस आंघोळच करीत नाही. यासंदर्भात जे निकष आहेत, कमीत कमी त्यांचे तरीही पालन करणे आवश्यक आहे. अमरावती जिल्ह्यातील आश्रमशाळांची यादी व इतर माहिती समितीला सादर करावी. यामध्ये कोणकोणत्या सुविधा अभिप्रेत आहेत, त्यापैकी कोणकोणत्या सुविधा दिल्या जातात, कोणत्या दिल्या जात नाहीत, याचीही माहिती द्यावी. वाशिम जिल्हयातील आश्रमशाळांचीही सविस्तर माहिती सादर करण्यात यावी आश्रमशाळानिहाय सर्व माहिती समितीला सादर करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले व समितीने सूचित केले असता व ही माहिती समितीला एका महिन्याच्या आत सादर करावी. (विवरण पत्र क्रमांक-१)

परिच्छेदक्रमांक २.२.४.८—आश्रमशाळांमध्ये मुलभूत सुखसोयीची अपर्याप्तता—

या परिच्छेदा संदर्भात माहिती देताना याच्यामध्ये जो सॅनिटेशनचा विषय आहे, त्याच्यामध्ये मोठ्या प्रमाणात विकेंद्रीकरण केलेले आहे. यामध्ये जो मायनर रिपेअर्स, सीट बदलून घ्यायची आहे, सीट बेल्ट्स लावायचे आहे, ही सर्व कामे स्कूल मॅनेजमेंट कमिटीला दिलेली आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची मुले त्याच शाळेत शिकत असले पाहिजे, अशी अट आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये बाहेरचे पालक शाळेत येऊ शकत नाहीत, त्यामध्ये वार ठरवून दिले पाहिजे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

जिल्हापरिषदेच्या शाळेमध्ये गावातील माणूस शालेय व्यवस्थापन समितीचा सदस्य असतो, त्याची मुलेही त्याच शाळेत शिकत असली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले असता, शालेय शिक्षण विभागाचा जो शासन निर्णय आहे, तसाच आदिवासी विकास विभागाने त्याच धर्तीवर हा शासन निर्णय काढलेला आहे. काही टक्के लोकल सदस्य, काही टक्के बाहेरचे सदस्य अशी ही समिती बनलेली असते. केवळ पालकांना सदस्य न बनविता अधीक्षक आणि मुख्याध्यापक यांची ही समिती आहे. त्यांच्या खात्यांमध्ये शासनाने पाच लाख रुपये मंजूर केलेले आहेत. शालेय स्तरावर स्वच्छता, दुरूस्ती, इलेक्ट्रीफिकेशन, प्लंबिंग, कन्झ्यूमेबल्स करण्याचे अधिकार त्यांच्या पातळीवर दिलेले आहेत. या समितीच्या अधिकारांचा वापर सुरू केला तर किरकोळ दुरूस्तीचा प्रश्न राहणार नाही.

जे डीपीआर करू शकतात, एनजीओ यांना मदर एनजीओमधून कि रिसोर्स नेमून दिलेले आहेत. त्यांनाही नेमून दिलेले आहे. कारण आदिवासी विकास विभागाच्या सार्वजनिक बांधकामाबाबत कक्ष आहे. परंतु पाणीपुरवठ्यासाठी ते जिल्हापरिषदेच्या पाणीपुरवठा विभागावर अवलंबून आहे. इलेक्ट्रीफिकेशनसाठी पीडब्ल्यूडी एम्पॅनेलमेंट केलेली आहे. जिल्हानिहाय एम्पॅनेलमेंट अशीच करण्यात यावी असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जिल्हापरिषदे ऐवजी हे काम महाराष्ट्र जलप्राधिकरणाला दिले तर बरे होईल. त्यांच्याकडे कर्मचारी वर्ग आहे. जिल्हापरिषद यांच्याकडे अतिरिक्त रिक्त पदे आहेत. हे काम डिपॉजिट लेव्हलवर महाराष्ट्र जल प्राधिकरण करेल, त्यांच्याकडे कर्मचारी वर्ग जास्त आहे असे समितीने सूचित केले असता, समितीच्या सूचनेप्रमाणे आदिवासी विकास विभाग महाराष्ट्र जलप्राधिकरणाशी चर्चा करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

फिरत्या वैद्यकीय पथकांद्वारे आश्रमशाळांना आवश्यकते एवढया भेटी दिल्या नव्हत्या. आरोग्याबाबत मागील सादरीकरणामध्ये खूप काही सांगितलेले आहे. दर महिन्याच्या विहित भेटी झाल्या पाहिजेत, या दृष्टीने मोठे लॅप्सेस झालेले आहेत, तो तक्ता खाली दिसत आहे. त्याप्रमाणे मॉनिटरींग सिस्टम डेव्हलप झाले पाहिजे. विभागाने सर्वांना मोबाईल युनिट दिले. सरासरी पाच वर्षांत साठ भेटी व्हायला पाहिजे होत्या. एकच

शाळेला पन्नासच्या वर भेटी दिल्या गेल्या. तीन शाळा ४० ते ५० च्या मध्ये आहेत. पार पाडण्याची जबाबदारी कोणाची आहे ? एटीसी आणि पीओ यांनीही आश्रमशाळांना भेटी दिल्या पाहिजेत असे समितीने सूचित केले असता, एसपी खाली आरएसबीओ राष्ट्रीय बालकल्याण योजनाखाली मोबाईल पथक यांचे मॉनिटरींग सार्वजनिक आरोग्य विभागाकडे असते. त्यांनी मुलांची तपासणी केली पाहिजे, अशी त्यांची जबाबदारी असते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

आरबीएसबीची आकडेवारी उपलब्ध करून दिलेली आहे. लड्डा नावाचा डॉक्टर आणि तीच डोईफोडे नावाची मुलगी यांची चांदुर रेल्वे, जि. अमरावती या कार्यरत आहेत. त्यांनी या शाळा केव्हा तपासल्या. या पथकांची संख्या वाढवायची जबाबदारी आरोग्य विभागाची आहे. या पथकांना पीओ इतर ड्यूटीही लावतात. काही मोबाईल युनिट महाराष्ट्र जल प्राधिकरणांना दिलेले आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, ६-७ कोटी टीएसपीमधून दिले जातात. त्यामध्ये संजीवनी पथक, आरएसबीचे पथक दिले जाते. हे सगळे आदिवासी भाग करीत असते. या वर्षीमध्ये त्यांची जी आकृतीबंध होते, त्यांनी ते अद्ययावत करून घेतली नव्हती. सार्वजनिक आरोग्य विभागाने आदिवासी विकास विभागाने अहवाल दिलेला आहे. त्यांची जी मोबाईल युनिट्स आहेत, त्यांच्यावर अवलंबून राहत नाही. आता विभागाने नियोजन केलेले आहे, ०२ ऑक्टोबरमध्ये ते नवीन लॉंच करण्यात येणार आहे. आदिवासी विभागाच्या विकासाच्या ३०१ दुर्गम भागातील शाळांचे मॅपिंग करून क्लस्टरींग केलेले आहे. त्यांना २४×७ हेल्थ सर्व्हिसेससाठी आश्रमशाळांकरिता डेडिकेटेड सुविधा असे रोल आऊट करण्यात येत आहे. या कामासाठी बीव्हीजी ही कंपनी कार्यरत आहे. We have taken the cost that is given by the Public Health Department. ॲम्ब्युलन्स उनकी है, लेकिन उसकी प्लानिंग आदिवासी विकास विभाग में उनके साथ बैठकर की है अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

It means you are giving work to private company? अशी विचारणा समितीने केली असता, Department are having dedicated service, because the ambulances of the Public Health Department are also being run by private agency. 108 Ambulance Service is run by BVG. Department had creating a dedicated health service ambulances for remote villages in the whole State. ज्या ठिकाणी रुग्णवाहिका दूर असते, प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा आरोग्य उप केंद्र दूर असते अशा ठिकाणी प्रकल्प कार्यालय अंतर्गत येत असलेल्या ३०१ आश्रमशाळांचे मॅपिंग करून, ट्रान्सपोर्ट प्लॅनिंग करून, सिक रुम करून ॲम्ब्युलन्सच्या संदर्भात बेस लोकेशनच्या अनुषंगाने काम करण्यात येत आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

Will it not be duplication? कारण बीव्हीजी कंपनीने त्या एरियाचे मॅपिंग केल्यानंतरच १०८ क्रमांकाच्या ॲम्ब्युलन्सला काम दिले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, विभागाने बीव्हीजी कंपनीचे मॅपिंग बघितले आहे.त्यांची ॲम्ब्युलन्स लोकसंख्येनुसार त्या त्या भागात असते आणि त्याचे लोकेशन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी असते. It has become substitute for regular PHC ambulance service. दुर्गम भागातील शाळा या बीव्हीजी कंपनीच्या रडारवर राहत नाहीत. त्यामुळे बीव्हीजी कंपनीच्या ॲम्ब्युलन्सचे लोकेशन कुठे आहे हे ओव्हरलॅप होऊ नये म्हणून विभागाच्या माध्यमातून काम करण्यात आले आहे. तसेच त्यांचा कंट्रोल सिस्टीमसाठी जो हेल्प डेस्क आहे त्या ठिकाणी विभागाच्या माध्यमातून स्वतंत्र डेस्कची व्यवस्था केली आहे. त्यामुळे विभागाकडून सर्व आश्रमशाळांतील मुलांचे या वर्षभरात १०० टक्के डिजीटाईज्ड हेल्थ रेकॉर्ड तयार करण्यात येणार आहेत. We will be having dedicated health services. अमरावती संदर्भात जे दोन मुद्दे आहेत त्या बाबतीत अमरावती विभागाचे अपर आदिवासी आयुक्त हे अधिक सांगू शकतील प्रकल्प कार्यालय धारणी अंतर्गत येत असलेली शासकीय आश्रमशाळा चिरोडी, ता. चांदूर आणि शासकीय आश्रमशाळा टेंब्रुसोंडा, ता. चिखलदरा या दोन शाळांपैकी एक आश्रमशाळा अमरावती शहराच्या अगदी जवळ आहे आणि दुसरी आश्रमशाळा रिमोट एरियामध्ये आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याबाबत अधिक माहिती देताना अमरावती विभागात वेगवेगळ्या ठिकाणी ७ आरोग्य पथके आहेत. टेंब्रुसोंडा आणि चिरोडी या आश्रमशाळा चिखलदरा युनिटला जोडलेल्या आहे. आरोग्य पथकाच्या व्यतिरिक्त आरबीएसके, प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी आश्रमशाळांना नियमित भेटी देऊन विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करतात असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले. या ठिकाणी अपर आदिवासी आयुक्त समितीला असत्य माहिती देत आहेत. मुळात जिल्हा परिषदेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नाहीत. अशा परिस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी आश्रमशाळांना भेटी देऊ देऊन विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी कशी करू शकतील ? या ठिकाणी अपर आदिवासी आयुक्त समितीची दिशाभूल करीत आहेत. समितीला असत्य माहिती दिल्यामुळे अपर आदिवासी आयुक्तांवर चार्जेस फ्रेम करावयास पाहिजेत. अमरावती जिल्हा परिषदेअंतर्गत ५६ प्राथमिक आरोग्य केंद्र येतात. शासनाच्या निकषानुसार प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी प्रत्येकी २ वैद्यकीय अधिकारी गृहीत धरल्यास ५६ प्राथमिक आरोग्य केंद्रासांठी ११२ वैद्यकीय अधिकारी असावयास पाहिजेत. परंतु तेवढे वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नाहीत. अशा वेळी प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी आश्रमशाळांना कशा भेटी देऊ शकतात ? अशी विचारणा समितीने केली असता, समितीने थोडासा वेळ दिल्यास अमरावती विभागामध्ये आरोग्य पथकाच्या माध्यमातून तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील

वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या माध्यमातून आश्रमशाळांना किती भेटी देण्यात आल्या बाबतचा तपशील समितीला सादर करण्यात येईल. विभाग आरबीएसके आणि प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांना आश्रमशाळांना भेटी देण्याचे उद्दिष्ट ठरवून देत असतो असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

विभागाने जरी उद्दिष्ट निश्चित करून दिले असेल तरी प्रत्यक्षात त्यांच्याकडून ते उद्दिष्ट पूर्ण केले जाते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, टेंब्रुसोंडा ही आश्रमशाळा चिखलदरा आणि परतवाड्याच्या मध्ये चिखलदऱ्याच्या पायथ्याशी आहे. ही आश्रमशाळा इयत्ता १ ते १२ वी पर्यंत आहे. ही आश्रमशाळा टीएसपी शेड्युल्ड एरियामध्ये आहे. टेंब्रुसोंडा ही आश्रमशाळा चिखलदरा युनिटच्या अंतर्गत येते. टेंब्रुसोंडा ही आश्रमशाळा चिरोडा आश्रमशाळेच्या तुलनेत चिखलदरा येथून जवळ आहे. टेंब्रुसोंडा ही आश्रमशाळा शेड्युल्ड एरियामध्ये आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

टेंब्रुसोंडा आणि चिखलदरा हे दोन वेगवेगळे भाग आहेत. This shows that department representative not visited any of the ashram shalas. He doesn't know the Government ashram shalas. तेथील लोकेशन माहीत नाही. विभागाने या भागात मोबाईल व्हॅन उपलब्ध करून दिल्या. त्यांनी दरमहा किमान एका आश्रमशाळेला भेट द्यावी, या अनुषंगाने कार्यक्रम निश्चित केला. परंतु या कार्यक्रमाची पूर्तता झाली नाही, ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळेच विभागाने प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आश्रमशाळांना भेटी देण्याबाबत पर्यायी व्यवस्था केली आहे. या शिवाय विभागाने १०८ क्रमांकाच्या ॲम्ब्युलन्सची व्यवस्था केली. या भागात ३४ मोबाईल युनिट दिले आहेत. परंतु त्यांच्याकडून व्यवस्थित काम झालेले नाही हे विभागाच्या सचिवांना मान्य आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने ही बाब मान्य केली असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

अशा परिस्थितीत विभागाने त्यांच्यावर काय कारवाई केली ? विभागाचे अनेक बाबतीत मोठ्या प्रमाणात सुधारणा केल्या, नवीन नवीन बाबी सुरू केल्या आहेत, हे समितीला मान्य आहे. परंतु ज्यांनी त्याची जबाबदारी पार पाडली नाही त्यांच्यावर विभागाने कारवाई करावयास पाहिजे होती. अन्यथा, विभागाने पुढे कितीही चांगले नियोजन केले तरी ते यशस्वीरित्या पार पडू शकणार नाही. ज्यांनी त्याचे कर्तव्य योग्य प्रकारे पार पाडले नाही त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे असे समितीने सूचित केले असता, या बैठकीच्या अनुषंगाने झालेली चर्चा प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या निदर्शनास आणून देण्यात येईल. त्यांना संबंधितांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यास सांगण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

परंतु सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव श्री. प्रदीप व्यास यांनी लोकलेखा समितीसमोर माहिती दिली होती. आरबीएसके संदर्भातील माहिती घेऊनच ते सांगत आहेत. चांदूर रेल्वे जिल्हा अमरावती या मतदारसंघातील आरोग्य पथकाची माहिती, डॉक्टरांची माहिती, एएनएम, जीएनएम, फार्मासिस्ट यांची नावे घेऊन जे ड्युप्लीकेशन होते ती बाब माननीय समिती प्रमुखांच्या निदर्शनास आणून दिली. ही मंडळी शालेय आरोग्य तपासणीच व्यवस्थित करू शकत नसताना, ते आश्रमशाळांना कशा भेटी देऊ शकतील ? मुळात त्यांना शालेय आरोग्य तपासणीचे वर्षातून दोन वेळा उद्दिष्ट असते. अशा परिस्थितीत प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांची तपासणी कधी करतात ? अशी विचारणा समितीने केली असता, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि आरबीएसकेला जे उद्दिष्ट दिले आहे त्यानुसार त्यांनी काम करणे अपेक्षित आहे. पण प्रत्यक्षात अनेक ठिकाणी त्यानुसार काम होत नाही. या मागील कारणे शोधली असता असे निदर्शनास आले की, अनेक ठिकाणी वाहनांची उपलब्धता नाही, तसेच अनेक ठिकाणी बहुतांश पदे रिक्त आहेत. या कारणांमुळे किंवा आरबीएसकेचा स्टाफ प्राथमिक आरोग्य केंद्रात ड्युटीवर असल्यामुळे भेटी दिल्या जात नाहीत. अशा अनेक कारणांमुळे हे काम झालेले नाही. त्यामुळेच आदिवासी विकास विभागाच्या सचिवांनी सांगितल्यानुसार सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांसोबत चर्चा करून, या संदर्भातील कारवाई केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात व्हावी या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सध्या आरोग्य विभाग हा स्वतःच आजारी आहे. आदिवासी विकास विभागातील आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी विभागाच्या स्वतंत्र युनिटनेच केली पाहिजेया विभागाने तशी व्यवस्था केलेली आहे. परंतु या संदर्भात ज्यांनी स्वतःची जबाबदारी पार पाडली नाही त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत आदिवासी विकास विभागाने सार्वजनिक आरोग्य विभागाकडे समितीच्या वतीने शिफारस करण्यात यावी. कारण ज्यांनी निकष पाळले नाही किंवा ५० पेक्षा कमी भेटी दिल्या त्या सर्व मोबाईल युनिटमध्ये काम करणाऱ्यांवर योग्य ती कारवाई करून पेनल्टी लावावी असे मत समितीने व्यक्त केले.

परिच्छेद क्र. २.२.४.८ (क)—इतर सुविधांची अनुलब्धता—

दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी समितीने पुन्हा आदिवासी विभागाचे सचिव विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी आश्रमशाळांमध्ये प्रसाधनगृह, स्नानगृह कमी आहेत. विशेषतः ज्या ५२ आश्रमशाळांचा चार्ट दिला आहे त्यामध्ये तोरंगण त्र्यंबकेश्वर तालुक्याच्या

आश्रमशाळांमध्ये विद्यार्थींनीची शौचालये आहेत पण विद्यार्थ्यांची शौचालयाची संख्या शुन्य आहे. याचप्रमाणे देवगाव, धानवळ व बोरगडची परिस्थिती आहे. विद्यार्थ्यांसाठी स्नानगृह नसल्याचे समजणे शक्य आहे पण विद्यार्थीनीसाठी पण स्नानगृह नाही. नाळगाव, तोरंगण, बोरवड, ओझर, धानवळ या ठिकाणी विद्यार्थीनींसाठी स्नानगृह नाही हि बाब समितीने निदर्शनास आणली असता, शासकीय आश्रमशाळांमध्ये २० विद्यार्थ्यांमागे एक स्नानगृह आणि प्रसाधनगृह असायला पाहिजे, असा निकष आहे. लेखापरिक्षण अहवालामध्ये ज्या ५२ आश्रमशाळा आहेत त्या शाळांची विभागाने सद्य:स्थिती काढलेली आहे. त्याचे प्रमाण १७ विद्यार्थ्यांमागे एक प्रसाधनगृह आणि २० विद्यार्थ्यांमागे एक स्नानगृह असा येतो. आपण ज्या विशिष्ट शाळांचा उल्लेख केलेला आहे त्याबद्दल रिस्पेक्टीव एटीसी त्यांच्या त्यांच्या कार्यक्षेत्राबद्दल माहिती देतील असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीला जो चार्ट दिला आहे त्या व्यतिरिक्तत किंवा महालेखाकारांची माहिती नाही. समितीने फक्त स्पेसिफिक सांगितले की, मुलींसाठी स्नानगृह आवश्यकपणे पाहिजेच. ५० मुलींसाठी कमीत कमी एक तरी स्नानगृह पाहिजे. तसेच मुलांसाठी प्रसाधनगृह तर आवश्यक आहे. हे दोन विषय घेतले आहेत. यामध्ये एटीसी काय सांगणार आहेत तर 'आम्ही ते काम करतो किंवा ते काम प्रस्तावित आहे.' हा चार्ट विभागाने दिलेला आहे. त्यावरच चर्चा करण्यात येत आहे असे मत समितीने व्यक्त केले असता त्या आश्रमशाळा स्थलांतरित झालेला आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ही साक्ष आजच्या परिस्थितीवर नाही तर महालेखाकारांनी जे मुद्दे काढले आहेत त्यावर आहे. त्या दिवशी त्या सर्व गोष्टी तिथे असणे शासनाच्या नियमाने आवश्यकक होते पण त्या नव्हत्या. यासाठी कोण कारणीभूत आहे किंवा कोण जबाबदार आहे ? हा समितीचा विषय आहे. आज विभागाने काय केले आहे यासाठी वेगळी बैठक घेण्यात येईल. आजची बैठक ही महालेखाकारांच्या मुद्यावर उत्तरे देण्यासाठी आहे. त्याचे जर उत्तर दिले तर बरे होईल असे समितीने सूचित केले.

दुसरी गोष्ट अशी आहे की, तिथे स्नानगृह नसताना सोलार वॉटर हिटर घेतले आहेत. यासाठी विभागाने किती कोटी रुपये खर्च केले आहेत? ज्या ठिकाणी स्नानगृह नाहीत तिथे सोलार वॉटर हिटर घेण्यापूर्वी विभागाने विचार करायला पाहिजे. सोलार वॉटर हिटरसाठी विभागाने करोडो रुपये खर्च केले आणि मुलभूत सुविधांसाठी दुर्लक्ष झाले तर यासाठी कोणी दोषी आहे. त्यावेळच्या एटीसीने हे लिहून पाठवायला पाहिजे होते की, त्यांना सोलार वॉटर हिटर नको त्याऐवजी एवढे पैसे स्नानगृहांसाठी वर्ज करावे. कारण त्या पैशातून ताबडतोब स्नानगृह बांधण्यात येतील. ही सर्व जबाबदारी त्या एटीसीची होती. पण त्यांनी ते न करता सोलार वॉटर हिटर घेतले. स्नानगृहच नसताना सोलार वॉटर हिटर कुठे लावणार आहेत. यासाठी कोण जबाबदार आहे ? फक्त चारच शाळा नाहीत तर विभागाने दिलेल्या चार्टमध्ये खूप शाळांची नावे आहेत ती वाचलेली नाहीत. एकाच पेजमधील नावे वाचली आहेत दुसऱ्या पेजमध्ये देखील नावे आहेत. मुद्दा असा आहे की, मुलींसाठी स्नानगृह आणि सर्वांसाठी प्रसाधनगृह महत्त्वाची आहेत. तसेच अनेक ठिकाणी भोजनकक्ष पण नाहीत. क्रिडांगण, निवासस्थान, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान, प्रयोगशाळा, संगणककक्ष यासाठी आपण दुसऱ्या क्रमांकावर प्राधान्य देऊ. पण कमीत कमी प्रत्येक माणसाला ज्या मुलभूत सुविधा लागतात त्या द्यायला पाहिजे. एका बाजूला आपण स्वच्छतेचा उद्घोष करतो आणि दुसऱ्या बाजूला आपल्याला ज्या प्राथमिक सुविधा पाहिजे त्याच नाहीत. सकाळी उठल्यानंतर प्रत्येक माणसासाठी प्रसाधानगृह आणि स्नानगृह आवश्यक आहे. त्यासाठी कमीत कमी मुलांसाठी नाहीतर मुलींसाठी स्नानगृह आणि सर्वांसाठी प्रसाधनगृह या दोन बाबी अत्यंत आवश्यक आहेत. तिसरे म्हणजे अनेक ठिकाणी भोजनकक्ष नाहीत. मी ज्या चार शाळांचा उल्लेख केला त्या पेज क्र. १ वरील आहेत. पण पेज क्र. २ वरील शाळांमध्ये देखील तीच परिस्थिती आहे. ज्या ज्या ठिकाणी या बाबींवर दुर्लक्ष केलेले आहे त्या सर्व अधिकाऱ्यांवर विभागाने कारवाई केली काय आणि कारवाई केली नसेल तर न करण्याचे काय कारण आहे? Committee asking the Commissioner because it is not related to only one Taluka, it is related to the whole State. Committee had only taken the survey of 8 POs अशी विचारणा समितीने केली असता,महालेखाकार कार्यालयाने ज्या ५२ आश्रमशाळांची पाहणी केलेली आहे त्याबद्दल ज्या ज्या ठिकाणी त्रुटी आढळलेल्या आहेत. त्या त्रुटी दूर करण्याचा विभागाने प्रयत्न केलेला आहे. आता त्या परिस्थितीमध्ये सुधारणा झालेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

याबाबत समितीचा आक्षेप आहे. कारण अतिशय चुकीची उत्तरे दिली जात आहेत. विभाग आता काय त्रुट्या पूर्ण करीत आहे याचा काही विषयच नाही. महालेखाकारांनी सन २०१४-१५ ला जे आक्षेप काढलेले आहेत, त्याबाबत विभाग गंभीर नाहीत. कारण एका महिन्यापूर्वी डब्ल्यूसेल उमरेड येथे त्या कार्यालयामध्ये एक मुलगी कर्मचारी होती तिने विनंती करूनही शौचालयाची व्यवस्था केली नाही. बाहेर शौचालयाला गेल्यानंतर त्या मुलीवर बलात्कार होऊन तिचा खून झाला. विभागाचे सर्व नॉन सिरियस अधिकारी आहे. ज्या शाळांमध्ये १७ किंवा १५ विद्यार्थी आहेत त्या प्रतिनिधी विभागीय नॉर्म्स सांगतो की, २० विद्यार्थी असतील तर शौचालय आणि स्नानगृह करावे लागते. समिती सदस्य आपल्या घरी राहतात तर तिथे २ ते ३ लोक असले तर तिथे नार्म्स आहेत काय किंवा शौचालय नाहीत. उद्या आदिवासी विभाग, ग्रामपंचायत, नगरपरिषद किंवा महानगरपालिकामध्ये जो आदिवासी उमेदवार निवडणूक लढेल त्याला शौचालय का अनिवार्य करण्यात येते. त्यासाठी विभाग कर्ज देणार आहात काय किंवा घरी २ लोक आहेत म्हणून फॉर्म नाकारला जाणार असे सांगण्यातयेते काय ? ही सर्व वक्तव्य बेजबाबदारपणाची आहेत. आता विदर्भात

जो उमरेड येथील प्रकरण किती गाजलेले हे लक्षात येईल. त्या ठिकाणी १० ते २० हजार लोक रस्त्यावर होते. नार्म्स नाहीत किंवा इतर काही बाबी नाहीत हे सर्व झाल्यानंतर त्यामध्ये दुरूस्ती करू असे सांगण्यात आले आहे. एवढे दिवस विभागाने हे सर्व का केले नाही ? ज्या अधिकाऱ्यांनी हे केले नाही त्यांच्यावर विभाग नेमकी काय कारवाई करणार आहे हे त्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. आता विभाग काय दुरुस्त्या करतो हे समितीच्या दृष्टीने महत्त्वाचे नाही.

महालेखाकारांनी फक्त ५२ आश्रमशाळांची भेट घेतली आहे. ५२ आश्रमशाळांमध्ये अशी परिस्थिती आहे तर मग ५०२ आश्रमशाळांपैकी किती शाळांमध्ये सुविधा उपलब्ध आहेत काय हे आपण सर्व एटीसींना विचारण्यात यावे अशी सूचना समितीने केली असता, राज्यामध्ये एकूण किती आश्रमशाळा आहेत ? राज्यामध्ये एकूण ५०२ आश्रमशाळा आहेत.समितीने भेट दिल्यानंतर ज्या ज्या शाळांमध्ये प्रसाधनगृह आणि स्नानगृह नाही असे आढळून आले.त्यावेळी ज्या ज्या आश्रमशाळांमध्ये पुरेशा प्रमाणात स्नानगृह आणि प्रसाधनगृह उपलब्ध नव्हते ते उपलब्ध नसण्यासाठी कोण जबाबदार आहे.त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हे अधिकारी शब्द फिरवत आहेत. 'पुरेशा' असा शब्द त्यांना वापरला पण ज्या ठिकाणी शौचालय आणि स्नानगृह पण उपलब्ध नव्हते. 'पुरेशा' या शब्दाचा अर्थ असा आहे की, समजा स्नानगृह असेल आणि शौचालय नसेल तर पुरेसे म्हणता येईल.विद्यार्थी व विद्यार्थींनीचा मुद्दा वेगळा आहे. विद्यार्थींनीसाठी स्नानगृह, प्रसाधनगृह आणि भोजनकक्ष या तीन गोष्टी अत्यंत प्राथमिक पातळीवर आवश्यक आहेत. राज्यामध्ये ज्या ज्या ठिकाणी या ५२ शाळांची स्थिती होती त्यामध्ये सर्व काही नमूदच केले आहे. त्याबद्दल सद्यःस्थिती काय आहे, हे नाही तर सन २०१०-१५ ची माहिती देण्यात यावी. आजच्या सद्यःस्थितीत विभागाने त्यात काही दुरूस्ती केली असेल किंवा काही प्रस्तावित केले असेल. सन २०१०-१५ मध्ये कोणत्या कोणत्या ठिकाणी अशी व्यवस्था नव्हती. त्यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर विभाग कारवाई किती दिवसात करणार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१०-१५ दरम्यान ज्या ज्या ठिकाणी अशी व्यवस्था नव्हती त्यासाठी जे अधिकारी जबाबदार आहेत त्यांची चौकशी करून कारवाई करण्यात येईल. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्र्यंबकेश्वर तालुक्यातील तोरंगण या ठिकाणच्या ८ विद्यार्थीनी आश्रमशाळेत राहत होत्या. त्या आंघोळ कुठे करायच्या ? त्यांची विभागाने काय व्यवस्था लावली होती ? प्रगतशील महाराष्ट्र म्हणायला लाज वाटायला पाहिजे. किती विद्यार्थ्यांमागे प्रसाधनगृह किंवा स्नानगृह असावे हे कोण ठरवणार आहे, एक जर विद्यार्थी असला तरी तिथे या व्यवस्था पाहिजे. आदिवासी विकास विभागाला बजेटमध्ये १० हजार कोटी रुपये मंजूर होते. ज्या मुलीचा बाप ६ हजार रुपये कमवतो त्याच्या मुलीला तो घरात वेगळे शौचालय करून देतो. मायबाप सरकार असणारे १० हजार कोटी रुपयांचा अर्थसंकल्प विभागाला देऊन विभागाचे अधिकारी भेट देण्यासाठी जातात. त्यांना कळत नाहीं काय कीं, त्या ठिकाणी विद्यार्थीनी असतात त्यांच्यासाठी वेगळे शौचालय किंवा वेगळे स्नानगृह पाहिजे. फक्त चर्चा करून हा विषय सोडून देण्यात येतो पण संबंधित एटीसींना निलंबीत करण्यात यावे. कारण त्यांच्या घरी शौचालय आहे की नाही ? त्यांच्या घरी जर पाहुणे आले तर ते काय बाहेर पाठवतात काय ? त्यांच्याकडे तर बेडरुमला अटॅच बाथरुम पाहिजे. त्यावेळेच्या संबंधित एटीसींना निलंबीत करण्यात यावे मग त्यांना कळेल. शासनाच्या निकषाप्रमाणे ज्या ज्या ठिकाणी व्यवस्था झालेली नाही. आश्रमशाळेच्या मुली काही इयत्ता दुसरी किंवा तिसरीच्या नसतात आणि जरी तिसरीच्या मुली असल्या तरी त्यांचे वय ८ वर्ष असते. ३-३ वर्षाच्या मुलींवर देखील काही घटना होतात आणि त्या तर इयत्ता सहावी ते दहावीपर्यंतच्या मुली आहेत. आपल्याला काही संवेदनशीलता आहे किंवा नाही. या ५२ ठिकाणी किमान इमारती तरी आहेत काय, इमारती नसतील तर ते काय उघड्यावर झोपतात काय ? जर इमारती असतील तर इमारत बांधत असताना प्रसाधनगृह आणि स्नानगृह बांधणे त्यामध्ये अनिवार्य नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ५२ पैकी एक आश्रमशाळा समायोचित झालेली आहे. ५१ पैकी ४७ ठिकाणी शासनाची स्वतःची जागा आहे. उर्वरित चार ठिकाणी जिल्हाधिका-यांना स्वतःच्या जागेकरिता मागणी केलेली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. ४७ ठिकाणी स्वतःच्या जागा असतानाही इतक्या त्रुटी आहेत. शासन व अधिकारी आश्रमशाळेतील मुलभूत सुविधांबाबत गंभीर नाहीत. याबाबत संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांच्यावर कारवाई करून एका महिन्याच्या आत अहवाल समितीला सादर करावा. या कारवाईचे स्वरुप काय राहील, याचीही माहिती समितीला कळवावी. विभागातील कोणीही या आश्रमशाळांचा सर्व्हे कधीच केला नाही का ? या आश्रमशाळांची तपासणी कधीच केली नाही का ? या आश्रमशाळांमध्ये टॉयलेट्स, बाथरुम, लायब्ररी, डायनिंग रुम, क्रीडांगण, संगणक कक्ष काही आहे का ? याच्याकडे लक्ष देऊन त्याकरिता काही प्रयत्न कधीही कोणी केले नाही, ही आश्चर्याची व लाजिरवाणी बाब आहे. याबाबत समितीने तीव्र नाराजी व्यक्त केली. आदिवासी विकास विभागाकडून याकडे पूर्णतः दुर्लक्ष झालेले आहे. वरिष्ठ अधिका-यांचेही याकडे दुर्लक्ष झालेले आहे. तेथील पीओ व इतर अधिकारी यांचा तर याकडे बघण्याचा दृष्टीकोनच वेगळा असेल. याची कोणीही काळजी घेतली नाही. महालेखापालांच्या भेटी दिल्यानंतरही यामध्ये सुधारणा नाही, ही तर आणखीच आश्चर्याची व लाजिरवाणी बाब असून याबाबत समितीने तीव्र शब्दात नाराजी व्यक्त केली असता, कायापालट अभियानांतर्गत या आश्रमशाळांमध्ये सॅनिटरी सर्व्हिसेस अपडेट करण्याचे काम चालू आहे. यामध्ये हळू हळू सुधारणा होत आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले. सन २०१० पासून याकडे कोणी लक्षच दिलेले नाही, हे योग्य नाही. याबाबत परिपत्रकानुसार संबंधित सर्व अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करून त्यांना पदाबाबत करण्यात यावे अथवा त्यांना बडतर्फ करण्यात यावे.

महाराष्ट्रातील सर्व ५०२ आश्रमशाळांचा अद्ययावत व सविस्तर माहिती ताबडतोब समितीला सादर करण्यात यावेत. दिनांक ३१ मार्च,२०१८ पासून या ५०२ आश्रमशाळांची काय अवस्था, सुधारणा, परिस्थिती काय आहे याची माहिती समितीला समजणे अत्यावश्यक आहे असे समितीने सूचित केले.

कासार, धानवड येथे स्नानगृह आणि प्रसाधनगृह यापुढे शून्य असे आलेखित केलेले आहे. परंतु तक्त्यामध्ये विद्यार्थी संख्या १० आणि शौचालय संख्या ०५ असे नमूद केलेले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, महालेखापालयांच्या निरीक्षणानंतर ही सुधारणा झालेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. तेथे विद्यार्थिनींसाठी वेगळया स्नानगृहाची आवश्यकता आहे. भाड्याच्या इमारती आश्रमशाळांसाठी घेताना त्यामध्ये टॉयलेट्स आणि बाथरुम्स आहेत की नाही हे पाहणे संबंधितांचे प्राथमिक कर्तव्य आहे. ज्या इमारतींमध्ये या मुलभूत सुविधाच नाहीत, तरीही त्या भाड्याने घेतल्या गेल्या, म्हणजे याचा अर्थ असा आहे की, हे संगनमताने केलेले काम आहे. इतर अधिकारी यामध्ये केवळ बघ्याची भूमिका स्वीकारतात. तत्कालीन पीओ आणि एटीसी कोण होते, त्यांची सविस्तर माहिती समितीला सादर करावी. तसेच, ते जे कोणी असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. राज्यातील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांकरिता निदान कमीत कमी स्नानगृहे, शौचालये, भोजन कक्ष तर पाहिजेतच असे मत समितीने व्यक्त केले असता, काही आश्रमशाळा समायोजनामध्ये शिफ्ट झालेल्या आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने तक्ता दिलेला आहे, त्यामध्ये कमी व जादा प्रमाणात असे काही झालेले आहे का ? काही आश्रमशाळाच केवळ स्थलांतरित झालेल्या आहेत. बाकी शाळा स्थलांतरित झालेल्याच नाहीत. धानवडला आश्रमशाळेचे बांधकाम केले होते का ? तेथील मूळ जागा मालकाने बांधले असेल, शासनाने बांधले होते का ? अशी विचारणा समितीने केली असता, समायोजनमध्ये ते शिफ्ट झालेले आहे. त्यानुसार ते २० मुलांकरिता एक शौचालय याप्रमाणे केलेले बांधकामही शिफ्ट केलेल्या जागी पुन्हा केलेले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

गोंदिया-धानवडमध्ये कुठे बांधकाम झाले ? विभागाच्या नियमाप्रमाणे २० मुलांकरिता एक शौचालय, २५ मुलांकरिता एक स्नानगृह बांधणे हे योग्य नाही. २० मुलांपेक्षा कमी असतील तर त्यांना सकाळी प्रसाधनगृहाची आवश्यकता नसते का ? हे निकष खूप जाचक आहेत असे मत समितीने व्यक्त केले असता, आता हे नियम बदलून ते अंमलात आणण्यात येत आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले. या वसतिगृहांना भेटी विभागाने दिल्या असतील आणि त्यावर जर समाधानकारक शेरे दिले असतील तर हेही कारवाईस पात्र आहेत. याबाबत विभागातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांचे शेरे तपासण्यात यावेत. महालेखापाल यांचे आक्षेप आणि विभागातील सर्व स्तरावरील अधिकारी यांच्या भेटी व शेरे यांची तुलना करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून त्यांना निलंबित करण्यात यावे. या आश्रमशाळांना प्रत्यक्ष भेटी न देता पाहणी व तपासणी न करता दिलेल्या शेऱ्यांची योग्य ती दखल घेऊन नियम व कायद्याप्रमाणे संबंधितांवर कारवाई झालीच पाहिजे असे समितीने सूचित केले.

आश्रमशाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींकरिता शौचालये, स्नानगृहे, क्रीडांगण, संगणक कक्ष, भोजन कक्ष बांधले गेलेले आहेत का, याचा पाठपुरावा करणे आवश्यक आहे. याकरिता आवश्यक ती कार्यवाही करून याकरिता विलंब व टाळाटाळ केलेल्या व करणाऱ्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून योग्य ती कारवाई करण्यात यावी. तसेच, केलेल्या कारवाईचा अहवाल एका महिन्याच्या आत समितीच्या माहितीस्तव सादर करण्यात यावा असेही समितीने सूचित केले.

(ड) इतर सुविधांची अनुलब्धता जनरेटर संचाबाबत

आदिवासी विकास विभागाने आश्रमशाळेतील मुलभूत सुविधांचे काम पूर्ण केल्याशिवाय आश्रमशाळांसाठी जनरेटर व तत्सम इतर वस्तू खरेदी करू नयेत. डिझेलची सोय नसतानाही ५० जनरेटर खरेदी करून ते विनावापर पडलेले आहेत. काहीही उपयोग न करता ते जनरेटर तसेच पडून असल्यामुळे ते आता नादुरुस्त अवस्थेत आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, डिझेलकरिता आता २०१७ मध्ये शासनाने शासन निर्णय काढलेला आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, २०१३ पासून हे जनरेटर खरेदी केलेले आहेत. डिझेलची सोय नसताना शासनाच्या शासन निर्णयाची वाट पाहत ते चार वर्षे खरेदी करून असे पडून आहेत. ते शासनाचे पैसे निरुपयोगी पडून राहिलेले आहेत. ती अव्यवहार्य गुंतवणूक आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागीय प्रतिनिधींनी ते मान्य केले व आता केवळ बेसिक ॲमेनिटीजवरच भर दिला जाईल असे सांगितले.

सन २०११-२०१३ या कालावधीत जनरेटर खरेदी केलेले आहेत. त्याकरिता डिझेल व मेटेंनन्सची तरतूद नसतानाही ते खरेदी केले गेले. असे असताना मुलभूतसुविधांकडे मात्र जराही लक्ष दिले गेलेले नाहीत.आश्रमशाळांमध्ये जनरेटरप्रमाणे हिटर खरेदीही विजेची व्यवस्था नसताना केली गेली होती. वीज नसल्यामुळे हे खरेदी केलेले हिटरही विनावापर पडून होते.उपयोग नसताना केलेली खरेदी ही पैशांचा अपव्यय व ठेकेदाराची भर करण्याकरिता केली जाते, असे मत समितीने व्यक्त केले असता, ५० जनरेटरची खरेदी ही त्या एटीसीच्या पातळीवर केली गेली होती असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्या खरेदीची एसीबी चौकशी सुरू झाली होती. एसीबी चौकशी स्तरावर चार्जशीट फाईल करून घेतलेली आहे. ५० पैकी १७ जनरेटर विनावापर पडून असल्यामुळे नादुरुस्त झाले होते. त्यानंतर माहिती दिली होती की, ते १७ जनरेटर कार्यान्वित झाले होते. ३३+१७ जनरेटरची आताची सद्य:स्थिती काय आहे, याची माहिती समितीसमोर सादर करावी. तत्कालीन एटीसी श्री. वरवंट असे त्यांच नाव होते असे समितीने निदर्शनास आणले असता, वैधानिक विकास महामंडळाचा पैसा यामध्ये खर्च केला गेला होता असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यामुळेच वैधानिक विकास महामंडळांना एक रुपयाही दिला गेला नव्हता. वैधानिक विकास महामंडळाचा पैसा लोड शेडींगच्या नावाखाली तांत्रिक मंजुरीविना जनरेटरकरिता खर्च करण्यात आला होता. हे आयुक्त आदिवासी विकास विभाग यांच्या अधिकारात बसत होते का ? अशी विचारणा समितीने केली असता, ही खरेदी करणारे आयुक्त कोण होते, याची माहिती घेण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

श्री. सरकुंडे असे त्या आयुक्तांचे नाव होते. आता ते महाराष्ट्राचे माहिती आयुक्त आहेत. He is the person with doubtful integrity असे निदर्शनास आणून एटीसीने ही सर्व खरेदी केलेली आहे, हे त्यांच्या अधिकारात आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, सन २०१३ पर्यंत एटीसी पातळीपर्यंत खरेदीचे अधिकार होते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

डीपीडीसीला खरेदी करावयाची असेल तर तांत्रिकमान्यता वरिष्ठांकडून घ्यावी लागते. एटीसीने ५० जनरेटरचे पैसे वैधानिक विकास महामंडळाकडून मंजूर करून घेतलेले आहेत. खरेदीकरिता प्रशासकीय मान्यता जरी डीपीडीसीने दिली तरीही तांत्रिक मान्यतेकरिता विहित प्राधिकाऱ्याकडे जावेच लागते. यामध्ये कोणतीही तांत्रिक मान्यता घेतलेली नाही. तांत्रिक मंजुरी देणारे जे अधिकारी आहेत त्यांच्या अधिकारांचे उल्लंघन केलेले आहे, हे तरी विभागाला मान्य आहे का ? ए.टी.सी. नी त्यांचे अधिकार वापरले, चेअरने त्यांचे अधिकार वापरले ए.टी.सी. ला तांत्रिक मान्यता देण्याचे अधिकार आहेत काय ? समितीला या संदर्भात रोज अडचण येते. विभागाने डी.पी.डी.सी. मधून काही प्रस्ताव दिले तर तांत्रिक मंजुरी देण्याचे अधिकार वरिष्ठांना असतात. प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार वैधानिक मंडळ किंवा डी.पी.डी.सी.ला असतात. तांत्रिक मान्यता आयुक्त देतात असे असताना आयुक्तांना माहिती न होता संबंधितांनी खरेदी कशी काय केली ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय प्रतिनिधींनी त्या सहमती दर्शविली व अधिकार आयुक्त पातळीवरच होते. प्रशासकीय मान्यता ही वैधानिक विकासच्या निधीमधून केली जाते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

एक्झीट कॉन्फरन्सच्या वेळेस सचिवांनी सांगितले की, याची ए.सी.बी. चौकशी सुरू आहे. ते असे म्हणाले की, “The Government stated that the inquiry in the matter is under process and appropriate action would be taken after submission of Inquiry Report”. What action have you taken against the ATC? ए.सी.बी. चौकशी पूर्ण झाली आहे काय, त्यांच्या चौकशीचा रिपोर्ट आला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ए.सी.बी.ची चौकशी अद्याप सुरू आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. ही चौकशी कधी पासून सुरू आहे ? सन २०१३ मध्ये खरेदी केलेली आहे. ए.सी.बी.च्या डी.जीं.ना समितीच्या साक्षीकरिता बोलावलेच पाहिजे. ही सर्व संगनमताने झालेले आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, श्री. वरवणकर, ए.टी.सी. यांनी हायकोर्टामध्ये केस दाखल केलेली आहे. त्या केसमुळे हे थांबलेले असे असे समजले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ही चौकशी थांबलेली आहे काय ? हायकोर्टाने या संदर्भात चौकशी करू नका असा स्टे दिला आहे काय ? चौकशी थांबलेली नाही. त्यांनी या चौकशीच्या आदेशा विरोधात हायकोर्टामध्ये केस दाखल केली आहे. ही केस हँडल केलेली नाही. ए.सी.बी. ला या केसबाबतची करंट पोझिशन विचारली होती, ते म्हणाले होते की, ही केस आता चार्जशिट लेव्हलला आलेली आहे आणि हे प्रकरण न्यायालयात सुरू आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

हे प्रकरण जरी न्यायालयात सुरू असले तरी, हायकोर्टाने चौकशी करू नये असे आदेश दिले होते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, मी त्यांना सद्य:स्थिती कळविण्याबाबत लेखी सांगितले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

असे असेल तर या संदर्भात ए.सी.बी.च्या डी.जीं. ना समितीच्या बैठकीस बोलावले पाहिजे. राज्यात हे काय सुरू आहे ? ए.सी.बी.ची चौकशी हायकोर्ट कधीच थांबवत नाही. श्री. वरवणकर यांनाही समितीच्या साक्षीकरिता बोलवावे. ते सध्या कुठे आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, ते वन विभागात होते. सेवानिवृत्त झालेले आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सेवानिवृत्त होईपर्यंत चौकशी पूर्ण होऊ नये असे नियोजन असते. विभागाच्या सचिवांनी महालेखापालांना आश्वासित केले होते की, यावर चौकशी सुरू आहे. चौकशी पूर्ण झाली की, लगेच कारवाई करू. मात्र ५ वर्षे झाली तरी Tribal Development Department has not initiated any inquiry or any action in this regard. ए.सी.बी.कडे या प्रकरणाची चौकशी देऊन हा विषय थंड्या बस्त्यामध्ये टाकून दिला. ५० जनरेटरकरिता १ कोटी ६३ लक्ष ५० हजार रुपयांपेक्षा जास्त रक्कमेचा निष्फळ खर्च केला. ५ वर्षे झाल्यानंतरही विभाग याकरिता

जबाबदारी निश्चित करीत नाही. ए.सी.बी. केवळ हायकोर्टाचे कारण सांगून गप्प बसले आहे. समिती या केसमध्ये पुढच्या बैठकीस ए.सी.बी. डी.जी. यांनाही बोलावणार आहे. संपूर्ण राज्यामध्ये अशीच खरेदी झालेली आहे. ही खरेदी कोणी केली, कोणाच्या आदेशावरून केली याचे पूर्ण डिटेल्स तपशील समितीला द्यावेत. डिझेलच्या पुरवठ्याविना ते कार्यान्वित होते काय, याचीही माहिती द्यावी. विभागाने आता डिझेलचा जी.आर. काढला असला तरी, ४-५ वर्षे खरेदी केलेले शेकडो जनरेटर असेच पडले होते. हा पूर्णपणे अनियोजित कारभाराचा भाग आहे, असे प्रथमदर्शनी दिसत आहे. याचे पूर्ण तपशील समितीला द्यावेत, ए.सी.बीं.ची चौकशी सुरू होती. यांनी अनियमितता केली हे विभागाला मान्य आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, ए.सी.बी. केस सुरू आहे व अनियमितता केली आहे हे मान्य आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

अनियमितता केली तर विभागाने त्यांच्या विरोधात निलंबन किंवा कोणती कारवाई केली होती काय? विभाग ए.सी.बीं.च्या भरवशावर का थांबला ? अशी विचारणा समितीने केली असता, ते वन विभागाचे होते. परंतु, विभागाने काही कार्यवाही केलेली नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने कारवाई का केली नाही ? When department handed over the case to ACB means *prima facie* department feel that there is something wrong then department should have taken action on behalf of your Department. विभागाने तसे का केले नाही ? विभागाने कारवाई केलेली नाही. ए.टी.सी.ने चूक केली. ए.टी.सी. बाबत विभागाने ए.सी.बी. कडे तक्रार केली. मात्र स्वतः त्यांच्यावर काही कारवाई का करीत नाही? हा गंभीर विषय आहे. PAC can call and give directions to the Secretary of the concerned Department and ACB. समितीने प्रत्येक आरोपीची साक्ष घेण्याची आवश्यकता नाही. तशी समितीची पद्धत नाही. समिती तिच्या मतांच्या आधारे त्यांना निर्णय देऊन मग त्यांनी त्यांची बाजू मांडावी. हा परिच्छेद प्रलंबित ठेवण्यात येत आहे. पूर्ण राज्यामध्ये सन २०११ ते सन २०१५ दरम्यान खरेदी केलेल्या जनरेटरचा वापर केव्हापासून सुरू केला, त्याकरिता जबाबदार कोण आहे, कोणाच्या आदेशाने हे केले, याबाबतची सर्व नस्ती समिती लाद्यावी. तसेच, ए.सी.बी. चौकशी सुरू असताना त्यांना सस्पेंड करण्याची कारवाई का केली नाही? ए.सी.बी. चौकशी विभागाच्या आदेशाने सुरू झाली असेल. एका बाजूला विभाग ही पूर्ण केस ए.सी.बी.ला देतो व दुसऱ्या बाजूला विभाग त्या अधिकाऱ्यावर कोणतीही कारवाई करीत नाही, तो अधिकारी स्वतःच्या मूळ विभागामध्ये जाऊन नियमित वयोमानाप्रमाणे सेवानिवृत्त होतो आणि चौकशीच्या विरोधात हायकोर्टामध्ये जाऊन या सर्व विषयावर पडदा टाकण्याचा प्रयत्न करतो ? या विषयावर शासन गंभीर नाही. या सर्व विषयाची सखोल माहिती पुढच्या बैठकीत द्यावी. हा परिच्छेद प्रलंबित ठेवण्यात येत आहे असे समितीने सूचित केले असता, सदरहू माहिती सादर करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. समितीने दिनांक १६ ऑक्टोबर २०१८ रोजी पुन्हा आदिवासी विकास विभागाचे प्रधान व विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी याबाबत मागच्या साक्षीच्या वेळेस दिलेल्या सूचनेनुसार एक सदस्यीय चौकशी समिती नेमलेली होती. त्यांच्या सहा शिफारशींच्या अनुपालनाबाबतचा एक अहवाल तयार केलेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

ही खरेदी २०१३ ची आहे. ही कमिटी नेमूनही चार वर्षे झालेली आहेत. ही समिती २०१४ मध्ये नेमलेली होती. कार्यवाही होत नाही. पैसे गुंतलेले आहेत. जनरेटरकरिता डिझेलची व्यवस्था न करता खरेदी केली. जनरेटरचे काही पैसे दिले, काही पैसे दिले नाहीत. याबाबत सद्यःस्थिती काय आहे? अशी विचारणा समितीने केली असता, ५० जनरेटर्सच्या बाबतीत विदर्भ वैधानिक विकास महामंडळाकडून जो निधी आला, त्यामार्फत अपर आयुक्त, अमरावती यांनी केलेली ती खरेदी आहे. या ५० जनरेटरच्या खरेदीबाबत तक्रार झाल्यानंतर त्या ५० पैकी १७ जनरेटर्सचेच पैसे केवळ दिले गेले, ३३ जनरेटर्सचे प्रदान रोखून धरण्यात आले. त्याच्यामध्ये जी तक्रार झाली होती, त्यासंबंधित अपर आयुक्तांवर एसीबीची केसही झाली होती. पोलीस केसही झाली होती. सध्या प्रकरण न्यायालयामध्ये आहे. दुसरीकडे प्रशासकीय कारवाईही त्याबाबत झालेली आहे. या ५० पैकी १७ चे प्रदान धारणीदारास झालेले आहे. बाकी ३३ चे प्रदान झालेले नाही असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

३३ जनरेटर्सचे प्रदान झालेले नाही, तो निधी प्रकल्प अधिकारी, अकोला यांचेकडे आहे. तो निधी प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा यांचेकडे आहे. लोकलेखा समितीची साक्ष संपली की, प्रदान होऊन जातील असे मत समितीने व्यक्त केले असता, त्यामध्ये त्याची जी चौकशी झाली त्या चौकशीमध्ये संबंधित अपर आयुक्तांवरती वित्तीय अनियमिततेचा आरोप झाला असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

निधी आदिवासी आयुक्ताकडून मागून घ्यावा. परिच्छेद संपल्यानंतर हा विषय संपला, असा अर्थ होत नाही.अहवालामध्ये विभागाचा काय अहवाल आला, कमिटी नियुक्ती त्याचा अहवाल काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, जनरेटरबाबतची जी समिती नियुक्त केली होती त्याचा अहवाल असा आहे की, अपर आयुक्त यांची वित्तीय अनियमितता झालेली आहे. त्यांच्यावर दोन प्रकारची कारवाई झाली. एसीबीची कारवाई होऊन ते प्रकरण कोर्टात आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाकडील कागदपत्रामधील जे पेपर्स आहेत, त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई झालेली आहे. हायकोर्टामध्ये डेलिक्वेंट्स आहेत, त्यांनाही ॲप्रोच झाल्यामुळे हायकोर्टाने स्थगिती दिलेली आहे, ही सद्यःस्थिती आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

हायकोर्टाने स्थगिती कधी दिली ? त्याच्यावर विभागाने काय कार्यवाही केली अशी विचारणा समितीने केली असता,

विभागाकडे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे दिनांक १२ ऑक्टोबर २०१८ चे पत्र आहे. त्यामध्ये असे नमूद आहे की, सदर प्रकरणात आरोपी यांनी हायकोर्ट, नागपूर अन्वये प्रथम खबरी अहवाल रद्द होणेबाबत याचिका दाखल केलेली आहे. सदर गुन्ह्यात तपास प्रक्रियेवर माननीय उच्च न्यायालय, नागपूर यांनी स्थगनादेश दिलेला आहे. हे पत्र १२ ऑक्टोंबर २०१८ चे आहे. त्यामुळे हायकोर्टाच्या स्थगितीच्या दिनांकाची माहिती विभागाकडे आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने जागृत राहिले पाहिजे. हे प्रकरण गंभीर प्रकरण आहे. हे प्रकरण पूर्ण लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या भरवशावर ठेवलेले आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चौकशी करतो, त्यांच्यावर खटला दाखल करते, तरीही विभाग निलंबित करीत नाही. तो कर्मचारी मूळ विभागात जातो. तेथे जाऊन तो सेवा कालावधी पूर्ण करतो. २०११ ते २०१५ दरम्यान खरेदी केलेल्या जनरेटरचा वापर केव्हापासून सुरू केला ? त्याकरिता जबाबदार कोण आहे ? कोणाच्या आदेशाने हे केलेले आहे ? त्याबाबतची सर्व नस्ती समितीला द्यावी. तसेच, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या चौकशी सुरू असताना त्यांना निलंबित करण्याची कारवाई का केली नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत प्रशासकीय कारवाई झालेली आहे. अमरावती विभागीय आयुक्त यांनी वाशिम जिल्हाधिकारी यांच्यामार्फत एक चौकशी करून घेतलेली आहे. त्याचा अहवाल प्राप्त आहे. त्यानंतर आयुक्त नाशिक यांनीही चौकशी केली, दोन्हीचा अहवाल नाशिक येथे सादर झाला असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सरतेशेवटी संबंधित अधिकारी सेवानिवृत्त झाला.तोपर्यंत अहवाल, चौकशी हेच सुरू आहे असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता, यासंदर्भात पुढील कारवाई झाली. सदर अधिकारी हा वन विभागाचा आहे, त्यांच्यावर कारवाईचे अधिकार आदिवासी विकास विभागाकडे आहेत. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्यांच्यावरील कारवाईसंबंधी वन विभागाला सूचना व शिफारशी केल्या का ? त्यासंबंधीचा अहवाल संबंधित विभागाला सादर केला का ? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत मुख्य सचिवांकडे संपूर्ण अहवाल सादर करण्यात आला. मुख्य सचिवांचे पत्रही रेकॉर्डवर आणलेले आहे. त्यावर मुख्य सचिवांनी निर्णय दिलेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

यामध्ये संबंधितांवर सक्त ताकीद देण्यात आली होती. त्यांचा खुलासाही मागविण्यात आला होता असे विभागीय सचिवांनी सांगितले.

एवढी खरेदी केली, ती वाया गेली, यामध्ये केवळ ताकीद देऊन काय करणार ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने चौकशी अहवाल सादर केले, त्यावर मुख्य सचिवांचे दिनांक ७ नोव्हेंबर २०१३ रोजीचे पत्र आहे, त्यामध्ये त्याची प्रत उपलब्ध केलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

मुख्य सचिवांनी मा. मुख्यमंत्री यांच्याकडे काय शिफारस केली ? अशी विचारणा समितीने केली असता, यामध्ये जे प्रकरण आहे, त्याच्यामध्ये दोन-तीन मुद्दे होते. त्याच्यामध्ये एक मुद्दा असा आहे की, सुरुवातीला असे झाले की, त्यांच्यावर जी नोटीस बजाविण्यात आली की, त्यांनी जे वैधानिक विकास मंडळामध्ये संबंधित कलेक्टर्स यांनी ज्या संचाकरिता पैसे दिले, त्यांनी ते मॉडेल बदलले. ते मॅन्युअल न घेता त्यांनी तो ऑटोमॅटिक मॉडेल घेतला. पण जेव्हा जे जिल्हाधिकारी यांचे प्रशासकीय पत्र जे आहे, त्याच्यामध्ये ॲटलीस्ट ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ॲप्रुव्हल आहे, त्याच्यामध्ये काही जनरेटर्सचे स्पेसिफिकेशन्स नाहीत. त्याच्यामध्ये संचांची संख्या आणि एकूण प्रशासकीय रक्कमची मान्यतेची एकूण रक्कम अशी नमूद केलेली आहे. त्यांनी त्याच्या खुलाशामध्ये मॅन्युअल न घेता, हे ऑटोमॅटिक प्रकारचे मॉडेल घेतलेले आहे.ती जी व्यक्ती आहे, तसेच, यारिता जी प्रशासकीय मान्यता आहे, त्याच्यामध्येच त्याच्या ॲक्सेसिव्ह अमाऊंटचे त्यांनी घेतलेले नाहीत. ही जी खरेदी झाली, ती रेट कॉन्ट्रॅक्ट ज्या एजन्सीचा ठेवला होता, त्याला न देता त्यांनी दुस-याला दिलेला आहे. त्यांनी त्या आर्थिक नियमांचे उल्लंघन केलेले आहे. दर करार संस्थेच्या व्यक्तीला हे दिलेले नाही. दर करार येतो, त्यावेळी ते एफडीदेखील दर करारानुसार जाण्याचा सल्ला देते. त्यांनी तेव्हा कागदपत्रे सादर केली, त्यांनी ज्या एजन्सीला कंत्राट दिले, तो दर करार सप्लायरचा अधिकृत पुरवठादार होता. याबाबत जुन्या फाईल्स पाहिल्या, त्यावेळी हे पाहिले होते. कलेक्टर, वाशिम यांचे यावर अहवाल आहे. तत्कालीन श्री. आर. जी. कुलकर्णी, कलेक्टर, वाशिम होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

हीच तर सर्वात मोठी अनियमितता आहे. ५०० रुपयांपासून गैरव्यहार करणारी व्यक्ती आहे. विभागाच्या कर्मचाऱ्यांनी, याच्याविरुद्ध आंदोलन केले होते. ही तर खरेदीची बाजू झाली. हा वेगळा प्रश्न आहे, मूळ मुद्दा वेगळा आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, The third thing is that out of 3 Project Offices only in one Project Office the payment was made to the supplier. बाकी किसीने वह पैसा दियाही नही , वह आज तक पेण्डिंग ही है. तो इसलिए अपहार नही है, असे विभागीय सचिवांनी सांगितले.

विभागाने जनरेटर खरीद लिया है, जनरेटर विभाग के ताबें में है, एक सालसे नही पाच सालसे है, सरकारका पैसा डुबता नही. विभाग का पैसा विभागाने प्रदान किया नही. इसका मतलब विभाग को पैसा देना नही पडेगा क्या ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने आता जो

निर्णय घेतलेला आहे, तो असाच आहे. ते विभागाच्या ताब्यात आहे. विभागाने एजन्सीला लेखी कळविले नाही की, त्याचे जनरेटर्स पडून आहेत, ते घेऊन जा. तो कंत्राटदार कोर्टबाजी करू शकतो. संबंधित आयएफएसचे जे अधिकारी त्यांचे वर जी प्रशासकीय कारवाई व्हायची होती, ती झालेली आहे. There were two independent administrative enquiries. One was ordered by Divisional Commissioner, Amravati through Collector, Washim. ती एक होती आणि एक आयुक्त, आदिवासी विकास विभाग, ही दोन्ही अहवालाची जी चौकशी विभागीय स्तरावर झाली, त्यानंतर त्यांचे जे काही मत होते, ते संबंधितांना देऊन ते मुख्य सचिवांसमोर आले, डिसीजन ते विथ ॲप्रुव्हल मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने त्यांनी याप्रकरणी मान्यतेसह निर्णय प्रकियेत प्रशासकीय आणि वित्तीय प्रोसिजरमध्ये अनियमितता झालेली आहे, असे शेरा दिलेला आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

यामध्ये तांत्रिक मान्यतेशिवाय प्रशासकीय मान्यता मिळत नाही. प्रस्ताव देणारा विभागाचा एटीसी आहे. प्रस्ताव दिल्यावर त्यांना पैसे देणारे प्रशासकीय मान्यता देणारे कलेक्टर आहेत. विभागाने जर चुकीचा प्रस्ताव दिला, विभागाकडे डिझेलची व्यवस्था नाही. कोणता जनरेटर पाहिजे, याचा निर्णय घेण्याचा अधिकार विभागाला आहे. कलेक्टर हा तांत्रिक माणूस नाही. हे सर्व कलेक्टरने देऊन कलेक्टरने बदलले. कोणाकडून खरेदी करायची, हा मुद्दाही एकदम स्पष्ट आहे. दर करार किंवा निविदा प्रकिया हा एकच मुद्दा होता. प्रत्येक ठिकाणी दर करार करण्याचे बंधनकारक नाही. निविदा प्रकियाही करू शकतो.या दोन्ही विषयाबाबत पूर्ण विषयामध्ये कोणतेही सर्व नियम कायदे याचे उल्लंघन करून खरेदी केलेले ते जनरेटर्स सद्यःस्थितीत आताही उपयोगात नाहीत. १,६३,००,००० रुपयांची जबाबदारी ठेवली आहे. ५५,००,०००,१७ जनरेटर्सचे पेमेंट केले. बाकी ३३ जनरेटर्सला अनधिकृतपणे घरी बसविले. आज नाही तर उद्या तो कंत्राटदार कोर्टात जाऊन त्यांचे पैसे वसूल करतील. विभागाचे लोक लोकलेखा समितीचा साक्ष झाल्यावर त्यांचे पैसे देतील. या विषयावर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कारवाई करतो, मुख्यमंत्री महोदयांकडे तशी नस्ती सादर केली का ? एका बाजूला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई सुरू आहे, तर मुख्यमंत्री महोदय याला ताकीद देऊन सोडून द्यावी, असे सांगू शकत नाही. एसीबीची चौकशी सुरू आहे, हे मुख्यमंत्री महोदयांच्या लक्षात आणून दिले आहे का ? अशी विचारणा समितीने केली असता, एसीबी प्रकरण हे नंतर घडले असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे आदिवासी विकास विभागानेच केस दिली. एसीबीचे प्रकरण २०१३ नंतर झाले. मुख्यमंत्री महोदयांच्या आदेशानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे प्रकरण होत नाही मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले तर ताकीद द्या, तर एसीबी यांच्याकडे जाण्याचे कारण काय ? अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत कार्यालयीन कार्यवृत्त होते. ओरिजनरल फाईल्स तपासाव्या लागतील असे विभागीय सचिवांनी सांगितले.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची चौकशी कधी प्रस्तावित केली, मुख्यमंत्री महोदयांनी ज्यावेळी आदेश दिले, त्यावेळी त्यांच्या लक्षात हा विषय आणून दिला का ? अशी विचारणा समितीने केली असता, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे परस्पर तक्रार झाली होती. त्यांनी त्यांचा अहवाल आदिवासी विकास विभागामार्फत नव्हे तर परस्पर महसूली व वन विभागाकडे दिला होता. त्यांच्याकडून आदिवासी विभागाच्या एटीसीकडे ज्या फाईल्स होत्या, आयुक्तालयाकडे या तीन प्रकरणांची फाईल्स होती, त्या दिलेल्या आहेत. प्रायव्हेट कंपलेनर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे गेले होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या संदर्भातील सर्व कागदपत्रे, मुख्य सचिवांची शिफारस, मुख्यमंत्री महोदयांची नस्तीवरील सही जिल्हाधिकारी वाशिम यांनी केलेला चौकशी अहवाल समितीला सादर करावा. या कागदपत्रांची झेरॉक्स प्रत समितीला घेण्यात यावी असे समितीने सूचित केले त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

जे जनरेटर सेट वापरात आले नाही, ते परत करण्याची कारवाई करावी. हे पैसे त्यांनी ज्यावेळी मागितले, त्यांना फाईन केला पाहिजे. डिझेलची व्यवस्था नाही आणि जनरेटर खरेदी करणे आवश्यक नव्हते. ती व्यक्ती आता कामावर रुजू झाली आहे का ? त्याला सेवानिवृत्तीला किती वर्षे झालेली आहेत. गेल्या वर्षीपासून तो माणूस रिटायर झालेला आहे. समितीच्या शिफारशीप्रमाणे याचा पुर्नविचार शासनाने करावा, या विषयावर याची दिरंगाई झालेली आहे. त्याबाबत त्या अधिकाऱ्यावर कारवाई झाली पाहिजे. १,०८,००,००० रुपयांची जबाबदारी निश्चित करण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, मागील वर्षीपासून शाळा व्यस्थापनाला ते अधिकार दिलेले आहेत. आता डिझेलची व्यवस्था आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

२.२.४.८.—इ. निष्काम सौर पाणी तापके—

या परिच्छेदात विभागाकडे पायाभूत सुविधा नसताना यांनी सौर पाणी तापके विकत घेतली. इन्फ्रास्ट्रक्चर नसताना तुम्ही हे विकत घेण्याची मान्यता का दिली ? ते सर्व पडून राहिले. त्यांच्याकडे ५ वर्षांचे मेनटेनन्स होते. पूर्ण पेमेंट त्यांना देऊन टाकले, या सर्वांचे कारण काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, ही सर्व कारणे शोधून या माहिती सोबत सादर करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने दिलेल्या उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, जैन इरिगेशनने सप्लाय केलेल्या संचापैकी ५१ संच कार्यान्वित केले नाहीत. विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, पर्ल एंटरप्रायजेसने पुरवठा केला. त्यापैकी ३०१ संच कार्यान्वित केले नाहीत. ३०१ व ५१ असे ३५२ संचाबाबत समजणे शक्य आहे. परंतु, त्याच्या पलीकडे जाऊन तुम्ही आता असे सांगण्यात येत आहे की, फक्त ४२० संच कार्यान्वित आहेत व इतर सर्व निष्कामी झाले आहेत. असे कसे काय ? ५ वर्षांपर्यंतचे मेनटेनन्स त्याच्याकडे होते. ते पूर्ण केल्याशिवाय त्याला पूर्ण पेमेंट करून टाकले. या बाबी समितीने निदर्शनास आणल्या असता, पूर्ण पेमेंट केलेले नाही. जैन व पर्ल या दोन्ही पुरवठादारांची रक्कम आपल्याकडे शिल्लक आहे. देणे बाकी आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

त्या दोघांचे बिल किती रुपयांचे आहे व किती रक्कम देणे बाकी आहे ? ९० टक्के बिल देऊन टाकले व १० टक्के बिल बाकी आहे असे दिसते असे मत समितीने व्यक्त केले असता, पर्लचे १ कोटी ११ लाख ७० हजार रुपये आपल्याकडे शिल्लक आहेत. जैन यांचे ४१ लाख २६ हजार रुपये शिल्लक आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

याचा अर्थ एकूण १० टक्के पेमेंट शिल्लक आहे. त्यांनी ९० टक्के पेमेंट घेतलेले आहे. फक्त २०-२२ टक्के यंत्रे सुरू आहेत. ७५ पेक्षा जास्त सोलर युनिट बंद आहेत, असे विभागाने दिलेल्या माहितीमध्ये नमूद केले आहे. विभागाने ज्यावेळेस निविदा काढल्या. त्यावेळेस विभागाने ५ वर्षांच्या मेनटेनन्ससहित कंत्राट दिले होते. विभागाच्या निविदेतील अटी काय होत्या, डिलिव्हरी केल्यावर किती पेमेंट करायचे होते, फिट केल्यावर किती पेमेंट करायचे होते आणि ५ वर्षांचा मेनेटेनन्स असताना ५ वर्षात कसेकसे पेमेंट करायचे होते, हे याबाबतची माहिती समितीला द्यावी असे समितीने सूचित केले असता, याबाबतीत एक चौकशी समिती देखील स्थापन झाली होती. त्या चौकशी समितीचा अहवालही प्राप्त झालेला आहे. त्यामध्ये त्यांनी कंत्राटामधील सर्व तरतुदी, कंपन्यावरील कारवाई या सर्व बाबतीत शिफारशी केलेल्या आहेत. एकूण ६ शिफारशी आहेत. त्यातील पहिली शिफारस अशी आहे की, बंद असलेली सौर तापके त्वरित दुरुस्त करून सुरू करावीत. हा अहवाल ऑगस्ट, २०१८ मध्ये प्राप्त झाला असून विभागाने त्यावर कारवाई सुरू केली आहे. विभागाने पहिल्या शिफारशीबाबत प्रोजेक्ट ऑफिसर लेव्हलला दुरूस्तीच्या सूचना दिल्या. त्यात अशाही सूचना दिल्या की, पी.ओ. लेव्हलला जर दुरुस्त करणारे मिळू शकले नाहीत, जसे धारणी सारख्या भागात मिळाले नाहीत तर ए.टी.सी. पातळीवर विभाग दुरूस्ती करणारे लोक त्यांना उपलब्ध करून देणार आहे. विभागाने याचा संपूर्ण सर्व्हे घेतला व कार्यान्वित व अकार्यान्वितची पाहणी करून अकार्यान्वित राहण्याची कारणे शोधून जेथे किरकोळ कारणे आहेत तेथे दुरूस्ती होऊ शकते. मोठे प्रॉब्लेम्स आहेत तेथे ती होऊ शकणार नाही. या सर्व बाबतीतील विभागाचा संपूर्ण आढावा पुढच्या ६ महिन्यांत पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. काही किरकोळ दुरूस्ती असू शकते. कंपनीने व्यवस्थित इन्स्टॉलेशन केले नाही आणि सुरू करून दिले नाही किंवा मुळातच पुरवठा झाला परंतु, त्याचा वापर सुरूच झाला नाही, याला कंपनी कारणीभूत आहे, असेही काही ठिकाणी आढळून येत आहे.

जी.ए.डी. च्या अहवालातील पहिली शिफारस अशी होती की, बंद असलेली सौर तापके त्वरित दुरुस्त करावीत. विभागाने त्याप्रमाणे सुरू केले आहे. दुसरी शिफारस अशी आहे की, सौर तापकांचे दुरूस्ती व संरक्षण न करण्यास जबाबदार असलेल्यांवर जबाबदारी निश्चित करावी व त्यांच्याकडून दुरूस्तीचा खर्च वसूल करता येईल का हे तपासावे. या प्रमाणे आम्ही प्रोजेक्ट ऑफिसरकडे जबाबदारी निश्चित करण्याचे काम दिलेले आहे. आता आम्हाला जे प्रिलिमिनरी रिपोर्ट्स आलेले आहेत त्यावरून असे दिसत आहे की, काही ठिकाणी कंपनीच जबाबदार आहे आणि काही ठिकाणी इन्स्टॉलेशन झाल्यानंतर व्यवस्थित मेनटेनन्स झाला नाही, दुर्लक्ष झाले त्यामुळे नादुरुस्त आहेत. ऑगस्ट, २०१८ मध्ये हा अहवाल विभागाकडे प्राप्त झाला असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

यामध्ये मुख्य विषय असा आहे की, विभागाने पॅनल विकत घेत असताना तेथे काही व्यवस्था नसताना ती विकत घेतली. विभागाच्या अहवालामध्ये असे नमूद केले आहे की, तेथे पाण्याची व्यवस्था, नळ, पाईपलाईन नव्हत्या. अशा सर्व गोष्टी नसल्याने पाणी गरम होण्याचा प्रश्नच येत नव्हता. ही सर्व परिस्थिती असताना विभागाने ऑर्डर दिली व यंत्रे विकत घेतली, याकरिता कोण जबाबदार आहे, विभागाने याला मान्यता कशी दिली, विभागाच्या ए.टी.सी. व कमिशनर यांनी त्या फाईलवर काय नमूद केले, विकत घ्यावीत असे नमूद आहे काय ? तुमच्याकडे पाणी, नळ, पाईपलाईन, टाकी नाही असे असताना यंत्रे विकत घेण्याची जो प्रस्ताव सादर केला त्याची प्रत समितीला द्यावी. सुरुवातीपासून शेवटपर्यंत सर्वांचे रिमार्क्स समितीला कळवावेव त्यावर विभागाचे मत द्यावे की, हे सर्व नसताना आपण पॅनल विकत का घेतली ? ती माहिती सादर करावी असे समितीने सूचित केले असता, ती माहिती उपलब्ध करून देण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

६ शिफारशी कोणत्या आहेत अशी विचारणा समितीने केली असता, कंपन्याबाबत अशी शिफारस आहे की, संबंधित पुरवठादारावर कारवाई करून त्यांना काळ्या यादीमध्ये टाकण्यात यावे. एकूण ३ कंपन्यांचा संबंध येत आहे. त्यातील १ जैन आहे, दुसरी पर्ल आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने सन २०१४ मध्ये त्यांना कारणे दाखवा, त्यांच्यावर कारवाई करा, त्यांना काळ्या यादीत टाका अशी ऑर्डर ए.टी.सीं.ना दिली होती. परंतु, त्यावर काहीच झाले नाही. रिपोर्टच्या अगोदरच दि. १२ फेब्रुवारी २०१४ रोजी कारणे दाखवा नोटिसद्वारे त्यांना काळ्या यादीत का टाकण्यात येऊ नये याबाबत व त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत आयुक्तालयाने ए.टी.सीं.ना पत्र पाठविले होते. विभागाचा अहवाल तर आता आला आहे. तुम्ही त्याच्या आधीच पत्र पाठविले आहे. त्यावर ए.टी.सीं.नी काय केले ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने नोटीस दिली होती. परंतु, चौकशी समितीचा अहवाल येईपर्यंत कार्यवाही स्थगित केलीअसे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

चौकशी समितीचा अहवाल आला. चौकशी समितीने जी शिफारस केली त्याप्रमाणे विभागाने २०१४ मध्ये कारवाई केली आहे. त्या कंपन्यांना काळ्या यादीमध्ये टाकलेच नाही. त्या सर्व कंपन्यांकडून सध्याही हजारो कोटींचा पुरवठा होत आहे. विभागाने माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, आयुक्तांनी दि.१२ फेब्रुवारी २०१४ रोजी कारणे दाखवा नोटिसीबाबत व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ऊर्जा अभिकरण यांना कळविले. कारण तो मुळ विभाग होता. महाराष्ट्र ऊर्जा अभिकरणाने त्यांना काळ्या यादीमध्ये टाकले काय, ही माहिती विभागाने घेतली पाहिजे होती. त्यांनी विभागाला एवढे लुबाडले आहे, विभागावर डाका टाकला, त्यावर विभागाने असे कळविले की, या कंपन्यांना काळ्या यादीमध्ये टाका. त्यानंतर त्यांनी त्या कंपन्यांना काळ्या यादीमध्ये टाकले आहे की नाही, हे आदिवासी विकास विभागाने कमीतकमी विचारले तर पाहिजे होते. दिनांक ३ ऑक्टोबर, २०१८ रोजी ५७ हजार सोलर पंप पुरविण्याबाबतचा निर्णय झाला. हे जैन इरिगेशन त्यामध्ये आहे. ते त्यांना पुरवठा करणार आहेत. त्यांनी आदिवासी विभागामध्ये अडचणी निर्माण केल्या तशा शेतकऱ्यांना अडचणी निर्माण करणार आहेत. जैन इरिगेशन ५७ हजारांमध्ये बोली करणार. कारण ते त्यामध्ये एक्सपर्ट आहेत.आता अहवालही असे सांगत आहे की, त्या कंपन्यांना काळ्या यादीमध्ये टाकावे. यापुढे विभागाने असे फसता कामा नये. जैन इरिगेशन ही कंपनी त्यामध्ये पारंगत आहेत. ते बोली करणार, ते कंत्राट घेणार व आदिवासी विभागाचे जसे नुकसान केले तसे ऊर्जा विभागाचे नुकसान करणार व या महाराष्ट्राचा सत्यानाश करणार. आदिवासी विकास विभागाने याबाबत ताबडतोब कळवावे की, जैन इरिगेशन व पर्ल या दोन्ही कंपन्यांनी असे-असे केले आहे त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये ऊर्जा विभागाने त्यांच्याबाबत सावध रहावे. त्या कंपन्यांना काळ्या यादीमध्ये टाकण्यात यावे. त्या कंपन्यांना काळ्या यादीमध्ये हे नाही तर महाराष्ट्र ऊर्जा अभिकरण टाकणार आहे.यांना आता ऑगस्टमध्ये प्राप्त झालेल्या रिपोर्टमध्येही तोच विषय आहे. आदिवासी विभाग, सामाजिक न्याय विभाग या सर्वांमार्फत जी पॅनल लावण्यात आली आहेत ती जैन इरिगेशननेच लावली आहेत. आता हे ५७ हजार सोलर पंपाच्या कामातील तो सर्वात मोठा बिडर आहे. त्यामुळे असे वाटते की, आदिवासी विकास विभागचे नुकसान झाले आहे. मात्र इतरांना वाचवले पाहिजे असे समितीने सूचित केले असता, या तिन्ही कंपन्यांच्या बाबतीत त्यांना आदिवासी विभागातर्फे ब्लॅकलिस्ट करण्यात येईलया दोनच कंपन्या आहेत परंतु बायोमेट्रिक बाबतची जी तिसरी कंपनी आहे, तिचाही इशू असाच आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आदिवासी विकास विभागाने ऊर्जा विभागाच्या सचिवांना पत्र लिहावे की, या कंपन्यांनी असे-असे केले आहे, विभागाने ताबडतोब यांच्या बाबतीत खातरजमा करून त्याला टेक्नीकल बिडमध्येच येऊ देऊ नये. He should be in the blacklist of the Government. आदिवासी विकास विभागामध्ये काय होणार आहे ? He should be in the list of the Government. समितीच्या शिफारशीमध्येही हे नमूद करण्यात येईल असे समितीने सूचित केले असता, या तिन्ही कंपन्यांबाबत समितीने जसे आदेशित केले आहे, तशी कारवाई करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

या परिच्छेदाबाबत दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या साक्षीच्यावेळी माहिती देताना सोलार वॉटर हिटर आणि बायोमॅट्रीक या दोन्हीबद्दल सामान्य प्रशासन विभागाच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यातील मुद्दे मागच्यावेळी समितीला वाचून दाखवले होते. त्या अहवालातील शिफारशींच्या पुर्ततेचा प्रयत्न मागच्या साक्षीनंतर केला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले चौकशी समितीच्या शिफारशीच्या पुर्ततेबाबतची माहिती देताना, शिफारशीमध्ये पहिला मुद्दा असा होता की, बंदिस्त संनियंत्र ही त्वरित दुरुस्त करून सुरू करावी. ऑगस्ट महिन्यात ही शिफारस प्राप्त झाली आहे. त्यानंतर विभागाने कार्यान्वित आणि अकार्यान्वितचा पहिला सर्व्हे पूर्ण केला. या तीनही मुद्यांसाठी एक अभियान आखलेले आहे. त्या अभियानामध्ये काही डेटस् नक्की केल्या आहेत. तसेच प्रोसिजर मेथॉडॉलॉजीसुद्धा प्रिस्क्राईब केली आहे. त्यानुसार विभागाला असा तांत्रिक अंदाज घ्यावा लागेल की, किरकोळ दुरूस्ती किती यंत्राची आहे, मोठी दुरूस्ती किती यंत्रांची आहे आणि सयंत्र बदलणे किती ठिकाणी आवश्यक आहे. त्याप्रमाणे तांत्रिक सहाय्य घेऊन चमू स्थापन केलेल्या आहेत. त्यातून एक फॉरमॅट तयार केलेला आहे. हे आकडे महिन्याच्या अखेरपर्यंत उपलब्ध होतील. हे आकडे मिळाल्यानंतर जनरेटबद्दलल लोकल आयटीआय, सौरऊर्जेबद्दल मेढाच्या वेबसाईटवर १० वेडॉर्सची यादी आहे. अनेक उद्योजक त्या क्षेत्रामध्ये आहेत. कमी रकमेच्या किरकोळ दुरुस्त्या स्थानिक पातळीवर त्यांच्या मदतीनेच पूर्ण करण्यात येणार आहेत. किरकोळ दुरुस्त्यांसाठी ३० नोव्हेंबर ही तारीख निश्चित केली आहे. तोपर्यंत किरकोळ दुरुस्त्यांची यंत्रे पूर्ण होतील. त्यानंतर मोठ्या दुरुस्त्यांसाठी काही ई-टेंडरींग प्रक्रिया करावी लागू शकते म्हणून त्यासाठी विभागाने २ महिन्याचा कालावधी दिलेला आहे.

३१ डिसेंबर पर्यंत मोठ्या दुरुस्त्या पण पूर्ण होतील. जानेवारी महिन्यामध्ये ज्या ठिकाणी बदल करावयाचे आहेत तिथे नवीन खरेदीचा मुद्दा हाताळण्यात येणार आहे. या पद्धतीने या तीनही संनियंत्रणाचे काम पूर्ण करण्यात येणार आहे. त्याचा फायदा विद्यार्थ्यांना मिळेल अशा पद्धतीने विभागाचे नियोजन आहे. त्याचबरोबर यंत्र आस्थापित करताना मागच्या अनुभवातून शिकल्यामुळे स्थानिक पातळीवर काही छोटे प्रशिक्षण, कार्यक्रम, तांत्रिक दृष्टीने यंत्राची काळजी व संरक्षण घ्यावे आणि छोटी देखभाल दुरूस्ती कशी करावी याबद्दलसुद्धा विभाग कार्यवाही करीत आहे. सोलार वॉटर हिटरसाठीच्या ज्या दोन संस्था होत्या त्यांची बँक गॅरंटी आणि त्यांची १० टक्के शिल्लक रक्कम या दोन्ही रकमा मिळून एकूण ३ कोटी ७ लाख रुपये जमा आहेत, याच निधीतून विभाग या सर्व दुरूस्त्या करणार आहे. त्याचे ढोबळ अंदाजपत्रक सुद्धा ३ कोटी रुपयांच्या जवळपास आहे. त्यामुळे ह्या निधीतून या दुरुस्त्या होऊ शकतील. या दोन्ही संस्थांना विभागामार्फत काळ्या यादीमध्ये टाकलेले अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

विभागाच्या काळ्या यादीमध्ये टाकून काही उपयोग नाही. कारण राज्याच्या काळ्या यादीमध्ये टाकले पाहिजे असे समितीने सूचित केले असता, त्याची शिफारस पण विभागाने केलेली आहे. ज्या संस्थेमार्फत दर करारच केला होता त्या संस्थेमार्फत हे काम होईल. त्यांना हे कळवलेले आहे आणि त्यांची त्रुटी आली होती त्याचेही उत्तर दिलेले आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

त्या संस्थांना काळ्या यादीमध्ये कधी टाकले आहे ? समितीची शिफारस काय आली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१८ रोजी विभागापुरते त्या संस्थेला काळ्या यादीमध्ये टाकण्याची कार्यवाही केली आहे. गेल्या १० दिवसामध्ये केलेली कार्यवाहीच समितीला सांगितली आहे. सन २०१४ रोजी चौकशी समिती स्थापन झाली आहे. समितीने या संस्थांना काळ्या यादीमध्ये टाकण्याची शिफारस केली आहे. तो अहवाल ऑगस्ट, २०१८ ला आला आहे. त्यानंतर आता या संस्थांना काळ्या यादीमध्ये टाकण्याची शिफारस केली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

या संस्थांना विभागाने सर्व प्रदान केले आहे? विभागाकडे ३ कोटी रुपयांचे नियोजन आहे तर याचे काय झाले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, या संस्थांना पूर्ण प्रदान केलेले नाही, ९० टक्के पेमेंट केलेले आहे. १० टक्के पेमेंट ठेवलेले आहे आणि त्यातूनच विभागाकडून दुरुस्त्यांचा खर्च करण्यात येणार आहे. याची माहिती उपलब्ध आहे. बँक गॅरंटी १ कोटी १४ लाख रुपयांची जप्त केली आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

बँक गॅरंटी कधी जप्त केली आहे ? Whether it is in current? अशी विचारणा समितीने केली असता, It is in cash. १० कोटी रुपयांचे प्रदान थांबविले आहे त्यामध्ये १ कोटी ५१ लाख रुपये प्रति इंटरप्रायजेस आणि ४१ लाख रुपये जैन इरिगेशनचे असे सर्व मिळून एकूण ३ कोटी ६० लाख रुपये विभागाकडे आहेत. त्यातुन दुरूस्तीचा खर्च केला जाणार आहे. सर्व दुरुस्त्यांचे अंदाजपत्रक ३ कोटी रुपयांचेच आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सोलार वॉटर हिटर सारख्या ज्या ज्या गोष्टी विभागाने खरेदी केल्या आहेत त्यासाठी विभागाने शासनाला प्रस्ताव दिला होता काय किंवा या सर्व गोष्टी विकत घेण्यासाठी एखाद्या पुरवठादाराने मंत्र्यांना प्रस्ताव दिला काय म्हणजे याची नेमकी सुरुवात कुठून झाली होती ? अशी विचारणा समितीने केली असता, याची सुरुवात आयुक्त कार्यालयातून झालेली आहे.परचेस का जो मुद्दा है, कमिशनर कार्यालय ने परचेस किया है, सोलर हिटर का प्रस्ताव है. मेढा की रेट कॉन्ट्रेक्ट वाली एजेन्सी थी, इनको ये दिया गया है. अफकोर्स इसमें जो एस्टीमेशन है, डिमांड है वह काफी इन्फ्लेटेड जैसे लगी. जितने बच्चे है, उनको दस लीटर गरम पानी प्रति बच्चा करके उस डिमांड का एस्टीमेशन है. लेकिन बाकी रेट कॉन्ट्रेक्ट एजेन्सी है आणि त्यामध्ये असे होते की, जेव्हा तो पुरवठादार पुरवठा करेल आणि सुस्थितीमध्ये त्यांनी संच पुरवला तर त्याचे ९० टक्के रक्कम अदा करण्यात येईल. त्यांनी आयुक्त कार्यालयामध्ये अभिलेख्यानुसार जो पुरवठा केला आणि काही ठिकाणी टप्याटप्यामध्ये पुरवठा केला त्यामध्ये काही अडथळे आहेत. काहीच ठिकाणी पाणी तापके स्थापित झाली नाहीत, असे निदर्शनास आले आहे. बाकी ठिकाणी त्यांनी रेकॉर्डवर Received in good conditionu अशी पावती आहे की सुस्थितीमध्ये संच प्राप्त झाला आहे त्याच्या आधारे ९० टक्के प्रदान केले आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

या विषयामध्ये विभागाला पुरवलेले सोलारचे साहित्य सुस्थितीमध्ये आहे, हे वापरल्याशिवाय कसे कळू शकते? प्रत्यक्ष कंत्राटामध्ये ९० टक्के पैसे सन २०१५ मध्ये दिले. सन २०११ चे इन्स्टॉलेशन बरोबर झाले नाही तरी सन २०१५ मध्ये कोणाच्या दबावाखाली विभागाने पैसे दिले आहेत तसेच ९० टक्के पैसे का दिले आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने एक व्यवहार केला त्यामध्ये या सर्व कंपन्यांबरोबर जो काही करारनामा झालेला आहे त्यातील प्रत्येक अटीनिहाय काय निरिक्षण आहेत ते विभागाच्या गटाने अभ्यास करून काढलेले आहे. त्यातील काही अटींमध्ये असे आढळून आलेले आहे की, 'पुर्तता झालेली नाही.' असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

तरी देखील विभागाने पैसे दिले आहेत. Then department's persons are resposible, what action department has taken? अशी विचारणा समितीने केली असता, समोर आलेल्या निरिक्षणाप्रमाणे या तीनही कंपन्यांची तपासणी केली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

कंपनीचा काही विषय नाही. विभागाच्या प्रतिनिधींनी तपासणीकरता ९० टक्के निधीचे प्रदान कसे काय केले आहे ? विभागाची कंत्राटीमध्ये बायोमॅट्रीकसाठी अट आहे की, १० टक्के कॉम्प्लिकेशन आणि सर्व्हरमध्ये कनेक्टिविटी झाली पाहिजे. त्याचप्रमाणे सौरऊर्जेची पण परिस्थिती आहे. हे सर्व काम विभागाच्या प्रतिनिधींनी बघितल्यानंतर आणि विभागाचे समाधान झाल्यानंतरच ९० टक्के पैसे द्यायचे होते. पण ते न बघता विभागाने प्रदान केले आणि सर्व विषय संपविला आहे. कंत्राटाची जी अट होती ती परिपूर्ण केली नाही तरी ९० टक्के रिलिफ केले त्यासाठी विभाग जबाबदार आहे असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता, यातील समितीचे मत बरोबर आहे की, यामध्ये जे डयु डिलेजन्स पाहिजे तसेच कमिशनींग इन्स्टॉलींग, त्याचा वापर याचा विचार केला पाहिजे. पण जर तांत्रिक दृष्टीने अट पाहिली तर अटी शर्तीमध्ये आहे की, त्यांनी ९० टक्के पेमेंट सोलार वॉटर हिटर पुरवठा प्राप्त झाल्यावर आणि १० टक्के पेमेंट सामाधानकारक कार्यान्वित केल्यावर करावे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

Department should interpret in the interest of the public असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

बायोमॅट्रीकच्या बाबतीत कोणावर कारवाई केली आहे.कोणाला व किती दरामध्ये पुरवठा केला यामध्ये समितीला स्वारस्य नाही. पूर्ण अटीचे उल्लंघन झाल्यावरही विभागाने २ वर्षानंतर ९० टक्के पैसे दिले यामध्ये काय आहे? सन २०११ ची ऑर्डर आहे आणि सन २०१५ मध्ये पैसे दिले यासाठी काय कारण आहे ? याच परिस्थितीमध्ये सौरऊर्जेच्या बाबतीतसुद्धा काही तक्रार झाली नाही. माल म्हणजे ९० टक्के पैसे द्यायचे का? तो माल योग्य आहे की नाही ? बाकीची फिटींग व्यवस्थित केली की नाही, हे आधी बघायचे होते. विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, जैन एरिगेशनने ६४९ द्वसंचापैकी ५१ संच कार्यान्वित केले नव्हते. पर्लवाल्यांनी ९६० संचापैकी ३०१ संच कार्यान्वित केले नाही. ज्यांनी जे संच कार्यान्वित केले नाही त्याचे पैसे विभागाने कसे मंजूर केले आहेत ? ज्यांनी हे पैसे मंजूर केले. त्यांच्यावर विभाग काहीच कारवाई करीत नाही. त्यामुळे आता विभागाने ९० टक्के पैसे दिले आहेत त्या संचाच्या दुरूस्तीसाठी विभागाने प्रयत्नकरावा आणि ३ कोटी रुपयांचे नियोजन करावेत, सर्व्हे करावा कारण आता विभागाकडे हेच काम आहे असे समितीने सूचित केले.

संच कार्यान्वित नसताना विभागाने त्याचे पैसे का दिले आहेत, संचाचा पुरावठा केल्यानंतर ९० टक्के आणि संच कार्यान्वित केल्यानंतर १० टक्के रक्कम द्यायची या तांत्रिक बाबीचा फक्त विभागाने वापर केला आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता, करारनाम्यातील ८ क्रमांकाची सोलार वॉटर हिटरबद्दल अट अशी होती की, द्वएकूण पुरवठा आदेशातील विहित निर्देशानुसार सोलार वॉटर हिटर प्राप्त होऊन त्याबाबतचा प्रकल्प अधिकारी यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर ९० टक्के रक्कम अदा करण्यात येईल उर्वरित १० टक्के रक्कम पुरवठा झालेले सोलार वॉटर हिटर समाधानकारक झाल्याची खात्री झाल्यानंतर अदा करण्यात येईल. परंतु सदर १० टक्के रक्कम अदा करण्यापूर्वी पुरवठादारास १० टक्के इतक्या रकमेची वैध असलेली राष्ट्रीय बँकेची परफॉरमन्स बँक गॅरंटी सादर करावी लागेल. याप्रमाणे पोहोच प्राप्त झाल्यानंतर ९० टक्के रक्कम अदा केल्याचे रेकॉर्डवरून दिसून येते. १० टक्के रक्कम अदा केलेली नाही ती विभागाने फोरफिट केलेली आहे. बँक गॅरंटीच्या अटीचा सुद्धा कंपनीने भंग केलेला आहे म्हणजे या प्रकरणामध्ये बँक गॅरंटी सादर केलेली नाही असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

९० टक्के पैसे रिलिफ करण्यापूर्वी बँक गॅरंटी सादर करून घेण्याची जबाबदारी विभागाची होती ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, त्या अटीमध्ये असे वाक्य होते की, १० टक्के रक्कम अदा करण्यापूर्वी बँक गॅरंटी घेतली पाहिजे. १० टक्के अदा केलेली नाही त्यामुळे बँक गॅरंटी पण घेतलेली नाही.दोन वेगवेगळ्या संस्था आहेत. एका संस्थेची बँक गॅरंटी, त्याचा करारनामा वेगळा होता. जैन एरिगेशनची बँक गॅरंटी आहे आणि पर्ल या संस्थेची बँक गॅरंट नव्हती असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

विभागाचा करार नसताना बँक गॅरंटी कशासाठी मिळाली आहे. एकाच कामासाठी दोन वेगवेगळे करारनामे आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता, एकाच कामासाठी दोन वेगवेगळे करारनामे होते त्या करारनाम्यामध्ये तसा उल्लेख होता. दोन्ही कराराच्या अटीमध्ये फरक होता असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

एकाच वेळी आणि एकाच मालकाला ऑर्डर दिली तरी दोन कंपन्यांसाठी वेगवेगळे करारनामे केले आहेत. अशा प्रकारच्या अटी व शर्तीवर विभागाने वस्तू खरेदी कराव्या हे योग्य वाटते काय ? अशी विचारणा समितीने केली असता, पुरवठादार जरी वेगवेगळे असले तरी एका ॲटम्ससाठी अटी व शर्ती सारख्याच असायला पाहिजे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ज्यांनी हे काम केलेले आहे त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे आणि १५ दिवसाच्या आत केलेल्या कारवाईची माहिती समितीला द्यावी. सोलार वॉटर हिटरबद्दल विभागाने माहिती दिली आहे. आता बायोमॅट्रीकबद्दल १० टक्के किंवा ९० टक्के पैसे देऊ नका अशी अट बायोमॅट्रीकमध्ये आहे तरी विभागाने ९० टक्के पैसे का दिले आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, बायोमॅट्रीकमध्ये एसब्रेन नावाची कंपनी होती.

बायोमॅट्रीकच्या अटीमध्ये असे म्हटले आहे की, सर्व यंत्र टप्याटप्याने कार्यान्वित झाल्यास त्यानुसार प्राप्त पोहोच व अहवालाच्या आधारे देयके अदा करण्यात यावीत. असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

समितीसमोर जी अट आहे ती अशी आहे की, बीओएची मांडणी झाल्यावर आणि सीममध्ये डाटा कर्मचारी आणि विद्यार्थ्यांच्या गटात असेल तर तो अपलोड झाल्यानंतर एजन्सीला ९० टक्के पैसे अदा करायचे होते आणि उर्वरित १० टक्के केंद्रीय सर्व्हरबरोबर समाधानकारक कॉन्फीगरेशन झाल्यावर कोणतीही बाधा न येता दिले पाहिजे. पण विभागाने १० टक्के पैसे दिलेच नाहीत. ९० टक्के पैसे पण मांडणी झाल्यावर आणि डाटा अपलोड झाल्यावर देण्याची अट होती. ती अट न पाळताविभागाने सन २०१५ मध्ये ९० टक्के पैसे रिलीज केले यासाठी कोण जबाबदार आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, करारनाम्यातील अटीमध्ये म्हटले आहे की, बायोमॅट्रीक यंत्र व सीमकार्ड कार्यालयामध्ये पोहोच पावती ४ प्रतीत घ्यावी. पावतीच्या २ प्रती आयुक्तांकडे सादर केल्यावर केंद्रीय सर्व्हरशी जोडणी केल्यानंतरर १० दिवस केंद्रीय सर्व्हरवर जोडलेले असल्याचा अहवाल प्राप्त करून घेतल्यावर ९० टक्के देयक अदा करण्यात येईल. उर्वरित १० टक्के रक्कम ही बायोमॅट्रीक यंत्र योग्यरित्या स्थापित करून त्याबाबतची माहिती केंद्रीय सर्व्हरवर दिसायला लागल्यानंतर तसेच १० टक्के रकमेची बँक गॅरंटी मिळाल्यानंतर पुरवठा करण्यात आलेल्या संनियंत्राची प्रत्येक अपर आयुक्त आदिवासी विकास यांच्या कार्यक्षेत्रातून एनआयसी किंवा शासकीय तंत्रनिकेतन अथवा शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांच्यामार्फत तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर व उपस्थितीची संपूर्ण माहिती प्राप्त झाल्यानंतर अदा करण्यात येईल. त्यापैकी ९० टक्के प्रदान हे समिती म्हणजे त्याप्रमाणे १० दिवस केंद्रीय सर्व्हरवर जोडलेले असल्याचा अहवाल प्राप्त करून घेतल्यानंतर करायचे होते परंतु वस्तूस्थिती तशी घडलेली नाही. केंद्रीय सर्व्हर स्थापित न झाल्यामुळेहे काम झालेले नाही असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

अटीचे उल्लंघन झाल्यावर सुद्धा प्रदान केले आहे त्यामुळे ज्यांनी हे प्रदान केले त्यासाठी ते जबाबदार आहेत. त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. केंद्रीय सर्व्हर का स्थापित झाले नाही? यापेक्षाही मागचे प्रकरण गंभीर आहे की, १७१४ सोलार वॉटर हिटर यंत्र होते त्यापैकी फक्त ४२० यंत्रच कार्यान्वित आहेत, असे या ठिकाणी दिलेले आहे. जवळपास १२९४ यंत्र कार्यान्वित नाहीत तरी विभागाने प्रदान केलेले आहे. याबाबत चौकशी केली विभागाने म्हटले आहे पण याठिकाणी तसे काहीच नमूद केलेले नाही. सदरहू प्रकरणात उल्लंघन केल्यानंतर संबंधितांना प्रदान केलेले आहे. या प्रकरणात संबंधित अधिकारी दोषी आहेत आणि त्यांनी संगनमताने केलेले आहे. सदरहू प्रकरणी सद्यःस्थितीत संबंधित अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई केलेली नाही. या प्रकरणी विभागाने संबंधित अधिकाऱ्यांवर कृपा दाखविली आहे. यासंदर्भात लोकलेखा समिती पुढे सदरहू परिच्छेद चर्चेला आलेला आहे. सदरहू प्रकरणात संबंधितांवर कारवाई केल्यानंतरच लोकलेखा समितीसमोर चर्चेसाठी यायला हवे होते. शासनाचा या प्रकरणातत निधी वाया गेलेला असून, तो निष्फळ ठरलेला आहे. सद्यःस्थितीत या प्रकरणी दंडात्मक कारवाई करणे अपेक्षित होते असे मत समितीने व्यक्त केले असता, तपासणी समितीच्या शिफारशीमध्ये सुद्धा कारवाईचा मुद्दा प्रकर्षाने आलेला आहे. शिफारशी प्राप्त झाल्यानंतर या प्रकरणी नस्तींची संख्या लक्षणीय असल्याचे लक्षात आले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

संबंधित व्यक्तीनी कंत्राटाचे पूर्णपणे पालन न करता प्रदान केलेले आहे. यामुळे या प्रकरणी सोलर, बायोमॅट्रीक आणि जनरेटरमधील संबंधित अधिकाऱ्यांच्या विरोधात १५ दिवसांच्या आत कारवाई करावी. विभागाने समितीला या प्रकरणी अहवाल लवकरात लवकर द्यावा, अशी सूचना आहे. या प्रकरणी ठोस कारवाई करावी एवढीच समितीची अपेक्षा असणार आहे. सदरहू प्रकरणी संबंधितांकडून रक्कम वसूल करावी, अशी समितीची सूचना आहे. २५ कोटी रुपयांचा विषय आहे. विभागाच्या समितीने कोणती कारवाई करण्यास सांगितले आहे अशी विचारणा समितीने केली असता, समितीने कारवाई सुचविलेली नाही. नस्तीचा अभ्यास करून अहवालातील शिफारशीनुसार दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येणार आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

सदरहू प्रकरणाला आता पर्यंत ५ वर्षाचा कालावधी उलटून गेलेला आहे. विभागाच्या समितीने कोणते निष्कर्ष काढले आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, समितीचा अहवाल ऑगस्ट २०१८ मध्ये प्राप्त झालेला आहे. विभागाच्या समितीने संबंधित अधिकारी विभागाच्या दोषी असतील तर त्यांच्या विरोधात कारवाई करावी, असा निष्कर्ष काढलेला आहे तसेच विभागाला सूचना दिलेल्या आहेत.असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

या प्रकरणी विभागाच्या समितीने कारवाई करावी असे म्हटले असून, त्यानुसार कोणती कारवाई केली जाणार आहे अशी विचारणा समितीने केली असता, संबंधित कागदपत्रातील पुराव्यांचा छाननी करण्याचे काम सुरू केलेले आहे. त्यासाठी एका चमूची नियुक्ती केलेली आहे. कंपनीने करारनाम्यातील कोणकोणत्या शर्तीचा भंग केला आणि ऑफिसेसकडून कोणत्या त्रुटी झालेल्या आहे, याबाबतची माहिती गोळा केलेली आहे. कंपनीवरील कारवाई भाग पूर्ण केलेला आहे. सद्यःस्थितीत त्रुटी तपासण्याचे काम सुरू आहे. नस्तीची संख्या लक्षणीय असल्यामुळे वेळ लागत आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

या प्रकरणी समितीला १५ दिवसाच्या आत सर्व इत्यंभूत माहिती सादर करावी.या प्रकरणी विभाग कोणती कारवाई करणार आहे. चौकशी समितीमध्ये कोण-कोणत्या अधिकाऱ्यांचा समावेश होता ? सदरहू प्रकरणी किती दिवसांमध्ये कारवाई केली जाणारर आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, सामान्य प्रशासन विभागाची समिती होती. समितीने पिनपॉईंट लोकांची नावे सांगितलेली नाही. समितीने चौकशी केली होती. समितीने पिनपॉईंट जबाबदारी निश्चित केली असती तर विभागासाठी ते चांगले झाले असते.असे विभागीय सचिवांनी सांगितले आहे.

समितीने विभागाला संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत सांगितले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी अटी व शर्तीचा भंग केलेला आहे. विभागाने पुरवठादाराच्या विरोधात कारवाई केली असे सांगितले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी खरेदीमध्ये कंत्राटातील अटी व शर्तीचा भंग केल्यानंतर देखील ९० टक्के पेमेंट अदा केलेले आहे. त्यामुळे जबाबदार असणाऱ्या अशा संबंधित अधिकाऱ्यांवर पुढील १५ दिवसाच्या आत कडक कारवाई केल्यानंतर त्यासंदर्भातील माहिती समितीला देण्यात यावी. समितीने विभागाला दिलेल्या निर्देशाचे पालन करावे अशी सूचना समितीने केली असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

परिच्छेद क्रमांक २.२.४.८—निष्क्रीय बायोमेट्रिक हजेरी प्रणाली—

या परिच्छेदाबाबत माहिती देताना हा चौकशी अहवाल बायोमेट्रिक व सोलर वॉटर हिटर या दोन्हीबाबतचा होता. समितीने ज्या दोन कंपन्यांची चर्चा केली ती सोलर वॉटर हिटरबाबत होती. बायोमेट्रिकबाबत जी तिसरी एस ब्रेन नावाची कंपनी आहे, त्या कंपनीला ब्लॅकलिस्ट करण्यात यावे व त्यांची रक्कम फोरफिट करण्यात यावी, अशी सूचना चौकशी समितीने केलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

८ कोटी ३८ लक्ष रुपये ज्यांनी दिले. आता विभाग ब्लॅकलिस्ट करणार, फोरफिट करणार परंतु, ८ कोटी ३८ लक्ष रुपये देण्याच्या अगोदर विभागाचीअट काय होती, आदिवासीविकासविभागाने त्याच्याकडून काय काय करून घेतले पाहिजे होते, ते आदिवासीविकासविभागाने करून घेतले होते काय, हा मूळ विषय आहे. कारण हाच विषय समाजकल्याण विभागाबरोबरच्या चर्चेमध्ये उपस्थित झाला होता. आदिवासीविकासविभागाने ८ कोटी ३८ लक्ष रुपये देण्याच्या आधी या कंत्राटाची जी प्राथमिकअट होती, ती विभागाने पार पाडली काय ? विभागाने जर ती पार पाडली असती तर ही अडचण आलीच नसती. त्यांचे पूर्ण कार्यान्वय करून घेण्याची विभागाची जबाबदारी होती, विभागानेती पार पाडली नाही. मशिन आली की, लगेच पैसे द्यायचे कारण लगेच पैसे दिले तर बाकीचा व्यवहार होईल व विषय संपेल असे दिसते.यामध्ये विभागाकडूनराज्यातील सर्व कंपन्यांना ब्लॅकलिस्ट करून टाकण्यातयेईल. त्यांना पैसे देणे तर विभागाच्या हातात आहे मग विभागाने त्यांना पैसे का दिले ? कंत्राटदार कोणताही असो ज्यावेळेस कोणत्याही गोष्टींच्या अटीवशर्ती पूर्ण होत नाहीत, त्यावेळेस विभागाकडूनपैसेकामेदिलेजातात?

विभागाने ९० टक्के पैसे दिले हे सर्व झाले त्या काळात एकच आयुक्त होते.विभागाचा हेतू होता की, साहित्य घेणे आणि ठेवून देणे आणि पैसे काढणे करारामध्ये काय नमूद केले आहे, त्यांच्याकडून काय करून घेतल्यानंतर ९० टक्के पैसे रिलिज करावयाचे आहेत ? त्या करारामधील शर्ती पूर्ण झाल्या होत्या काय ? अशी विचारणा समितीने केली असता, करारामधील शर्ती पूर्ण झाली नव्हती असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

मग पैसे कसे दिले, ज्या व्यक्तीने ते दिले त्यांना विभागाने बडतर्फ केले काय ? शासनाने त्या कंपनीबरोबर जो करार केला, त्या कराराची पूर्तता केल्याशिवाय ९० टक्के पैसे देताच येत नाहीत, तरी ९० टक्के पैसे विभागाने देऊन टाकले. १० टक्के रक्कम फोरफिट करणार असे आता विभागाने सांगितले आहे म्हणजे विभाग ८०-९० लाख रुपये फोरफिट करणार आहे. परंतु, समितीला ८ कोटी ३८ लाख रुपयांची काळजी आहे. कारण बायोमेट्रिक प्रणाली हे सर्व भंगाराचे डबे आहेत.माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, आदिवासी आयुक्त नाशिक यांनी पुरवठा आदेशाच्या अटी व शर्ती विरुद्ध जाऊन मार्च, २०१५ पर्यंत एजन्सीला रुपये ८.३८ कोटींची (जवळजवळ ९० टक्के) अदायगी केली. यामध्ये त्यांनी आयुक्तांचे नाव घेतले आहे. विभागाने त्यांच्यावर कारवाई का केली नाही ? तेव्हाही तेच आयुक्त होते काय, समितीला त्यांची माहिती असली पाहिजे. अशा महत्त्वाच्या विषयाकरिता सचिव पाहिजे. समिती एवढया सूचना करीत आहोत. हे सर्व अधिकार आयुक्तांना आहेत काय ? राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांना मानवंदना, प्रमाणपत्र मिळत आहे. त्यामुळे सचिव आजच्या बैठकीला येऊ शकले नाहीत. त्यांनी पत्र पाठविले आहे की, पूर्ण तयारी करून यांना पाठवत आहे. यामुळे आता त्यांनी समितीसमोर उत्तर द्यावे अशी आमची अपेक्षा आहे. या विषयासंदर्भात समितीच्या भावना तीव्र आहेत असे समितीने नमूद केले असता, करारातील अटी व शर्ती पूर्ण न करता पुरवठादाराने अनियमितता केली. असे असताना पेमेंट झाल्याचे दिसते. ही संपूर्ण कार्यवाही आयुक्त स्तरावर झालेली आहे. कराराचे उल्लंघन आयुक्तांकडून झाले होते. महालेखापालांनी सन २०१४-१५ मधील हा विषय विभागाच्या लक्षात आणून दिला. दोषी अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई प्रस्तावित केलेली नाही, याचे कारण काय आहे ? आयुक्तांना एवढी रक्कम खर्च करण्याची अनुमती होती काय ? त्यांना ५० लाख रुपयांपर्यंतचे अधिकार असतील असे समितीने निदर्शनास आणले असता, सन २०१३ पर्यंत अधिकार होते. दि. १५ सप्टेंबर २०१३ नंतर ५० लाख रुपयांपर्यंतचे अधिकार आयुक्तांना आले. त्या आधी पूर्ण अधिकार होते असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

समितीच्या माहितीनुसार आयुक्तांना अधिकार नव्हते. कराराचा भंग झाल्यानंतर ९० टक्के रक्कम दिलेली आहे. ही गोष्ट सचिवांच्या लक्षात आली नसेल मात्र महालेखापालांनी ही बाब लक्षात आणून दिलेली असून या बाबत तत्कालीन सचिवांनी सांगितले की, " The Government accepted the facts and stated that inquiry in the matter is under process and appropriate action will be taken after submission of inquiry report." असे मुद्दा समितीने उपस्थित केला असता, चौकशी रिपोर्ट सादर झालेला आहे.

त्या चौकशी अहवालामध्ये आयुक्तांवर ठपका ठेवण्यातआलेला आहेअसे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. या कारवाई बाबत सदनात चर्चा होणार आहे. महालेखापालांच्या अहवालामध्ये ८ कोटी ३८ लाख रुपयांची अदायगी केली.चौकशी समितीमध्ये सर्व माहिती आलेली आहे. महालेखापालांनी दिलेला अहवाल सादर होतो, महालेखापालांची कॉन्फरन्स होते. तरी देखील त्यामध्ये आयुक्तांनी केलेल्या गोंधळाचा उल्लेख

सचिव करीत नाही. हे त्यांना प्रशासकीय मार्ग दाखवल्यासारखे आहेअसे मत समितीने व्यक्त केले असता, महालेखाकारांना उत्तर दिलेले आहे. यामध्ये चौकशी समितीचा उल्लेख केलेला आहे. जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई करावी असे नमूद केलेले आहेअसे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

नियतकालिक अहवाल निर्मित करता येऊ शकले नाही व शिखर स्तरावर यांचे संनियंत्रण करता येऊ शकले नाही या अपर्याप्तता असल्यावरही आदिवासी आयुक्त नाशिक यांनी पुरवठा आदेशांच्या अटी व शर्ती विरुद्ध जाऊन मार्च, २०१५ पर्यंत एजन्सीस रु. ८.३८ कोटी रुपयांची अदायगी केली. यामुळे ८.३८ कोटींचा खर्च निष्फळ ठरला. याचे उत्तर विभागाने दिलेले नाही. विभागाने असे नमूद केले आहे की, बायोमॅट्रीक मशीन्सच्या पुरवठ्यापोटी एकूण देयक रक्कम रु. ९,३३,७८,५०० पैकी वेळोवेळी त्यांनी ८.३८ कोटी रुपये अदा करण्यात आले असूनन उर्वरित रक्कम रु. ९४,९३,४११ शिल्लक आहे. याचाच अर्थ महालेखापालांचे म्हणणे खरे आहे. मात्र याचा कोठेही उल्लेख केलेला नाही. हे विभाग एकमेकांना वाचवत आहे काय? अशी शंका समितीने उपस्थित केली असता, चौकशीमध्ये हे सर्व मुद्दे समोर आलेले आहेत. महालेखापालाच्या परिच्छेदामध्ये जे उत्तर दिलेले आहे त्यातच चौकशी समितीचा देखील उल्लेख केलेला आहे. त्यात जबाबदार असलेल्यांवर कारवाई करावी असे नमूद केलेले आहेअसे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आयुक्तांनी अटी व शर्तींचा भंग करून रकमेची अदायगी केली याचा महालेखापालांनीउल्लेख केलेला आहे. या बाबत विभागाने काही तरी उल्लेख करावयास हवा होता. हे खरे आहे, आयुक्तांनी असे करावयास नको होते इ.चौकशी अहवाल आल्यानंतर कारवाई करू असे शेवटी नमूद केलेले आहे. महालेखापालांचा आक्षेप स्पष्टपणे आहेत. कराराचे पालन झाले नाही. ९० टक्के रक्कम देण्यात आली. तरी देखील चौकशी समितीकडे प्रकरण देऊन ४ वर्षे विभागाने काहीच केले नाही. आता लोकलेखासमितीचीबैठक लागली म्हणून तो अहवाल आलेला आहे.दि. १६.४.२०१४ रोजी चौकशी समितीची स्थापना झाली. त्या नंतरर देखील आयुक्तांनी मार्च, २०१५ पर्यंत प्रदान केले.

सन २०१४ मध्ये समितीची स्थापना झाली. त्या नंतर शेवटचे पेमेंट कधी केले ? मार्च २०१५ ला शेवटचे पेमेंट केल्याची या ठिकाणी नोंद आहे. चौकशी समिती सुरू असताना पेमेंट कसे काय करता येते ? अशी विचारणा समितीने केली असता, महालेखापालांच्या परिच्छेदामध्ये स्पष्ट उल्लेख आहे. चौकशी अहवालात देखील स्पष्ट उल्लेख केलेला आहे. सचिव या नात्याने सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार संबंधित दोषींवर कारवाई केली जाईल असे विभागीय प्रतिनिधींनी आश्वस्त केले.

करारामधील अटींचा भंग झाला, ९० टक्के रक्कम रिलीज करण्यात आली. तसेच सन २०१४ मध्ये समित्या तयार केल्या नंतर देखील प्रदानकेले गेले. हे सर्व उल्लंघनआहे. या संदर्भात अहवाल आल्यानंतर ऑगस्ट महिन्यात विभागानेगंभीर दखल घ्यावयास हवी होती. समिती समोर येण्यापूर्वी आपण काही तरी कारवाई करून यायला हवे होते. येथे एक-एक तासस त्यावर चर्चा होते. हा विषय उपस्थित नसता झाला तर सर्व सुटून गेले असतेअसे मत समितीने व्यक्त केले असता, आदिवासी विकास विभाग या बाबत गंभीर आहेअसे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

हा परिच्छेद प्रलंबित ठेवण्यात येत आहे. समिती विभागाला पुढील आठवड्यात कधीही बोलावू शकते. कारवाई करूनच आपण समितीच्या समोर यावे. आयुक्त जेव्हा पेमेंट करीत होते तेव्हा तत्कालीन सचिवांना ते माहीत होते. या बाबत जीएडीने चौकशी लावलेली आहे असे माहीत असताना त्यांनीदेखील काहीच सांगितले नाही. खरे तर त्यांनी थांबवायला हवे होते. चौकशी सुरू असताना आयुक्त पेमेंट करीत होते. अशा वेळी आदिवासी विकास विभागाच्या सचिवांची देखील जबबादारी आहे. जोपर्यंत चौकशी होत नाही तोपर्यंत पेमेंट करू नका असे लिहायला हवे होते.सध्या विभागाचे हार्डवेअर सुस्थितीत आहे काय ? ते कार्यान्वित करता येईल काय ? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने दीड वर्षापूर्वी याबाबत एक सर्व्हे घेतला होता व आता देखील द्वघेतला आहे. काही ठिकाणी किरकोळ कारणामुळे म्हणजे बॅटरी नाही किंवा डिस्प्ले गेला आहे अशा कारणांमुळे यंत्र बंद आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

अमुक दिवसात ते यंत्र कार्यान्वित होईल असे समितीला सांगणे शक्य आहे काय, त्या बाबत आयुक्त म्हणून आश्वासन देणे शक्य आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, विभागाने या बाबत कार्यवाही सुरू केली असून पुढील ४ महिन्यात ती पूर्ण होईल. कोणते यंत्र कोणत्या कारणामुळे बंद आहेत याचे वर्गीकरण केले आहे. किरकोळ दुरूस्ती असल्यास स्थानिक पातळीवर यंत्र दुरुस्त करून कार्यान्वित करणार आहे. मोठ्या दुरूस्तीकरिता एटीसी पातळीवर सर्व्हिस प्रोव्हायडर बघावा लागेल. त्यामध्ये आयटीचा देखील मुद्दा येतो. मंत्रालयात सेंट्रल सर्व्हर कॉन्फिगर करून करावे लागेल. या करिता आयटी विभागाला या पूर्वीच पत्र लिहिलेले आहे. सध्याच्या हार्डवेअरचा कसा उपयोग करता येईल याचा अहवाल मागवला आहे. पुढील ४ महिन्यात निश्चित कार्यवाही होणार आहे.चौकशी अहवालात एकूण ६ शिफारशी केलेल्या आहेत. (१) बंद असलेली सौर तापके त्वरित दुरुस्त करून सुरू करावीत. (२) सौर तापके यांचे संरक्षण व दुरूस्ती न करण्यास जबाबदार असलेल्यांवर जबाबदारी निश्चित करावी व त्यांचे कडून दुरूस्तीचा खर्च वसूल करता येईल का हे तपासावे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

कोणावर जबाबदारी निश्चित करावी ? ही रक्कम कोणाकडून वसूल करावी ? अशी विचारणा समितीने केली असता, ही शिफारस विभागाबद्दल केलेली आहे. एजन्सीबद्दल पुढील शिफारस आहे. यामध्ये दोन प्रकार आहेत.ज्या ठिकाणी यंत्र सुरू न होण्यामध्ये पुरवठादार जबाबदार आहे तेथे त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी. दुसरा प्रकार असा आहे की, बायोमेट्रीक यंत्र त्यांनी सुरू केले मात्र ते पुढे सुरू राहिले नाही. त्याचे देखभाल दुरूस्ती झाले नाही. या संदर्भात हमी कालावधीत एजन्सी जबाबदार व नंतरच्या काळात त्याचे संरक्षण न करणारे जे अधिकारी, कर्मचारी आहेत त्यांना देखील जबाबदार धरावे, अशी शिफारस आहे. दुरूस्तीचा खर्च अधिकारी, कर्मचाऱ्यांकडून वसूल करावा अशी शिफारस आहे. किती खर्च येणार आहे हे काढण्यास आता विभागाने सुरुवात केली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या पगारातून जोपर्यंत ३/४ रक्कम वसूल होत नाही तोपर्यंत ते सुधारणार नाहीत. अधिकाऱ्याचे नाव, आलेला खर्च व किती दिवसात रक्कम वसूल केली जाणार आहे याची देखील माहिती द्यावी असे समितीने सूचित केले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली. याबाबत काही ठिकाणी जास्त दुरूस्ती आहे. त्या बाबत काळजी घ्यायची आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

या शिफारशीची कॉपी समितीला उपलब्ध करून द्यावी असे समितीने सूचित केले असता, विभागीय प्रतिनिधींनी ते मान्य केले व (३) बायोमॅट्रीक प्रणालीसंदर्भात प्रकल्प अंमलबजावणीची स्थापना न करणे व उच्चस्तरीय समितीची मान्यता आवश्यक होती तसेच मंत्रालयात सेंट्रल सर्व्हर स्थापित न करण्याबाबत जबाबदारी निश्चित करावी. या संदर्भात आयटी विभागाकडे अभिप्रायासाठी पाठवले आहे. त्यांच्याकडून अभिप्राय आल्यानंतर कार्यवाही करता येईल असे समितीस अवगत केले.

या करिता किती कालावधी लागेल ? ते पुन्हा मॅनेज करतील त्यात वेळ जाईल. नंतर निवडणुका येतील असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबत आय.टी. विभागाशी समन्वय करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगून (४) सदर प्रकल्पांच्या अंमलबजावणीबाबत योग्य ती खबरदारी न घेतल्याबाबत व निधी वितरण केल्याबाबत, जबाबदारी निश्चित करण्यात यावी. आयुक्त स्तरापासून खालपर्यंत सनियंत्रणचा संबंध आला त्याचा आढावा घेतला जात आहे अशी माहिती दिली.

सनियंत्रणामध्ये तत्कालीन सचिवांचा देखील समावेश होईल. सन २०१४ मध्ये चौकशी समिती सुरू झाली असे मत समितीने व्यक्त केले असता, (५) सदर प्रकल्पांच्या वेळोवेळी सुयोग्य व सनियंत्रणाचा अभाव अंमलबजावणीबाबत योग्य ती खबरदारी न घेतल्याबाबत निधी वितरण व जबाबदारी निश्चित करण्यात यावी.

(६) सोलार वॉटर हिटर बसविण्याआधी टेक्निकल फिजिबिलीटी न तपासणे व सोलार वॉटर हिटर आणि बायोमेट्रीक करारनाम्यानुसार देखभाल दुरूस्ती न करणेबाबतत संबंधित पुरवठादारावर कार्यवाही करून त्यांना काळ्या यादीत टाकण्यात यावे, अशा शिफारशी समितीने केल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

एप्रिल, २०१४ ते मार्च, २०१५ या कालावधीत किती पेमेंट करण्यात आले ? बायोमेट्रीक यंत्रणा लागू झाली तर किती विद्यार्थी आश्रमशाळेत येतात हे लक्षात येईल. हे होऊ नये या करिता ही संपूर्ण यंत्रणा बंद करण्याचे हे षढयंत्र आहे. बायोमेट्रीक यंत्रणा संपूर्ण राज्यात सर्व आश्रम शाळांमध्ये जेथे अनुदान दिले जाते तेथे किती दिवसांच्या आत १०० टक्के लावली जाणार आहे ? सध्या एफडीएने सर्व दुकानांमध्ये ही यंत्रणा सुरू केलेली आहे. महिन्यात करण्यात यावे असे समितीने सूचित केले असता, ४ महिने सांगितले होते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

पुढच्या साक्षीच्या बैठकीला डीजी एसीबी व आयटी विभागाच्या सचिवांना बोलविण्यात यावे. समितीने जी शंका उपस्थित केली ती बरोबर आहे. कोणत्याही शब्दाचे इंटरपिटिशन सोईचे करू नये. जे योग्य आहे तेच करण्यात यावे. सनियंत्रणाखाली सर्व लोक येतात, त्याखाली सर्व लोक आलेच पाहिजेत. सर्वांना जबाबदार धरायलाच पाहिजे. या दृष्टीकोनातून भूमिका घेण्यात यावी. हे सर्व कामकाज मागील कालखंडातील आहे. कारवाई न केल्यामुळे विभागदेखील त्यासाठी दोषी ठरत आहात. ही बाब लक्षात ठेवावी. असे मत समितीने व्यक्त केले.

परिच्छेद क्रमांक २.२.५—आदिवासी विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक आणि शिष्यवृत्ती योजना—

परिच्छेदामध्ये अनेक विद्यार्थ्यांचे अकाऊंट नंबर न मिळाल्याच्या कारणास्तव तो निधी शासनाकडे जमा केला असे शेवटी उत्तरात नमूद केले आहे. शासनाकडे निधी जमा करण्यामध्ये समितीला इंटरेस्ट नाही. Ultimately, the tribal should not be deprived from their rights in getting scholarships. ते विभागाच्या व्यवस्थेमुळे झालेले आहे. त्यांचे अकाऊंट नंबर न मिळाल्यामुळे हा निधी त्यांना देता आलेला नाही. शिष्यवृत्ती योजनेचे योग्य वाटप झाले नाही. अशा दोन योजना आदिवासी विकास विभागाच्या आहेत असे समितीने निदर्शनास आणले असता, शासनाकडे निधी समर्पित केला जातो त्यामागे दोन तीन कारणे असतात. समिती म्हणाली ते एक कारण आहे. शासनाकडे मागणी करतांना पटसंख्येनुसार मागणी करण्यात येते. शिष्यवृत्ती रकमेचे वाटप जिल्हा परिषदांच्या शाळांमार्फत मुलांच्या उपस्थितीनुसार करण्यात येते. प्रत्यक्ष जेवढी मागणी आहे त्यापेक्षा कमी रकमेचे वाटप होते. म्हणून उर्वरित रक्कम समर्पित करावी लागते. हे एक कारण आहे. दुसरे कारण काही मुलांचे अकाऊंट नंबर नाहीत. तिसरे कारण असे आहे की, संबंधित विद्यार्थी शाळा सोडून गेले, रक्कम पोहचण्यास उशीर झाला. प्रोजेक्ट ऑफिसर व

मुख्याधिकारी यांच्या स्तरावर निधी पोहचविण्याचे प्रयत्न केले जात असतात. असे करूनही विद्यार्थी लोकेट होत नाही अशा पण काही प्रकरणे आहेत. अशा दोन तीन कारणांमुळे रक्कम समर्पित करावी लागते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

या अहवालात एक आक्षेप नमूद केला आहे की, त्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या नामांकित शाळेत टाकले. त्यांच्यासाठी वेगळे वर्ग काढण्यात आले. मग त्याचा काय उपयोग आहे. विभागाचा असा उद्देश होतो की, हे विद्यार्थी चांगल्या वातावरणात तयार झाले पाहिजेत. ते सर्व मिळून मिसळून राहिले पाहिजेत. तेथे त्या मुलांना वेगळी वागणूक देत असाल तर या मागील उद्देश काय आहे, त्यांचा वर्ग वेगळा का भरविण्यात येतो. काहींची फी स्टॅण्डर्डपेक्षा जास्त भरली. त्यांचे अकाऊंट वेगळे न ठेवल्यामुळे किती खर्च झाला याचा ताळमेळ लावता येत नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. दिलेल्या पैशांचे अकाऊंट ठेवायचे नाही, किती विद्यार्थी आहेत त्यांची फी किती भरली त्याचा उद्देश सफल झाला काय ? याबाबत कोणताही हिशोब ठेवण्यात आलेला नसेल ही बाब गंभीर आहे. ३२७ विद्यार्थ्यांचे स्टॅण्डर्डपेक्षा जास्त पैसे भरण्यात आले आहेत. रेग्युलर फी पेक्षा जास्त पैसे भरण्यात आले आहेत. शाळेच्या रेग्युलर फी पेक्षा जास्त पैसा त्या शाळांना शासन देते. मुले खरोखर इंग्रजी शिकली काय हा प्रश्न वेगळाच आहे. त्यांचा परफार्मन्स टेस्ट केला काय, आता शासन सर्वांना पास करते. त्यामुळे परफार्मन्स टेस्ट होत नाही. या मुलांवर १२६ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत ती मुले इंग्रजी शिकले आहेत काय ? पहिला मुद्दा स्वतंत्र लेखे ठेवण्याबाबतचा आहे. याबाबत विभागाने पूर्णपणे खात्री केलेली आहे. शाळांकडून सर्टिफिकेटस् घेतले आहेत. स्वतंत्र लेखे ठेवल्याबाबत तपासणी केलेली आहे. या मुद्यांची पूर्तता झालेली आहे. आता प्रत्येक शाळेत स्वतंत्र लेखे ठेवले जातात. त्याची खात्री क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून करून घेतली आहे. दुसरा मुद्दा फी बाबतचा आहे. २०१५-१६ पासून नामांकित शाळेची योजना सुरू आहे. यामध्ये फिक्स रक्कम आहे. शाळेच्या फी सोबत त्याची सांगड घातलेली नाही. गुणांकणानुसार ५०,६० व ७० हजार अशी रक्कम प्रति विद्यार्थी दिली जाते. शाळेच्या फी सोबत त्याची सांगड घातलेली नाही. तिसरा मुद्दा असा आहे की, वेगळे वर्ग बसविले जातात. अशा प्रकारची तक्रार दोन ठिकाणावरून विभागाकडे आल्याबरोबर त्याची गंभीर दखल घेतली आहे. मुख्य उद्देश असा होता की, इंग्रजी शाळांमधील इतर मुलांबरोबर आदिवासी मुलांनी मिळून मिसळून शिक्षण घ्यावे. तो उद्देश साध्य होत नसेल तर त्या योजनेची विभागाला गरज नाही. त्यामुळे हा मुद्दा विभागाने खूप सिरिअस घेतला आहे. तेथे ही सर्व काळजी घेतली तेथील दोन मुद्दे लक्षात आले ते असे की, काही वेळा ॲडमिशनला उशिर झाला म्हणून किंवा इतर काही कारणांमुळे रेमिडिएल टिचिंगसाठी शाळा सुटल्यानंतर या विद्यार्थ्यांचा एक क्लास घेतल्याचे आढळले आहे. शाळेच्या वर्गात ते एकत्र बसतात फक्त रेमिडिएल टिचिंगसाठी स्वतंत्रपणे क्लास घेतल्याचे आढळून आले आहे. या व्यतिरिक्त जेव्हा अशी तक्रार येते किंवा विभागाच्या प्रतिनिधीच्या कानावर अशा बाबी येतात तेव्हा ती बाब गांभीर्याने घेण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महालेखापाल यांना असा प्रकार दोन ठिकाणी आढळून आलेला आहे. महालेखापाल यांनी स्पष्ट उल्लेख केला की, दोन शाळांमध्ये आदिवासी मुलांसाठी वेगळे वर्ग घेतले जात होते ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, यामध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

यामध्ये विभागाने आता सुधारणा केली तरी आदिवासी मुलांचे पैसे त्यांना देण्यात आले. ही समिती महालेखापाल यांच्या मुद्दयांवर चर्चा करण्यासाठी आहे. विभागाने भविष्यात सुधारणा केली त्याबाबत समिती विभागाचे अभिनंदन करते. परंतु दोन वर्ग वेगळे भरविले तर त्यांना पैसा कसा काय देण्यात आला आहे. अटी व शर्तीचा भंग केलेला आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, नागपूर विभागातील या दोन शाळा आहेत, ऊर्सुदा सेकंडरी स्कूल ही मुलींची शाळा आहे, दुसरी शाळा आदर्श संस्कार विद्यालय आहे. या दोन शाळांमध्ये हा प्रकार निदर्शनास आला होता. या शाळांना विभागाच्या तेथील ज्या अधिकाऱ्यांनी भेट दिली त्यांची नावे प्रकल्प अधिकाऱ्यांकडून घेण्यात येतील. त्यांच्या भेटीच्या वेळी ज्या बाबी लक्षात आल्या त्यानुसार कारवाई सुरू आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

लोकलेखा समिती साक्ष घेते त्यावेळी सर्व तयारीनिशी कारवाई करून समितीसमोर आले पाहिजे. संबंधित अधिकाऱ्यांनी सन्माननीय सदस्यांना सविस्तर उत्तर द्यावे असे समितीने सूचित केले असता, या मध्ये सुधारणा करण्यात आला आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

सुधारणा करण्याचा हा विषय नाही, महालेखापाल यांनी ही बाब लक्षात आणली तेव्हा त्या शाळेने वेगळे वर्ग भरविले होते, आदिवासी विकास विभागाचे अधिकारी त्यावेळी काय करीत होते. आज विभागाने सुधारणा केली परंतु त्या दिवशी त्या मुलांचे जे नुकसान झाले किंवा तेथे ज्या गोष्टी घडल्या त्याबाबत काय करणार समिती भविष्यासाठी नाही. भविष्यासाठी करता ते बरोबर आहे.आता विभागाने दुरूस्ती केली असेल परंतु त्यावेळी नियमानुसार जे करायला पाहिजे होते ते केले नाही म्हणून संबंधित अधिकाऱ्यांवर का कारवाई करण्यात आली नाही. चार वर्षानंतर विभागाने करेक्शन केले परंतु त्या वेळच्या विद्यार्थ्यांचे नुकसान झाले आहे. त्यासाठी कोण जबाबदार आहे. तो अधिकारी आता तेथून निघून गेला आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, त्यावेळी ज्या अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या त्यांची माहिती अपर आयुक्तांनी गोळा केली आहे त्या सर्व अधिकाऱ्यांवर कारवाई सुरू करण्यात येत आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

संबंधित अधिकाऱ्यांवर काय कारवाई केली ही बाब समितीला एक महिन्यात कळविण्यात यावी. १६ नामांकित शाळांची नावे समितीला देण्यात यावी असे समितीने सूचित केले.

विभाग उत्पन्नाचा दाखला घेत नाही. जातीचा दाखला घेत नाही. कोणी म्हटले की, टीएसपीचा मुलगा आहे तर त्याला आदिवासी म्हणून प्रवेश दिला जातो. उत्पन्नाचा व जातीचा दाखला घेतला पाहिजे. आदिवासी आहे किंवा नाही त्याबाबत तपासणी केली जात नाही. शहरी किंवा ग्रामीण भागातील आदिवासी असतील तरी त्यांच्या उत्पन्नाचे प्रमाणपत्र व जातीच्या प्रमाणपत्राची तपासणी न करता त्यांचे पेमेंट कसे करण्यात आले आहे. नागपूर येथे अनेक आदिवासी अधिकारी मोठ्या पदावर आहेत, त्यांची मुले यामध्ये घुसविण्यात आली आहेत काय ? ही योजना बीपीएल आदिवासी यांच्यासाठी आहे. नागपूर येथे अनेक आदिवासी अधिकारी चांगल्या पदावर काम करीत आहेत. त्यांच्या मुलांना नॉर्मलकोर्समध्ये त्या शाळांमध्ये ॲडमिशन मिळत नाही. त्यामुळे ते लोक कोण होते याची माहिती घेण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, महालेखापाल यांच्या परिच्छेदामध्ये ज्या अर्जांचा उल्लेख आहे त्यानुसार ६३ अर्ज जाती प्रमाणपत्राशिवाय व ५४ अर्ज उत्पन्न प्रमाणपत्राशिवाय स्वीकृत केले. या सर्व अर्जदारांचा व प्रकरणांचा शोध लावला त्यासंदर्भात आताची परिस्थिती अशी आहे की, ७ प्रकरणे वगळता सर्व प्रकरणांमध्ये उत्पन्न व जातीचे प्रमाणपत्र प्राप्त आहेत अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली. सद्य:स्थितीत ७ प्रकरणांमध्ये उत्पन्न व जातीचे प्रमाणपत्र नाही. सन २०१० ते २०१५ दरम्यान जे आढळून आले त्या प्रकरणांची माहिती देण्यात यावी असे समितीने सूचित केले असता, सन २०१० ते २०१५ या दरम्यानच्या प्रकरणांचीच माहिती देण्यात येत आहे. ६३ व ५४ या तेव्हाच्या केसेस होत्या. त्यांचा शोध घेऊन त्यांचे उत्पन्न व जाती प्रमाणपत्रांचा शोध घेतला आहे. फक्त ७ प्रकरणांमध्ये उत्पन्न व जातीचे प्रमाणपत्र नसल्याचे आढळून आले आहे. इतर प्रकरणांमध्ये उत्पन्न व जातीचे प्रमाणपत्र त्या वर्षाचे उपलब्ध असल्याचे आढळून आले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

याचा अर्थ आज रोजी चार वर्षांनंतर ७ लोकांचे प्रमाणपत्र विभागाला आढळत नाही. त्यांचे पैसे दिले आहेत. नियम असा आहे की, प्रमाणपत्राशिवाय निधी वितरण करू नये. ७ प्रकरणांमध्ये दिलेल्या पैशांची जबाबदारी कोणाची आहे अशी विचारणा समितीने केली असता, सर्व प्रकरणांची तपासणी केली. फक्त ७ प्रकरणात जात व उत्पन्न प्रमाणपत्र आढळले नाही. याबाबत एटीसी, ठाणे कार्यवाही करीत आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

७ प्रकरणांमध्ये ज्या अधिकाऱ्यांनी निधी वाटप केला त्यांच्याकडून तो वसूल करण्यात यावा. प्रकल्प अधिकारी, नाशिक यांनी शिष्यवृत्तीचे वाटप केले आहे. त्यामध्ये सन २०१३-१४ मध्ये मंजूर तरतूद २३१६.६६ कोटी रुपये व वितरित तरतूद २२०१.८३ कोटी रुपये दर्शविण्यात आली आहे ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, यामध्ये जी रक्कम वाटप केली ती दर्शविण्यात आली असून शिल्लक रक्कम चलनाद्वारे शासनाकडे परत भरण्यात आली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

२३१६ कोटी रुपये मंजूर आहेत. २२०१ कोटी रुपयांचे वाटप केले आहे याकडे समितीने लक्ष वेधले असता, या फरकाबाबत मी मघाशी सांगितल्याप्रमाणे पटसंख्येनुसार विभागाकडून तरतूद करण्यात येते. प्रत्यक्ष शिष्यवृत्तीचे वाटप उपस्थितीनुसार होते. त्यामुळे ही तफावत येत असते असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

It is not a regular practice. जर २०११-२०१२ पासून बघितले तर निदर्शनास येईल की, जितकी तरतूद केली तेवढी वितरित केली आहे. सन २०१३-१४ मध्ये असे काय घडले. If it is a regular practice committee I can consider your reply असे समितीने सूचित केले असता, प्रकल्प अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन समितीला सादर करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

त्याचप्रमाणे सन २०१३-१४ मध्ये जिल्हा परिषद शाळा ज्योती माध्यमिक विद्यालय पिंपळगांव बहुला या शाळेत वाटप केलेली अतिरिक्त रक्कम चलनाने खालील प्रमाणे भरण्यात आली आहे. सन २०१३-१४ मध्ये वितरित शिष्यवृत्ती १,८७,५००/- रुपये. वाटप शिष्यवृत्ती १७०५० व चलनाने जमा केली १७,४५० रुपये असे नमूद केले आहे. ही बाब समितीने निदर्शनास आणली असता अशी आकडेवारी आहे की, १,८७,५०० रुपये मंजूर तरतूद होती. वाटप शिष्यवृत्ती १,७०,०५० रुपये चलनाने जमा केली १७४५० रुपये यामध्ये टायपिंक मिस्टेक झाली आहे, सन २०१३-१४ मध्ये वाटप शिष्यवृत्तीची रक्कम १,७०,०५० अशी पाहिजे ती चूक दुरुस्त करू घेतो घेण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.त्यास समितीने सहमती दर्शविली व चूक दुरुस्त करून घ्यावी. मागील ५ ते १० वर्षात आदिवासी विभागाच्या माध्यमातून ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली आहे. त्यासंदर्भातील माहिती आयुक्त किंवा विभागाच्या संकेतस्थळावर टाकण्यात यावी. त्यामुळे ती सर्वांना पाहता येईल असे समितीने सूचित केले असता, विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली. सन २०१०-११ पासून झालेला खर्च व लाभार्थींची संख्या दिलेली आहे.

परिच्छेद क्रमांक २.६.१—शिक्षक कक्षामधील प्रमुख पदे न भरणे—

सदर परिच्छेदाबाबत ८४९ पैकी ४४५ पदे भरण्यात आली आहेत. १०२ पदे चपराशी यांची आहेत. ती न भरण्याबाबत माहिती आहे. बाकीची पदे न भरण्याची काय कारणे आहेत अशी विचारणा समितीने केली असता, या पदाबाबत संवर्गनिहाय माहिती देताना सह आयुक्त शिक्षण व सहाय्यक आयुक्त शिक्षण ही पदे शिक्षण विभागामार्फत भरली जातात. या पदांची मागणी शिक्षण विभागाकडे करण्यात आलेली आहे. सहाय्यक प्रकल्प अधिकारी, शिक्षण या पदाचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. नियम तयार झाले तर या पदाची भरती तातडीने होऊ शकेल. ती प्रक्रिया कशी करावी त्याचे नियोजन केले आहे. कार्यालय अधीक्षक, शिक्षण यांचे एक पद आहे. ते पद भरण्यात येईल. वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी, आदिवासी विकास निरीक्षक व कनिष्ठ विस्तार अधिकारी या तीन संवर्गाचे रिक्रुटमेंट रुल्स अंतिम टप्प्यात आहेत. १५ दिवसात त्यांना मान्यता मिळणे अपेक्षित आहे. भरतीची कार्यवाही सुरू होईल. लिपिक-टंकलेखक पदाची भरती सर्वात मोठी आहे. यासाठी तीन महिन्यांचे वेळापत्रक तयार करण्यात आले आहे. त्या वेळापत्रकानुसार एटीसी पातळीवर कार्यवाही सुरू झाली आहे. डिसेंबर, २०१८ पर्यंत ही भरती पूर्ण होईल. १०२ शिपाई पदाची भरती शासनाच्या धोरणानुसार करण्यात येणार नाही असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

विभागाने आता शिक्षण विभागाला दोन पदे भरण्याचे सांगितले आहे, काही पदांबाबत नियम तयार होत आहेत, पुढील तीन महिन्यात ही सर्व पदे भरण्यात येतील अशी समितीने अपेक्षा केली असता, डिसेंबर, २०१८ पर्यंत या सर्व पदांची भरती करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

परिच्छेद क्र. २.२.६.२— ई-गव्हर्नन्स ॲप्लीकेशन सॉफ्टवेअरचे कमकुवत कार्यान्वयन—

ई-गव्हर्नन्स ॲप्लीकेशन सॉप्टवेअरचे कमकुवत कार्यान्वयन याबाबत माहिती देण्यास समितीने सूचित केले असता, याबाबतीत तीन प्रकारचे सॉप्टवेअर आहेत असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आदिवासी विकास विभागाच्या दोन योजना आहेत. त्यापैकी सुवर्ण महोत्सवी ट्रायबल प्री-सेकंडरी स्कॉलरशिप या योजनेमध्ये जव्हार आणि नंदुरबारमध्ये पैसे शिल्लक आहेत असा महालेखापालांचा आक्षेप आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, या शिष्यवृत्तीचे वाटप जिल्हा परिषदेमार्फत होते. विभागाने पूर्वीच जिल्हा परिषदेकडे सदर योजना हस्तांतरित केली आहे. परंतु जेव्हा हा परिच्छेद तयार झाला तेव्हा या काळात सुद्धा याचे वाटप जिल्हा परिषदेकडून होत होते. जातीचे आणि उत्पन्नाचे प्रमाणपत्र घेऊन मग शिष्यवृत्तीचे वाटप करायचे ही जबाबदारी मुख्याध्यापकाची असायची. त्यामध्ये आदिवासी विकास विभागाने एक शासन निर्णय पण काढला आहे की, मुख्याध्यापकाने केलेली जातीची नोंद गृहीत धरण्यात यावी आणि उत्पन्नाच्या बाबतीत ग्रामपंचायतीने दिलेले उत्पन्नाचे प्रमाणपत्र गृहीत धरण्यात यावे. त्यामुळे या दोन्हीची पडताळणी करून मुख्याध्यापक पात्रता यादी तयार करतात. ती यादी बीईओच्या मार्फत विभागाकडे मान्यतेसाठी येते. त्यामुळे हे निकष पडताळणे ही मुख्याध्यापकाची जबाबदारी आहे. अशा १४६३ केसेस आहेत ज्यामध्ये अशी अनियमितता आढळून आली आहे. महालेखाकारांच्या परिच्छेदामध्ये नमूद आहे. याबद्दल संबंधित मुख्याध्यापकाबद्दल कारवाई करण्याबाबत ग्रामविकास विभागाच्या सचिवांना येत आहे. कारण तो विभाग दुसरा आहे. महालेखाकारांनी हे सन २०१४ मध्ये निदर्शनास कधी आणले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महालेखाकारांना २०१४ मध्ये आक्षेप काढूनही विभाग सन २०१८ मध्ये आपण ग्रामविकास विभागाला याबाबत कळविणार आहे. हे सर्व काम करण्याबाबत विभागीय सचिव कार्यपद्धतीशी समाधानी आहे काय ? सन २०१४ मध्ये महालेखाकारांनी विभागाला सांगितले की, लोकलेखा समितीने याबाबत साक्ष घेतली आणि आता सन २०१८ ला आदिवासी विकास विभाग ग्रामविकास विभागाला कळविणार आहे. यामध्ये समिती काय सांगते याकडे न बघता विभागाने स्वयं मुल्यांकन करावे. लोकलेखा समितीने जर साक्ष लावली नसती तर सन २०२२ पर्यंत हे काम झाले नसते असे मत समितीने व्यक्त केले.

विभागीय प्रतिनिधींनी त्यास सहमती दर्शविली व अनेक त्रुटी दिसतात. अनेक लॅक्युनाज दिसतात आणि ते वेगवेगळ्या पद्धतीने सर्व पैलूंनी भरुन काढणे आवश्यक आहे. असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महालेखापालांचे असे मत आहे की, जव्हार आणि नंदुरबारमध्ये ११ लाख ८ हजार रुपये एका ठिकाणी आणि १ लाख ९७ हजार रुपये एका ठिकाणी अखर्चित राहिले. याच बरोबर विभागाने ६३ आणि ६८ ची संख्या सांगितली पण ज्या १७४६ लोकांची तपासणी महालेखापालांनी केली. त्यापैकी १५८८ अर्जदारांकडे जात प्रमाणपत्र नव्हते आणि १४६३ अर्जदारांकडे उत्पन्नाचे प्रमाणपत्र नव्हते. त्यामुळे त्यांचे महालेखापालांचा आक्षेप असा होता की, शिक्षण आणि शिष्यवृत्तीची योजना आदिवासी मुलांसाठी Funded by the state. आदिवासी विकास विभागाने हे निश्चित करावे की, ती योजना योग्यरित्या राबवली गेली पाहिजे. महालेखापालांनी पुढे असे नमूद केले आहे की, "..Stakeholder and their is no leakage of funds due to lack of oversight mechanism." ८० ते ९० टक्के लोकांची प्रमाणपत्रे नाहीत तर त्यामुळे जास्तीचे पैसे गेले असतील विभागाने पण बघितले की, १० टक्के लोक कसे मिळाले आहेत त्यामुळे जास्तीचे किती लोकांना जास्तीचे पैसे गेले आहेत ? अशी

विचारणा समितीने केली असता, याबद्दल विभागाने मगाशी सांगितल्याप्रमाणे तेव्हाच जातीच्या प्रमाणपत्राची अट शिथिल करण्यात आली होती. कारण मुख्याध्यापकांनी जातीच्या प्रमाणपत्राच्या रकान्यात जी नोंद घेतलेली आहे तो पुरेसा पुरावा आहे, असे शासन निर्णयामध्ये स्पष्टपणे दिलेले आहे. त्यामुळे जातीची प्रमाणपत्रे नव्हती हा आक्षेप चुकीचा आहे. दुसरा मुद्दा उत्पन्न प्रमाणपत्राचा आहे त्याबद्दलचे स्पष्टीकरण शासनाने त्याच शासन निर्णयामध्ये दिले आहे की, ग्रामपंचायतीचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र पुरेसे आहे. त्यामुळे दुसऱ्या कोणत्याही प्रशासनाच्या प्रमाणपत्राची गरज नाही म्हणून या दोन्ही पातळीवर मुख्याध्यापकांनी पुर्तता केलेली आहे. ज्याबाबत पुर्तता झालेली नाही असे म्हटले जाते त्याबाबतीत त्या मुख्याध्यापकाची जबाबदारी असल्यामुळे ते आदिवासी विभागाच्या अखत्यारित नाही पण आदिवास विकास विभाग त्यांना निधी देत असल्यामुळे तो निधी योग्य ठिकाणी जातो किंवा नाही हे बघणे विभागाची जबाबदारी आहे. परंतु शासनाने यामध्ये खूपच शिथिलता आणलेली आहे आणि तो शासन निर्णय सुद्धा स्पष्ट आहे. कारण लहान मुलांचे प्रमाणपत्र आणायचे किंवा त्यातील अनेक प्रात्यक्षिक गोष्टी होत्या म्हणून केवळ मुख्याध्यापकाच्या नोंदीवर ही शिष्यवृत्ती देण्यात येते. उत्पन्नाच्या प्रमाणपत्राबाबत देखील ग्रामपंचायतीचा दाखला पुरेसा आहे. सन २०१० चा शासन निर्णय आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

जव्हार आणि नंदुरबार या ठिकाणी निधी उरलेला आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, एटीसी ठाणे मध्ये जव्हारच्या अंतर्गत ५ वर्षांमध्ये ३ लाख ६४ हजार ७५० रुपयांची बचत होती. तो सर्व भरणा चलनद्वारे केलेला आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

समितीचा असा मुद्दा आहे की, हा भरणा करण्याची वेळ का आली आहे, डिसबर्समेंट का झाले नाही ? त्याचबरोबर जव्हारसोबत नंदूरबारमध्ये १३ लाख रुपये का आले त्याचे दोन्ही ठिकाणी वाटप झाले पाहिजे असे महालेखाकारांचे मत आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, ५ वर्षांमध्ये १० कोटी ४० लाख २५ हजार ५०० रुपयांची मागणी होती. त्यापैकी १० कोटी ३६ लाख ६० हजार ७५० रुपये एवढी रक्कम वितरित झाली आहे, असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

मागणी जास्त आणि वितरित झालेली रक्कम असे का झाले ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, अनुषंगाने शेवटच्या वर्षाची जी मागणी असते त्याच्या पुढच्या वर्षाची मागणी दरवर्षी बीईओ जी मागणी करतात. पण जे पैसे वितरित केले जातात ते उपस्थितीनुसार करतात. त्यामध्ये थोडक्यात काही तफावत होत असते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

It means department's demand is being made on the basis of last year demand. आता मुळ मुद्दा ई-गव्हर्नन्स ॲप्लीकेशन सॉप्टवेअरचे कमकुवत कार्यान्वयन याबाबत आहे. यामध्ये मास्टेक कंपनीला ज्या उद्देशाने काम दिले त्याबाबत महालेखाकारांचे असा आक्षेप आहे की, वसतिगृहामध्ये डेटा एंन्ट्री करता येऊ शकत नव्हती. त्याला असे कारण दिले की, तिथे इंटरनेट नव्हते, ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया होऊ शकली नाही, वसतिगृह व्यवस्थापन प्रणाली क्रियाशील नव्हती, सुवर्ण महोत्सवी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती, इतर शिष्यवृत्ती योजनांची माहिती अद्ययावत करण्यात आलेली नव्हती. तर मग आपण हे सर्व कशासाठी केले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, मागील वर्षाच्या मागणीच्या आधारे चालू वर्षाची मागणी एकूण जी ३ ॲप्लीकेशन सॉप्टवेअर आहेत त्यापैकी वसतिगृह व्यवस्थापन आणि भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे आयसीआयसीआय मदतीने मॉस्टेकने तयार केलेले मॉड्युल विभागाकडून वापरण्यात येत आहे. त्याचप्रमाणे वसतिगृह व्यवस्थापनासाठी तीच प्रणाली वापरात आहे. त्यावेळेस महालेखाकारांच्या निदर्शनास जे आक्षेप आले त्यामध्ये त्याचे असे मत आहे की, कित्येक जागेवर इंटरनेटच नव्हते. मग तिथे ती योजना लावलीच कशाला म्हणजे जर घरात विजेचे कनेक्शन नसेल तर लाईट कशाला लावून ठेवले तर याला काही अर्थ आहे काय असे मत समितीने व्यक्त केल असता, काही ठिकाणी अशी परिस्थिती होती हे बरोबर आहे. परंतु अनेक ठिकाणी वसतिगृहांमध्ये इंटरनेट आहे. कारण जिल्हा व तालुका पातळीवर वसतिगृह आहेत. काही ठिकाणी मात्र इंटरनेटची अडचण आहे पण जास्तीत जास्त ठिकाणी इंटरनेट उपलब्ध आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

इंटरनेट आहे, पण ज्या गोष्टी करण्यासाठी सॉप्टवेअर घेतले होते त्यासाठी इंटरनेटचा वापर केला नाही, असा महालेखाकारांचे आक्षेप आहे. मग तिथे इंटरनेटचा वापर का केला नाही ? अशी विचारणा समितीने केली असता, आपले म्हणणे बरोबर आहे. सुरुवातीला काही काळ प्रशिक्षणामध्ये आणि सॉप्टवेअरमध्ये वेळ लागला. विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

विभाग एखाद्या शेतातील गड्याला काम सांगत नाही. कारण विभागाचे अधिकारी सुशिक्षित आहेत. शेतातील गड्याला ४ डाटा एन्ट्री कर असे नाही सांगत. हा सर्व विषय शिक्षित लोकांचा आहे. असे मत आता तर धान्याचे वितरण वाटप सुद्धा इंटरनेटद्वारे सुरू झाले आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, तीच मोड्युल्स कस्टमाईज करून वापर सुरू आहे. योजना सनियंत्रण आणि आश्रमशाळा या दोन्ही मोड्युल्सवर विभागाकडून काही कस्टमायजेशन करण्यात येत आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

अमरावती भागात श्री. तुकाराम मुंडे हे जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी होते. त्या ठिकाणी सर्व शिक्षकांना अशाच सवयी होत्या पण एका महिन्यात सर्व सिस्टिम अपडेट झाली. याचा अर्थ इच्छाशक्ती असेल तर सर्व शक्य आहे. विभागाच्या अधिकाऱ्यांनी ठरवले तर चार दिवसांचे ट्रेनिंग देणे शक्य आहे असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने आता इच्छाशक्ती दाखवलेली आहे म्हणून आता ते काम सुरू आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महालेखाकारांनी लक्षात आणून दिले म्हणून विभाग हे काम करतो म्हणजे विभागामध्ये काय सुरू आहे हे महालेखाकारांनीच विभागाच्या निदर्शनास आणून द्यावे काय? अशी विचारणा समितीने केली असता, परिच्छेदामध्ये नसलेल्या अनेक चांगल्या गोष्टी विभागाने केलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

ई-गव्हर्नन्सबद्दल विभागाच्या प्रतिनिधींनी महालेखाकारांच्या एक्झिट कॉन्फरन्सला सांगितले की, "the detail reply will be given after verification." याबाबत विभागाने काहीच उत्तर दिले नाही. सर्व सिस्टिम झालेले नाही हे विभागाने मान्यच केले आहे असे समितीने निदर्शनास आणले असता, असे उत्तर दिले आहे की, एकूण तीन सॉप्टवेअरपैकी पहिल्या सॉप्टवेअरमध्ये कस्टमायजेशन सुरू आहे आणि आता विभाग पुढे तेच सॉप्टवेअर वापरणार आहे. पण काही कस्टमायजेशनची गरज असल्यामुळे अद्याप ते मोड्युल्स सुरू नाही. दुसरे असे आहे की, आश्रमशाळा आणि वसतिगृह व्यवस्थापन असे दोन मुद्दे आहेत. त्यातील वसतिगृह व्यवस्थापनाचे मोड्युल्स व्यवस्थितपणे सुरू आहे. पण आश्रमशाळांसाठी पुन्हा कस्टमायजेशनची गरज असल्यामुळे कस्टमायजेशन म्हणजेजी नवीन आश्रमशाळा संहिता तयार झालेली आहे. त्यामधील नियमाप्रमाणे आपण सॉप्टवेअरमध्ये बदल करण्यात येत आहेत. भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती आणि शिक्षण फी प्रणाली आहे हे तिसरे मोड्युल्स गेल्या वर्षीपासून विभागाकडून वापरण्यात येत आहे आणि ते व्यवस्थित सुरू आहे. सन २०१७ मध्ये हे मॉड्युल्स सुरू झाले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

विभागाने त्यांना ४ कोटी ९० लाख रुपये दिलेले आहेत. विभागानेपसंतीचे (Custamzation) पण हे तीन्ही मॉड्युल्स सुरू झाले पाहिजेत असे समितीने सूचित केले असता विभागीय प्रतिनिधी त्यास सहमती दर्शवून त्याच दृष्टीने विभागाचे प्रयत्न सुरू आहेत असे सांगितले.

परिच्छेद क्र. २.२.६.३—आदिवासी उपयोजने अंतर्गत झालेल्या कार्याचे मुल्यांकन—

या परिच्छेदामध्ये विभागाने नमूद केले की, ' टाटा कन्सलटींग संस्थेकडून विभाग हे सर्व काम करून घेतो किंवा याचा अभ्यास करून घेतो, सन २०१५ मध्ये त्यांनी मुल्यांकन प्रमाणपत्र तयार करून त्याचा अहवाल विभागाला दिला आहे.' त्या मुल्यांकनामध्ये काय आढळले आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, आता विभाग त्रयस्थ संस्थेच्या मुल्यांकनावर खूप भर देत आहे वेगवेगळ्या योजनांचे आयोजन करीत आहे. उत्तरामध्ये ज्या टीआयएसएसच्या अहवालाचा उल्लेख केलेला आहे त्यांना आश्रमशाळांचे अ, ब, क आणि ड असे वर्गीकरण विभागाकडे संख्या दिली. मग ड वर्गातील क मध्ये, क वर्गातील ब मध्ये श्रेणी वाढवण्यासाठी ॲक्शन प्लॅन विभागाने तयार केला आणि त्यानुसार कार्यवाही सुरू आहे. या व्यतिरिक्त पेसा फंडाबद्दल प्रत्यक्षपणे ग्रामपंचायतीला ५ टक्के निधी देण्यात येतो. त्याचे सुद्धा त्रयस्थ संस्थेद्वारे मुल्यांकन केले आहे. विभाग जे आर-डीबीटी देतो त्याचे सुद्धा त्रयस्थ संस्थेमार्फत मुल्यांकन सुरू आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

टीआयएसएसने विभागाला जे मुल्यांकन करून दिले शेवटी आदिवासी विभागाच्या पूर्ण लोकाभिमुख योजनांचा आढावा आणि मुल्यमापन त्यांनी केलेले आहे. या योजनेबद्दल त्यांचा निष्कर्ष काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता, टीआयएसएसने फक्त आश्रमशाळांचे ग्रेडेशन केले कारण त्यांच्याकडे फक्त तेवढीच जबाबदारी दिली होती. त्यांनी सर्व आश्रमशाळांचे अ, ब, क आणि ड असे विभाजन करून दिले. त्यामध्ये पुढे काय सुधारणा करता येईल याचे नियोजन झाले. बाकीचे काही मुल्यांकन मुंबई विद्यापीठाकडून करून घेतलेले आहेत. उदाहरणार्थ आश्रमशाळा डीबीटी आहे. यामध्ये ९० टक्के विद्यार्थ्यांनी योजनेबद्दल सकारात्मकता दाखवलेली आहे. तो मोठा नमुना असून सुद्धा विद्यार्थ्यांनी खरोखर त्या वस्तू घेतलेल्या त्रयस्थ संस्थेच्या गटाला आढळून आल्या आहेत. त्यामुळे विभागाचा उत्साह वाढलेला आहे. मुंबई स्कुल ऑफ इकॉनॉमी आणि पुणे विद्यापीठ अशा मोठ्या संस्थांकडून वेगवेगळ्या योजनांचे मुल्यांकन करून घेण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

महालेखाकारांचे असे निरिक्षण आहे की, ' मानवी विकास निर्देशकांत स्थायी सुधारणा करून आदिवासी आणि इतर क्षेत्र यांच्यातील अंतर भरुन आदिवासींचा सामाजिक व आर्थिक दर्जा सुधारणे, हे आदिवासी उपयोजनेचे उद्दिष्ट आहे. परंतु आदिवासी योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या कामाचे नियतकालिक प्रभाव निर्धारण अथवा मुल्यांकन आदिवासी विभागाद्वारे करण्यात आले नाही. परिणामी आदिवासी लोकांच्या उन्नतीसाठी घेण्यात आलेल्या विविध कामांचे आणि योजनांचे उद्दिष्ट साध्य झाले नाही अथवा होत नाही. याची खातरजमा करणे कठीण होते.' याबद्दल समितीने विभागाचे मत विचारले असता, महालेखाकारांनी जे निरिक्षण दिलेले आहे त्यानुसार ही बाब खरी आहे की, टाटा इन्सिटीटयुट ऑफ सोशल सर्व्हिस सोडल्यास बाकी योजनांचे मुल्यांकन झालेले नव्हते परंतु या निरिक्षणाला प्रतिसाद म्हणून विभागाने अनेक योजनांचे त्रयस्थ संस्थेकडून मुल्यांकनाचे काम सुरू केले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

विभागाने अनेक नाहीतर सर्व योजनांचे कोणत्या तरी एजन्सीकडून मुल्यांकनकेलेच पाहिजे. जेणेकरून विभागाचे कुठे चुकते किंवा विभाग कुठे कमी पडतो याची विभागाला जाणीव होईल आणि विभाग अजून प्रभावीपणे या योजनेचा लाभ सर्वसामान्यांच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचू शकतो, या दृष्टीने विभागाने लक्ष देण्याची गरज आहे. असे वाटत नाही काय ? अशी विचारणा समितीने केली असता, तज्ञ संस्थांना विभागाने शोधले आहे आणि त्यांना योजना वाटून देऊन त्याचे मुल्यांकन त्यांनी सुरू केलेले आहे अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

अभिप्राय व शिफारशी :—

परिच्छेद क्रमांक २.२.२.१—दिर्घावधी परिप्रेक्ष्य योजनेचा अभाव—

अभिप्राय :

एखाद्या घटकाचे दिर्घावधी ध्येय वेळेत साध्य करण्यासाठी नितीबद्ध तंत्र नियोजन आवश्यक आहे. आदिवासी विकास विभागाने सर्व प्रकल्प अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिकार क्षेत्रातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत (ITDP) पंचवार्षिक परिप्रेक्ष्य योजना तयार करण्याचे माहे सप्टेंबर, १९९३ मध्ये निर्देश दिले. तथापि, लेखापरिक्षेच्या असे निदर्शनास आले की, सन १९९२-९३ पासून २९ प्रकल्प अधिकाऱ्यांपैकी (लेखापरिक्षणाच्या प्रयोजनाकरिता नमुन्या दाखल निवडलेल्या चंद्रपूर, डहाणू, धारणी, जव्हार, नागपूर, नाशिक, नंदुरबार आणि पांढरकवडा येथील प्रकल्प अधिकाऱ्यांसहीत) एकाही प्रकल्प अधिकाऱ्याने कोणतीही दिर्घावधी परिप्रेक्ष्य योजना तयार केली नव्हती. प्रकल्प अधिकाऱ्यांनी स्थानिक मागण्या आणि निधी उपलब्धतेच्या आधारावर, कोणतेही भौतिक लक्ष निर्धारित न करता, फक्त वार्षिक योजना तयार केली आणि ती मंजुरीकरिता जिल्हा नियोजन विकास समिती आणि अंतिमतः राज्य शासनाकडे सादर केली. मागील २२ वर्ष परिप्रेक्ष्य अहवाल संकलित न करता राज्य शासन राज्यात आदिवासी उपयोजना राबवित आहे.

३.१ परिप्रेक्ष्य योजना तयार न केल्याचे, मुख्यतः दुष्परिणामे i) आदिवासी आयुक्त, अतिरिक्त आदिवासी आयुक्त आणि प्रकल्प अधिकारी या अंमलबजावणीच्या सर्व स्तरांवर मोठ्या प्रमाणात अखर्चित शिल्लक राहणे, ii) नवीन शासकीय आश्रमशाळा आणि वसतिगृहांच्या बांधकामात लक्षणीय विलंब होणे, iii) अनेक आश्रमशाळांमध्ये अनिवार्य शिक्षकांची पदे रिक्त राहणे, iv) आश्रमशाळांच्या व्यवस्थापनावर अवाढव्य खर्च करूनसुद्धा शासकीय आश्रमशाळांमध्ये प्रवेशाचा कल कमी होणे, v) धोरणातील विसंगतीमुळे आश्रमशाळांमध्ये आदिवासी मुलांसाठी गणवेशाचे प्रापण आणि वाटपात लक्षणीय विलंब होणे, vi) आदिवासी आयुक्त, अतिरिक्त आदिवासी आयुक्त आणि प्रकल्प अधिकारी यांचे स्तरावर शिक्षण कक्ष स्थापन न केल्यामुळे योजनांचे समन्वयन, संनियंत्रण आणि सर्वेक्षण निष्प्रभावी होणे, vii) इ-गव्हर्नन्स ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर, ज्याद्वारे राज्य शासनाला निधीचे अधिक चांगले व्यवस्थापन आणि निर्णय घेणे इत्यादीकरिता मदत होणे अपेक्षित होते, त्याचे कार्यान्वयन कमकुवत होणे, इत्यादी परिणाम दिसून आले.

विभागांच्या लेखी स्पष्टीकरणामध्ये नमूद केल्याप्रमाणे केंद्र शासनाच्या सूचनेनुसार राज्य स्तरांवरून पंचवार्षिक योजना निश्चित करण्यात येतात. राज्य व केंद्र शासनाच्या पंचवार्षिक योजनांमधील उद्दिष्टांनुसार प्रत्येक वर्षी संबंधित क्षेत्रासाठी प्राथम्याने निधी उपलब्ध करून देण्याची कार्यवाही प्रकल्प स्तरावरून करण्यात येते. राज्य स्तरावरील सूचनांनुसार संबंधित योजनांसाठी प्रत्येक वर्षी नियोजन आराखडे तयार करून त्यास जिल्हा नियोजन समितीची मान्यता घेण्यात येते. आदिवासी उपयोजनेंतर्गत असलेल्या विविध शैक्षणिक योजना आणि कार्यांचा वित्तीय अंदाजपत्रके आणि मंजूर निधी त्या वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदीला अधीन राहुन खर्च केला जातो. मागासवर्गियांचे कल्याण (विशेष क्षेत्र) जिल्हास्तर व राज्यस्तर योजनांमध्ये ज्या योजनांसाठी दोनही स्तोत्रांमध्ये बाब निहाय निधीची मागणी करतांना दोन्ही स्तोत्रांद्वारे केलेल्या मागणीची पडताळणी करून योग्य व आवश्यक तेवढी नियतव्ययाची मागणी करणेबाबत वेळोवेळी झालेल्या बैठकांमध्ये संबंधितांना सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना/घटक कार्यक्रम आराखडे तयार करतांना नियतव्ययाच्या मागणीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना दरवर्षी शासनस्तरावरून माहे ऑक्टोबर महिन्यात परिपत्रकाद्वारे सर्व जिल्ह्यांसाठी व विकास शिर्षनिहाय आर्थिक कमाल मर्यादा निश्चित करण्यात येत आहे.

साक्षीदरम्यान, विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले की, पूर्वी नियोजन आयोगाच्या पद्धतीप्रमाणे केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या स्तरावर पंचवार्षिक योजना राबविण्यात येत होती. बाराव्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी सन २०१२ ते २०१७ पर्यंत होता. या कालावधीनंतर निती आयोगाची पुनर्रचना झाल्यामुळे पंचवार्षिक योजनेचा अवलंब करण्यात आलेला नाही. प्रत्येक विभागाने फक्त पाच वर्षांचा आराखडा न करता वर्ष २०३० पर्यंतचा पथदर्शी आराखडा तयार करण्याबाबत शासनाच्या सूचना होत्या. त्यानुरुप विभागाने आपल्या स्तरावर तसा आराखडा तयार करून सुमारे ६ महिन्यांपूर्वी त्याचे वित्त आणि नियोजन मंत्री महोदयांसमोर सादरिकरण केले. तथापि, नियोजन विभागाकडून त्यावर कोणतीही औपचारीक मंजुरी अथवा कार्यवाही करण्यात आलेली नाही. उपरोक्त धोरण तयार करताना संबंधित क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींचा अधिकृतपणे याकामी सल्ला घेण्यात आला होता किंवा कसे अशी समितीने पृच्छा केली असता, त्यावर विभागीय सचिवांनी टिस (Tata Institute of Social Sciences), आयआयटी, बाबासाहेब आंबेडकर टेक्नीकल युनिव्हर्सीटी पुणे, पुणे विद्यापीठाचे डिपार्टमेंट ऑफ टेक्नॉलॉजी, शिक्षण विभाग यांचे समवेत सामंजस्य करार (MOU) करून वैचारिक स्तरावर विचारमंथन करून सदरहू धोरण तयार करण्यात आलेले आहे, असे समितीस सांगितले.

सन २०३० पर्यंत ज्या उपयोजना द्यावयाच्या होत्या त्यांचे निकष, हेतु, उद्दिष्ट इत्यादी बाबतीत विभागाच्या स्तरावरच निर्णय करणे हे योग्य ठरणार नाही. जेव्हा दिर्घ कालावधीसाठी एखादे धोरण ठरवावयाचे असते त्यावेळी निश्चितच त्या त्या क्षेत्रातील तज्ञांचा सल्ला घेणे हे केव्हाही उचित ठरणारे असते. आदिवासी उपाययोजनांसंदर्भात दिर्घकालिन योजना आखतांना आदिवासी विद्यार्थ्यांकरिता निश्चित करावयाचा आहार, गणवेश, स्तनदा मातांना देण्याचे थेट लाभ, आदिवासींसाठी रोजगार निर्मिती करणे या व इतर काही तत्सम प्रमुख बाबींचा त्यात समावेश होणे नितांत आवश्यक आहे, असे समितीने मत व्यक्त केले. विभागाने शासनाला ज्या दिर्घकालीन उपाययोजना सुचविल्या आहेत त्याची प्रत समिती सदस्यांना उपलब्ध करून देण्याबाबत समितीने सूचना केल्या. सदरहू दिर्घकालीन धोरण ठरवितांना कोणत्या बाबींचा (Inputs) आधार घेण्यात आला अशी समितीने विचारणा केली असता, युनिसेफ, युएनडीटी तसेच विभागाचे क्षेत्रीय अधिकारी यांच्याशी नियमित सल्लामसलत करण्यात आले तसेच वेळोवेळी वैचारीक सत्रांचे आयोजन करण्यात आल्याचे देखील विभागीय सचिवांनी सांगितले. विभागाने मागील एक वर्षात खालच्या स्तरावरील आदिवासी आश्रम शाळांमध्ये सोयी सुविधांसाठी 'कायापालट अभियान' हाती घेतले आहे. पाच वर्षांचे नियोजन करण्यासाठी नियोजन विभाग ही त्याकरिता 'नोडल एजन्सी' होती. कृती आराखडे, वार्षिक कृती आराखडे आणि दीर्घ कालावधीकरिता कृती आराखडे असे नियोजनाचे वेगवेगळे टप्पे होते. मात्र सदरहू पद्धत आता बंद झाली असून प्रत्येक राज्याने आता पुढील पाच वर्षांच्या ऐवजी सन २०३० पर्यंतचे नियोजन करावे अशी निती आयोगाची सूचना असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. त्यावर निती आयोगाची स्थापना ही सन २०१४-१५ मध्ये झाली असून तद्नंतर ही जूनी पद्धत बंद झाली आहे. मात्र प्रस्तुतचे लेखा परिक्षण हे वर्ष २०१०-२०१५ या कालावधी करिता असून उक्त कालावधीत माहे सप्टेंबर, १९९३ च्या निर्देशानुसार एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत दिर्घावधी परिप्रेक्ष्य योजना विभागाने तयार करणे आवश्यक होते असे समितीने मत प्रदर्शित केले.

त्याचप्रमाणे पंचवार्षिक किंवा प्रस्तावित दिर्घकालावधीसाठीचे नियोजन आदिवासी क्षेत्रांतील लोकसंख्येच्या आधारावर करण्यात येते किंवा कसे याबाबत विचारणा करून सन २०११ च्या जनगणनेनुसार आदिवासी क्षेत्रांना लोकसंख्येच्या प्रमाणात निधी मिळत नसल्याची बाब समितीने निदर्शनास आणून दिली असता विभागामार्फत प्रतिपादन करण्यात आले की, आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेच्या प्रस्तावाची शासन स्तरावर छाननी सुरू असून शासन मान्यतेनंतर प्रस्तुत अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्रचनेचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येणार आहे.

शिफारस—

३.२ लेखापरिक्षणातील उपरोक्त निरीक्षणे ही अत्यंत मूलभुत व महत्त्वाची आहेत. सचिव, आदिवासी विकास विभाग हे विभाग प्रमुख असून आदिवासी आयुक्त, नाशिक हे त्यांना सहाय्य करतात. आदिवासी आयुक्तांना अमरावती, नागपूर, नाशिक आणि ठाणे येथील चार अतिरिक्त आदिवासी आयुक्त सहाय्य करतात. आदिवासी आयुक्त हे आदिवासी उपयोजनेच्या संपूर्ण संनियंत्रणासाठी जबाबदार असून अतिरिक्त आदिवासी आयुक्त त्यांच्या क्षेत्रातील विकास कार्यक्रमांचे समन्वयन करून संनियंत्रण ठेवतात. अतिरिक्त आदिवासी आयुक्तांना एकूण २९ प्रकल्प अधिकारी मदत करतात आणि ते त्यांच्या आदिवासी उपयोजना क्षेत्रातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत विविध विकास कार्याच्या नियोजनासाठी जबाबदार असतात. विभागाची उपरोक्तप्रमाणे संघटनात्मक संरचना असल्याचे समितीस दिसून आले. आदिवासी विकास विभागाने सर्व प्रकल्प अधिकाऱ्यांना त्यांच्या अधिकार क्षेत्रातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांकरिता (ITDP) पंचवार्षिक परिप्रेक्ष्य योजना तयार करण्याचे निर्देश दिले होते. सदरहू आदेश हे माहे सप्टेंबर, १९९३ पासून अंमलात आले असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. लेखापरिक्षणात सन १९९२-९३ पासून २९ पैकी एकाही प्रकल्प अधिकाऱ्याने कोणतीही दीर्घावधी परिप्रेक्ष्य योजना तयार केली नसल्याचे निदर्शनास आले. प्रकल्प अधिकाऱ्यांनी स्थानिक मागण्या आणि निधी उपलब्धतेच्या आधारावर फक्त वार्षिक योजना तयार केल्या. लेखापरिक्षणातील उपरोक्त आक्षेप हे अत्यंत गंभीर आहेत.

साक्षीदरम्यान, पूर्वी नियोजन आयोगाच्या पद्धतीप्रमाणे केंद्र शासनाच्या आणि राज्य शासनाच्या स्तरावर पंचवार्षिक योजना राबविण्यात येत होत्या. १२ व्या पंचवार्षिक योजनेचा कालावधी २०१२ ते २०१७ पर्यंत होता. तथापि, या दरम्यान नियोजन आयोगाची पुनर्रचना होऊन 'निती आयोग' अस्तित्त्वात आला. १२ व्या पंचवार्षिक योजनेनंतर पंचवार्षिक योजना पद्धतीचा अवलंब बंद करण्यात आला असून पाच वर्षांचा आराखडा न करता वर्ष २०३० पर्यंतचा एक पथदर्शी आराखडा तयार करण्याच्या शासनाच्या सूचना असल्याचे समितीस विदित करण्यात आले. तथापि, विभागाचे उपरोक्त समर्थन समितीस अजिबात मान्य नाही. प्रस्तुतचे लेखापरिक्षण हे वर्ष २०१०-२०१५ या कालावधिकरिता असून एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांकरिता पंचवार्षिक परिप्रेक्ष्य योजना तयार

करण्याचे सन १९९३ मध्ये निर्गमित केलेले निर्देश हे अगदी अलिकडे निती आयोगाची स्थापना होईपर्यंत सुमारे २२ वर्षे अस्तित्त्वात व अंमलात होते ही वस्तूस्थिती आहे. त्यामुळे विभागाने विशद केलेली उपरोक्त कारणमिमांसा ही केव्हाही पटण्याजोगी नाही.

वास्तविक, आदिवासी समाजाची सर्वांगिण उन्नती आणि प्रगती करून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या प्रामाणिक आणि स्तुत्य हेतूने पाचव्या पंचवार्षिक योजनेच्या (१९७४-७८) प्रारंभापासून आदिवासी उपयोजना कार्यप्रणाली आखण्यात आली आहे. राज्याच्या अर्थसंकल्पाच्या एकूण ९.३ टक्के निधी हा आदिवासी विकास विभागाकरिता दरवर्षी अर्थसंकल्पित केला जातो. आदिवासी समाजाची शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक प्रगती साधण्याच्या दृष्टीने त्यांच्या उत्कर्षाकरिता अचूक भौतिक लक्ष्य निर्धारीत करून सर्वस्पर्शी असे दीर्घसूत्री धोरण आखून त्याकरिता भरीव आर्थिक तरतूद करून या ध्येयपूर्तीकरिता एका नेमक्या दिशेने आदिवासी विकास विभागाने वाटचाल करणे अभिप्रेत व आवश्यक होते व आहे. तथापि, या उद्देशांशी फारकत घेऊन एक-दोन नव्हे तर सुमारे २२ वर्षे कोणतेही दीर्घसूत्री धोरण न आखता फक्त अल्प कालावधीची वार्षिक नियोजने करून त्यावर कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करून आदिवासी विकास विभाग वाटचाल करीत राहीला. अगदी लेखापरिक्षणाच्या कालावधित म्हणजेच वर्ष २०१० ते २०१५ या दरम्यान आदिवासी विकास विभागाने आदिवासी उपयोजनेंतर्गत विविध शैक्षणिक योजना व इतर संबंधित कार्यांवर रु. ३,४५१.१८ कोटी खर्च केल्याचे लेखापरिक्षणातून दिसून येते. अखेर याची परिणती म्हणजे ज्या प्रमाणात आदिवासी विकास योजनांवर भरघोस निधी खर्च झाला त्याप्रमाणात अपेक्षित असा आदिवासी समाजाचा विकास निश्चितच होऊ शकलेला नाही हे खेदाने येथे नमूद करावे लागत असून समिती याबाबत तिव्र शब्दात नापसंती व्यक्त करीत आहे.

त्याचप्रमाणे निती आयोगाची स्थापना झाल्यानंतर पंचवार्षिक आराखडा तयार न करता वर्ष २०३० पर्यंतचा कालावधी विचारात घेऊन प्रत्येक विभागाने आपापल्या विभागाशी संबंधित सर्वकष ध्येयधोरण ठरविण्याबाबत शासनाच्या सूचना असून आदिवासी विकास विभागाने सन २०३० पर्यंतचे ध्येयधोरण तयार केले असल्याचे साक्षीदरम्यान समितीस विदित करण्यात आले आहे. आदिवासी विभागाने तयार केलेल्या उपरोक्त धोरणाची प्रत (व्हिजन डॉक्यूमेंट २०३०) समितीस यथाशिघ्र उपलब्ध करून देण्यात यावी.

त्याचप्रमाणे साक्षीदरम्यान, समितीस अवगत केल्याप्रमाणे आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचेकडून प्राप्त झालेल्या अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्ररचनेच्या प्रस्तावाच्या शासन स्तरावर सुरू असलेल्या छाननीचे काम तातडीने पूर्ण करून उक्त प्रस्तावास राज्य शासनाची मान्यता घेऊन प्रस्तुत अनुसूचित क्षेत्राच्या पुनर्ररचनेचा प्रस्ताव केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी तातडीने सादर करण्यात यावा व उक्त प्रस्तावास केंद्र शासनाची मंजुरी प्राप्त करण्याकरिता विभागाने आवश्यक तो पाठपुरावा करावा अशी समितीची शिफारस आहे.

शिफारशीनुरुप केलेल्या कार्यपूर्तीचा अहवाल समितीस दोन महिन्यांत उपलब्ध करून देण्यात यावा.

परिच्छेद क्रमांक २.२.२.२—शासकीय आश्रमशाळांमध्ये दाखला घेणाऱ्यांच्या संख्येत घसरता कल—

अभिप्राय—

३.३ वर्ष २०१०-१५ दरम्यान आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी विद्यार्थ्यांच्या सशक्तीकरणासाठी रु. ३,४५१.१८ कोटी खर्च करण्यात आले. त्यापैकी रु.१,७२९.५७ कोटी (सुमारे ५० टक्के) शासकीय आश्रमशाळांवर खर्च करण्यात आले. लेखापरिक्षेच्या निदर्शनास आले की, आश्रमशाळांच्या व्यवस्थापनेवर रु. १७२९.५७ कोटी इतका खर्च करून सुद्धा २.६३ लक्ष मंजूर क्षमतेच्या विरुद्ध आश्रमशाळांच्या प्रवेशामध्ये वर्ष २०११-१२ मधील २.०७ लक्ष वरून वर्ष २०१४-१५ मध्ये १.९६ लक्ष इतका घसरता कल आढळला. यावरून असे निदर्शित होते की, आदिवासी लोकांनी त्यांच्या पाल्यांना शासकीय आश्रमशाळांमध्ये प्रवेश द्यावा यासाठी आकर्षित करण्याकरिता आदिवासी विकास विभाग वर्धनक्षम धोरण आखण्यात असफल ठरला.

उपआयुक्त (शिक्षण) आदिवासी विकास विभाग, नाशिक यांनी शासकीय आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा घसरता प्रवेश कल याविषयी माहे जुलै २०१५ मध्ये i) आदिवासी विकास विभागाद्वारे पुरस्कृत शहरातील प्रख्यात इंग्रजी माध्यमांच्या शाळेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षित करणे आणि भारत सरकार पुरस्कृत 'एकलव्य रहिवाशी शाळा' अंतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांना इतर शाळांमध्ये प्रवेश घेण्याकरिता पर्यायी योजनांची सुरुवात, ii) वसाहती पासून एक किलोमिटरच्या आत जिल्हा परिषद शाळांची उपलब्धता आणि iii) घरगुती व शेतीविषयक कामांकरिता विद्यार्थ्यांद्वारे त्यांच्या पालकांसोबत राहण्यास पसंती दर्शविणे इत्यादी कारणे देण्यात आली.

विभागाने आपल्या लेखी खुलाशामध्ये नमूद केले आहे की, शिक्षणाचा हक्क कायदा २००९ नुसार प्रत्येक बालक आणि त्यांच्या पालकांना त्यांच्या इच्छेनुसार शाळेत प्रवेश घेण्याचा अधिकार आहे. स्थनिक पातळीवर १ ते ३ कि.मी.च्या आत शाळा, जिल्हा परिषदेच्या इ. १ली ते ५वी पर्यंतच्या शाळा प्रत्येक गावात आहेत. शासकीय आश्रमशाळेप्रमाणे जिल्हा परिषद शाळेत मोफत गणवेश, पाठयपुस्तक, शिष्यवृत्ती या सुविधा मिळतात, त्यामुळे विद्यार्थ्यांचा स्थानिक शाळेत प्रवेश घेण्याचा कल आहे. त्यामुळे अनेक आश्रमशाळांमध्ये इ. १ली ते ५वी मध्ये विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात घटलेली आहे. १० वी नंतर ITI नर्सिंग, विविध डिप्लोमा तसेच ११ वी १२ वी साठी विद्यार्थी तालुका व जिल्हा स्तरावर वसतिगृहात प्रवेशित होतात. एकलव्य निवासी शाळेतील विद्यार्थी हे बहुतांशी शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांमधून निवडले जातात. इंग्रजी शाळेमध्ये विद्यार्थ्यांना पाठविण्याचा पालकांचा कल वाढत आहे. वरील विविध कारणांमुळे विभागाकडील शाळांमधील एकंदरीत विद्यार्थी संख्येत वाढ होत असली तरी शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी पटसंख्या कमी होत आहे.

साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी कथन केले की, आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या परिणामकारक घटली असे म्हणता येणार नाही. सन २०११-१२ मध्ये आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या ४ लाख ५२ हजार होती त्यामध्ये सन २०११-१२ ते सन २०१७-१८ या कालावधीत ५२ हजार इतक्या संख्येने वाढ झाली. त्यावर, शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या घटत असून अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थी संख्यांमध्ये मात्र वाढ होत आहे असा समितीचा आक्षेप असल्याचे समितीने विभागीय सचिवांच्या लक्षात आणून दिले. सन २०११-१२ मध्ये शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या ही २ लाख ७ हजार होती ती सन २०१७-१८ मध्ये १ लाख ९१ हजारांवर खाली आली मात्र त्याचवेळी खाजगी अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या २.०५ लाख इतकी होती त्यामध्ये वाढ होऊन २.४९ लाखापर्यंत पोहोचली आहे. तसेच नामांकित शाळेमध्ये सन २०११-१२ मध्ये १५०९ विद्यार्थी संख्या होती त्यामध्ये वाढ होऊन ती ८ हजार ९२९ पर्यंत पोहोचली आहे असे देखील समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिले. त्यावर विभागीय सचिवांनी असे विदीत केले की, या संदर्भात विद्यार्थी संख्येचा विभागनिहाय तपशील तसेच त्यांच्या शैक्षणिक निकालांची तुलना करून पहावी लागेल. सर्वसाधारणपणे पाहिले तर ग्रामिण भागामध्ये नवीन इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळा सुरू झाल्या असून हा कल वाढत आहे. लहान शहरांमधील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या नवीन इंग्रजी माध्यमांच्या खाजगी शाळा सुरू झाल्यामुळे थोड्या प्रमाणात कमी झाली आहे. या व्यतिरिक्त आणखी एक कारण म्हणजे मागील दोन वर्षांच्या काळात ज्या आश्रम शाळांमधील विद्यार्थ्यांची पट संख्या ६० ते ८० इतकी कमी असेल अशा आश्रम शाळेतील मुलांचे जवळपासच्या आश्रम शाळेत समायोजन करून त्यांना एकाच ठिकाणी चांगल्या सुविधा मिळाव्यात असा त्या मागचा प्रयत्न आहे. तसेच आदिवासी क्षेत्रातही जिल्हा परिषदेच्या दर १ कि.मी. परिसरामध्ये शाळा असून तेथे सर्व शिक्षा अभियान राबविण्यात येत आहे. आदिवासी विकास विभागामार्फत १४ एकलव्य शाळा देखील सुरू करण्यात आल्या आहेत. विभागाने नामांकित शाळा सुरू केल्या असून आदिवासी मुलांसाठी चांगल्या खाजगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांना पुरस्कृत करण्यात येत आहे. शहरीकरण झालेल्या क्षेत्रामध्ये प्रामुख्याने आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या कमी झाली आहे. जवार, डहाणू, धारणी येथील शासकीय आश्रम शाळेतील पट संख्या वाढलेली आहे.

शासकीय आश्रम शाळांमधील इमारत, स्वच्छता गृहे व इतर सोयीसुविधा चांगल्यारितीने उपलब्ध आहे मात्र अशा सर्वच सुविधा खाजगी आश्रम शाळांमध्ये उपलब्ध नाही. तरी देखील शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या संख्येत घट का होत आहे, अशी समितीने पृच्छा केली असता या संदर्भात एका त्रयस्त संस्थेमार्फत तुलनात्मक अभ्यास करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी समितीस विदीत केले. शासकीय आश्रम शाळेच्या संख्येत घट झाली आहे किंवा कसे याबाबत समितीने विचारणा केली असता सदरहू आश्रम शाळेची संख्या ५५२ होती त्यामध्ये आता घट होऊन ती ५०२ इतकी झाली असल्याचे समितीच्या निदेर्शनास आणून देण्यात आले. त्यावर अनुदानित आश्रम शाळेंची संख्या देखील तपासून पाहण्यात यावी अशी समितीने सूचना केली.

शिफारस—

३.४ लेखापरिक्षणातील उपरोक्त आक्षेप हे अतिशय मूलभुत स्वरुपाचे आहेत. वर्ष २०१०-१५ दरम्यान आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी विद्यार्थ्यांच्या सशक्तीकरणासाठी रु. ३,४५१.१८ कोटी खर्च करण्यात आले. त्यातील निम्मी रक्कम रु. १,७२९.५७ कोटी इतकी फक्त शासकीय आश्रमशाळांवर खर्च करण्यात आली, असे असूनही निर्धारीत २.६३ लक्ष मंजूर क्षमतेच्या तुलनेत आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा कल वर्ष २०११-१२ मधील २.०७ लक्ष वरून वर्ष २०१४-१५ मध्ये १.९६ लक्ष इतका घसरलेला आढळला.

यामागची कारणमिमांसा स्पष्ट करताना विभागाने नमूद केले की, शिक्षणाचा हक्क कायदा २००९ नुसार प्रत्येक पाल्य आणि पालकास त्यांच्या ईच्छेनुसार शाळेत प्रवेश घेण्याचा हक्क असून स्थानिक पातळीवर प्रत्येकी १ ते ३ कि.मी. अंतरामध्ये एक शाळा अस्तित्त्वात आहे. तसेच जिल्हापरिषदेची इ. १ली ते ५ वी पर्यंतची प्रत्येक गावात एक शाळा आहे. शासकीय आश्रम शाळेप्रमाणेच जिल्हा परिषद शाळेंमध्ये देखील आता मोफत गणवेश, पाठ्यपुस्तक, शिष्यवृत्ती इत्यादींसारख्या सुविधा मिळत असल्याने विद्यार्थ्यांचा

स्थानिक शाळेत प्रवेश घेण्याकडे कल वाढलेला आहे. एकलव्य निवासी शाळेतील विद्यार्थी हे बहुतांशी शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांमधून निवडले जातात. तसेच इंग्रजी शाळेमध्ये विद्यार्थ्यांना पाठविण्याचा पालकांचा कल वाढत आहे. उपरोक्त कारणांमुळे शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थी पटसंख्या कमी होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

साक्षीदरम्यान, शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होत असून खाजगी अनुदानित आश्रम शाळेतील विद्यार्थी संख्येत मात्र वाढ होत असल्याची बाब समितीने विभागीय सचिवांच्या लक्षात आणून दिली. शासकीय आश्रम शाळांमध्ये इमारत, स्वच्छतागृहे व तद्नुषंगीक इतर सोयीसुविधा यासारख्या मुलभूत पायाभूत सुविधा उपलब्ध असतांना आणि खाजगी आश्रम शाळेत अशा सुविधांचा अभाव असतांना देखील शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या संख्येत घट होण्यामागची नेमकी कारणमिमांसा जाणून घेण्यासाठी समितीने यांसंदर्भात विभागीय सचिवांकडे विचारणा केली असता याबाबतत्रयस्त संस्थेकडून तुलनात्मक अभ्यास करून घेण्यात येईल असे समितीस आश्वस्त केले. सबब, समितीस आश्वस्त केल्याप्रमाणे याप्रकरणी एखाद्या तज्ञ त्रयस्त समितीमार्फत सखोल चौकशी करून तुलनात्मक अभ्यासाअंती यामागची निश्चित कारणमिमांसा जाणून घेऊन योग्य निष्कर्षाप्रत येऊन शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांचा घसरता कल रोखण्याकरिता करावयाच्या प्रभावी उपाययोजना योजून त्याबाबतचा विस्तृत अहवाल समितीस दोन महिन्यांत उपलब्ध करून द्यावा अशी समितीची शिफारस आहे.

त्याचप्रमाणे शासकीय आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा घसरता कल लक्षात घेऊन त्यामध्ये आमुलाग्र बदल करण्याच्यादृष्टीने आदिवासी क्षेत्रातील एखाद्या तालुक्याची 'आदर्श तालुका' म्हणून निवड करून त्या तालुक्यातील शासकीय आश्रमशाळांमध्ये प्रायोगिक तत्त्वावर अभ्यास बाह्य इतर काही उपक्रम सुरू करून विद्यार्थ्यांना शासकीय आश्रम शाळेत प्रवेश घेण्याबाबत प्रोत्साहित करण्याकरिता विभागाने सकारात्मक दृष्टीकोनातून प्रयत्न करावेत. याकामी स्वयंसेवी संस्थांच्या (NGOs) माध्यमातून देखील काही उपक्रम शासकीय आश्रम शाळांमधून राबविता येणे शक्य होईल किंवा कसे यादृष्टीने देखील विभागाने विचार करून काही ठोस उपाययोजना हाती घ्याव्यात अशी देखील समिती शिफारस करीत आहे.

परिच्छेद क्रमांक २.२.२.३—आश्रमशाळांच्या अभ्यासक्रमात अभ्यासबाह्य विषयांचा अभाव—

अभिप्राय—

३.५ आदिवासी विकास विभागाद्वारे प्रकाशित करण्यात आलेली आश्रमशाळा संहिता २००६-०७ च्या नियम ३.१६ अनुसार, शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांनी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण (इयता १ ली ते ८ वी करिता) तसेच महाराष्ट्र मंडळ माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण (इयत्ता ९ वी व १० वी करिता) यांचे द्वारे अभिस्वीकृत अभ्यासक्रम स्वीकारावयास पाहिजे. लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की, राज्य अभ्यासक्रमाचा भाग असलेले खेळ, चित्रकला आणि पेटिंग, नृत्य आणि गायन यासारखे अभ्यास बाह्य विषय आश्रमशाळांच्या अभ्यासक्रमांत (शासकीय आणि अनुदानित) अंतर्भूत करण्यात आले नव्हते. हे विषय अंतर्भुत न केल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रतिभा, आवड आणि रुचियांच्या सर्वांगिण विकासामध्ये बाधा उत्पन्न होऊ शकते. आश्रमशाळा संहिता नियम ३.३६(इ) अनुसार अशा अभ्यासबाह्य विषयांकरिता शिक्षकांची नियुक्ती शिक्षकांच्या मंजूर क्षमतेतून करता येते. तथापि, आदिवासी विकास विभागाद्वारे अशी कोणतीही नियुक्ती करण्यात आली नव्हती.

विभागाच्या लेखी स्पष्टीकरणात नमूद केल्यानुसार, राज्यातील सर्व शासकीय व अनुदानीत आश्रमशाळांमध्ये इयत्ता १ली ते ८वी करिता महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थेमार्फत तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम राबविला जातो. तसेच इ.९ वी आणि १० वी करिता महाराष्ट्र राज्य प्राथमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम राबविला जातो.

आश्रमशाळा संहितेमध्ये सुधारणा करण्याचे काम अंतिम टप्प्यात असून त्यामध्ये राज्य अभ्यासक्रमाचा भाग असलेले खेळ, चित्रकला, पेटींग, नृत्य आणि गायन यासारख्या विषयांचा समावेश करून त्यासाठी आवश्यक शिक्षकवर्ग प्रस्तावित करण्यात येत आहेत. तात्पुरत्या स्वरुपात खेळासाठी क्रीडा प्रशिक्षक कंत्राटी पद्धतीने भरण्याबाबत दि. ६.३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये कळविण्यात आलेले आहे. पुढील शैक्षणिक वर्षात खेळासाठी प्रशिक्षक उपलब्ध करून देण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे. तसेच आश्रमशाळा संहितेस मंत्रीमंडळाची मान्यता घेऊन अन्य विषयांसंदर्भात शिक्षक उपलब्ध करून देण्यासाठी कार्यवाही करण्यात येणार आहे.

साक्षी दरम्यान विभागीय सचिवांनी असे कथन केले की, नवीन आश्रम शाळा संहिता तयार करण्यात आली आहे. अभ्यास बाह्य क्रीडा व इतर उपक्रमांसाठी, त्या क्षेत्रातील विशेष कौशल्य प्राप्त केलेल्या किंवा स्थानिक स्तरावरील कौशल्य प्राप्त व्यक्तींना कंत्राटी तत्त्वावर नियुक्ती देवून

शाळेच्या तासिकेंमध्ये त्या उपक्रमाचा अंतर्भाव करून प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या संदर्भात एक शासन निर्णय देखील निर्गमित करण्यात आलेला आहे. प्रकल्प अधिकारी यांनी, त्यांचे स्तरावरून जागतिक, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील खेळाडू तसेच माजी सैनिक उपलब्ध असतील तर त्यांना आश्रमशाळेत प्रशिक्षण देण्यासाठी ठेवणे अपेक्षित आहे. त्याशिवाय 'क्रिकेट ॲकॅडमी नागपूर' व इतर क्रीडा संघटनांसमवेत 'विशेष कल शोध' (Talent Hunt Search) मोहिम राबविण्यात येणार आहे. विशेष कल असलेल्या मुलांना ४ ॲकाडमींच्या माध्यमातुन प्रशिक्षण देण्यात येणार आहे. तसेच खेळा व्यतिरिक्त कला आणि गायन इत्यादीकरिता कौशल्य प्राप्त व्यक्तींचे सहाय्य घेण्यासाठी प्रकल्प अधिकारी यांना सूचित करण्यात आलेले आहे. उक्त प्रयोजनासाठी नियमित शिक्षकांना नियुक्त करावयाचे झाले तर वित्त विभागाकडून पद निर्मितीस मान्यता मिळणे अशक्य प्राय आहे.

शिफारस—

३.६ लेखापरिक्षणात नोंदविण्यात आलेली उपरोक्त निरीक्षणे ही अत्यंत महत्त्वाची आहेत. आदिवासी विकास विभागाद्वारे प्रकाशित आश्रमशाळा संहिता २००६-२००७ नुसार शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांनी इयत्ता १ ली ते ८ वी करिता महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण यांनी तसेच इयत्ता ९ वी व १० वी करिता महाराष्ट्र मंडळ माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांचेद्वारे अभिस्विकृत केलेला अभ्यासक्रम स्विकारावयास पाहिजे होता. मात्र राज्य अभ्यासक्रमाचा भाग असलेले खेळ, चित्रकला आणि पेंटिंग तसेच नृत्य व गायन यासारख्या अभ्यासबाह्य विषयांचा शासकीय तसेच अनुदानित आश्रमशाळांच्या अभ्यासक्रमांत अंतर्भाव करण्यात आला नसल्याचे लेखापरिक्षणात आढळून आले. तसेच अशा अभ्यास बाह्य विषयांकरिता शिक्षकांची नियुक्ती शिक्षकांच्या मंजूर क्षमतेतून करणे संहितेतील तरतूदींनुसार अभिप्रेत असूनही तशा नियुक्त्या करण्यात आलेल्या नव्हत्या. विभागाच्या लेखी खुलाशातून तसेच विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, आश्रमशाळा संहितेमध्ये सुधारणा करण्याचे काम अंतीम टप्प्यात असून त्यामध्ये राज्य अभ्यासक्रमाचा भाग असलेले खेळ, चित्रकला, पेंटींग, नृत्य आणि गायन यासारख्या विषयांचा समावेश करून त्यासाठी आवश्यक शिक्षक वर्ग प्रस्तावित करून त्यास मंत्रीमंडळाची मान्यता घेण्यात येईल. विभागीय सचिवांनी समितीच्या पुढे असेही निदर्शनास आणून दिले की, सर्वच विभागांच्या पद निर्मितीच्या प्रस्तावांना वित्त विभागाकडून अनुमती मिळत नसल्याने दि. ६ मार्च, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये खेळासाठी क्रीडा प्रशिक्षक तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटीपद्धतीने भरण्याबाबत सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तसेच याच धर्तीवर नृत्य, गायन, चित्रकला या विषयांकरिता देखील स्थानिक स्तरावरील कौशल्य निपूण व्यक्तींची कंत्राटीपद्धतीने नियुक्ती करण्याबाबत सर्व प्रकल्प अधिकाऱ्यांना सूचित करण्यात येत आहेत. हे जरी खरे असले तरी आदिवासी विद्यार्थ्यांचा जर खऱ्या अर्थाने सर्वांगिण विकास करावयाचा असेल तर नियमित अभ्यासक्रमातील विषयांत त्यांना निपूण करणे तर आवश्यक आहेच मात्र त्या व्यतिरिक्त खेळ, गायन, चित्रकला आणि नृत्य इत्यादी क्षेत्रांतील त्यांच्या अभिरुचीमध्ये वाढ करून त्या विकसित करणे क्रमप्राप्त आहे. आदिवासींच्या सर्वांगीण विकासाकरिता एकूण अंदाजपत्रकांच्या सुमारे ९ टक्के निधी हा एकटया आदिवासी विकास विभागाकरिता अर्थसंकल्पित केला जातो. ही बाब विचारात घेता वर उल्लेखित अभ्यास बाह्य विषयांकरिता आवश्यकतेनुसार शिक्षक नियुक्तीकरिता पदनिर्मितीचे प्रस्ताव आदिवासी विभागाने योग्य समर्थनासह वित्त विभागास सादर करून वित्त विभागाची मंजुरी प्राप्त करण्याकरिता योग्य तो पाठपुरावा करावा तसेच वित्त विभागाने देखील उक्त प्रस्तावांचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा अशी समितीची शिफारस आहे.

त्याचप्रमाणे, आदिवासी आश्रमशाळांमधील शिक्षकांना प्रशिक्षण देण्याकरिता तसेच अभ्यासक्रमांमध्ये अभ्यास बाह्य उपक्रमांचा अंतर्भाव करण्याकरिता स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून 'सी.एस.आर.' निधीचा वापर करण्याबाबतच्या शक्यतेचा विभागाने विचार करून त्याबाबत सकारात्मक कार्यवाही करावी अशी देखील समितीची शिफारस आहे.

आणखी महत्त्वाची बाब म्हणजे विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान, आदिवासी विभागाकडून स्वतंत्रपणे औद्योगिक प्रशिक्षण संस्था चालविल्या जातात किंवा कसे अशी समितीने पृच्छा केली असता, आदिवासी विकास विभाग स्वतः अशा संस्था चालवित नसून आदिवासी क्षेत्रात औद्योगिक प्रशिक्षण संस्था चालविण्याकरिता तंत्र शिक्षण विभागास निधी उपलब्ध करून देत असल्याचे कथन करण्यात आले. ही बाब विचारात घेता आदिवासी बहुल क्षेत्रांत स्थापित उद्योगांना आवश्यक असणाऱ्या कौशल्यांवर आधारित आणि निगडीत असे रोजगाराभिमुख प्रशिक्षण जर आदिवासी विद्यार्थ्यांना उक्त संस्थांमार्फत दिले गेले तर आदिवासी मुलांना स्थानिक पातळीवरच नजिकच्या उद्योगांमध्ये रोजगाराच्या संधी प्राप्त होऊन त्यांचे आर्थिक राहणीमान त्यामुळे निश्चितच सुधारु शकेल. सबब, आदिवासी विकास विभागाने यादृष्टीकोनातून सकारात्मक विचार करून काही ठोस पावले उचलावित अशी समितीची आग्रही शिफारस आहे.

समितीच्या उपरोक्त शिफारशींनुरुप केलेल्या कार्यपूर्तीचा अहवाल समितीस दोन महिन्यांत उपलब्ध करून देण्यात यावा.

परिच्छेद क्रमांक २.२.२.४—अनेक आश्रमशाळांमध्ये शिक्षकांची रिक्त पदे—

अभिप्राय—

३.७ लेखापिरिक्षणाकरिता निवडलेल्या ५२ पैकी २७ आश्रमशाळांद्वारे सादर केलेल्या माहितीवरून लेखापरीक्षेत असे निदर्शनात आले की, वर्ष २०१०-१५ दरम्यान अनेक आश्रमशाळांमध्ये बहुतांश अनिवार्य विषयांकरिता (हिंदी, गणित, विज्ञान आणि समाज विज्ञान) शिक्षक उपलब्ध नव्हते. मागील पाच वर्षांपासून २७ पैकी कमीत कमी १२ आश्रमशाळांमध्ये, २७ पैकी १० आश्रमशाळांमध्ये आणि २७ पैकी १७ आश्रमशाळांमध्ये अनुक्रमे हिंदी, गणित आणि विज्ञान/समाज विज्ञानाकरिता शिक्षक उपलब्ध नव्हते. तात्पुरती व्यवस्था म्हणून (Stopgap) इंग्रजी, मराठी आणि हिंदी विषय शिकविणारे शिक्षक गणित, विज्ञान आणि समाज विज्ञानसुद्धा शिकवित होते, ज्यामुळे उक्त शिक्षकांवर कामाचा अधिक ताण आला.

विभागाच्या खुलाशाप्रमाणे व विभागीय सचिवांच्या साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आणून दिले की, अपर आयुक्त, अमरावती यांच्या कार्यक्षेत्रात अनुसूचित क्षेत्रातील ४९ शिक्षकांच्या पदांची निवड प्रक्रीया पूर्ण झालेली आहे. उक्त उमेदवारांची १५ दिवसांमध्ये नियुक्ती होईल. पदोन्नतीने ४७ शिक्षकांची पदे भरण्यासाठी विभागीय पदोन्नती समितीची बैठक संपन्न झालेली आहे. एक महिन्याच्या आत उक्त उमेदवारांची नियुक्ती होईल.

अपर आयुक्त, ठाणे यांच्या कार्यक्षेत्रात शासकीय आश्रमशाळांतील अनुसूचित क्षेत्रातील शिक्षक संवर्गातील प्राथमिक शिक्षक ११६, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक ०२, माध्यमिक शिक्षक ४३ अशी एकूण १६१ पदांसाठी जाहिरात प्रसिद्ध केलेली होती. तथापि सदर भरती प्रक्रीयेस बिगर आदिवासी हक्क बचाव समिती शहापूर, जि.ठाणे यांनी अनुसूचित क्षेत्रातील भरतीस मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ८७८३/२०१४ दाखल केली असून मा. न्यायालयाच्या दि. १५ मे, २०१५रोजीच्या आदेशानुसार अनुसूचित क्षेत्रातील भरतीस अंतिम आदेश होईपर्यंत अंतरिम आदेशान्वये स्थगिती दिलेली आहे. अनुसूचित क्षेत्राबाहेरील शिक्षकांच्या पदांच्या भरतीकरिता विभाग लवकरच जाहिरात निर्गमित करीत आहे.

अपर आयुक्त, नागपूर यांच्या कार्यालयात शासकीय आश्रमशाळेतील शिक्षक संवर्गातील अनुसूचित क्षेत्रातील ७, अनुसूचित क्षेत्रा बाहेरील ८ पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. तथापि, कागदपत्र तपासणी नंतर उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या पदव्युत्तर पदवी व बीएड च्या गुणपत्रिकेत गुणांऐवजी ग्रेडेशन असल्यामुळे त्या त्या विद्यापीठांकडून ग्रेडेशनचे रुपांतर गुणांमध्ये करून नियुक्ती आदेश निर्गमित करणेबाबत कळविले आहे.

रिक्त पदांच्याअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून तासिका तत्त्वातील उमेदवारांकडून शैक्षणिक कामकाज करून घेण्यात येत आहे. सद्यःस्थितीत प्राथमिक शिक्षक - ६७६, पदविधर प्रथमिक शिक्षक- ११६, माध्यमिक शिक्षक- ३८४, कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक - १२३ असे एकूण १२९९ तासिका तत्त्वावरील कर्मचारी कार्यरत आहेत.

साक्षीदरम्यान, समितीने मराठी व हिंदी हे विषय शिकविणारे शिक्षक गणित आणि विज्ञान हे विषय शिकवित आहेत. हे उचित नसून तासिका तत्त्वावर शिक्षकांची नियुक्ती करताना गणित व विज्ञान शिकविणाऱ्या उमेदवारांची नियुक्ती करावी, अशी समितीने सूचना केली असता विभागीय सचिवांनी यासंदर्भात सकारात्मकता दाखवून शिक्षकांची शाळानिहाय व विषयनिहाय सविस्तर माहिती संकलीत करून समितीस सादर केली जाईल असे विदीत केले.

शिफारस—

३.८ लेखापरिक्षणातील प्रस्तुतची निरीक्षणे ही निश्चितच मुलभूत आणि गंभीर आहेत. लेखापरिक्षणाकरिता निवडलेल्या ५२ पैकी २७ आश्रमशाळांद्वारे सादर झालेल्या माहितीवरून दिसून येते की, वर्ष २०१०-१५ दरम्यान अनेक आश्रमशाळांमध्ये हिंदी, गणित, विज्ञान आणि समाज विज्ञान या बहुतांश अनिवार्य विषयांकरिता शिक्षक उपलब्ध नव्हते. उक्त कालावधीत २७ आश्रमशाळांपैकी १२ आश्रमशाळांमध्ये हिंदी, १० आश्रमशाळांमध्ये गणित आणि १७ आश्रमशाळांमध्ये विज्ञान/समाज विज्ञानाकरिता शिक्षक उपलब्ध नव्हते. पर्यायी तात्पुरती व्यवस्था म्हणून इंग्रजी, मराठी व हिंदी विषय शिकविणारे शिक्षक गणित, विज्ञान व समाज विज्ञानसुद्धा शिकवित होते.

साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, अपर आयुक्त कार्यालय, अमरावती यांचे अधिनस्त एकूण ४९ शिक्षकांच्या पदांची निवड प्रक्रिया पूर्ण झालेली असून पंधरा दिवसांत उमेदवारांची नियुक्ती करण्यात येईल. पदोन्नतीच्या कोट्यातील ४७ शिक्षकांच्या पदांकरिता विभागीय पदोन्नती समितीची बैठक झालेली असून एक महिन्यात उक्त उमेदवारांच्या पदोन्नतीने नियुक्त्या करण्यात येतील.

अपर आयुक्त कार्यालय, ठाणे अंतर्गत शासकीय आश्रमशाळेतील अनुसूचित क्षेत्रातील शिक्षक संवर्गातील प्राथमिक शिक्षक ११६ पदे, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक २ पदे आणि माध्यमिक शिक्षक ४३ पदे अशी एकूण १६१ पदांसाठी जाहीरात प्रसिद्ध करण्यात आली होती. तथापि, सदर भरती प्रक्रियेस बिगर आदिवासी हक्क बचाव समिती, शहापूर, जि.ठाणे यांनी मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्र. ८७८३/२०१४ वरील सुनावणी दरम्यान अंतरिम आदेशान्वये भरती प्रक्रियेस अंतिम आदेश होईपर्यंत स्थगिती दिलेली आहे. अनुसूचित क्षेत्राबाहेरील भरती प्रक्रियेकरिता विभागामार्फत लवकरच जाहिरात निर्गमित करण्यात येईल.

अपर आयुक्त कार्यालय, नागपूर अंतर्गत शासकीय आश्रमशाळेतील शिक्षक संवर्गातील अनुसूचित क्षेत्रातील ७ पदे तर अनुसूचित क्षेत्राबाहेरील ८ पदे भरण्याची कार्यवाही सुरू आहे. तथापि, कागदपत्रे तपासणीनंतर उमेदवारांकडून प्राप्त झालेल्या पदव्युत्तर पदवी व बी.एड.च्या गुणपत्रिकेत गुणांऐवजी ग्रेडेशन असल्यामुळे त्या त्या विद्यापीठांकडून ग्रेडेशनचे रुपांतर गुणांमध्ये करून नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील.

शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षकांच्या विविध संवर्गातील रिक्त पदांबाबत समितीसमोर आलेली आकडेवारी पाहता आश्रमशाळांमधील शिक्षकांच्या रिक्त पदांबाबतची स्थिती ही विदारक व चिंताजनक अशीच असल्याचे समितीचे मत झाले आहे. अपर आयुक्त कार्यालय, अमरावती अंतर्गत शिक्षक भरतीची प्रक्रिया जवळपास पूर्णत्वास आली असल्याचे साक्षीदरम्यान समितीस विदित करण्यात आले होते. आता दरम्यानच्या कालावधीत शिक्षकांची उक्त भरती प्रक्रिया निश्चितच पूर्ण झालेली असेल अशी समितीस अपेक्षा आहे. सबब, सदरहू भरती प्रक्रियेच्या प्रगतिची सविस्तर माहिती समितीस १५ दिवसांत उपलब्ध करून देण्यात यावी.

अपर आयुक्त कार्यालय, ठाणे अंतर्गत शिक्षक भरती प्रक्रियेसंदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल झालेली याचिका विभागाने सर्वोतोपरी प्रयत्न करून लवकरात लवकर निकाली काढून आश्रमशाळेतील शिक्षकांची प्रलंबित असलेली भरती प्रक्रिया शक्य तितक्या लवकर पूर्णत्वास नेण्याबाबत आवश्यक ते सर्व युध्दपातळीवर प्रयत्न करावेत, अशी समितीची शिफारस आहे. शिफारशीनुरुप केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यांत उपलब्ध करून देण्यात यावा.

अपर आयुक्त कार्यालय, नागपूर अधिनस्त शिक्षक भरती प्रक्रियेसंदर्भात विद्यापिठांनी उमेदवारांचे ग्रेडेशनमध्ये केलेले मुल्यांकन गुणांकनामध्ये करून घेण्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून आश्रमशाळांमधील प्रलंबित असलेली भरती प्रक्रिया येत्या दोन महिन्यांत पूर्ण करून त्याबाबतच्या कार्यपूर्तीचा अहवाल समितीस यथाशिघ्र उपलब्ध करून देण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

तद्वतच उपरोक्तप्रमाणे शिक्षकांची नियमित भरती प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत तात्पुरती पर्यायी व्यवस्था म्हणून तासिका तत्त्वावर करण्यात येत असलेल्या शिक्षकांच्या नियुक्त्यांमध्ये गणित तसेच विज्ञान व समाज विज्ञान याविषयाकरिता त्या त्या विषयातील तज्ञ शिक्षकांची नेमणूक करण्याबाबत विभागाने अतिव दक्षता घ्यावी. तासिका तत्त्वावर नेमणूक करण्यात असलेल्या शिक्षकांची शाळा निहाय व विषयनिहाय माहिती संकलित करून समितीस तातडीने उपलब्ध करून द्यावी, अशी देखील समिती शिफारस करीत आहे.

तसेच लेखापरिक्षणाकरिता निवडलेल्या ५२ आश्रमशाळांमध्ये शिक्षकांच्या रिक्त पदांबाबतची जी परिस्थिती आहे तीच परिस्थिती उर्वरित इतर आश्रमशाळांमध्ये देखील असण्याची शक्यता आहे. सबब, विभागाने सर्वच आश्रमशाळांमधील शिक्षकांच्या रिक्त पदांचा आढावा घेऊन सदरहू पदे तातडीने भरण्याबाबत एक कालबद्ध कृती आराखडा तयार करून रिक्त पदे त्वरेने भरण्याची कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. शिफारशीनुरुप केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस दोन महिन्यांत अवगत करण्यात यावे.

परिच्छेद क्रमांक २.२.२.५—आदिवासी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या संगणक प्रशिक्षण योजनेचे त्रुटीपूर्ण संकल्पन—

अभिप्राय :

३.९ आदिवासी विकास विभागाने वर्ष २०१०-११ या शिक्षण सत्राकरिता शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता ५वी ते १२वी मधील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी संगणक प्रशिक्षण योजना माहे जानेवारी, २००९ मध्ये मंजूर केली. योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रकल्प अधिकाऱ्यांनी (नोडल एजन्सी) रु. ५० प्रति विद्यार्थी प्रति माह (जर प्रशिक्षण विभागीय संगणकावर देण्यात येत असेल) आणि रु. ६० प्रति विद्यार्थी प्रति माह (जर प्रशिक्षण सेवा पुरवठादारांच्या संगणकावर देण्यात येत असेल), या दराने सेवा देणाऱ्या खाजगी सेवा पुरवठादारांची निवड करून, त्यांच्या सोबत कंत्राट करावयाचे होते. एका शिक्षण सत्राकरिता प्रशिक्षण कालावधी नऊ महिने होता. राज्यस्तरावर रु. २७.४४ कोटी संवितरण रक्कमेतून वर्ष २०१०-२०१५ दरम्यान रु. १५.८९ कोटी खर्च करण्यात आला. निवडक आठ प्रकल्प अधिकारी कार्यालयांमध्ये संवितरित रु. ११.७० कोटी रकमेच्या तुलनेत त्याच कालावधीत रु. ६.९१ कोटी खर्च करण्यात आला.

वर्ष २०१०-१५ दरम्यान निवडक ८ प्रकल्प अधिकारी कार्यालयात योजनेच्या अंमलबजावणीवरील लेखापरीक्षा छाननीत निदर्शनास आले की, प्रशिक्षण कालावधीत संगणक वर्गाच्या तासांची संख्या, वर्गाचा कालावधी, प्रशिक्षण देण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या, तसेच प्रशिक्षण कालावधी दर्शविणारे कोणतेही वेळापत्रक आखले नव्हते. सेवापुरवठादारांसोबत झालेल्या कंत्राटात आणि योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांतसुद्धा प्रशिक्षणाचे हे महत्त्वाचे मापदंड अंतर्भूत नव्हते. देयक नस्त्यांच्या छाननीत असे निदर्शनास आले की, पुरवठादारांमार्फत जरी आवश्यक १० संगणकांचा पुरवठा करण्यात आलेला नव्हता तरीसुद्धा प्रकल्प अधिकाऱ्यांमार्फत रु. ६० प्रति विद्यार्थी प्रति माह प्रमाणे देयक अदा करण्यात आले.

तीन प्रकल्प अधिकाऱ्यांनी (डहाणू, चंद्रपूर, पांढरकवडा) एखाद्या ठराविक महिन्यात विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या प्रशिक्षण कालावधीच्या प्रत्यक्ष दिवसांच्या संख्येची पडताळणी न करता त्या महिन्यात प्रशिक्षण देण्यात येणाऱ्या विद्यार्थीच्या संख्येला रु. ६० ने गुणून त्या आधारावर पूरवठादारास रक्कम अदा केलेली आहे. प्रशिक्षण संस्थेद्वारे देण्यात आलेल्या कार्य अहवालानुसार प्रकल्प अधिकारी यांनी पुढील करार वाढवून त्याचे नूतनीकरण केले. तथापि, सेवा पुरवठादाराद्वारे सादर करण्यात आलेल्या अहवालाचे तथ्य तपासण्याकरिता प्रकल्प अधिकाऱ्यांनी वर्ष २०१०-१५ दरम्यान स्वतंत्र मुल्यमापन केलेले नव्हते आणि प्रशिक्षणाची गुणवत्ता पडताळणीदेखील करण्यात आली नव्हती. योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये मुल्यमापनाचे मापदंड स्पष्ट नमूद नसल्याने कराराचे वाढविणे वा संपुष्टात आणणे याकरिता अडचणी निर्माण झाल्या. प्रकल्प अधिकारी, डहाणू यांच्या कार्यक्षेत्रातील १७ आश्रमशाळांमध्ये प्रशिक्षण संस्थेद्वारे देण्यात आलेल्या प्रशिक्षणाचे दस्ताऐवज (नस्ती) ठेवण्यात आले नाहीत. सेच प्रशिक्षण पूर्ण झाल्यावरआश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना संगणकाच्या मुलभूत हार्डवेअर बाबी ओळखता आलेल्या नाहीत.

साक्षीदरम्यान, विभागीय सचिवांनी कथन केले की, इयत्ता ५ वी ते १२ वी मधील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक आठवड्यात १२ तासांचा संगणक प्रशिक्षणाचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला होता. त्यानुसार प्रशिक्षण दिले गेले होते. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीनुसार देयके अदा करण्यात आलेली आहेत. वर्ष २०१०-१५ या लेखापरिक्षणाच्या कालावधीत विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक आठवड्यात दुपारी ३ ते ५ या वेळेत संगणक प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात आले होते. पाच वर्षांकरिता प्रशिक्षणाचा आराखडा तयार करून प्रशिक्षणाचे लक्षांक निश्चित करण्यात आले होते. सन २०१०-११ मध्ये ८ हजार लक्षांकाच्या प्रमाणात ६ हजार ७७ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. सन २०१२ मध्ये ९,०२० इतका लक्षांक निश्चित करण्यात आला होता. सन २०१२-१३ मध्ये ७,३७२ इतका लक्षांक पूर्ण झाला होता तर सन २०१३-१४ मध्ये ६,५२० विद्यार्थ्यांचा लक्षांक पूर्ण झाला होता. विभागाच्या सदर खुलाशान्वये समितीचे समाधान न झाल्यामुळे विभागीय सचिवांनी महालेखाकारांच्या आक्षेपांना नेमके उत्तर द्यावे अशी सूचना केली. समितीने पुढे अशीही विचारणा केली की, पुरवठादाराला देयक अदा करताना विद्यार्थ्यांची पटसंख्या आधारभूत मानुन देयके संबंधित संस्थेस अदा करण्यात आलेली आहेत. मात्र प्रशिक्षणासाठी प्रत्यक्ष उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येवर आधारित देयके खऱ्या अर्थाने अदा करणे आवश्यक होते तसेच पुरवठादाराने संगणक उपलब्ध करून दिले नसतांना देखील प्रती विद्यार्थी रु. ६० याप्रमाणे पुरवठादारास देयके अदा केलेली आहेत. पुरवठादाराने संगणक उपलब्ध करून दिले असल्यास त्याची निश्चित तारीख विभागाने समितीस अवगत करावी असे समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी त्यावर कथन केले की, प्रस्तुतची योजना आता विभागाने बंद केलेली असून विभागाच्या स्तरावरच संगणक लॅब तयार करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे. लेखापरिक्षणात आक्षेपित केलेल्या प्रस्तुतच्या प्रकरणाची विभाग स्तरावर सविस्तर तपासणी करून त्याबाबतची माहिती समितीस अवगत करण्यात येईल.

शिफारस—

३.१० आदिवासी विकास विभागाने सन २०१०-११ या शिक्षण सत्राकरिता शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता ५ वी ते १२ वीच्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी संगणक प्रशिक्षण योजना मंजूर केली होती. योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रकल्प अधिकाऱ्यांनी जर प्रशिक्षण विभागीय संगणकावर देण्यात आले तर रु. ५० प्रती विद्यार्थी आणि जर प्रशिक्षण पुरवठादारांच्या संगणकावर देण्यात आले तर रु. ६० प्रती विद्यार्थी या दराने खाजगी पुरवठादाराची निवड करून करार करावयाचा होता. प्रशिक्षण सत्राची कालावधी नऊ महिने होती. राज्यस्तरावर रु. २७.४४ कोटी संवितरण रकमेतून वर्ष २०१०-१५ दरम्यान रु. १५.८९ कोटी खर्च करण्यात आला. निवडक आठ प्रकल्प अधिकारी कार्यालयांमध्ये संवितरित रु. ११.७० कोटी रकमेच्या तुलनेत त्याच कालावधीत रु. ६.९१ कोटी खर्च करण्यात आला.

वर्ष २०१०-१५ दरम्यान निवडक आठ प्रकल्प अधिकारी कार्यालयातील छाननीत आढळून आले की, दररोज घेण्यात येणाऱ्या संगणक वर्गाची / तासांची संख्या, वर्गाचा कालावधी आणि प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या तसेच प्रशिक्षण कालावधी दर्शविणारे कोणतेही वेळापत्रक आखलेले नव्हते. सेवा पुरवठाद्वारे जरी आवश्यक १० संगणकांचा पुरवठा करण्यात आला नव्हता तरीही प्रकल्प अधिकाऱ्यांद्वारे रु. ६० प्रती विद्यार्थी प्रती महिना अदा करण्यात आले होते. योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये तसेच कंत्राट अटींमध्ये विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाचा किमान कालावधी नमूद करण्यात आला नव्हता. प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर, डहाणू आणि पांढरकवडा यांनी प्रशिक्षणाच्या प्रत्यक्ष दिवसांच्या संख्येची पडताळणी न करता विद्यार्थ्यांच्या संख्येला रु. ६०

ने गुणून त्या आधारावर सेवा पुरवठादारांना रक्कम अदा केली. सेवा पुरवठादाराद्वारे देण्यात आलेल्या कार्य अहवालाच्या आधारावरच प्रकल्प अधिकाऱ्यांमार्फत कराराचे नुतनीकरण करण्यात आले. सेवा पुरवठादाराद्वारे सादर करण्यात आलेल्या अहवालाचे तथ्य तपासणीकरिता प्रकल्प अधिकाऱ्यांनी वर्ष २०१०-१५ दरम्यान स्वतंत्र मुल्यमापन केले नव्हते तसेच प्रशिक्षणाच्या प्रभावाचे विश्लेषण देखिल करण्यात आलेले नव्हते. त्याचप्रमाणे प्रकल्प अधिकारी, डहाणू अधिनस्त १७ आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना देण्यात आलेले संगणक प्रशिक्षण सुयोग्य नव्हते. परिणामी या आश्रमशाळांचे विद्यार्थी प्रशिक्षणानंतरही संगणकावर मुलभूत काम करण्यास अपयशी ठरले.

साक्षीदरम्यान, सदरहू योजना आता बंद झाल्याचे समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले. मात्र, लेखापरिक्षणात आक्षेपित करण्यात आलेल्या उपरोल्लेखित मुद्यांबाबत विभागास कोणतीही तपशीलवार माहिती समितीस उपलब्ध करून देता आली नाही. विभागीय सचिवांनी याप्रकरणी सविस्तर तपासणी करून समितीस त्याप्रमाणे अवगत करण्यात येईल असे विदित केले. १५ कोटी पेक्षा जास्त खर्च त्या शुल्का अंतर्गत राज्यात झाले तरी माहिती अप्राप्त आहे. समितीस उपरोक्तप्रमाणे आश्वासित केल्यानुसार प्रस्तुत प्रकरणी विभागाने सत्वर उच्चस्तरीय चौकशी समिती स्थापन करून या प्रकरणी लेखापरिक्षणातील मुद्देनिहाय सखोल चौकशी करून संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून दोषींविरुद्ध नियमानुसार योग्य ती कारवाई करावी, अशी समितीची आग्रही शिफारस आहे. शिफारशीनुरुप केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस दोन महिन्यांत उपलब्ध करून देण्यात यावी.

परिच्छेद क्रमांक २.२.२.६—गणवेशाचे प्रापण आणि वाटप पद्धतीत विसंगती—

अभिप्राय—

३.११ राज्यातील सर्व शासकीय आश्रमशाळांमधील आदिवासी विद्यार्थ्यांना प्रत्येक शिक्षणसत्राच्या सुरूवातिलाच म्हणजेच प्रत्येक वर्षी १५ जून पर्यंत आदिवासी विकास विभागामार्फत गणवेष पुरविण्यात यावयास पाहिजे होता. वर्ष २०१०-१५ दरम्यान आदिवासी विकास विभागामार्फत खरेदी आणि वितरण केलेल्या गणवेषाच्या दस्तावेजांच्या छाननीत निदर्शनास आले की, वर्ष २०१०-११, २०११-१२ आणि २०१४-१५ दरम्यान आदिवासी विकास विभागाने आश्रमशाळांना प्रत्येक वर्षी जून/जुलै महिन्यात कापड पुरविले होते. परंतू विद्यार्थ्यांना तयार गणवेष पुरविण्यात आल्याच्या तारखा आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्याकडे उपलब्ध नव्हत्या. वर्ष २०१२-१३ दरम्यान तीन महिन्यांच्या विलंबाने आश्रमशाळांना तयार गणवेषाचा पुरवठा करण्यात आला. वर्ष २०१३-१४ मध्ये माहे ऑक्टोबर, २०१३ ते मार्च २०१४ (तीन महिने ते १० महिन्यांच्या विलंबाने) दरम्यान आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांना गणवेश भत्ते देण्यात आले. परंतू विद्यार्थ्यांना गणवेष वाटप केल्याच्या तारखा आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्याकडे उपलब्ध नव्हत्या. वर्ष २०१०-१५ दरम्यान, निवडलेल्या ५२ पैकी फक्त एका आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना सन २०१०-११ या वर्षात वेळेत गणवेष पुरविण्यात आला. तसेच, उर्वरित चार वर्षात गणवेश वाटपाला नऊ महिन्यांपर्यतचा विलंब झाला. अशाप्रकारे गणवेष प्रापण आणि वाटपाच्या पद्धतीमधील विसंगतिमुळे शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना गणवेष उपलब्ध होण्यामध्ये विलंब झाला.

विभागाच्या खुलाशानुसार व विभागीय सचिवांच्या साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आले की, सन २०१०-११ या शैक्षणिक सत्रात शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना गणवेष कापड पुरवठा करणेसाठी संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग सह. महासंघ मर्या. मुंबई यांना दि. ३०/०३/२०१० रोजी पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्यानुसार माहे जुलै, २०१० अखेर प्रकल्पस्तरावर कापडाचा पुरवठा करून शिलाई पूर्ण करून माहे ऑगस्ट, २०१० अखेर गणवेष संच पुरविले आहेत.

सन २०११-१२ या शैक्षणिक सत्रात शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना गणवेष कापड पुरवठा करणेसाठी संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग सह. महासंघ मर्या. मुंबई यांना दि. ३०.०३.२०११ रोजी पुरवठा आदेश देण्यात आला होता. त्यानुसार माहे ऑगस्ट, २०११ अखेर प्रकल्पस्तरावर कापडाचा पुरवठा करून शिलाई पूर्ण करून माहे सप्टेंबर, २०११ अखेर गणवेष संच पुरविले आहेत.

सन २०१२-१३ या शैक्षणिक सत्रात शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना गणवेष पुरवठा करणेसाठी मे. श्री. जगदंबा महिला रेडीमेड ड्रेसेस विविध उत्पादन सहकारी औद्योगिक संस्था, मर्या., सोलापूर यांना रेडीमेड गणवेष पुरवठा करणेसाठी पुरवठा आदेश देण्यात आले होते. त्यानुसार माहे ऑक्टोबर, २०१२ अखेर रेडीमेड ड्रेस वाटप करण्यात आले आहेत.

सन २०१३-१४ या शैक्षणिक सत्रात शासकीय आश्रमशाळेतील गणवेष ऐवजी थेट रक्कम विद्यार्थ्यांचे बँक खात्यात जमा करणेसाठी शासन निर्णय दिनांक १२/०९/२०१३ नुसार तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार विद्यार्थ्यांचे बँक खात्यावर रक्कम जमा करण्यात आली.

सन २०१४-१५ या शैक्षणिक सत्रात गणवेश कापडाचे रंग व डिझाइनमध्ये बदल करण्यात आला. त्यानुसार निश्चित केलेली कापडनिहाय मागणी विचारात घेऊन कापडासाठी दरकरारधारक व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांना दर करारातील मंजूर दराप्रमाणे पुरवठा आदेश निर्गमित करण्यात आला. तथापि, मागणीनुसार कापड तयार करून ते वाटप करण्यासाठी महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांना काहीअंशी विलंब झालेला आहे व त्यानुसार दंडनीय रक्कम वसुल करण्यात आलेली आहे.

शैक्षणिक सत्र माहे जूनमध्ये सुरू झाल्यानंतर वर्ष २०१० ते २०१५ दरम्यान सुमारे तीन ते पाच महिने विलंबाने विद्यार्थ्यांना गणवेश पुरवठा करण्यात आलेला असून विभागाने गणवेशांसदर्भातील धोरण बदलताना शैक्षणिक वर्षाची सुरुवात लक्षात घेऊन त्यापूर्वी धोरणात बदल करणे आवश्यक होते. नवीन धोरण निश्चित करण्यात विलंब झाल्याने विद्यार्थ्यांना एका वर्षी रोख रक्कम तर दुसऱ्या वर्षी सहा महिने उशिराने गणवेश पुरविणे ही बाब योग्य नाही असे समितीने मत प्रदर्शित केले. वर्ष २०१२-१३ मध्ये जगदंबा रेडिमेड ड्रेसेस यांना गणवेश पुरवठा आदेश दि. २१ मे, २०१२ रोजी करूनही गणवेशाचा प्रत्यक्ष पुरवठा पाच महिने विलंबाने माहे ऑक्टोबर, २०१२ मध्ये करण्यात आल्याने पुरवठादारास दंड आकारण्यात आला आहे किंवा कसे, तसेच पुरवठादाराच्या कार्यारंभाच्या आदेशात गणवेश पुरवठा करण्यासाठी निश्चित असा कालावधी नमूद करण्यात आला होता किंवा कसे तसेच त्याबाबतच्या अटी व शर्ती काय होत्या, पुरवठादाराने विलंबाने गणवेशाचा पुरवठा केला असल्यास पुरवठादारावर काय कार्यवाही केली, अशी कार्यवाही केली गेली नसल्यास त्यासाठी जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कार्यवाही करण्यात आली, अशी समितीने पृच्छा केली असता यासंदर्भात सविस्तर तपासणी करून समितीस याबाबत अवगत करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

शिफारस—

३.१२ राज्यातील सर्व शासकीय आश्रमशाळांमधील आदिवासी विद्यार्थ्यांना प्रत्येक शिक्षणसत्राच्या सुरुवातीलाच १५ जूनपर्यंत आदिवासी विकास विभागामार्फत गणवेश पुरविणे आवश्यक आहे. वर्ष २०१० ते २०१५ दरम्यान आदिवासी विकास विभागामार्फत खरेदी आणि वितरण केलेल्या गणवेशाच्या दस्तऐवजांच्या छाननीत आढळून आले की, वर्ष २०१०-११, वर्ष २०११-१२ आणि वर्ष २०१४-१५ दरम्यान आदिवासी विकास विभागाने आश्रमशाळांना प्रत्येक वर्षी माहे जून/जुलै महिन्यात कापड पुरविले होते. मात्र विद्यार्थ्यांना तयार गणवेश पुरविण्यात आल्याच्या तारखा आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्याकडे उपलब्ध नव्हत्या. वर्ष २०१२-१३ दरम्यान तीन महिन्यांच्या विलंबाने आश्रमशाळांना तयार गणवेशांचा पुरवठा करण्यात आला. वर्ष २०१३-१४ मध्ये माहे ऑक्टोबर, २०१३ ते मार्च २०१४ दरम्यान तीन महिने ते दहा महिन्यांच्या विलंबाने आश्रमशाळांच्या मुख्याध्यापकांना गणवेश भत्ते देण्यात आले. मात्र विद्यार्थ्यांना गणवेष वाटप केल्याच्या तारखा आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्याकडे उपलब्ध नव्हत्या. वर्ष २०१०-१५ दरम्यान, निवडलेल्या ५२ पैकी फक्त एका आश्रमशाळेत विद्यार्थ्यांना वेळेत गणवेश पुरविण्यात आले. उर्वरित चार वर्षात गणवेश वाटपाला नऊ महिन्यांपर्यंतचा विलंब झाला.

साक्षीदरम्यान, विभागीय सचिवांनी समितीस विदित केले की, सन २०१०-११ या शैक्षणिक सत्रात शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश कापड पुरवठा करणेसाठी संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग सह. महासंघ मर्या., मुंबई यांना दि. ३० मार्च, २०१० रोजी पुरवठा आदेश देण्यात आला. मात्र त्यांचेकडून माहे जुलै, २०१० अखेर प्रकल्पस्तरावर कापडाचा पुरवठा केल्यानंतर शिलाई पूर्ण करून माहे ऑगस्ट, २०१० अखेर गणवेश पुरविले गेले. सन २०११-१२ या शैक्षणिक सत्राकरिता संचालक, महाराष्ट्र राज्य हातमाग महासंघास दि. ३० मार्च, २०११ रोजी पुरवठा आदेश देण्यात आला मात्र त्यांचेकडून माहे ऑगस्ट, २०११ अखेर प्रकल्पस्तरावर कापडाचा पुरवठा केल्यानंतर शिलाई पूर्ण करून माहे सप्टेंबर, २०११ अखेर गणवेश पुरविले गेले. सन २०१२-१३ या शैक्षणिक सत्राकरिता जगदंबा रेडिमेड ड्रेसेस, सोलापूर यांना दि. २१ मे, २०१२ रोजी पुरवठा आदेश देण्यात आला. उक्त संस्थेने माहे ऑक्टोबर, २०१२ अखेर तयार गणवेशांचा पुरवठा केला. सन २०१३-१४ या शैक्षणिक सत्राकरिता गणवेशाऐवजी विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर थेट रक्कम जमा करण्यात आली. सन २०१४-१५ या शैक्षणिक सत्रात गणवेश कापडाचे रंग व डिझाईनमध्ये बदल करण्यात आल्याने त्यानुसार निश्चित केलेल्या कापडासाठी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ यांना पुरवठा आदेश देण्यात आला. मात्र मागणीनुसार कापड तयार करून ते वाटप करण्यासाठी उक्त महामंडळाने विलंब लावला.

विभागाच्या उपरोक्त खुलाशाने समितीचे अजिबात समाधान झालेले नाही. लेखापरिक्षणाच्या वर्ष २०१०-१५ या कालावधीत विभागाच्या गणवेश वाटपात कोणतेही सातत्य नव्हते. दर शैक्षणिक सत्राला गणवेशाचे आत्यंतिक विलंबाने वाटप झालेले आहे. एका वर्षी गणवेशाचे कापड घेऊन प्रकल्पस्तरावर त्याची शिलाई करण्यात आली तर दुसऱ्या वर्षी तयार गणवेश विकत घेण्याचा निर्णय झाला. तिसऱ्या वर्षी गणवेश न देता विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट रक्कम जमा करण्याचा निर्णय घेण्यात आला तर नंतरच्या वर्षी पुन्हा रंग व डिझाईन बदलून गणवेशाचे कापड विकत घेण्यात आले. हे सगळे पाहता विभागाच्या गणवेश वाटपाच्या धोरणात कोठेही सुसंगती व एकवाक्यता दिसून न येता त्यामध्ये कमालीचा विस्कळीतपणा असल्याचे समितीच्या निदर्शनास आले असून समिती यासंदर्भात अतिशय नाराजी व्यक्त करीत आहे.

सन २०१२-१३ या शैक्षणिक सत्राकरिता श्री. जगदंबा महिला रेडीमेड ड्रेसेस सहकारी औद्योगीक संस्थेस आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना तयार गणवेशाचे वाटप करण्याचे आदेश माहे मे, २०१२ मध्ये दिले असतांनाही उक्त संस्थेने गणवेशांचा प्रत्यक्ष पुरवठा हा माहे ऑक्टोबर, २०१२ मध्ये खूप विलंबाने केलेला आहे. पुरवठादाराने गणवेशांचा पुरवठा विलंबाने केल्याबद्दल पुरवठादारावर

कारवाई करण्यात आली आहे काय ? तसेच पुरवठादारावर कारवाई करण्यात आली नसल्यास, त्यास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली आहे याबाबत सविस्तर तपासणी करण्यात येऊन समितीस अवगत करण्यात येईल, असे समितीस विदित करण्यात आले आहे.

समितीस उपरोक्त प्रमाणे आश्वस्त केल्यानुसार प्रस्तुत प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित सर्व दोषींविरुद्ध नियमानुसार उचित अशी कारवाई करून त्याबाबत समितीस दोन महिन्यांत अवगत करावे, अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक २.२.३.१—शैक्षणिक योजनांतर्गत भरीव बचत—

अभिप्राय—

३.१३ जिल्ह्यातील आदिवासी लोकांच्या कल्याणाकरिता DPDC द्वारे मंजूर विविध योजना/कार्यांच्या अंमलबजावणिकरिता आदिवासी विकास विभागातर्फे जिल्हाधिकाऱ्यामार्फत प्रकल्प अधिकाऱ्यांना निधीचे वाटप करण्यात येते. आदिवासी विकास विभागआदिवासींच्या फायद्याकरिता राज्य शासनाच्या इतर समांतर विभागांनासुद्धा आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्यामार्फत विविध योजना/उपक्रमांच्या अंमलबजावणीसाठी निधीचे वाटप करण्यात येते.

वर्ष २०१०-१५ दरम्यान आदिवासी उपयोजनेंतर्गत (TSP) आदिवासी विकास विभागाला शैक्षणिक योजनांकरिता वाटप केलेली तरतूद, प्रत्यक्ष झालेला खर्च आणि बचत यांचे अवलोकन केले असता वर्ष २०१०-११ करिता शैक्षणिक योजनांसाठी करण्यात आलेली अर्थसंकल्पीय तरतूद रु. ४५५.२७ कोटी इतकी होती. प्रत्यक्ष खर्च रु. ४१९.२० कोटी झाला तर निव्वळ बचत रु. ३६.०७ कोटी झाली. वर्ष २०११-१२ करिता शैक्षणिक योजनांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद रु. ६४८.०१ कोटी तर प्रत्यक्ष खर्च रु. ५२३.४० कोटी झाला व निव्वळ बचत रु. १२४.६१ कोटी झाली. वर्ष २०१२-१३ करिता शैक्षणिक योजनांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद रु. ७६१.२० कोटी तर खर्च रु. ६३२.०३ कोटी होऊन निव्वळ बचत रु. १२९.१७ कोटी झाली. वर्ष २०१३-१४ करिता शैक्षणिक योजनांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद रु. १०२७.१८ कोटी तर खर्च रु. ९५१.४५ कोटी झाला व निव्वळ बचत रु. ७५.७३ कोटी झाली. वर्ष २०१४-१५ करिता शैक्षणिक योजनांसाठी अर्थसंकल्पीय तरतूद रु. ११७८.३० कोटी तर खर्च रु. ९२५.१० कोटी झाला व निव्वळ बचत रु. २५३.२० कोटी झाली. अशा रीतीने वर्ष २०१०-११ ते २०१४-१५ या दरम्यान शैक्षणिक योजनांतर्गत एकूण रु. ६१८.७८ कोटी इतकी बचत झालेली दिसून येते.

सदरहू बचत ही मुख्यतः अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृहे सुरू करणे आणि त्यांची देखभाल करणे, शासकीय आश्रमशाळांमधील शिक्षकांना सेवेत प्रशिक्षण देणे, शासकीय आश्रमशाळा आणि वसतिगृहांचे बांधकाम, आश्रमशाळांमध्ये मुलींच्या वसतिगृहांचे बांधकाम आणि सुवर्ण-महोत्सवी आदिवासी पूर्व-माध्यमिक शिष्यवृत्ती योजना अशा विविध योजनांत झालेल्या बचतीमुळे झालेली होती.

निवडलेल्या चंद्रपूर, डहाणू, धारणी, जव्हार, नागपूर, नाशिक, नंदुरबार आणि पांढरकवडा या आठ प्रकल्प अधिकारी कार्यालयांत वर्ष २०१०-१५ दरम्यान अर्थसंकल्पीय तरतूद आणि शैक्षणिक योजनांवर झालेला खर्च याचे अवलोकन केले असता रु. २१४.६१ कोटी इतकी शैक्षणिक योजनांतर्गत बचत झाल्याचे दिसून येते.

विभागाच्या खुलाशात नमूद केल्याप्रमाणे, जिल्हा वार्षिक आदिवासी घटक कार्यक्रम व राज्यस्तर योजनांसाठी नियतव्ययाची मागणी ही जिल्ह्याचे पालकमंत्री/संबंधित जिल्हाधिकारी/प्रकल्प अधिकारी/संबंधित कार्यान्वय यंत्रणा यांच्या समंतीने शासनास सादर होते. शासनस्तरावरून मा. मंत्री, आदिवासी विकास यांच्या अध्यक्षतेखाली प्राप्त आराखडे राज्यस्तरीय बैठकांमध्ये चर्चा होऊन अंतिम केले जातात. आदिवासी उपयोजनेअंतर्गत असलेल्या विविध शैक्षणिक योजना आणि कार्यांचा वित्तीय अंदाजपत्रके आणि मंजूर निधी त्या वर्षातील अर्थसंकल्पीय तरतुदीला अधीन राहुन खर्च केला जातो. मागासवर्गीयांचे कल्याण (विशेष क्षेत्र) जिल्हास्तर व राज्यस्तर योजनांमध्ये ज्या योजनांसाठी दोन्ही स्तोत्रांमध्ये बाबनिहाय निधीची मागणी करतांना दोन्ही स्तोत्रांद्वारे केलेल्या मागणीची पडताळणी करून योग्य व आवश्यक तेवढी नियतव्ययाची मागणी करणे बाबत वेळोवेळी झालेल्या बैठकांमध्ये सूचना देण्यात आलेल्या आहेत. जिल्हा वार्षिक आदिवासी उपयोजना/घटक कार्यक्रम आराखडे तयार करतांना नियतव्ययाच्या मागणीच्या अनुषंगाने मार्गदर्शक सूचना दरवर्षी शासनस्तरावरून माहे ऑक्टोबर महिन्यात परिपत्रकाद्वारे जिल्हा व विकासशिर्षनिहाय आर्थिक कमाल मर्यादा निश्चित करण्यात येत आहे. लेखापरिक्षक निष्कर्षामध्ये नमूद केलेल्या बाबीचे काही प्रमाणात प्रारुप आराखडे सादर करण्यात येत आहेत. शैक्षणिक योजनांसाठी आवश्यक तेवढी तरतूद खर्च करण्यात येते. त्यानंतरची बचत अन्य योजनांसाठी पुनर्विनियोजनाने वळती करून खर्च करण्यात आलेली आहे.

साक्षी दरम्यान, विभागीय सचिवांनी कथन केले की, शैक्षणिक बाबींवर सन २०१०-११ मध्ये ८१.८ टक्के, सन २०११-१२ मध्ये ८९ टक्के, सन २०१२-१३ मध्ये ८८ टक्के, सन २०१३-१४ मध्ये ९४.७ टक्के, सन २०१५-१६ मध्ये ९७.२ टक्के, सन २०१६-१७ मध्ये ९५ टक्के व सन २०१७-

१८ मध्ये ८८ टक्के अशी एकूण खर्चाची टक्केवारी आहे. उक्त वर्षामध्ये वित्त विभागाने विभागाच्या निधीमध्ये सन २०१०-११ मध्ये १० टक्के, सन २०११-१२ मध्ये १५ टक्के, सन २०१२-१३ मध्ये २० टक्के, सन २०१३-१४ मध्ये २० टक्के व सन २०१४-१५ मध्ये २५ टक्के आर्थिक कपात केली होती.

अनुसूचित जाती व जमातींच्या योजनेसाठी विभागांना दिलेल्या निधीतून वित्त विभागाला कपात करता येते का अशी समितीने विचारणा केली असता, वित्त विभागाकडून सर्वच विभागांच्या निधीमध्ये सरसकट कपात करण्यात येत असल्याचे समितीस सांगण्यात आले. त्यावर विभागाच्या निधीमध्येच कपात करण्यात येत असेल तर बचतीचा विषय खऱ्या अर्थाने उद्‌भवू नये. एका बाजूला विभागाच्या निधीमध्ये कपात करण्यात येते तर दुसऱ्या बाजुला लेखापरिक्षणामध्ये बचतीचा मुद्दा निदर्शनास येतो. कपात करण्यात येत असलेला निधी जर बचत म्हणून दर्शविण्यात येत असेल तर विनाकारण त्यामुळे विभागावर आक्षेप घेण्याची शक्यता नसते. सबब, यासंदर्भात वित्त विभागाने काही ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे, असे समितीने मत प्रदर्शित केले.

शिफारस—

३.१४ वर्ष २०१०-१५ दरम्यान आदिवासी उपयोजनेंतर्गत (TSP) आदिवासी विकास विभागाला शैक्षणिक योजनांकरिता वाटप केलेली तरतूद, प्रत्यक्ष झालेला खर्च आणि बचत यांचे अवलोकन केले असता वर्ष २०१०-११ पासून सन २०१४-१५ एकूण उपलब्ध निधीतून अभिप्रायामध्ये दर्शविल्याप्रमाणे प्रत्येक वर्षी मोठ्या प्रमाणात निधी अखर्चित राहीला. अशा रीतीने वर्ष २०१०-११ ते २०१४-१५ या दरम्यान शैक्षणिक योजनांतर्गत एकूण रु. ६१८.७८ कोटी इतकी बचत झालेली दिसून येते.

साक्षीदरम्यान, समितीच्या निदर्शनास आणून दिल्याप्रमाणे शैक्षणिक बाबींवर सन २०१०-११ मध्ये ८१.८ टक्के, सन २०११-१२ मध्ये ८९ टक्के, सन २०१२-१३ मध्ये ८८ टक्के, सन २०१३-१४ मध्ये ९४.७ टक्के, सन २०१५-१६ मध्ये ९७.२ टक्के, सन २०१६-१७ मध्ये ९५ टक्के व सन २०१७-१८ मध्ये ८८ टक्के अशी एकूण खर्चाची टक्केवारी आहे. उक्त वर्षामध्ये वित्त विभागाने विभागाच्या निधीमध्ये सन २०१०-११ मध्ये १० टक्के, सन २०११-१२ मध्ये १५ टक्के, सन २०१२-१३ मध्ये २० टक्के, सन २०१३-१४ मध्ये २० टक्के व सन २०१४-१५ मध्ये २५ टक्के आर्थिक कपात करण्यात आली होती.

समितीस विदीत करण्यात आल्यानुसार, वित्त विभागाकडून आर्थिक वर्षाच्या अखेरीस सर्वच विभागांच्या निधीतून सरसकट कपात करण्यात येत असेल तर बचतीचा विषय खऱ्या अर्थाने उद्‌भवू नये. एका बाजूला विभागाच्या निधीमध्ये कपात करण्यात येते तर दुसऱ्या बाजुला लेखापरिक्षणामध्ये बचतीचा मुद्दा निदर्शनास येतो. कपात करण्यात येत असलेला निधी जर बचत म्हणून दर्शविण्यात येत असेल तर विनाकारण त्यामुळे विभागावर आक्षेप घेण्याची शक्यता नसते. उक्त आक्षेपांचे निराकरण करण्यामध्ये विभागाचा व त्यासोबत समिती व महालेखाकार कार्यालयाचा देखील नाहक वेळ खर्ची पडतो. सबब, यासंदर्भात वित्त विभागाने महालेखाकार कार्यालयासोबत समन्वय साधून यासंदर्भातील कार्यप्रणालीमध्ये ठोस अशी सुधारणा करावी, अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक २.२.३.२—रोकडवही आणि बँकेच्या शिल्लक रक्कमेत लक्षणीय फरक—

अभिप्राय—

३.१५ लेखापरिक्षणाकरिता निवडलेल्या आठ प्रकल्प अधिकारी कार्यालयांतील माहे मार्च २०१५ च्या रोकडवही आणि बँकेच्या विवरणपत्रांच्या पडताळणीत डहाणू प्रकल्प कार्यालयात रु. ४४.०७ कोटी, जव्हार प्रकल्प कार्यालयात रु. २.५४ कोटी, नंदुरबार प्रकल्प कार्यालयात रु. ११.४२ कोटी, नाशिक प्रकल्प कार्यालयात रु. ५३.२० कोटी, नागपूर प्रकल्प कार्यालयात रु. १८.६७ कोटी, चंद्रपूर प्रकल्प कार्यालयात रु. १९.३२ कोटी, धारणी प्रकल्प कार्यालयात रु. १.०३ कोटी तर पांढरकवडा प्रकल्प कार्यालयात रु. ०.२० कोटी इतकी फरकाची रक्कम आढळली. विशेषतः प्रकल्प अधिकारी, नाशिक, नागपूर, चंद्रपूर आणि पांढरकवडा येथील स्थिती चिंताजनक आढळली. कारण बँकेची अखेरची शिल्लक ही रोकड वहीच्या अखेरच्या शिल्लक रक्कमेपेक्षा सुमारे रु. ०.२० कोटी ते रु. ५३.२० कोटी इतकी खूप कमी होती, ज्यावरून शासकीय पैशांची संभाव्य अफरातफर झाल्याचा संशय येतो. लेखापरिक्षेस पुढे असे आढळले की, ही परिस्थिती दीर्घावधीसाठी कायम होती, जेव्हा की प्रत्येक अतिरीक्त आदिवासी आयुक्तकार्यालयात त्यांच्या अधिपत्याखाली एक मुख्य लेखा आणि वित्त अधिकारी (CAFO) होते आणि आदिवासी आयुक्तस्तरावर एक उपायुक्त (वित्त) होते.

साक्षीदरम्यान, विभागीय सचिवांनी कथन केले की, दि. ३१ मार्च, २०१५ रोजी वर नमूद प्रकल्प अधिकाऱ्यांच्या कार्यालयात रोकडवहीतील शिल्लक रक्कम आणि बँकेतील शिल्लक रक्कम यामध्ये खुप तफावत असल्याचे निदर्शनास आले होते. यात साधारणतः आठ प्रकल्प अधिकारी

कार्यालयांचा समावेश होता. दि. ३१ मार्च हा वर्ष अखेरचा दिवस असल्याने उक्त दिवशी पारित झालेल्या देयकांचे धनादेश कोषागारातून माहे एप्रिल महिन्यामध्ये प्राप्त झालेले असल्याने दि. ३१ मार्च, २०१५ अखेर रोकडवहीत जादा शिल्लक तर बँक खात्यात कमी शिल्लक दिसून येत आहे. दि. ३१ मार्च, २०१५ अखेर रोकडवही व बँक खाते पुस्तक यामध्ये तफावत माहे एप्रिल, २०१५ मध्ये बहुतांशी दूर झालेली आहे. माहे मार्च, २०१८ पर्यंत रोकड वही व बँक खात्यातील रकमांचा मेळ घालण्याचे काम (Reconciliation) पूर्ण करण्यात आलेले आहे. त्यानुसार पाच प्रकल्प अधिकारी कार्यालयातील तफावत तपासणीअंती निरंक झालेली आहे. डहाणू प्रकल्प अधिकारी कार्यालयात मात्र रु. १२ लाख ५० हजार इतकी तफावत आढळलेली आहे. त्यावर विभागाच्या लेखी स्पष्टीकरणात नमूद केल्याप्रमाणे विवरणपत्रानुसार रु.३२.४४ कोटी शिल्लक असल्याने रु. ११.४२ कोटीची तफावत दिसून येते. तसेच प्रकल्प अधिकारी, नंदुरबार यांच्या दि. २३ एप्रिल, २०१८ रोजीच्या पत्रान्वये दि. ३१ मार्च, २०१५ रोजी प्रत्यक्ष रोकडवहीची तपासणी केली असता रु. ८७.४० कोटींची तफावत आढळून आली असल्याचे समितीने निदर्शनास आणून दिले असता विभागीय सचिवांनी कथन केले की, त्यावेळी १ कोटी ८ लाख २६ हजार रुपयांची तफावत दिसून येत होती. त्यानंतर एका पथकामार्फत त्याची तपासणी केली असता अंतिमतः रु. ९७ लक्ष इतकी तफावत आढळून आली. त्यावर सदरहू रकमांमध्ये फार मोठा फरक दिसून येत असून माहे ऑक्टोबर ते डिसेंबर या दरम्यान जरी कामे पूर्ण झाली तरी त्याबाबतचे धनादेश हे दि. ३१ मार्च रोजी दिले जातात. ही बाब संयुक्तीक नसून उपलब्ध असलेल्या निधीतून देयके वेळोवेळी अदा करण्याची भूमिका विभागाने ठेवणे आवश्यक असल्याचे मत प्रदर्शित करून याबाबतची नेमकी कारणमिमांसा जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, नेहमीच्या पद्धतीनुसार विभागाच्या मंजूर निधीत साधारणतः २० ते ३० टक्के पर्यंत कपात करण्यात येत असते. विशेष बाब म्हणून सदरहू निधी Restore करावयाचा झाल्यास असे निर्णय साधारणतः मार्च महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात होत असतात. साहजिकच निधी वितरणास मंजुरी देऊन प्रत्यक्ष धनादेश निर्गमित करण्याची कार्यवाही ही दि. ३१ मार्च अखेरपर्यंत सुरू राहते. अशा रितीने धनादेशांचे प्रत्यक्ष रोखीकरण होण्याकरिता पुढील आर्थिक वर्षातील माहे एप्रिल मधील पहिल्या वा दुसऱ्या आठवड्यापर्यंतचा कालावधी लागतो आणि तोपर्यंत अशा रकमा बँक खाते पुस्तकात प्रतिबिंबीत होत नसतात. बँक खाते पुस्तक व रोकडवहीतील रकमांमधील तफावतीचे हे एक मुख्य कारण आहे. विभागाने आता माहे मार्च, २०१८ पर्यंतच्या रकमांचा ताळमेळ घालण्याचे काम पूर्ण केलेले असून सहा प्रकल्प अधिकारी कार्यालयातील रकमांमधील तफावत निरंक झालेली आहे. नाशिक येथील मुख्य लेखा आणि वित्तीय अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या पथकाकडून उर्वरित दोन प्रकल्प अधिकारी कार्यालयांतील रकमांच्या तफावतीमधील फरकाची तपासणी करण्याचे काम विभागामार्फत सुरू आहे. यापुढील काळात देयकांच्या रक्कमा अदा करताना RTGS कार्यपद्धती बंधनकारक करण्याबाबत विभागामार्फत सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

शिफारस—

३.१६ लेखापरिक्षणात आक्षेपिलेले उपरोक्त मुद्दे हे अतिशय गंभीर आहेत. लेखापरिक्षणाकरिता निवडलेल्या डहाणू, जव्हार, नंदुरबार, नाशिक, नागपूर, चंद्रपूर, धारणी व पांढरकवडा या आठ प्रकल्प कार्यालयांतील माहे मार्च, २०१५ च्या रोकडवही आणि बँकेच्या विवरण पत्रांच्या पडताळणीत अभिप्रायात नमूद केल्याप्रमाणे लक्षणीय फरक आढळून आला. विशेषतः प्रकल्प अधिकारी, नाशिक, नागपूर, चंद्रपूर आणि पांढरकवडा या कार्यालयातील स्थिती अधिक चिंताजनक आढळली. विभागीय सचिवांच्या साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, प्रचलित पद्धतीनुसार मंजूर निधीच्या प्रत्यक्ष वितरणात वित्त विभागाकडून काही अंशी मर्यादा घालण्यात येत असतात. विशेष बाब म्हणून असा निधी मंजूर करून घ्यावयाचा झाल्यास ही कार्यवाही वित्तीय वर्षाच्या अखेरीस मार्च महिन्याच्या साधारणतः शेवटच्या आठवड्यात केली जाते. त्यामुळे आर्थिक वर्षाच्या अगदी शेवटी असा निधी प्राप्त होत असतो. त्यामुळे देयके अदा करण्यासाठी जरी माहे मार्च महिन्यात धनादेश देण्यात आले असले तरी बँकामार्फत ते पारित होऊन त्यांचे प्रत्यक्ष रोखीकरण हे लगतच्या एप्रिलच्या महिन्यातील पहिल्या वा दूसऱ्या आठवड्यात होत असते. रोकडवही आणि बँकेच्या शिल्लक रक्कमेतील दिसणाऱ्या तफावतीचे हे एक प्रमुख कारण आहे. तथापि, विभागाने आता माहे मार्च, २०१८ पर्यंत रोकडवही आणि बँक खात्यातील नोंदीनुसार रकमांचा मेळ (Reconciliation) घालून घेतलेला आहे. त्यानुसार सहा प्रकल्प अधिकारी कार्यालयातील तफावत रक्कम निरंक झालेली आहे. समिती त्याबाबत समाधान व्यक्त करते. तथापि, लेखापरिक्षणात आक्षेपित करण्यात आलेल्या उर्वरित दोन प्रकल्प अधिकारी कार्यालयासंदर्भातील रोकडवही आणि बँकेच्या शिल्लक रक्कमेतील फरकाचा ताळमेळ घालण्यासाठी विभागाने तातडीने कार्यवाही करावी. कार्यवाही अंती शासकीय निधीच्या अफरातफरीची संभाव्यता आढळल्यास त्यासंदर्भात तातडीने चौकशी करून संबंधित दोषींविरुद्ध नियमानुसार कडक फौजदारी (Criminal) स्वरुपात कारवाई करण्यात यावी. तसेच देयके अदा करण्याची कार्यपद्धत अधिक पारदर्शी आणि गतीमान करण्याकरिता सर्व प्रकल्प अधिकारी कार्यालयांनी यापुढील काळात RTGS सारख्या अद्ययावत पद्धतींचा अंगिकार करणे बंधनकारक करावे व त्यासंदर्भात विभागाने तातडीने परिपत्रकान्वये आदेश निर्गमित करावेत अशी समिती शिफारस करीत आहे.

त्याचप्रमाणे लेखापरिक्षणाकरिता मोजक्याच निवडलेल्या आठ प्रकल्प अधिकारी कार्यालयातील रोकडवही व बँकेच्या शिल्लक रकमेत लाक्षणिय फरक आढळून आलेला आहे. उर्वरित सर्वच प्रकल्प अधिकारी कार्यालयांच्या बाबतीत अशाच प्रकारची स्थिती असण्याची समितीस दाट शंका आहे. सबब, विभागाने आपल्या अधिनस्त सर्वच प्रकल्प अधिकारी कार्यालयांच्या संदर्भात रोकडवही व बँक खात्यातील शिल्लक रकमां याबाबतचा ताळमेळ घालण्यासाठी एक ठोस कार्यक्रम हाती घ्यावा व आर्थिक अनियमितता अथवा गैरव्यवहार आढळून येणाऱ्या प्रकरणांत संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून दोषींविरुद्ध तातडीने कडक कारवाई करण्यात यावी, अशी देखील समिती शिफारस करीत आहे.

समितीच्या उक्त शिफारशींनुसार केलेल्या कार्यवाहीची विस्तृत माहिती समितीस दोन महिन्यांत उपलब्ध करून देण्यात यावी.

परिच्छेद क्रमांक २.२.३.३—अखर्चित रक्कम—

अभिप्राय—

३.१७ महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या तरतूदींनुसार शासकीय कोषागारातून तात्काळ वितरणासाठी लागणाऱ्या रक्कमेशिवाय अन्य कोणतीही रक्कम काढता येत नाही. असे असताना चार प्रकल्प अधिकारी, एक अतिरिक्त आदिवासी आयुक्त आणि आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्या दस्ताऐवजांच्या नमुना चाचणीत असे आढळून आले की, माहे मार्च, २००८ ते डिसेंबर, २०१४ दरम्यान शासकीय कोषागारातून १४३ देयकांद्वारे काढलेली रु. १२९.५९ कोटी रक्कम माहे मार्च, २०१५ पर्यंत अखर्चित होती. रु. १२९.५९ कोटीपैकी रु. ३३.४६ कोटी रक्कम विविध शैक्षणिक योजना आणि कार्यासाठी होती. सर्व अखर्चित रक्कम प्रकल्प अधिकारी/अतिरिक्त आदिवासी आयुक्त/आदिवासी आयुक्त यांच्या बँक खात्यात ठेवण्यात आली होती.

साक्षीदरम्यान, विभागीय सचिवांनी असे नमूद केले की, ३१ मार्च, २०१५ पर्यंत अखर्चित असलेली रक्कम रु. १२९ कोटी ही कमी होऊन ती आजमितीस रक्कम रु. ३३ कोटी पर्यंत आलेली आहे. आदिवासी आयुक्त, नाशिक यांचेकडे रु. ११ कोटी ४६ लक्ष इतकी रक्कम अखर्चित आहे. त्यामध्ये जैन एरिगेशन, जळगाव ; पर्ल एंटरप्रायजेस, पुणे व बायोमॅट्रिक ॲप्लीकेशन सिस्टीमला देणारी रक्कम असे मिळून रु. २.६८ कोटी अखर्चित होते. उक्त संस्थांनी प्रकल्पाचे काम योग्यरित्या न केल्याने त्याबाबतची चौकशी सुरू असल्याने त्यांची देयके प्रदान न केल्याने सदरहू रक्कमा अखर्चित राहिल्या आहेत. प्रकल्प अधिकारी कार्यालय, धारणी येथील रक्कम रु. ४६ कोटी २६ लक्ष इतकी आहे. त्यामध्ये विविध योजनांचा समावेश आहे. विभागाने सन २००१ पासून पुढील पंधरा वर्षांमधील अखर्चित रकमांचा ताळमेळ घालण्याचे काम पूर्ण केले असून वित्त विभागाकडे ते अधिप्रमाणित करण्यासाठी पाठविले आहे. त्यावर समितीने असे सुचविले की, विभागांकडे रक्कमा अखर्चित राहणे, आर्थिक वर्ष संपल्यानंतर त्या चलनाने पुनःश्च शासनाकडे जमा करणे इत्यादी संदर्भातील कार्यवाही सुकर होण्याकरिता विभागाने आता एक नवीन कार्यप्रणाली विकसीत करणे आवश्यक आहे. सदरहू कार्यप्रणालीनुसार विभागाला जो निधी मंजूर होतो तो निधी विभागाकडे प्रत्यक्ष हस्तांतरीत न करता तो कोषागारामध्येच राहू द्यावा. देयके अंतिमतः मंजूर झाल्यानंतर लेखा कोषागारास तसे अवगत करण्यात येईल व तद्नंतर देयके अदा करण्याचे काम परस्पर कोषागार कार्यालयाकडूनच केले जाईल. ग्रामविकास विभागाने ही पद्धत प्रायोगिक तत्त्वावर अवलंबिली असून ती यशस्वी झाल्याचे दिसून येत आहे. आदिवासी विकास विभागाने देखील ही पद्धत अवलंबिण्याबाबत विचार करावा, अशी समितीने सूचना केली.

शिफारस—

३.१८ लेखापरिक्षणात नमूद केलेले आक्षेप हे आर्थिक शिस्तीच्या दृष्टीने अतिशय गंभीर आहेत. महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ च्या तरतूदींनुसार शासकीय कोषागारातून तात्काळ वितरणासाठी लागणाऱ्या रकमेशिवाय अन्य कोणतीही रक्कम काढण्यास प्रतिबंधित करण्यात आलेले आहे. असे असतांनाही जव्हार, नंदूरबार, धारणी आणि नाशिक प्रकल्प अधिकारी कार्यालय, अतिरिक्त आदिवासी आयुक्त, ठाणे आणि आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्या दस्तऐवजांच्या तपासणीत माहे मार्च, २००८ ते माहे डिसेंबर, २०१४ या दरम्यान शासकीय कोषागारातून एकूण १४३ देयकांद्वारे काढलेली रक्कम रु. १२९.५९ कोटी माहे मार्च, २०१५ पर्यंत अखर्चित राहून सदरहू रक्कम प्रकल्प अधिकारी/आतिरिक्त आदिवासी आयुक्त/आदिवासी आयुक्त यांच्या बँक खात्यात ठेवण्यात आल्याचे निदर्शनास आले. यासंदर्भात विभागाने आपल्या लेखी स्पष्टीकरणात कारणमिमांसा नमूद केलेली आहे. साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की, माहे मार्च, २०१५ पर्यंत अखर्चित असलेली रक्कम रु. १२९ कोटी इतकी होती ती आता कमी होऊन रु. ३३ कोटी इतकी झालेली आहे. विभागाने केंद्र शासनाकडून प्राप्त होणाऱ्या सानुग्रह अनुदानातील (Grant in aid) तुटीचे विशेषतः अवलोकन करून सन २००१ ते सन २०१५ पर्यंतच्या अखर्चित रकमांचा ताळमेळ (Reconciliation) घालण्याचे काम पूर्ण केले असून वित्त विभागाकडे ते सप्रमाणित (Validation) करण्याकरिता पाठविण्यात आले आहे. हे जरी खरे असले तरी समिती यावर फारशी समाधानी नाही.

आदिवासी समाजाच्या सर्वांगिण विकासाकरिता शासनामार्फत दरवर्षी विविध योजनांकरिता अर्थसंकल्पात कोट्यावधी रुपयांचा निधी अर्थसंकल्पीत केला जातो. केंद्र शासनाकडून देखील विविध योजनांकरिता भरघोस निधी प्राप्त होत असतो. मंजूर झालेला निधी जर योग्य वेळी योग्य त्या उद्दिष्टपूर्तीकरिता खर्ची पडला तरच आदिवासी समाजाला विविध कल्याणकारी योजनांचा खऱ्या अर्थाने लाभ प्राप्त होईल. तथापि, समितीसमोर आलेल्या दस्तऐवज तथा कागदपत्रांवरून तसे होताना दिसत नसल्याचेच सामोरे येत असून समिती याबाबत तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

आदिवासी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांतर्गत उदिष्ट निश्चिती, उदिष्ट साध्यतेकरिता निधी अर्थसंकल्पित करणे, विविध योजनांतर्गत कामांना प्रशासकीय मंजुरी देणे, निश्चित केलेली उद्दिष्टे विहित कालमर्यादेत पूर्ण करणे या-करिता निधीचे वितरण व विगतवारी या सर्वांमध्ये सुसंगती व एकसुत्रीपणा आणण्यासाठी विभागाने या संपूर्ण कार्यपद्धतीमध्ये आमूलाग्र बदल करण्याकरिता काही ठोस पावले उचलावित असे समितीचे मत आहे. यादृष्टीने अधिक विचार करता समितीचे असे मत झालेले आहे की, देयके रोखीने अदा करण्याची पद्धत आता पूर्णतः बंद झालेली असल्याने विभागाला मंजूर झालेल्या निधीचे विभागाकडे प्रत्यक्ष हस्तांतरण करण्याची आता आवश्यकता उरलेली नाही. मंजूर निधीचे विभागाकडे प्रत्यक्ष हस्तांतरण न करता सदरहू निधी शासनाच्या Revolving Fund मध्ये राहू द्यावा. देयक मंजूर झाल्यानंतर निधीचे वितरण शासकीय कोषागारांच्या माध्यमातून देता येईल. ग्रामविकास विभागाने यासंदर्भातील कार्यपद्धती प्रायोगिक तत्त्वावर सुरू केली असून प्रथमदर्शनी ती यशस्वी झाल्याचे दिसून येत आहे. आदिवासी विकास विभागाने देखील उक्त कार्यपद्धतीचा सखोल अभ्यास करून ती यशस्वीरित्या अंगिकारण्याबाबत कार्यवाही करावी, अशी समिती शिफारस करीत आहे. समितीच्या शिफारशीनुरुप केलेल्या कार्यपूर्तीचा अहवाल समितीस दोन महिन्यांत उपलब्ध करून देण्यात यावा.

परिच्छेद क्रमांक २.२.४.१—विद्यार्थ्यांना अन्नधान्याचा कमी पुरवठा—

अभिप्राय—

३.१९ आदिवासी विकास विभागाने शासकीय आश्रमशाळांतील प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी प्रती दिन ४०० ग्रॅम गहु किंवा ज्वारी किंवा बाजरी आणि १०० ग्रॅम तांदुळ हे माप माहे ऑगस्ट, १९९९ मध्ये निश्चित केले होते. म्हणजेच, प्रत्येक विद्यार्थ्याला प्रती दिन ५०० ग्रॅम अन्नधान्य पुरवावयाचे होते. आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्या दस्तावेजांच्या पडताळणीत असे आढळले की, ५२९ शासकीय आश्रमशाळांमध्ये निवास करणाऱ्या १,९६,३५७ विद्यार्थ्यांसाठी वर्ष २०१४-१५मध्ये ५०० ग्रॅम प्रती विद्यार्थी या मापाऐवजी फक्त २६२.५६ग्रॅम अन्नधान्य प्रती दिन (सरासरी) प्रती विद्यार्थी पुरविण्यात आले होते. यामुळे प्रती विद्यार्थी प्रती दिन २३७.४४ ग्रॅम अन्नधान्य कमी पुरविण्यात आले होते. निवडलेल्या ५२ शासकीय आश्रमशाळांध्ये याच कालावधीत २०,०१३ विद्यार्थ्यांना २५१.७८ग्रॅम अन्नधान्य कमी पुरविण्यात आले होते.

विभागाच्या खुलाशाप्रमाणे, शासन निर्णय दिनांक २५ फेब्रुवारी २०१४ अन्वये शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहांना आवश्यक अन्नधान्य, कडधान्य व इतर किराणा माल पुरवठयाकरिता आदिवासी विकास महामंडळ, मर्या., नाशिक यांचे स्तरावरून ई-निविदा प्रक्रीया खरेदी करण्याची तरतूद आहे. त्यानुसार सन२०१४-१५या वर्षाकरिता प्रकल्प अधिकारी यांचेकडून या कार्यालयाकडे अन्नधान्य, कडधान्य व इतर किराणा मालाची निव्वळ मागणी (मागील शिल्लक वजा जाता) नोंदविण्यात आली होती. सदर मागणीनुसार गहू ९३,०६० क्विंटल व तांदूळ १,०३,६१६ क्विंटल अशी एकूण १,९६,६७६ इतकी मागणी होती.

शासन निर्णय दिनांक २५ फेब्रुवारी २०१४ मधील तरतुदीनुसार सदर मागणी आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक यांचेकडे नोंदविण्यात आली होती. त्यानुसार आदिवासी विकास महामंडळ, मर्या., नाशिक यांचे स्तरावरून ई-निविदा प्रक्रीया सुरू करण्यात आली. तथापि, सदर निविदा प्रक्रीयेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रीट पिटीशन क्र. ५१४० व ५१९७ दाखल झालेली होती. सदर याचिकांच्या सुनावणीअंती सदर निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत आवश्यक अन्नधान्य, कडधान्य व इतर किराणा मालाची खरेदी ही महाराष्ट्र स्टेट को.ऑ. कंन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई यांचेकडून मागील मंजूर दराने करणेबाबत मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्देश दिलेले होते. त्यानुसार महाराष्ट्र स्टेट को.-ऑ. कंन्झ्युमर्स फेडरेशन लि., मुंबई यांचेकडून वेळोवेळी गहू ४१,८७७ क्विंटल खरेदी केलेला आहे व व्यंकटेश्वरा महिला औद्योगिक उत्पादन सह. संस्था मर्या., उदगिर यांचेकडून वेळोवेळी गहू ३२,५७१ क्विंटल असा एकूण ७४,४४८ क्विंटल गहू खरेदी केलेला आहे.

वरीलप्रमाणे या कार्यालयाच्या स्तरावरून खरेदी करण्यात आलेल्या गहू व तांदूळाची मागणी वजावट करून आदिवासी विकास महामंडळ मर्या., नाशिक यांनी पुरवठा केलेला आहे.

तसेच आदिवासी विकास महामंडळ, मर्या., नाशिक यांचे स्तरावरून ई-निविदा प्रक्रीयेची कार्यवाही सुरू होती. तथापि, सदर निविदा प्रक्रीयेच्या संदर्भात मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट पिटीशन क्र. ५१४० व ५१९७ दाखल झालेली असल्याने पुरवठ्यास विलंब होण्याची

शक्यता लक्षात घेऊन तसेच शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची अन्नधान्याअभावी जेवणाची गैरसोय होऊ नये म्हणून शासकीय आश्रमशाळा स्तरावर तातडीची बाब म्हणून काही प्रमाणांत स्थानिक स्तरावर खरेदी करण्यात आलेली होती. त्यामुळे आदिवासी विकास महामंडळ, मर्या., नाशिक यांचेकडून माल स्विकारतांना शासकीय आश्रमशाळास्तरावरून खरेदी करण्यात आलेला माल वजावट करून स्विकारण्यात आलेला आहे. त्यामुळे मागणी व पुरवठा यामध्ये तफावत दिसून येत आहे.

वरीलप्रमाणे या कार्यालयाच्यास्तरावरून गव्हाची ७४,४४८ क्विंटल खरेदी करण्यात आलेली असून आदिवासी विकास महामंडळाने ३,३१९ क्विंटल गहू पूरवठा केलेला आहे. अशा प्रकारे गव्हाची एकूण प्राप्त मागणी ९३,०६० पैकी एकूण ७७,७६७ क्विंटल गव्हाचा पुरवठा झालेला आहे. तसेच तांदूळाची प्रत्यक्षांत मागणी १,०३,६१६ क्विंटल होती, आदिवासी विकास महामंडळाने ७६,९०१ क्विंटल पुरवठा केलेला आहे.

शासकीय आश्रमशाळेवरून विद्यार्थ्यांच्या परिमाणानुसार आवश्यक एकूण मागणी व त्यामधून मागील शिल्लक वजावट करून मागणी नोंदवित असतात. त्यामुळे एकूण परिमाणानुसार येणारी मागणी व प्रत्यक्षात नोंदविलेली मागणी यामध्ये तफावत दिसून येत आहे.

शिफारस—

निरंक

परिच्छेद क्रमांक २.२.४.२—तांदुळ खरेदीवर जादा खर्च—

अभिप्राय—

३.२० केंद्र शासनाने संपुर्ण देशात कच्च्या धानातून किमान ६७ टक्के उत्पादन आणि ग्राहकोपयोगी तांदळाचे मापदंड निश्चित केले आहे. वर्ष २०१४-१५ दरम्यान आदिवासी आयुक्त, नाशिक यांच्या अध्यक्षतेखालील खरेदी समीतीने ५२९ शासकीय आश्रमशाळांना आदिवासी विकास महामंडळाकडून रुपये २७.४५ कोटी किंमतीवर ' अ ' आणि ' ब ' प्रतीचा माहे जून, २०१४ ते माहे ऑक्टोबर, २०१४ दरम्यान रु. ३,४५० प्रती क्विंटल या दराने पुरवठा केलेला ३६,४०३.१९ क्विंटल आणि माहे नोव्हेंबर, २०१४ ते माहे एप्रिल, २०१५ दरम्यान रु. ३,६७६ प्रती क्विंटल या दराने पुरवठा केलेला ४०,४९८.२१ क्विंटल असा एकूण ७६,९०१.४० क्विंटल तांदुळ खरेदी करण्यात आला.

परंतू प्रती क्विंटल तांदळाची किंमत निर्धारीत करण्यासाठी आदिवासी विकास महामंडळाने (TDC) उत्पादन माप ६७ टक्क्याऐवजी ५७ टक्के घेतले, त्यामुळे ७६,९०१.४० क्विंटल तांदुळ खरेदीसाठी रुपये ३.६५ कोटी इतका जादा खर्च झाला.

लेखा परीक्षेस पुढे असेही निदर्शनास आले की,आदिवासी विकास महामंडळाने (TDC) प्रती क्विंटल तांदळाची किंमत निर्धारीत करतांना १४ टक्के प्रति वर्ष व्याज घटकही विचारात घेतले, जे आदिवासी विकास महामंडळाला अग्रीम प्रदान करण्याची व्यवस्था असती तर टाळता आले असते. अशी व्यवस्था करता येऊ शकली असती, कारण वर्ष २०१०-११ पासून वर्ष २०१४-१५ पर्यत दरवर्षी आदिवासी विकास विभागामध्ये नियमीत बचत होत होती. तांदळाच्या विक्री किमतीत व्याज घटक अंतर्भुत केल्यामुळे वर्ष २०१४-१५ मध्ये ७६,९०१.४० क्विंटल तांदुळ खरेदीसाठी आदिवासी विकास विभागाने आदिवासी विकास महामंडळाला (TDC) रुपये ७९.४४ लक्ष व्याजासाठी जादा प्रदान केले. रुपये ७९.४४ लक्ष या व्याजाच्या रक्कमेने शासकीय आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांसाठी २,३०० क्विंटल अतिरीक्त तांदुळ घेता येऊ शकला असता.

विभागाच्या खुलाशाप्रमाणे, आदिवासी विकास महामंडळामार्फत पुरवठा करण्यात येणाऱ्या तांदुळाची किंमत निश्चित करतांना सदर तांदळासाठी एकाधिकार योजनेंतर्गत खरेदी केलेल्या धान्याची किंमत भरडाईसाठी येणारा खर्च, भरडाईदरम्यान प्राप्त होणाऱ्या उप पदार्थांची किंमत तसेच एकाधिकार योजनेसाठी राज्य सहकारी बँकेमार्फत लावण्यात आलेल्या व्याजाचा विचार करण्यात येतो.

खरेदी समितीने तांदुळाचे नमुने निश्चित केल्यानुसार (५७% उताऱ्याचे नमुने) तांदळाचा पुरवठा करण्यात आलेला आहे.

६७% उतारा व ५७% उतारा असणाऱ्या तांदळातील उप पदार्थ (जसे कणी व पॉलीश कोंडा) यांचीही वेगवेगळी टक्केवारी असते. ५७% दराची किंमत निश्चित करतांना त्याप्रमाणात निर्माण होणाऱ्या उप पदार्थाची किंमत आणि खर्च वजा करून किंमत निश्चित केली जाते. त्यामुळे तांदुळ खरेदीसाठी जास्त खर्च केला अशी परिस्थिती नाही. तसेच एकाधिकार खरेदी योजना या शासनाच्या आदिवासी शेतकऱ्यांच्या योजनेमार्फत असलेली ही खरेदी शासन उपक्रमामार्फत पुरवठा असल्याने महामंडळाने निश्चित केलेल्या दराने किंमत अदा केली आहे. याबाबत महामंडळाने दिनांक १४ जानेवारी २०१६ रोजी अहवाल सादर केला आहे.

सद्य:स्थितीत, शासन निर्णय आदिवासी विकास विभाग दिनांक १५ जून २०१७ मधील तरतुदीनुसार आदिवासी विकास महामंडळ यांनीदेखील ई-निविदा प्रक्रियेत भाग घेणे आवश्यक आहे, अशी तरतूद करण्यात आली आहे.

साक्षीदरम्यान, विभागीय सचिवांनी असे कथन केले की, आश्रमशाळांसाठी तुकडा तांदुळ नसावा याकरिता ५७ टक्क्यांचा उताऱ्याचा निकष लावण्यात आलेला असल्याने ही तफावत दिसून येत आहे. एकाधिकार योजना ही स्टेट को.-ऑप. बँकेकडून कर्ज घेऊन आदिवासी विकास महामंडळाकडून राबविण्यात येत आहे. एकाधिकार योजना ही वर्ष २०१२-१३ पर्यंत राबविण्यात येत होती, तद्नंतर योजना अस्तित्त्वात आहे किंवा कसे अशी समितीने पृच्छा केली असता समितीस विदीत करण्यात आले की, सुरुवातीस सदरहू योजनेंतर्गत ६८ तालुके अंतर्भूत होते. सद्यःस्थितीत तालुक्यांची संख्या कमी झाली असून सध्या २९ तालुक्यांमध्ये योजना अस्तित्त्वात आहे. केंद्र शासनाचा पूर्ण देशामध्ये जो हमी भाव दर आहे त्यापेक्षा एक रुपया किलो जास्त दर राज्य शासनाच्या एकाधिकार योजनेमध्ये २९ आदिवासी क्षेत्रात देण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे.

शिफारस—

निरंक

परिच्छेद क्रमांक २.२.४.३—आश्रमशाळा आणि वसतिगृहांच्या अन्नधान्य खर्चाच्या किंमतीत भरीव वाढ—

अभिप्राय—

३.२१ अतिरीक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांच्या अधिकार क्षेत्रात ८९शासकीय आश्रमशाळा आणि १०४ शासकीय वसतीगृहे येतात. अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांचे दस्ताऐवजांच्या पडताळणीत असे आढळून आले की, वर्ष २०१२-१५ दरम्यान ८९ शासकीय आश्रमशाळांमध्ये प्रवेश संख्येत घसरता कल होता (उणे १६ टक्के ते उणे ७ टक्के) तरी अन्नावरील खर्च (आहार खर्च या उपशिर्षाखाली वर्गीकृत केलेले) वर्ष २०१२-१३ मध्ये ७६ टक्के तर वर्ष २०१४-१५ मध्ये ८१ टक्क्यांनी मोठ्या प्रमाणात वाढला, वर्ष २०१३-१४ मधील उतार वगळता तसेच १०४ शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश संख्येत जरी वर्ष २०१२-१५ दरम्यान वाढता कल (९ ते ५३ टक्के) होता तरी अन्नावरील खर्च वर्ष २०१२-१३ मधील ४६ टक्क्यांवरून वर्ष २०१४-१५ मध्ये १७२ टक्क्यांपर्यंत अयोग्य प्रमाणात वाढला.

साक्षीदरम्यान, समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, वर्ष २०११-१२ व वर्ष २०१२-१३ मध्ये अन्नधान्याच्या खर्चात भरीव वाढ दिसून येण्याचे मुख्य कारण म्हणजे मा.उच्च न्यायालयात यासंदर्भात दाखल झालेल्या याचिकेवर मा.न्यायालयाने विद्यार्थ्यांना आहारामध्ये दूध, अंडी, केळी व इतर फळांचा समावेश करण्याबाबत विवक्षित निर्देश दिले. शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या आहारात उक्त बाबींचा नव्याने समावेश झाल्याने साहजिकच आहार खर्चात वाढ झालेली आहे. वर्ष २०१२-१५ दरम्यान आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या प्रवेशामध्ये घसरता कल दिसून आला असून सन २०१२ मध्ये विद्यार्थ्यांची संख्या २९,७९२ होती ती वर्ष २०१३ मध्ये २८,५२५ इतकी झाली तर वर्ष २०१४-१५ मध्ये त्यामध्ये आणखी घसरण होऊन त्या वर्षी विद्यार्थ्यांची संख्या २६,६९६ इतकी झाली. यामागची कारणमिमांसा स्पष्ट करण्यासाठी समितीने विभागीय सचिवांना सूचित केले असता, विभागीय सचिवांनी सांगितले की, यासंदर्भातील नेमकी विस्तृत अशी माहिती साक्षीदरम्यान त्यांच्या जवळ उपलब्ध नाही. लेखापरिक्षणात दर्शविलेला आकडा हा ५२ आश्रमशाळांपुरताच आहे. तथापि, राज्यातील इतरही आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या प्रवेश संख्येत असाच घसरता कल आहे किंवा कसे याबाबतची विस्तृत माहिती घ्यावी लागेल. यातील काही शाळा या आदिवासी उप योजना (TSP) क्षेत्रातील आहेत तर काही शाळा आदिवासी उप योजना बाह्यक्षेत्र (OTSP) क्षेत्रातील आहेत. आदिवासी उप योजना (TSP) क्षेत्रातील आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या संख्येत अंशतः वाढ झालेली आहे, तर आदिवासी उप योजना बाह्यक्षेत्र (OTSP) क्षेत्रातील आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या संख्येमध्ये घट झालेली दिसून येते. विद्यार्थ्यांच्या पालकांचा कल इंग्रजी माध्यमाकडे जास्त असल्यामुळे खाजगी इंग्रजी शाळांची संख्या वाढत चालली आहे. आदिवासी उप योजना (TSP)क्षेत्रात खाजगी इंग्रजी शाळा अस्तित्त्वात नसल्याने त्या क्षेत्रात आदिवासी आश्रमशाळांच्या विद्यार्थी संख्येत वाढ झालेली आहे. विभागाने आता असा निर्णय घेतला आहे की, ज्या शासकीय आश्रमशाळा चांगल्या पायाभूत सोयी-सुविधांनी युक्त आहेत, अथक प्रयत्नांती ज्या आश्रमशाळा 'आय.एस.ओ.' प्रमाणित आहेत अशा सुमारे १०० शाळांना इंग्रजी माध्यम, सेमी-इंग्रजी माध्यमांमध्ये रुपांतरीत करण्याचा शासनाचा मानस असून त्यादृष्टीने प्रयत्न करण्यात येत आहेत. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची संख्या कमी होत असतानादेखील आहार खर्चात वाढ झाल्याबाबत नेमके स्पष्टीकरण करण्यास समितीने सूचित केले असता समितीस विदीत करण्यात आले की, आहारात अंडी, दूध, केळी या नवीन बाबींचा समावेश केल्यामुळेच आहार खर्चात वाढ झालेली आहे. आहारात उपरोक्त नवीन बाबींचा समावेश केल्यानंतर वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या संख्येत भरीव वाढ झालेली आहे. वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या संख्येत सन २०११-१२, सन २०१२-१३ मध्ये ९ टक्के वाढ, सन २०१३-१४ मध्ये २० टक्के वाढ तर सन २०१४-१५ मध्ये ५३ टक्के इतकी वाढ झालेली असताना आहार खर्चात मात्र एकदम १७२ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. यामागची कारणमिमांसा समितीने विचारली असता शासन निर्णयातील नवीन तरतुदीनुसार विद्यार्थ्यांच्या आहारामध्ये फळे, अंडी, केळी, दोन भाज्या, दही इत्यादिंचा अंतर्भाव केल्यामुळे भोजन पुरवठयाच्या पुर्वीच्या रु. १६०० ते १८०० या दरात वाढ होऊन ते रु. २८०० ते २९०० पर्यंत केल्याचे समितीस विदीत करण्यात आले.

शिफारस :-

३.२२ लेखापरिक्षणात नमूद करण्यात आलेली निरीक्षणे ही निश्चितच गंभीर स्वरुपाची आहेत. अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती यांच्या दस्तऐवजांच्या पडताळणीत असे आढळले की, वर्ष २०१२ ते वर्ष २०१५ दरम्यान त्यांच्या अधिनस्त असलेल्या ८९ शासकीय आश्रमशाळांमध्ये ऊणे १६ टक्के ते उणे ७ टक्के इतका विद्यार्थी प्रवेश संख्येत घसरता कल असताना देखील अन्नावरील खर्चात मात्र वर्ष २०१२-१३ मध्ये ७६ टक्के तर वर्ष २०१४-१५ मध्ये ८१ टक्के इतकी मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्याचप्रमाणे १०४ शासकीय वसतिगृहांमध्ये विद्यार्थी प्रवेश संख्येत जरी वर्ष २०१२ ते वर्ष २०१५ दरम्यान ०९ ते ५३ टक्के इतकी वाढ झाली तरी अन्नावरील खर्चात मात्र वर्ष २०१२-१३ मधील ४६ टक्क्यावरून वर्ष २०१४-१५ मध्ये एकदम १७२ टक्क्यांपर्यंत अयोग्य वाढ झाल्याचे निदर्शनास आले.

साक्षीदरम्यान, विभागीय सचिवांनी समितीस कथन केले की, वर्ष २०११-१२ दरम्यान मा. उच्च न्यायालयामध्ये एक जनहित याचिका दाखल झाली होती. मा. न्यायालयाने सुनावणी दरम्यान आदिवासी आश्रमशाळेतील तसेच वसतिगृहांतील विद्यार्थ्यांच्या आहारात दूध, अंडी, केळी इत्यादिंचा समावेश करण्याबाबत निर्देश दिले. मा.न्यायालयाच्या उक्त निदेशानुसार आदिवासी विकास विभागाने दि. १९ जुलै, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये विद्यार्थ्यांच्या आहारात उक्त नव्या बाबींचा समावेश करण्यासंदर्भात आदेश निर्गमित केले. विद्यार्थ्यांच्या आहारात उपरोक्त बाबी नव्याने समाविष्ट झाल्यामुळे आहार खर्चात वाढ झाल्याचे दिसून येते.

विभागाच्या प्रस्तुत खुलाश्याने समितीचे अजिबात समाधान झालेले नाही. वर्ष २०१२-१५ दरम्यान आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या प्रवेश संख्येत उणे १६ टक्के ते उणे ७ टक्के इतकी घसरण होऊनही उक्त नव्या बाबींचा आहारात समावेश केल्याने अन्नावरील खर्चात एकदम ७६ टक्के ते ८१ टक्क्यांनी झालेली वाढ तर वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांच्या प्रवेश संख्येत त्याच कालावधीत ९ टक्के ते ५३ टक्के इतका वाढता कल असतानाही वर उल्लेखित बाबींचा आहारात नव्याने समावेश केल्याने अन्नावरील खर्चात ४६ टक्क्यांवरून एकदम १७२ टक्क्यांपर्यंत झालेली वाढ समितीस अवास्तव व अवाजवी अशीच वाटत असून या प्रकरणी निश्चितच तपासणी करण्याची आवश्यकता असल्याचे समितीचे मत झालेले आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी विभागाने चौकशी समिती नियुक्त करून लेखापरिक्षणाच्या वर्ष २०१२ ते वर्ष २०१५ या कालावधीत अन्नधान्य खर्चाच्या किंमतीत झालेल्या अवाजवी वाढीसंदर्भात सखोल छाननी व चौकशी करून तसेच पुरवठादाराच्या दरात ७५% ते ८०% पर्यंत भाववाढीच्या संदर्भात तपासणी अहवाल समितीस दोन महिन्यांत उपलब्ध करून द्यावा, अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक २.२.४.४—एकाच क्षेत्रातील शासकीय वसतिगृहांसाठी वेगवेगळ्या दराने कॅटरींग सेवा कंत्राट बहाल करणे—

अभिप्राय :

३.२३ आदिवासी विकास विभागाद्वारे आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहांना तयार जेवण पुरविण्यात येते. यासाठी प्रकल्प अधिकाऱ्यांना खाजगी सेवा पुरवठादारासोबत कॅटरींग सेवा कंत्राट करण्याचे प्राधिकार आहेत. सन २०१४-१५ दरम्यान प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांनी माहे जुलै, २०१४ मध्ये रु.३.७९ कोटी किंमतीवर १८ कॅटरींग कंत्राट सेवा पुरवठादारांना दिले. प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांच्या निविदा दस्तऐवजांच्या पडताळणीत असे आढळले की, वर्ष २०१४-१५ दरम्यान बहाल केलेल्या १८ पैकी १६ कंत्राटात कॅटरींगच्या दरात मोठ्या प्रमाणात तफावत (रु.२९९ ते १४९९ प्रती विद्यार्थी दरमहा) होती, जेव्हा की ही वसतीगृहे एकाच क्षेत्रात स्थित होती आणि सेवा पुरवठादारांनी एका ठराविक आहारासाठीच (उपहार, मध्यान्ह भोजन आणि रात्रीचे जेवण) हे दर कळविले होते. तसेच मुलांच्या वसतिगृहातील आहाराचे दर हे मुलींच्या वसतिगृहातील आहारांच्या दरापेक्षा खूपच जास्त होते.

विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान, मुलींचे वसतिगृह-२, चंद्रपूर याकरिता प्रती विद्यार्थी दर रु. १९८५ तर मुलांचे वसतिगृह-२, चंद्रपूर याकरिता प्रती विद्यार्थी दर रु. २६६६ असे आहेत, तर मुलांचे वसतिगृह-१, चंद्रपूर करिता प्रती विद्यार्थी दर रु. २७७७ असे आहेत. यामागची कारणे समितीने विचारली असता मुलांच्या वसतिगृहाकरिता आहाराच्या ठेक्याचे दर जास्त आहेत तर मुलींच्या वसतिगृहाकरिता आहाराच्या ठेक्याचे दर कमी असल्याचे प्रतिपादन विभागामार्फत करण्यात आले. विभागाच्या उक्त स्पष्टीकरणाशी समितीने असहमती दर्शवून मुलांच्या गोंडपिंपरी येथील वसतिगृहाचे दर रु. २४४४, मुल येथील मुलांच्या वसतिगृहाचे दर रु. २४९९ तर सिंदेवाही येथील मुलांच्या वसतिगृहाचे दर रु. २३१६ असल्याचे निदर्शनास आणून विभागाकडून समितीस योग्य माहिती येत नसल्याबाबत नापसंती व्यक्त केली. त्यावर विभागीय सचिवांनी प्रतिपादीत केले की, प्रकल्पस्तरावर मुलांचे शासकीय वसतिगृहास न्युनतम प्राप्त दर निविदाधारक यांचे समवेत दि. ३ जुलै २०१४ रोजी प्रथम दरवाटाघाटीसाठी बोलविले असता सबंधित न्युनतम निविदाधारक यांनी निविदेत भरलेले दर हे स्थानिक बाजारभाव प्रमाणे असल्यामुळे व शासनाचे आहार मेनुप्रमाणे मुलांना भोजन आहार पुरवठा करणेसाठी दरवाटाघाटी करण्यास सबंधित न्युतनम निविदाधारक यांनी सहमती दिली नसल्याचे

प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांनी कळविले. प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांनी दिनांक २१ ऑगस्ट २०१४ रोजी अपर आयुक्त, नागपूर यांचेकडे भोजनठेका दर मंजूर होणेसाठी प्रस्ताव सादर करून प्रकल्पस्तरावर निवड केलेल्या निविदा धारक यांना मुला-मुलींचे वसतिगृहास भोजन पुरवठ्यासाठी आदेशित केले. क्षेत्रिय अधिकाऱ्यांनी अनौपचारीक माहिती दिल्यानुसार मुलांच्या वसतिगृहामध्ये अनधिकृतपणे राहणाऱ्या मुलांची संख्या मोठी असून मुलींच्या वसतिगृहामध्ये मात्र अनधिकृतपणे राहणाऱ्या मुलींचे प्रमाण नगण्य आहे. या कारणामुळे मुलींच्या वसतिगृहातील आहाराचे मासिक दर रु. ८०० ते ९०० इतके कमी असून मुलांच्या वसतिगृहातील आहराचे दर मात्र जास्त आहे. अनधिकृत मुलांना आहार पुरवठा करावा लागणार ही बाब गृहीत धरून मुलांच्या वसतिगृहाकरिता आहाराचे मासिक दर जास्त आकारणे ही बाब निश्चितच योग्य नसून समितीने विभागाच्या उक्त स्पष्टीकरणाशी असहमती दर्शविली. सदर दरांमध्ये मोठा फरक दिसून येत असून प्रस्तुत प्रकरणी ई-निविदा करून सर्व कार्यवाही जरी पूर्ण झाली असली तरी त्या व्यतिरिक्त काही मुद्दे आहेत का याची तपासणी करणे गरजेचे आहे. सदर प्रकरणी प्रथमदर्शनी अनियमितता झाली असल्याचे समितीचे मत झाले असून सदर प्रकरणी चौकशी करणे नितांत गरजेचे असल्याचे समितीने मत प्रदर्शित केले.

शिफारस—

३.२४ लेखापरिक्षणात नमूद करण्यात आलेली निरीक्षणे ही अत्यंत महत्त्वाची व गंभीर स्वरुपाची आहेत. आदिवासी विकास विभागाद्वारे आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहांना तयार जेवण पुरवण्यात येते. त्यासाठी प्रकल्प अधिकाऱ्यांना खाजगी सेवा पुरवठादारांना कंत्राट देण्याचे अधिकार आहेत. सन २०१४-१५ दरम्यान प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांनी रु. ३.७९ कोटी इतक्या किंमतीची एकूण १८ कॅटरिंग कंत्राटे सेवा पुरवठादारांना दिले. प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांच्या निविदा दस्तऐवजांच्या पडताळणीत वर्ष २०१४-१५ दरम्यान देण्यात आलेल्या १८ पैकी १६ कंत्राटात कॅटरिंगच्या दरात रु. २९९ ते रु. १,४९९ प्रती विद्यार्थी दरमहा इतक्या मोठ्या प्रमाणात तफावत आढळली. विशेष म्हणजे सदरहू वसतिगृहे ही एकाच क्षेत्रात असून सेवा पुरवठादारांनी एका ठराविक आहारासाठीच हे दर कळविलेले होते.

साक्षीदरम्यान, विभागीय सचिवांमार्फत असे कथन करण्यात आले की, जिल्हा मुख्यालयातील काही ठराविक शहरांमध्ये मुलांच्या वसतिगृहांकरिता कॅटरींगच्या दरांमध्ये मोठी तफावत असल्याचे निदर्शनास येत असून जिल्हा मुख्यालयातील काही ठराविक शहरांमध्ये मुलांच्या वसतिगृहांत अनधिकृतपणे राहणाऱ्या मुलांची संख्या जास्त असल्याने ठेकेदारांकडून मुलांच्या वसतिगृहांकरिता निविदेत जास्त दर नमूद करण्यात येतात. विभागीय सचिवांची उक्त कारणमिमांसा समितीस अजिबात मान्य नसून अनधिकृत मुलांना का काढण्यात आले नाही आणि त्यांच्याकडून एवढ्या शुल्काची वसुली का करण्यात आली नाही हि गंभीर बाब आहे. याबाबत दोषींवर कारवाई करावी. तसेच प्रकल्प अधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांचेकडून कॅटरिंग सेवेच्या निविदा अंतिम करताना मितव्ययतेचे मापदंड पाळण्यात आलेले नसून प्रथमदर्शनी या प्रकरणात आर्थिक अनियमितता वा गैरव्यवहार झाला असल्याबाबत समिती साशंक आहे. सबब, विभागाने प्रस्तुत प्रकरणाची सखोल चौकशी करून चौकशी अंती संबंधितांवर त्याबाबतची जबाबदारी निश्चित करून योग्य ती कारवाई करावी व त्याबाबतचा अहवाल समितीस एक महिन्यांत सादर करण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक २.२.४.५—शासकीय वसतिगृह बांधण्यातील विलंब—

अभिप्राय—

३.२५ माहे मार्च,२०१५ पर्यंत आदिवासी मुला-मुलींसाठी असणाऱ्या राज्यातील ४९१ पैकी १३४ शासकीय वसतिगृहे शासकीय इमारतीमधुन चालविण्यात येत होते, तर उर्वरित ३५७ (७३%) वसतिगृहे रुपये २.४० कोटी अशा भक्कम मासिक भाड्यावर भाड्याच्या इमारतीमध्ये चालविण्यात येत होती. लेखापरिक्षेस असे आढळले की, ३५७ पैकी २२९ वसतिगृहांसाठी जमीन संपादीत करण्यात आली होती. तर १२८ वसतिगृहांसाठी भुसंपादन अद्याप करण्यात आलेले नव्हते.लेखापरिक्षेस असे ही निदर्शनास आले की, वर्ष २०१०-१५ दरम्यान आदिवासी विकास विभागाने कोणतेही भौतिक लक्ष न ठरविता वसतिगृहांच्या बांधकामासाठी रुपये ४६१.८२ कोटी निधी वितरित केला आणि अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर (बीडीएस) रुपये ३५५.९० कोटींची तरतूद केली, त्यापैकी प्रकल्प अधिकाऱ्यांद्वारे फक्त रुपये २३०.४५ कोटी (६५%) उपयोगात आणण्यात आले.

साक्षीदरम्यान, विभागीय सचिवांनी अद्ययावत माहिती देताना सांगितले की, आजमितीस १९० शासकीय वसतीगृहे शासकीय इमारतींमधून चालविण्यात येत आहेत. लेखापरिक्षणादरम्यान ३५७ इमारती या भाडेतत्त्वावर होत्या. आजमितीस भाड्याच्या इमारतीमध्ये चालविण्यात येत असलेल्या वसतिगृहांची संख्या ३०१ इतकी आहे. उक्त ३०१ इमारतींबाबतच्या सद्यःस्थितीची समितीकडून पृच्छा करण्यात आली असता विभागीय सचिवांनी विदीत केले की, सन २०१८ मध्ये ९ इमारतींना प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून ७ इमारतींचे अंदाजपत्रक तयार आहे. सन २०१८ मध्ये ७६ इमारतींचे बांधकाम सुरू करीत असून त्याकरिता रु. १२५ कोटी इतकी आर्थिक तरतूद करण्यात आलेली आहे. उक्त ३०१ कामांपैकी

किती इमारतींना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे, किती इमारतींचे बांधकाम प्रगतीपथावर आहे, त्यापैकी किती कामे सुरू आहेत व किती इमारतींकरिता जागा उपलब्ध झालेली नाही याबाबत समितीने विचारणा केली असता समितीच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले की, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात ५८ कामांचा समावेश होता. तयार करण्यात आलेल्या नियोजन आराखडयाप्रमाणे २२ कामे माहे मे, २०१८ अखेर पूर्ण करण्यात आली होती. माहे जून, २०१८ अखेर १३ कामे पूर्ण झाली. माहे सप्टेंबर, २०१८ व माहे डिसेंबर, २०१८ अखेर अनुक्रमे तीन-तीन कामे पूर्ण करण्यात येतील. माहे मार्च, २०१९ अखेर ७ कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे. अशा रितीने सन २०१९ अखेरीस ४८ कामे पूर्ण करण्याचे नियोजित आहे. उपरोक्त कामांव्यतिरिक्त आणखी किती कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे, अशी समितीमार्फत विचारणा केली असता विभागामार्फत असे प्रतिपादीत करण्यात आले की, एकूण १४६ ठिकाणच्या जागा विभागाकडे हस्तांतरीत झालेल्या असून त्यापैकी ७० कामांना प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून ४१ कामांची अंदाजपत्रके प्रगतीत आहेत.

शिफारस—

३.२६ लेखापरिक्षणात नोंदविण्यात आलेले आक्षेप हे अत्यंत मुलभूत व महत्त्वाचे आहेत. आदिवासी मुला-मुलींसाठी असणाऱ्या राज्यातील ४९१ पैकी १३४ शासकीय वसतिगृहे शासकीय इमारतींमधून चालविण्यात येत होती, तर उर्वरित ३५७ वसतिगृहे रु. २.४० कोटी इतक्या मासिक भाड्यावर भाड्याच्या इमारतींमध्ये चालविण्यात येत होती. लेखापरिक्षणात निदर्शनास आल्याप्रमाणे ३५७ पैकी २२९ वसतिगृहांसाठी जमीन संपादित करण्यात आली होती, तर १२८ वसतिगृहांसाठी भूसंपादन करण्यात आलेले नव्हते. त्याचप्रमाणे वर्ष २०१० ते वर्ष २०१५ दरम्यान आदिवासी विकास विभागाने कोणतेही भौतिक लक्ष्य न ठरविता वसतिगृहांच्या बांधकामासाठी रु. ४६१.८२ कोटी निधी वितरित केला आणि अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर रु. ३५५.९० कोटींची तरतूद केली. उक्त निधीपैकी प्रकल्प अधिकाऱ्यांकडून फक्त रु. २३०.४५ कोटी रुपयांचा निधी उपयोगात आणण्यात आला.

साक्षीदरम्यान, विभागीय सचिवांनी समितीस अद्ययावत माहिती देताना असे कथन केले की, एकूण ४९१ वसतिगृहांपैकी सद्यःस्थितीत १९० इमारती शासकीय मालकीच्या असून ३०१ इमारती भाडेतत्त्वावर आहेत. उक्त भाडेतत्त्वावरील ३०१ इमारतींपैकी किती इमारतींना प्रशासकीय मान्यता मिळाली आहे व त्यापैकी किती कामे सुरू आहेत व किती इमारतींना जागा उपलब्ध झालेली नाही यासंदर्भात समितीने पृच्छा केली असता समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले की, सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात ५८ इमारतींच्या कामाचा समावेश होता. नियोजन आराखडयानुसार २२ कामे माहे मे, २०१८ अखेर पूर्ण करण्यात आली आहेत. माहे जून, २०१८ अखेर १३ कामे पूर्ण केलेली आहेत. माहे सप्टेंबर, २०१८ अखेर ३ कामे पूर्ण तर माहे डिसेंबर, २०१८ अखेर ३ कामे पूर्ण करण्यात येणार आहेत. माहे मार्च, २०१९ अखेर ७ कामे पूर्ण करण्यात येतील. सुरू नसलेली ९ कामे आहेत. सन मार्च, २०१९ मध्ये अखेर एकूण ४८ कामे पूर्ण करण्यात येतील.

सन २०१६-१७ या अर्थसंकल्पात समाविष्ट ५८ कामांव्यतिरिक्त उर्वरित प्रलंबित कामांसंदर्भात समितीने विचारणा केली असता समितीस विदित करण्यात आले की, १४६ ठिकाणच्या जागा विभागाकडे हस्तांतरीत झालेल्या असून त्यापैकी ७० कामांना प्रशासकीय मान्यता मिळालेली असून त्याकरिता निधीची तरतूद देखील करण्यात आलेली आहे. ४१ कामांची अंदाजपत्रके प्रगतित आहेत.

समितीच्या निदर्शनास आणून दिल्यानुसार आजमितीस विभागाच्या एकूण ४९१ वसतिगृहांपैकी फक्त १९० वसतिगृहे ही शासकीय इमारतींमधून चालविण्यात येत असून ३०१ वसतीगृहे ही आज देखील भाड्याच्या इमारतींमधून चालविण्यात येत आहेत. साक्षीदरम्यान, समिती समोर आलेल्या माहितीनुसार विभागाकडे प्रस्तुत प्रयोजनार्थ पर्याप्त निधी उपलब्ध असताना देखील उपलब्ध निधीच्या प्रमाणात पुरेशा संख्येने वसतिगृहांची बांधकामे पूर्णत्वास नेण्यामध्ये विभाग सर्वार्थाने कमी पडलेला असून विभागाचे याकामी असलेले औदासिनत्व व निष्क्रीयताच सामोरी येते. समिती यासंदर्भात तीव्र शब्दात नाराजी व्यक्त करत आहे.

अतः विभागाने आजमितीस भाड्याच्या इमारतीत असलेल्या सर्व वसतिगृहांच्या प्रकरणांचा एक सर्वंकष आढावा घेऊन ज्या इमारतींकरिता आजही जमीन संपादनाचे काम बाकी आहे अशी प्रकरणे सत्त्वर हाती घेऊन वसतिगृहांच्या इमारतींकरिता जमीन संपादन करून विभागाकडे सदरहू जमीनींचे हस्तांतरण करण्याचे काम विनाविलंब तातडीने पूर्ण करावे. भाड्याच्या इमारतीतून चालविण्यात येणाऱ्या वसतिगृहांकरिता जमीन संपादन करणे, इमारतीच्या बांधकामाकरिता प्रशासकीय मंजुरी प्राप्त करणे, प्रत्यक्ष इमारतींच्या बांधकामांसाठी पर्याप्त निधी अर्थसंकल्पित करणे व इमारतींचे प्रत्यक्ष बांधकाम विहित केलेल्या वेळेत पूर्णत्वास नेणे यादृष्टीने विभागाने एक कालबद्ध कार्यक्रम आखून शक्य तितक्या लवकर सर्वच शासकीय आदिवासी विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांना शासकीय इमारती प्राप्त होण्याच्यादृष्टीने युध्दपातळीवर आवश्यक ते सर्व प्रयत्न करून हे काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशी समिती आग्रही शिफारस करीत आहे. आता पर्यंत हे सर्व बांधकाम, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून करण्यात आले पण आता आदिवासी विकास विभागाचे स्वतंत्र बांधकाम विभाग असल्याने त्या कामाचा सातत्याने आढावा घेऊन जास्त गती देता येईल

त्या दृष्टीने नियोजन करावे. समितीच्या शिफारशीनुरुप केलेल्या कार्यपूर्तीच्या प्रगतीचा अहवाल समितीस दोन महिन्यांत उपलब्ध करून देण्यात यावा.

परिच्छेद क्रमांक २.२.४.६—शासकीय आश्रमशाळा बांधण्यातील विलंब—

अभिप्राय—

३.२७ आदिवासी विकास विभागाने माहे मे, २००५ ते माहे जुलै, २०११ दरम्यान प्रकल्प अधिकारी कार्यालय, डहाणू अंतर्गत १६ आश्रमशाळा व प्रकल्प अधिकारी कार्यालय, जव्हार अंतर्गत १८ आश्रमशाळा अशा एकूण ३४ शासकीय आश्रमशाळा इमारती बांधकामासाठी रुपये १६७.९८ कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान केली. सार्वजनिक बांधकाम विभागाद्वारे (PWD) आश्रमशाळा इमारतींचे बांधकाम डिपॉझीट वर्क म्हणून करावयाचे होते. लेखापरिक्षा पडताळणीत आढळून आल्याप्रमाणे आदिवासी विकास विभागाने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे निधी जमा केला. परंतु बांधकाम पुर्ण करण्यासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित केली नव्हती.अनेक प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर २ ते ३ वर्षानंतर कार्यादेश जारी केले. माहे मार्च, २०१५ पर्यंत ३४ पैकी फक्त २ आश्रमशाळा बांधण्यात येऊ शकल्या. तथापि, या आश्रमशाळा सार्वजनिक बांधकाम विभागाने माहे मार्च, २०१५पर्यंत आदिवासी विकास विभागाकडे सुपुर्द केल्या नव्हत्या. उर्वरित ३२ आश्रमशाळांपैकी २३ आश्रमशाळांचे काम माहे मार्च, २०१५पर्यंत चालू होते. माहे मार्च, २०१५ पर्यंत ९ आश्रमशाळांची कामे, प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतरही (एक आश्रमशाळा) आणि माहे जून, २०१० ते माहे ऑक्टोबर, २०१५ दरम्यान प्रशासकीय मान्यता संपल्यानंतरही आठ आश्रमशाळांचे बांधकामे सुरू झाले नव्हते. प्रशासकीय मान्यता संपल्यामुळे बांधकामे सुरू होऊ शकली नाही अशा आठ आश्रमशाळा कामांपैकी चार आश्रमशाळांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे जमा केलेले रुपये १०.४१ कोटी अडकुन राहिले.

साक्षी दरम्यान, विभागीय सचिवांनी कथन केले की, लेखापरिक्षणाधीन असलेल्या एकूण ३४ शाळांपैकी सन २०१७-१८ पर्यंत १६ आश्रमशाळांचे बांधकाम पूर्ण झालेले असून सन २०१५-१६ मध्ये १० आश्रमशाळांकरिता जमीन उपलब्ध होणे बाकी होते. त्यापैकी आता ६ आश्रमशाळांकरिता जमीन उपलब्ध झालेली असून ४ आश्रमशाळांकरिता जमीन उपलब्ध करणे बाकी आहे. सन २०१५-१६ मध्ये ८ आश्रमशाळांची बांधकामे प्रगतीपथावर होती. त्यातील गारगांव व गिरगाव येथील दोन आश्रमशाळांची कामे सन २०१७-१८ मध्ये पूर्ण झालेली आहेत. रणकोळ, विनवळ, गुहीर, सुर्यमाळ, पळसुंडे व कावळे येथील ६ आश्रमशाळांची कामे प्रगतीत आहेत. फक्त ४ आश्रमशाळांकरिता अजून जमीन मिळणे बाकी आहे. एकूण १८ आश्रमशाळांचे बांधकाम पूर्ण झाले असून ६ आश्रमशाळांचे बांधकाम प्रगतीपथावर आहे आणि ४ आश्रमशाळांना जमीनी मिळणे अद्याप बाकी आहे. अशा एकूण २८ आश्रमशाळांबाबतची माहिती समितीस प्राप्त झाली असून उर्वरित ६ आश्रमशाळांबाबत निश्चित काय सद्यस्थिती आहे अशी समितीने पृच्छा केली असता, समितीस विदीत करण्यात आले की, एकूण ३४ पैकी १८ आश्रमशाळांचे बांधकाम पूर्ण झालेले आहे. सन २०१५-१६ मध्ये १० आश्रमशाळांकरिता जागा उपलब्ध नव्हती, त्यापैकी ६ आश्रमशाळांकरिता वरखंडा, आंबेसरी, सायवंड, आंबगाव, कळंबे, ओझर या ठिकाणी जमीन प्राप्त झाली असून सदरहू आश्रमशाळांकरिता सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळालेली असून अंदाजपत्रक तयार करण्याचे काम देखील पूर्ण झाले आहे. त्यावर जमीन, सुधारीत प्रशासकीय मान्यता व पर्याप्त निधी प्राप्त असूनदेखील आजमितीस उक्त आश्रमशाळांचे बांधकाम सुरू झाले नसल्यामुळे समितीने खेद व्यक्त केला.

शिफारस—

३.२८ आदिवासी विकास विभागाने माहे मे, २००५ ते माहे जुलै, २०११ दरम्यान प्रकल्प अधिकारी कार्यालय, डहाणू अंतर्गत १६ आश्रमशाळा आणि प्रकल्प अधिकारी कार्यालय, जव्हार अंतर्गत १८ आश्रमशाळा अशा एकूण ३४ शासकीय आश्रमशाळा इमारती बांधकामासाठी रु. १६७.९८ कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान केली होती. सदरहू आश्रमशाळांचे बांधकाम हे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करावयाचे होते व त्याकरिता या विभागाकडे सदरहू निधी हा ' ठेव अंशदान ' अंतर्गत आदिवासी विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात आला होता. असा निधी उपलब्ध करून देताना काम पूर्ण करण्यासंदर्भात कोणतीही कालमर्यादा निश्चित करण्यात आलेली नव्हती. माहे मार्च, २०१५ पर्यंत ३४ आश्रमशाळांपैकी फक्त २ आश्रमशाळा बांधण्यात येऊ शकल्या होत्या. उर्वरित ३२ आश्रमशाळांपैकी १३ आश्रमशाळांचे काम माहे मार्च, २०१५ पर्यंत सुरू होते. प्रशासकीय मान्यता संपल्यामुळे सुरू होऊ न शकलेल्या ८ आश्रमशाळांपैकी ४ आश्रमशाळांसाठी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे जमा केलेले रु. १०.४१ कोटी अडकून राहिले. लेखापरिक्षणातील उपरोक्त निरीक्षणे ही मुलभूत आणि गंभीर आहेत.

साक्षीदरम्यान, विभागीय सचिवांनी समितीस अद्ययावत माहिती देताना कथन केले की, साक्षीच्या दिनांकापर्यंत उक्त ३४ आश्रमशाळांच्या बांधकामांपैकी १८ आश्रमशाळांची बांधकामे पूर्ण झालेली आहेत. सन २०१५-१६ मध्ये १० आश्रमशाळांकरिता जागा उपलब्ध नव्हत्या. त्यापैकी आता ६ आश्रमशाळांसाठी जागा उपलब्ध झालेल्या आहेत. उपलब्ध झालेल्या जागेवर आश्रमशाळांचे बांधकाम

सुरू झाले आहे काय अशी समितीने विचारणा केली असता त्यावर विभागीय सचिवांनी प्रत्यक्ष बांधकामाचे काम सुरू झालेले नसून उक्त कामांचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम पूर्ण झालेले असल्याचे कथन केले.

वास्तविक सन २००५ ते सन २०११ या कालावधीत ३४ शासकीय आश्रमशाळा इमारती बांधकामासाठी आदिवासी विकास विभागास एकूण रु. १६७.९८ कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली होती. या कामांकरिता आदिवासी विकास विभागास निधी देखील प्राप्त झालेला होता. प्रशासकीय मान्यता प्राप्त होऊन निधी मंजूर असून आजमितीस १२-१४ वर्षांचा कालावधी उलटूनही उक्त मंजूर ३४ आश्रमशाळांच्या इमारतींचे बांधकाम आदिवासी विकास विभाग आजही पूर्ण करू शकलेला नाही. यातून विभागाची निष्क्रियता व अकार्यक्षमता प्रथमदर्शनिच सामोरी येते. यासंदर्भात समिती अजिबात समाधानी नसून समितीच्या भावना अतिशय तीव्र आहेत.

आजमितीस मंजूर एकूण ३४ आश्रमशाळांच्या इमारतींच्या बांधकामांपैकी १८ आश्रमशाळांची कामे पूर्ण असून १६ आश्रमशाळांची कामे अपूर्ण आहेत. त्यापैकी सहा आश्रमशाळांसाठी जागा उपलब्ध झाली आणि ४ ची अद्याप मिळालेली नाही. अपूर्ण असलेल्या उक्त १६ आश्रमशाळांपैकी प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात होऊन काम प्रगतीपथावर असलेल्या व अद्याप बांधकाम सुरूच झाले नसलेल्या अशा सर्वच आश्रमशाळांच्या बांधकामाचा विभागाने पुनश्च एकदा तातडीने फेरआढावा घेऊन उक्त इमारतींची बांधकामे पूर्ण करण्याकरिता एक ठोस कालबद्ध कार्यक्रम त्वरेने हाती घेऊन उक्त कामे यापुढे अधिकचा कोणताही विलंब न लावता तातडीने पूर्णत्वास नेण्याबाबत युध्द पातळीवर आवश्यक ते सर्व प्रयत्न करावेत अशी समितीची शिफारस आहे. समितीच्या शिफारशीनुरुप सुरू करण्यात आलेल्या कार्यवाहीचा प्रगती अहवाल समितीस दोन महिन्यांत उपलब्ध करून देण्यात यावा.

परिच्छेद क्रमांक २.२.४.७—आश्रमशाळा इमारतींच्या बांधकामावर करण्यात आलेला विवेकहीन खर्च—

अभिप्राय—

३.२९ मारेगांव (ता. सिंदेवाही) शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता १ली ते ७ वी मध्ये दाखला घेणाऱ्या विद्यार्थ्यांची कमी संख्या विचारात घेऊन प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांनी मारेगांव येथील सर्व ६९ विद्यार्थ्यांना पिंपरी दिक्षीत (ता. मुल) येथील शासकीय आश्रमशाळेत भरती करून या दोन्ही आश्रमशाळा विलिनिकरणाचा माहे जुलै, २०१२ मध्ये प्रस्ताव सादर केला. माहे जुलै, २०१४ मध्ये आदिवासी विकास विभागाने हा विलिनिकरणाचा प्रस्ताव मान्य केला आणि मारेगांव आश्रमशाळा बंद करण्यात आली. परंतु लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की, ६९ विद्यार्थ्यांपैकी कोणत्याही विद्यार्थ्यांनी पिंपरी दिक्षीत येथील आश्रमशाळेत प्रवेश घेतला नाही. कारण या दोन आश्रमशाळांमध्ये (मारेगांव आणि पिंपरी दिक्षीत) ४० कि.मी. अंतर होते. विद्यार्थ्यांनी पिंपरी दिक्षीत आश्रमशाळेऐवजी जवळ पासच्या जिल्हा परिषद शाळेतआणि मारेगांव जवळील इतर अनुदानित आश्रमशाळेत प्रवेश घेतला. अशाप्रकारे शाळेच्या विलिनिकरणाचा मुळ उद्देशच विफल ठरला.

दरम्यानच्या काळात प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांनी मारेगांव वस्तीत नवीन आश्रमशाळा बांधण्याचा दुसरा प्रस्ताव माहे सप्टेंबर, २०१२ मध्ये मांडला आणि आदिवासी विकास विभागाने माहे डिसेंबर, २०१२ मध्ये या प्रस्तावास मान्यता देऊन यासाठी रुपये २.८६ कोटी मंजूर केले. माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये हे काम बहाल करण्यात आले आणि माहे डिसेंबर, २०१५ पर्यंत यावर रुपये १.९७ कोटी खर्च करण्यात आला. सुरुवातीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची कमी संख्या लक्षात घेऊन आश्रमशाळा बंद करणे आणि नंतर त्याच वस्तीत नवीन आश्रमशाळा इमारत बांधण्याचा निर्णय घेणे तक्रसंगत नाही आणि यामुळे रुपये १.९७ कोटी विवेकहिन खर्च झाला.

साक्षीदरम्यान, समितीस अवगत करण्यात आले की, मारेगांव येथील आश्रमशाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची कमी झालेली संख्या विचारात घेता सन २०१२ मध्ये उक्त शाळा बंद करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. त्यावर शाळा बंद करण्याचा आदेश प्राप्त झाला, उक्त शाळा पिंपरी दिक्षीत (ता. मुल) या शाळेमध्ये विलिनिकरणाचा प्रस्ताव मंजूर झाला तरीदेखील मारेगाव येथील शाळा सन २०१४ पर्यंत सुरू राहिली याबाबतची कारणे समितीने विचारली असता विभागातर्फे असे सांगण्यात आले की, मारेगाव येथील शाळा बंद करण्याचा निर्णय होईपर्यंत त्यामध्ये सुमारे २ वर्षाचा कालखंड गेला. दरम्यानच्या काळात असे झाले की, मारेगाव जवळच्या उमरी पोतदार व पिंपरी दिक्षीत या दोन गावांमध्ये देखील तात्पुरत्या शेडमध्ये आश्रमशाळा सुरू होत्या. उक्त शाळांमध्ये देखील सोयी-सुविधांची कमतरता असल्यामुळे नागरिकांनी तेथे आंदोलन केले होते. मारेगाव येथे आश्रमशाळा बांधण्याकरिता शासकीय जमीन उपलब्ध असल्याकारणाने उक्त दोन्ही शाळांचे विलिनिकरण करून मारेगाव येथे नवीन आश्रमशाळेचे बांधकाम करून तेथे शाळा सुरू करण्यात आलेली आहे. विभागाच्या या स्पष्टीकरणावर समितीने असहमती दर्शविली. मारेगाव येथील शाळा बंद करण्याचा सन २०१२ मध्ये प्रस्ताव सादर करण्यात येवून सन २०१४ मध्ये उक्त शाळा बंद करण्याचा अंतिम निर्णय झाला. मारेगाव येथील आश्रमशाळेतील ६९ मुलांपैकी एकाही विद्यार्थ्याने नजीकच्या पिंपरी दिक्षीत व उमरी पोतदार या शाळांमध्ये प्रवेश न घेता नजिकच्या जिल्हा परिषद शाळेत व अनुदानित आश्रमशाळेत प्रवेश घेतलेला आहे. एका बाजुला माहे जुलै, २०१२ मध्ये मारेगाव येथील शाळा बंद करण्याचा

प्रस्ताव सादर करायचा आणि दुसऱ्या बाजुला त्याच वर्षी म्हणजेच माहे सप्टेंबर २०१२ मध्ये मारेगाव येथेच नवीन आश्रमशाळा इमारत बांधकामाचा प्रस्ताव सादर करायचा असे हे एकमेकांशी विसंगत असलेले दोन प्रस्ताव प्रकल्प अधिकारी कार्यालय, चंद्रपूर यांचे स्तरावर सादर करण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सदरहू प्रस्ताव अपर आदिवासी आयुक्त स्तरावर देखील मंजूर झालेला आहे. याबाबत समितीने तीव्र नापसंती व्यक्त करून या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी होणे अगत्याचे असल्याचे मत प्रदर्शित केले.

शिफारस—

३.३० लेखापरिक्षणात नोंदविण्यात आलेला आक्षेप अतिशय गंभीर स्वरुपाचा आहे. मारेगांव (ता. सिंदेवाही) शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता १ ली ते ७ वी मध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची कमी झालेली संख्या विचारात घेऊन प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांनी मारेगांव येथील सर्व ६९ विद्यार्थ्यांना पिंपरीदिक्षीत (ता. मुल) येथील शासकीय आश्रमशाळेत भर्ती करून या दोन्ही आश्रमशाळांचा विलिनिकरणाचा प्रस्ताव माहे जुलै, २०१२ मध्ये सादर केला. माहे जुलै, २०१४ मध्ये आदिवासी विकास विभागाने प्रस्तुत विलिनिकरणाच्या प्रस्तावास मान्यता दिली व मारेगांव येथील आश्रमशाळा बंद करण्यात आली. उक्त शाळा बंद झाल्यानंतर या शाळेतील एकूण ६९ विद्यार्थ्यांपैकी एकाही विद्यार्थ्याने मारेगांव ते पिंपरीदिक्षीत हे अंतर सुमारे ४० कि.मी. असल्याने पिंपरीदिक्षीत येथील शाळेत प्रवेश घेतला नाही. उक्त सर्व विद्यार्थ्यांनी आसपासच्या जिल्हा परिषद शाळेत आणि मारेगांव जवळील इतर अनुदानित आश्रमशाळेत प्रवेश घेतला.

अत्यंत आक्षेपार्ह बाब म्हणजे दरम्यानच्या काळात प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांनीच मारेगांव वस्तीत नवीन आश्रमशाळा बांधण्याचा दुसरा प्रस्ताव माहे सप्टेंबर, २०१२ मध्ये सादर केला आणि आदिवासी विकास विभागाने माहे डिसेंबर, २०१२ मध्ये या प्रस्तावास मान्यता देऊन यासाठी रु. २ कोटी ८६ लाख मंजूर केले. माहे फेब्रुवारी, २०१४ मध्ये हे काम बहाल करून माहे डिसेंबर, २०१५ पर्यंत उक्त कामावर रु. १ कोटी ९७ लाख इतका खर्च देखील करण्यात आला होता. सुरुवातीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची कमी संख्या विचारात घेऊन आश्रमशाळा बंद करणे आणि नंतर त्याच वस्तीत नवीन आश्रमशाळा इमारत बांधण्याचा निर्णय घेणे केव्हाही तर्कसंगत वाटत नाही.

साक्षीदरम्यान समितीस असे कथन करण्यात आले की, मारेगांव जवळच्या उमरी पोतदार व पिंपरीदिक्षीत या गावांमध्ये देखील २ शाळा होत्या. त्या शाळा शेडमध्येच सुरू होत्या. तेथेही सोईसुविधांची कमतरता होती म्हणून आंदोलन होत होते. मारेगांव येथे शासकीय जमीन उपलब्ध होती त्यामुळे या तीनही शाळांचे विलिनिकरण करून मारेगाव येथे नवीन इमारत बांधून या ठिकाणी नवीन शाळा सुरू करण्यात आली असून आता या ठिकाणी २६५ मुले शिक्षण घेत आहेत.

विभागाचा उपरोक्त खुलासा हा मुळीच पटणारा नाही. प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची कमी झालेली संख्या विचारात घेऊन मारेगांव (ता.सिंदेवाही) येथील आश्रमशाळा ही पिंपरी दिक्षीत (ता. मूल) येथील आश्रमशाळेत विलिनिकरण करण्याचा प्रस्ताव माहे जुलै, २०१२ मध्ये प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांनी आदिवासी विकास विभागास सादर करणे. त्या प्रस्तावास आदिवासी विकास विभागाने माहे जुलै, २०१४ मध्ये मान्यता देणे. त्याचवेळी दुसरीकडे माहे सप्टेंबर, २०१२ मध्ये प्रकल्प अधिकारी, चंद्रपूर यांनीच प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी असून देखील मारेगांव वस्तीत नवीन आश्रमशाळा बांधण्याचा प्रस्ताव सादर करणे व त्यास आदिवासी विकास विभागाने देखील माहे डिसेंबर, २०१२ मध्ये मान्यता देऊन यासाठी रु. २ कोटी ८६ लक्ष इतका निधी मंजूर करणे हा संपूर्ण घटनाक्रमच विसंगत व अनाकलनिय असाच असून सहज दिसतो इतका तो सरळ व सोपा नसून यामागे ढिसाळ नियोजन व समन्वयाची कमी दिसून येते. अतः आदिवासी विकास विभागाने या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरिय अधिकाऱ्यांची समिती स्थापन करून त्यान्वये सखोल चौकशी करावी तसेच परस्पर दोन अंतर्विरोधी निर्णय विभागातील समन्वयाचा अभाव दर्शवित असून विभागाने समन्वय पुनःस्थापित करावा, अशी समितीची शिफारस आहे.

शिफारशीनुरुप केलेल्या कार्यवाहीबाबत समितीस दोन महिन्यांत अवगत करण्यात यावे.

परिच्छेद क्रमांक २.२.४.८—आश्रमशाळांमध्ये मुलभूत सुखसोयींची अपर्याप्तता—

अभिप्राय—

३.३१ (i) सन २००६-०७ च्या आश्रमशाळा संहितेत आश्रमशाळांमध्ये मूलभूत सुविधा, जसे वर्ग कक्ष वाचनालय, प्रयोगशाळा, भोजन कक्ष, भांडार कक्ष, स्वयंपाक घर, पिण्याच्या पाण्याची सोय, प्रसाधनगृह, स्नान घर, खेळण्याचे मैदान, फिरत्या वैद्यकीय कक्षाची तरतूद इत्यादी सोयी पुरविण्याचे विहित केले आहे.

साक्षीदरम्यान, विभागीय सचिवांनी कथन केले की, निकषाप्रमाणे साधारणतः प्रत्येक २० विद्यार्थ्यांमागे एक स्नानगृह आणि एक प्रसाधनगृह असणे आवश्यक आहे. लेखापरिक्षणाधीन असलेल्या ५२ आश्रमशाळांमध्ये सद्यःस्थितीत १७ विद्यार्थ्यांमागे एक प्रसाधनगृह तर २० विद्यार्थ्यांमागे एक स्नानगृह उपलब्ध आहे. राज्यात एकूण ५०२ आश्रमशाळा असून उक्त आश्रमशाळांमध्ये उपलब्ध असलेल्या प्रसाधनगृह आणि स्नानगृहांची गुणोत्तरात थोडा फरक असून त्या शाळांत सर्वसाधारणतः दर २५ विद्यार्थ्यांमागे एक शौचालय तर दर २७ विद्यार्थ्यांमागे एक स्नानगृह उपलब्ध आहे.

विभागाच्या लेखी स्पष्टीकरणात एकूण ५०२ आश्रमशाळांपैकी ३५९ आश्रमशाळांमध्ये पाण्याची कायमस्वरुपी व्यवस्था आहे तर १४३ आश्रमशाळांमध्ये पाण्याची तात्पुरती व्यवस्था असल्याचे नमूद करण्यात आले आहे. पाण्याची व्यवस्था ही प्राथमिक व मुलभूत स्वरुपाची गरज असून पाण्याच्या व्यवस्थेचे तात्पुरते प्रयोजन असणे ही बाब कदापिही संयुक्तीक नसल्याने उक्त आश्रमशाळांमध्ये पाण्याच्या व्यवस्थेचे कायमस्वरुपी प्रयोजन करणे आवश्यक असल्याचे मत समितीने व्यक्त केले.

शिफारस :-

३.३२ (i) लेखापरिक्षणात नमूद करण्यात आलेली निरीक्षणे ही अत्यंत मुलभूत व महत्त्वाची आहेत. सन २००६ च्या आश्रमशाळा संहितेत दर्शविल्यानुसार राज्यातील ५०२ आश्रमशाळांमध्ये पुरविण्यात येत असलेल्या मुलभूत सोयी-सुविधांबाबतचा गोषवारा देण्याबाबत समितीने सूचित केले असता समितीस सांगण्यात आले की, निकषाप्रमाणे प्रत्येक २० विद्यार्थ्यांमागे एक स्नानगृह व एक प्रसाधनगृह असणे आवश्यक आहे. ज्या ५२ आश्रमशाळांचे लेखापरिक्षण झाले त्यामध्ये १७ विद्यार्थ्यांमागे एक प्रसाधनगृह तर २० विद्यार्थ्यांमागे एक स्नानगृह उपलब्ध आहे. राज्यामध्ये इतरत्र आश्रमशाळांमध्ये २५ विद्यार्थ्यांमागे एक शौचालय तर २७ विद्यार्थ्यांमागे एक स्नानगृह उपलब्ध आहे.

प्रस्तुतचा विहित करण्यात आलेला दर २० विद्यार्थ्यांकरिता एक स्नानगृह व एक प्रसाधनगृह हा निकष निश्चितच जाचक व अमानवी अशा स्वरुपाचा असून त्यामध्ये तातडीने सुधारणा करण्याबाबत विभागाने सकारात्मक कार्यवाही करावी असे समितीचे स्पष्ट मत आहे.

त्याचप्रमाणे विभागाच्या स्पष्टीकरणात नमूद केल्यानुसार एकूण ५०२ आश्रमशाळांमध्ये १४३ ठिकाणी पाण्याची तात्पुरती व्यवस्था करण्यात आल्याचे नमूद आहे. याबाबत समितीचा तीव्र आक्षेप आहे. पाणी ही खऱ्या अर्थाने प्राथमिक व मुलभूत अशी गरज आहे. त्यामुळे पाण्याची व्यवस्था ही तात्पुरती स्वरुपाची न करता ती कायमस्वरुपी अशीच व्यवस्था असणे आवश्यक आहे. अतः विभागाने आश्रमशाळांमध्ये पाण्याची कायमस्वरुपी व्यवस्था उपलब्ध करण्याबाबत आवश्यक ती ठोस कार्यवाही सत्वर करावी. शिफारशीनुरुप केलेल्या कार्यपूर्तीचा अहवाल समितीस यथाशिघ्र उपलब्ध करून देण्यात यावा.

अभिप्राय—

३.३३ (ii) फिरत्या वैद्यकीय पथकाद्वारे आश्रमशाळांना आवश्यक त्या भेटी न दिल्याबाबत :

आश्रमशाळा संहितेच्या नियम ३.२९ अ नुसार वैद्यकीय पथकाने प्रत्येक आश्रमशाळेत विद्यार्थ्याच्या वैद्यकीय तपासणीसाठी दर महिन्यात कमीत कमी एकदा भेट द्यावयास हवी. म्हणजेच प्रत्येक आश्रमशाळेत वर्ष २०१०-१५ या ५ वर्षाच्या कालावधीत आश्रमशाळांचे शिक्षण सत्र दहा महिन्यांचे असल्याने प्रत्येक आश्रमशाळेस ५० वेळा भेट द्यावयास पाहिजे होती. या तरतुदी विरुद्ध फिरत्या वैद्यकीय पथकाद्वारे आश्रमशाळांना देण्यात आलेल्या भेटीत असे आढळून आले की, फिरत्या वैद्यकीय पथकाने फक्त एक आश्रमशाळेस ५० पेक्षा जास्त भेटी दिल्या होत्या, ३ आश्रमशाळांस ४१ ते ५० भेटी दिल्या होत्या, एका आश्रमशाळेस ३१ ते ४० भेटी दिल्या होत्या, ५ आश्रमशाळेस २१ ते ३० भेटी दिल्या होत्या, १७ आश्रमशाळेस ११ ते २० भेटी दिल्या होत्या तर २४ आश्रमशाळेस १ ते १० भेटी दिल्या होत्या.

याशिवाय प्रकल्प अधिकारी, धारणी यांच्या अखत्यारितील चिरोडी आश्रमशाळेत फिरत्या वैद्यकीय पथकाने ५ वर्षात फक्त एकदा भेट दिली, त्याच प्रकल्प अधिकाऱ्याच्या अखत्यारीतील टेंब्रुसोंडा आश्रमशाळेत ५ वर्षात आवश्यक ५० भेटी ऐवजी १८३ भेटी देण्यात आल्या होत्या. यावरून विहित मापदंडाचे काटेकोरपणे पालन न झाल्याचे निदर्शनास आले.

साक्षीदरम्यान, विभागीय सचिवांनी कथन केले की, आर.एस.बी.ओ. राष्ट्रीय बाल कल्याण योजनेखाली फिरत्या वैद्यकीय पथकांवर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी ही मुख्यतः सार्वजनिक आरोग्य विभागाची आहे. ज्या ठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र किंवा आरोग्य उप केंद्र दूर असते. रुग्णवाहिकेची नजिकच्या परिसरात उपलब्धता नसते अशा ठिकाणी प्रकल्प कार्यालयांतर्गत येत असलेल्या ३०१ आश्रमशाळांचे रेखांकन (Maping) करून, वाहतूक नियोजन करून, रुग्ण कक्ष तयार करून रुग्णवाहिकांकरिता स्थळ निश्चिती करण्यात येत आहे. यासंदर्भात बी.व्ही.जी. कंपनीची मदत घेण्यात येत आहे. विभागाने आश्रमशाळेतील सर्व मुलांचे नजिकच्या काळात १०० टक्के ' डिजीटाइज्ड हेल्थ रेकॉर्ड ' तयार करण्याचे योजिले आहे.

आदिवासी विकास विभागाने फिरते वैद्यकीय पथकासाठी वाहने उपलब्ध करून दिली. सदरहू पथकाने दर महिन्याला किमान एकदा प्रत्येक आश्रमशाळेस भेट देण्याचा कार्यक्रम निश्चित केला. परंतु फिरते वैद्यकीय पथकाद्वारे त्याची पूर्तता झालेली नाही. अशा परिस्थितीत संबंधितांवर विभागाने काय कारवाई केली, अशी समितीने पृच्छा केली असता विभागातर्फे असे प्रतिपादन करण्यात आले की, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि आरबीएसके यांना जे उदिष्ट दिले त्यानुसार काम करणे अपेक्षित होते. तथापि, प्रत्यक्षात त्याप्रमाणात उद्दिष्टपूर्ती होत नसल्याचे दिसते. यामागील कारणमिमांसा तपासली असता अनेक ठिकाणी फिरत्या वैद्यकीय पथकाकरिता वाहनांची पुरेशी उपलब्धता नसल्याचे दिसते. तसेच अनेक ठिकाणी रिक्त पदांची संख्या जास्त आहे. तसेच आरबीएसके चे कर्मचारी प्राथमिक आरोग्य केंद्रात कर्तव्यावर असल्याकारणाने त्यांच्याकडून आश्रमशाळांना आवश्यक इतक्या भेटी दिल्या जात नाहीत अशी यामागची अनेक कारणे आहेत. यासंदर्भात सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांसमवेत बैठक आयोजित करून याबाबतीत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल असे आश्वासित केले.

शिफारस—

३.३४ (ii) आश्रमशाळा संहितेच्या नियम ३.२९ नुसार फिरत्या वैद्यकीय पथकाने प्रत्येक आश्रमशाळेत विद्यार्थ्यांच्या वैद्यकीय तपासणीसाठी दर महिन्यातून कमीत कमी एकदा भेट द्यावयास हवी. म्हणजेच प्रत्येक आश्रमशाळेस वर्ष २०१० ते २०१५ या पाच वर्षांच्या कालावधीत फिरत्या वैद्यकीय पथकाने ५० वेळा भेट द्यावयास पाहिजे. या तरतुदीविरुद्ध फिरत्या वैद्यकीय पथकांद्वारे आश्रमशाळांना देण्यात आलेल्या भेटीत अभिप्रायात नमूद केल्याप्रमाणे मोठ्या प्रमाणावर तूट होती. फिरत्या वैद्यकीय पथकाने लेखापरिक्षण कालावधीच्या पाच वर्षात फक्त एका आश्रमशाळेस ५० पेक्षा जास्त भेटी दिल्या होत्या. तर २४ आश्रमशाळांना १ ते १० इतक्या कमीत कमी भेटी दिल्या होत्या. प्रकल्प अधिकारी, धारणी यांच्या अखत्यारीतीतील चिरोडी आश्रमशाळेत फिरत्या वैद्यकीय पथकाने पाच वर्षात फक्त एकदा भेट दिली तर त्याच प्रकल्प अधिकाऱ्यांच्या अखत्यारितीतील टेंब्रुसोंडा आश्रमशाळेस पाच वर्षात आवश्यक ५० भेटींऐवजी १८३ भेटी दिल्या होत्या.

साक्षीदरम्यान, विभागीय सचिवांनी फिरत्या वैद्यकीय पथकांनी आश्रमशाळांना भेटी देण्याच्या आवश्यक त्या मापदंडाचे काटेकोरपणे पालन केले नसल्याची बाब मान्य करून पुढे कथन केले की, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि आरबीएसकेला जे उदिष्ट देण्यात आले आहे त्याप्रमाणे त्यांनी काम करणे अपेक्षित आहे. शासकीय बाल कल्याण योजनेखाली फिरत्या वैद्यकीय पथकांवरील नियंत्रण तथा पर्यवेक्षणाचे काम आरोग्य विभागाकडे असल्याने प्रस्तुत बाबी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या निदर्शनास आणून देऊन संबंधितांची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यास सांगण्यात येईल. समितीला उपरोक्त प्रमाणे आश्वस्त केल्यानुसार सत्वर कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल समितीस दोन महिन्यांत उपलब्ध करून देण्यात यावा, अशी समितीची शिफारस आहे.

अभिप्राय—

३.३५ (iii /iv) आश्रमशाळांमध्ये प्रसाधनगृहे आणि स्नानघरांची संख्या अपर्याप्त असणे / इतर सुविधांची अनुपलब्धता :

लेखापरिक्षणाकरिता निवडलेल्या ५२ आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांची मंजूर संख्या २७,४७० इतकी होती. या आश्रमशाळांमध्ये ७९६ प्रसाधनगृहे आणि ७०४ स्नानघरे होती, म्हणजेच सरासरी ३५ विद्यार्थ्यांसाठी एक प्रसाधनगृह, ३९ विद्यार्थ्यांसाठी एक स्नानघर उपलब्ध होते. दोन आश्रमशाळांमध्ये (धानवळ आणि ओझर) प्रसाधनगृह, स्नानघर नव्हते आणि एका आश्रमशाळेत (बोरीपाडा) प्रसाधनगृह नव्हते. परिणामी, या आश्रमशाळातील विद्यार्थी मुलांना प्रसाधनासाठी उघड्यावर जाण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता आणि विद्यार्थी मुली गावातील महिलांसाठी असलेल्या सामाईक प्रसाधनगृहांचा वापर करीत होत्या. तसेच१५ आश्रमशाळांमध्ये खेळण्यासाठी मैदान नव्हते, १३ आश्रमशाळांमध्ये कर्मचाऱ्यांसाठी निवासी क्वार्टर्स नव्हते, २७ आश्रमशाळांमध्ये विज्ञान प्रयोगशाळा नव्हत्या, १९ आश्रमशाळांमध्ये भोजन कक्ष नव्हते, २६ आश्रमशाळांमध्ये संगणक कक्ष नव्हते, ३० आश्रमशाळांमध्ये वाचनालय कक्ष नव्हते आणि माहे एप्रिल,२०११ ते माहे डिसेंबर २०१३ दरम्यान लोड-शेडिंगच्या समस्येचे निवारण करण्यासाठी आश्रमशाळांना पुरविलेल्या २६ डिझेल जनरेटर संचापैकी सात संच माहे जुलै, २०१५ पर्यंत स्थापित करण्यात आले नव्हते. उर्वरित १९ संचाचा उपयोग करण्यात येत नव्हता, कारण डिझेल खरेदी करण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली नव्हती, या २६ जनरेटरची एकूण किंमत रुपये ०.८९ कोटी होती.

साक्षीदरम्यान, समितीने विचारणा केली की, लेखापरिक्षणाधीन असलेल्या ५२ आश्रमशाळांमधील तोरंगण, त्र्यंबकेश्वर तालुक्याच्या आश्रमशाळांमध्ये विद्यार्थीनींची शौचालये आहेत पण विद्यार्थ्यांच्या शौचालयाची संख्या शून्य आहे. त्याचप्रमाणे देवगाव, धानवड व बोरगड येथील आश्रमशाळेमधील परिस्थिती सारखीच आहे. विद्यार्थ्यांसाठी स्नानगृह नसेल तर एकवेळ समिती समजू शकेल पण नाळगाव, तोरंगण, बोरवण, ओझर, धानवड इत्यादी ठिकाणी विद्यार्थीनींसाठी स्नानगृह नाहीत. या गोष्टीचा समितीस विशाद वाटतो. विद्यार्थी व विद्यार्थीनींना प्रस्तुतच्या सोयीसुविधा उपलब्ध करून

देण्याचा विचार करताना विद्यार्थीनींसाठी स्नानगृह, प्रसाधनगृह, भोजनकक्ष इत्यादी गोष्टींची अगदी प्राथमिक पातळीवर आवश्यकता असल्याचे समितीचे मत आहे. लेखापरिक्षणाधीन असलेल्या ५२ आश्रमशाळांकरिता इमारतींचे बांधकाम करतानाच प्रसाधनगृह आणि स्नानगृहाचे बांधकाम बंधनकारक करणे आवश्यक होते असे मत व्यक्त करून समितीने यासंदर्भात विभागाकडे अधिकची विचारणा केली असता विभागातर्फे असे सांगण्यात आले की, ५२ पैकी एक आश्रमशाळा समायोजित झालेली असून ५१ पैकी ४७ ठिकाणी शासनाची स्वतःची जागा आहे. उर्वरित ४ ठिकाणी जिल्हाधिकाऱ्यांकडे जागेची मागणी केली आहे. त्यावर, ४७ आश्रमशाळांना स्वतःच्या जागा व इमारती असतानाही उपलब्ध सोयी-सुविधांमध्ये खूपच त्रुटी असून आश्रमशाळांमधील मुलभूत सोयी-सुविधांबाबत विभाग अजिबात गंभीर नसून यास जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करणे अगत्याचे असल्याचे समितीने मत व्यक्त केले.

त्याचप्रमाणे, सन २०११-१३ या कालावधीत आश्रमशाळांकरिता एकूण ५० जनरेटरची खरेदी करण्यात आलेली होती. सदरहू जनरेटरकरिता डिझेल व देखभाल दुरूस्तीकरिता निधीची तरतूद नसतानादेखील उक्त जनरेटरची खरेदी करण्यात आलेली आहे. यासंदर्भात अधिकचे स्पष्टीकरण करण्याबाबत समितीने विभागाला सूचित केले असता विभागातर्फे असे सांगण्यात आले की, सदरहू ५० जनरेटरची खरेदी ही तत्कालीन अपर आदिवासी आयुक्त, अमरावती यांच्या स्तरावर झालेली होती. सदरहू ५० जनरेटर संच खरेदीसाठी विदर्भ वैधानिक विकास महामंडळाकडून निधी प्राप्त झाला होता. सदरहू ५० जनरेटर संच खरेदीसंदर्भात तक्रार प्राप्त झाल्यानंतर एकूण ५० जनरेटर संचापैकी फक्त १७ जनरेटर संचाचेच देयक अदा करण्यात आले आहे. उर्वरित ३३ जनरेटर संचाचे देयक रोखून ठेवण्यात आलेले आहे. तत्कालीन अपर आदिवासी आयुक्त, अमरावती यांचे विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल झालेली असून सद्यःस्थितीत ते प्रकरण न्यायालयात प्रलंबित असून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार हे प्रकरण दोषारोप दाखल करण्याच्या स्तरावर आहे. प्रस्तुत प्रकरणी तत्कालीन अपर आदिवासी आयुक्त, अमरावती यांनी मा. उच्च न्यायालय, नागपूर येथे प्रथम खबरी रद्द होणेबाबत याचिका दाखल केलेली असून मा. उच्च न्यायालय, नागपूर यांनी सदरहू गुन्ह्याच्या तपास प्रक्रीयेवर सद्यःस्थितीत स्थगनादेश दिलेला आहे.

याप्रकरणात तत्कालीन अपर आदिवासी आयुक्त, अमरावती यांच्या विरोधात दोन स्वतंत्र प्रशासकीय चौकशी प्रक्रिया सुरू करण्यात आल्या. जिल्हाधिकारी, वाशिम यांनी चौकशी करून अहवाल सादर केलेला आहे. तसेच आयुक्त, आदिवासी विभाग यांनीदेखील चौकशी करून याबाबतचा अहवाल सादर केलेला आहे. सदरहू दोन्ही चौकशी अहवाल तत्कालीन मुख्य सचिवांना सादर करण्यात आलेले असून यामध्ये प्रशासकीय आणि वित्तीय अनियमीतता झालेली असल्याबाबत शेरे नोंदणी करण्यात आलेली आहे. त्यावर, प्रस्तुत प्रकरणात जिल्हाधिकारी, वाशिम यांनी चौकशी करून सादर केलेला अहवाल, त्याचप्रमाणे आयुक्त, आदिवासी विकास यांनीदेखील चौकशी करून सादर केलेला अहवाल, यासंदर्भात मुख्य सचिवांकडे सादर केलेली नस्ती इत्यादींच्या छायांकीत प्रती समितीस उपलब्ध करून द्याव्यात, असे समितीने सूचित केले. तसेच प्रस्तुत प्रकरणी डिझेलकरिता आर्थिक तरतूद नसतानादेखील विनाकारण ५० जनरेटर संचाची खरेदी अपर आदिवासी आयुक्त, अमरावती यांच्यास्तरावर करण्यात आलेली आहे. उक्त संचापैकी १७ संच कार्यान्वित असून त्यापोटी रुपये ५५,८१,२०२ इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे तर, उर्वरित ३३ जनरेटर संच हे विभागाकडे न वापरता पडून असून त्यापोटीचे रुपये १,०८,३४,७२८ इतक्या रकमेचे आर्थिक दायित्व विभागाकडे आलेले आहे. ही बाब अतिशय गंभीर असून प्रस्तुत प्रकरणात दोषी असणाऱ्या सर्व संबंधितांवर तातडीने नियमानुसार कठोर अशी कारवाई होणे नितांत आवश्यक असल्याचे समितीने मत व्यक्त केले.

शिफारस—

३.३६ (iii/iv) आश्रमशाळांमध्ये प्रसाधनगृहे आणि स्नानघरांची संख्या अपर्याप्त असणे/इतर सुविधांची अनुपलब्धता :

लेखापरिक्षणात आक्षेपित करण्यात आलेले मुद्दे हे अतिशय मुलभूत व महत्त्वाचे आहेत. लेखापरिक्षणाकरिता निवडलेल्या ५२ आश्रमशाळांमध्ये एकूण २७,४७० आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत होते. या आश्रमशाळांमध्ये एकूण ७९६ प्रसाधनगृहे आणि ७०४ स्नानगृहे होती. म्हणजेच सरासरी ३५ विद्यार्थ्यांसाठी एक प्रसाधनगृह आणि ३९ विद्यार्थ्यांसाठी एक स्नानगृह होते. धनवळ व ओझर या दोन आश्रमशाळांमध्ये तर प्रसाधनगृह आणि स्नानगृह अस्तित्त्वातच नव्हते आणि बोरीपाडा आश्रमशाळेत प्रसाधनगृहाची सोय नव्हती. त्यामुळे या आश्रमशाळेतील मुलांना प्रसाधनासाठी उघड्यावर जाण्याशिवाय दुसरा मार्ग नव्हता तर, विद्यार्थी मुली गावातील महिलांसाठी असलेल्या सामायिक प्रसाधनगृहाचा वापर करीत होत्या.

वास्तविक अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना योग्यप्रकारे शिक्षण देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याच्या स्तुत्य हेतुने आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृहांची खऱ्या अर्थाने स्थापना करण्यात आलेली आहे. सदरहू आदिवासी आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सोयी-सुविधा पुरवून त्यांना उत्तमप्रकारे शिक्षित करून त्यांचे सर्वांगीण कल्याण साधणे हा खरे म्हणजे एक सामाजिक जिव्हाळ्याचा विषय आहे. आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थीनींकरिता स्नानगृह, प्रसाधनगृह यासारख्या सुविधा या अत्यावश्यकच आहेत तर विद्यार्थ्यांकरिता किमान प्रसाधनगृहांची सोय असणे अति आवश्यक आहे. असे असताना आदिवासी

आश्रमशाळा व वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना निकषाप्रमाणे आवश्यक त्या योग्य सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याप्रती विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी दर्शविलेली असंवेदनशीलता व निष्काळजीपणा याबाबत समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत असून समिती प्रस्तुत प्रकरणी अतिशय संवेदनशील आहे. सबब, लेखापरिक्षणाधीन असलेल्या ५२ आदिवासी आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना निकषाप्रमाणे पर्याप्त संख्येने प्रसाधनगृह, स्नानगृह इ. सारख्या सोयी-सुविधा पुरविण्याकामी निष्काळजीपणा दाखविलेल्या सर्व संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाई होणे नितांत आवश्यक असल्याचे समितीचे मत झाले आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी विभागाने उच्चस्तरीय सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्यावर जबाबदारी निश्चित करून त्यांचे विरुद्ध नियमानुसार योग्य ती कारवाई त्वरित करावी, अशी समितीची शिफारस आहे. शिफारशीनुरुप विभागामार्फत करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस एक महिन्यात उपलब्ध करून देण्यात यावी.

त्याचप्रमाणे सन २०११-१३ या कालावधीमध्ये भारनियमनाच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती यांचेस्तरावर एकूण ५० जनरेटर संचाची खरेदी करण्यात आली होती. त्यापैकी १७ जनरेटर संच कार्यान्वित करण्यात आले तर ३३ जनरेटर संच विभागाकडे विनावापर पडून असल्याचे लेखापरिक्षणात निदर्शनास आले. डिझेल खरेदी करण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूद नसतानादेखील उपरोक्त ५० जनरेटर संच खरेदी करण्यात आले. साक्षीदरम्यान, निदर्शनास आल्याप्रमाणे सदरहू जनरेटर संच हे दर करारावरील पुरवठादाराकडून खरेदी न करता अन्य पुरवठादाराकडून अपर आदिवासी आयुक्त, अमरावती यांच्याद्वारे खरेदी करण्यात आले. सदरहू कार्यरत असलेल्या १७ जनरेटर संचांच्या देयकांपोटी रक्कम रुपये ५५,८१,२०२ पुरवठादारास अदा करण्यात आली तर विनावापर पडून असलेल्या ३३ जनरेटर संचापोटी रक्कम रुपये १ कोटी ८ लाख इतके आर्थिकदायित्व विनाकारण विभागावर आले.

अपर आदिवासी आयुक्त, अमरावती यांचे स्तरावर खरेदी करण्यात आलेल्या प्रस्तुत जनरेटर संचांच्या खरेदीसंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडेदेखील तक्रार प्राप्त झाली होती. सदरहू प्रकरण हे न्यायालयात दोषारोप पत्र दाखल करण्याच्या स्तरावर प्रलंबित आहे. याप्रकरणी मा. उच्च न्यायालय, नागपूर येथे आरोपी यांनी प्रथम खबरी रद्द होणेबाबत याचिका दाखल केलेली असून मा.न्यायालयाने सदर गुन्ह्यात तपास प्रक्रियेवर स्थगनादेश दिलेला आहे. प्रस्तुत प्रकरण हे अतिशय गंभीर असून या प्रकरणात जनरेटर संच खरेदीमुळे विभागावर विनाकारण प्रचंड आर्थिक दायित्व आलेले असल्याने विभागाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे संपर्क व समन्वय साधून मा.उच्च न्यायालय, नगापूर येथील दाखल झालेल्या याचिकेवरील सुनावणी प्रक्रिया अधिक गतिमान करून प्रकरणाचे गांभिर्य मा.न्यायालयाच्या निदर्शनास आणून देऊन प्रकरण त्वरेने अंतिमतः निकाली काढण्याच्यादृष्टीने कसोटीने सकारात्मक असे प्रयत्न करावेत.

तद्वतच या प्रकरणी जिल्हाधिकारी, वाशिम व आदिवासी आयुक्त, नाशिक यांची स्वतंत्ररित्या चौकशी करून अहवाल विभागाकडे सादर केले. प्रस्तुत प्रकरणी विभागाने दोन्ही चौकशी अहवालांसह नस्ती मुख्य सचिवांकडे सादर केली असता संबंधित दोषी अधिकाऱ्याला फक्त सक्त ताकीद देण्याची कारवाई करण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले.

वास्तविक, जनरेटर संचांची अनाठायी खरेदी करून विभागवार सुमारे रु. १ कोटी ८ लक्ष इतका विनाकारण आर्थिक दायीत्वांचा भुर्दंड लादला गेलेला असल्याने प्रस्तुत प्रकरण हे अतिशय गंभीर स्वरुपाचे आहे असे असताना यामध्ये दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यास सक्त ताकीद देण्यासारखी किरकोळ शिक्षा करणे हे कधीही योग्य व उचित ठरणारे नाही. प्रस्तुत प्रकरणी दोषी अधिकारी सेवानिवृत्त झाला असल्याचे समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आले असे जरी असले तरी प्रकरणाचे गांभीर्य विचारात घेता विभागाने उक्त प्रकरणी पुनर्विचार करून नियमांचा योग्य आधार घेऊन या प्रकरणी पुर्नआढावा घेऊन संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी समितीची शिफारस आहे.

अभिप्राय—

३.३७ (v) निष्काम सौर पाणी तापके (Solar water heaters)

आदिवासी आयुक्तांनी वर्ष २०११-१३ या दरम्यान आश्रमशाळा आणि वसतिगृहांसाठी रुपये २८.६४ कोटी किंमतीचे १,७८९ सौर पाणी तापके खरेदी केले, ज्यापैकी १,७४६ सौर पाणी तापके ४२५ आश्रमशाळा आणि ७९ वसतिगृहांना देण्यात आले होते. चार अतिरिक्त आदिवासी आयुक्तांच्या (अमरावती, नागपूर, नाशिक आणि ठाणे) दस्तावेजांच्या पडताळणीत असे आढळले की, १,७४६ पैकी १,३३१ पाणी तापके (७६ टक्के) सौर पॅनल्स, पाईप लाईन्सच्या खराबीमुळे आणि पाण्याच्या कमतरतेमुळे व छोट्या दुरूस्तीसाठी आश्रमशाळा आणि वसतिगृहांमध्ये निष्काम पडले होते. ती निष्कामी होण्याची बाब अतिरिक्त आदिवासी आयुक्तांनी माहे सप्टेंबर, २०१३ मध्ये पुरवठादारांच्या निदर्शनास आणून दिली

होती. परंतु संच मांडणी करण्याच्या तारखेपासून पाच वर्षांपर्यंत या उपकरणांची मोफत देखभाल करण्यासाठी पुरवठादारांची जबाबदारी असतानादेखील पुरवठादारांकडून कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही. यामुळे न केवळ १३३१ पाणी तापकांच्या खरेदीवर करण्यात आलेला रुपये २१.४३ कोटी खर्च निष्फळ ठरला तर गरम पाण्याच्या सोयीपासून विशेषतः हिवाळ्यात विद्यार्थी वंचित राहिले. निवडलेल्या ५२ पैकी ५० आश्रमशाळांना सौर पाणी तापके दिले होते. ज्यापैकी फक्त १४ चालू होते.

सचिव,आदिवासी विकास विभाग यांनी नमूद केले की, या विषयावर आधीपासूनच चौकशी करण्यात येत आहे आणि चौकशीच्या अहवाल प्राप्त झाल्यावर योग्य ती कारवाई करण्यात येईल.

विभागाच्या स्पष्टीकरणात नमूद केल्याप्रमाणे व विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, विभागाकडे आवश्यक त्या पायाभूत सुविधांचा अभाव असतानादेखील मे. जैन इरिगेशन जळगाव यांनी ६१४ संच शासकीय आश्रमशाळांना व ८६ वसतिगृहांना सोलर वॉटर हिटर संचाचा पुरवठा करून शासकीय आश्रमशाळा व शासकीय वसतिगृह मिळून ६४९ संच कार्यान्वित करून दिले व ५१ संच कार्यान्वित करून दिले नाही. पर्ल इंटरप्रायजेस, पुणे यांनी ९६० सोलर वॉटर हिटर संच शासकीय आश्रमशाळांना व ५४ संच शासकीय वसतिगृहांना पुरवठा करून शासकीय आश्रमशाळा व शासकीय वसतिगृह मिळून एकूण ७१३ संच कार्यान्वित करून दिले व ३०१ संच कार्यान्वित करून दिले नाही. यासंदर्भात अधिकचे स्पष्टीकरण करण्याबाबत समितीने विभागास सूचित केले असता, समितीस असे सांगण्यात आले की, पुरवठादारांची संपूर्ण देयके अदा करण्यात आलेली नसून पर्ल इंटरप्रायजेस लि., पुणे यांचे रुपये १ कोटी ११ लाख ७० हजार तर मे. जैन इरिगेशन, जळगाव ४१ लाख २६ हजार रुपयांचे देयके रोखून ठेवण्यात आले. त्यावर, याचा अर्थ एकूण देयकांपैकी ९० टक्के पेक्षा जास्त देयके पुरवठादारांना अदा करण्यात आली असून १० टक्केपेक्षा कमी रक्कम अदा करणे बाकी आहे. मात्र फक्त २० ते २२ टक्के संच सुरू आहेत. ही बाब समितीने निदर्शनास आणू दिली असता विभागातर्फे सांगण्यात आले की, सोलर वॉटर हिटर पुरवठ्यासाठी शासनाने उच्चस्तरीय चौकशीसाठी सामान्य प्रशासन विभाग यांच्याकडील विभागीय चौकशी अधिकारी यांची एक सदस्यीय चौकशी समिती गठीत केली होती. उक्त समितीचा अहवाल माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये प्राप्त झाला असून त्यामध्ये, बंद असलेली सौर तापके संच त्वरित दुरुस्त करून सुरू करावीत, अशी एक शिफारस करण्यात आलेली आहे. त्यानुरुप उक्त संच दुरूस्ती त्वरित करण्याबाबत प्रकल्प अधिकारी स्तरावर सूचना देण्यात आलेल्या आहेत. उपरोक्तप्रमाणे सर्व दुरुस्त्या करून त्याचा येत्या ६ महिन्यात विभागातर्फे संपूर्ण आढावा घेण्यात येईल. दुसरी शिफारस अशी आहे की, सौर तापके संच दुरूस्ती व संरक्षण न करण्यास जबाबदार असलेल्यांवर जबाबदारी निश्चित करावी व त्यांच्याकडून दुरूस्तीचा खर्च वसूल करता येईल काय? ही बाब तपासावी. त्यानुरुप संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांना यासंदर्भात संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. यातील प्राप्त झालेल्या प्राथमिक अहवालात असे दिसून येते की, काही ठिकाणी याबाबत पुरवठादार संस्था जबाबदार आहेत तर काही ठिकाणी सौर तापके संच स्थापित झाल्यानंतर योग्य त्या देखभाल व दुरूस्ती अभावी त्या नादुरुस्त झालेले आहेत. तसेच उक्त अहवालामध्ये संबंधित पुरवठादार संस्थांवर कारवाई करून त्यांना काळ्या यादीमध्ये टाकण्याबाबत शिफारसदेखील करण्यात आलेली आहे. तत्पूर्वी दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या पत्रान्वये आयुक्तालय स्तरावरून व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ऊर्जा अभिकरण, पुणे यांना मे. पर्ल इंटरप्रायजेस, पुणे व मे.जैन इरिगेशन सिस्टीम लि., जळगाव या संस्थांना काळ्या यादीत टाकण्याबाबत कळविण्यात आलेले होते. त्यावर याप्रकरणी शासनाने समिती गठीत केली असल्याने समितीची कार्यवाही पूर्ण झाल्यावर निष्कर्षानुसार कार्यवाहीची बाब विचारात घेतली जाईल असे उक्त अभिकरणाच्या व्यवस्थापकीय संचालकांकडून दिनांक १९ मे, २०१४ रोजीच्या पत्रानुसार आयुक्तालयास कळविण्यात आलेले आहे.

यावर चौकशी समितीचा अहवाल माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये प्राप्त झाला असून उक्त अहवालात संबंधित पुरवठादार संस्थांना काळ्या यादीत टाकण्याची शिफारसदेखील करण्यात आलेली आहे. असे असताना आजमितीपर्यंत विभागामार्फत उक्त संस्थांना काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही पूर्ण होणे अपेक्षित व आवश्यक होते. याप्रकरणात सदरहू संस्थाना काळ्या यादीत टाकण्याबाबत महाराष्ट्र ऊर्जा अभिकरण यांना अधिकार असल्याने उक्त अभिकरणाशी आदिवासी विकास विभागाने योग्य तो पाठपुरावा करून उक्त संस्थांचा समावेश काळ्या यादीत झाल्याबाबत खातरजमा करणे आवश्यक होते. तथापि, विभागाकडून यांसंदर्भात अक्षम्य दिरंगाई झाल्याचे समितीचे मत असून समितीच्या याबाबतीतील भावना अतिशय तीव्र असल्याचे समितीने मत व्यक्त केले.

शिफारस—

३.३८ (v) निष्काम सौर पाणी तापके :

आदिवासी आयुक्तांनी आश्रमशाळा आणि वसतिगृहांसाठी सन २०११-१३ दरम्यान रुपये २८.६४ कोटी किंमतीची १,७८९ सौर पाणी तापके खरेदी केली. त्यापैकी १,७४६ सौर पाणी तापके ४२५ आश्रमशाळा आणि ७९ वसतिगृहांना देण्यात आले होते. अतिरिक्त आदिवासी आयुक्त, अमरावती, नागपूर, नाशिक आणि ठाणे यांच्या कार्यालयातील दस्तऐवजांच्या पडताळणीत आढळून आल्याप्रमाणे १,७४६ पैकी १,३३१ पाणी तापके सौर पॅनल्स, पाईप लाईन्स खराबी, पाण्याची कमतरता व छोट्या दुरुस्तींसाठी

आश्रमशाळा आणि वसतिगृहांमध्ये विना वापरात होती. उक्त बाब अतिरिक्त आदिवासी आयुक्तांनी पुरवठारांना कळवूनही उपकरणे खरेदी केल्यापासून पाच वर्षापर्यंत देखभाल-दुरूस्तीची जबाबदारी असतांनाही संबंधित पुरवठादारांनी कोणतेही लक्ष दिले नाही. यामुळे उक्त १,३३१ पाणी तापकांच्या खरेदीवरील रुपये २१.४३ कोटी खर्च निष्फळ ठरून गरम पाण्याच्या सोयीपासून विशेषतः हिवाळ्यात विद्यार्थी वंचित राहिले.

विभागाच्या खुलाशाप्रमाणे तसेच साक्षीदरम्यान, समितीच्या निदर्शनास आले की, मे.जैन इरिगेशन सिस्टम, जळगाव यांनी ६१४ संच शासकीय आश्रमशाळांना व ८६ वसतिगृहांना सोलर वॉटर हिटर संचाचा पुरवठा करून शासकीय आश्रमशाळा व शासकीय वसतिगृह मिळून एकूण ६४९ संच कार्यान्वित करून दिले तर ५१ संच कार्यान्वित करून दिले नाहीत. तद्वतच पर्ल एंटरप्रायजेस, पुणे यांनी ९६० संच शासकीय आश्रमशाळा व ५४ संच शासकीय वसतिगृहांना सोलर वॉटर हिटर संचाचा पुरवठा करून शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहांना मिळून एकूण ७१३ संच कार्यान्वित करून दिले तर ३०१ संच कार्यान्वित केले नाहीत.

मुळात आवश्यक अशा कोणत्याही मुलभूत, पायाभूत सोयी-सुविधा (Infrastructure) उपलब्ध नसतांनाही इतक्या मोठ्या प्रमाणात सौर पाणी तापके सारासार विचार न करता खरेदी करण्यात आली. त्याबाबत समिती नाराजी व्यक्त करीत असून यासंदर्भात ज्या ज्या स्तरांवर हा निर्णय झाला त्याबाबत चौकशी करण्यात येऊन त्यात कोणी दोषी आढळून आल्यास संबंधितांवर कार्यवाही करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.

समितीच्या असेही निदर्शनास आले की, सौर पाणी तापके खरेदी प्रकरणी सामान्य प्रशासन विभाग यांच्या अधिनस्त विभागीय चौकशी अधिकाऱ्यांची एक सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती. उक्त समितीने चौकशी करून माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये चौकशी अहवाल विभागास सादर केलेला आहे. उक्त अहवालातील शिफारशींपैकी सदरहू दोन पुरवठादारांना काळ्या यादीत टाकण्याबाबतची एक प्रमुख शिफारस असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. अतिरिक्त आदिवासी विकास आयुक्त यांनी यापूर्वीच त्यांच्या दिनांक १२ फेब्रुवारी, २०१४ रोजीच्या पत्रान्वये उपरोक्त दोन्ही पुरवठादारांना मूळ विभाग म्हणून व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ऊर्जा अभिकरण, पुणे यांना कळविले होते. तथापि, त्यावर यासंदर्भात शासनाने चौकशी समिती गठीत केली असल्याने समितीची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्यातील निष्कर्षानुसार पुढील कारवाईची बाब विचारात घेतली जाईल अशी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ऊर्जा अभिकरण यांनी भूमिका घेतली.

सद्यःस्थितीत, माहे ऑगस्ट, २०१८ मध्येच चौकशी अहवाल विभागास प्राप्त झालेला असून त्यामध्ये संबंधित पुरवठादारांना काळ्या यादीत टाकण्याबाबत स्पष्ट शिफारस असतानादेखील आजमितीपर्यंत या पुरवठादारांना काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात आलेली नाही. ही बाब अतिशय गंभीर असून समितीच्या यासंदर्भातील भावना अतिशय तीव्र आहेत. अतः विभागाने सदरहू दोन्ही पुरवठादारांचा समावेश काळ्या यादीत करण्याबाबत तातडीने व्यवस्थापकीय संचालक महाराष्ट्र ऊर्जा अभिकरण, पुणे यांना कळवून यासंदर्भात योग्य तो पाठपुरावा करून उपरोक्त दोन्ही पुरवठादारांचा तातडीने काळ्या यादीत समावेश होईल याची दक्षता घ्यावी, अशी समितीची आग्रही शिफारस आहे.

तसेच उपरोल्लिखित विना वापर, पडून असलेली एकूण १,३३१ सौर पाणी तापके तातडीने कार्यान्वित करून आदिवासी विद्यार्थी गरम पाण्याच्या सोईपासून वंचित राहणार नाहीत याचीदेखील विभागाने पूर्ण काळजी घेऊन आवश्यक ती उपाययोजना सत्वर हाती घ्यावी, अशीदेखील समितीची शिफारस आहे.

अभिप्राय—

(vi) निष्क्रीय बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली :

३.३९ आदिवासी आयुक्त, नाशिक यांनी एसब्रेनसिस्टम्स ॲन्ड सॉफ्टवेअर प्राइव्हेट लि., पुणे (एजेन्सी) यांना ३,१७७ बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली (BAS) सब्सक्राईबरस् आयडेन्टीटी मॉड्युल (SIM) आणि BAS चे मंत्रालयातील केंद्रीय सर्वर समवेत कॉन्फ्रीग्रेशन, एकूण रुपये ९.३८ कोटी किंमतीला माहे ऑगस्ट, २०११ ला पुरवठा आदेश दिला. बायोमॅट्रीक हजेरी प्रणालीची स्थापना आदिवासी विकास विभागाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयात, शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळा व वसतिगृहांमध्ये करावयाची होती, जेणेकरून, आदिवासी विकास विभाग कार्यालयात वक्तशीरपणाची खातरजमा करण्यासाठी आणि आश्रमशाळा व वसतिगृहांना विद्यार्थ्यांच्या वास्तविक संख्येनुसार अनुदान देण्यासाठी उपयोग होईल. पुरवठा आदेशाच्या अटीं व शर्तीनुसार बायोमॅट्रीक हजेरी प्रणालीची संच मांडणी झाल्यावर आणि SIM मध्ये डेटा (आदिवासी विकास विभागातील कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अंगठा ठसे) अपलोड झाल्यानंतर एजेन्सीला ९० टक्के रक्कम अदा करावयाचे होते आणि उर्वरित १० टक्के बायोमॅट्रीक हजेरी प्रणालीचे केंद्रीय सर्वर सोबत समाधानकारक कॉन्फ्रीग्रेशन झाल्यावर आणि ते १० दिवस कोणतीही बाधा न येता सुरू राहिल्यावर अदा करावयाचे होते. ही प्रणाली एजेन्सीद्वारे तीन वर्ष राबवावयाची होती.

लेखा परीक्षेस असे निदर्शनास आले की, एजन्सीने माहे जुलै, २०११ ते माहे जुलै, २०१३ दरम्यान ३,१७७ बायोमॅट्रीक हजेरी प्रणालीचा पुरवठा केला व संच मांडणी केली. त्यापैकी फक्त १,३५७ संच सुरू होते आणि उर्वरित १,८२० SIM ची वैधता संपल्यामुळे आणि बेकाम यंत्रामुळे निष्क्रिय होते. याशिवाय, जेथे बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली चालू स्थितीत होती तेथेही एजन्सीद्वारे ते केंद्रीय सर्वर सोबत कॉन्फ्रीगर करण्यात येऊ शकले नव्हेत आणि म्हणूनच नियतकालीक अहवाल निर्मात करता येऊ शकले नाही व शिखर स्तरावर यांचे संनियंत्रण करता येऊ शकले नाही, या अप्रयाप्त असल्यावरही आदिवासी आयुक्त, नाशिक यांनी पुरवठा आदेशांच्या अटी व शर्ती विरुद्ध जाऊन माहे मार्च, २०१५ पर्यंत एजन्सीस रुपये ८.३८ कोटींची (जवळजवळ ९० टक्के) अदायगी केली. माहे जानेवारी २०१६ पर्यंत बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली क्रियाशिल करण्यात आली नव्हती आणि यामुळे रुपये ८.३८ कोटींचा खर्च निष्फळ ठरला.

सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी नमूद केले की, या विषयावर आधीपासूनच चौकशी करण्यात येत आहे आणि चौकशीचा अहवाल प्राप्त झाल्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

विभागाच्या खुलाशात नमूद केल्याप्रमाणे प्रभावी व लोकाभिमुख प्रशासन व्यवस्थेसाठी प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात वेळेवर उपस्थित राहाण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाचे परिपत्रक क्रमांक मातंसं-२००९/९२४/३९, दिनांक ७ जुलै, २००९ अन्वये बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली बसविण्याबाबत निर्देश दिलेले आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई यांचे दिनांक ३० ऑक्टोबर २०१० च्या दर करारानुसार आदिवासी विकास विभागाच्या नियंत्रणाखालील क्षेत्रीय कार्यालये, शासकीय व अनुदानित आश्रमशाळा, शासकीय वसतिगृहांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती प्रणाली (Biometric Attendance System) लागू करणेसाठी आदिवासी विकास विभाग शासन निर्णय क्रमांक शाआशा-२०११/प्र.क्र.२७/का. १३, दिनांक १६ जुलै २०११ अन्वये ३१७७ जी.पी.आर.एस./एस.एम.एस. आधारित बायोमेट्रिक उपस्थितीप्रणाली (GPRS SMS based Biometric Attendance System) मे. अेसब्रेन सिस्टीम ॲण्ड सॉफ्टवेअर प्रा. लि., सदाशिव पेठ, पुणे यांचेकडून आस्थापित करण्यास मंजुरी देण्यात आली.

शासन निर्णयानुसार आयुक्तालयाचे आदेश क्र. रवका/बायो/जंस-१२१०/प्र.क्र.१९१/का.२ (४), दिनांक २० ऑगस्ट २०११ अन्वये मे. अेस-ब्रेन सिस्टीम ॲण्ड सॉफ्टवेअर प्रा. लि., सदाशिव पेठ, पुणे यांनी ३,१७७ बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली संचाचा पुरवठा केला.

बायोमॅट्रीक मशिन्सच्या पुरवठ्यापोटी एकूण देयक रक्कम रुपये ९,३३,७८,५०० पैकी वेळोवेळी त्यांना रक्कम रुपये ८,३८,८५,०८९ अदा करण्यात आलेली असून उर्वरित रक्कम रुपये ९४,९३,४११ शिल्लक आहे आणि ती पण कालांतराने अदा करण्यात आली.

बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणाली संयंत्राच्या वापराबाबत चौकशी करण्यासाठी आदिवासी विकास विभाग शासन निर्णय दिनांक १६ एप्रिल २०१४ अन्वये मा. प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या चौकशी समितीचा अहवाल प्राप्त झाला, चौकशी अहवालाच्या शिफारशीनुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान, समितीस कथन करण्यात आले की, बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली संच या एस ब्रेन या संस्थेने स्थापित केलेली आहे, त्या कंपनीचा काळ्या यादीत समावेश करावा व त्या कंपनीची प्रलंबित देयकाची रक्कम रोखून धरावी अशी शिफारस चौकशी समितीने केली आहे. त्यावर समितीने असे निदर्शनास आणून दिले की, संस्थेबरोबर करण्यात आलेल्या कराराच्या अटी व शर्तींची संस्थेकडून पूर्तता झालेली नसतानादेखील सदरहू संस्थेस देयकाच्या एकूण ९० टक्के रक्कम म्हणजेच रु. ८ कोटी ३८ लक्ष इतकी रक्कम अदा करण्यात आलेली आहे व फक्त रक्कम रु. ९४ लाख रोखून ठेवण्यात आलेली आहे. यासंदर्भात चौकशी समितीने दिलेल्या अहवालात कोणत्या शिफारशी करण्यात आलेल्या आहेत, अशी समितीने विचारणा करता विभागामार्फत सांगण्यात आले की, यामध्ये प्रामुख्याने दोन भाग आहेत. ज्या ठिकाणी बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली संच सुरू न होण्यामागे पुरवठादार संस्था जबाबदार आहे तेथे त्या संस्थेवर जबाबदारी निश्चित करावी व ज्या ठिकाणी बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली संच पुरवठादार संस्थेकडून स्थापित करून सुरू झाले पण नंतरच्या कालावधीत योग्य देखभाल व दुरूस्तीच्या अभावी जे संच बंद झाले त्याबाबतीत संबंधित अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी. हमी (वॉरंटी) कालावधीत संबंधित पुरवठादार संस्था जबाबदार तर नंतरच्या कालावधीकरिता योग्य ती देखभाल व दुरूस्ती न करणारे अधिकारी व कर्मचारी यांना जबाबदार धरण्यात यावे, अशी शिफारस आहे. दुरूस्ती खर्च अधिकाऱ्यांकडून वसूल करावा अशीदेखील शिफारस आहे. तसेच बायोमॅट्रीक प्रणाली संदर्भात प्रकल्प अंमलबजावणीची स्थापना न करणे व उच्चस्तरीय समितीची मान्यता न घेणे, तसेच मंत्रालयात सेंट्रल सर्वर स्थापित न करण्याबाबत जबाबदारी निश्चित करावी, अशीदेखील शिफारस करण्यात आलेली आहे. या संदर्भात माहिती व तंत्रज्ञान विभागाकडून अभिप्राय मागविण्यात आले आहेत. सदरहू अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर त्यानुरुप पुढील कार्यवाही करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदर प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत योग्य ती खबरदारी न घेतल्याबाबत व निधी वितरित केल्याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात यावी तसेच बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली संचांची अटी व शर्तीनुसार देखभाल दुरूस्ती न

करणेबाबत संबंधित पुरवठादार संस्थेवर कारवाई करून त्या संस्थेचा काळ्या यादीत समावेश करण्यात यावा, अशा शिफारशी करण्यात आलेल्या होत्या. त्यावर, सदरहू अहवाल ऑगस्ट, २०१८ मध्ये प्राप्त झालेला असून त्यानुरुप पुढे काय कारवाई करण्यात आली अशी समितीने पृच्छा केली असता विभागातर्फे विदीत करण्यात आले की, संबंधित कागदपत्रातील छाननी करण्याचे काम सुरू करण्यात आले असून त्यासाठी एक समिती नियुक्ती करण्यात आलेली आहे. संबंधित संस्थेने करारनाम्यातील कोणकोणत्या शर्तींचा भंग केला व कार्यालयाकडून कोणत्या त्रुटी राहिल्या यासंदर्भातील माहिती संकलीत करण्यात आली आहे. नस्तींची संख्या जास्त असल्यामुळे यासाठी थोडा कालावधी लागत आहे. त्यावर, संबंधित अधिकाऱ्यांनी पुरवठादार संस्थेने अटी व शर्तींचा भंग केल्यानंतर देखील संबंधित अधिकाऱ्यांनी उक्त संस्थेस ९० टक्के देयकाची रक्कम अदा केली आहे. सबब, संबंधित जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर व पुरवठादार संस्थेवर योग्य ती कडक कारवाई १५ दिवसात करावी, असे सूचित केले.

शिफारस—

(vi) निष्क्रिय बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली.

३.४० लेखापरिक्षणातील नोंदविण्यात आलेली निरीक्षणे अतिशय गंभीर आहेत. आदिवासी विकास विभागाच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयात, शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळा व वसतिगृहांमध्ये वक्तशीरपणाची खात्री करण्यासाठी आणि आश्रमशाळा व वसतिगृहांना विद्यार्थ्यांच्या वास्तविक संख्येनुसार अनुदान देणे सुकर व्हावे याकरिता बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली संच स्थापित करण्याचा निर्णय माहे ऑगस्ट, २०११ मध्ये घेण्यात आला. सदरहू बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली संच स्थापित करण्याचे काम मे. अेस ब्रेन सिस्टीम अॅण्ड सॉफ्टवेअर प्रा. लि., पुणे या संस्थेस देण्यात आले. पुरवठा आदेशाच्या अटी व शर्तीनुसार बायोमॅट्रीक हजेरी प्रणालीची संच मांडणी झाल्यावर आणि SIM मध्ये आदिवासी विकास विभागाच्या कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अंगठ्याचे ठसे अपलोड झाल्यानंतर पुरवठादार संस्थेस ९० टक्के रक्कम अदा करावयाची होती. उर्वरित १० टक्के रक्कम बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली केंद्रीय सर्व्हर सोबत समाधानकारक कॉन्फ्रीग्रेशन झाल्यावर आणि ते दहा दिवस सुरळीतपणे सुरू राहिल्यावर अदा करावयाची होती.

लेखापरिक्षणात आढळल्यानुसार पुरवठादार संस्थेने माहे जुलै, २०११ ते माहे जुलै, २०१३ दरम्यान ३,१७७ बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली संच स्थापित केले. त्यापैकी फक्त १,३५७ संच सुरू होते आणि उर्वरित १,८२० संच SIM ची वैधता संपल्यामुळे व बेकाम यंत्रांमुळे निष्क्रिय होते. तसेच जेथे बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली संच सुरू होते तेथेही पुरवठादार संस्थेद्वारे केंद्रीय सर्व्हर सोबत कॉन्फ्रीगर करण्यात आले नव्हते. उपरोल्लेखित अपर्याप्तता असूनदेखील आदिवासी आयुक्त, नाशिक यांनी पुरवठा आदेशाच्या अटी व शर्तींचा भंग करून माहे मार्च, २०१५ पर्यंत पुरवठादार संस्थेला रु. ८.३८ कोटींची (जवळपास ९० टक्के) रक्कम अदा केली. माहे जानेवारी, २०१६ पर्यंत बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली कार्यान्वित नव्हती यामुळे रु. ८.३८ कोटी इतक्या रकमेचा खर्च निष्फळ ठरला.

विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीच्या निदर्शनास आल्यानुसार बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली सयंत्रांच्या वापराबाबत चौकशी करण्यासाठी प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली माहे एप्रिल, २०१४ मध्ये स्थापन झालेल्या चौकशी समितीने यासंदर्भात चौकशी पूर्ण करून आपला अहवाल माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये आदिवासी विकास विभागास सादर केला आहे. सदर अहवालामध्ये पुरवठादार संस्थेने उक्त संच खरेदी संदर्भातील कराराच्या अटी व शर्तींचा भंग करूनही पुरवठादार संस्थेला ज्या संबंधित अधिकाऱ्यांनी ९० टक्के देयकाची रक्कम अदा केलेली आहे अशा अधिकाऱ्यावर कडक कारवाई करण्याबाबत शिफारस करण्यात आलेली आहे. तसेच बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली कार्यान्वित झाल्यानंतर पुढील कालावधीत योग्य देखभाल/दुरूस्ती अभावी जे बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली संच विनावापर पडून राहिले, तसेच मंत्रालयातील केंद्रीय सर्व्हर सोबत सदरहू बायोमॅट्रीक संचाचे योग्य कॉन्फ्रीगेशन होऊ न शकणे याकरिता जबाबदार असणाऱ्या अशा संबंधित अधिकाऱ्यांवरसुद्धा कारवाई करण्याबाबत शिफारस आहे. तसेच पुरवठादार संस्थेवरसुद्धा करारातील अटी व शर्तींचे योग्य पालन न केल्याबाबत उक्त संस्थेचा काळ्या यादीत समावेश करण्याबाबत शिफारस आहे.

वर उल्लेख केल्याप्रमाणे संबंधित अधिकारी व कर्मचारी तसेच पुरवठादार संस्थेच्या बेजबाबदार व बेपर्वाईमुळे आदिवासी विकास विभागाच्या अधिनस्त कार्यालयात बायोमॅट्रीक हजेरी प्रणाली सुमारे रु. ८ कोटींपेक्षा जास्त रक्कम खर्च होऊनही पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होऊ शकलेली नाही. सरतेशेवटी याची परिणती विभागाच्या कार्यालयात वक्तशीरपणाची खातरजमा होणे व आश्रमशाळा व वसतिगृहांना विद्यार्थ्यांच्या वास्तविक संख्येनुसार अनुदान देणे हे दोन प्रमुख उद्देश विफल होण्यामध्ये झालेली आहे. या संदर्भात समितीच्या भावना अतिशय तीव्र आहेत.

प्रस्तुत प्रकरणातील चौकशी अहवाल हा माहे ऑगस्ट, २०१८ मध्ये प्राप्त होऊनही तसेच साक्षीच्या वेळी प्रस्तुत प्रकरणी संबंधित पुरवठादार संस्था व दोषी अधिकारी-कर्मचारी यांचेवर १५ दिवसांत कडक कारवाई करून त्याबाबत समितीला अवगत करावे असे

समितीमार्फत सूचित करण्यात येऊनही आजमितीपर्यंत यासंदर्भात समितीला कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. समिती यासंदर्भात तीव्र नाराजी व्यक्त करीत असून या प्रकरणास पुरवठादार संस्थेवर संबंधित सर्व दोषी अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुद्ध विभागाने तातडीने नियमानुसार योग्य ती कारवाई करून त्याबाबतची माहिती समितीस पंधरा दिवसांत उपलब्ध करून देण्यात यावी, अशी समितीची आग्रही शिफारस आहे. तसेच ज्या अधिकाऱ्यांनी बायोमेट्रीक हजेरी प्रणाली संचाच्या देयकांची ९०% रक्कम करार नाम्यातील अटी व शर्ती पूर्ण केल्याशिवाय प्रदान केली त्यांच्याविरूध्द फौजदारी स्वरूपाचा गुन्हा दाखल करावा अशी समिती शिफारस करते.

समितीच्या उपरोक्त शिफारशींनुरुप केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यांत उपलब्ध करून देण्यात यावा.

परिच्छेद क्रमांक २.२.५—आदिवासी विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक आणि शिष्यवृत्ती योजना—

अभिप्राय—

३.४१ आदिवासी विद्यार्थ्यांकरिता आदिवासी विकास विभाग, ' शहारातील प्रख्यात इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देणे ' आणि ' सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व-माध्यमिकशिष्यवृत्ती ' या दोन शैक्षणिक योजना राबवित आहे. दोन्ही योजनांमध्ये शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांव्यतिरिक्त दुसऱ्या शाळांमध्ये शिकत असणारे आदिवासी विद्यार्थी येतात व आदिवासी उपयोजनेंतर्गत उपलब्ध असणाऱ्या अनुदानातुन भरीव निधी पुरविण्यात येतो.

'***शहरातील प्रख्यात इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची योजना***' ही विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेशी परिचित करून देऊन त्यांची इंग्रजी भाषा सुधारावी या उद्येशाने माहे ऑगस्ट, २००९ पासून आदिवासी विकास विभागाद्वारे राबविण्यात येत आहे, जेणेकरून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेतांना मदत होईल. या योजनेंतर्गत प्रत्येक अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांसाठी प्रती वर्ष रु. ५०,००० आणि रु. ७०,००० रक्कम प्रख्यात इंग्रजी शाळांत (बहुतांश खाजगी बोर्डिंग शाळा) अनुक्रमे इयत्ता पहिली ते दहावी आणि अकरावी ते बारावी मध्ये प्रवेश घेण्यासाठी आदिवासी विकास विभागातर्फे देण्यात येते. वर्ष २०१०-१५ दरम्यान १०,१०३ विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर रु. १२६.२९ कोटी खर्च करण्यात आला. लेखापरिक्षणाकरिता निवडलेल्या आठ प्रकल्प अधिकाऱ्यांच्या अधिकार क्षेत्रातील १६ प्रख्यात इंग्रजी शाळांमधील दस्तावेजांच्या पडताळणीत लेखापरिक्षेस आढळून आले की, योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये लाभार्थी शाळांना या योजनेसाठी वेगळे लेखे ठेवण्याबाबत सूचना दिलेल्या नव्हत्या. यामुळे खाजगी शाळांना आदिवासी विकास विभागाद्वारे देण्यात आलेला निधी, शाळांद्वारे ठराविक उद्येशासाठीच वापरण्यात आला,याबाबत लेखापरिक्षणाचे वेळी खात्री करणे कठीण झाले. योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वाविरुद्ध १६ पैकी सेंट उर्सुला उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर व आदर्श संस्कार शाळा, नागपूर या दोन शाळांनी इयत्ता पहिली आणि दुसरीच्या आदिवासी विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र वर्ग तयार केले होते.

वर्ष २०१३-१५ दरम्यान इयत्ता पहिली, दुसरी आणि बारावी मध्ये शिकणाऱ्या ३२७ आदिवासी विद्यार्थ्यासाठी सैनिक पब्लिक स्कूल, वाडकी राळेगाव ; इन्फॅन्ट जिझस इंग्लिश पब्लिक स्कूल, राजूरा; स्कॉलर सर्च ॲकॅडमी, कोर्पणा आणि महर्षि पब्लिक स्कूल, अमरावतीया चार शाळांनी त्याच अवधीत त्याच इयत्तांमध्ये शिकणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांनी अदा केलेल्या फीच्या तुलनेत रु. १६.४५ लक्ष प्रवेश शिकवणी फी आदिवासी विकास विभागाकडून जादा आकारली.

योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार या योजनेचा लाभ घेऊन खाजगी शाळांमध्ये प्रवेश घेण्यास पात्र ठरण्यासाठी पालकांचे जाती आणि उत्पन्न प्रमाणपत्रे संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यास सादर करावयास पाहिजे होती. सन २०१०-१५ दरम्यान १६ खाजगी शाळांमध्ये इयत्ता पहिली मध्ये प्रवेश घेण्यासाठी केलेल्या ८९२ अर्जाच्या नमूना चाचणीत असे आढळले की, संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांनी आदर्श संस्कार स्कूल, नागपूर; के.डी.गावित इंग्लिश मिडियम स्कूल, पाथराई ; अमृत वाहिनी मॉडेल स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, संगमनेर; एस.एन.डी. इंग्लिश मिडियम पब्लिक स्कूल, बाबुळगाव; भावना पब्लिक स्कूल, रिसोड; सेंट ऊर्सुला हायस्कूल आणि ज्युनिअर कॉलेज, नागपूर; लिटिल वंडर्स इंग्लिश स्कूल, सिल्लोड आणि भारती विद्यापीठ, विक्रमगड, जव्हार या आठ शाळांमध्ये ६३ अर्ज जाती प्रमाणपत्राशिवाय आणि ५४ अर्ज उत्पन्न प्रमाणपत्राशिवाय स्वीकृत केले.

"***सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व-माध्यमिक शिष्यवृत्ती योजना***" ही आदिवासी विकास विभागाने माहे मे, २०१० मध्ये सूरू केली, ज्या अंतर्गत गुणवत्ता पूर्ण आदिवासी विद्यार्थ्यांना तीन हप्त्यांत रू. १,००० प्रती वर्ष (इयत्ता १ ली ते ४ थी), रु. १,५०० प्रतीवर्ष (इयत्ता ५ वी ते ७ वी) आणि रू. २,००० प्रती वर्ष (इयत्ता ८ वी ते १० वी) शिष्यवृत्ती प्रदान करावयाची होती. वर्ष २०१०-१५ दरम्यान आदिवासी विकास विभागाने ६१.८१ लाख आदिवासी विद्यार्थ्यांना रू. ७८६.२० कोटी शिष्यवृत्ती प्रदान केली. आदिवासी आयुक्त, नाशिक आणि निवडलेल्या आठ प्रकल्प अधिकाऱ्यांच्या अधिकार क्षेत्रातील तपासणी केलेल्या १६ शाळांच्या (जिल्हा परिषद शाळा, महानगरपालिका/नगरपरिषद शाळा आणि खाजगी शाळा) दस्तऐवजांच्या पडताळणीत आढळून आले की, वर्ष २०१०-११ आणि वर्ष २०१२-१३ मध्ये प्रकल्प अधिकारी स्तरावर मागणी करतेवेळी आणि आदिवासी आयुक्त

स्तरावर अनुदान देतेवेळी इयत्ता पाचवी ते सातवीच्या ६.१९ लक्ष विद्यार्थ्यांना (राज्याची स्थिती) शिष्यवृत्ती रक्कमेचे रु. ०.६१ कोटी जादा प्रदान झाले.

दोन प्रकल्प अधिकाऱ्यांकडे (जव्हार आणि नंदुरबार) माहे मार्च, २०१५ ला त्यांच्या रोख शिल्लक रक्कमेत वर्ष २०१० ते १४ या कालावधीची वितरित न केलेली शिष्यवृत्ती रू. ११.०८ लक्ष रक्कम शिल्लक राहिली. तसेच वर्ष २०११-१५ कालावधीची रु. १.९७ लक्ष शिष्यवृत्ती रक्कम ज्योती माध्यमिक विद्यालय, पिंपळगाव बहुला; जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, नागपूर आणि डी. ॲण्ड जी. माध्यमिक विद्यालय, श्रावणी या तीन शाळांमध्ये अवितरित राहिली. अशाप्रकारे विद्यार्थी रु. १३.०५ लक्ष रक्कमेच्या शिष्यवृत्तीपासून वंचित राहिले.

योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र ठरण्यासाठी पालकांची जाती आणि उत्पन्न प्रमाणपत्रे ज्यावरून विद्यार्थ्यांच्या जातीची आणि त्यांच्या पालकांच्या उत्पन्नाची पडताळणी होऊ शकेल, संबंधित शाळांच्या मुख्याध्यापकांना सादर करावयाची होती. लेखापरीक्षेने वर्ष २०१०-१५ मधील कालावधीच्या १७४६ अर्जांची पडताळणी केली, त्यातील १५८८ अर्जांमध्ये (९१ टक्के) जातीचे प्रमाणपत्रे नव्हती आणि १४६३ अर्जामध्ये (८४ टक्के) उत्पन्न प्रमाणपत्रे नव्हती.

साक्षीदरम्यान, विभागातर्फे असे प्रतिपादन करण्यात आले की, शासनाकडे निधी समर्पित केला जाण्याची मुख्यतः दोन-तीन कारणे आहेत. एक म्हणजे शासनाकडे निधीची मागणी करताना विद्यार्थ्यांच्या पटसंख्येनुसार मागणी करण्यात येते. शिष्यवृत्ती रक्कमेचे वाटप जिल्हा परिषदांच्या शाळोमार्फत मुलांच्या उपस्थितीनुसार करण्यात येते. प्रत्यक्ष जेवढी मागणी आहे त्यापेक्षा कमी रक्कमेचे वाटप होते म्हणून उर्वरित रक्कम समर्पित करावी लागते. दुसरे कारण म्हणजे शाळेचे व विद्यार्थ्यांचे बँक खाते उपलब्ध न झाल्यामुळे शिष्यवृत्तीच्या रक्कमा प्रलंबित आहेत. तिसरे कारण म्हणजे काही वेळेस शिष्यवृत्ती रक्कम प्राप्त होण्यास उशिर झाला, दरम्यानच्या काळात विद्यार्थी शाळा सोडून गेले. प्रकल्प अधिकारी आणि मुख्याधिकारी यांचे स्तरावर निधी पोहचविण्याचा प्रामाणिक प्रयत्न होऊनही विद्यार्थ्यांचा शोध न लागल्याने रक्कम समर्पित करावी लागली.

लेखापरीक्षणात, काही नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांकरिता वेगळे वर्ग निर्माण करण्यात आल्याचे नमूद आहे. नामांकित इंग्रजी शाळांमधील इतर मुलांबरोबर आदिवासी मुलांनी मिळून मिसळून एकत्र शिक्षण घ्यावे हा प्रस्तुत योजनेमागचा खरा उद्देश त्यामुळे साध्य होताना दिसत नाही. तसेच काही शाळांनी आदिवासी विद्यार्थ्यांसाठी नियमित विद्यार्थ्यांपेक्षा जादा फी आकारली आहे. तसेच लाभार्थी शाळांनी या योजनेसाठी वेगळे लेखेसुद्धा न ठेवल्याने शाळांद्वारे प्राप्त निधी निश्चित उद्देशांसाठीच वापरला गेला किंवा कसे याचीदेखील खातरजमा होऊ शकली नाही या बाबी गंभीर असून त्याबाबत स्पष्टीकरण करण्यासंदर्भात समितीने सूचित केले असता समितीस असे कथन करण्यात आले की, लाभार्थी शाळांमार्फत प्रस्तुत योजनांकरिता वेगळे लेखे ठेवण्याबाबत सक्त सूचना देण्यात आलेल्या असून याबाबत क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून खातरजमा करण्यात आलेली असून आता प्रत्येक लाभार्थी शाळेत सदरहू योजनेबाबत स्वतंत्र लेखे ठेवले जात आहे. दुसरी बाब म्हणजे शहरातील प्रख्यात इंग्रजी माध्यमाच्या शाळेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देताना इयत्ता निहाय प्रती वर्षी रु. ५० हजार/रु. ७० हजार अशी रक्कम प्रती विद्यार्थी दिली जाते. शाळेच्या नियमित फी सोबत याची सांगड घालण्यात आलेली नाही. तिसरी बाब म्हणजे नागपूर विभागातील सेंट उर्सुला उच्च माध्यमिक शाळा आणि आदर्श संस्कार शाळा या दोन शाळांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांकरिता स्वतंत्र वर्ग निर्माण करण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. उक्त शाळांना ज्या अधिकाऱ्यांनी भेटी दिलेल्या आहेत त्यांची माहिती संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांकडून घेऊन त्यासंदर्भात योग्य ती कारवाई करण्यात येईल.

त्याचप्रमाणे लेखापरिक्षणामध्ये प्रकल्प अधिकाऱ्यांनी ६३ अर्ज जातीचे प्रमाणपत्राशिवाय व ५४ अर्ज उत्पन्न प्रमाणपत्राशिवाय स्वीकृत केल्याचा उल्लेख आहे. या सर्व प्रकरणांची विभागामार्फत छाननी केली असता ७ प्रकरणे वगळता सर्व उर्वरित सर्व प्रकरणांमध्ये उत्पन्न व जात प्रमाणपत्रं प्राप्त झालेली आहेत. त्यावर, सदरहू ७ प्रकरणांमध्ये ज्या अधिकाऱ्यांनी निधीचे वाटप केले आहे त्या अधिकाऱ्यांकडून सदरहू रक्कम वसूल करण्याचे मत समितीने प्रदर्शित केले.

वर्ष २०१३-१४ मध्ये शिष्यवृत्ती करिता मंजूर तरतूद रु. २३१६.६६ कोटी असताना प्रत्यक्ष रक्कम रु. २२०१.८३ कोटी इतकीच खर्च झाल्याचे निदर्शनास येत असून त्याबाबतची कारणमिमांसा स्पष्ट करण्यास समितीने सूचित केले असता संबंधित प्रकल्प अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन ती समितीस सादर करण्यात येईल असे विभागातर्फे सांगण्यात आले.

शिफारस—

३.४२ अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेशी परिचित करून त्यांची इंग्रजी भाषा सुधारावी याकरिता शहरातील प्रख्यात इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याची योजना माहे ऑगस्ट, २००९ पासून आदिवासी विकास विभागाने सुरू केली. या योजनेंतर्गत प्रत्येक अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्याला प्रख्यात इंग्रजी शाळांत इयत्ता पहिली ते दहावीमध्ये प्रवेश घेण्याकरिता वार्षिक रु. ५० हजार तर अकरावी व बारावीमध्ये प्रवेश घेण्याकरिता रु. ७० हजार आदिवासी

विकास विभागामार्फत देण्यात येतात. वर्ष २०१०-१५ दरम्यान १०,१०३ विद्यार्थ्यांच्या प्रवेशावर रु. १२६.२९ कोटी खर्च करण्यात आला. लेखापरिक्षणाकरिता निवडलेल्या आठ प्रकल्प अधिकाऱ्यांच्या अधिकार क्षेत्रांतील १६ प्रख्यात इंग्रजी शाळांमधील दस्तऐवजांच्या पडताळणीत असे आढळले की, योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये शाळांना योजनेसाठी वेगळे लेखे ठेवण्याबाबत सूचना दिलेल्या नसल्याने आदिवासी विकास विभागामार्फत शाळांना देण्यात आलेला निधी, शाळांद्वारे ठराविक उद्देशांसाठीच वापरण्यात आला असल्याबाबत खातरजमा करता येऊ शकली नाही. तसेच योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांविरुद्ध दोन शाळांनी इयत्ता पहिली व दुसरीच्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वर्ग तयार केले होते. तसेच दुसरी आणि बारावीमध्ये शिकणाऱ्या ३२७ आदिवासी विद्यार्थ्यांसाठी चार शाळांनी त्याच कालावधित त्याच इयत्तांमध्ये शिकणाऱ्या नियमित विद्यार्थ्यांनी अदा केलेल्या फीच्या तुलनेत रु. १६.४५ लक्ष जास्तीची प्रवेश फी आदिवासी विभागाकडून आकारली. त्याचप्रमाणे संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांनी आठ शाळांमध्ये ६३ अर्ज जातीच्या प्रमाणपत्राशिवाय आणि ५४ अर्ज उत्पन्न प्रमाणपत्राशिवाय स्वीकृत केले.

साक्षीदरम्यान, समितीस कथन करण्यात आले की, स्वतंत्र लेखे ठेवण्यासंदर्भात विभागाने पूर्ण तपासणी व खात्री करून घेतली आहे. या मुद्यांची पूर्तता झालेली असून क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून प्रत्येक शाळेत स्वतंत्र लेखे ठेवले जात असल्याबाबत आता खातरजमा करण्यात आलेली आहे. दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे नामांकित इंग्रजी शाळांमध्ये अनुसूचित जमातींच्या मुलांना प्रवेश देण्याच्या योजनेंतर्गत शाळांना ठराविक एक ठोस रक्कम देण्यात येत असून त्या रकमेची शाळेच्या प्रवेश फी सोबत सांगड घालण्यात आलेली नाही. तिसरी बाब म्हणजे सेंट उर्सुला उच्च माध्यमिक शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर आणि आदर्श संस्कार शाळा, नागपूर या दोन शाळांनी इयत्ता पहिली व दुसरीच्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वर्ग तयार केले होते. आदिवासी मुलांना प्रख्यात इंग्रजी शाळेतील इतर मुलांसोबत मिळुन मिसळून शिक्षण देण्याच्या उद्देशाशिच फारकत घेण्यासारखे यामुळे झालेले असून ही बाब गंभीर आहे. उक्त शाळांना त्यावेळी ज्या अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या असून आपल्या पर्यवेक्षकिय कामात कसूर केला आहे, त्याची माहिती अपर आयुक्त, आदिवासी यांचेकडून घेण्यात येऊन त्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल असे समितीस सांगण्यात आले. समितीस आश्वस्त केल्याप्रमाणे उक्त अधिकाऱ्यांवर नियमानुसार योग्य ती सत्वर कारवाई करण्यात येऊन त्याबाबतची माहिती समितीस एक महिन्यात उपलब्ध करून देण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.

त्याचप्रमाणे लेखापरिक्षेत नमूद जात प्रमाणपत्रांशिवायचे ६३ अर्ज व उत्पन्न प्रमाणपत्रांशिवायचे ५४ अर्जांची विभागाने छाननी केली असता फक्त ७ प्रकरणे वगळता अन्य प्रकरणात उत्पन्न व जातीचे प्रमाणपत्र आढळून आलेले आहे. सबब, उक्त ७ प्रकरणांत ज्या अधिकाऱ्यांनी निधीचे वाटप केले आहे त्या संबंधित अधिकाऱ्यांची चौकशी करून वाटप केलेल्या निधीची रक्कम त्यांच्याकडून वसूल करण्याची सत्वर कार्यवाही करण्यात येऊन त्याबाबतची माहिती समितीस यथाशीघ्र कळविण्यात यावी. तद्वतच प्रकल्प अधिकारी, नाशिक यांनी सन २०१३-१४ मध्ये शिष्यवृत्तीचे जे वाटप केले आहे त्यामध्ये मंजूर तरतूद रु. २,३१६.६६ कोटी होती. मात्र वितरित तरतूद रु. २,२०१.८३ कोटी दर्शविण्यात आली आहे. ही तफावत येण्यामागची कारणे समितीने विचारली असता, सदरहू माहिती प्रकल्प अधिकारी यांचेकडून प्राप्त करून समितीस सादर करण्यात येईल असे समितीस विदित करण्यात आले. सबब, समितीस दिलेल्या आश्वासनानुसार उक्त माहिती समितीस विनाविलंब उपलब्ध करून देण्यात यावी.

तसेच गत पाच ते दहा वर्षांत आदिवासी विकास विभागामार्फत विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीसंबंधीची अद्ययावत माहिती आयुक्त किंवा आदिवासी विकास विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात यावी, अशी देखील समितीची शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक २.२.६.१ : शिक्षक कक्षामधील प्रमुख पदे न भरणे.

अभिप्राय :

३.४३ प्रकल्प अधिकाऱ्यांवरील शासकीय आश्रमशाळा आणि वसतिगृहांवर सनियंत्रण ठेवण्याचा भार कमी करण्यासाठी आदिवासी विकास विभागाने आदिवासी आयुक्त, अतिरिक्त आदिवासी आयुक्त आणि प्रकल्प अधिकारी स्तरावर माहे जानेवारी, २०१४ मध्ये स्वतंत्र शिक्षण कक्ष गठन करण्याचे ठरविले. या शिक्षण कक्षांसाठी आयुक्त स्तरावर २१ पदे, अतिरिक्त आयुक्त स्तरांवर ७६ पदे आणि प्रकल्प अधिकारी स्तरावर ७५२ पदे अशी एकूण ८४९ पदे भरण्याचा निर्णय आदिवासी विकास विभागाने घेतला. या शिक्षण कक्षांना आश्रमशाळा आणि वसतिगृहाच्या संपूर्ण कार्याचे समन्वय, सनियंत्रण आणि पर्यवेक्षण करावयाचे होते. या कार्यात विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शिक्षणाचा दर्जा, बांधकाम कार्ये, अन्नधान्य वितरण इ. समाविष्ठ होते.

दस्ताऐवजांच्या पडताळणीत असे आढळले की, आयुक्त स्तरावर भरावयाच्या असलेल्या २१ पदांपैकी फक्त १० पदे भरण्यात आली होती, ज्यापैकी सात पदे (७०%) लिपीक टंकलेखकाची होती. अतिरिक्त आयुक्त स्तरावर भरावयाच्या असलेल्या ७६ पदांपैकी फक्त १७ पदे भरण्यात आली होती, ज्यापैकी १५ पदे (८८ टक्के) लिपीक टंकलेखकांची होती. २९ प्रकल्प अधिकारी कार्यालयात भरावयाच्या असलेल्या ७५२ पदांची स्थिती आदिवासी आयुक्त, नाशिक यांनी आणि माहे जुलै, २०१५ मध्ये सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी मागविली होती, परंतु त्यांच्याकडून उत्तर प्राप्त झाले नव्हते. तथापि, लेखापरीक्षणाकरिता निवडलेल्या आठ प्रकल्प अधिकारी कार्यालयांत भरावयाच्या असलेल्या १६८ पदांपैकी फक्त ५२ पदे भरण्यात आली होती, ज्यापैकी २८ पदे (५४ टक्के) लिपीक-टंकलेखकांची होती. येथे प्रकर्षाने असे दिसून येते की, संनियंत्रणाशी थेट संबंधित नसलेली पदे मोठ्या संख्येने भरण्यात आली असली तरीही सह आयुक्त (शिक्षण); सहायक आयुक्त (शिक्षण); सहायक परिविक्षा अधिकारी (शिक्षण) आणि वरिष्ठ विस्तार अधिकारी इत्यादी प्रमुख पदे रिक्त राहिली. अशाप्रकारे आश्रमशाळांचे आणि वसतिगृहांचे प्रभावी समन्वयन, संनियंत्रण आणि पर्यवेक्षण गठीत करण्यात आलेल्या शिक्षण कक्षांचा मूळ उद्देशच विफल ठरला.

साक्षीदरम्यान, विभागातर्फे सांगण्यात आले की, सह आयुक्त (शिक्षण) व सहायक आयुक्त (शिक्षण) ही पदे शिक्षण विभागामार्फत भरली जातात. या पदांची मागणी शिक्षण विभागाकडे करण्यात आलेली आहे. सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) या पदाचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. सदरहू नियम तयार झाल्यानंतर उक्त पदांची भरती तातडीने होवू शकेल. कार्यालय अधीक्षक (शिक्षण) हे एक पद भरण्यात येईल. वरिष्ठ विस्तार अधिकारी, आदिवासी विकास निरीक्षक व कनिष्ठ विस्तार अधिकारी या संवर्गांचे सेवा प्रवेश नियम अंतिम टप्प्यात आहे. उक्त सेवाप्रवेश नियमांना लवकरच मान्यता मिळून सदरहू पदांच्या भरतीची कार्यवाही सुरू होईल. लिपीक-टंकलेखक या संवर्गात पद भरतीची संख्या मोठी असून यासाठी तीन महिन्यांचे नियोजन करण्यात आले असून अपर आदिवासी आयुक्त स्तरावर यासंदर्भातील कार्यवाही सुरू आहे. माहे डिसेंबर, २०१८ पर्यंत सदरहू भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. चतुर्थ श्रेणीतील शिपाई संवर्गातील १०२ पदे शासनाच्या धोरणानुसार भरण्यात येणार नाहीत.

शिफारस—

३.४४ प्रकल्प अधिकाऱ्यांवरील शासकीय आश्रमशाळा आणि वसतिगृहांवर संनियंत्रण ठेवण्याच्या कामाचा भार कमी करण्यासाठी आदिवासी विकास विभागाने आदिवासी आयुक्त, अतिरिक्त आदिवासी आयुक्त आणि प्रकल्प अधिकारी स्तरावर माहे जानेवारी, २०१४ मध्ये स्वतंत्र शिक्षण कक्ष गठन करण्याचा निर्णय घेतला. उक्त शिक्षण कक्षासाठी अभिप्रायात नमूद केल्यानुसार विविध संवर्गातील एकूण ८४९ पदे भरण्याचा आदिवासी विकास विभागाने निर्णय घेतला. लेखापरिक्षणात आढळून आल्याप्रमाणे उक्त पदांपैकी आयुक्त स्तरावर भरावयाच्या २१ पदांपैकी फक्त १० पदे भरण्यात आली होती. ज्यापैकी ७ पदे लिपीक-टंकलेखकांची होती. अतिरिक्त आयुक्त स्तरावर भरावयाच्या ७६ पदांपैकी फक्त १७ पदे भरण्यात आली होती. ज्यापैकी १५ पदे लिपीक-टंकलेखकांची होती. २९ प्रकल्प अधिकारी कार्यालयांत भरावयाच्या ७५२ पदांची स्थिती आदिवासी आयुक्त, नाशिक यांनी तसेच माहे जुलै, २०१५ मध्ये सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी मागविली होती. परंतु याबाबतची माहिती ३ वर्षानंतही आयुक्ताला प्राप्त झालेली नव्हती. तथापि, निवडलेल्या आठ प्रकल्प अधिकारी कार्यालयांत भरावयाच्या १६८ पदांपैकी फक्त ५२ पदे भरण्यात आली होती, ज्यापैकी २८ पदे लिपीक-टंकलेखकांची होती. सनियंत्रणाशी थेट संबंधित असलेली सह आयुक्त (शिक्षण), सहाय्यक आयुक्त (शिक्षण), सहाय्यक परिवीक्षा अधिकारी (शिक्षण), वरिष्ठ विस्तार अधिकारी इत्यादी प्रमुख पदे मात्र रिक्तच होती. ज्यामुळे शिक्षण कक्ष स्थापनेमागचा मूळ उद्देशच विफल ठरला.

साक्षीदरम्यान, विभागीय सचिवांनी सांगितले की, सह आयुक्त (शिक्षण) व सहाय्यक आयुक्त (शिक्षण) ही पदे शिक्षण विभागांमार्फत भरली जाणार आहेत. या पदांची मागणी शिक्षण विभागाकडे करण्यात आलेली आहे. सहाय्यक प्रकल्प अधिकारी (शिक्षण) या पदांचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. नियम झाल्यानंतर तातडीने भरती करण्यात येईल. कार्यालय अधीक्षक (शिक्षण) यांचे एक पद असून ते देखिल भरण्यात येईल. वरिष्ठ विस्तार अधिकारी (शिक्षण), वरिष्ठ आदिवासी विकास निरीक्षक व कनिष्ठ विस्तार अधिकारी (शिक्षण) या तीन संवर्गांचे सेवाप्रवेश नियम अंतिम टप्प्यात असून १५ दिवसांत त्यांना मान्यता मिळणे अपेक्षित आहे. तद्नंतर भरतीची कार्यवाही सुरू होईल. लिपीक-टंकलेखकांच्या पदांच्या भरतीबाबत तीन महिन्यांचा कार्यक्रम तयार करण्यात आला असून अतिरिक्त आदिवासी विकास अधिकारी पातळीवर यासंदर्भात कार्यवाही सुरू आहे. शिपाई पदांची भरती मात्र शासनाच्या धोरणांनुसार करण्यात येणार नाही. उपरोक्त सर्व पदांची भरती ही माहे डिसेंबर, २०१८ पर्यंत पूर्ण करण्यात येईल असे सांगण्यात आले.

समितीस उपरोक्त प्रमाणे आश्वस्त केल्यानंतर आता साधारणतः सुमारे सात महिन्यांचा कालावधी उलटून गेलेला असल्याने उपरोक्त भरती प्रक्रिया आता निश्चितच पूर्ण झालेली असेल अशी समितीस अपेक्षा आहे. अतः उपरोक्त प्रमाणे संवर्गनिहाय पदे भरतीची सविस्तर माहिती समितीस १५ दिवसांत उपलब्ध करून देण्यात यावी, अशी समिती शिफारस करीत आहे.

परिच्छेद क्रमांक २.२.६.२—ई-गव्हर्नन्स ॲप्लिकेशन सॉफ्टवेअरचे कमकुवत कार्यान्वयन—

अभिप्राय—

३.४५ आदिवासी विकास विभागाने मास्टेक लिमिटेड, मुंबई या संस्थेस रु.४.९६ कोटी एकूण किंमतीवर ई-गव्हर्नन्स ॲप्लीकेशन सॉफ्टवेअर, जे वर्ष २०१२-१३ पासून लागू करावयाचे होते, विकसित करावयाचा कार्यादेश माहे नोव्हेंबर, २०११ मध्ये जारी केला. या ॲप्लिकेशन सॉफ्टवेअरच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना आणि नागरिकांना विविध सेवा त्या शासकीय कार्यालयांना प्रत्यक्ष भेट न देता, ऑनलाईन देणे आणि शासनाची कार्यपद्धती आणखी जास्त प्रभावी, कार्यक्षम आणि पारदर्शक करणे अपेक्षित होते. या ॲप्लिकेशन सॉफ्टवेअरमध्ये तीन मॉडयुल्स आहेत. (i) योजना संनियंत्रण प्रणाली - जी योजना निधीचे नियोजन आणि संनियंत्रण करण्यास मदत करते आणि MIS अहवाल पुरविते, (ii) आश्रमशाळा आणि वसतिगृह व्यवस्थापन प्रणाली - शासकीय आश्रमशाळा आणि वसतिगृहामध्ये प्रवेश घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज करणे सुकर करते आणि (iii) शिष्यवृत्तीचे प्रदान करण्यासाठी प्रणाली - शिष्यवृत्तीचे ऑनलाईन प्रोसेसिंग आणि संवितरण करते.

लेखापरिक्षणादरम्यान, ५२ शासकीय आश्रमशाळा आणि निवडलेल्या ८ प्रकल्प अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील सॉफ्टवेअरच्या नमुना तपासणीत आढळून आले की, मास्टेक या संस्थेने विकसित केलेले पहिले दोन मॉडयुल्स (योजना संनियंत्रण प्रणाली आणि आश्रमशाळा व वसतिगृह व्यवस्थापन प्रणाली माहे जानेवारी, २०१६ पर्यंत क्रियाशिल नव्हते. कारण अपुऱ्या सोयी (विशेषतः इंटरनेट सुविधा) आणि अप्रशिक्षित कर्मचाऱ्यांमुळे आश्रमशाळा आणि वसतिगृहांमध्ये डेटा एंट्री करण्यात येऊ शकत नव्हती. परिणामतः योजना निधीचे नियोजन आणि संनियंत्रण तसेच वसतिगृहांमध्ये ऑनलाईन प्रवेश प्रणाली सुरूच होऊ शकली नाही.तिसऱ्या मॉडयुल्स (शिष्यवृत्ती प्रदानासाठी प्रणाली) मध्ये फक्त मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती योजनेशी सबंधित माहिती ऑनलाईन अद्यावत करण्यात आली होती आणि ' सुवर्ण महोत्सवी आदिवासी पुर्व माध्यमिक शिष्यवृत्ती ' यासह इतर शिष्यवृत्ती योजनांची माहिती माहे डिसेंबर, २०१५ पर्यंत अद्यावत करण्यात आली नव्हती. इ-गव्हर्नन्स प्रकल्प आधिच जवळपास तीन वर्षानी प्रलंबित झाला होता. माहे जानेवारी, २०१६ पर्यत मास्टेक लि., मुंबईला रु.४.७१ कोटी प्रदान करण्यात आले होते.

साक्षी दरम्यान, विभागीय सचिवांनी कथन केले की, एकूण जी तिन ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर आहेत त्यापैकी वसतिगृह व्यवस्थापन आणि भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्तीचे मास्टेक लि., मुंबई या संस्थेने तयार केलेले मॉड्यूल्स आयसीआयसीआय बँकेच्या मदतीने वापरण्यात येत आहे. त्याचप्रमाणे वसतिगृह व्यवस्थापनासाठी देखील हीच प्रणाली वापरात आहे. त्यावर, लेखापरिक्षणात आक्षेपित केल्यानुसार इंटरनेटची सुविधा नसल्याकारणाने सदरहू कार्यप्रणाली क्रियाशिल नसल्याबाबत विभागाने स्पष्टीकरण करावे, असे समितीचे सूचित केले असता समितीस सांगण्यात आले की, काही ठिकाणी इंटरनेटची सुविधा नसल्याने ही प्रणाली कार्यान्वित नव्हती. मात्र बहुतांश ठिकाणी म्हणजेच जिल्हा व तालुका पातळीवरील वसतिगृहांत इंटरनेटची सुविधा उपलब्ध असून ही कार्यप्रणाली कार्यान्वित होती. एकूण तीन संगणकीय कार्यप्रणाली पैकी (Software) पहिल्या कार्यप्रणालीमध्ये आवश्यकतेनुरुप काही अंशी बदल करण्याचे काम सुरू असल्याने अद्यापही सदरहू मॉड्यूल सुरू नाही. आश्रमशाळा आणि वसतिगृह व्यवस्थापन अशा दोन स्वतंत्र बाबी असून वसतिगृह व्यवस्थापनाचे मॉड्यूल्स व्यवस्थित सुरू आहे मात्र नवीन आश्रमशाळा संहितेनुसार आश्रमशाळांसाठीच्या मॉड्यूल्समध्ये काही आवश्यक ते बदल करण्यात येत आहेत. भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती आणि शिक्षण फी प्रणाली हे तीसरे मॉड्यूल्स सन २०१७ पासून सुरू आहे.

शिफारस—

३.४६ आदिवासी विकास विभागाने ' मास्टेक लिमिटेड, मुंबई ' या संस्थेला ' ई-गव्हर्नन्स ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर ' विकसित करण्याचा माहे नोव्हेंबर, २०११ मध्ये कार्यादेश दिला. सदरहू कार्यप्रणाली ही वर्ष २०१२-१३ पासून लागू करावयाची होती. या कार्यप्रणालीमध्ये प्रामुख्याने योजना संनियंत्रण प्रणाली, आश्रमशाळा आणि वसतिगृह व्यवस्थापन प्रणाली आणि शिष्यवृत्तींचे प्रदान करण्यासाठी प्रणाली ही तीन मॉड्यूल्स विकसित करण्यात आली. ५२ शासकीय आश्रमशाळा आणि निवडलेल्या आठ प्रकल्प अधिकाऱ्यांच्या कार्यालयातील सॉफ्टवेअरच्या नमूना तपासणीत आढळल्याप्रमाणे ' योजना संनियंत्रण प्रणाली ' आणि ' आश्रमशाळा व वसतिगृह व्यवस्थापन प्रणाली ' ही दोन मॉड्यूल्स अपूरी इंटरनेटची सुविधा व अप्रशिक्षित कर्मचारी या कारणांमुळे माहे जानेवारी, २०१६ पर्यंत क्रियाशील नव्हते. तर तिसऱ्या शिष्यवृत्तींचे प्रदान करण्यासाठी प्रणालीमध्ये फक्त मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती योजनेशी संबंधित माहिती ऑनलाईन अद्ययावत करण्यात आली होती. मात्र ' सुवर्ण महोत्सवी आदिवासी पूर्व-माध्यमिक शिष्यवृत्ती ' सह इतर शिष्यवृत्ती योजनांची माहिती माहे डिसेंबर, २०१५ पर्यंत अद्ययावत करण्यात आली नव्हती.

साक्षीदरम्यान, समितीस विदित करण्यात आले की, जिल्हा व तालुका पातळीवरील वसतिगृहांमध्ये इंटरनेटची सुविधा आहे. मात्र इतरत्र काही ठिकाणी इंटरनेट सुविधेची कमतरता आहे, ही वस्तूस्थिती आहे. ' योजना संनियंत्रण प्रणाली ' या पहिल्या मॉड्यूल्समध्ये नवीन आश्रमशाळा संहितेमधील नियमांप्रमाणे आश्यकतेनुरुप योग्य असे बदल करण्याचे काम (customization) सुरू आहे. ' आश्रमशाळा आणि वसतिगृह व्यवस्थापन प्रणाली ' या दुसऱ्या मॉड्यूल्समध्ये वसतिगृह व्यवस्थापनाचे मॉड्यूल्स व्यवस्थितपणे सुरू असून आश्रमशाळांकरिता त्यामध्ये आवश्यक ते बदल करणे सुरू आहे. ' शिष्यवृत्तींचे प्रदान करण्यासाठी प्रणाली ' ही तिसरी प्रणाली वर्ष २०१७ पासून सुरू करण्यात आलेली आहे.

विभागाच्या उपरोक्त स्पष्टीकरणाने समितीचे मुळीच समाधान झालेले नाही. वास्तविक, उपरोक्त कार्यप्रणाली ही वर्ष २०१२-१३ पासून क्रियाशील करावयाची होती. त्यासाठी विभागाने सर्वंकष नियोजन करणे आवश्यक होते. मात्र जवळपास रु. ५ कोटी खर्चून देखील आजमितीस सुमारे सहा-सात वर्षे उलटून गेल्यानंतरही सदरहू संगणकिय कार्यप्रणाली पूर्ण क्षमतेने आजही कार्यान्वित झालेली नाही. विभागाची निष्क्रीयता व असंवेदनशिलताच यातून सामोरी येत असून ही बाब गंभीर असून यासंदर्भातील समितीच्या भावना अतिशय तीव्र आहेत. अतः विभागाने उपरोक्तप्रमाणे विकसित केलेली संगणकीय कार्यप्रणाली त्यामध्ये जे आवश्यक बदल करावयाचे आहेत ते तातडीने करून विभागाच्या सर्व आश्रमशाळा व वसतिगृहांत येत्या दोन महिन्यांत पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करावी व केलेल्या कार्यपूर्तीचा अहवाल समितीस सादर करावा, अशी समितीची आग्रही शिफारस आहे.

परिच्छेद क्रमांक २.२.६.३—आदिवासी उपयोजनेंतर्गत झालेल्या कार्याचे मुल्यांकन—

अभिप्राय :

३.४७ मानवी विकास निर्देशांकात स्थायी सुधारणा करून, आदिवासी क्षेत्र आणि इतर क्षेत्रे यांच्यातील अंतर भरून आदिवासींचा सामाजिक - आर्थिक दर्जा सुधारणे, हे आदिवासी उपयोजनेचे उद्दिष्ट आहे. परंतू आदिवासी योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या कामांचे नियतकालीक प्रभाव निर्धारण अथवा मुल्यांकन आदिवासी विकास विभागाद्वारे करण्यात आले नाही. परिणामी, आदिवासी लोकांच्या उन्नतीसाठी घेण्यात आलेल्या विविध कामांचे अथवा योजनांचे उद्दिष्ट साध्य झाले अथवा नाही याची खातरजमा करणे कठीण होते.

सचिव, आदिवासी विकास विभाग यांनी नमूद केले की, टाटा कन्सलटंन्सी सर्व्हिसेसद्वारे मुल्यांकन अभ्यास करण्यात आला आणि त्याचा अहवाल माहे डिसेंबर, २०१५ मध्ये शासनास सादर करण्यात आला आहे.

विभागाच्या लेखी स्पष्टिकरणानुसार समितीच्या असे निदर्शनास आले की, आदिवासी उपयोजनांतर्गत झालेल्या कार्याचे मुल्यांकन संदर्भात टाटा कन्सलटंन्सी सर्व्हीसेसद्वारे मुल्यांकन अभ्यास अहवाल प्राप्त करून त्यावर झालेल्या कार्यवाही संदर्भात स्वतंत्ररित्या अहवाल सादर करण्यात येत आहे. आदिवासी विभागामार्फत राज्यात आदिवासी कल्याणाच्या विविध योजना राबविल्या जातात. सदरच्या योजना इतर विभागांमार्फत देखील राबविल्या जातात. या योजना राबवितांना सदर योजनांची सांख्यिकीय माहिती व संगणिकृत विश्लेषण करणे गरजेचे आहे. यासाठी आदिवासी विकास विभागाकडे कोणतीही तांत्रिक प्रणाली वा मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने डेटा ॲनालिटीक्स आणि प्रकल्प व्यवस्थापन केंद्र (Data Analytics & Project Management Center for TSP Planning) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अंतर्गत संनियंत्रण व मुल्यमापन कक्ष मुंबई येथे स्थापन करण्यात आला आहे. या केंद्राला संलग्न 'तरंग' हे केंद्र आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. केंद्रिय-२०१७/प्र.क्र.८६/का. १९, दिनांक २५ जानेवारी २०१८ अन्वये पुणे विद्यापीठात कार्यान्वित करण्यात येत आहे. या केंद्राच्या माध्यमातून आदिवासी उपयोजनेंतर्गत आदिवासी विकास विभाग व अन्य विभागांकडून प्रतिवर्षी राबविण्यात आलेल्या योजनांचा आदिवासी बांधवांना कितपत लाभ झाला, त्यावर किती लाभार्थ्यांसाठी किती खर्च झाला याविषयी सहजगत्या माहिती मिळणे सुलभ होईल.

साक्षी दरम्यान, विभागीय सचिवांनी प्रतिपादन केले की, टाटा कन्सलटंन्सी सर्व्हिसेस या संस्थेने आश्रमशाळांचे ' अ ', ' ब ', ' क ' आणि ' ड ' असे वर्गीकरण करून त्याची माहिती विभागाकडे दिली. त्यानुसार ' ड ' वर्गातील आश्रमशाळांचे ' क ' वर्गामध्ये, ' क ' वर्गातील आश्रमशाळांचे ' ब ' वर्गामध्ये, ' ब ' वर्गातील आश्रमशाळांचे ' अ ' वर्गामध्ये श्रेणीवर्धन करण्यासाठी विभागस्तरावर कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्यानुसार कार्यवाही सुरू आहे. त्यावर, टाटा कन्सलटंन्सी सर्व्हिसेसने आदिवासी विकास विभागाच्या सर्व लोकाभिमुख योजनांचा आढावा आणि मुल्यमापन करून त्यासंदर्भातील त्यांचे निष्कर्ष काय आहेत अशी समितीने पृच्छा केली असता विभागातर्फे सांगण्यात आले की, उक्त संस्थेकडे फक्त आश्रमशाळांच्या वर्गिकरणाची जबाबदारी सोपविण्यात आलेली होती. योजनांचे मुल्यमापन करण्याचे काम मुंबई स्कूल ऑफ इकोनॉमी व पुणे विद्यापीठ या संस्थांकडून करून घेण्यात येत आहे.

शिफारस—

३.४८ मानवी विकास निर्देशांकात स्थायी सुधारणा करून आदिवासी क्षेत्र आणि इतर क्षेत्रे यांच्यातील अंतर भरून आदिवासींचा सामाजिक - आर्थिक दर्जा सुधारणे, हे आदिवासी उपयोजनेचे उद्दिष्ट आहे. परंतू आदिवासी विकास विभागामार्फत आदिवासी योजनेंतर्गत घेण्यात आलेल्या कामांचे नियतकालिक प्रभाव निर्धारण अथवा मूल्यांकन करण्यात आले नाही. परिणामी, आदिवासी लोकांच्या उन्नतीसाठी घेण्यात आलेल्या विविध कामांचे अथवा योजनांचे उद्दिष्ट साध्य झाले अथवा नाही याची खातरजमा करणे शक्य झालेले नाही. लेखापरिक्षणातील सदरहू निरीक्षण हे निश्चितच मुलभूत व महत्त्वाचे आहे.

विभागाच्या खुलाशात नमूद केल्यानुसार व साक्षी दरम्यान समितीच्या निदर्शनास आल्याप्रमाणे ' टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सर्व्हिसेस ' या संस्थेमार्फत आश्रमशाळांचे मुल्यांकन करून आश्रमशाळांची ' अ ', ' ब ', ' क ', ' ड ' असे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. त्यानुसार ' ड ' वर्गातील आश्रमशाळेचे ' क ' वर्गात, ' क ' वर्गातील आश्रमशाळेचे ' ब ' वर्गात आणि ' ब ' वर्गातील आश्रमशाळेचे ' अ ' वर्गात श्रेणीवर्धन करण्याबाबत कृती आराखडा तयार करण्यात आला असून त्यानुसार कार्यवाही सुरू आहे. त्याशिवाय आदिवासी विभागामार्फत राज्यात आदिवासी कल्याणाच्या विविध योजना राबविल्या जातात. सदरच्या योजना इतर विभागांमार्फत देखील राबविल्या जातात. या योजना राबवितांना सदर योजनांची सांख्यिकीय माहिती व संगणकिकृत विश्लेषण करणे आवश्यक असून यासाठी आदिवासी विकास विभागाकडे कोणतीही तांत्रिक प्रणाली वा मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने ' डेटा ॲनालिटीक्स आणि प्रकल्प व्यवस्थापन केंद्र ' आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या अंतर्गत संनियंत्रण व मुल्यमापन कक्ष, मुंबई येथे स्थापन करण्यात आला आहे. या केंद्राला संलग्न असे ' तरंग ' हे केंद्र आदिवासी विकास विभागाच्या दिनांक २५ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये पुणे विद्यापीठात कार्यान्वित करण्यात येत आहे. त्याशिवाय विभागाने अन्य काही तज्ज्ञ संस्थांची निवड करून त्यांना योजना वाटून देऊन योजनांचे मुल्यमापन सुरू केले आहे.

समितीस उपरोक्तप्रमाणे विदित करण्यात आल्यानुसार विभागाने आदिवासी उपयोजनेंतर्गत सर्व योजनांचे प्रभाव निर्धारण व मुल्यांकनाचे हाती घेतलेले काम निश्चित अशी कालमर्यादा आखून ते सत्वर पूर्णत्वास न्यावे व त्याबाबतची विस्तृत माहिती समितीस सत्वर उपलब्ध करून द्यावी, अशी समितीची शिफारस आहे.

परिशिष्ट-अ

विवरणपत्र क्रमांक १

महाराष्ट्र शासन

लोकलेखा समिती

क्रमांक लेखाप २०१६/प्र.क्र.२६/का-२
आदिवासी विकास विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ३२.
दिनांक :- ३.१०.२०१८

प्रति,

अवर सचिव (लो.ले.स.)
विधानमंडळ,
विधान भवन, मुंबई.

विषय :- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या सामान्य् आण सामाजिक क्षेत्र अहवालातील परि. क्र. २.२ संदर्भात प्रधान सचिव (आवि.) यांची साक्ष

महोदय,

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-१५ या वर्षाच्या सामान्य् आण सामाजिक क्षेत्र अहवालातील परि. क्र. २.२ संदर्भात प्रधान सचिव (आवि.) यांची दि. १८.९.२०१८ रोजी झालेल्या साक्षीमध्ये लोकलेखा समितीने उपसित केलेल्या बांधकाम कक्षाशी (आदिवासी विकास) सबंधीत खालील माहिती सोबत जोडण्यात येत आहे.

१) बांधकाम कक्षासाठीनिर्माण केलेले मनुष्यबळ
२) शासकीय वसतीगृह बांधकाम सद्य: स्थिती
३) जव्हार व डहाणू प्रकल्पातील जमीन प्राप्त झालेल्या आश्रमशाळांच्या बांधकामाची माहिती.

आपला,

(सु. ना. शिंदे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

सोबत वरील प्रमाणे.

प्रत,

कार्यासन २ संग्रहार्थ.

महाराष्ट्र शासन

क्र. विनियो-२०१७/प्र.क्र.८८/बांव्यक,
आदिवासी विकास विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १ ऑक्टोबर, २०१८.

प्रति,

श्री.सु.ना.शिंदे
उपसचिव
आदिवासी विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

विषय :- भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.२ संदर्भात

संदर्भ :- १) आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई का.२ यांचे पत्र क्र. लेखाप २०१६/प्र.क्र.२६/का.२ दि. २४.०९.२०१८

वरील संदर्भांकित पत्रान्वये मागविण्यात आलेली माहिती सोबत सादर करण्यात येत आहे.

सहपत्र :- वरीलप्रमाणे

(रा.क. खटके)
मुख्य अभियंता, महाराष्ट्र शासन.

प्रत:-

१) मा.प्र.स,आ.वि.वि, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

आदिवासी विकास विभागांतर्गत शासकीय आश्रमशाळा/ वसतिगृहे यांच्या बांधकाम व देखभालीकरीता सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गतचे विभाग/ उपविभाग आदिवासी विकास विभागाकडे समर्पित करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक बांधकाम विभाग
शासन निर्णय क्र. ईएसटी २०१६/प्र.क्र.६२/प्रशासन-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : ११ नोव्हेंबर, २०१६

संदर्भ : १) आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र.शाआशा २०१५/प्र.क्र.९८/ का-१३, दिनांक १४.७.२०१६

प्रस्तावना :-

महाराष्ट्र राज्यात आदिवासी विकास विभागांतर्गत एकूण ५२९ शासकीय आश्रमशाळा व ४९१ शासकीय वसतिगृहे कार्यरत आहेत. सद्य:स्थितीत २०६ आश्रमशाळा व ५४ वसतिगृहाच्या इमारतींचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरु आहे. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत इतर विभागाप्रमाणेच शासकीय आश्रमशाळा व वसतिगृह इमारत बांधकामे व देखभाल दुरुस्त्या करण्यात येतात. परंतु बांधकामाचे प्राकलने तयार करणे, तांत्रिक मान्यता देणे, निविदा मागविणे व प्रत्यक्ष बांधकाम करणे तातडीने होवून वसतिगृहामधील विद्यार्थ्यांना मुलभुत सुविधांपासून वंचित रहावे लागू नये याकरीता शासकीय आश्रमशाळा/ वसतिगृहांची बांधकामे व देखभाल दुरुस्तीच्या कामाचे संनियंत्रण करण्यासाठी आदिवासी विकास विभागांतर्गत स्वतंत्र -बांधकाम व्यवस्थापन कक्ष॰ स्थापन करण्याच्या प्रस्तावास मंत्रिमंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार आदिवासी उपयोजनेमधील आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृहाच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील काही सा.बां.विभाग व उपविभाग समर्पित स्वरुपात जोडण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

शासकीय आश्रमशाळा व वसतिगृहाच्या बांधकामासाठी व वसतिगृहाची बांधकामे व देखभाल व दुरुस्तीसाठी शासन निर्णय आदिवासी विकास विभाग दि. १४.७.२०१६ अन्वये स्वतंत्र -बांधकाम व्यवस्थापन कक्ष॰ स्थापन करण्यात आलेला असून यासाठी मुख्य अभियंता यांचे १ पद व अधीक्षक अभियंता यांचे नाशिक व नागपूर येथे प्रत्येकी १ प्रमाणे २ पदे व अन्य १८ पदांच्या पदनिर्मितीस मान्यता देण्यात आलेली आहे. आदिवासी विभागांतर्गत आश्रमशाळा व वसतिगृहाची कामे प्राथम्याने पूर्ण करण्याच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिपत्याखालील कार्यरत कार्यकारी अभियंता यांच्या संनियंत्रणामधील सार्वजनिक बांधकाम विभाग (P.W.Division) व उपविभाग (P.W.Sub-Divisions) समर्पित स्वरुपात (Dedicated) जोडणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने राज्यातील एकूण कार्यरत विभाग व उपविभागाचा आढावा घेवून आदिवासी विकास विभागांतर्गत स्थापन करण्यात आलेल्या नागपूर व नाशिक येथील मंडळ कार्यालयांसाठी खालील सार्वजनिक बांधकाम विभाग व उपविभाग समर्पित स्वरुपात जोडण्यात येत आहेत.

अ.क्र.		सध्याच्या विभागाची व उपविभागाची नांवे (*जुने नांव कंसात दर्शविले आहे.)	मुख्यालय	प्रस्तावित कार्यक्षेत्र
अ	.	अधीक्षक अभियंता, सा.बां. (आदिवासी) मंडळ नाशिक	नाशिक	नाशिक, पुणे व कोकण प्रादेशिक विभागातील आदिवासी क्षेत्र
	१	सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, धुळे (*मार्ग प्रकल्प विभाग, धुळे)	धुळे	नाशिक, धुळे , जळगांव, अहमदनगर, नंदुरबार, पुणे जिल्हे
	i)	सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग नाशिक (*मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.३, नाशिक)	नाशिक	नाशिक, सिन्नर, येवला, निफाड, इगतपुरी, दिंडोरी, पेठ, त्र्यंबकेश्वर
	ii)	सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग, कळवण (*मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.१,धुळे)	कळवण	कळवण, सुरगाणा मालेगाव, चांदवड, नांदगांव, देवळा, बागलाण
	iii)	सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग, तळोदा (*मार्ग प्रकल्प उपविभाग, शहादा)	शहादा	अक्राणी, अक्कलकुवा, तळोदा, धडगाव
	iv)	सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग, धुळे (दुष्काळी प्रकल्प उपविभाग, धुळे)	धुळे	धुळे, साक्री, शिरपूर, सिंदखेडा व जळगांव जिल्हा
	v)	सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग, नंदुरबार (*मार्ग प्रकल्प उपविभाग, नंदुरबार)	नंदूरबार	नंदुरबार, शहादा, नवापुर
	vi)	सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग, संगमनेर (*मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.८ संगमनेर)	संगमनेर	पुणे व अहमदनगर जिल्हा
	२	सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, ठाणे (*मार्ग प्रकल्प विभाग, कोकण भवन)	कोकण भवन	ठाणे, पालघर व रायगड जिल्हा
	i)	सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग शहापूर (*मार्ग प्रकल्प उपविभाग क्र. १, ठाणे)	शहापूर	ठाणे, अंबरनाथ, शहापूर, मुरबाड, कल्याण, भिवंडी, मुंबई व मुंबई उपनगर, रायगड जिल्हे
	ii)	सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग डहाणू (*मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.२, ठाणे)	डहाणू	पालघर, डहाणू, तलासरी, वसई
	iii)	सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग, जव्हार (*पूल पाहणी उपविभाग क्र.५, कोकण भवन)	जव्हार	जव्हार,वाडा, मोखाडा, विक्रमगड
ब	.	*अधीक्षक अभियंता, सा.बां.* (आदिवासी) मंडळ, *नागपूर*	नागपूर	नागपूर, अमरावती, औरंगाबाद प्रादेशिक विभागातील आदिवासी क्षेत्र

	१	<u>सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, चंद्रपूर</u> (*मार्ग प्रकल्प विभाग, चंद्रपूर)	चंद्रपूर	नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, वर्धा जिल्हे
	i)	**सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग, नागपूर** (*सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.३ भंडाराचे स्थानांतरण)	नागपूर	नागपूर, उमरेड, सावनेर, रामटेक, हिंगणा,वर्धा देवरी, सडक अर्जुनी, तिरोडा, सालेकसा,आमगाव भंडारा, तुमसर, साकोली, लाखनी, मोहाडी
	ii)	**सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग, गडचिरोली** (*सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२ गडचिरोली -- मूळ मार्ग प्रकल्प उपविभाग गडचिरोली--सा.बां. विभाग क्र.१ गडचिरोली अंतर्गतचे)	गडचिरोली	गडचिरोली, वडसा, आरमोरी, कुरखेडा, धानोरा, चार्मोशी, कोरची
	iii)	**सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग,आलापल्ली** (*विशेष प्रकल्प उपविभाग क्र.२ सिरोंचा - विशेष प्रकल्प विभाग सिरोंचा अंतर्गतचे स्थानांतरण)	आलापल्ली	अहेरी, सिरोंचा, मुलचेरा भामरागड, एटापल्ली
	iv)	**सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग, चंद्रपूर** (*मार्ग प्रकल्प उपविभाग क्र.१ चंद्रपूर- मार्ग प्रकल्प विभाग चंद्रपूर अंतर्गतचे स्थानांतरण)	चंद्रपूर	चंद्रपूर, राजुरा, कोरपना, मुल, सावली, सिंदेवाही, गोंडपिंपरी, बल्लारपुर, पोंभुर्णा, जिवती, गडचांदुर चिमुर, वरोरा, भद्रावती, नागभीड, ब्रम्हपुरी
	२	<u>सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) विभाग, अमरावती</u> (*सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.२ अमरावती)	अमरावती	अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळ, हिंगोली, नांदेड जिल्हे
	i)	**सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग,धारणी** (*सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र.२ धारणी)	धारणी	अमरावती, धारणी, चिखलदरा, मोर्शी, तिवसा, वरुड अकोला, वाशिम व बुलढाणा जिल्हे
	ii)	**सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग, झरीजामणी** (*सार्वजनिक बांधकाम उपविभाग, झरी जामणी)	झरीजामणी	उमरखेड, महागांव, नेर, पुसद, दारव्हा, दिग्रस, आर्णी मारेगाव, यवतमाळ, कळंब, राळेगांव, बाभुळगांव, केळापुर, घाटंजी, वणी, झरीजामणी
	iii)	**सार्वजनिक बांधकाम (आदिवासी) उपविभाग, किनवट** (*सा.बां.उपविभाग क्र.२, किनवट)	किनवट	किनवट, बिलोली, मुखेड, मुदखेड, माहुर, भोकर, उमरी तसेच हिंगोली व परभणी जिल्हे

२. सांगली, सातारा, कोल्हापुर, सोलापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, उस्मानाबाद, औरंगाबाद, जालना, बीड व लातूर या जिल्हयातील आदिवासी क्षेत्र व कामे ही विखुरलेल्या स्वरुपात व तुलनात्मक अत्यल्प असल्याने सदर कामे कोणत्या विभाग / उपविभागाकडे सोपवावी, याबाबत आदिवासी विकास विभाग निर्णय घेईल.

३. ज्या उपविभागांकडे कार्यालये उपलब्ध नसतील त्या उपविभागांसाठी कार्यालय उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही संबंधित प्रकल्प अधिकारी यांची असेल. त्यांनी त्यांच्या कार्यालयाच्या इमारतीत सार्वजनिक बांधकाम आदिवासी उपविभागासाठी जागा उपलब्ध करुन द्यावी. अथवा भाडेपट्टयाने कार्यालये उपलब्ध करुन द्यावीत व भाडेपट्टी ही संबंधित प्रकल्प अधिकाऱ्यांनी अदा करावी,

४. उंपरोक्तप्रमाणे पुनर्रचना करुन आदिवासी विकास विभागाकडे विभाग-उपविभाग वर्ग केल्यानंतर उपरोक्त सर्व विभाग/ उपविभागामधील कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या आस्थापनाविषयक बाबी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधित परिमंडळ कार्यालयाकडून हाताळण्यात येतील. तसेच उपरोक्त नमूद केल्यानुसार कार्यकारी अभियंता यांचे नियंत्रणाखालील पुनर्रचनेप्रमाणे बांधकाम विभाग व उपविभाग कार्यालयांतर्गत अधिकारी /कर्मचाऱ्यांचा वेतनावरील खर्च पूर्वीप्रमाणेच सार्वजनिक बांधकाम विभागाकडून मंजूर लेखाशिर्षाखालील तरतूदीतून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय हा आदिवासी विकास विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय **दिनांक १ डिसेंबर, २०१६** पासून अंमलात येईल. तत्पूर्वी उपरोक्त तक्त्यातील विभाग / उपविभागांनी सार्वजनिक बांधकाम विभागासंबंधित दस्तऐवज संबंधित सार्वजनिक बांधकाम मंडळाकडे हस्तांतरित करावा.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६११०३१७०२४८९४१८ असा आहे. सदर आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Archana Vilas Walzade

Digitally signed by Archana Vilas Walzade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Desk Officer, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Archana Vilas Walzade
Date: 2016.11.11 16:52:53 +05'30'

(अ.वि. वालझाडे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री, (सार्वजनिक बांधकाम)यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
२. मा. राज्यमंत्री, (सार्वजनिक बांधकाम)यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
३. प्रधान सचिव (सार्वजनिक बांधकाम) मंत्रालय, मुंबई
४. सचिव (रस्ते), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
५. सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
६. सचिव,आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२
७. सर्व मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,
८. मुख्य अभियंता, आदिवासी बांधकाम कक्ष
९. सर्व सहसचिव, उप सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१०. सर्व अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग.
११. सर्व अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय ,मुंबई
१२. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१३. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य ,मुंबई/नागपूर

१४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
१५. अधिदान व लेखा अधिकारी, वान्द्रे (पूर्व), मुंबई
१६. सर्व कक्ष अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
१७. कार्यासन प्रशासन-१, सार्वजनिक बांधकाम विभाग (निवड नस्ती).

शासकीय आदिवासी वसतिगृहाची अर्थसंकल्पीय कामे - नाशिक विभाग

अ.क्र.	प्रकल्पाचे नांव	कामांचे नांव/कामाची संख्या प्रगतीपथावरील कामे	प्र.मा.रक्कम	कार्यारंभ आदेश दिनाक	काम पुर्ण होण्याचा दिनांक
१	२	३	४	५	६
१	यावल	मुलांचे एरंडोल	४४७.९६	२७-०८-२०१७	३१-०१-२०१९
२	नंदुरबार	मुलींचे चिंचपाडा	४९८.७८	१८-०५-२०१६	३१-०३-२०१९
३	नंदुरबार	मुलींचे नवापुर	४९९.७८	१७-०४-२०१८	३१-०३-२०१९
४	कळवण	मुलींचे सुरगाणा	३२९.२८	१७-०९-२०१८	३१-०३-२०१९
५	ठाणे	मुलींचे ठाकरपाडा,तलासरी (नविन	४९२.६३	१६-०२-२०१७	१५-०८-२०१८ काम प्रगतीत
६	यावल	मुलांचे पाल	४९७.३५	--	-
७	नाशिक	मुलांचे येवला	४५३.४१	२१-०८-२०१७	३१-०३-२०१९
८	नाशिक	मुलींचे येवला	४६२.३०	२१-०८-२०१७	३१-०३-२०१९
९	यावल	मुलांचे जळगांव (१२५)	४९८.६४	२१-०८-२०१७	३१-०३-२०१९
१०	यावल	मुलींचे जळगांव (७५)	४४७.९६	२१-०८-२०१७	३१-०३-२०१९
११	यावल	मुलींचे जळगांव	३४४.११	-	-

अ.क्र.	प्रकल्पाचे नांव	कामांचे नांव/कामाची संख्या प्रगतीपथावरील कामे	प्र.मा.रक्कम	कार्यारंभ आदेश दिनाक	काम पुर्ण होण्याचा दिनांक
१	२	३	४	५	६
१२	राजूर	मुलांचे श्रीरामपुर	३९६.४३	१४-०३-२०१८	१३-०३-२०२०
१३	राजूर	मुलींचे श्रीरामपुर	३९३.४३	१४-०३-२०१८	१३-०३-२०२०
१४	नंदुरबार	मुलांचे शहादा	७२९.२५	३०-०५-२०१७	-
१५	धुळे	मुलींचे शिंगावे-२	२६०.७९	२४-०३-२०१८	३१-१२-२०१८
१६	धुळे	मुलांचे शिंगावे -३	१९९.३७	२४-०३-२०१८	३१-१२-२०१८
१७	कळवण	मुलांचे मालेगांव	३२५.७२	०८-०१-२०१३	०७-०१-२०१५
१८	कळवण	मुलींचे मालेगांव	१७२.०५	०३-०१-२०१२	०२-०१-२०१४
१९		मुलींचे नेरळ	३९९.००	०७-०८-२०१८	०७-११-२०१९
२०	राजूर	मुला/मुलींचे राजुर (पाणी पुरवठा)	४०.२५	--	--
२१	कळवण	मुलींचे सटाणा (७५)	१०६.०० + ३९०.९२	४१०५७.००	३१-०३-२०१९
२२	कळवण	मुलींचे सटाणा (जुने) (२५०)	३०४.१०+४५८.५१	४१०५७.००	३१-०३-२०१९
२३	नंदुरबार	मुलींचे नदुरबार (जुने)	४६९.८५	१२-०६-२०१६	३०-१०-२०१८

अ.क्र.	प्रकल्पाचे नांव	कामांचे नांव/कामाची संख्या प्रगतीपथावरील कामे	प्र.मा.रक्कम	कार्यारंभ आदेश दिनाक	काम पुर्ण होण्याचा दिनांक
१	२	३	४	५	६
२४	ठाणे	मुलींचे पनवेल	३२२.००		
२५	तळोदा	मुलांचे खापर	२९५.१०	१७-०६-२०१६	३०-१०-२०१८

शासकीय आदिवासी आदिवासी वसतिगृहाची अर्थसंकल्पीय कामे - नागपूर विभाग

अ.क्र.	कामाचे नांव	प्रकल्प	प्र.मा. किंमत	प्र.मा. दिनांक	कार्यारंभ दिनांक	काम पूर्ण होण्याचा दिनांक	कालावधी	कामाची सद्यस्थिती
१	२	३	४	५	६		७	८
१	मुलांचे वसतीगृह, कोरची (चौकीदार वर्ग-४ निवासस्थान)	गडचिरोली	१७.८४	०३-०६-२०१५	२७-१०-२०१६	२६-०४-२०१७	६ महिणे	काम पुर्ण व हस्तांतरीत
२	मुलींचे वसतीगृह, मुलचेरा	अहेरी	२२२.२८		०४-१२-२०१३	३१-०८-२०१८	१८ महिणे	काम पुर्ण व मीटर लावणे बाकी.
३	मुलांचे वसतीगृह, ता. मुलचेरा	अहेरी	२२२.२८		०६-११-२०१३	३१-०८-२०१८	१८ महिणे	काम पुर्ण व मीटर लावणे बाकी.
४	मुलांचे वसतीगृह, सिंदेवाही	चंद्रपुर	३१५.४९		१०-०८-२०१६	३१-१०-२०१८		सा.बां. आदिवासी विभागकडे हस्तांतरीत ,आरसीसी वर्क पुर्ण,प्लास्टर व फोरींग प्रगतीत.
५	मुलींचे वसतीगृह, ता. सिंदेवाही	चंद्रपुर	३०९.१२		२७-०९-२०१६	३१-१०-२०१८		सा.बां. आदिवासी विभागकडे हस्तांतरीत , आरसीसी वर्क पुर्ण,प्लास्टर व फोरींग प्रगतीत.
६	मुलींचे वसतीगृह, चंद्रपुर क्र. १	चंद्रपुर	४९९.४६		१८-०३-२०१६	३१-०७-२०१८ काम पूर्ण व हस्तांतरीत		इमारत काम पुर्ण, किरकोळ कामे प्रगतीत, विदयूतीकरणाचे काम प्रगतीत.
७	मुलींचे वसतीगृह, चंद्रपुर क्र. २	चंद्रपुर	४९९.४६		१८-०३-२०१६	३१-०७-२०१८ काम पूर्ण व हस्तांतरीत		इमारत काम पूर्ण किरकोळ कामे प्रगतीत, विदयूतीकरणाचे काम प्रगतीत.
८	मुलींचे वसतीगृह, मुल	चंद्रपुर	२१४.०१			जागा उपलब्ध नसल्याने काम सुरु झाले नाही.		जागेची निश्चिती करीता प्रकल्प अधिकारी यांचे कडे प्रलंबीत.
९	मुला-मुलींचे वसतीगृह गडचिरोली (ग्रंथालय व संगणक कक्ष)	गडचिरोली	५००.००	१५-०३-२०१६	३१-०३-२०१७	०१-१०-२०१८	१५ महिणे	फिनीशींगचे काम प्रगतीत.
१०	मुलींचे वसतिगृह, अर्जूनी मोरगांव जि. गोंदिया	देवरी	३५२.६६	२९.०७.२०१५	२३-०३-२०१६	२२-०९-२०१७		आरसीसी वर्क पुर्ण,विटांची जुडाई प्रगतीत.
११	मुलांचे वसतिगृह,अर्जूनी मोरगांव जि. गोंदिया	देवरी	३५२.४८	२९.०७.२०१६	२३-०३-२०१६	२२-०९-२०१७		आरसीसी वर्क पुर्ण,विटांची जुडाई प्रगतीत.
१२	मुलींचे शासकीय वसतीगृह, तुमसर	भंडारा	१७२.०५				काम पूर्ण व हस्तांतरीत	
१३	मुलांचे शासकीय वसतीगृह, तुमसर	भंडारा	१७२.०५					
१४	मुलांचे शासकीय वसतीगृह, चिमुर	चंद्रपूर	२६१.२९					
१५	मुलींचे शासकीय वसतीगृह भद्रावती	चिमूर	४९७,२४		१८-०३-२०१६		३०-११-२०१८	
१६	मुलांचे वसतिगृह, हिंगणघाट	नागपूर	२५६.२८	१९.०१.२०१३	२५-०३-२०१५		२५.०३.२०१५	जिल्हाधिकारी, नागपूर यांनी जागा बदलून दिली आहे. सुदतवाढ प्रस्ताव सादर केला आहे.
१७	मुलांचे वसतिगृह, पी-२, कळमना, नागपूर	नागपूर	४९३.३३	६.१२.२०१०				
१८	मुलींचे वसतिगृह, मूलचेरा (संरक्षण भिंत)	अहेरी	४०.७०	०३.०६.२०१५	२८-०१-२०१६			काम पूर्ण व हस्तांतरीत
१९	मुलांचे वसतिगृह, चातगांव ता. धानोरा	चंद्रपूर	२८०.००	०१-०९-२०१४	१६-०३-२०१५			काम पूर्ण व हस्तांतरीत
			३५०५.०८					

शासकीय आदिवासी वसतिगृहांची अर्थसंकल्पीय कामे - अमरावती विभाग

अ.क्र.	कामाचे नाव	प्रकल्प	प्र.मा. किंमत	प्र.मा. दिनांक	कार्यारंभ दि.	काम पूर्ण होण्याचा दि.	कामाचे सद्यस्थिती विवरण
१	२	३	४	५	६	७	८
१	शा.मुलांचे वसतीगृह क्र.२ , रहाटगांव अमरावती	धारणी	४९९.७०	जिल्हाधीकारी, अमरावती यांचे पत्र क्र.नि-२०१५/प्र.अ.धारणी /जिवाआऊयो/२०१५-१६/२१८८, दि. २९/१२/२०१५	--	--	--
२	शा.मुलांचे वसतीगृह क्र.३ , रहाटगांव अमरावती	धारणी	४९९.७०		--	--	--
३	शा. मुलांचे वसतीगृह क्र.१ , परतवाडा	धारणी	४०९.१०	शासन पत्र क्र. आवागृ-२०१६ प्र.क्र.९३/का-०५/आदिवासी , दिनांक ०६/१०/२०१६	१६.०८.२०१८	फेब्रवारी, २०२०	निविदा प्रक्रीयेत
४	शा. मुलांचे वसतीगृह क्र.२ , परतवाडा	धारणी	३८९.२३	शासन पत्र क्र. आवागृ-२०१६ प्र.क्र.९३/का-०५/आदिवासी , दिनांक ०६/१०/२०१६	२०.०८.२०१८	फेब्रवारी, २०२०	निविदा प्रक्रीयेत
५	शा. मुलींचे वसतीगृह क्र.१ , परतवाडा	धारणी	३९५.२८	शासन पत्र क्र. आवागृ-२०१६ प्र.क्र.९३/का-०५/आदिवासी , दिनांक ०६/१०/२०१६	२०.०८.२०१८	फेब्रवारी, २०२०	निविदा प्रक्रीयेत
६	शा. मुलींचे वसतीगृह क्र.२, परतवाडा	धारणी	३८९.२३	--	२०.०८.२०१८	फेब्रवारी, २०२०	निविदा प्रक्रीयेत
७	शा. मुलांचे वसतीगृह मोर्शी	धारणी	४२४.१७	जिल्हाधीकारी, अमरावती यांचे पत्र क्र. प्रनियो/२०१४/प्रअधारणी/जिआऊया/ २०१४-१५/४१३ दि. ०२/०३/२०१५	०५.०१.२०१६	१२ महिने	सा.बां. विभाग अमरावती यांचेमार्फत अंतीम टप्प्यात
८	शा. मुलांचे वसतीगृह क्र.१, अकोला शा. मुलांचे वसतीगृह क्र.२, अकोला	अकोला	४९९.८३	जिल्हाधीकारी, अकोला यांचे पत्र क्र. २३जिआऊया/ २०१५-१६/ प्र.शा/निधी/२०२३, दि. २९/०३/२०१६	१९.०३.२०१८	१८ महिने	पायव्याचे काम प्रगतीत. उप वास्तुशालश यांच्या वास्तुमांडणी आराखडा प्रस्ताव सादर.
९	शा.मुलांचे वसतीगृह बुलढाणा (कोलयड)	अकोला	३८३.८२	--	--	--	सा.बां. विभाग बुलडाणा मार्फत प्रगतीत
१०	शा. मुलींचे वसतिगृह क्र. १, नवसारी, अमरावती	धारणी	४९९.९५	जिल्हाधिकारी, अमरावती यांचे पत्र क्र. नि-२०१५/प्र.अ.धारणी/जिवाआऊयो/२०१५-१६	१४.०४.२०१६	१८ महिने	-
			८८३.६५				

शासकीय आदिवासी वसतिगृहाची अर्थसंकल्पीय कामे - ठाणे विभाग

अ. क्र.	कामाचे नाव	प्रकल्प	प्र.मा. किंमत	प्र.मा. दिनांक	कार्यादेश दि	कालावधी	कामाचे सद्यस्थिती विवरण
१	२	३	४	५	६	७	८
१	मुलींचे शासकीय वस्तीगृह, ठाकरपाडा ता. तलासरी जि. पालघर	डहाणू	४९५.६२	०५-०९-२०१५	१६-०२-२०१७	१८ महिने	काम अवळपास पूर्ण
२	आदिवासी मुलींचे शासकीय वस्तीगृह, नेरळ ता. कर्जत जि. रायगड	पेण	३९९.००	२१-०१-२०१६	-	१५ महिने	निविदास्तर
३	मुलींचे शासकीय वस्तीगृह, पनवेल जि. रायगड	पेण	३२२.००	-	-	-	काम हस्तांतरण
४	मुलांचे शासकीय वस्तीगृह, ठाणे (१००० पैकी ३२८) मिरा भाईंदर) जि. ठाणे	शहापूर	२०२१.०४	-	-	-	अंदाजपत्रक पूर्ण

लोकलेखा समिती, विधान मंडळ, विधान भवन, मुंबई येथे दि.१८/०९/२०१८ रोजी प्रधान सचिव (आदिवासी) विभाग यांच्या साक्षीमध्ये उपस्थित झालेल्या मुदयाची पुर्तता अहवाल
कार्यकारी अभियंता (आदिवासी) विभाग, ठाणे यांच्या कार्यक्षेत्रातील आश्रमशाळांची माहिती

मुददा क्रमांक	अ.क्रं	आश्रमशाळेचे नाव	प्रकल्प	मूळ प्र.मा. वर्ष	जागा उपलब्ध झाल्याचे वर्ष	सुधारीत प्रशासकीय मान्यता व प्र.मा यांची सद्यास्थिती
१	२	३	४	५	६	७
४	१	कळंभे	जव्हार	२०१०	२०१४	प्रकल्प अधिकारी, कार्यालयाकडून २०१० मधील प्रशासकीय मान्यता २०१५ मध्ये व्यपगत झाल्यामुळे जागा मिळाल्यानंतर २०१७-१८ च्या दरानी रु. १४८९.४३ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रकाला प्र.मा. मिळाल्यानंतर सदरहू काम डिसेंबर, २०१८ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करुन सुरु करण्याचे नियोजन आहे.
	२	आमगावं	जव्हार	२०१०	२०१४	प्रकल्प अधिकारी, कार्यालयाकडून २०१० मधील प्रशासकीय मान्यता २०१५ मध्ये व्यपगत झाल्यामुळे जागा मिळाल्यानंतर २०१७-१८ च्या दरानी रु. १४८९.४३ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रकाला प्र.मा. मिळाल्यानंतर सदरहू काम डिसेंबर, २०१८ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करुन सुरु करण्याचे नियोजन आहे.
	३	ओझर	जव्हार	२०१०	२०१२	रु. ६६३.२५ लक्ष प्रशासकीय मान्यता ३६४.०० लक्ष निधी उपलब्ध तथापि सदहू जागा टेकडीवर असल्यामुळे शाळा इमारतीचे नवीन नकाशे मुख्य वास्तुशास्त्रज्ञांकडून तयार करुन घेण्यात आले. सदरहू काम नोव्हे. २०१८ पासून सुरु करण्याचे नियोजन आहे.
	४	सायवन	डहाणू	२०१०	२०१२	प्रकल्प अधिकारी, कार्यालयाकडून २०१० मधील प्रशासकीय मान्यता २०१५ मध्ये व्यपगत झाल्यामुळे जागा मिळाल्यानंतर २०१७-१८ च्या दरानी रु. ९३३.८९ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रकाला प्र.मा. मिळाल्यानंतर सदरहू काम डिसेंबर, २०१८ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करुन सुरु करण्याचे नियोजन आहे.
	५	आंबेसरी	डहाणू	२०१०	२०१४	प्रकल्प अधिकारी, कार्यालयाकडून २०१० मधील प्रशासकीय मान्यता २०१५ मध्ये व्यपगत झाल्यामुळे जागा मिळाल्यानंतर २०१७-१८ च्या दरानी रु. ९९४.५२ लक्ष किंमतीचे अंदाजपत्रकाला प्र.मा. मिळाल्यानंतर सदरहू काम डिसेंबर, २०१८ च्या अर्थसंकल्पात समाविष्ट करुन सुरु करण्याचे नियोजन आहे.
	६	वरखंडा	डहाणू	२०१०		भूखंडाचा सर्वे क्रमांक चुकीचा असल्यामुळे जागेची निश्चिती झालेली नाही जागेची निश्चिती झाल्यानंतर प्रशासकीय मान्यतेबाबत कार्यवाही करण्यात येईल.

परिशिष्ट-ब

बुधवार, दिनांक ६ जून, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक ६ जून, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरू होऊन दुपारी ३-२५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख :

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(८) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(९) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१०) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(११) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१२) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.,

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

(१) श्रीमती संगिता चौरे, प्रधान महालेखाकार, मुंबई.

(२) श्री. सतिश वासनिक, उप महालेखाकार, नागपूर.

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग (ले. व को.).

विभागीय प्रतिनिधी :

आदिवासी विकास विभाग :

(१) श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.२ या संदर्भात प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांची साक्ष घेतली.

बुधवार, दिनांक २० जून, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक बुधवार, दिनांक २० जून, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४-१५ वाजता स्थगित झाली.

कार्यकारी समिती प्रमुख :

(१) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. शंभूराज देसाई, वि.स.स.

(७) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(८) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(९) श्री. विजय उर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१०) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(११) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि. अ.,

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

श्री. पार्डीकर, उपमहालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग (ले. व को.).

विभागीय प्रतिनिधी :

आदिवासी विकास विभाग :

(१) श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.२ या संदर्भात प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांची साक्ष घेतली.

सोमवार, दिनांक २० ऑगस्ट, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक सोमवार, दिनांक २० ऑगस्ट, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४-३० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(८) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(९) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१०) श्री. शंभूराज देसाई, वि.स.स.

(११) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१२) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१४) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री.अ.चां.कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री.सो.न.सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

श्री. राजदिप सिंह, महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त विभाग (ले. व को.).

विभागीय प्रतिनिधी :

आदिवासी विकास विभाग :

(१) श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.२ या संदर्भात प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक १८ सप्टेंबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १८ सप्टेंबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन सायंकाळी ४-०५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(५) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(६) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

श्री. पार्डीकर, उप महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग.

विभागीय प्रतिनिधी :

आदिवासी विकास विभाग :

(१) श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.२ या संदर्भात प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांची साक्ष घेतली.

गुरूवार, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरूवार, दिनांक ४ ऑक्टोबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२-३० वाजता सुरू होऊन दुपारी ३.१५ वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(६) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(७) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(८) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(९) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

(४) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

श्रीमती हेमा मुनिवेंकटप्पा, महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग.

विभागीय प्रतिनिधी :

आदिवासी विकास विभाग :

डॉ. किरण कुलकर्णी, आयुक्त, आदिवासी विकास विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.२ या संदर्भात आयुक्त, आदिवासी विकास विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १६ ऑक्टोबर, २०१८ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २-३० वाजता सुरू होऊन दुपारी ३-४५वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(३) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(४) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(५) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(३) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

निमंत्रित :

महालेखाकार कार्यालय :

श्रीमती हेमा मुनिवेंकटप्पा, महालेखाकार, नागपूर

वित्त विभाग :

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग.

विभागीय प्रतिनिधी :

आदिवासी विकास विभाग :

(१) श्रीमती मनिषा वर्मा, प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग.

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.२ या संदर्भात प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग यांची साक्ष घेतली.

मंगळवार, दिनांक १८ जून, २०१९

लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १८ जून, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे सायंकाळी ४-०० वाजता सुरू होऊन सायंकाळी ५-०० वाजता स्थगित झाली.

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

सदस्य :

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. शंभूराज देसाई, वि.स.स.

(५) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(८) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

विशेष निमंत्रित

(१०) श्री. प्रसाद लाड, वि.प.स.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :-

(१) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा जि.अ.

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

(३) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

(४) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१४-२०१५ या वर्षाच्या सामान्य आणि सामाजिक क्षेत्र अहवालातील आदिवासी विकास विभागासंदर्भात समितीने तयार केलेला प्रारूप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई